
## डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# बुद्ध आणि त्याचा धम्म



# भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म



डॉ. बाबासाहेब आंबेडकर

*BAIAE,Japan. Digital Publication*

# भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म



डॉ. बाबासाहेब आंबेडकर

*BAIAE,Japan. Digital Publication*

# भारतरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

M.A., PH.D.,D.SC., LL.D., D.LITT., BAR-AT-LAW



**जन्मः १४ एप्रिल१८९१**

**धम्मदीक्षाः अशोकविजयादशमी १४ ऑक्टोबर १९५६**

**महापरीनिर्वाणः ६ डिसेंबर १९५६**

परिचय.21

उपोद्घात........................................................................23

प्रथम खंड: सिद्धार्थ गौतम-बोधिसत्व बुद्ध कसे झाले?.24

भाग पहिला: जन्मापासून परिव्रज्ये पर्यंत..25

१. कूळ........................................................................*25*

२. पूर्वज.*25*

३. जन्म........................................................................*26*

४. असितमुनीचे आगमन.*28*

५.महामायेचा मृत्यू........................................................................*30*

६. बालपण आणि शिक्षण.*31*

७. सुरुवातीची लक्षणे........................................................................*31*

८. विवाह.*34*

९. पुत्राला वाचविण्याच्या पित्याच्या योजना.*35*

१०. राजपुत्राला वश करण्यात स्त्रियांचे अपयश.*36*

११. महामंत्र्याकडून  राजपुत्राची समजूत........................................................................*38*

१२. राजपुत्राचे महामंत्र्यास उत्तर........................................................................*40*

१३. शाक्य संघात प्रवेश........................................................................*41*

१४. संघाशी संघर्ष.*42*

१५. देशत्यागाची तयारी........................................................................*44*

१६. मार्ग सापडला-परिव्रज्या.*46*

१७. निरोप *47*

१८. गृहत्याग........................................................................................................*49*

१९. राजपुत्र आणि त्याचा सेवक.*51*

२०. छन्न परतला ...................................................................................................*54*

२१. शोकाकुल कुटुंब...............................................................................................*54*

भाग दुसरा: कायमचा संसारत्याग.....................................................................57

१. कपिलवस्तूहून राजगृहाकडे प्रयाण.*57*

२. राजा बिंबीसाराचा उपदेश.*57*

३. गौतमाचे बिंबिसारास उत्तर *(पूर्वार्ध).60*

४. गौतमाचे उत्तर *(उत्तरार्ध) 63*

५. शांततेची वार्ता.*65*

६. नव्या परिस्थितीतील समस्या.*66*

भाग तिसरा: नव्या प्रकाशाच्या शोधात.67

१. भृगुऋषींच्या आश्रमात.......................................................................................*67*

२. सांख्य तत्वज्ञानाचा अभ्यास..............................................................................*68*

३. सभाधि-मार्गाचे शिक्षण.*69*

४. वैराग्याची कसोटी ...........................................................................................*70*

५. वैराग्याचा त्याग................................................................................................*72*

भाग चवथा: ज्ञानप्राप्ती आणि नव्या मार्गाची दृष्टी.74

१. नव्या प्रकाशासाठी चिंतन.*74*

२. ज्ञानप्राप्ती ........ 75

३. नव्या धम्माचा शोध ........ 76

४. बोधिसत्व गौतम सम्यक संबोधीनंतर 'बुद्ध' होतात.76

भाग पाचवा: बुद्ध आणि त्यांचे पूर्वकालीन.79

१. बुद्ध आणि वैदिक ऋषि.79

२. तत्ववेत्ता कपिल.81

३. ब्राम्हणे ........ 83

४. उपनिषदे आणि त्यांची शिकवण.87

भाग सहावा: बुद्ध आणि त्यांचे समकालीन.88

१. बुद्धाचे समकालीन ........ 88

२. समकलीनांविषयी बुद्धाची वृत्ती..89

भाग सातवा: साम्य आणि भेद.91

१. बुद्धाने काय त्याज्य ठरविले ?.91

२. बुद्धाने कोणते बदल केले? ........ 91

३. बुद्धाने काय स्वीकारले? ........ 92

द्वितीय खंड: धम्मदीक्षेची मोहीम.1

भाग पहिला: भगवान बुद्ध आणि त्यांचा विषादयोग.2

१. धर्मोपदेश करावा की करू नये ?.2

२. ब्रम्ह सहंपती सुवार्ता जाहीर करतो 3

३. धम्मदीक्षेचे दोन प्रकार ........ 4

भाग दुसरा: परिव्राजकांची धम्मदीक्षा.6

१. सारनाथ येथे आगमन........................................*6*

२. बुद्धाचे पहिले प्रवचन.*6*

३. भगवान बुद्धाचे पहिले प्रवचन--विशुद्धी मार्ग.*8*

४. भगवान बुद्धाचे पहिले प्रवचन *(*चालू*)* --अष्टांगिक मार्ग किंवा सदाचाराचा मार्ग.*9*

५. भगवान बुद्धाचे पहिले प्रवचन--शीलमार्ग *(* चालू *).12*

६. भगवान बुद्धाचे पहिले प्रवचन *(*पूर्ण*).13*

७. परिव्राजकांची प्रतिक्रिया.*15*

भाग तिसरा: उच्चकुलीन आणि पवित्र व्यक्तींची धम्मदीक्षा.17

१. यशसची धम्मदीक्षा........................................*17*

२. काश्यप बंधूंची धम्मदीक्षा........................................*18*

३. सारीपुत्त आणि मोग्गलान यांची धम्मदीक्षा.*21*

४. राजा बिंबिसाराची धम्मदीक्षा.*23*

५. अनाथपिंडकाची धम्मदीक्षा *25*

६. राजा प्रसेनजित याची धम्मदीक्षा.*27*

७. जीवकाची धम्मदीक्षा........................................*29*

८. रट्ठपालाचे धर्मांतर.*30*

भाग चवथा: घरचे निमंत्रण.35

१. शुद्धोदनाची शेवटची भेट........................................*35*

२. यशोधरा व राहुल यांची भेट........................................*37*

३. शाक्यांनी केलेले स्वागत........................................................................................*38*

४. बुद्धाला गृहस्थाश्रमी बनविण्याचा शेवटचा प्रयत्न.*40*

५.भगवान बुद्धाचे उत्तर ........................................................................................*41*

६.मंत्र्याचे प्रत्युत्तर........................................................................................*42*

७. भगवान बुद्धाचा मनोनिग्रह *44*

भाग पाचवा: धम्मदीक्षेच्या मोहिमेस पुन्हा सुरुवात.45

१. खेडवळ ब्राम्हणांना धम्मदीक्षा ........................................................................................*45*

२. उत्तरावतीच्या ब्राम्हणांना धम्मदीक्षा ........................................................................................*46*

भाग सहावा: कनिष्ठ आणि सामान्यजनांची धम्मदीक्षा.48

१. उपाली न्हाव्यास धम्मदीक्षा........................................................................................*48*

२. सुनीत नावाच्या भंग्यास धम्मदीक्षा........................................................................................*48*

३. सोपाक आणि सुप्पीय या अस्पृश्यांना धम्मदीक्षा.*49*

४. सुमंगल इत्यादि हीन जातीतील लोकांना धन्मदीक्षा.*50*

५. महारोगी सुप्रबुद्धाची धम्मदीक्षा ........................................................................................*50*

भाग सातवा: स्त्रियांची धम्मदीक्षा.52

१. महाप्रजापती गौतमी, यशोधरा आणि तिच्या मैत्रिणी यांना धम्मदीक्षा *52*

२. चंडालिका प्रकृतीची धम्मदीक्षा.*54*

भाग आठवा: पतित व गुन्हेगार यांची धम्मदीक्षा.57

१. एका उडाणटप्पूची धम्मदीक्षा........................................................................................*57*

२. अंगुलीमाल नावाच्या दरोडेखोराची धम्मदीक्षा ........................................................................................*57*

३. इतर गुन्हेगारांची धम्मदीक्षा......................................................................................*60*

४. धम्मीक्षेची जोखीम......................................................................................................*61*

## तृतीय खंड: भगवान बुद्धाने काय शिकविले?.1

भाग पहिला: धम्मामध्ये बुद्धाचे स्थान.2

१. भगवान बुद्धाने आपल्या धम्मात स्वत:साठी विशेष स्थान राखलेले नाही.*2*

२. बुद्धाने मोक्षदानाचे आश्वासन दिले नाही. तो म्हणे, मी 'मार्गदाता' आहे, 'मोक्षदाता' नव्हे..*3*

३. भगवान बुद्धाने स्वत:संबंधी अथवा आपल्या धममासंबंधीअपौरुषेयतेचा दावा मांडला नाही. त्याचा धम्ममाणसाने माणसासाठी शोधून काढलेला आहे. तो अपौरुषेय म्हणजे साक्षात्कारी स्वरूपाचा नाही..*6*

भाग दुसरा: भगवान बुद्धाच्या धम्मसंबंधी.......................................................................8

१. इतरांच्या मताने बुद्धाने काय शिकविले ?.*8*

२. भगवान बुद्धाने स्वत: केलेले वर्गीकरण.*9*

भाग तिसरा: धम्म म्हणजे काय ?.10

१. जीवन-शुचिता राखणे म्हणजे धम्म.*10*

२. जीवनात पूर्णता साधणे म्हणजे धम्म होय.*12*

३. निब्बाण प्राप्त करणे हा धम्म आहे *13*

४. तृष्णा-त्याग म्हणजे धम्म ........................................................................................*16*

५. सर्व संस्कार अशाश्वत आहेत असे मानणे म्हणजे धम्म.*17*

६. 'कर्म' हे जगातील नैतिक व्यवस्थेचा आधार आहेहे मानणे म्हणजे धम्म.*19*

भाग चवथा: अधम्म म्हणजे काय? .........................................................................22

१. दैवी चमत्कृतीवर विश्वास ठेवणे म्हणजे अधम्म !.*22*

२. ईश्वरावर विश्वास हे धम्माचे आवश्यक अंग नव्हे.*23*

३. ब्रम्ह-सायुज्यावर भाधारीत धर्म अधर्म आहे *26*

४. आत्म्यावरील विश्वास हा अ-धर्म आहे *29*

५. यज्ञयागावर विश्वास ठेवणे हा अधम्म आहे *33*

६. काल्पनिक अनुमानावर आधारलेला धर्म, हा धर्मच नव्हे..*36*

७. धर्मग्रंथांचे केवळ पठण म्हणजे धर्म नव्हे *38*

८. 'धर्म पुस्तके' प्रमादातीत आहेत असे मानणे म्हणजे अधर्म आहे..*40*

भाग पाचवा: सद्धम्म म्हणजे काय? ........................................................................43

१. मनाची मलिनता दूर करणे.*43*

२. जग हे धम्मराज्य बनविणे.*44*

*(ख)* धर्म हा तेव्हाच सद्धम्म असतो जेव्हा तो सर्वांना ज्ञानाचा मार्ग मोकळा करतो..*47*

१. धम्माला सद्धम्माच रूप येण्यासाठी त्याने प्रजेला उत्तेजन दिले पाहिजे. जेव्हा धम्म विद्या सर्वांस मोकळी करतो तेव्हा तो सद्धम्म होय..........................................................................47

२. धम्म जेव्हा केवळ विद्या पुरेशी नाही, कारण त्यामुळे पोकळ पांडित्य निर्माण होते, असे शिकवितो तेव्हा त्याला सद्धम्मरूप प्राप्त होते 49

३. धम्म जेव्हा प्रजेची आवश्यकता शिकवितो तेव्हा तो सद्धम्मरूप पावतो 50

*( ग )* धम्माला सद्धम्मरूप प्राप्त व्हावयाला त्याने मैत्रीला उत्तेजन दिले पाहिजे..*51*

१. केवळ प्रजा ही पुरेशी नसून तिच्यासमवेत शीलही असले पाहिजे असे धम्म जेव्हा शिकवितो तेव्हाच तो सद्धम्मरूप पावतो..........................................................................52

२. धम्म जेव्हा प्रज्ञा आणि शील ह्यांच्याशिवाय करुणेची आवश्यकता प्रतिपादतो तेव्हाच तो सद्धम्मरूप पावतो..........................................................................52

३. जेव्हा धम्म करुणेपेक्षाही मैत्रीचे महत्त्व अधिक प्रतिपादतो तेव्हा सद्धम्मरूप पावतो 53

*( घ )* धम्माला सद्धम्मरूप येण्यासाठी त्याने सामाजिक भेदाने उत्पन्न झालेले निर्बंध नाहीसे केले पाहिजेत.*56*

१. धम्मालाला सद्धम्मरूप प्राप्त व्हायला त्याने माणसामाणसांत भेद करणारे अडसर मोडून काढले पाहिजेत 56

२. धम्माला सद्धम्मरूप यावयाला त्याने माणसाचे मोठेपण त्याच्या जन्मावरून नव्हे तर कार्यावरून ठरवावे; अशी शिकवण दिली पाहिजे.59

३. धम्माला सद्धम्मरूप यावयाला त्याने ( धम्माने ) माणसामाणसांमधील समतेच्या भावनेची अभिवृद्धी केली पाहिजे.61

# चतुर्थ खंड: धर्म ( Religion ) आणि धम्म.1

## भाग पहिला: धर्म ( Religion) आणि धम्म.2

१. धर्म *( Religion)* म्हणजे काय *?.2*

२. धम्म धर्मापासून *(Religion)* वेगळा कसा *?.3*

३. धर्माचे प्रयोजन आणि धम्माचे प्रयोजन.*4*

४. धर्म आणि धम्म यांमधील इतर भेद भगवान आणि पोट्ठपद यांच्यामधील संवादांत व्यक्त झाले आहेत........................................................................................................................*6*

५. नीति आणि धर्म *( Religion ) 7*

६. धम्म आणि नीति.*7*

७. केवल नीति पुरेशी नाही. ती पवित्र आणि सर्वव्यापक असली पाहिजे.*8*

## भाग दुसरा: पारिभाषिक शब्दसाम्यामुळे होणारे मौलिक भेद कसे अस्पष्ट राहतात ? 11

पुनर्जन्म.*11*

१. प्रास्ताविक 11

२. पुनर्जन्म कशाचा 11

३. पुनर्जन्म कोणाचा ? 14

कर्म.*16*

१. बौद्ध आणि ब्राम्हणी कर्मसिद्धान्त समान आहेत काय ? 16

२. गतकर्माचा भविष्य जन्मावर परिणाम होतो असे बुद्ध मानतो काय ? 17

३. गतकर्मांचा भविष्यजीवनावर परिणाम होतो, असे बुद्ध मानतो काय ? ( पुढे चालू ) 20

अहिंसा.*21*

१. अहिंसेचे भिन्न अर्थ आणि तिचे आचरण 21

२. अहिंसेचा खरा अर्थ 22

संसरण........................................................................................................................*23*

१. आत्म्याचा एका देहातून दुसर्या देहात प्रवेश (संसरण) 23

२. गैरसमजुतीचे कारण-..........................................................................................24

भाग तिसरा: बौद्ध जीवन मार्ग.27

१. सत, असत् आणि पाप.*27*

२. लोभ आणि तृष्णा.*28*

३. क्लेश आणि द्वेष.*29*

४. क्रोध आणि वैर.*30*

५. मनुष्य, मन आणि मनोमल.*31*

६. आपण आणि आत्मविजय.*32*

७. प्रज्ञा, न्याय आणि सत्संगती.*33*

८. विवेकशीलता आणि एकाग्रता.*36*

९. जागरूकता, कळकळ आणि धयैं *(अप्रमाद आणि वीयर्य).36*

१०. दु:ख आणि सुख; दान आणि कर्म.*37*

११. ढोंग......*38*

१२. सम्यक मार्गनुसरण.*38*

१३. सद्धर्म आणि असद्धर्म यांचा संकर करु नका.*40*

भाग चवथा: बुद्धाची प्रवचने......41

गुहस्थासाठी प्रवचन......*41*

१. सुखी गुहस्थ......41

२. पुत्रापेक्षा कन्या बरी......41

३. पती आणि पत्नी 42

शील परिपालनाच्या आवश्यकतेवरील प्रवचने.*42*

१. माणसाची अधोगती कशाने होते ?......42

२. दुष्ट मनुष्य......43

३. सर्वोत्तम पुरुष.44

४. ज्ञानी पुरुष......44

५. न्यायी आणि सज्जन असा पुरुष 45

६. शुभकर्मांची (कुशल कर्मांची) आवश्यकता 46

७. शुभ संकल्पाची आवश्यकता......46

सदाचरणावरील प्रवचने......*47*

१. सदाचरण म्हणजे काय ?......47

२. सदाचरणाची आवश्यकता......49

३. सदाचार आणि जगाचे अधिकार 49

४. सदाचरणात परिपूर्णता कशी साधता येईल ? 51

५. सदाचरणाच्या मार्गावर सहचार्यासाठी वाट पाहण्याची आवश्यकता नाही 52

निब्बाणावरील प्रवचने.*54*

१. निब्बाण म्हणजे काय ? 54

२. निब्बाणाची मूलतत्वे 54

धम्मावरील प्रवचने ........................................................................................................*56*

१. सम्यक दृष्टीला प्रथम स्थान का ? ...........................................................................56

२. मृत्यूत्तर जीवनाची चिंता कशाला करा ? 56

३. देवाची प्रार्थना किंवा त्याचे आवाहन करणे हे व्यर्थ आहे 57

४. विशिष्ट अन्नसेवनाने मनुष्य पवित्र होत नाही 57

५. अधोगतीचे कारण दुष्कर्मे, अन्न नव्हे 58

६. देहप्रक्षालन पुरेसे नाही ........................................................................................60

७. पवित्र जीवन म्हणजे काय? 60

सामाजिक व राजकीय प्रश्नांवरील प्रवचने.*61*

१. राजकृपेवर अवलंबून राहू नका...............................................................................61

२. जर राजा धार्मिक असेल तर त्याची प्रजा धार्मिक होते 61

३. राजकीय आणि लष्करी शक्ती समाजव्यवस्थेवर अवलंबून असते 62

४. युद्ध हा चुकीचा मार्ग आहे 63

५. शान्ती स्थापन करणार्या जेत्याची कर्तव्ये 64

## पंचम खंड: संघ.....................................................................1

भाग पहिला: संघ.2

१. संघ आणि त्याची संघटना.*2*

२. संघप्रवेश........................................................................................................................*2*

३. भिक्खु आणि त्याच्या प्रतिज्ञा *4*

४. भिक्खू आणि धार्मिक दोष.*4*

५. भिक्खु आणि प्रतिबंध *5*

६. भिक्खु आणि शिष्टाचाराचे नियम *5*

७. भिक्खु आणि दोषपरीक्षा.*5*

८. भिक्खु आणि अपराध स्वीकृती.*6*

भाग दुसरा: भिक्खू आणि त्यांच्याविषयी भगवान बुद्धाची कल्पना.8

१. भिक्खू कसा असावा यासंबंधी बुद्धाची कल्पना.*8*

२. भिक्खु आणि तपस्वी.*9*

३. भिक्खु आणि ब्राम्हण.*12*

४. भिक्खु आणि उपासक.*13*

भाग तिसरा: भिक्खुची कर्तव्ये.16

१. भिक्खुची नवदीक्षितांसंबंधी कर्तव्य.*16*

२. धम्मदीक्षा ही चमत्काराने करावयाची नाही ..........................................................................*17*

३. धम्मपरिवर्तन हे बळाने करावयाचे नसते.*19*

४. भिक्खु धम्मप्रचारासाठी झटले पाहिजे.*21*

भाग चवथा: भिक्खू आणि उपासक.22

१. भिक्षापाश.*22*

२. परस्परावरील परिणाम.*22*

३. भिक्खूचा धम्म आणि उपासकाचा धम्म *23*

भाग पाचवा: उपासकासाठी नियम.26

१. धनवंतासाठी विनय.*26*

२. गुहस्थासाठी विनय.*27*

३. पुत्रांसाठी विनय.*29*

४. शिष्यासाठी विनय.*29*

५. पति-पत्नीसाठी विनय.*30*

६. धनी व सेवक यांसाठी विनय.*30*

७. निष्कर्ष.*30*

८. कन्येसाठी विनय.*31*

षष्ठ खंड: भगवान बुद्ध आणि त्यांचे समकालीन.1

भाग पहिला: भगवान बुद्ध व त्यांचे समर्थक.2

१. बिम्बिसार राजाचे दान.*2*

२. अनाथपिण्डिकाचे दान.*3*

३. जीवकाचे दान ........ *4*

४. आम्रपालीचे दान ........ *4*

५. विशाखेची दानशूरता.*6*

भाग दुसरा: भगवान बुद्धाचे विरोधक.9

१. मोहाकर्षणाने धम्मदीक्षा देण्याचा आरोप.*9*

२. परोपजीवी असल्याचा आरोप........................................................................................*10*

३. सुखी संसार उध्वस्त केल्याचा आरोप.............................................................................*11*

४. जैन तीर्थक आणि प्राणघाताचा आरोप.*11*

५. जैन तीर्थक आणि अनैतिकतेचा आरोप.*12*

६. देवदत्त, चुलत भाऊ आणि शत्रू.*14*

७. ब्राम्हण आणि भगवान बुद्ध.*15*

भाग तिसरा: भगवान बुद्धाच्या धम्माचे टीकाकार.20

१. संघातील मुक्त प्रवेशाचे टीकाकार ...............................................................................*20*

२. व्रत-नियमाचे टीकाकार.*20*

३. अहिंसा-तत्वाचे टीकाकार.*21*

४. शीलप्रचार आणि दुःखनिर्मितीबाबत टीका.*23*

( १ ): दुःख हे निराशाजनक आहे 23

( २ ): अशाश्वतता हे निराशेचे कारण 24

( ३ ): बौद्ध धम्म निराशावादी आहे काय? 24

५. 'आत्मा' आणि 'पुनर्जन्म' तत्त्वांचे टीकाकार..*25*

६. विनाशवादी असल्याबद्दल टीका.*26*

भाग चवथा: भगवान बुद्धाचे मित्र आणि चाहते.27

१. धनंजनी ब्राम्हणीची भक्ती..........................................................................................*27*

२. विशाखेची दृढ श्रद्धा.*28*

३. मल्लिकेची श्रद्धा *30*

४. गर्भवती मातेची तीव्र अभिलाषा.*32*

५. केनियाचे स्वागत.*33*

६. राजा प्रसेनजितची स्तुती.*34*

## सप्तम खंड: भ्रमणिकाची अंतिम यात्रा 1

### भाग पहिला: निकटवर्तीयांच्या भेटी.2

१. धम्मप्रचाराची केंद्र....................*2*

२. त्यांच्या भेटीची स्थाने....................*2*

३. माता-पुत्राची आणि पति-पत्नींची अंतिम भेट.*3*

४. पिता-पुत्रांची अंतिम भेट.*4*

५. भगवान बुद्ध आणि सारिपुत्त ह्यांची अंतिम भेट.*4*

### भाग दुसरा: वैशालीचा निरोप 7

१. वैशालाली प्रणाम....................*7*

२. पावा येथे वास्तव्य....................*8*

३. कुशिनारा येथे आगमन.*8*

### भाग तिसरा: महा परिनिर्वाण.10

१. वारसाची नियुक्ती.*10*

२. अन्तिम धर्म-दीक्षा.*11*

३. अन्तिम शब्द.*12*

४. शोकग्रस्त आनन्द....................*14*

५. मल्लांचा विलाप आणि एका भिक्खूची प्रसन्नता. *16*

६. अन्तिम संस्कार. *17*

७. रक्षेसाठी संघर्ष. *17*

८. बुद्ध-भक्ती ........................................................................................................................ *18*

## अष्टम खंड: त्यांचे व्यक्तिमत्त्व. 1

### भाग पहिला: त्यांचे व्यक्तिमत्त्व. 2

१. त्यांची देहाकृती ........................................................................................................................ *2*

२. प्रत्यक्ष पाहिलेल्यांची साक्ष. *3*

३. त्यांचे नेतृत्व-सामर्थ्य. *3*

### भाग दुसरा: त्यांची मानवता ........................................................................................ 5

१. त्यांची करुणा- महाकारुणिकता. *5*

२. दु:खितांचे दु:खहरण-दु:खांचा उपशमनकर्ता. *5*

( १ ): विशाखेचे सान्त्वन 6

( २ ): किसा-गौतमीचे सान्त्वन 6

३. रुग्णांबद्दल चिंता. *7*

४. असहिष्णुंच्या बाबतीत त्यांची उदारता. *10*

५. समता आणि समान व्यवहाराचे समथर्न. *12*

### भाग तिसरा: त्यांची आवड-नावड. 14

१. त्यांना दारिद्र्य नापसंत होत. *14*

२. त्यांना संग्राहक वृत्ती नापसंत होती ........................................................................................ *14*

३. त्यांची सौंदर्याची आवड. *15*

४. त्यांची सौंदर्याबद्दल आसक्ती *16*

उपसंहार ........................................................................ 18

१. भगवान बुद्धांच्या महत्तेची प्रशंसा ........................................................................ 18

२. त्यांच्या धम्माचा प्रसार करण्याची प्रतिक्षा. 20

३. भगवान बुद्धांच्या स्वदेशप्रत्यागमनासाठी प्रार्थना. 21

# परिचय

भारतीय जनतेच्या काही वर्गात बौद्ध धर्माबद्दल आस्था वाढत असल्याची लक्षणे दृष्टोत्पत्तीस येत आहेत. त्याबरोबरच स्वाभाविकपणे भगवान बुद्धांचे जीवन व शिकवण ह्यांच्या सुलभ आणि स्पष्ट निवेदनाबद्दलही मागणी वाढत आहे.

भगवान बुद्धांचे जीवन आणि शिकवण सुसंगतपणे व संपूर्णत: सादर करणे हे जो बौद्ध नाही त्याला साध्य होणे कठिण आहे. निकायांवर अबलंबून राहून बुद्धाची जीवनकथा सुसंगतपणे सादर करण्याचा जेव्हा आपण प्रयत्न करतो तेव्हा ती किती कठिण गोष्ट आहे हे प्रत्ययास येते. त्याहूनही त्यांच्या शिकवणीचा काही भाग सादर करणे अधिक अडचणीचे आहे असे आढळते. जगात जेवढे धर्मसंस्थापक होऊन गेले त्यांत बौद्धधर्माच्या संस्थापकाचे जीवन व शिकवण सादर करण्यात जी अडचण निर्माण होते ती गोंधळून टाकणारी नसली तरी पुष्कळ अवघड आहे, असे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही. हे प्रश्न सोडवावे आणि बौद्धधर्म समजून घेण्याचा मार्ग मोकळा करावा हे आवश्यक नाही काय? जे बौद्धधर्मीय आहेत त्यांनी निदान साधारण चर्चेसाठी तरी हे प्रश्न मांडावेत आणि त्यांवर त्यांना जितका प्रकाश टाकता येईल तेवढा टाकावा ह्यासाठी अजून योग्य वेळ आली नाही काय? ह्या प्रश्नावर चर्चा व्हावी म्हणून ते इथे उद्धृत करण्याचे मी योजीत आहे.

पहिला प्रश्न भगवान बुद्धांच्या जीवनातील एका मुख्य घटनेबद्दलचा आहे. ती म्हणजे परिव्रज्या. भगवान बुद्धांनी परिव्रज्या का ग्रहण केली? ह्याचे पारंपारिक उत्तर म्हणजे, त्यानी मृत देह, रुग्ण आणि जराजर्जर मनुष्य पाहिला म्हणून. वरवर पाहताही हे उत्तर हास्यास्पद वाटते. बुद्धाने आपल्या वयाच्या एकोणतिसाव्या वर्षी परिव्रज्या ग्रहण केली. ह्या तीन दृश्यांची परिणती म्हणुन जर त्याने परिव्रज्या ग्रहण
केली असली तर ही तीन दृश्ये तत्पूर्वी त्याला कधी कशी दिसली नाहीत? ह्या शेकड्यांनी घडणार्या नेहमीच्या घटना आहेत, आणि त्या तत्पूर्वी बुद्धांच्या सहजच नजरेस न येणे असंभाव्य होते. त्याने त्या ह्याच वेळी प्रथम पाहिल्या हे पारंपारिक स्पष्टीकरण मान्य करणे अशक्य आहे. हे स्पष्टीकरण विश्वासार्ह नाही आणि ते बुद्धीलाही पटत नाही. पण मग हे जर त्या प्रश्नाचे उत्तर नसेल तर खरे उत्तर तरी कोणते?

दुसरा प्रश्न चार आर्य-सत्यांनी निर्माण केला आहे. बुद्धाच्या मूळ शिकवणीत त्यांचा अंतर्भाव होतो काय? हे सूत्र बौद्धधर्माच्या मुळावरच आघात करते. जीवन हे जर दुःख आहे, मृत्यु हे जर दुःख आहे, आणि पुनर्जन्म हे जर दुःख आहे तर सर्व काही संपलेच म्हणायचे. ह्या जगात सुखप्राप्तीसाठी धर्म किवा तत्वज्ञान माणसाला कधीच उपयोगी पडणार नाही. जर दुःखापासून मुक्ती नसेल तर धर्म काय करू शकणार?
जन्मापासूनच जे दुःख अस्तित्वात येते अशा दुःखापासून मानवाची सुटका करण्यासाठी बुद्ध तरी काय करू शकेल? अबौद्धांनी बौद्धधर्माचा स्वीकार करण्याच्या मार्गात ही चार आर्य-सत्ये हा एक मोठाच अडथळा आहे. कारण चार आर्य-सत्ये मानवाला आशा नाकारतात. ही चार आर्य-सत्ये बुद्धाच्या आचारतत्वांना निराशावादी ठरवतात. ही आर्य-सत्ये मूळ शिकवणीत अंतर्भूत आहेत काय, की ती भिक्खूंनी नंतर दिलेली जोड आहे?

तिसरा प्रश्न आत्मा, कर्म आणि पुनर्जन्म ह्या तत्वांबद्दलचा आहे. बुद्धाने आत्म्याचे अस्तित्व नाकारले आहे; पण त्याने कर्म आणि पुनर्जन्म ह्यांबद्दलची तत्वे दृढतया प्रतिपादन केली आहेत असे सांगितले जाते. मग लगेच प्रश्न उपस्थित होतो, जर आत्मा नाही तर कर्म कसे असू शकेल? जर आत्मा नाही तर पुनर्जन्म कसा असू शकेल? हे

गोंधळ निर्माण करणारे प्रश्न आहेत. बुद्धाने कर्म आणि पुर्नजन्म हे शब्द कोणत्या अर्थी वापरले? त्या काली ब्राम्हण वापरत त्यापेक्षा निराळ्या अर्थी हे शब्द त्याने वापरले काय? असे जर असेल तर कोणत्या अर्थी? ब्राम्हण वापरत त्याच अर्थी त्याने हे वापरले काय? असे जर असेल तर आत्म्याचा अस्वीकार आणि कर्म व पुर्नजन्म ह्यांचे दृढ प्रतिपादन ही भयानक विसंगती नाही काय? ही विसंगती उकलण्याची आवश्यकता आहे.

चौथा प्रश्न भिक्खूसंबंधीचा आहे. भिक्खू निर्माण करण्यात बुद्धाचा काय हेतू होता? एक पूर्ण पुरुष निर्माण करणे हा हेतू होता काय? की जनतेज्या सेवेला आपले आयुष्य वाहिलेला आणि त्यांचा मित्र, मार्गदर्शक आणि तत्वज्ञ असलेला एक समाजसेवक निर्माण करणे हा हेतू होता? हा एक अगदी महत्वाचा प्रश्न आहे. त्यावर बौद्धधर्माचे भवितव्य अवलंबून आहे. जर भिक्खू हा केवळ पूर्ण पुरुष असेल तर बौद्धधर्माज्या प्रसाराला तो उपयोगी होत नाही. कारण जरी तो पूर्ण पुरुष असला तरी तो स्वार्थी पुरुष आहे. उलटपक्षी जर समाजसेवक असला तर बौद्धधर्मास तो आशाजनक होऊ शकेल. ह्या प्रश्नाचा निर्णय तात्विक सुसंगतीच्या हितापेक्षा बौद्धधर्माच्या भवितव्याच्या हिताच्या दृष्टीने केला पाहिजे.

मला आशा वाटते की, माझे प्रश्न वाचकांत चेतना निर्माण करतील, आणित्यांची उकल करण्यासाठी हातभार लावण्यास प्रवृत करतील.

# उपोद्‌घात

प्रचलित आणि पूर्वानुभवात काही तरी सुसंवाद साधावा, भावना आणि विचार ह्याच्या गरजा पूर्ण करील अशी परिस्थिती निर्माण व्हावी आणि भवितव्याला सामोरे जाण्यासाठी आत्मविश्वास प्राप्त व्हावा ह्यासाठी मानवाला आपल्या चालू आणि परंपरागत समजुती आणि कल्पनांचा वेळोवेळी पुनर्विचार करणे भाग पडते. अलिकडे व्यावहारिक व तात्विक महत्त्वाच्या दृष्टीने समीक्षेचा किंवा शास्त्रीय अन्वेषणाचा विषय म्हणून धर्माचे आकर्षण जर वाढले असेल तर त्याची कारणे अशी आहेत : (अ ) शास्त्रीय ज्ञान व विचार ह्यांची जलद प्रगती ; (ब) विषयाबद्दलची सखोल बौद्धिक आवड ; (क) धर्मात सुधारणा किंवा त्याची पुनर्रचना करण्याची किंवा अधिक 'तर्कसिद्ध' व 'शास्त्रीय' किंवा कमी 'अंधश्रद्धे ' च्या विचारप्रणालीची त्याऐवजी स्थापना करण्याची जगात सर्वत्र दिसणारी प्रवृत्ती आणि (ड ) धर्मावर प्रभाव करणार्या किंवा धर्माने प्रभावित होणार्या एका प्रकारच्या सामाजिक, राजकीय आणि आंतरराष्ट्रीय घटनांचा परिणाम. जेव्हा एखाद्या कार्याचे किंवा परिस्थितिचे नैतिक किंवा सदसद्विचारविषयक मूल्य संभ्रमित असते तेव्हा धर्माच्या महत्त्वाबद्दलचा प्रश्न उपस्थित होतो आणि सर्व खळबळजनक अनुभव धार्मिक किंवा इतर मुलतत्त्वांचा पुनर्विचार करण्यास निश्चित भाग पडतात. अखेरिस न्याय, दैव, देव व विश्वासंबंधीचे प्रश्न निर्माण होतात आणि तदनुषंगाने धार्मिक आणि इतर विचारांच्या परस्परसबंधाचे प्रश्न सर्वसामान्य ज्ञानाची साधारण आणि 'अनुभव' व 'सत्य' त्यांच्या व्यावहारिक कल्पना ह्याबद्दलचेही प्रश्न त्यात गुंतले जातात.

( एनसायक्लोपीडिया ऑफ रिलीजन अँड एथिक्स, खंड १० पृ. ६६९ )

# प्रथम खंड: सिद्धार्थ गौतम-बोधिसत्व बुद्ध कसे झाले?

भाग पहिला - जन्मापासून परिव्रज्ये पर्यंत.

भाग दुसरा - कायमचा संसार त्याग.

भाग तिसरा - नव्या प्रकाशाच्या शोधात.

भाग चवथा - ज्ञानप्राप्ति आणि नव्या मार्गाची दृष्टी.

भाग पाचवा - बुद्ध आणि त्यांचे पूर्वकालीन.

भाग सहावा - बुद्ध आणि त्यांचे समकालीन.

भाग सातवा - साम्य आणि भेद.

# भाग पहिला: जन्मापासून परिव्रज्ये पर्यंत.

## १. कूळ

१. ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकात उत्तर भारतात सार्वभौम असे एक राज्य नव्हते.
२. संबंध देश निरनिराळ्या अनेक लहानमोठ्या राज्यात विभागला गेला होता. त्यांपैकी काही राज्यांवर एका राजाची सत्ता होती, तर काहींवर एका राजाची सत्ता नव्हती.
३.राजाची सत्ता असलेली राज्ये संख्येने एकूण सोळा होती. त्यांची नावे - अंग, मगध, काशि, कोशल, व्रजी, मल्ल, चेदी, वत्स, कुरु, पांचाळ, मत्स्य, सौरसेन, अश्मक, अवंती, गांधार आणि कंबोज ही होत.
४. ज्या राज्यांवर राजाची अधिसत्ता नव्हती ती ही होत -कपिलवस्तूचे शाक्य, पावा व कुशीनारा येथील मल्ल, वैशालीचे लिच्छवी, मिथिलेचे विदेह, रामग्रामचे
कोलिय, अल्लकपचे बळी, रेसपुत्तचे कलिंग, पिप्पल्वनाचे मौर्य आणि ज्यांची राजधानी सिसुमारगिरी होती ते भग्ग.
५. ज्या राज्यांवर राजाची सत्ता होती त्या राज्यांना जनपद म्हणत व ज्यावर राजाची सत्ता नव्हती त्या राज्यांना ‘संघ’ किंवा ‘गणराज्य’ असे म्हणत असत.
६.कपिलवस्तु येथील शाक्यांच्या शासनपद्धतीविषयी विशेष अशी माहिती मिळत नाही. या राज्याची शासनव्यवस्था प्रजासत्ताक होती की त्यावर काही विशिष्ट लोकांची लोकांची सत्ता होती हे समजत नाही.
७. तथापि, हे मात्र निश्चित की, शाक्यांच्या गणतंत्र राज्यात अनेक राजवंश होते व ते आळीपाळीनेन राजसत्ता चालवीत होते.
८. अशा प्रकारे राजसत्ता चालविणाऱ्या राजघराण्याच्या प्रमुखाला 'राजा' अशी संज्ञा होती.
९. सिद्धार्थ गौतमाच्या जन्माच्या वेळी राजपद धारण करण्याची पाळी शुद्धोधनाची होती.
१०. शाक्यांचे राज्य भारतवर्षाच्या ईशान्य कोपऱ्यात बसले होते. ते एक स्वतंत्र राज्य होते. परंतु कालांतराने कोशल देशाच्या राजाने शाक्यांवर आपले आधिपत्य प्रस्थापित करण्यात यश मिळविले.
११. कोशलाधिपतीच्या अधिसत्तेमुळे शाक्यांना कोशल राजाच्या अनुज्ञेखेरीज आपल्या राजसत्तेचे काही अधिकार वापरणे अशक्य झाले होते.
१२. तत्कालीन राज्यात कोशलराज्य हे एक सामर्थ्यशाली राज्य होते. मगधाचेही राज्य तसेच प्रबळ होते. कोशल देशाचा राजा पसेनदी (प्रसेनजित) व मगध देशाचा राजा बिंबिसार हे सिद्धार्थ गौतमाचे समकालीन होते.

## २. पूर्वज

१. शाक्यांच्या राजधानीचे नाव ‘कपिलवस्तु’ हे होते. कदाचित हे नाव थोर बुद्धिवादी तत्ववेत्ता कपिलमुनी याच्या नावावरुन पडलेले असावे.

२. कपिलवस्तुमध्ये जयसेन नावाचा एक शाक्य राहात होता. सिनहु (सिंहहनु ) नावाचा त्याला एक मुलगा होता. सिंहहनूचा विवाह कच्चनाशी झाला होता. त्याला शुद्धोदन, धौतोदन, शुक्लोदन, शाक्योदन, व अभितोदन असे पाच पुत्र होते. या पाच पुत्रांशिवाय सिंहहनूला अमिता व प्रमिता या नावांच्या दोन कन्या होत्या.
३. त्याच्या कुटुंबाचे गोत्र आदित्य होते.
४. शुद्धोदनाचा विवाह महामायेशी झाला होता. तिच्या पित्याचे नाव अंजन व आईचे नाव सुलक्षणा असे होते. अंजन हा कोलिय वंशातील होता. तो देवदह नावाच्या गावी राहात होता.
५. शुद्धोदन हा मोठा योद्धा होता. जेन्हा शुद्धोदनाने शूरपणा दाखविला तेव्हाच त्याला दुसरी पत्नी करण्याची अनुमती देण्यात आली व त्याने दुसरी पत्नी म्हणून महाप्रजापतीची निवड केली. ती महामायेची वडील बहीण होती.
६. शुद्धोदन फार श्रीमंत होता. त्याच्या मालकीची भूमि विस्तृत होती व त्याचे पुष्कळ नोकर-चाकर होते. असे म्हणतात की, त्याच्या मालकीची जमीन नांगरण्यासाठी एक हजार नांगर चालत असत.
७. तो ऐषारामात राहात होता. त्याचे अनेक महाल होते.

## ३. जन्म

१. शुद्धोदनाला सिद्धार्थ गौतम हा पुत्र झाला. त्याच्या जन्माची कथा अशी आहे.
२. शाक्य लोकात प्रतिवर्षी आषाढ महिन्यात येणारा एक उत्सव पाळण्याची प्रथा होती. सर्व शाक्य लोक आणि त्याप्रमाणे राजघराण्यातील मंडळी हा महोत्सव साजरा करीत असत.
३. हा महोत्सव सात दिवस साजरा करण्याची पद्धत होती.
४. एकदा महामायेने हा महोत्सव मोठ्या थाटामाटात, पुष्पमाला,सुगंधादि वस्तूंचा उपयोग करून परंतु मद्यपानादि उत्तेजक वस्तू वर्ज्य करून साजरा करण्याचे ठरविले.
५. उत्सवाच्या सातव्या दिवशी ती भल्या पहाटे उठली, सुगंधी पाण्याने तिने आंघोळ केली, दानधर्मार्थ चार लक्ष मोहरा तिने देणगी म्हणून वाटल्या, मौल्यवान अलंकार घालून साजशृंगार केला, आवडीच्या पदार्थाचे सेवन केले व व्रताचरण करून निद्रेसाठी कलात्मकतेने सजविलेल्या शयनमंदिरात ती गेली.
६. त्या रात्री शुद्धोदन व महामाया याचा एकांत होऊन महामायेला गर्भसंभव झाला. पलंगावर पहुडली असताना ती तशीच झोपी गेली. निद्राधीन असताना तिला स्वप्न पडले.
७. स्वप्नात तिला असे दिसले की, चतुर्दिक्पालांनी आपणाला निद्रित स्थितीत मंचकासह उचलले व हिमालयाच्या माथ्यावर नेऊन एका विशाल शाल वृक्षाखाली ठेवून ते बाजूला उभे राहिले आहेत.
८. नंतर चतुर्दिक्पालांच्या स्त्रिया तिच्या जवळ आल्या व त्यानी तिला मानससरोवराकडे नेले.
९. त्यांनी तेथे तिला अभंग्यस्नान घालून तिची वेषभूषा केली. तिला त्यांनी सुगंधी द्रव्ये लावून फुलांनी असे सजविले की, ती कुणा दिव्यशक्तीचे स्वागत करावयास तयार झाली आहे असे वाटले.
१०. इतक्यात सुमेध नावाचा एक बोधिसत्व तिच्यापुढे प्रकट झाला व तिला म्हणाला, “मी माझा शेवटचा जन्म पृथ्वीवर घेण्याचे ठरविले आहे. तू माझी माता होण्यास कबूल होशील का?” तिने उत्तर दिले, “मोठया आनंदाने”.

त्याच क्षणी महामायेला जाग आली.

११. दुसरे दिवशी सकाळी महामायेने आपले स्वप्न शुद्धोदनास सागितले. स्वप्नाचा अर्थबोध न झाल्यामुळे शुद्धोदनाने स्वप्नविद्येत पारंगत असलेल्या सुप्रसिद्ध आठ ब्राम्हणांना बोलावून घेतले.

१२. त्याची नावे-राम, धन, लख्खण, मन्ती, यण्ण, सुयाम, भोग व सुदत्त अशी होती. शुद्धोदनाने त्यांच्या स्वागताची यथायोग्य तयारी केली.

१३. त्याने सेवकांकडून जमिनीवर फुलांचे सडे घालून त्या ब्राम्हणांसाठी उच्चासने मांडली.

१४. त्याने त्या ब्राम्हणांची पात्रे सोन्याचांदीने भरून घृतमधुयुक्त व साखरमिश्रित दूध भाताचे सुग्रास भोजन देऊन त्यांस संतुष्ट केले. याशिवाय त्याना नवी वस्त्रे, गायी इत्यादींचे दान दिले.

११. ब्राम्हण संतुष्ट झाल्यावर शुद्धोदनाने महामायेला पडलेले स्वप्न त्यांना सांगितले आणि तो म्हणाला, "या स्वप्नाचा अर्थ मला सांगा!"

१६. "राजा, चिन्ता करू नकोस". ब्राम्हण म्हणाले, "तुला एक असा पूत्र होईल की, जर तो संसारात राहिला तर तो सार्वभौम सम्राट होईल पण संसारत्याग करून जर तो सन्यासी झाला तर तो विश्वातील अज्ञान अंध:कार नाहीसा करणारा भगवान बुद्ध हाईल!"

१७. पात्रांतील तेलाप्रमाणे महामायेने दहा महिने बोधिसत्त्वाला आपल्या गर्भात धारण केले. तिचा प्रसूतीकाल जवळ येऊ लागताच प्रसूतीसाठी आपल्या माहेरी जाण्याची तिने इच्छा व्यक्त केली. आपल्या पतीला ती म्हणाली, "माझ्या पित्याच्या देवदहनगरील मी जाऊ इच्छिते."

१८. "तुइया इच्छेप्रमाणे होईल." राजाने उत्तर दिले. सोन्याच्या पालखीत बसवून शुद्धोदनाने मोठया लवाजम्यासहित तिला तिच्या पित्याच्या घरी पाठविले.

१९. देवदहला जात असताना मार्गात फुलांनी बहरलेल्या तसेच पुरष्पविरहित अशा वृक्षांच्या आल्हाददायक गर्द वनराईतून महामायेला जावे लागणार होते. तेच लुंबिनी वन होय.

२०. लुंबिनी वनातून पालखी नेली जात असताना ते वन स्वर्गीय अशा चित्रलता वनाप्रमाणे किंवा एखाद्या महाप्रतापी राजाच्या स्वागतासाठी स सुशोभित केलेल्या मंडपा-सारखे भासत होते.

२१. बुंध्यापासून फांद्यांच्या शेंड्यापर्यत तेथील वृक्ष फूलाफळांनी ओथंबलेले होते. त्यावर नानारंगांचे असंख्य भ्रमर चित्रविचित्र आवाजात गुंजारव करीत होते आणि निरनिराळया प्रकारचे पक्षिगण मंजुळ स्वरालाप काढीत होते.

२२. तेथील मनोरम दृश्य पाहून महामायेच्या मनात तेथे थांबून काही काळ क्रीडाविहार करण्याची इच्छा उत्पन्न झाली. म्हणून तिने पालखी वाहनाऱ्या सेवकास आपली पालखी शालवृक्षाच्या कुंजात नेऊन उतरविण्यास व तेथे उभे राहण्यास सांगितले.

२३. महामाया पालखीतून उतरली व तेथील एका सुंदर शालवृक्षाच्या बुंध्याशी चालत गेली. त्या शालवृक्षाच्या फांद्या वाऱ्याच्या झुळुकीने वर खाली हेलावत असलेल्या पाहून महामायेला त्यांपैकी एक फांदी हाताने धरावी असे वाटले.

२४. सुदैवाने एक फांदी सहजगत्या तिला धरता येईल एवढी खाली आली. इतक्यात ती आपल्या पायाच्या चवड्यावर उभी राहिली व तिने ती फांदी हाताने धरली. तेवढ्यात फांदी वर गेल्यामुळे झटक्याने महामाया वर

उचलली गेली; आणि अशा प्रकारे हलल्यामुळे तिला प्रसूतीच्या वेदना होऊ लागल्या. शालवृक्षाची फांदी हातत धरली असताना उभ्यानेच तिने मुलाला जन्म दिला.

२५. त्या मुलाचा जन्म खिस्तपूर्व ५६३ व्या वर्षी वैशाखी पोर्णिमेला झाला.

२६. शुद्धोदन व महामाया यांचा विवाह होऊन पुष्कळ वर्षे झाली होती. परंतु त्यांच्या पोटी संतान नव्हते. आणि म्हणून पुत्रप्राप्ती झाली तेव्हा शुद्धोदनाने व त्याच्या परिवाराने आणि सर्व शाक्यांनी पुत्रन्माचा तो उत्सव मोठ्या हर्षोल्हासाने थाटामाटात साजरा केला.

२७. पुत्रजन्माच्या या वेळी कपिलवस्तूचे राजपद भूषविण्याची पाळी शुद्धोदनाची होती. अर्थातच त्यामुळे बालकाला युवराज म्हणून संबोधण्यात येऊ लागले.

## ४. असितमुनीचे आगमन

१. ज्या वेळी या बालकाचा जन्म झाला त्या वेळी असित नावाचा एक महान तपस्वी ऋषी हिमालय पर्वतावर राहात होता.

२. असित ऋषीने पाहिले की, अंतरिक्षातील देव 'बुद्ध' या शब्दाचा ध्वनी करीत आहेत व त्याचा प्रतिध्वनी चोहोकडे उमटत आहे. त्याने पाहिले की, ते आपली वस्त्रभूषणे मिरवित इकडे तिकडे हर्षभराने फिरत आहेत. त्याने विचार केला, की ज्या ठिकाणी बुद्धाने जन्म घेतला आहे तेथे मी का जाऊ नये ?

३. त्याने आपल्या दिव्यदृष्टीने सर्व जंबूद्वीपाचे निरीक्षण केले. तेव्हा शुद्धोदनाच्या गृही तळपणारे एक दिव्य बालक जन्माला आले असून त्यामुळेच अंतरिक्षातील सर्व देव हर्षनिर्भर झाले आहेत असे त्याला दिसले.

४. म्हणून तो महान ऋषी उठला आणि आपला पुतण्या नरदत्त याला बरोबर घेऊन राजा शुद्धोदनाच्या गृही आला व त्याच्या राजवाड्याच्या प्रवेशद्वारी उभा राहिला

५. तेथे त्याने लाखो लोक गोळा झाल्याचे पाहिले. तेव्हा तो द्वारपालाजवळ गेला आणि त्याला म्हणाला, "अरे ! राजाला जाऊन सांग की, दाराशी एक तपस्वी उभा आहे."

६. तेव्हा तो द्वारपल शुद्धोदनाजवळ गेला आणि हात जोडून म्हणाला, "महाराज, दाराशी एक वयोवृद्ध ऋषी येऊन उभे राहिले आहेत. ते आपणाला भेटण्याची इच्छा करीत आहेत."

७. राजाने असितमुनीकरता एका आसनाची व्यवस्था केली आणि तो द्वारपालास म्हणाला, "त्या ऋशीला आत येऊ दे !" तेव्हा महालाच्या बाहेर येऊन तो द्वारपाल असितमुनीला म्हणाला, "कृपा करून आत चला."

८. असितमुनी शुद्धोदन राजाजवळ गेला व त्याच्यापुढे उभा राहून म्हणाला, "विजय असो ! राजा, तुझा विजय असो ! तू आयुष्यमान हो आणि आपले राज्य सद्धर्माने चालव."

९. तेव्हा शुद्धोदनाने असितमुनीला साष्टांग नमस्कार घातला आणि त्याला बसण्याकरिता आसन दिले. असितमुनी सुखपूर्वक स्थानापन्न झाल्यावर शुद्धोदन म्हणाला, " हे तपस्विन ! यापूर्वी आपले दर्शन झाल्याचे आठवत नाही. आपल्या आगमनाचा काय हेतू असावा बरे ? आपण इथे येण्याचे काय कारण ?"

१०. असित ऋषी शुद्धोदनाला म्हणाला, "राजा तुला पुत्रप्राप्ती झाली आहे. तुझ्या पूत्राला पाहण्याच्या इच्छेने मी इथे आलो आहे."

११. शुद्धोदन म्हणाला, “मुनिवर, बालक आता झोपला आहे. थोडा वेळ आपण थांबण्याची कृपा कराल का ?” ऋषी म्हणाला, “ राजा, असले थोर महात्मे जास्त वेळ झोपत नाहीत. हे थोर महात्मे स्वभावत:च जागृत असतात."

१२. इतक्यात त्या महान ऋषींवर अनुकंपा दाखवून त्या बालकाने आपण जागे झाल्याची हालचाल केली.

१३. बालक जागे झालेले पाहताच शुद्धोदनाने आपल्या दोन्ही हातांनी त्याला उचलून घेऊन ऋषींच्या समोर आणले.

१४. असित ऋषीने त्या बालकाला निरखून पाहिले तेव्हा ते महापुरुषाच्या बत्तीस लक्षणांनी व एंशी शुभ चिन्हांनी युक्त असलेले त्यास दिसले. त्याने पाहिले की त्याचा देह शुक्र व ब्रम्हा यांच्यापेक्षाही अधिक तेजस्वी आहे व त्याच तेजोमंडल त्यांच्यापेक्षा शतसहस्त्र पटींने अधिक दैदिप्यमान आहे. असितऋषीच्या मुखातून त्वरीत उदगार निघाले, “निस्संदेह, या पृथ्वीतलावर हा अलौकिक पुरुष अवतरला आहे !” असे म्हणून असीतमुनी आपल्या आसनावरून उठले व आपल दोन्ही हात जोडून त्यांनी त्या बालकाला साष्टांग नमस्कार घातला. त्यांनी बालकाभोवती प्रदक्षिणा घातली आणि त्याला आपल्या हातांत घेऊन ध्यानमग्न स्थितीत ते उभे राहिले.

१५. असितऋषीला पूर्वीची सुपरिचित भविष्यवाणी माहीत होती. गौतमप्रमाण महापुरुषांच्या बत्तीस लक्षणांनी युक्त असलेल्यांच्या पुढे दोनच मार्ग असतात, तिसरा नाही. “जर तो संसारी जीवनात राहिला तर चक्रवर्ती सम्राट होईल; पण जर गृहत्याग करून त्याने संन्यास घेतला तर तो सम्यक् सम्बुद्ध असा बुद्ध होईल!”

१६. असितऋषीला खात्री होती की, हे बालक गृहस्थी जीवनात राहणार नाही.

१७. त्या बालकाकडे पाहून अश्रु ढाळीत दीर्घ नि:श्वास टाकून तो ऋषी रडू लागला.

१८. असितमुनी अश्रु ढाळीत व दीर्घ नि:श्वास टाकीत रडत आहे हे शद्धोदनाने पाहिले.

१९. असितमुनी रडत असलेला पाहून शुद्धोदनाच्या अंगावार रोमांच उभे राहिल आणि त्यांनी व्याकुळतेने असितमुनीला विचारले, “हे मुनीवर, अशा रीतीने का रडत आहात ? अश्रु का ढाळीत आहात? दीर्घ नि:श्वास का टाकीत आहात? माझ्या बालकाचे भविष्य निर्विघ्न आहे ना?”

२०. हे ऐकून ऋषी म्हणाला, “राजा, मी बालकासाठी रडत नाही. त्याचे भविष्य अगदी निर्विघ्न आहे. मी रडतो आहे तो माझ्यासाठी!”

२१. “का बरं?” शुद्धोदनाने विचारले. ऋषी उत्तरला, “मी वयोवृद्ध झालो आहे. माझं आयुष्य आता संपत आलं आहे, निश्चितपणे हे बालक बुद्ध होणार असून ते परमोच्च व सम्यक सम्बोधी प्राप्त करून घेईल. तदनंतर आजवर या पृथ्वीतलावर जे कोणी करू शकले नाही, ते धर्मचक्रप्रवर्तन हे बालक करील. जगताच्या सुखसमृद्धीसाठी तो आपल्या महान तत्त्वाचा उपदेश करील.”

२२. “ज्या धार्मिक जीवनाची तो घोषणा करील ते जीवन आरंभी कल्याणकारक, मध्ये कल्याणकारक आणि अन्ती कल्याणकारक असंच असेल. ते शब्द व शब्दाचा भावार्थ यांनी परिपूर्ण, शुद्ध आणि पवित्र असंच असेल.”

२३. “ज्याप्रमाणे एखादे उंबराचे फूल क्वचितच वेळी व स्थळी या जगात उमललेले दिसते, त्याचप्रमाणे असंख्य पर्वकालानंतर या जगतात एखाद्याच वेळी व स्थळी पूजनीय ‘बुद्ध’ उदयास येतात. त्याचप्रमाणे, राजा ! हा मुलगा सुद्धा नि:संशय परमज्ञान प्राप्त करून सम्बोधी प्राप्त करून घेईल आणि असंख्य जीवांना दु:खसागरातून तरून नेऊन परमसुखाची स्थिति प्राप्त करून देईल.

२४. “परंतु मी त्या बुद्धाला पाहू शकणार नाही म्हणून मी रडतो आहे आणि या दुःखामुळेच हा असा दीर्घ निःश्वास टाकीत आहे. कारण मला या बुद्धाची पूजा करावयास मिळणार नाही.”
२५. तदनंतर राजाने त्या थोर असित ऋषीला व त्याचा पुतण्या नरदत्त याला यथायोग्य भोजन देऊन संतुष्ट केले. त्यांना वस्त्रदान देऊन त्यांच्या भोवती प्रदक्षिणा घालून वंदन केले.
२६. तेव्हा असितमुनी त्याचा पुतण्या नरदत्त याला म्हणाला, “नरदत्ता ! जेव्हा हे बालक बुद्ध झाल्याचे तू ऐकशील तेव्हा त्याच्याकडे जाऊन त्याच्या ज्ञानमार्गाचा अनुग्रह कर. ते तुला सुखशांतीचे व कल्याणप्रद ठरेल.” असे म्हणून असितमुनीने राजाची अनुज्ञा घेऊन तो आपल्या आश्रमाकडे निघून गेला.

## ५.महामायेचा मृत्यू

१. पाचव्या दिवशी नामकरणविधि करण्यात आला. मुलाचे नाव ‘सिद्धार्थ’ असे ठेवण्यात आले. त्याचे गोत्रनाम गौतम होते. म्हणून त्याला सिद्धार्थ गौतम या नावाने लोक संबोधू लागले.
२. मुलाच्या जन्माचा आनंदोत्सव व नामकरणविधी-समारंभ चालू असतानाच महामाया एकाएकी आजारी पडली व तिचे दुखणे बळावू लागले.
३. आपला अंतकाळ जवळ आला आहे असे ओळखून तिने राजा शुद्धोदनाला व प्रजापतीला आपल्या रुग्णशय्येजवळ बोलाविले आणि म्हटले, “माझ्या मुलाबद्दल असितमुनिनं जे भविष्य वर्तविलं आहे ते खरं होईल, याचा मला विश्वास वाटत आहे. मला दुःख एवढंच वाटतं की, ते खरं ठरलेलं पाहाण्यासाठी मी जीवंत राहणार नाही.”
४. “माझं बाळ आता लवकरच मातृहीन होईल ! परंतु माझ्या मागे माझ्या मुलाच काळजीपूर्वक लालनपालन होईल किंवा नाही व त्याच्या भवितव्याला अनुलक्षून त्याची योग्यप्रकारे जोपासना केली जाईल किंवा नाही, याबद्दल मला मुळीच चिंता वाटत नाही.”
५.“प्रजापती, माझे बाळ मी तुझ्या स्वाधीन करते आहे. त्याच्या आईपेक्षाही तू त्याचा चांगला सांभाळ करशील याबद्दल मला मुळीच शंका वाटत नाही.”
६. “आता कष्टी होऊ नका. मला इहलोक सोडण्याची आज्ञा द्या. देवाचं बोलावणं आलं आहे, त्याचे दूत मला घेऊन जाण्यासाठी थांबले आहेत!” असे म्हणून महामायेने प्राण सोडला. शुद्धोदन व प्रजापती या दोघांनाही दुःखावेग अनावर झाला व त्यांनी रडून आक्रोश केला.
७. सिद्धार्थाच्या मातेचे देहावसान झाले तेव्हा तो अवघा सात दिवसांचा होता.
८. सिद्धार्थाचा नन्द नावाचा एक धाकटा भाऊ होता. शुद्धोदनाचा महाप्रजापति पासून झालेला तो पुत्र होता.
९. सिद्धार्थाला याशिवाय अनेक चुलत भाऊ होते. महानाम व अनुरुद्ध हे त्याचा चुलता शुक्लोदन याचे पुत्र. आनंद हा त्याचा चुलता अमितोदन याचा पुत्र व देवदत्त हा त्याची मावशी अमिता हिचा पुत्र होत. महानाम हा सिद्धार्थापेक्षा वयाने वडील होता व आनंद हा लहान होता.
१०. त्यांच्या सोबतीत सिद्धार्थ लहानाचा मोठा झाला.

## ६. बालपण आणि शिक्षण

१. जेव्हा सिद्धार्थ चालू आणि बोलू लागला तेव्हा शाक्यांतील वयोवृद्ध जाणते लोक एकत्र जमले व त्यांनी शुद्धोदनाला सांगितले की, मुलाला 'अभया' या ग्राम देवतेच्या देवळात दर्शनाला नेले पाहिजे.

२. शुद्धोदन कबूल झाला व त्याने मुलाला कपडे घालण्यास महाप्रजापतीला सांगितले.

३. ती त्याला कपडे करीत असताना बाळ सिद्धार्थाने गोड आवाजात आपल्याला कुठे नेले जात आहे हे आपल्या मावशीला विचारले. जेव्हा त्याला समजले की, आपल्याला देवळात नेले जात आहे, तेव्हा तो हसला. तथापि शाक्यांच्या रीतीरिवाजानुसार तो देवळात गेला.

४. वयाच्या आठव्या वर्षी सिद्धार्थाच्या विद्याभ्यासास सुरुवात झाली.

५. महामायेच्या स्वप्नाचा अर्थ सांगण्यासाठी शुद्धोदनाने ज्या आठ ब्राम्हणांना बोलविले होते व ज्यांनी सिद्धार्थाचे भविष्य कथन केले होते ते त्याचे प्रारंभीचे गुरु झाले.

६. त्यांना जे काही ज्ञान होते ते सर्व त्यांनी सिद्धार्थाला शिकविल्यानंतर शुद्धोदनाने उदिच्च देशातील थोर कुळात जन्मलेल्या व उच्च परंपरा असलेल्या सब्बमित्ताला बोलावून घेतले. सब्बमित्त हा भाषाशास्त्र, व्याकरणशास्त्र, वेद, वेदांगे आणि उपनिषदे या सर्वांत पारंगत होता. शुद्धोदनाने त्याच्या हातावर सुवर्ण कलशातून उदक प्रदान करून सिद्धार्थाला अध्ययनासाठी त्याच्या स्वाधीन केले. हा त्याचा दुसरा गुरु.

७. त्याच्या हाताखाली सिद्धार्थ गौतमाने तत्कालीन सर्व दर्शन-शास्त्रे आत्मसात केली.

८. याशिवाय त्याने आलारकालामचा शिष्य भारद्वाज याजकडून ध्यानधारणेची विद्या संपादिली. भारद्वाजाचा आश्रम कपिलवस्तु येथे होता.

## ७. सुरुवातीची लक्षणे

१. जेव्हा तो आपल्या पित्याच्या शेतावर जात असे व जेव्हा त्या ठिकाणी त्याला काही काम नसे त्या वेळी तो एकान्त स्थळी जाऊन समाधी लावण्याचा यत्न करीत बसे.

२. त्याच्या बौद्धिक विकासासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी केल्या जात असताना क्षत्रियाला आवश्यक अशा युद्धविद्येच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जात नव्हते.

३. कारण आपल्या मुलाचा मानसिक विकास करताना त्याच्या पौरुषत्वाच्या विकासाकडे दुर्लक्ष करण्याची चूक आपल्या हातून होऊ नये याची दक्षता शुद्धोदन घेत असे.

४. सिद्धार्थ दयाशील प्रवृत्तीचा होता. माणसाने माणसाची पिळवणूक करावी, हे त्याला आवडत नसे.

५. एकदा तो आपल्या काही मित्रांच्याबरोबर आपल्या पित्याच्या शेतावर गेला. तेथे त्याने अंगावरील अगदी थोडक्या वस्त्रांनिशी अंग भाजून काढणाऱ्या कढत उन्हात जमीन नांगरणे, बांध घालणे, झाडे तोडणे इत्यादी कामे करीत असलेले मजूर पाहिले.

६. ते दृश्य पाहून तो अतिशय हळहळला.

७. तो आपल्या मित्रांना म्हणाला, “एका माणसाने दुसऱ्याची पिळवणूक करावी हे योग्य ठरते काय? मजुराने कष्ट करावे व त्याच्या कष्टाच्या फळावर मालकाने आपले जीवन जगावे हे कसे बरोबर असू शकेल?”

८. त्याच्या मित्रांना यावर काय उत्तर द्यावे हे कळेना. कारण ते जुन्या परंपरेच तत्वज्ञान मानणारे होते. त्यांच्या मते मजुराचा जन्म हा आपल्या धन्याची चाकरी करण्यासाठीच आहे आणि आपल्या धन्याची चाकरी करण्यातच त्याच्या जीवनाची इतिकर्तव्यता आहे.

९. शाक्य लोक वप्रमंगल नावाचा एक उत्सव साजरा करीत असत. हा ग्रामीण लोकांनी धान्याच्या पेरणीच्या दिवशी साजरा करावयाचा उत्सव होता. शाक्य लोकांच्या प्रथेनुसार ह्या दिवशी प्रत्येक शाक्याला स्वतः आपल्या हाताने जमिनीत नांगर धरणे भाग पडत असे.

१०. सिद्धार्थ या प्रथेचे नेहमी पालन करीत असे. तो स्वतः नागर धरीत असे.

११. जरी तो विद्वान होता तरी त्याने शीरीरिक श्रमाचा कधी तिरस्कार केला नाही.

१२. तो क्षत्रिय कुळात जन्मलेला होता आणि त्याला धनुर्वीद्येचे आणि इतर शस्त्रे चालविण्याचे शिक्षण मिळाले होते; परंतु दुसऱ्याला निष्कारण इजा करणे त्याला आवडत नसे.

१३. शिकार करणाऱ्यांच्या मंडळांत सामील होण्यास तो तयार नसे. त्याचे मित्र त्याला म्हणत, “तुला वाघांची भीती वाटते काय!” तेव्हा तो उत्तर देई, “मला माहीत आहे, तुम्ही वाघाला मारण्यासाठी जात नसून तेथे हरिण आणि ससे यांच्यासारख्या निरुपद्रवी प्राण्याना मारण्यासाठी जात आहात.”

१४. “निदान तुझे मित्र किती बिनचूक निशाणबाजी करतात हे पाहण्यासाठी तरी तू ये.” त्याचे मित्र त्याला आग्रह करीत. सिद्धार्थ अशा प्रकारचा आमंत्रणालाही नकार देई आणि म्हणे, “मला निरुपद्रवी प्राण्याना मारताना पाहाणे आवडत नाही.”

१५. सिद्धार्थाच्या ह्या प्रवृत्तीमुळे प्रजापती गौतमी अतिशय चिंताग्रस्त होत असे.

१६. त्याच्याशी वाद घालताना ती म्हणे, “तू विसरतोस की, तू क्षत्रिय आहेस. लढणे हा तुझा धर्म आहे. शिकारीच्या मार्गानेच युद्धविद्येत निपुणता प्राप्त होते. कारण शिकारीने अचूक नेमबाजीचे शिक्षण मिळते. शिकार हे क्षत्रियांचे युद्धविद्येचे शिक्षण घेण्याचे एक क्षेत्र आहे.”

१७. सिद्धार्थ नेहमी गौतमीला विचारीत असे, “पण आई, क्षत्रियांना लढावे तरी का लागते?” आणि गौतमी उत्तर देई, “तो त्याचा धर्म आहे म्हणून!”

१८. तिच्या उत्तराने सिद्धार्थाचे समाधान होत नसे. तो गौतमीला विचारी, “मला असे सांग की, माणसाला मारणे हा माणसाचा धर्म कसा होऊ शकतो?” गौतमी उत्तर देई, “ही प्रवृत्ती एखाद्या संन्याशाला योग्य आहे. पण क्षत्रियाने लढलेच पाहिजे. जर ते लढणार नाहीत तर राज्याचे संरक्षण कोण करील?”

१९. “पण आई, जर सगळे क्षत्रिय एकमेकांवर प्रेम करू लागले तर हिंसा न करता ते आपल्या राज्यांचे रक्षण करू शकणार नाहीत काय?” यावर गौतमी निरुत्तर होई.

२०. तो आपल्या मित्रांना आपत्याबरोवर बसवून समाधी लावण्यास उद्युक्त करण्याचा प्रयत्न करी. त्यासाठी तो योग्य असे आसन घालून बसण्याचे त्यांना शिकवी. तो त्यांना एखाद्या विषयावर चित्त एकाग्र करण्यास शिकवी. “मी सुखी व्हावे, माझे आप्तेष्ट सुखी व्हावेत, सर्व प्राणिमात्र सुखी व्हावेत” अशा प्रकारच्या विचारांची ध्यानाकरिता निवड करण्याविषयी तो त्यांना उपदेश करी.

२१. परंतु त्याचे मित्र या गोष्टीला महत्व देत नसत. ते त्याची हसून थट्टा करीत.

२२. ते डोळे बंद करीत; पण ते चिंतनाच्या विषयावर मन एकाग्र करू शकत नसत. उलट त्याच्या दृष्टीपुढे शिकारीची हरिणे किंवा खाण्याचे गोड पदार्थ येत असत.

२३. त्याच्या पित्याला व मातेला त्याचा हा ध्यानधारणेचा ध्यास आवडत नसे. तो क्षत्रियाच्या जीवनाच्या सर्वथा विरुद्ध आहे, असे त्याना वाटे.

२४. योग्य विषयावर चित्त एकाग्र केल्याने अखिल जगातील मनुष्यमात्रावरील प्रेमभावना वृद्धिंगत होते, यावर सिद्धार्थाचा विश्वास होता. या संबंधीची खात्री देताना तो म्हणे, "आपण जेव्हा प्राणिमात्रांचा विचार करतो तेव्हा त्यातील भेदाभेद व असमानता यापासून सुरुवात करतो. आपण मित्रांना शत्रूपासून वेगळ करतो. आपण आपल्या पाळीव जनावरांना मनुष्यप्राण्यापासून भिन्न समजतो. आपण मित्र व पाळीव जनावरे यांवर प्रेम करतो आणि शत्रू व हिंस्त्र पशूंचा द्वेष करतो."

२५. "ही भेदरेषा आपण ओलांडली पाहिजे आणि आपण जेव्हा आपल्या चिंतनात व्यवहारी जीवनाच्या मर्यादेपलीकडे जातो तेव्हांच हे करू शकतो." अशा प्रकारची त्याची विचारधारणा होती.

२६. त्याचे बालपन परमोच्च प्रेमभावनेने व्यापलेले होते.

२७. एकदा तो आपल्या पित्याच्या शेतावर गेला. विश्रांतीच्या वेळी एका झाडाखाली बसून तो निसर्गाची शान्ति व सौंदर्याचा आस्वाद घेत होता. इतक्यात आकाशातून एक पक्षी त्याच्यासमोर पडला.

२८. त्या पक्ष्याला बाण लागला होता व तो त्याच्या शरीरात रुतला होता. त्यामुळे तो पक्षी घायाळ होऊन तडफडत होता.

२९. सिद्धार्थ त्या पक्ष्याला वाचविण्यासाठी पुढे झाला. त्याने त्याच्या अंगातील बाण उपटून काढला. त्याच्या जखमेवर पट्टी बांधली व त्याला पिण्यासाठी पाणी दिले. त्याने त्या पक्ष्याला उचलले व ज्या जागी तो अगोदर बसला होता त्या जागी आला त्याने त्या पक्ष्याला आपत्या उत्तरीय वस्त्रात गुंडाळले. आणि ऊब देण्यासाठी त्याला आपल्या हृदयाशी धरले.

३०. सिद्धार्थाला आश्चर्य वाटले की, "या निष्पाप पक्ष्याला कोणी मारले असावे?" थोड्याच वेळात त्याचा चुलत भाऊ देवदत्त शिकारीच्या सर्व आयुधांनिशी तेथे आला. त्याने सिद्धार्थाला सांगितले की, "आकाशात उडत असलेल्या एका पक्ष्याला आपण बाण मारला आहे. तो पक्षी जखमी झाला असून काही अंतरावर उडून गेल्यावर तो इथेच कुठे तरी पडला असावा. तो तू पाहिलास काय?" सिद्धार्थाला त्याने विचारले.

३१. सिद्धार्थ 'होय' म्हणाला व घायाळ स्थितीतून बरा झालेला तो पक्षी त्याने त्याला दाखविला.

३२. देवदत्ताने मागणी केली की, "माझा पक्षी तू माझ्या स्वाधीन कर." पण सिद्धार्थाने ते नाकारले, त्यामुळे त्या दोघांमध्ये तीव्र वाद झाला.

३३. देवदत्ताचे म्हणणे होते की, "या पक्ष्याचा मालक मी आहे. कारण शिकारीच्या नियमानुसार जो शिकार करतो तोच त्या शिकारीचा मालक होतो."

३४. सिद्धार्थाने या नियमाची अधिकृतता अमान्य केली. तो म्हणाला, "जो ज्याचे रक्षण करतो त्यालाच त्याच्या मालकीचा हक्क प्राप्त होतो. ज्याला दुसऱ्याचा जीव घ्यावयाचा असतो तो त्याचा मालक कसा होऊ शकतो ?"

३५. या वादात दोघांपैकी कुणीही माघार घ्यायला तयार होईना.शेवटी हा प्रश्न लवादाकडे नेण्यात आला.

लवादाने सिद्धार्थ गौतमाचा दृष्टिकोणच योग्य असल्याचा निर्णय दिला.
३६. यामुळे देवदत्त सिद्धार्थाचा कायमचा शत्रू बनला; परंतु सिद्धार्थ गौतमाची करुणावृत्ती इतकी उत्कट होती की, आपल्या चुलत भावाची मर्जी राखण्यापेक्षा एका निष्पाप पक्ष्याचा जीव वाचवणे त्याने अधिक पसंत केले.
३७. सिद्धार्थ गौतमाच्या बालपणीच प्रकट झालेली त्याची स्वभावलक्षणे ही अशी होती.

## ८. विवाह

१. दंडपाणि नावाचा एक शाक्य होता. त्याला यशोधरा नावाची एक मुलगी होती. ती आपल्या सौंदर्याविषयी आणि चारित्र्याविषयी प्रसिद्ध होती.
२. यशोधरेने सोळाव्या वर्षात पदार्पण केले होते व दंडपाणि तिच्या लग्नाच्या चिंतेत होता.
३. त्या वेळच्या प्रथेप्रमाणे दंडपाणीने आपल्या मुलीच्या स्वयंवरात भाग घेण्याकरिता शेजारच्या सर्व देशातील युवकांना निमंत्रणे धाडली.
४. सिद्धार्थ गौतमालाही निमंत्रण पाठविण्यात आले होते.
५. सिद्धार्थ गौतमालाही सोळा वर्षे पूर्ण झाली होती. त्याच्या मातापित्याला देखील त्याच्या विवाहाची अशीच काळजी लागली होती.
६. त्यांनी त्याला त्या स्वयंवरास जाण्यास आणि यशोधरेचे पाणिग्रहण करण्यास सांगितले. त्याने आपल्या मातापित्याच्या इच्छेला मान दिला.
७. जमलेल्या सर्व युवकांतून यशाधरेने सिद्धार्थ गौतमालाच वरिले.
८. दंडपाणि विशेष प्रसन्न नव्हता. या विवाहाच्या यशस्वीतेबद्दल तो साशंक होता.
९. त्याला वाटले,'सिद्धर्थाला साधुमुनींच्या सहवासाचे विशेष वेड आहे. त्याला एकलकोंडे राहणे आवडते. तो एक यशस्वी गृहस्थ कसा होऊ शकेल?'
१०. सिद्धर्थाखेरीज कुणालाही वरणार नाही असा निश्चय केलेल्या यशोधरेने आपल्या पित्याला विचारले, “साधूंच्या व तपस्व्यांच्या सहवासात राहणे हा काय अपराध आहे?” यशोधरेला तसे मुळीच वाटत नव्हते.
११. सिद्धार्थ गौतमाखेरीज कुणाशीही लग्न करणार नाही असा आपल्या मुलीने केलेला निश्चय ओळखून यशोधरेच्या मातेने या विवाहास संमति देण्यास दंडपाणीला सांगितले. दंडपाणीने तशी संमती दिली.
१२. गौतमाच्या प्रतिस्पर्ध्यांची यामुळे निराशा तर झालीच, परंतु आपला अपमान झाला असे त्यांना वाटले.
१३. त्यांना वाटले की, त्यांच्या बाबतीत सारखा न्याय मिळण्याच्या दृष्टीने यशोधरेने निवड करताना काही परीक्षा घेतली पाहिजे होती, पण तिने तसे काही केले नाही.
१४. त्या वेळी ते स्वस्थ बसले. त्यांना वाटले दंडपाणि यशोधरेला सिद्धार्थ गौतमाची निवड करू देणार नाही आणि त्यामुळे आपला हेतू साध्य होईल.
१५. परंतु दंडपाणि जेव्हा या बाबतीत अयशस्वी झाला तेव्हा त्यांनी धीर करून अशी मागणी केली की, धनुर्विद्येचे कौशल्य दाखविण्याची परीक्षा घेतली जावी. दंडपाणीला त्यांच्या मागणीला कबूल व्हावे लागले.
१६. सुरूवातीला सिद्धार्थ या बाबतीत तयार नव्हता. तेव्हा त्याने असा नकार दिल्यास त्याचा पिता, त्याचे कुळ

व सर्वात अधिक यशोधरा यांना लाजेने खाली मान घालण्याचा कसा प्रसंग येईल, हे त्याचा सारथी छन्न याने त्याच्या निदर्शनाला आणून दिले.
१७. त्याच्या या म्हणण्याचा सिद्धार्थाच्या मनावर फारच परिणाम झाला व त्याने त्या स्पर्धेत भाग घेण्याचे कबूल केले.
१८. स्पर्धा सुरू झाली. प्रत्येक स्पर्धकाने आपली पाळी येताच आपले कौशल्य दाखविले.
१९. गौतमची पाळी सर्वांच्या शेवटी आली ; परंतु त्याची बिनचूक निशाणबाजी सर्वश्रेष्ठ ठरली.
२०. तदनंतर विवाह समारंभ झाला. शुद्धोदन व दंडपाणि ह्या दोघांनाही आनंद झाला. त्याचप्रमाणे यशोधरेला व महाप्रजापतीलाही अत्यानंद झाला.
२१. विवाह होऊन अनेक वर्षे लोटल्यावर यशोधरेला एक पुत्र झाला. त्याचे नाव राहुल असे ठेवण्यात आले.

## ९. पुत्राला वाचविण्याच्या पित्याच्या योजना

१. आपल्या पुत्राचा विवाह होऊन व त्याने सांसारिक जीवनात प्रवेश केला हे पाहून राजाला संतोष झाला. तथापि याबरोबरच असितमुनीची भविष्यवाणी त्याचा सारखा पिच्छा पुरवीत होती.
२. ते भविष्य खरे होऊ नये म्हणून राजाने त्याला वैषयिक सुखविलासात गुंतवून ठेवण्याचा विचार ठरविला.
३. हा उद्देश दृष्टीपुढे ठेवून शुद्धोदनाने आपल्या पुत्राला राहण्यासाठी तीन राजमहाल बांधले, एक उन्हाळ्यात राहण्यासाठी, एक पावसाळ्यात राहण्यासाठी व एक हिवाळ्यात राहण्यासाठी. हे तिन्ही राजमहाल विलासी जीवनाला उत्तेजक अशा सर्व प्रकारच्या साधनांनी सुसज्ज करण्यात आले होते.
४. प्रत्येक महालाभोवती विविध जातींच्या वृक्षांची आणि फुलांची मनोहारी रचना केलेले विस्तृत असे उद्यान होते.
५. आपल्या कुटुंबाचा पुरोहित उदयीन याच्याशी सल्लामसलत करून राजाने राजपुत्रासाठी अतिसुंदर युवतींनी युक्त अशा अंत:पुराची व्यवस्था करण्याचा विचार ठरविला.
६. तेव्हा शुद्धोदन राजाने जीवनातील सुखोपभोगासाठी राजकुमाराला वश कसे करून घ्यावे याचा त्या सुंदरीना सल्ला देण्यास उदयीनास सांगितले.
७. अंत:पुरात ठेवावयाच्या स्त्रियांना एकत्रित करून उदयीनाने त्यांनी राजकुमाराला वश कसे करून घ्यावे याची त्यांना प्रथम माहिती दिली.
८. त्यांना उद्देशून तो म्हणाला, "तुम्ही या प्रकारच्या सर्व वशीकरण कलांत कुशल आहात, तुम्ही मदनाची भाषा जाणण्यात चतुर आहात, तुमच्या ठायी सौंदर्य आणि आकर्षकता परिपूर्ण आहे. तुम्ही तुमच्या कसबात वाकबगार आहात."
९. "तुमच्या या कलागुणांनी, ज्यांच्या ठायी काही वासना शिल्लक राहिलेली नाही अशा योग्यांचेसुद्धा तुम्ही चित्त अस्वस्थ करू शकता, आणि ज्यांना केवळ स्वर्गीय अप्सराच भुलवू शकतात अशा देवांनासुद्धा तुम्ही आपल्या मोहपाशात गुरफटू शकता!"
१०. "हृदयातील भावना व्यक्त करण्याच्या तुमच्या कौशल्याने, तुमच्या नखरेलपणाने, तुमच्या शरीरसौष्ठवाने

आणि अकृत्रिम अशा लावण्याने तुम्ही जर स्त्रियांनाही मोहित करू शकता तर मग पुरुषांना तुम्ही किती सहज अंकित कराल?"

११. "आपापल्या क्षेत्रात अशा प्रकारे कुशल असलेल्या तुम्हाला राजपुत्राला जिंकून त्याला तुमचा बंदी करणे व प्रेमरज्जूंनी बांधून त्याला तुमचा अंकित करून ठेवणे असाध्य नाही."

१२. "या बाबतीत तुमच्या हातून घडलेली एखादी भित्रेपणाची कृती लज्जेने डोळे मिटणाऱ्या एखाद्या नववधूला शोभेल, पण तुम्हाला ती शोभणार नाही."

१३. " निसंशय, हा वीर पुरुष आपल्या पराक्रमामुळे महान आहे! परंतु तुम्हाला त्याचे काय? 'स्त्रिचे सामर्थ्य त्यापेक्षाही मोठे आहे!' हाच तुमचा दृढनिश्चय असू द्या!"

१४. "प्राचीन काळी, ज्याला जिंकणे देवांनाही कठीन होते अशा एका महान तपस्व्याला काशीतील एका सौंदर्यवती वेश्येने लाथा मारून झिडकारून आपल्या पायी लोळण घेत ठेवले होते."

१५. "आणि महान तपस्वी विश्वामित्राला तो तपश्चर्येत निमग्न असतानाही घृताची नावाच्या अप्तरेने दहा वर्षे जंगलात आपला बंदी करून ठेविला होता."

१६. "यासारख्या अनेक तपस्वयांना जेथे स्त्रियांनी कवडीमोल केले तेथे ज्याचे यौवनपुष्प प्रथमच उमलत आहे अशा कोमल राजकुमाराची काय कथा ?"

१७. "हे असे असल्यामुळे तुम्ही धीटपणाने असे प्रयत्न करा की, राजकुळाची वंशपरंपरा सिद्धार्थाकडून खुंटणार नाही."

१८. "सामान्य स्त्रिया सामान्य पुरुषाला अंकित करतात, परंतु त्याच खऱ्या स्त्रिया की, ज्या असाधारण स्वभावाच्या पुरुषांना जिंकतात."

## १०. राजपुत्राला वश करण्यात स्त्रियांचे अपयश

१. उदयीनाचे हे शब्द त्या स्त्रियांच्या हृदयाला लागले व राजपुत्राला वश करण्यासाठी आपले सर्व सामर्थ्य पणास लावण्याचा त्यांनी निश्चय केला.

२. तथापि, त्यांच्चा भृकुटी, त्यांचे कटाक्ष, त्यांचे नखरे, त्यांचे हसणे, त्यांच्या नाजुक हालचाली हे सर्व काही त्यांच्या ठायी असून सुद्धा त्या अंत:पुरवासिनी युवतींना आपण राजपुत्राला वश करू शकू अशी स्वत:बद्दल खात्री वाटत नव्हती.

३. परंतु पुरोहित उदयीनाच्या प्रेरणेमुळे, राजपुत्राच्या कोमल स्वभावामुळे आणि मादकता व कामभावना यांच्या प्रभावाच्या जाणीवेमुळे थोड्याच वेळात त्यांचा आत्मविश्वास जागृत झाला.

४. नंतर त्या स्त्रिया आपल्या कामगिरीस लागल्या. हिमालयाच्या अरण्यात हत्तिणींच्या कळपासमवेत हत्ती जसा फिरत असतो तशा त्या उपवनात त्या आपल्या समवेत राजपुत्रास हिंडावयास लावू लागल्या.

५. स्त्रियांच्या समवेत तो राजपुत्र त्या मनोहर उद्यानात सूर्य जसा अप्सरांना घेऊन आपल्या राजोद्यानात फिरावा तसा शोभून दिसत होता.

६. त्यांच्यापैकी काही जणींनी कामाकुल होऊन सहज लागलेल्या धक्क्यात त्याला आपल्या भरदार व

पीनस्तनांशी दाबून धरले.
७. तर दुसऱ्यांनी ठेच लागून पडत असल्याचा बहाणा करून त्याला घट्ट आलिंगन दिले व आपले वेलीसारखे गोंडस हात त्याच्या खांद्यावर लोंबकळत सोडून त्या त्याच्यावर वाकल्या.
८. तोंडाला मद्याचा वास येत असलेल्या दुसऱ्या जणी आपल्या ताम्र रंगाच्या अधरोष्ठांनी त्याच्या कानात पुटपुटल्या, "माझं गुपित ऐकावं बरं का !"
९. ज्यांची शरीरे उटण्यांनी ओली झाली होती, अशा काही जणी त्याचे दोन्ही हात आतुरतेने घट्ट धरून, जणू काय त्याला हुकूमच करीत म्हणत होत्या, "आमचा पूजाविधी येथेच करा !"
१०. मद्य पिऊन झिंगल्याचे सोंग करणारी दुसरी एक तिचे निळे वस्त्र पुन्हा पुन्हा खाली सरकत असताना आपली जीभ दाखवीत अशी उभी होती की, रात्री चमकणाऱ्या विद्युलतेप्रमाणे ती चटकन नजरेत भरत होती.
११. काही जणी आपल्या सोन्याच्या पैंजणांचा आवाज करीत तलम वस्त्रात झाकलेली आपली अंगे त्याला दाखवीत इकडे तिकडे फिरत होत्या.
१२. दुसऱ्या काही जणी आम्रवृक्षाची फांदी हातात धरून सुवर्णकलशांप्रमाणे दिसणारे आपले उरोज मुद्दाम दाखवीत उभ्या होत्या.
१३. कमलांच्या ताटव्यातून आणलेली कमलपुष्पे हातात धरलेली एक कमलनयना कमलावती पद्मादेवीसारखी त्या कमलमुख राजपुत्राशेजारी उभी होती.
१४. दुसरी एक सहज समजू शकेल असे मधुर गीत हावभावपूर्वक गात त्या आत्मसंयमी पुरुषाला कामोमुक करण्याचा प्रयत्न करीत होती आणि आपल्या नेत्रकटाक्षाने जणू काय म्हणत होती, "तुम्ही भ्रमात आहात बरं का महाराज!"
१५. दुसरी एक जण आपल्या तेजस्वी चेहऱ्यावर आपल्या भृकुटीची कमान ताणून वीर पुरुषाचा आविर्भाव आणून त्याची नक्कल करीत होती.
१६. जिच्या कानांतील कुंडले वाऱ्याने सारखी हलत होती अशी उत्फुल्ल उरोज असलेली दुसरी एक यौवना त्याच्याकडे पाहत मोठमोठ्याने हसून जणू काही संगत होती, "जमत असेल तर पकडा मला !"
१७. दुसरीकडे जात असताना दुसऱ्या एकीने त्याला पुष्पहाराने बांधून ठेविले; तर बाकीच्या काही जणी मधुर पण हत्तीच्या मस्तकावरील अंकुशाप्रमाणे बोचक अशा शब्दाचा मारा करून त्याला जणू काय शिक्षाच करीत होत्या.
१८. त्याच्याशी वाद घालण्याची इच्छा बाळगणाऱ्या दुसऱ्या एकीने आंब्याच्या मोहोराची डहाळी हातात धरून विषयवासनेने बेभान झालेल्या स्थितीत त्याला विचारले, "हे कुणाचे फूल आहे ?"
१९. दुसरी एक जण पुरुषी आव आणून त्याला म्हणाली, "स्त्रिकडून जिंकला गेलेला तू आता जा, ही पृथ्वी पादाक्रांत कर."
२०. दुसरी एक चंचलनयना आपले नीलकमल हुंगीत उत्तेजित अवस्थेत काहीशा अस्पष्ट शब्दात राजपुत्राला उद्देशून म्हणाली-
२१. "नाथ, मधु-सुगंधी मोहोराने बहरलेला हा आम्रवृक्ष पहा! यावर बसून सोन्याच्या पिंजऱ्यात बंद करून ठेवल्याप्रमाणे कोकिळा येथे गात आहे."

२२. “इकडे या आणि हा अशोकवृक्ष पहा ! प्रेमिकांची दु:खे तीव्र करणाऱ्या या वृक्षावर बसून हे भ्रमर असा गुंजारव करीत आहेत की, जणू काय ते कामाग्नीने
होरपळून निघाले आहेत.”
२३. “या, हा आम्रवृक्षाच्या कोमल डहाळीने आलिंगिलेला 'तिलक' वृक्ष तर
पहा ! जणू काय हळदीची उटी लावलेल्या युवतीने शुभ्र वस्त्र परिधान केलेल्या पुरुषास आलिंगन दिले आहे!”
२४. “हा फुललेला 'कुरवक' पहा! रक्तचंदन रसासारखा ताजा आणि टवटवीत दिसणारा हा वृक्ष जणू काय रमणींच्या नखाच्या रंगापुढे आपण फिक्के आहोत असे वाटून खाली वाकला आहे !”
२५. “या ! आणि सभोवार अंकुरलेला हा तरुण ‘अशोक’ बघा! जणू काय आमच्या हाताच्या सौंदर्यापुढे लज्जित होऊन तो उभा आहे!”
२६. “ज्याच्या काठावर सभोवार ‘सिंदूरवराचे’ चे कुंज उगवलेले आहेत असे हे सरोवर पहा ! जणू काय शुभ्र व तलम वस्त्रांकित अशी रूपसुंदरीच आराम घेत पहुडावी अर्स ते दिसत आहे.”
२७. “स्त्रि जातीचे सार्वभौम सामर्थ्य पहा! पलिकडे पाण्यात जी चक्रवाकी पुढे पुढे जात आहे आणि तिचा प्रियकर चक्रवाक् पक्षी एखाद्या दासाप्रमाणे तिच्या मागोमाग जात आहे.”
२८. “आपल्याच तंद्रीत गात असलेल्या कोकिळाचे ते स्वरलाप ऐका! दुसरी कोकिळा जणू काय त्याला निर्भयपणे रुकार दिल्यागत गात आहे असे वाटते.”
२९. “वसंत ऋतूंत पक्ष्यांत निर्माण होणारा उन्माद आपणातही निर्माण झाला असता व आपण किती बुद्धिमान आहोत अशा विचारात मग्न राहणाऱ्या पंडितांचा विचार आपणात नसता, तर किती चांगले झाले असते!”
३०. अशा प्रकारे प्रेमासक्त झालेल्या या प्रमदांनी प्रेमयुद्धाच्या सर्व प्रकारच्या क्लृप्त्यांनी राजपुत्रावर हल्ला केला.
३१. तथापि, अशा प्रकारचे आक्रमण झाले असतानाही तो आत्मसंयमी राजपुत्र प्रमुदित झाला नाही किंवा हंसलाही नाही.
३२. त्यांच्या नैसर्गिक अवस्थेत त्या स्त्रियांना पाहुन तो राजपुत्र स्थिर व एकाग्र मनाने विचार करू लागला.
३३. “या स्त्रियांत अशा कोणत्या गोष्टिंची उणीव आहे की, त्यांना इतकेही दिसू नये की, यौवन हे चंचल आहे ? कारण, वार्धक्य हे सौंदर्यात जे जे काही आहे ते ते सर्व नष्ट करणारे आहे.”
३४. अशा प्रकारे ह्या स्तुतीसुमनांचा वर्षाव अनेक महिने व वषें सारखा चालला होता. परंतु तो सफल झाला नाही.

## ११. महामंत्र्याकडून राजपुत्राची समजूत

१. त्या तरूण स्त्रिया अयशस्वी झाल्या व राजपुत्र काही त्यांच्याकडे आकर्षित झाला नाही हे उदयीनाच्या लक्षात आले.
२. राजनीतीत कुशल असलेल्या उदयीनाने स्वत:च शेवटी राजपुत्राशी बोलण्याचे ठरविले.
३. राजपुत्रास एकांतात भेटून उदयीन त्याला म्हणाला, “तुझा एक अनुरूप मित्र म्हणून ज्या अर्थी राजाने माझी नेमणूक केली आहे त्या अर्थी अंत:करणपूर्वक मित्रभावनेने तुझ्याशी बोलण्याची माझी इच्छा आहे.” असे म्हणून

उदयीनाने सुरुवात केली.

४. “जे अहितकारक आहे त्याच्यापासून परावृत्त करणे, जे हितकारक आहे त करण्यास प्रवृत्त करणे व संकटकाळी सोडून न जाणे ही मित्राची तीन लक्षण आहेत.”

५. “ मित्रत्वाचे अभिवचन दिल्यानंतरही पुरुषार्थापासून तुला दूर जात असताना पाहून मी त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे मी मित्रत्वाला पारखा झालो असे होईल.”

६. “कपटानेसुद्धा स्त्रिला वश करणे हे योग्यच आहे. त्यामुळे मनुष्याची लज्जाही जाते व त्याचे रंजनही होते.”

७. “आदरपूर्वक वागणूक व तिच्या इच्छेची परिपूर्ती यांनीच स्त्रिचे हृदय बांधले जाते. सदगुणच खऱ्या अर्थाने प्रेमाचे कारण असतात. कारण, स्त्रिला आदरभाव आवडतो.”

८. “मग, हे विशाल नयनांच्या राजपुत्रा, जरी तुझ्या मनात नसले तरी तुझ्या सौंदर्याला साजेशा शालीनतेने तू त्या स्त्रियांना प्रसन्न करण्याचा प्रयत्न नाही का करणार?”

९. “विनय हा स्त्रियांना सुगंधी उटण्याप्रमाणे सुखकर वाटतो. विनय हा एक बहुमोल अलंकार आहे. विनयावाचून सौंदर्य हे पुष्पविहीन उद्यानासारखे आहे !”

१०. “पण केवळ विनयाचा काय उपयोग ? त्याच्याबरोबर हृदयातील भावनेचीही जोड असली पाहिजे. मोठया कष्टाने प्राप्त होणारे कामभोग तुझ्या मुठीत आहेत. मग खात्रीने तू त्यांचा तिरस्कार का करावा?”

११. “काम हाच सर्वप्रथम पुरुषार्थ मानून प्राचीन काळी इंद्राने गौतम ऋषीची पत्नी अहिल्या हिचे प्रियाराधन केले.”

१२. “अशाच प्रकारे अगस्ती ऋषीसुद्धा सोमाची पत्नी रोहिणी हिच्याशी रममाण झाला; आणि श्रुती सांगतात, लोपामुद्रेचीही तीच गत झाली.”

१३. “महान तपस्वी बृहस्पतीने औतथ्याची पत्नी व मरुताची कन्या ममता हिला भोगून भारद्वाजाला जन्म दिला.”

१४. “श्रेष्ठ दाता अशाचन्द्राने बृहस्पतीच्या पत्नीला ती अर्ध्यप्रदान करीत असताना ग्रहण करून तिच्या ठायी दिव्य बुधाला जन्म दिला.”

१५. “अशाच प्रकारे प्राचीन काळी विषयासक्त झालेल्या पराशर ऋषीनेसुद्धा यमुनानदीच्या काठी वरुणाच्या मुलाची मुलगी कुमारी काली हिच्याशी सहवास केला.”

१६. “कामातुर वशिष्ठ ऋषीने अक्षमाला नावाच्या एका खालच्या जातीतील हीन स्त्रिशी रत होऊन कपिंगलाद नावाच्या पुत्रास जन्म दिला.”

१७. “आणि वार्धक्याने गलितगात्र झालेला असताही राजर्षी ययाती चैत्ररथ वनात विश्वाकी अप्सरेबरोबर रममाण झाला.”

१८. “आणि पत्नीशी संभोग केल्यानेने आपला मृत्यु ओढवेल हे जाणत असूनसुद्धा कौरवनरेश पंडू माद्रीच्या सौंदर्यगुणावर मुग्ध होऊन विषयसुखाच्या आधीन झाला.”

१९. “यासारख्या अनेक महान पुरुषांनी सुखासाठी निंदनीय कामोपभोगाचा अवलंब केला, तर मग जे भोग प्रशंसनीय आहेत अशाचा अवलंब करणे किती सुखद हाईल!”

२०. "आणि असे असताना तुझ्यासारख्या शक्ती व सौंदर्यसंपन्न युवकाने ज्या सुखाच्या आधीन सर्व जग आहे आणि ज्या सुखावर स्वभावतःच तुझा हक्क आहे त्या सुखाची उपेक्षा करावी हे आश्चर्य आहे !"

## १२. राजपुत्राचे महामंत्र्यास उत्तर

१. पवित्र परंपरेने समर्थिलेली व योग्य वाटणारी महामंत्र्याची ही वचने ऐकून मेघगर्जनेसारख्या आपल्या आवाजात राजपुत्राने उत्तर दिले.

२. "माझ्याबद्दलचा स्नेहभाव व्यक्त करणारी तुझी ही भाषा तुला योग्यच आहे. परंतु माझ्यासंबंधी तुझी चूक कुठे होत आहे, हे मी तुला पटवून देईन."

३. "मी ऐहिक विषयांची अवहेलना करीत नाही; सर्व मानवमात्र त्यात गुरफटलेला आहे, हे मला माहीत आहे. पण हे जग अनित्य आहे याची जाणीव असल्यामुळे माझे मन त्यात रमत नाही."

४. "यद्यपि हे स्त्रिसौंदर्य कायम राहिले तरीसुद्धा विषयोपभोगातच आनंद मानून राहाणे सूज्ञ माणसाला शोभणारे नाही."

५. "आणि जरी तू म्हणत असलास की थोर थोर महात्मे सुद्धा विषयवासनेला बळी पडले, तरी त्यांच्या त्या उदाहरणांना भुलू नकोस. कारण त्यामुळे शेवटी त्यांचा नाशच झालेला आहे."

६. "जेथे सर्वनाश आहे, किंवा जेथे ऐहिक विषयाचा मोह आहे अथवा जिथ आत्मसंयमनाचा अभाव आहे, अशा ठिकाणी खरीखुरी महात्मता असूच शकत नाही."

७. "आणि ' स्त्रियांशी वरकरणी प्रेम करुन वागावे' असे जेव्हा तू म्हणतोस, तेव्हा ते वरकरणी प्रेम जरी आदरपूर्वक असले तरी मला त्याची गोडी वाटत नाही."

८. "जेथे खरेपणा नसेल तेथे स्त्रिची इच्छापूर्ती करण्यातही मला मुळीच आवडणार नाही. जर संयोग मनापासून व नैसर्गिक नसेल तर 'त्या संयोगाचा धिक्कार असो', असेच मी म्हणेन."

९. "मन विषयाधीन झाले असेल, मिथ्यत्वावर विश्वास ठेवणारे असेल, विषयवस्तूंचे दोष न पाहणारे असेल तर मग अशी वंचना करून घेण्यात काय अर्थ आहे?"

१०. "आणि विषयवासनेचे बळी जर एकमेकांची फसवणूक करू लागले तर ते पुरुष आणि त्या स्त्रिया एकमेकाकडे पाहण्यासही अपात्र आहेत, असेच नाही का?"

११. "या गोष्टी अशा असल्यामुळे मला खात्री आहे की, अशा नीच विषयभोगाच्या कुमार्गाकडे तू मला नेणार नाहीस."

१२. राजपुत्राच्या या दृढ संकल्पाने उदयीन निरुत्तर झाला, आणि त्याने ही सर्व हकीकत त्याच्या पित्याला - राजा शुद्धोदनास निवेदन केली.

१३. आपल्या पुत्राचे मन सर्व प्रकारच्या विषयभोगापासून परावृत्त असल्याच जेव्हा शुद्धोदनाला समजले तेव्हा

त्याला त्या सबंध रात्री झोप लागली नाही. हृदयांत बाण रुतलेल्या हत्तीसारखा तो विव्हल झाला.
१४. राजपुत्र सिद्धार्थाला भोगमय जीवनाच्या सुखाकडे आकर्षित करण्याचा मार्ग शोधण्यासाठी व आपल्या जीवनाला ज्या प्रकारची कलाटणी तो देण्याचा संभव होता त्यापासून प्याला परावृत्त करण्यासाठी राजा शुद्धोदनाने आपल्या मंत्र्यासह विचार करण्यात पुष्कळ वेळ खर्च केला, पण आतापर्यंत योजिलेल्या उपायांखेरीज दुसरा कोणताही उपाय त्यांना सुचला नाही.
१५. आणि ज्यांच्या पुष्पमाला आणि अलंकार व्यर्थ ठरले, ज्यांचे हावभाव व लाडीगोडी निष्फळ ठरली, अशा आपले रतिभाव हृदयांत लपवून ठेवलेल्या युवतींचे ते अंत:पुर विसर्जित करण्यात आले.

## १३. शाक्य संघात प्रवेश

१. शाक्यांचा एक संघ होता. वयाची वीस वर्षे झाल्यावर प्रत्येक शाक्य तरुणाला संघाची दीक्षा घ्यावी लागत असे व संघाचे सभासद व्हावे लागे.
२. सिद्धार्थ गौतमाला वीस वर्षे पूर्ण झाली होती. संघाचीं दीक्षा घेऊन त्याचे सभासद होण्यास ते योग्य असे वय होते.
३. शाक्यांचे एक सभागृह होते. त्याला ते ‘संथागार’ म्हणत. ते कपिलवस्त नगरात होते. संघाच्या सभाही ह्याच संथागारात होत असत.
४. सिद्धार्थाला शाक्य संघाची दीक्षा देण्याच्या हेतूने शुद्धोदनाने शाक्यांच्या पुरोहिताला संघाची सभा बोलाविण्यास सांगितले.
५. त्यानुसार कपिलवस्तु येथील शाक्यांच्या संथागारात संघाची सभा झाली.
६. सिद्धार्थाला संघाचे सभासद करुन घ्यावे म्हणून पुरोहिताने संघाच्या सभेत ठराव मांडला.
७. तेव्हा शाक्यांचा सेनापती आपल्या जागेवर उठून उभा राहिला. संघाला उद्देशून त्याने पुढीलप्रमाणे भाषण केले : “शाक्य वंशातील शुद्धोदनाच्या कुळात जन्मलेला सिद्धार्थ गौतम संघाचा सभासद होऊ इच्छितो. त्याचे वय वीस वर्षाच असून तो सर्व दृष्टींनी ह्या संघाचा सदस्य होण्यास पात्र आहे. म्हणून त्याला ह्या संघाचे सदस्य करून घ्यावे, असे मी सुचवितो. माझी अशी प्रार्थना आहे की, या प्रस्तावाच्या विरुद्ध असणाऱ्यांनी आपले मत व्यक्त करावे.”
८. या सूचनेविरुद्ध कोणीही बोलले नाही. सेनापती पुन्हा म्हणाला, “मी दुसऱ्यांदा सांगतो की, जे कोणी या ठरावाच्या विरुद्ध असतील त्यांनी बोलावे.”
९. ठरावाविरुद्ध बोलण्यास कोणीही उभे राहिले नाही. सेनापतीने पुन्हा म्हटले, “मी तिसऱ्यांदा सांगतो की, जे कोणी या ठरावाविरुद्ध असतील .त्यांनी बोलावे.”
१०. तिसऱ्या वेळी सुद्धा कोणीही ठरावाविरुद्ध बोलले नाही.
११. शाक्यांचा असा नियम होता की, एखाद्या ठरावाशिवाय त्यांच्या संघात कोणतीही चर्चा होऊ शकत नव्हती व कोणताही ठराव तीन वेळा संमत झाल्याखेरीज तो संमत झाला असे जाहीर करता येत नव्हते.

१२. सेनापतीने मांडलेला ठराव तीन वेळा बिनविरोध संमत झाल्यामुळे सिद्धार्थाचा शाक्य संघात अंतर्भाव करून तो संघाचा सदस्य झाल्याचे जाहीर करण्यात आले.

१३. तदनंतर शाक्याचा पुरोहित उभा राहिला व त्याने सिद्धार्थाला आपल्या जागी उभे राहावयास सांगितले.

१४. सिद्धार्थाला उद्देशून तो म्हणाला, "तुला सभासद करून घेऊन संघाने तुझा बहुमान केला हे तू मानतोस ना?" "होय महाराज." सिद्धार्थ उत्तरला.

१५. "संघाच्या सभासदत्वाची बंधने तुला ठाऊक आहेत काय?" "नाही महाराज ! पण ती जाणून घेतल्याने मी सुखी होईन." सिद्धार्थ म्हणाला.

१६. पुरोहिताने म्हटले, "प्रथम तुला मी संघाच्या सभासदाची कर्तव्ये काय" आहेत ती सांगतो. असे म्हणून तो पुरोहित त्याला संघाच्या सभासदाचे एक एक कर्तव्य सांगू लागला-

( १ ) "तू संघाच्या हितसबंधांचे संरक्षण तनमनधनपूर्वक केले पाहिजे.

( २ ) संघाच्या सभांमधून तू कधीही गैरहजर राहता कामा नये.

( ३ ) कोणत्याही शाक्याच्या वर्तनात तुला दिसून येणारे दोष तू कोणत्याही प्रकारची भीती किंवा भीड न बाळगता उघडपणे बोलून दाखविले पाहिजेत.

( ४ ) तुझ्यावर कोणी दोषारोप ठेवला तर तू रागावून जाता कामा नये. परंतु तू जर अपराधी असशील तर तू तसे कबूल केले पाहिजे. अथवा निरपराधी असशील तर तू तसे सांगितले पाहिजे."

१७. पुरोहित पुढे म्हणाला, "यानंतर मी तुला संघाच्या सभासदत्वाला तू अपात्र कसा ठरू शकशील ते सागतो.

( १ ) "तू बलात्कार केल्यास सभासद राहू शकणार नाहीस.

( २ ) तू कोणाचा खून केल्यास संघाचा सभासद राहू शकणार नाहीस.

( ३ ) तू चोरी केलीस तर संघाचा सभासद राहू शकणार नाहीस.

( ४ ) तू खोटी साक्ष दिल्याचा तुझ्यावर आरोप सिद्ध झाला तर तू संघाचा सभासद राहू शकणार नाहीस."

१८. सिद्धार्थाने म्हटले, "महाराज, शाक्य संघाच्या शिस्तपालनाचे नियम मला सांगितल्याबद्दल मी आपला कृतज्ञ आहे. मी त्या नियमांचे त्यांच्या शब्द व आशयासहित पालन करण्याचा अधिकाधिक प्रयत्न करीन अशी मी आपणास खात्री देतो."

## १४. संघाशी संघर्ष

१. सिद्धार्थाला शाक्य संघाचा सभासद करून घेतल्यानंतर आठ वर्षे लोटली.

२. संघाचा तो एकनिष्ठ व बाणेदार असा सभासद होता. स्वतःच्या खाजगी कामात तो जेवढे लक्ष देत असे तेवढेच लक्ष तो संघाच्या कार्यात घालीत असे. संघाचा सभासद म्हणून त्याचे वर्तन आदर्श असे होते व त्यामुळे तो सर्वांना प्रिय झाला होता.

३. तो संघाचा सभासद झाल्यापासून आठव्या वर्षी एक अशी घटना घडली की, जी शुद्धोदनाच्या कुटुंबाच्या बाबतीत एक दुर्घटना व सिद्धार्थाच्या जीवनातील एक आणीबाणीची स्थिती ठरली.

४. या दुःखान्तिकेचा आरंभ असा आहे-

५. शाक्यांच्या राज्याच्या सीमेला लागून कोलियांचे राज्य होते. रोहिणी नदीमुळे ही दोन्ही राज्ये विभागली गेली होती.

६. रोहिणी नदीचे पाणी शाक्य व कोलीय हे दोघेही आपापल्या शेतीकरिता वापरीत होते. रोहिणी नदीचे पाणी प्रथम कोणी व किती घ्यावे याबद्दल प्रत्येक सुगीच्या हंगामात त्यांचा वाद होत असे. या वादाची परिणती भांडणात व काही प्रसंगी मारामारीतही होत असे.

७. सिद्धार्थाच्या वयाला अठ्ठावीस वर्षे झाली. त्या वर्षी शाक्यांच्या व कोलियांच्या सेवकांत नदीच्या पाण्यावरून फार मोठा संघर्ष झाला. दोन्ही बाजुंच्य लोकांना दुखापती झाल्या.

८. जेव्हा या संघर्षाची माहिती शाक्य व कोलीय यांना मिळाली तेव्हा हा प्रश्न आता युद्धानेच कायमचा निकालात काढावा असे त्याना वाटले.

९. म्हणून शाक्यांच्या सेनापतीने कोलियांशी युद्ध पुकारण्याच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी शाक्य संघाचे अधिवेशन बोलाविले.

१०. संघाच्या सभासदांना उद्देशून सेनापती म्हणाला, "आपल्या लोकांवर कोलियांनी हल्ला केला असून त्यात आपल्या लोकांना माघार घ्यावी लागली आहे. अशा प्रकारच्या आक्रमणाची कृत्ये यापूर्वी अनेक वेळा कोलियांकडून घडलेली आहेत. आम्ही ती आजपर्यंत सहन केली आहेत. पण यापुढे हे चालू देणे शक्य नाही. हे थांबलेच पाहिजे आणि हे थांबविण्याचा एकच मार्ग म्हणजे कोलियांच्याविरुद्ध युद्ध पुकारणे हाच होय. कोलियांच्या विरुद्ध संघाने युद्ध पुकारावे असा मी ठराव मांडतो. ज्यांचा विरोध असेल त्यांनी बोलावे."

११. सिद्धार्थ गौतम आपल्या जागी उभा राहिला आणि म्हणाला, "या ठरावाला माझा विरोध आहे. युद्धाने कोणताही प्रश्न सुटत नाही. युद्ध करून आपला हेतु सफल होणार नाही. त्यामुळे दुसऱ्या युद्धाची बीजे रोवली जातील. जो दुसऱ्याची हत्या करतो त्याला त्याची हत्या करणारा दुसरा भेटतो. जो दुसऱ्याला जिंकतो त्याला जिंकणारा दुसरा भेटतो. जो दुसऱ्याला लुबाडतो त्याला लुबाडणारा दुसरा भेटतो."

१२. सिद्धार्थ गौतम पुढे म्हणाला, "संघाने कोलियांच्या विरुद्ध युद्धाची घोषणा करण्याची घाई करू नये, असे मला वाटते. प्रथम दोष कोणाचा याची खात्री करून घेण्यासाठी काळजीपूर्वक चौकशी केली पाहिजे. आपल्याही लोकांनी आक्रमण केले असल्याचे मी ऐकतो. हे जर खरे असेल तर आपणसुद्धा निर्दोष नाहीत हे सिद्ध होते."

१३. सेनापतीने उत्तर दिले, "होय, आपल्या लोकांनी अतिक्रमण केले, तथापि आपण हे विसरता कामा नये की, प्रथम पाणी घेण्याची ती पाळी आपलीच होती."

१४. सिद्धार्थ गौतम म्हणाला, "यावरुन स्पष्ट होते को, आपण दोषापासून पूर्णपणे मुक्त नाही. म्हणून मी असे सुचवितो की, आपण आपल्यातून दोन माणस निवडावी व कोलियांना त्यांच्यापैकी दोन माणसे निवडावयास सागावे आणि या चौघांनी मिळून पांचवा मनुष्य निवडून घ्यावा आणि या पांच जणांनी हे भांडण मिटवावे."

१५. सिद्धार्थ गौतमाच्या सूचनेला अनुमोदनही मिळाले. परंतु सेनापतीने या सूचनेला विरोध केला. तो म्हणाला, "माझी खात्री आहे की, कोलियांचा हा उपद्रव जोपर्यंत त्यांना कडक शासन केले जात नाही तोपर्यत थांबणार नाही."

१६. यामुळे मूळ ठराव व त्याला सुचविलेली दुरुस्ती मतास टाकावी लागली. सिद्धार्थ गौतमाने सुचविलेली दुरुस्ती प्रथम मतास टाकण्यात आली. ती बहुसंख्येच्या मताधिक्याने अमान्य झाल्याचे जाहीर करण्यात आले.

१७. सेनापतीने त्यानंतर आपला स्वत:चा प्रस्ताव मतास टाकला. त्या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी सिद्धार्थ गौतम पुन्हा उभा राहिला. तो म्हणाला, “हा प्रस्ताव मान्य करू नये, अशी मी संघाला विनंती करतो. शाक्य आणि कोलीय यांचा निकटचा संबंध आहे. त्यांनी परस्पराचा नाश करणे हे शहाणपणाचे ठरणार नाही.”
१८. सिद्धार्थ गौतमाचे म्हणणे सेनापतीने खोडून काढले. त्याने जोर देऊन सांगितले की, “क्षत्रिय लोक युद्धात आपला आणि परका असा भेद करू शकत नाहीत. आपल्या राज्याकरिता त्यांनी आपत्या सख्ख्या भावाशी देखील लढले पाहिजे.”
१९. “यज्ञयाग करणे हा ब्राम्हणांचा धर्म आहे, युद्ध करणे हा क्षत्रियांचा धर्म आहे, व्यापार करणे हा वैश्यांचा धर्म आहे, तर सेवा चाकरी करणे हा क्षुद्रांचा धर्म आहे. प्रत्येक वर्णाला आपला धर्म पालन करण्यात पुण्य आहे. हीच आपल्या शास्त्रांची आज्ञा आहे.”
२०. सिद्धार्थाने उत्तर दिले, “धर्म याचा अर्थ मी असा समजतो की, वैराने वैर शमत नाही. वैरावर प्रेमानेच मात करता येते.”
२१. अस्वस्थ होऊन सेनापती म्हणाला, “या तत्वज्ञानाच्या चर्चेत शिरण्याची काही आवश्यकता नाही. मुख्य मुद्दा हा आहे की, सिद्धार्थाचा माझ्या प्रस्तावाला विरोध आहे. यासंबंधी संघाचे काय म्हणणे आहे हे हा प्रस्ताव मतास टाकून याची खात्री करून घेऊ या.”
२२. त्यानुसार सेनापतीने आपला प्रस्ताव मतास टाकला. फार मोठ्या बहुमताने तो संमत झाल्याचे घोषित करण्यात आले.

## १५. देशत्यागाची तयारी

१. दुसरे दिवशी, युद्धासाठी सैन्याची उभारणी करण्यासंबंधीच्या आपल्या योजनेचा संघाने विचार करावा म्हणून सेनापतीने शाक्य संघाची दुसरी सभा बोलाविली.
२. संघाची सभा भरल्यावर, कोलियांशी युद्ध करण्यासाठी २० ते २५ वर्षे वयाच्या प्रत्येक शाक्य पुरुषाने सैन्यात दाखल म्हावे, अशी घोषणा करण्यास संघाने मला परवानगी द्यावी, असा सेनापतीने ठराव मांडला.
३. संघाच्या अगोदरच्या सभेत ज्यांनी युद्धाची घोषणा करण्याच्या बाजूने मत प्रदर्शित केले होते व ज्यांनी त्याविरुद्ध मत दिले होते अशा दोन्ही बाजूकडचे लोक या सभेत उपस्थित होते.
४. ज्यांनी युद्ध पुकारण्याच्या बाजूने अनुकूल मत प्रदर्शित केले होते त्यांना सेनापतीचा ठराव स्वीकारण्यात काही एक अडचण नव्हती. त्यांच्या अगोदरच्या निर्णयाचा तो स्वाभाविक परिणाम होता.
५. परंतु ज्या अल्पसंख्यांकांनी त्या निर्णयाविरुद्ध मत व्यक्त केले होते त्यांच्यापुढे प्रश्न निर्माण झाला होता. त्यांच्यापुढे प्रश्न होता-बहुसंख्यांकांच्यापुढे नमावे की नमू नये?
६. अल्पमतवाल्यांनी निश्चय केला होता की, बहुमतवाल्यांच्या पुढे नमावयाचे नाही आणि याच कारणामुळे सभेत उपस्थित राहण्याचा त्यानी निर्णय घेतला होता. दुर्दैवाने त्यांच्यापैकी कुणालाही असे उघडपणे सांगण्याचे मनोधैर्य नव्हते. कदाचित त्यांना बहुमतवाल्यांना विरोध करण्यापासून होणाऱ्या परिणामाची जाणीव असावी.
७. जेव्हा सिद्धार्थाने पाहिले की, आपणास पाठिंबा देणारे मौन धारण करून बसले आहेत तेव्हा तो उभा राहिला

व संघाला उद्देशून म्हणाला, ”मित्रहो ! तुम्हाला जे वाटेल ते तुम्ही करा. तुमच्या बाजुला बहुमत आहे परंतु मला खेदाने म्हणावे लागत आहे की, सैन्यभरतीच्या तुमच्या निर्णयाचा मी विरोध करीन. मी तुमच्या सैन्यात दाखल होणार नाही आणि मी युद्धात भाग घेणार नाही.”

८. सिद्धार्थ गौतमाला उत्तर देताना सेनापतीने म्हटले, “संघाचा सदस्य होताना तू घेतलेल्या शपथेची आठवण कर. तू त्यांपैकी एका जरी शपथेचा भंग केलास तरी तुला लोक निंदेला तोंड द्यावे लागेल.”

९. सिद्धार्थाने उत्तर दिले, “होय, मी माझ्या तनमनधनाने शाक्यांचे हितसंक्षण करण्यासाठी वचनबद्ध आहे. पण हे युद्ध शाक्यांच्या सुहिताचे आहे असे मला वाटत नाही. शाक्यांच्या सूहितापपुढे मला लोकनिंदेची काय पर्वा?”

१०. कोलियांबरोबर सतत तंटा करीत राहण्याच्या कारणांवरून शाक्य हे कोशालाधिपतींच्या हातचे कसे खेळणे बनले आहेत याची आठवण करून देऊन सिद्धर्थाने संघाला सावधगिरीचा इशारा दिला. तो म्हणला, “हे समजणे कठीण नाही की, कोशल राजाला हे युद्ध शाक्यांचे स्वातंत्र्य अधिकाधिक हरण करण्यासाठी आणखी एक सबळ कारण निर्माण करून देईल.”

११. सेनापतीला ला राग आला आणि सिद्धार्थाला उद्देशुन तो म्हणाला, “तुझे हे भाषणकौशल्य तुझ्या उपयोगी पडणार नाही. बहुमताने घेतलेल्या संघाच्या निर्णयाचे तू पालन केलेच पाहिजे. कदाचित तुला असे वाटत असेल की, कोशल राजाच्या अनुज्ञेवाचून संघाची आज्ञा मोडणाऱ्याला देहान्ताची कींवा देशत्यागाची शिक्षा संघ देऊ शकत नाही आणि जर ह्यापैकी कोणतीही एक शिक्षा तुला संघाने जरी फर्मावली तरी कोशल राजा त्यास आपली अनुमती देणार नाही.”

१२. “पण लक्षात ठेव तुला शासन करण्याचे संघाजवळ दुसरे मार्ग आहेत. संघ तुझ्या कुटुंबावर सामाजिक बहिष्कार टाकू शकेल आणि सघ तुझ्या कुटुंबाची जमीन जप्त करू शकेल. याकरिता कोशल राजाची अनुमती मिळविण्यची संघाला आवश्यकता नाही.”

१३. कोलीयांशी युद्ध करण्याच्या संघाच्या योजनेला विरोध करीत राहण्यामुळे दुष्परिणाम भोगावे लागतील याची सिद्धार्थाला जाणीव झाली. त्याला तीन पर्याय विचारात घ्यावे लागले. एक सैन्यात दाखल होऊन युद्धात सामील होणे; दुसरा, देहान्तशासनाला अथवा देशत्यागाला संमती देणे; आणि तिसरा, आपल्या कुटुंबियांवर सामाजिक बहिष्कार ओढवून घेऊन त्याच्या मालमत्तेची जप्ती होऊ देण्यास तयार होणे.

१४. पहिला पर्याय न स्वीकारण्याबद्दल त्याचा निर्धार होता. तिसऱ्या पर्याया विषयीचा विचारच त्याला असह्य झाला. या स्थीतीत त्याला दुसरा पर्यायच अधिक योग्य वाटला.

१५. त्यानुसार सिद्धार्थ संघाला उद्देशून म्हणाला, “कृपा करून माझ्या कुटुंबियांना शासन करू नका. सामाजिक बहिष्कराच्या आपत्तीत लोटून त्यांना दुःख देऊ नका. त्यांच्या उपजीविकेचे एकमेव साधन असलेली त्यांची शेती हिरावून घेऊन त्यांची उपासमार करू नका. ते निरपराध अहेत. अपराधी मीच आहे. माझ्या अपराधाची शिक्षा मला एकट्यालाच भोगू द्या. मला देहान्ताची वा देशत्यागाची यांपैकी तुम्हांला योग्य वाटेल ती शिक्षा द्या, ती मी खुषीने स्वीकारीन. याविषयी कोशलाधिपतीकडे मी मुळीच याचना करणार नाही याचे मी आपणांस अभिवचन देतो.”

## १६. मार्ग सापडला-परिव्रज्या

१. सेनापती म्हणाला, "तुझे म्हणणे मान्य करणे कठीण आहे. कारण, जरी तू देहान्ताची किंवा देशत्यागाची शिक्षा भोगण्यास स्वेच्छेने तयार झालास तरी ही गोष्ट कोशलाधिपतीस समजणारच; आणि तो असाच निष्कर्ष काढील की, ही शिक्षा संघानेच दिली आहे आणि त्यामुळे तो संघाला जाब विचारील."

२. सिद्धार्थ गौतम म्हणाला, "हीच जर अडचण असेल तर मी एक मार्ग सुचवितो. मी परिव्राजक होतो आणि हा देश सोडून जातो. तो एक प्रकाराचा देशत्यागच होय."

३. सेनापतीला वाटले की, हा एक चांगला मार्ग आहे. तथापि, सिद्धार्थाला हा मार्ग कृतीत उतरविता येईल किंवा काय याबद्दल त्याला अद्यापही शंका होती.

४. म्हणून सेनापतीने सिद्धार्थाला विचारले, "तुझ्या आई-वडिलांची आणि पत्नीची संमती घेतल्यावाचून तुला परिव्राजक कसे होता येईल?"

५. "आपण त्यांची संमती मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न करू," असे सिद्धार्थाने त्याला अभिवचन दिले आणि तो म्हणाला, "त्यांची संमती मिळो वा न मिळो, हा देश त्वरित सोडून जाण्याचे मी तुम्हाला वचन देतो."

६. सिद्धर्थाने सुचविलेला मार्ग हाच या बिकट समस्येसून सुटण्याचा उत्तम मार्ग आहे असे संघाला वाटले आणि त्याने तो मान्य केला.

७. सभेचे कार्य संपल्यानंतर संघसभा विसर्जित होण्यापूर्वीच एक तरुण शाक्य आपल्या जागेवर उठून उभा राहिला आणि म्हणाला, "कृपा करून माझ म्हणणं ऐका मला काही महत्वाची गोष्ट सांगावयाची आहे."

८. बोलण्याची परवानगी मिळाल्यावर तो म्हणाला, " सिद्धार्थ गौतम आपले
वचन पाळील आणि त्वरित देशत्याग करील याबद्दल मला शंका नाही. तथापि
एकच प्रश्न आहे की, ज्याच्यामुळे माझे समाधान होत नाही."

९. "आता, ज्या अर्थी सिद्धार्थ येथून लवकरच दृष्टीआड होणार आहे त्या अर्थी कोलियांविरुद्ध युद्धाची घोषणा ताबडतोब करण्याचा संघाचा विचार आहे काय?"

१०. "या प्रश्नाचा संघाने अधिक विचार करावा अशी माझी इच्छा आहे. काहीही झाले तरी सिद्धार्थ गौतमाच्या देशत्यागाची माहिती कोशलाधिपतीला कळणारच आहे. जर कोलीयांविरुद्ध शाक्यांनी इतक्यात युद्ध पुकारले तर कोलियांशी युद्ध करण्याच्या विरुद्ध सिद्धार्थ असल्यामुलेच त्याला देशत्त्याग करावा लागला असे कोशलाधिपतीला वाटेल. हे आमच्या दृष्टीने चांगले ठरणार नाही!"

११. "म्हणून मी पुन्हा सुचवितो की, सिद्धार्थ गौतमाचा देशत्याग व कोलियांशी प्रत्यक्ष युद्धाचा प्रारंभ यांच्यात काही काळ जाऊ द्यावा, म्हणजे कोशलाधिपतीला या दोन घटनांनमध्ये संबध जोडण्यास वाव मिलणार नाही."

१२. संघाला पटले की, ही फारच महत्वाची सूचना आहे; आणि तात्कालिक निर्णयाच्या दृष्टीने ही सूचना स्वीकारण्याचे संघाने मान्य केले.

१३. अशा प्रकारे शाक्य संघाची ही दु:खपर्यवसायी सभा संपली आणि ज्यांचा युद्धाला विरोध होता, परंतु तसे सांगण्याचे ज्यांना धैर्य नव्हते अशा अल्पसंख्य सदस्यांनी या भयानक परिणामाच्या आपत्तीतून पार पडत्याबद्दल सुटकेचा नि:श्वास सोडला.

## १७. निरोप

१. शाक्य संघाच्या सभेत जे काही घडले त्याचा वृत्तांत सिद्धार्थ गौतम घरी परतण्यापूर्वी बराच वेळ अगोदर राजवाड्यात पोहोचला होता.

२ कारण, घरी परतताच सिद्धार्थ गौतमाने पाहिले की, त्याचे मातापिता रडत आहेत व ते फार दु:खमग्न झाले आहेत.

३. शुद्धोदन म्हणाला, “आम्ही युद्धाच्या दुष्परिणामाची चर्चा करीत होतो. पण तू या थरापर्यंत जाशील हे मला कधींच वाटले नाही.”

४. सिद्धार्थाने उत्तर दिले, “मला सुद्धा गोष्टी या थराला जाऊन पोहोचतील असे वाटले नव्हते. शांततेच्या समर्थनासाठी माझ्या युक्तिवादाने मी शाक्यांची मनेवळवू शकेन अशी मला आशा होती.”

५. “दुर्देवाने आपल्या सेनाधिकाऱ्याने आपल्या लोकांच्या भावना अशा काही चेतविल्या होत्या की माझ्या म्हणण्याचा त्यांच्यावर काही एक परिणाम झाला नाही.”

६. “तथापि, मी परिस्थीतीला अधिक बिघडण्यापासून कसे सावरून धरले हे आपल्या लक्षात आले असेलच. सत्य आणि न्याय यापासून मी परावृत्त झालो नाही आणि सत्याचा आणि न्यायाचा मी पुरस्कार केल्यामुळे जी काही शिक्षा करण्यात येणार होती ती मी माझ्या स्वत:वरच ओढवून घेण्यात यशस्वी झालो.”

७. शुद्धोदनाचे या योगाने समाधान झाले नाही. तो म्हणाला, “आमचे काय
होणार याचा तू विचारच केला नाहीस.” “पण मी याच कारणामुळे परिव्राजक होण्याचे स्वीकारले,” सिद्धार्थाने उत्तर दिले. शाक्यांनी जर तुमची जमीन जप्त करण्याची आज्ञा दिली असती तर त्याचा काय दुष्परिणाम झाला असता याचा तर आपण विचार करा.”

८. “पण तुझ्याशिवाय आम्हांला या जमिनीचा काय उपयोग आहे?” शुद्धोदन आंक्रदून म्हणाला, “सगळ्या कुटुंबानेच हा शाक्यांचा देश सोडून तुझ्याबरोबर अज्ञात वासात का जाऊ नये?”

९. रडत असलेली प्रजापती गौतमी शुद्धोदनाच्या म्हणण्याला साथ देत म्हणाली, “हेच बरोबर आहे. तू आम्हाला अशा स्थितीत टाकून एकटा कसा जाऊ शकतोस?”

१०. सिद्धार्थ म्हणाला, “आई, तू क्षत्रियाची माता आहेस हे तू आजपर्यत नाही का सांगत आलीस? हे खरे नाही का? मग तू धैर्य धरले पाहिजेस. हा दुखावेग तुला शोभत नाही. मी रणांगणावर जाऊन मेलो असतो तर तू काय केले असतेस? तू अशीच रडत बसली असतीस काय?”

११. “नाही”! गौतमी उत्तरली, “ते मरण क्षत्रियाला साजेसे झाले असते; पण तू आता अरण्यात जात आहेस. लोकांपासून अगदी दूर, हिंस्त्र पशूच्या सोबत राहण्याकरिता जात आहेस. आम्ही इथे शांततेने कसे राहणार? मी तुला सांगते, तू आम्हाला तुझ्यासोबत घेऊन चल.”

१२. “मी तुम्हा सर्वांना कसा काय बरोबर नेऊ? नंद अगदीच लहान मूल आहे. माझा पुत्र राहुल नुकताच जन्मला आहे. त्यांना येथे ठेवून तू येऊ शकतेस काय?” सिद्धार्थाने गौतमीला विचारले.

१३. याने गौतमीचे समाधान झाले नाही. तिचे म्हणणे होते की, “आपण सर्वजण शाक्यांचा देश सोडून

कोशलाधिपतीच्चा संरक्षणाखाली राहण्याकरिता कोशल देशात जाऊन राहू शकू.

१४. “पण आई, सर्व शाक्यजन काय म्हणतील?” सिद्धार्थाने प्रश्न केला, “याला ते देशद्रोह नाही का समजणार? शिवाय माझ्या परिव्रज्येचे कारण कोशलाधिपतीला समजेल असे मी वाचेने वा कृतीने काहीही करणार नाही, असे मी वचन दिले आहे.”

१५. मला अरण्यात एकटयालाच राहावे लागेल हे खरे आहे, पण यात कुठल श्रेयस्कर? अरण्यात राहणे की कोलियांच्या हत्येत सहभागी होणे?

१६. “पण ही घाई कशाला?” शुद्धोदन मध्येच म्हणाला. “शाक्य संघान काही काळ युद्धाचा दिवस स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.”

१७. “कदाचित युद्ध सुरूच होणार नाही. मग तू परिव्रज्या का स्थगित कुरू नये? कदाचित तुला शाक्यांत राहण्याकरिता संघाकडून अनुज्ञा मिळण्याचेही शक्य आहे.”

१८. सिद्धार्थाला ही कल्पना रुचली नाही. तो म्हणाला, “मी परिव्रज्या घेण्याचे वचन दिल्यामुळेच तर संघाने कोलियांच्या विरुद्ध युद्ध करण्याचे स्थगित केले आहे.”

१९. “मी परिव्रज्या घेतल्यानंतर युद्धाची घोषणा मागे घेण्यास संघाला उद्युक्त करणे शक्य आहे. हे सर्व मी प्रथम परिव्रज्या घेण्यावर अवलंबून आहे.”

२०. “मी वचन दिले आहे आणि ते मी पुरे केलेच पाहिजे. वचनभंगाचे परिणाम आपणाला व शांततेच्या पक्षाला दोघांनाही भयानक ठरतील.”

२१. “आई, आता माइया मार्गात आड येऊ नकोस. मला आज्ञा दे आणि तुझे आशीर्वाद दे. जे घडत आहे ते चांगल्यासाठीच घडत आहे.”

२२. गौतमी व शुद्धोदन स्तब्ध राहिले.

२३. सिद्धार्थ यशोधरेच्या महालात गेला. तिला पाहून तो स्तब्ध उभा राहिला. काय बोलावे व कसे बोलावे हे त्याला सुचेनासे झाले. यशोधरेनेच स्तब्धता भंग केली. ती म्हणाली, “कपिलवस्तु येथे संघाच्या सभेत काय घडले ते सर्व मला समजले आहे.”

२४. सिद्धार्थाने विचारले, “यशोधरा, मला सांग, परिव्रज्या घेण्याच्या माझ्या
निश्चयाबद्दल तुला काय वाटते?”

२५. त्याला वाटले की ती मूर्च्छित होऊन पडेल; पण तसे काही झाले नाही.

२६. आपल्या भावनावर संपूर्णपणे नियंत्रण ठेवून ती उत्तरली, “मी आपल्या जागी असते तरी आणखी दुसरे काय करू शकले असते! कोलियांविरुद्ध यूद्धकरण्याच्या कामी मी निश्चितपण भागीदारीण झाले नसते!”

२७. “आपला निर्णय हा योग्य निर्णय आहे. माझी आपणाला अनुमती आहे आणि पाठिंबाही आहे. मी सुद्धा आपल्याबरोबर परिव्रज्या घेतली असती. मी परिव्रज्या घेत नाही याचे एकच कारण, मला राहुलचे संगोपन करावयाचे आहे.”

२८. “असे झाले नसते तर फार बरे झाले असते; पण आपण धीट आणि शूर बनून प्राप्त परिस्थितीला तोंड दिले पाहिजे. आपल्या मातापित्यांविषयी व आपल्या पुत्राविषयी आपण मुळीच काळजी करू नका. माझ्या शरीरात प्राण असेपर्यंत मी त्यांची देखभाल करीन.”

२९. “ज्या अर्थी आपल्या जवळच्या प्रियजनांना सोडून आपण परिव्राजक होत आहात त्या अर्थी आपण एक असा नवीन जीवनमार्ग शोधून काढा की, तो सकल मानवजातीला कल्याणकारी ठरेल. हीच एक केवळ माझी इच्छा आहे.”

३०. याचा सिद्धार्थ गौतमावर फार मोठा प्रभाव पडला. यशोधरा किती शूर, धैर्यवान, उदात्त मनाची स्त्री आहे याची पूर्वी कधी न आलेली प्रचीति त्याला आली आणि अशी पत्नी लाभल्याबद्दल आपण किती भाग्यवान आहोत आणि अशा पत्नीचा व आपला वियोग दैवाने कसा घडवून आणला याची त्याला प्रथमच कल्पना आली. त्यान राहुलला आणण्यासाठी तिला सांगितले. पित्याच्या वात्सल्यदृष्टीने त्याने त्याच्याकड पाहिले आणि तो निघुन गेला.

## १८. गृहत्याग

१. सिद्धार्थाने भारद्वाजाच्या हस्ते परिव्रज्या घेण्याचा विचार केला. भारद्वाजाचा आश्रम कपिलवस्तुमध्ये होता. त्याप्रमाणे तो दुसरे दिवशी आपला आवडता घोडा कंठक यावर आरूठ होऊन व आपला आवडता सेवक छन्न याला बरोबर घेऊन आश्रमाकडे निघाला.

२. तो जसजसा आश्रमाच्या जवळ आला तसतसे एखाद्या नवीनच येणाऱ्या नवरदेदाला पाहण्यासाठी यावे तशी अनेक स्त्री-पुरुषांनी बाहेर येऊन त्याला भेटण्यासाठी दारापाशी एकच गर्दी केली.

३. आणि जेव्हा ते त्याच्याजवळ आले तेव्हा ते आश्चर्यचकित होऊन त्याच्याकडपाहू लागले व त्यांनी अस्फुट कमलाप्रमाणे हात जोडून त्याला वंदन केले.

४. ते त्याच्या सभोवती उभे राहिले. त्यांची अंत:करणे भावाकूल झाली होती. जणू काही प्रेमाने प्रफुल्लित होऊन पण निश्चल नयनांनी ते त्याला प्राशन करीत होते.

५. काही स्त्रीयांना वाटले की, तो साक्षात कामदेवाचा अवतारच आहे. कारण तशा सुंदर लक्षणांनी तो जात्याच सालंकृत होता.

६. काहीना तर त्याची कोमलता व राजचर्या पाहून आपल्या दिव्य किरणांनी युक्त असा चंद्रच पृथ्वीवर प्रत्यक्ष उतरलेला आहे असा तो भासला.

७. दुसऱ्या काही जणी त्याच्या सौंदर्याला भाळून जणू काय त्याला गिळून टाकावे म्हणून जांभया देत होत्या आणि एकमकींकडे नजरा रोखून हलकेच नि:श्वास टाकीत होत्या.

८. अशा प्रकारे स्त्रिया त्याच्याकडे नजरा लावून केवळ पाहात राहिल्या होत्या. त्यांच्या मुखातून शब्द येत नव्हता की त्यांच्या चेहऱ्यावर स्मित येत नव्हते. परिव्रज्या घेण्याच्या त्याचा निर्णयाचा विचार करीत दिडमूढ स्थितीत त्याच्या भोवती त्या उभ्या राहिल्या.

९. मोठ्या प्रयासाने त्या गर्दीतून त्याने आपली सुटका करून घेतली आणि आश्रमाच्या दारात प्रवेश केला.

१०. आपण परिव्रज्या घेत असताना शुद्धोदनाने व प्रजापती गौतमीने तेथेउपस्थित राहावे हे सिद्धार्थाला आवडले नाही. कारण त्याला ठाऊक होते की, दु:खावेगाने ती स्वत:ला सावरून धरू शकणार नाहीत; परंतु ती त्याच्या न कळत अगोदरच आश्रमात येऊन पोहोचली होती.

११. आश्रमाच्या आवारात प्रवेश करताच तेथे जमलेल्या लोकांत आपले मातापिता असल्याचे त्याने पाहिले.
१२. आपल्या मातापित्यास पाहताच तो प्रथम त्यांच्याजवळ गेला आणि त्याने त्यांचा आशीर्वाद मागितला. त्यांच्या भावना इतक्या दाटून आल्या होत्या की,त्यांच्या मुखातून एक शब्दही बाहेर पडत नव्हता. त्यांनी रडरडून त्याला कवटाळून धरले आणि आपल्या अश्रुंनी न्हाऊन काढले.
१३. छन्नाने कंठकाला आश्रमातील एका झाडापाशी बांधून तो तेथे उभा होता. शुद्धोदन व प्रजापती रड़त असलेली पाहून त्यालाही भरून आले आणि तो रडू लागला.
१४. मोठचा कष्टाने सिद्धार्थ आपल्या मातापित्यांपासून दूर झाला व छन्न जेथेउभा होता तेथे गेला. त्याने त्याला आपले कपडे व अलंकार घरी परत नेण्यासाठी दिले.
१५. त्याने परिव्राजकाला आवश्यक असे आपले मुंडन करून घेतले. त्याचा चुलतभाऊ महानाम याने परिव्राजकाला योग्य अशी वस्त्रे व भिक्षापात्र आणले होते. सिद्धार्थाने ते वस्त्र परिधान केले.
१६. अशा प्रकारे परिव्राजकाच्या जीवनात प्रवेश करण्याची पूर्व तयारी करून सिद्धार्थ परिव्रज्येची दीक्षा घेण्याकरिता भारद्वाजापाशी गेला.
१७. भारद्वाजाने आपल्या शिष्यांच्चा सहाय्याने आवश्यक तो संस्कारविधी केला आणि सिद्धार्थ गौतम परिव्राजक झाल्याचे जाहीर केले.
१८. परिव्रज्या घेण्याची व विलंब न लावता शाक्य राज्याच्चा सीमेबाहेर जाण्याची आपण शाक्य संघाच्चा समोर दुहेरी प्रतिज्ञा केली असल्याचे स्मरण ठेवून परिव्रज्येचा संस्कार आटोपल्यावर लगेच सिद्धार्थ आपल्या प्रवासाला निघाला.
१९. जो जनसमुदाय आश्रमात जमला होता तो नेहमीपेक्षा फार मोठा होता. कारण गौतमाला परिव्रज्या ध्यावयास लागणारी परिस्थितीच मोठी असाधारण हाती. राजपुल आश्रमाच्या बाहेर पडताच तो जनसमुदायही त्याच्या मागोमाग जाऊ लागला.
२०. त्याने कपिलवस्तु सोडले आणि तो अनोभा नदीच्या दिशेने जाऊ लागला. त्याने मागे वळून पाहिले तेव्हा तो जनसमुदायही अद्याप त्याच्चा मागोमाग येत असलेला त्याने पाहिला.
२१. तो थांबला आणि त्या समुदायास उद्देभून म्हणाला, “बंधूंनो आणि भगिनींनो, तुम्ही माझ्या मागोमाग येण्यापासून काही उपयोग होणार नाही. मी शाक्य आणि कोलियांच्यामधील झगडा मिटविण्यात अयशस्वी ठरलो आहे; परंतु तडजोडीच्या बाजूने तुम्ही लोकमत तयार केले तर तुम्ही कदाचित यशस्वी होऊ शकाल म्हणून तुम्ही परत जाण्याचीची कृपा करा.” ही विनंती ऐकून जनसमुदाय मागे परतू लागला.
२२. शुद्धोदन व गौतमी राजवाड्याकडे परतले.
२३. सिद्धार्थाने टाकून दिलेली वस्त्रे व अलंकार पाहाणे गौतभीला असह्य झाले. तिने ती कमळानी भरलेतल्या एका तळ्यात टाकली.
२४. परिवज्या (संन्यास ) ग्रहण करण्याच्या वेळी सिद्धार्थ गौतमाचे वय अवघे एकोणतीस वर्षाचे होते.
२५. लोक त्याची आठवण करून त्याची प्रशंसा करून म्हणत, “हाच तो श्रेष्ठ कुलोत्पन्न शाक्य, थोर मातापित्यांच्या पोटी जन्मलेला, विपुल धनसंपन्न व नवयौवन-शाली, बुद्धीने व शरीराने सुसंपन्न असून राजविलासांत वाढलेला; पृध्वीवर शांती नंदावी म्हणून लोककल्याणासाठी तो स्वकीयांशी लढला!”

२६. “तो असा शाक्य युवक होता की, ज्याने स्वकीयांच्या बहुमतापुढे आपलेशीर झुकविले नाहीच; पण स्पेच्छेने त्याने शिक्षा घेण्याचे पत्करले. त्या शिक्षेचा अर्थ ऐश्वर्याऐवजी दारिद्र्य, सुखसमृदीऐवजी भिक्षापात्र, गृहसौख्याऐवजी गृहहीन स्थिती असा होता; आणि तो अशा तर्हेने जात आहे की, त्याची काळजी वाहणारे जगात कोणी नाही आणि जगात स्वत:ची म्हणून म्हणता येईल अशी कोणतीही वस्तु त्याने सोबत घेतलेली नाही.”
२७. “हा त्याचा स्वेच्छेने केलेला महान असा त्याग होय. हे त्याचे शौर्याचे व धैर्याचे कृत्य आहे. जगाच्या इतिहासात त्याला तुलना नाही. त्याला शाक्यमुनी अथवा शाक्यसिंह असेच म्हणावे लागेल.”
२८. शाक्यकुमारी किसा गौतमीचे म्हणणे किती यथार्थ होते. सिद्धार्थ गौतमाच्यासंबंधी तिने म्हटले होते. “धन्य त्याची माता, धन्य त्याचा पिता, ज्यांनी अशा पुत्राला जन्म दिला. धन्य ती पत्नी जिला असा पती लाभला!”

## १९. राजपुत्र आणि त्याचा सेवक

१. कंठकाला घेऊन छन्नानेही घरी परतले पाहिजे होते; पण त्याने परत जाण्याचे नाकारले. त्याने राजपुत्राला कंठकासह अनोभा नदीच्या तीरापर्यत तरी पोहोचविण्याचा आग्रह धरला. छन्नाचा आग्रह इतका होता की त्याच्या इच्छेपुढे गौतमाला माघार ध्यावी लागली.
२. शेवटी ते सर्वजण अनोभा नदीच्या तीरावर येऊन पोचले.
३. तेन्हा छन्नाकडे वळून गौतम म्हणाला, “मित्रा, माझ्या पाठोपाठ येण्याने तुझी माझ्यावरील भक्ती स्पष्ट झाली आहे. क्या स्वामिभक्तीने तू माझे हृदय जिंकिले आहेस.”
४. “तुला कोणतेही बक्षीस देण्यास मी जरी असमर्थ असलो तरी माझ्याविषयीच्या तुझ्या उदात्त भावनांनी मला संतोष झाला आहे.”
५. “ज्याच्याकडून आपणाला लाभ होणार आहे त्याच्याबद्दल आपुलकी कोण दाखविणार नाही? पण दैव फिरले की, आपली वाटणारी माणसे देखील नेहमी परक्यासारखी वागतात.”
६. “कुटुंब पोषणासाठी पुत्राला लहानाचे मोठे केले जाते. पित्याचा सन्मान पुत्र करतो तो त्याच्या भावी पोषणासाठी. जग आशेसाठी माया करते. काही एक हेतूशिवाय स्वार्थनिरपेक्षता असूच शकत नाही.”
७. “तूच एक याला अपवाद आहेस. आता हा घोडा घे आणि परत जा!”
८. “महाराज जरी आपल्या प्रेमल आत्मविश्वासामुळे अद्याप डळमळले नसले तरी ते आपले दु:ख आतल्या आंत गिळण्याची पराकाष्ठा करीत असतील.”
९. “त्यांना सांग की, मी त्यांना सोडून आलो तो स्वर्गप्राप्तीच्या तृष्णेमुळे कींवा त्यांच्यावरील प्रेमाच्या अभावामुळे अथवा काही रागामुळे नाही.”
१०. “घर सोडून मी अशा रीतीने निघून जात असलो तरी माझ्याबद्दल शोक करण्याचा विचार त्यांनी करू नये. सहवास हा कितीही दीर्घ काल टिकला तरी कालावधीने त्याचा शेवट हा होतोच.”
११. “जर वियोग अटल आहे तर स्वजनांपासून दुरावण्याचे अनेक प्रसंग वारंवार कसे येणार नाहीत?”
१२. “माणसाच्या मरणसमयी त्याच्या संपत्तीचा नि:संशय वारसाहक्क सांगणारे लोक असतात; परंतु त्याच्या सद्गुणाचे वारस जगात सापडणे कठीण असते, किंबहुना ते नसतातच.”

१३. “महाराजांची-माझ्या पिताजींची-सेवा-शुश्रूषा होणे अगत्याचे आहे. महाराज म्हणतील की, मी अवेळी निघून गेलो; पण कर्तव्यासाठी कधीच अयोग्य वेळ नसते.”

१४. “ह्या आणि अशाच शब्दांत मित्रा, महाराजांना सांग आणि जेणेकरून ते माझी आठवणही करणार नाहीत असाच प्रयल करीत राहा”

१५. “आणि होय, माझ्या मातेलाही पुन्हापुन्हा सांग की, तिच्या वातल्यप्रेमाला मी किती तरी अपात्र आहे. ती फार थोर स्त्री आहे. तिची थोरबी शब्दानी सागता येण्यासारखी नाही.”

१६. हे शब्द ऐकून शोकाकुल झालेला छन्न हात जोडून भावनातिरेकाने कंठ दाटून येऊन उत्तरला :-

१७. “स्वामी, चिखलाने भरलेल्या नदीच्या पत्रात हत्ती जला रुतून बसावा, तशी तू तुझ्या आप्तानां ज्या मानसिक वेदना देत आहेस ते पाहून माझ्या मनाची स्थिती होत आहे.”

१८. “तुझ्यासारखा निग्रह पाहून, एखाद्याचे अंतःकरण लोखंडासारखे कठीण असले तरी कोणाच्या डोळ्यात अश्रु आल्याशिवाय राहाणार नाहीत? ज्यांचे अंत:पारण प्रेमाने उचंबळले आहे त्यांची तर गोष्टच बोलावयास नको.”

१९. “कुठे तुझा तो प्रासादात लोळणाऱ्या शरीराचा नाजूकपणा आणि कुठे कठीण कुशाग्रांनी भरलेली तपस्व्यांच्या अरण्यातील ती भूमि!”

२०. "हे राजपुत्रा, तुझा हा निर्णय माहीत असताना-हा घोडाघेऊन कपिलवस्तु नगरीला दुःखात लोटण्यास मी आपणहुन कसा जाऊ?”

२१. एखादा धर्मनिष्ठ माणुस आपल्या सद्धर्माला सोडून देईल काय? त्याचप्रमाणे स्वत:च्या मुलासाठी सतत झटणाऱ्या आपष्या वयोबृद्ध पित्याला सोडून तूजाणार काय?”

२२. “आणि तुझी सावत्र आई-जिने तुला लहानाचे मोठे करण्यात खस्ता खाल्यातिला एखादा कृतघ्न माणूस आपल्या उपकारकर्त्याला विसरतो तसा तू सोडून जाणार काय?”

२३. “जी सद्गुणाची खाण आहे, जिच्यामुळे कुटुंबाची शोभा वाढली आहे, जी पतिभक्तिपरायण असून जिने नुकताच एका बालकाला जन्म दिला आहे अशा तुझ्या त्या पत्नीचा तू त्याग करणार काय?”

२४. “धर्म आणि कीर्तीच्या चाहत्यात सर्वश्रेष्ठ असणारा तू, एखाद्या निगरगट्ट उधळ्या माणसाने स्वतःचे मौल्यवान धन उधळून टाकावे तसे, ज्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच अशा यशोधरेच्या त्या लहानग्या बाळाला सोडून जाणार काय?”

२५. “आणि तू तुझे आप्त नातलग व राज्य सोडून जाण्याचा जरी निर्धार केला असलास तरी, हे अन्नदात्या, तू मला सोडून जाणार नाहीस असा मला विश्वास आहे. कारण तुझे पाय हेच माझे आश्रयस्थान आहे.”

२६. “अशा प्रकारे माझे अंतःकरण तुझ्यासाठी होरपळून निघत असताना तुला असा एकटा अरण्यात मागे टाकून मी परत नगराकडे जाऊच शकत नाही.२

२७. “तुझ्याशिवाय मी नगरात परतल्यावर महाराज मला काय म्हणतील? आणि कुशल वर्तमान म्हणुन मी तुझ्या पत्नीला काय सांगू?”

२८. “राजाजवळ माझी बदनामी पुन्हा पुन्हा कर असे तूर सागतोस; पण ते कोण खरे मानील? आणि कोण त्यावर विश्वास ठेवील?' छन्न पुढे म्हणाला, “आणि जरी निर्लज्ज मनाने आणि जीभ टाळयाला चिकटवून तसे बोलण्याचा मी प्रयत्न केला तरी महाराजांना ते पटणार नाही.

२९. “जो नेहमी प्रेमळ आहे आणि जो दुसऱ्यावर दया करण्यास कधीही विसरत नाही, अशा माणसाला आपल्यावर प्रेम करणाऱ्या व्यक्तीस सोडून जाणे मुळीच शोभत नाही. म्हणून मागे फीर आणि माझ्यावर दया कर!”

३०. दु:खाकुल छन्नाचे ते शब्द ऐकून अगदी हळळुवारपणे सिद्धार्थ गौतमाने म्हटले,

३१. “छन्ना, माझ्या वियोगाचे दु:ख सोडून दे, अनेक जन्मांच्या फेऱ्यात सापडलेल्या प्राणांच्या बाबतीत बदल हा अटळ आहे.”

३२. “प्रेमामुबळे मी माझ्या आप्तनातलगांना सोडले नाही तरी मृत्यू आम्हाला अगतिकपगे एकमेकांस सोडण्यास भाग पाडील.”

३३. “ती माझी आई, जिने मला अनंत वेदना सोसून आपल्या उदरी जन्म दिला, तिच्या बाबतीत मी कुठे आहे आणि माझ्या बाबतीत ती आता कुठे आहे?”

३४. “पक्षी जसे आपल्या निवाऱ्यासाठी झाडावर एकत्र जाऊन बसतात आणि नंतर एकमेकांपासून दूर जातात तसे प्राणिमात्रांच्या सहवासाचा शेवट न चुकता वियोगातच होतो.”

३५. “ढग जसे जवळ जवळ येऊन पुन्हा दूर दूर जातात तसाच मी प्राणीमात्रांचा सहवास व वियोग मानतो.”

३६. “आणि ज्या अर्थी एक दुसऱ्याची फसवणूक करीत हे सर्व जग चालले आहे त्या अर्थी भीतिदायक असणाऱ्या संयोगकाळात हे माझे ते माझे असे मानणे बरोबर नाही.”

३७. “आणि म्हणून, ज्या अर्थी हे सत्य आहे त्या अर्थी माझ्या भल्या मित्रा, तू दु:ख करू नकोस. परत जा. आणि जर तुझ्या प्रेमामुळे तू घोटाळत असशील तर तू आधी जा आणि नंतर परत ये.”

३८. “माझ्याबद्दल वाईट न बोलता कपिलवस्तूच्या लोकांना जाऊन सांग की, ‘सिद्धार्थावर प्रेम करण्याचे सोडा व त्याचा निर्धार ऐका.’”

३९. स्वामी आणि सेवक यांच्यामधील हा संवाद ऐकून त्या उमद्या कंठक घोड्याने आपल्या जिभेने सिद्धार्थाचे पाय चाटले आणि टपटप उष्ण अश्रु ढाळले.

४०. ज्याची बोटे एकमेकाशी जुळलेली, ज्यावर स्वस्तिकाचे शुभचिन्ह आणि ज्याचे तळवे मध्ये खोलगट होते अशा आपल्या हाताने गौतमाने कंठक घोड्याच्या पाठीवर थोपटले आणि एखाद्या मित्रासारखा 'तो त्याला म्हणाला,

४१. “अश्रु ढाळू नकोस, कंठका! आवर ते अश्रु. तुझ्या कष्टाचे तुला लवकरच फळ मिळेल.”

४२. त्यांनतर छन्नाने आपापल्या मार्गाला लागण्याची वेळ आली आहे हे जाणून ताबडतोब गौतमाच्या काषाय वस्त्रांना नमन केले.

४३. कंठक आणि छन्न याचा निरोप घेऊन गौतम आपल्या मार्गाने जाऊ लागला.

४४. अशा रीतीने स्वत:च्या राज्याची तमा न बाळगता हलक्या वस्त्रांनिशी ऋषिवनाकडे जाणाऱ्या आपल्या मालकाला पाहून त्या छन्नाने आपले बाहू पसरून मोठा आक्रोश केला व तो जमिनीवर लोळू लागला.

४५. पुन्हा पुन्हा मागे वलून पाहात तो मोठमोठ्याने रडू लागला. आपल्या बाहुंनी कंठक घोड्याला कुरवाळू लागला आणि अशा रीतीने निराशेने सारखा दु:ख करीत तो परत जाण्यासाठी आपल्या प्रवासास निघाला.

४६. मार्गात तो काही वेला आपल्याशीच विचार करीत राही; काही वेळा चालताना अडखले व काही वेला

जमिनावर पडे. आणि अशा रीतीने जात असताना स्वामीभक्तीने विदग्ध झालेला तो छन्न रस्त्यावर अशा काही गोष्टी करीत होता की, आपण काय करीत आहोत याचे त्याला भानच राहिले नव्हते.

## २०. छन्न परतला

१. आपला मालक अशा रीतीने अरण्यात गेला यामुले दु:खी कष्टी क्षालेला छन्न मार्गात आपल्या दु:खाचा भार कमी करण्याचा प्रयत्न करीत होता.
२. त्याचे अंत:करण इतके जड जले होते की, ज्या रस्त्याने कंठकासह तो एका रात्रीत कूच करीत असे, त्याच रस्त्याने आपला स्वामी आपल्याबरोबर नाही याचा विचार करीत प्रवास संपविण्यात त्याला आठ दिवस लागले.
३. कंठक घोडा जरी मोठया शूराच्या आवेशाने कूच करीत होता तरी तो अगदी गलितगात्र, निस्तेज झाला होता. जरी तो अलंकारभूषणांनी सजविलेला होता तरी बरोबर आपला धनी नाही म्हणून अगदी स्वरूपहीन दिसत होता.
४. आणि ज्या दिशेला त्याचा मालक गेला होता त्या दिशेकडे वळून एकसारखी मान वर खाली करून केविलवाण्या सुरात खिंकाळत होता. तो जरी अतिशय भुकेलेला होता तरी पूर्वीप्रमाणे मार्गात गवत किंवा पाणी याची त्याने अपेक्षा केली नाही किंवा त्यांना तोंडही लावले नाही.
५. हळूहळू ते शेवटी कपिलवस्तुला येऊन पोहोचले. कपिलवस्तु नगरी तर गौतमाच्या जाण्याने अगदी उजाड दिसत होती. ते दोघे कपिलवस्तुला शरीराने पोचले, मनाने नाही.
६. जरी कपिलवस्तु नगरी अधून मधून कमळाच्या ताटव्यांनी भरलेल्या जलाशयामुळे व फुलांनी बहरलेल्या वृक्षांमुळे उल्हसित व शोभायमान दिसणारी होती तरी आज तिच्या नागरिकांचा आनंद पार मावळला होता.
७. निस्तेज चेहऱ्याने व अश्रु ढाळीत त्या दोघांनी जेव्हा हळू हळू शहरात प्रवेश केला तेव्हा त्या शहरातील सर्व लोक त्यांना शोकात बुडालेले दिसले.
८. जेव्हा लोकांनी छन्न आणि घोडा कंठक हे शाक्य कुलाच्या कुलदीपकाशिवाय गलितगात्र स्थितीत परत आलेले पाहिले तेव्हा त्यांनी ढळढळा अश्रु ढाळले!
९. "कुठे आहे आमचा राजपुत्र? कुठे आहे या राजकुळाचा व राज्याचा कुलदीप?" असे म्हणून व अश्रु ढाळीत लोक रागाने छन्नाच्या मागोमाग रस्त्याने धावू लागले.
१०. "गौतमाशिवाय ही नगरी म्हणजे अरण्य आहे आणि ज्या अरण्यात गौतम राहात आहे ती नगरी आहे. गौतमाशिवाय या शहराचे आम्हाला काहीसुद्धा आकर्षण वाटत नाही."
११. इतक्यात "राजपुत्र आला" असा हर्षोद्गार काढीत नगरयुवती रस्त्याच्या बाजूच्या खिडकीसून गर्दी करून पाहू लागल्या. परंतु जेन्हा त्यानी घोड्याची पाठ रिकामी पाहिली तेव्हा धडाधड खिडक्या बंद करून त्या आकोशाने रडू लागल्या.

## २१. शोकाकुल कुटुंब

१. शुद्धोदनाची कुटुंबीय मंडळी छन्न परत येण्याची आतुरतेने वाट पाहात होती. त्यांना आशा होती की, छन्न सिद्धार्थ गौतमाला घरी परत येण्यास भाग पाडील.

२. राजाच्या अश्व-शाळेत शिरताच कंठक घोडा आपले दु:ख राजमहालातील लोकांना कळण्यासाठी मोठयाने खिंकाळला.

३. राजाच्या अंत:पुराच्या जवळपास असलेले लोक आपल्या मनाशीच म्हणाले, "ज्या अर्थी घोडा कंठक खिंकाळत आहे त्या अर्थी राजपुत्र गौतम परत आला असावा."

४. आणि दु:खाने मूर्च्छित झालेल्या स्त्रिया हर्षाने बेहोष होऊन डोळे विस्फारीत राजपुत्राला पाहण्याच्या आशेने राजमंदिराच्या बाहेर आल्या. परंतु त्यांची मोठी निराशा झाली. राजपुत्राशिवाय केवळ कंठक घोडाच त्यांना दिसला.

५. गौतमीचा तर मनावरचा ताबा सुटून ती मोठमोठ्याने रडू लागली व मूर्च्छित झाली आणि रडत असतानाच ती ओरडली

६. "आजानुबाहू आ हे, ज्याची कमर सिंहाच्या कमरेसारखी बारीक, बैलाच्या डोळयासारखे ज्याचे डोळे, ज्याची अंगकांती सोन्यासारखी पिवळी धमक ज्याची छाती रुंद व आवाज दुंदुभी किंवा मेघगर्जनेसारखा आहे अशा वीरपुरुषाने वनातील आश्रमात राहावे काय?"

७. "असा सर्वगुणसंपन्न वीर पुरुष आपणापासून निघून गेल्यामुळे ही पृथ्वी त्या थोर कार्य करणार्‍या अद्वितीय पुरुषाच्या बाबतीत राहण्यास खरोखर अयोग्य अशीच झाली आहे?"

८. "ज्याची बोटे सुंदर स्नायूंनी जोडलेली आहेत, ज्यांचे घोटे स्नायूखाली लपलेले, नीलकमळासारखे दिसणार्‍या व मध्यावर चक्रचिन्ह धारण करणार्‍या अशा त्याच्या त्या सुकोमल दोन पायांनी तो त्या खडकाळ प्रदेशात कसा बरे चालू शकेल?"

९. "ज्याच्या शरीराला ऊंची वस्त्रे-प्रावरणे, सुगंधी अत्तरे व चंदनाने सजविलेल्या प्रासादाच्या गच्चीवर पहुडण्याची सवय तो पौरुषसंपन्न देह अरण्यात थंडी-वारा, व ऊन-पावसाच्या मार्‍याला नेहमी मोकळ्या असलेल्या अरण्यात कसा बरे राहु शकेल?"

१०. "ज्याला आपले कुटुंब, चांगुलपणा, सामर्थ्य, शक्ती, विद्वत्ता, सौंदर्य व तारुण्य याचा अभिमान वाटतो, जो नेहमी दान करण्यास सिद्ध असतो, पण घेण्यास नसतो, तो दुसर्‍याकडून भिक्षा मागत कसा काय फिरू शकेल?"

११. "जो स्वच्छ सुवर्ण शय्येवर झोपला असताना वाद्यवृंदाच्या नादमाधुर्याने रत्री ज्याला जागे केले जाते, तो माझा संन्याशी उघड्या जागेवर अस्ताव्यस्त पसरलेल्या फाटक्या चिंध्यांवर कसा काय झोपणार? हाय रे दैवा!"

१२. हा असा हृदयद्रावक शोक ऐकून तेथील स्त्रिया एकमेकींच्या गळयात गळा घालून, थरथरणाच्या वेली जशा आपल्या फूलांतून मध गाळतात तशा आपल्या डोळयांतून अश्रुधारा गाळीत होत्या.

१३. नंतर यशोधरेने आपण सिद्धार्थाला जाण्याची अनुज्ञा दिली आहे हे विसरून जाऊन दिडमूढ अवस्थेत धरणीवर अंग टाकून दिले.

१४. "मी त्यांची धर्मपत्नी असताना ते मला कसे सोडून गेले? त्यांनी मला विधवा करून मागे ठेविले. त्यांनी आपल्या धर्मपत्नीला आपल्या नव्या जीवनक्रमाची भागीदारीण करावयास पाहिजे होते."

१५. “मला स्वर्गप्राप्तीची अपेक्षा नाही. माझी एकच इच्छा की, माझ्या प्रिय
पतीने मला या किंवा दुसऱ्या जगात एकटीला मागे ठेवून जाऊ नये!”

१६. “विशाल डोळे व प्रसन्न हास्य असलेल्या माझ्या पतीच्या मुखाकडे पाहण्यास मी जरी अपात्र असले तरी या बिचाऱ्या राहुलाने आपल्या पित्याच्या मांडीवर कधीही खेळु नये काय.

१७. “हाय रे देवा! त्या सुज्ञ पुरुष नायकाचे अंतःकरण किती निष्ठुर! त्याच्या सुकोमल सौंदर्याप्रमाणे ते भासत असले तरी किती निर्दय व क्रूर! शत्रूलाही मोहित करील अशा बोबड्या बोलाच्या ह्या बालकाला आपण होऊन कोण बरे सोडून जाईल?”

१८. “माझे हृदय खरोखर मोठे कठोर आहे, होय! अगदी दगडाचे किंवा लोखंडाचे बनलेले असावे! कारण त्या हृदयाचा नाथ सुखोपभोग घेण्यास समर्थ असताना व एखाद्या पोरक्यासारखा आपले सर्व राजवैभव सोडून देऊन अरण्यात गेला असतानाही त्या हृदयाला तडा गेला नाही! पण मी काय करू? आता मला हे दुःख सहनच होत नाही!”

१९. अशा तर्हेने दुःखाने मूर्च्छित होऊन यशोधरा एकसारखी आक्रंदत होती. स्वभावतः जरी ती संयमशील होती तरी तिच्या या दुःखद स्थितीने तिच्या मर्यादेचा बंधारा फुटला होता.

२०. अशा प्रकारे दुःखाने दिडमूढ होऊन मोठमोठ्याने आक्रंदत जमिनीवर पडलेल्या यशोधरेला पाहून सर्व स्त्रिया मोठ्याने ओरडल्या आणि मोठाल्या कमळांवर पावसाच्या सरींचा मारा व्हावा तसा अश्रूंच्या नद्या त्यांच्या डोळयांतून गालावर वाहू लागल्या.

२१. छन्न आणि कंठक परत आले हे ऐकून आणि आपल्या मुलाचा दृढनिश्चय समजताच दुःखित होऊन राजा शद्धोदन धरणीवर पडला.

२२. दुःखविव्हळ झालेल्या शुद्धोदनाला सेवकांनी सावरून धरले. तेवढ्यात त्यांनी अश्रूंनी डबडबलेल्या डोळयांनी त्या घोड्याकडे पाहिले आणि जमिनीवर अंग टाकून विव्हळून तो रडू लागला.

२३. त्यानंतर शुद्धोदन उठला आणि मंदिरात गेला. त्याने तेथे देवाची प्रार्थना केली आणि पूजाअर्चा करून, आपला मुलगा सुरक्षित परत यावा म्हणून देवाची आराधना केली. अशा प्रकारे, “देवा, कधी रे आम्ही त्याला पुन्हा पाहू” असे म्हणत शुद्धोदन, गौतमी आणि यशोधरा दिवस कंठू लागली.

# भाग दुसरा: कायमचा संसारत्याग

## १. कपिलवस्तूहून राजगृहाकडे प्रयाण

१. कपिलवस्तु सोडल्यावर मगध देशाची राजधानी राजगृह येथे जाण्याचा सिद्धार्थ गौतमाने विचार केला.
२. राजा बिंबिसार हा तेथे राज्य करीत होता. मोठमोठे तत्त्वज्ञ आणि विचारवंत यांनी राजगृह हे आपले मुख्य निवासस्थान बनविले होते.
३. हा विचार मनात ठेवून गंगेच्या वेगवान प्रवाहाची तमा न बाळगता तो तिचे पाल ओलांडून पलीकडे गेला.
४. वाटेत तो प्रथम साकी नावाच्या एका ब्राम्हण योगिनीच्या आश्रमात थांबला, नंतर तो पुढे पद्मा नावाच्चा दुसर्या एका ब्राम्हण योगिनीच्या आश्रमात गेला; आणि मग रैवत नावाच्या ब्राम्हण ऋषीच्या आश्रमात जाऊन राहिला. त्या सर्वाँनी त्याचे आदरातिथ्य केले.
५. त्याचे आकर्षक व्यक्तिमत्व, उदात्त वागणूक आणि इतर सर्व पुरुषांना मागे टाकणारे त्याचे विलोभनीय सौंदर्य पाहिल्यावर त्या प्रदेशातील लोक त्याने अंगावर संन्याशाचे कपडे घातलेले पाहून आश्चर्य करू लागले.
६. त्याला पाहिल्यावर दुसरीकडे जात असलेला मनुष्य निश्चल उभा राही. तरउभा असलेला मनुष्य त्याच्या मागोमाग चालू लागे. सावकाश आणि गंभीरपणे चालत असलेला मनुष्य धावू लागे, तर बसलेला मनुष्य एकदम उठून उभा राही.
७. काही लोक त्याला दोन्ही हातानी वंदन करीत. तर काही पूज्य बुद्धीने मस्तक नमवून त्याला अभिवादन करीत. काही जण प्रेमळ शब्दांनी त्याला संबोधीत. कोणीही मनुष्य त्याला अभिवादन केल्याखेरीज जात नसे.
८. ज्यांनी रंगबेरंगी कपडे घातले होते अशा लोकांना त्याला पाहून लाज वाटे. वाटेल त्या विषयावर गप्पा मारणारे लोक गप्प होत. त्याला पाहिल्यावर कुणाच्याही मनात वाईट विचार येत नसत.
९. त्याच्चा भुंवया, त्याचा भालप्रदेश, त्याचे मुख, त्याचे शरीर, हात-पाय किंवा त्याची चालण्याची ढब यांपैकी त्याच्या कोणत्याही भागाकडे एखाद्याची नजर गेली की त्या क्षणीच त्याची दृष्टी तेथे खिलून राही.
१०. दीर्घ आणि खडतर प्रवास केल्यानंतर, पाच टेकड्यांनी वेढलेल्या पर्वतराजींन रक्षिलेल्या व सुशोभित केलेल्या आणि मंगल व पवित्र अशा स्थळांनी पुनीत झालेल्या राजगृह नगरीत गौतम येऊन पोहोचला.
११. राजगृहास आल्यावर पांडव टेकडीच्या पायथ्याशी एक जागा त्याने निवडली व तेथे तात्पुरती वस्ती करण्यासाठी एक लहानशी पर्णकुटी त्याने तयार केली.
१२. राजगृहापासून कपिलवस्तु पायवाटेने जवळजवळ ४०० मैल अंतरावर आहे.
१३. हा सगळा दीर्घ प्रवास गौतमाने पायीच केला.

## २. राजा बिंबीसाराचा उपदेश

१. दुसर्या दिवशी तो उठला आणि भिक्षेकरिता शहरात जाण्यासाठी निघाला. फार मोठा जमाव त्या वेळी त्याच्याभोवती जमला.
२. त्या वेळी मगधाधिपती श्रेणीय बिंबीसार राजाने राजवाड्याच्या बाहेर लोकांचा तो प्रचंड जनसमुदाय पाहिला आणि त्याने हे एवढे लोक जमण्याचे कारण काय याची विचारणा केली. तेन्हा एका राजसेवकाने त्याला पुढीलप्रमाणे हकीकत सांगितली-
३. "ज्याच्याबद्दल ब्राम्हणांनी असे भविष्य वर्तीवले होते की, 'हा एक तर उच्चतम ज्ञान प्राप्त करून घेईल किंवा या पृथ्वीचा सम्राट होईल' तोच हा शाक्यांच्या राजाचा पुत्र आहे, त्यालाच पाहण्यासाठी लोक गर्दी करीत आहेत."
४. हे ऐकून आणि त्याचा अर्थ मनात ओळखून राजाने त्या सेवकाला लगेच आज्ञा दिली की, "जा! तो कुणीकडे जात आहे ते पाहून मला येऊन सांग!" तो सेवक राजाची आज्ञा होताच त्या राजपुत्राच्या मागोमाग जाऊ लागला.
५. स्थिर नेत्रांनी आपल्या पुढील केवळ जोखडभर अंतरापर्यंतच पाहात शरीराचे अवयव आणि मनात भरकटणारे विचार कह्यात ठेवून तो याचकश्रेष्ठ सावकाश आणि मोजून पावले टाकीत हळू आवाजात भिक्षा मागत चालला होता.
६. मिळेल ती भिक्षा स्वीकारून तो पर्वताच्या एका निवान्त कोपर्यात जाऊन बसला आणि तेथे अन्नसेवन करून तो पांडव टेकडीवर चढून गेला.
७. लोध्रवृक्षांनी दाटलेल्या आणि मयूरांच्या केकारवांनी निनादलेल्या त्या अरण्यात रक्तरंगाची वस्त्रे धारण केलेला तो मानवजातीचा सूर्य पूर्वदिशेच्या पर्वतराजीवरील बालसूर्यासारखा तळपू लागला.
८. याप्रमाणे त्याला लक्षपूर्वक पाहिल्यावर त्या राजसेवकांनी राजाला सर्व हकीकत सांगितली आणि राजाने जेव्हा ती ऐकली तेव्हा अति आदराने आणि मोजकाच लवाजमा घेऊन तो स्वतः तिकडे जाण्यास निघाला.
९. पर्वताप्रमाणे धिप्पाड असा तो राजा टेकडी चढून गेला.
१०. त्या ठिकाणी आसनस्थ आणि जितेंद्रिय असा तेजस्वी गौतम त्याच्या दृष्टीस पडला. जणू काही तो पर्वत हलत असून स्वतः गौतम हा त्या पर्वताचे शिखर आहे, असा त्याला भास झाला.
११. शारीरिक सौंदर्य आणि पूर्ण मन:शांति यामुळे वैशिष्यपूर्ण दिसणार्या गौतमाला त्या नराधिपाने पाहिले आणि आश्चर्यचकित होऊन प्रेमपूर्ण आदरभावाने तो त्याच्याजवळ गेला.
१२. बिंबिसाराने मोठ्या आदराने त्याच्याजवळ जाऊन त्याच्या शरीरस्वास्थ्या विषयी विचारपूस केली आणि गौतमाने तितक्याच ममत्वाने आपले मन स्वस्थ व शरीर सर्व व्याधींपासून मुक्त असल्याची खात्री दिली.
१३. त्यानंतर तो राजा खडकाच्या स्वच्छ पृष्ठभागावर बसला आणि आपल्या मन:स्थितीची कल्पना देण्याच्या हेतूने तो म्हणाला,
१४. "बाळ, तुझया कुटुंबाशी माझी दृढ मैत्री आहे. ती वंशपरंपरागत असून तिची दृढता चांगली सिद्ध झालेली आहे. म्हणूनच तुला काही सांगावे अशी इच्छा माझया मनात निर्माण झाली आहे. माझे प्रेमाचे शब्द तू नीट ऐक."
१५. "सूर्यापासून ज्याचा प्रारंभ झाला आहे असा तुझा वंश, नवतारुण्य, डोळयांना भुरळ घालणारे सौंदर्य याचा मी जेव्हा विचार करतो तेव्हा मला अचंबा वाटतो की, इतर सर्व गोष्टींशी इतका विसंगत असा, राजोपभोगापेक्षा सर्वस्वी सन्याशाचे जीवन जगण्याचा हा तुझा निर्धार तुझ्या मनात कसा निर्माण झाला?"

१६. “तुझ्या अवयवांना रक्तचंदनाचा सुगंधच योग्य आहे. रक्तवर्णाची ही जाडीभरडी वस्त्रे त्यांना शोभत नाहीत. या तुझ्या हाताने प्रजाजनांचे रक्षण करावे; दुसर्याने दिलेले अन्न धारण करणे त्याला शोभत नाही.”

१७. “म्हणून सौजन्यशील युवका, जर तुला तुइया वडिलांचे राज्य नको असेल तर माझ्या अर्ध्या राज्याचा तू औदार्याने स्वीकार कर.”

१८. “या प्रमाणे तू केलेस तर तुझ्या आप्तस्वकीयांना दु:खाचे कारण उरणार नाही. कालांतराने सार्वभौम सत्तादेखील अखेरीस धीरगंभीर अशा पुरुषाच्या आश्रयासाठी धाव घेते. म्हणून या बाबतीत तू मला उपकृत कर. सज्जनांच्या साहाय्या-मुळे सज्जनांचा उत्कर्ष जास्त प्रभावी ठरतो.”

११. “परंतु तुझ्या वणशाभिमानामुळे जर तुला माइयाविषयी विश्वास वाटत नसेल तर अगणित अशा सज्ज असलेल्या सैन्यात आपल्या बाणासह सामील हो. आणि मला मित्र मानून आपल्या शत्रूंना जिंकण्याचा प्रयत्न कर.”

२०. “म्हणून तू यांपैकी एका गोष्टीचा स्वीकार कर. धर्म, संपत्ती आणि सुख यांच्या नियमांना अनुसरून तू वाग. प्रेम आणि इतर गुण यांना तू अनुसर. जीवनाची ही तीन उद्दिष्टे आहेत. जेव्हा माणसे मरतात तेव्हा केवळ या जगापुरताच त्यांचा अंत होतो.”

२१. “म्हणून जीवनाच्या या तीन उद्दिष्टांना अनुसरून त्यांची फलप्राप्ती करून घेण्यास तुझे हे व्यक्तिमत्व कारणीभूत होऊ दे. असे म्हणतात की, धर्म, संपत्ती आणि सुख यांची ज्या वेळी संपूर्ण प्राप्ती होते त्याच वेळी मानवी जीवनाचा हेतू पूर्ण होतो.”

२२. “धनुष्याची दोरी खेचण्यास लायक असलेले हे तुझे दोन बलवान बाहू निरुपयोगी राहू देऊ नकोस. ते ही पृथ्वीच काय पण त्रैलोक्य जिकण्यास अधिक समर्थ आहेत.”

२३. “मी तुला हे प्रेमामुळे सांगत आहे. सत्ता किंवा उद्धटपणामुळे नव्हे. तुझा हा याचकवेष पाहून माझे मन अनुकपेने भरून आले आहे आणि मी अश्रू ढाळीत आहे.”

२४. “याचकाचे जीवन जगू इच्छिणार्या गौतमा, नामवंत अशा तुझ्या वंशाला साजेसे तुझे सौंदर्य, वार्धक्य येऊन नष्ट होण्यापूर्वी वेळ गेली नाही तोपर्यन्त, आताच सर्व सुखाचा उपभोग घे.”

२५. “वृद्ध मनुष्य धर्माने पुण्य मिळवू शकतो. सुखोपभोगाच्या दृष्टीने वृद्धा पकाळ असह्य असतो. म्हणून असे म्हणतात की, सुखे ही तरुणांसाठी असतात. संपत्ती मध्यम वयस्कर पुरुषांसाठी असते, आणि धर्म वृद्धांसाठी असतो.”

२६. “आजच्या या जगात यौवन हे धर्म व संपत्ती याचा शत्रू आहे. आपण स्वत:ला सुखोपभोगापासून दूर ठेवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी आपण त्यांना टाळू शकत नाही. म्हणून जिथे जिथे सुखे सापडतील तिथे तिथे तुझ्या यौवनाने त्याचा उपभोग घ्यावा.”

२७. “वृद्धत्वाची प्रवृत्ती चिंतनाकडे असते. ते गंभीर आणि शांत राहण्याच्या बाबतीत तत्पर असते. फारसे आयास न करता अपरिहार्यपणे ते विकारविरहित होते. लज्जा हेही त्याचे कारण आहे.”

२८. “म्हणून चंचल, बाह्य वस्तूंकडेच आकर्षित होणार्या निष्काळजी, उतावळया आणि दूरदृष्टी नसलेल्या यौवनाच्या फसव्या कालखंडामधून बाहेर पडल्यावर लोक अरण्यातून सुरक्षितपणे सुटका झालेल्या माणसांप्रमाणे सुटकेचा नि:श्वास टाकतात.”

२९. “म्हणून अविचारी आणि भ्रामक असा हा यौवनाचा चंचल काल जाऊ दे. आपल्या आयुष्यातील पूर्व भागातील वर्षे सुखाकरिता राखून ठेवलेली असतात. इंद्रियांच्या आसक्तीपासून आपण त्यांना दूर ठेवू शकत नाही.”
३०. “किंवा धर्म हे जर खरोखर तुझे ध्येय असेल तर यज्ञ कर. यज्ञ करून सर्वोच्च अशा स्वर्गात आरोहण करणे ही तुझ्या कुटुंबाची अति प्राचीन अशी प्रथा आहे.”
३१. “मोठ्यामोठ्या ऋषींनी जे ध्येय आत्मक्लेशाने गाठले त्याच ध्येयाची प्राप्ती, सुवर्णकंकणांनी ज्यांचे हात भरलेले असत आणि ज्यांचे चित्रविचित्र मुकुट रत्नांच्या प्रकाशामुळे चकाकत असत अशा राजर्षींनी यज्ञाच्या मार्गाने करून घेतली आहे.”

## ३. गौतमाचे बिंबिसारास उत्तर (पूर्वार्ध)

१. याप्रमाणे मगध राजाने गौतमाला इंद्राप्रमाणे योग्य आणि खंबीर शब्दांत उपदेश केला. परंतु तो ऐकल्यावर राजपुत्र डळमळला नाही. तो पर्वताप्रमाणे अचल राहिला.
२. मगध राजाने याप्रमाणे उपदेश केल्पावर गौतमाने आपल्या शांत आणि स्नेहपूर्ण चेहर्यात बदल न करता खंबीर शब्दाने व खणखणीत वाणीने पुढीलप्रमाणे उत्तर दिले.
३. “आपण जे सांगितलेत त्यात आपल्या दृष्टीने चमत्कारिक असे काही नाही. महाराज, सिंह हे ज्याचे राजचिन्ह आहे अशा थोर कुलात ज्या अर्थी आपण जन्मला आहात, आणि ज्या अर्थी आपण आपतल्या मित्रांवर प्रेम करणारे आहात, त्या अर्थी आपल्या एका मित्राच्या बाबतीत आपण या मार्गाचा अवलंब करावा हे अगदी स्वाभाविक आहे.”
४. “दुष्ट मनाच्या माणसांच्या बाबतीत त्याच्या कुळाला योग्य असा स्नेहभाव खंडित होतो आणि विलयास जातो. फक्त चांगली माणसेच स्नेहशील कृत्यांची नवी परंपरा निर्माण करून पूर्वजांपासून चालत आलेल्या मैत्रीची वाढ करतात.”
५. “आपल्या मित्रांचे दैव फिरले तरी त्यांच्याशी वागताना जे आपत्या वर्तनात बदल करीत नाहीत त्यांनाच मी माझ्या अंतःकरणात खरे मित्र म्हणून स्थान देतो. भाग्यशाली पुरुषाला वैभवकाळ प्राप्त झाला असता त्याच्याशी कोण मैत्री करीत नाही?”
६. “या जगात संपत्ती मिळविल्यानंतर आपले मित्र आणि धर्म यांच्यासाठी तिचा उपयोग जे करतात त्यांच्या संपत्तीलाच खरे स्थैर्य प्राप्त होते आणि शेवटी जेव्हा ती नष्ट होते तेव्हा ती दुःख निर्माण करीत नाही.”
७. “महाराज, मझ्याविषयीच्या आपल्या सूचनेला शुद्ध औदार्य आणि मित्रत्व यांचीच प्रेरणा आहे. मी आपल्याला नम्रतेने आणि शुद्ध मित्रभावाने भेटेन. मी माझ्या उत्तरात दुसर्या कशाचाही उच्चार करणार नाही.”
८. “मला ह्या ऐहिक वस्तूंची जितकी भीती वाटते तितकी सर्पाची, आकाशातून होणार्या वज्राघाताची किंवा वार्याने भडकणार्या ज्वालांचीही वाटत नाही.”
९. “आपतल्या आनंदाची आणि आपल्या संपत्तीची लूटमार करणारी ही क्षणभंगूर सुखे जगभर भ्रामक कल्पनांप्रमाणे निरर्थक तरंगत असतात. त्यांची नुसती आशा केली तरीही माणसांची मने ती मोहून टाकतात

आणि त्यांच्या अंतःकरणात त्यांनी जर घर केले तर ती त्यांना अधिकच मोहून टाकतात.”

१०. “सुखाला बळी पाडलेल्या देवांच्या स्वर्गात देखील आनंद मिळत नाही आणि मानवाच्या जगात तर आनंद मुळीच मिळत नाही. वार्याला मित्र असलेला अग्नि ज्याप्रमाणे कितीही इंधन मिळाले तरी संतुष्ट होत नाही तत्याप्रमाणे जो तृष्णार्त आहे त्याला कितीही सुखे मिळाली तरी तो तृप्त होत नाही.”

११. “या जगात सुखासारखी दुसरी आपत्ती नाही. लोक भ्रमामुळे सुखासक्त होतात. सत्य म्हणजे काय हे समजले आणि असत्याची भीती वाटू लागली तर कोणता शहाणा मनुष्य स्वतःहून असत्याची इच्छा धारील?”

१२. “समुद्राने वेढलेली पृथ्वी ताब्यात घेतल्यावर राजे लोकांना त्या महासागरची दुसरी बाजुही जिंकण्याची इच्छा होते. सागराला मिळणार्या पाण्याने तो कधी तृप्त होत नाही. तद्वतच कितीही सुखे मिळाली तरी मानवजात तृप्त होत नाही.”

१३. “मंधत्र्याला आकाशातून सुवर्णमय पर्जन्यवृष्टी लाभली, त्याने सर्व खंड जिंकले व शक्राचे देखील अर्धे राज्य पादाक्रांत केले. तरीही त्याची ऐहिक पदार्थाविषयीची आसक्ती कमी झाली नव्हती.”

१४. “इन्द्र जेव्हा वृत्राच्या भयाने लपून बसला होता तेव्हा जरी स्वर्गातील देवांच्या राज्याचा नहुषाने उपभोग घेतला आणि आपल्या गर्विष्ठपणामुळे जरी त्याने आपली शिबिका मोठ्यामोठ्या ऋषींना वाहावयास लावली, तरीही तो संतुष्ट झाला नव्हता.”

१५. “इतर उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ज्यांनी आपले जीवन अर्पण केले, चिंध्या हेच ज्यांचे कपडे होते, कंदमुळे, फळे आणि पाणी हेच ज्यांचे अन्न होते आणि सर्पाप्रमाणे लांब आणि पिळलेल्या जटा ज्यांनी धारण केल्या होत्या अशा ऋषीमुनींना देखील ज्याने जिंकले त्या या सुख नामक शत्रूसाठी कोण प्रयत्न करील?”

१६. “सुखासाधी जे धडपडत आहेत आणि ऐहिक सध्याच्या जे पाठीस लागले आहेत, त्यांच्या दुःखविषयी आत्मसंयमी लोक जेव्हा ऐकतात तेव्हा सुखाचा त्याग करणेच त्यांना योग्य वाटते.”

१७. “सुखप्राप्तीतील यश म्हणजेच सुखी माणसांवरील विपत्ती समजली पाहिजे. कारण त्याने इच्छिलेली सुखे त्याला मिळाली म्हणजे तो उन्मत होतो; उन्मत्त्पानामुळे जे करू नये ते तो करतो व जे करावे ते तो करत नाही. आणि अशा रीतीने तो दुखावला गेला म्हणजे त्याला शेवट अधःपातात होतो.”

१८. “कष्ट करून मिळवून ठेवलेली, तुम्हाला फसवून जिथून आली तिथे परत जाणारी व काही काळापुरती उसनी घेतलेली ही सुखे, या सुखांत कोणता आत्मसंयमी मनुष्य तो जर शहाणा असेल तर रममाण होईल?”

१९. “ ज्यांचा शोध करून ती प्राप्त करीत असताना तुमच्या वासना भडकतात, अशा गवताच्या चुडीप्रमाणे असलेल्या सुखात कोणत्या आत्मसंयमी माणसाला समाधान लाभेल?”

२०. जी सुखे दूर भिरकावून दिलेल्या मांसच्या तुकड्याप्रमाणे आहेत आणि जी राजे लोकांकडून उपभोगली गेल्यामुळे विपत्ती निर्माण करतात, अशा सुखात कोणत्या आत्मसंयमी माणसाला समाधान लाभेल?”

२१. “ज्या सुखात रममाण होणार्या माणसावर अनेक बाजूंनी संकटे कोसळतात आणि जी वसनांप्रमाणे विनाशकारी आहेत, अशा या सुखांत कोणत्या आत्मसंयमी माणसाला समाधान लाभेल?”

२२. “ज्यांच्या अंतःकरणाचा यासुखांनी चावा घेतला आहे अशा आत्मसंयमी पुरुषांचाही नाश होतो. त्यांना आनंद मिळत नाही. संतापलेल्या क्रूर सर्पाप्रमाणे असलेल्या ह्या सुखांमध्ये कोणत्या आत्मसंयमी माणसाला समाधान लाभेल?”

२३. “हाड चघळीत उपाशी मारण्यार्या कुत्र्याप्रमाणे जरी त्या सुखांचा उपभोग माणसांनी घेतला तरी त्यांचे समाधान होत नाही. मेलेल्या हाडांचा सापळ्याप्रमाणे असलेल्या ह्या सुखांमध्ये कोणत्या आत्मसंयमी माणसाला समाधान लाभेल?”

२४. “अशा सुखांच्या आसक्तीमुळे ज्यांची बुद्धी आंधळी झाली आहे; जो कपाळकरंटा सुखोपभोगांच्या आशेचा दरिद्री गुलाम आहे, त्याने या जिवसृष्टीत मृत्युचे दुःख भोगावे हेच योग्य होय.”

२५. “गाण्यावर लुब्ध होऊन हरिणी स्वतःचा नाश ओढवून घेतात. तेजावर भाळून पतंग अग्नीत झेप घेतात. आमिषाला भुलून मासा लोखंडाचा गळ गिळतो. म्हणून ऐहिक सुखे अंती दुःख निर्माण करतात.”

२६. “सुखे म्हणजे उपभोग, असे सर्वसाधारणपणे मानले जाते. कसोटीला लागल्यास त्यांपैकी एकही उपभोगण्याच्या योग्यतेचे आहे असे आढळत नाही. सुंदर वस्त्रे आणि इतर सुखे म्हणजे पदार्थाचे केवळ सोबती होत. दुःखावरील उपाय एवढेच त्यांचे महत्व मानले पाहिजे.”

२७. “तहान भागविण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे भूक शमविण्यासाठी अन्न पाहिजे असते. वारा, ऊन आणि पाऊस यांच्या निवारणासाठी घर हवे असते आणि आपली नग्नता झाकण्यासाठी व थंडीवार्यापासून संरक्षण करण्यासाठी कपड्यांची आवश्यकता असते.”

२८. “याचप्रमाणे झोपेची गुंगी घालविण्यासाठी बिछाना असतो; प्रवासाचा शीण होऊ नये म्हणून वाहन असते; उभे राहण्याचा त्रास कमी करण्यासाठी आसन असते; तसेच शरीराची शुद्धी, आरोग्य आणि शक्ति यांच्यासाठी स्नान हे एक साधन असते.”

२९. “म्हणून बाह्य वस्तु म्हणजे मानवाच्या दुःखनिवारणाची साधने होत. ते आनंदाच्या उपभोगाचे मार्ग नव्हते.केवळ प्रतिबंधक उपाय म्हणून ज्यांचा उपयोग केला जातो अशा त्या बाह्य वस्तूंपासून आपल्याला आनंदाचा उपभोग मिळतो, असे कोणता शहाणा मनुष्य मान्य करील?”

३०. “पित्तप्रकोपाच्या तापाने फणफणल्यामुळे शीतलतेच्या उपाययोजानांनी दुःख कमी करण्यात गुंतला असताना, जो त्या उपाययोजना म्हणजेच आनंदाचा उपभोग असे समजतो, तोच सुखांना आनंद हे नाव देतो.”

३१. “ज्या अर्थी सर्व सुखांमध्ये चंचलता आढळून येते त्या अर्थी मी त्यांना आनंद हे नाव देऊ शकत नाही. कारण सुखामागून दुःख येणे हेच मुळी त्याचे वैशिष्ट्य आहे.”

३२. “भरपूर कपडे आणि सुंगधी कोरफड या वस्तु हिवाळ्यात सुखदायक असतात. परंतु उन्हाळ्यात त्रासदायक ठरतात आणि चंद्रकिरण व चंदन उन्हाळ्यात सुखदायक असतात पण हिवाळ्यात दुःखदायक ठरतात.”

३३. “सर्वांना माहीत असलेला फायदा आणि तोटा, या आणि इतर अनेक परस्परविरोधी जोड्यांचा जगातील प्रत्येक वस्तुशी अविभाज्य संबंध आहे. म्हणून जगात कोणताही मनुष्य संपूर्ण सुखी नाही किंवा संपूर्ण दुःखी नाही.”

३४. “सुख आणि दुःख यांचे स्वरूप संमिश्र आहे असे जेव्हा मला दिसून येते तेव्हा राजपद आणि गुलामगिरी या दोन्ही गोष्टी एकच आहेत असे मी समजतो. राजा नेहमीच हसत नसतो किंवा गुलाम नेहमीच दुःखांत नसतो.”

३५. “राजा होणे म्हणजे अधिक व्यापक अश जबाबदार्या स्वीकारणे होय. आणि म्हणून राजाची दुःखे मोठी असतात. कारण राजा हा खुंटीसारखा आहे. तो जगासाठी त्रास सहन करीत असतो.”

३६. “जे राजपद जाण्याची भीती असते आणि ज्याला कपटीपणाचे वर्तन आवडते अशा राजपदावर जर राजाची

निष्ठा असेल तर तो राजा दुर्दैवी होय; आणि याउलट जर त्यावर त्याची निष्ठा नसेल तर असल्या भित्र्या राजाला सुख तरी कसे मिळणार?"

३७. "आणि सबंध पृथ्वी जिंकल्यानंतर जर फक्त एकाच शहराचा उपयोग वसतिस्थान म्हणून होऊ शकतो आणि त्यातही जर फक्त एकच घर हे निवासस्थान होऊ शकते तर मग राज्यपद म्हणजे केवल इतरांसाठी केलेले कष्टच नव्हेत काय?"

३८. "आणि राजपद स्वीकारल्यावर सुद्धा वस्त्रांच्या एका जोडीपेक्षा अधिक कपड्यांची त्याला आवश्यकता नसते; आणि केवळ भूक शमविण्याइतके अन्न त्याला पुरेसे असते. त्याचप्रमाणे फक्त एक बिछाना आणि एक आसन एवढ्यांचीच राजाला गरज असते. याखेरीज इतर वस्तु या केवल अभिमानाने मिरविण्यासाठी असतात."

३९. "आणि समाधान लाभावे म्हणून जर या सर्व फलांची अपेक्षा असेल तर राज्याशिवायही मी संतुष्ट राहू शकेन; आणि जर माणसाला या जगात एकदा समाधान लाभले तर मग बाकी सगळ्या गोष्टी अनावश्यक नाहीत काय?"

४०. "म्हणून समाधानाचा मंगल मार्ग ज्याला सापडला तो सुखाच्या वाबतीत कधी फसणार नाही. आपण व्यक्त केलेली मैत्री लक्षात धेऊन मी विचारतो की, सुखांना काही किंमत आहे काय?"

४१. "मी गृहत्याग केला तो रागाने नव्हे किंवा शत्रूच्या बाणाने माझा मुकुट धुळीस मिळाला म्हणून नव्हे; किंवा अधिक उच्च असे हेतू साध्य करून घेण्याची माझी आकांक्षा आहे म्हणून मी आपली सूचना नाकारतो असेही नव्हे."

४२. "अत्यंत विषारी आणि क्रोधाविष्ठ सर्पाला एकदा सोडून दिल्यावर जो पुन्हा पकडण्याचा प्रयत्न करील किंवा एकदा पेटविलेल्या गवताची चूड ती पुन्हा धरण्याच्या जो प्रयत्न करील, असाच मनुष्य सुखाचा त्याग एकदा केल्यावर पुन्हा त्यांच्या पाठीमागे लागेल."

४३. "डोळस असून जो आंधळयाचा हेवा करील, स्वतंत्र असून बंधनात असलेल्याचा हेवा करील, श्रीमंत असून कंगाल माणसाचा हेवा करील, शहाणा असून वेड्याचा हेवा करील, तोच मी म्हणतो, फक्त तोच मनुष्य, ऐहिक सुखाच्या मागे लागलेल्या माणसाचा हेवा करील!"

४४. "माझ्या सन्मित्रा, जो भिक्षेवर गुजराण करतो त्याची कींव करण्याचे कारण नाही. त्याला या जगात उत्कृष्ट समाधान लाभते, संपूर्ण शांती मिळते आणि त्याच्या दृष्टीने परलोकातील सर्व दुःखे नाहीशी झालेली असतात."

४५. "परंतु संपत्तिमान असूनही जो लोभीष्ट आहे, त्याला या जगात शांतीचे समाधान लाभत तर नाहीच, पग परलोकी मात्र दुःख अनुभवावे लागते, त्याची मात्र कींव केली पाहिजे."

४६. "आपण जे मला सांगितले ते आपले चरित्र्य, आपला जीवनमार्ग आणि आपले कुळ यांना शोभेल असे आहे आणि माझा निश्चय पार पाडणे हे देखील माझे चारित्र्य, माझा जीवनमार्ग आणि माझे कुळ यांना शोभेल असेच आहे."

## ४. गौतमाचे उत्तर (उत्तरार्ध)

१. “जगातील कलहामुळे मी घायाळ झालो आहे आणि शांतता मिळविण्याच्या इच्छेने मी बाहेर पड़लो आहे. या दु:खाचा अंत करण्याऐवजी या पृथ्वीचेच राज्य काय पण स्वर्गलोकाच्याही राज्याची अपेक्षा मी करणार नाही.”

२. "आणि महाराज, तीन पुरुषार्थाचा पाठपुरावा करणे हा मानवाचा सर्वोच्च उद्देश होय, हे जे आपण मला सांगितले आणि जे इष्ट आहे असे मला वाटते ते दुःख होय, असे आपण म्हणता, त्याविषयी बोलावयाचे म्हणजे आपले ते तीन पुरुषार्थ शाश्वत नाहीत आणि संतोषदायकही नाहीत.”

३. “आणि आपण म्हणता वृद्धापकाळ येईपर्यंत थांब, कारण यौवन हे नेहमी बदलणारे असते. याविषयी बोलावयाचे म्हणजे, हा निर्णयाचा अभावच अनिश्चित आहे. कारण वृद्धावस्थेतही अस्थिरता असू शकते.”

४. “परंतु ज्या अर्थी दैव आपल्या कलेत इतके कुशल आहे की, ते जगाला कोणत्याही काळी आपल्या कह्यात ठेवू शकते, त्या अर्थी ज्याला शांततेची इच्छा आहे आणि मुत्यू केव्हा येईल हे ज्याला माहिती नाही, असा कोणता शहाणा मनुष्य वृद्धाप- काळाची वाट पाहात बसेल?”

५. “वृद्धत्वरूपी शस्त्राने आणि जिकडे तिकडे पसरलेल्या रोगरूपी बाणांनी दैवाच्या अरण्यात हरणाप्रमाणे धाव घेणार्या प्राणिमात्रावर प्रहार करीत मृत्यु ज्या वेळी एखाद्या शिकार्याप्रमाणे तत्परतेने उभा असतो, त्या वेळी दीर्घायुष्याची इच्छा कुणाच्या मनात निर्माण होऊ शकेल?”

६. “ज्याचे अतःकरण दयेने पूर्णपणे भरलेले आहे अशा धार्मिक माणसाच्या मार्गाची निवड करणे हेच तरुण, वृद्ध, किंवा लहान मूल यांना योग्य ठरेल.”

७. “आणि आपण म्हणता की, ‘तुझ्या वंशाला. शोभणारे आणि उत्कृष्ट फळ देणारे असे यज्ञ तू धर्मासाठी नेहमी करीत राहा’ अशा यज्ञांना माझा नमस्कार! दुसर्यांना दु:ख देऊन मिळणारे कोणतेही फळ मिळविण्याची माझी इच्छा नाही.”

८. “भावी फळाच्या आशेने असहाय्य पशूला ठार करण्याने यज्ञाचे फळ जरी शाश्वत मिळणारेही असले तरी देखील दयाशील आणि सहृदय माणसाच्या दृष्टीने ती अयोग्यच कृती ठरेल,”

९. “आत्मसंयमन, नैतिक आचरण आणि वासनेचा संपूर्ण अभाव हा खरा धर्म जरी दुसर्या एखाद्या अगदी निराळ्या नीतिनियमात बसत नसला, तरी देखील केवळ हत्या करून सर्वोत्कृष्ट फल मिळते असे म्हटले जाते, त्या यज्ञाच्या नियमानुसार वागणे योग्य होणार नाही.”

१०. “दुसर्याला दु:ख देऊन मिळविलेले जे समाधान माणसाला या जगात असताना लाभते, ते देखील शहाण्या, दयाशील अतःकरणाला तिरस्करणीय वाटते. तर मग अदृश्य असलेल्या दुसर्या जगातल्या माणसाला सुख मिळते हे म्हणणे त्याला किती तिरस्करणीय वाटेल?”

११. “भावी फळासाठी कृती करण्याचा मोह मला पडत नाही. महाराज! पुढच्या जन्माच्या कल्पनेत माझे मन रमत नाही. असल्या कृती अनिश्चित असतात आणि ढगातून कोसळणार्या पावसाने मारा होत असलेल्या रोपट्याप्रमाणे त्या आपल्या मार्गावर हेलकावे खात असतात.”

१२. स्वतः राजाने आपले हात जोडून उत्तर दिले, “तुझी इच्छा तू पूर्ण करण्यास माझी हरकत नाही. तुला जे जे काही करावयाचे आहे ते ते सिद्धीस गेल्यानंतर मला भेटण्याची कृपा कर.”

१३. पुन्हा भेटण्याचे  निश्चित आश्वासन गौतमाकडून घेतल्यावर राजा आपल्या सेवकासह राजवाडयाकडे परतला.

## ५. शांततेची वार्ता

१. गौतम राजगृहात असताना तेथे आणखी पाच परिव्राजक आले आणि त्यांनीदेखील गौतमाच्या झोपडी शेजारीच आपली झोपडी बांधली.
२. हे पाच परिव्राजक म्हणजे कौण्डिण्य, अश्वजित, .कश्यप, महानाम आणि भद्रिक हे होत.
३. ते देखील गौतमाचे रूप पाहून थक्क झाले आणि त्याने परिव्रज्या कां स्वीकारली असावी याचा त्याना प्रश्न पडला.
४. राजा बिंबिसाराने त्याला याविषयी जसे विचारले, तसेच त्यांनीही विचारले.
५. आपल्याला परिव्रज्या कोणत्या स्थितीत स्वीकारावी लागली हे जेव्हा त्याने त्यांना समजावून सांगितले तेव्हा ते म्हणाले, "आम्ही त्याबद्दल ऐकले आहे; परंतु तुम्ही निघून आल्यानंतर काय काय घडले ते तुम्हाला माहीत आहे काय?"
६. सिद्धार्थ म्हणाला, "नाही." नंतर त्यांनी त्याला सांगितले की, त्याने कपिलवस्तू सोडल्यानंतर कोलीयांशी युद्ध पुकारण्याविरुद्ध शाक्यांनी फार मोठी चळवळ केली.
७. स्त्री-पुरुषांनी, मुलांमुलींनी निदर्शने केली आणि "कोलीय हे आमचे भाऊ आहेत." "भावाने भावाविरुद्ध लढणे चूक आहे." "सिद्धार्थ गौतमाच्या हद्दपारीचा विचार करा" अशा प्रकारच्या घोषणांचे फलक हातात घेऊन त्यांनी मिरवणुका काढल्या.
८. या चळवळीचा परिणाम असा झाला की, शाक्य संघाला पुन्हा सभा बोलवावी लागली आणि या प्रश्नाचा फेरविचार करवा लागला. या बेळी कोलियांशी समेट घडवून आणण्याच्या बाजूने बहुमत होते.
९. कोलियांशी शांततेच्या वाटाघाटी करण्यासाठी आपले  दूत म्हपून पाच शाक्याची निवड करण्याचे  सघाने ठरविले.
१०. कोलियांनी जेव्हा हे  ऐकले  तेन्हा त्याना फार आनंद झाला. त्यांनी शाक्यांच्या दूतांशी वाटाघाटी करण्यासाठी पाच कोलियांची निवड केली.
११. दोन्ही बाजूंच्या दूतांची सभा झाली आणि एक कायम स्वरूपाचे  लवादमंडळ नेमण्याविषयी त्यांच्यात एकमत झाले. रोहिणी नदीच्या पाण्याच्या वाटपाबाबतीतील प्रत्येक वाद मिटविण्याचा या मंडळाला अधिकार देण्यात आला आणि त्याचा निर्णय दोन्ही बाजूना बंधनकारक ठरविण्यात आला. याप्रमाणे भेडसावणार्या युद्धाचा शेवट शांततेत झाला.
१२. कपिलवस्तु येथे  काय घडले  हे  गौतमाला सांगितल्यानंतर ते  परिव्राजक म्हणाले, "आता यापुढे तुम्ही

परिव्राजक म्हणून राहण्याची आवश्यकता नाही. मग तुम्ही घरी जाऊन आपल्या कुटुंबाबरोबर का राहत नाही?"
१३. सिद्धार्थ म्हणाला, "ही शुभ वार्ता ऐकून मला फार आनंद झाला आहे. हा माझा विजय आहे. परंतु मी घरी जाणार नाही. मी जाता कामा नये. यापुढेही मी परिव्राजकच राहिले पाहिजे."
१४. त्या पाच परिव्राजकांचा पुढचा कार्यक्रम काय आहे हे गौतमाने त्यांना विचारले. त्यांनी उत्तर दिले, "आम्ही तपस्या करण्याचे ठरविले आहे. तुम्ही आमच्या बरोबर का येत नाही?" सिद्धार्थ म्हणाला, "लवकरच येईन; पण प्रथम मला इतर मार्गांची परीक्षा केली पाहिजे."
१५. नंतर ते पाच परिव्राजक निघून गेले.

## ६. नव्या परिस्थितीतील समस्या

१. कोलीय आणि शाक्य यांनी केलेल्या समेटाची त्या पांच परिव्राजकांनी जी बातमी आणली तिने गौतम फार अस्वस्थ झाला.
२. एकटाच राहिल्यावर आपल्या स्वतःच्या स्थितीविषयी तो विचार करू लागला आणि आपली परिव्रज्या पुढे चालू ठेवण्याचे काही कारण आहे किंवा काय हे तो ठरवू लागला.
३. त्याने स्वकीयांचा त्याग कशासाठी केला होता? त्याने स्वतःलाच विचारले.
४. युद्धाला त्याचा विरोध असल्यामुले त्याने घर सोडले होते. "आता ज्या अर्थी युद्ध संपले आहे त्या अर्थी माझ्यापुढे काही प्रश्न शिल्लक राहिला आहे काय? युद्ध संपले याचा अर्थ माझ्यापुढील प्रश्न सुटला असा होतो काय?"
५. खोल विचार केल्यावर तो सुटला नाही असेच त्याला वाटले.
६. "युद्धसमस्या ही मूलतः कलहसमस्या आहे. एका अधिक विशाल समस्येचा तो केवल एक भाग आहे."
७. "हा कलह फक्त राजे आणि राष्ट्रे यांच्यातच चालत आहे असे नव्हे; तर क्षत्रिय आणि ब्राम्हण यांच्यात, कुटुंब-प्रमुखात, मातापुत्रात, पितापुत्रात, भावाबहिणीत आणि सहकार्यांत देखील चालू आहे."
८. "राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्ष हा प्रसंगोपात्त असतो; परंतु वर्गावर्गातील संघर्ष हा वारंवार होणारा आणि शाश्वत स्वरूपाचा असतो. हा संघर्षच जगातील सर्व दुःखांचे मूळ होय."
९. "युद्धामुळे मी घर सोडले हे खरे. पण शाक्य व कोलीय यांच्यातील युद्ध संपले असले तरी मी घरी जाऊ शकत नाही. मला आता असे दिसून येते की, माझ्यापुढील समस्येने विशाल रूप धारण केले आहे. या सामाजिक संघर्षाच्या समस्येचे उत्तर मला शोधून काढले पाहिजे."
१०. "जुन्या प्रस्थापित तत्वज्ञानाने या समस्येचा उलगडा कितपत करता येईल?"
११. "त्या सामाजिक तत्वज्ञानापैकी एखाद्याचा स्वीकार करणे त्याला शक्य आहे काय?"
१२. प्रत्येक गोष्ट स्वतःच तपासून पाहण्याचा त्याने निश्चय केला.

# भाग तिसरा: नव्या प्रकाशाच्या शोधात

## १. भृगुऋषींच्या आश्रमात

१. इतर मार्गाचे अनुसरण करण्याच्या इच्छेने आलारकालाम यांची भेट घेण्यासाठी गौतमाने राजगृह सोडले.
२. मार्गात त्याने भृगु ऋषींचा आश्रम पाहिला व तो पाहण्याच्या इच्छेने त्याने आश्रमात प्रवेश केला.
३. सरपणासाठी बाहेर गेलेले आश्रमवासी ब्राम्हण हातांत सरपण, फुले आणि कुशाचे गवत घेऊन नुकतेच परतले होते. तपस्येत अग्रगण्य आगि बुद्धिमान असलेले ते आश्रमवासी आपापल्या पर्णकुटीत न जाता ते गौतमास पाहण्यासाठी जमा झाले.
४. आश्रमवासीयांच्या आदरसत्काराचा स्वीकार केल्यावर सिद्धार्थ गौतमाने आश्रमातील गुरुजनांना आदरपूर्वक वंदन केले.
५. मोक्षाची इच्छा बाळगणार्या सूज्ञ सिद्धार्थाणे स्वर्गप्राप्तीसाठी निरनिराळया प्रकारची तपस्या करणार्या तपस्व्यांनी भरलेला तो आश्रम पाहिल्यावर तो पलीकडे गेला.
६. त्या सौजन्यशील सिद्धार्थाने त्या पवित्र तपोवनात तपस्व्यांनी चालविलेल्या तपश्चर्येचे निरनिराळे प्रकार प्रथमच पाहिले.
७. त्यानंतर तपश्चर्येचे तंत्र आत्मसात केलेल्या भृगुऋषींनी गौतमाला तपश्चर्येचे निरनिराळे सर्व प्रकार व त्यांची फले समजावून सांगितली.
८. "पाण्यातून उत्पन्न होणारे, न शिजवलेले अन्न, कंदमुले आणि फळे हेच पवित्र धर्मग्रंथात सांगितलेले साधुतपस्व्यांचे अन्न होय; परंतु तपश्चर्येंचे प्रकार मात्र भिन्न भिन्न असतात."
९. "काही जग पक्ष्याप्रमाणे दाणे टिपून आपली गुजराण करतात, काही जण हरणाप्रमाणे गवत खातात, तर काही जण सर्पाप्रमाणे हवेवर जगतात. जणू काय ते मुंग्यांची वारुळेच झाली आहेत."
१०. "दुसरे काही जण महत्प्रयासाने दगड खाऊन आपली भूक भागवितात. तर काही जण आपल्याच दातानी भरडलेले धान्य खातात. इतर काही जण दुसर्यांच्यासाठी अन्न शिजविल्यावर जर काही उरले तरच ते स्वत:साठी ठेवतात."
११. "दुसरे काही जण आपल्या जटांचे भारे पाण्याने सतत भिजवून स्तोत्रे गाऊन अग्नीला दोनदा अर्घ्य अर्पण करतात. आणखी काही जण माशांप्रमाणे पाण्यात बुडी मारून राहतात. त्यांच्या शरिराला कासवे ओरबाडून काढतात."
१२. "अशी तपश्चर्या काही काळ केल्यावर उच्च तपश्चर्येने स्वर्गप्राप्ती, तर कमी प्रतीच्या तपश्चर्येने मृत्युलोक मिळतो. दु:खमार्ग अनुसरत्यामुलळेच शेवटी त्यांना सुखप्राप्ती होते. असे म्हणतात की, दु:ख हेच पुण्याचे मूळ आहे."

१३. हे ऐकल्यावर गौतम म्हणाला, “अशा प्रकारचा आश्रम मी आज प्रथमच पाहात आहे. तुमचा हा तपश्चर्येचा नियमही मला समजलेला नाही.”

१४. “या वेळी मी इतकेच सांगू शकतो की, ही आपली तपश्चर्या स्वर्गप्राप्तीसाठी आहे. तर ऐहिक जीवनातील दु:खाचा विचार करावा व त्यावरील उपाय शोधून काढावा अशी माझी इच्छा आहे. आपण मला जाण्याची आज्ञा द्या. सांख्य तत्वज्ञानाचा अभ्यास करावा, स्वतः समाधि मार्गाचे शिक्षण घ्यावे आणि माझा प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत त्याची काही मदत होते किंवा काय ते पाहावे अशी माझी इच्छा आहे.”

१५. “याप्रमाणे तपश्चर्येत गुंतलेले असताना आपण मला अशा प्रकारे आश्रय दिला व आत्यंतिक दया दाखविली, परंतु आपणाला मला सोडून दूर जावे लागणार आहे, असा जेव्हा मी विचार करतो तेम्हा माझ्या आप्तस्वकीयांना सोडताना मला जसे दु:ख झाले तसेच मला दु:ख होते.”

१६. “मला येथे राहने आवडत नाही किंवा येथील एखाद्याच्या वर्तनात काही चूक झाली आहे म्हणून मी हे तपोवन सोडून जात आहे, असे नव्हे. कारण पूर्वीच्या ऋषींनी सांगितलेल्या धार्मिक मार्गाने जाणारे आपण श्रेष्ठ ऋषी आहात.”

१७. “या विषयावर ज्यांचे प्रभुत्व आहे त्या आलारकालाम मुनीकडे जाण्याची माझी इच्छा आहे.”

१८. त्याचा निश्चय पाहून, आश्रमप्रमुख भृगुऋषी म्हणाले, “राजपुत्रा, तुझे ध्येय हे खरोखरच शूराचे ध्येय आहे. तू तरुण असलास तरी स्वर्ग आणि मुक्ती यांचा तुलनात्मक संपूर्ण विचार करून तू मुक्तीचा मार्ग अवलंबिला आहेस व ध्येयाने प्रेरित झाला आहेस. तू खरोखर शूर आहेस!”

१९. “तू जे म्हणालास तेच जर तुझे निश्चित उद्दिष्ट असेल तर तू ताबडतोब विंध्यकोष्ठास जा. आलारकालाम ऋषी तेथे राहात आहेत. शाश्वत आनंदाचे पूर्ण ज्ञान त्यांनी मिळविले आहे.”

२०. “त्यांच्याकडून तुला त्या मार्गाचे ज्ञान होईल; परंतु माझी अशी कल्पना आहे की, त्यांच्या सिद्धांताचा अभ्यास केल्यावर तुझे उद्दिष्ट त्याच्याही पलीकडील आहे, असे तुला दिसून येईल.”

२१. गौतमाने त्यांचे आभार मानले आनले मुनिजनांना वंदन करून तो निघाला. त्या मुनींनीही त्याला सन्मानपूर्वक निरोप देऊन ते आपल्या तपोवनात परत गेले.

## २. सांख्य तत्वज्ञानाचा अभ्यास.

१. भृगुऋषींचा आश्रम सोडल्यावर गौतम आलारकालाम मुनींचे वसतिस्थान शोधावयास निघाला.

२. आलारकालाम त्या बेळी वैशालीस राहात होते. गौतम तेथे गेला. वैशालीस पोहोचल्यावर तो त्यांच्या आश्रमात गेला.

३. आलारकालामांकडे जाऊन तो म्हणाला, “आपल्या सिद्धान्ताचा अभ्यास करण्याची माझी इच्छा आहे.”

४. त्यावर आलारकालाम म्हणाले, “तुझे स्वागत असो. माझा सिद्धान्त असा आहे की, तुझ्यासारख्या बुद्धिमान

माणसाला थोड्याच काळात त्याचे आकलन व ज्ञान होऊन तो आत्मसात करून घेता येईल आणि त्या सिद्धान्तानुसार वर्तनही करता येईल."

५. "खरोखर हे उच्चतम ज्ञान सपादण्यास तू अगदी पात्र आहेस."

६. आलारकालाम मुनीचे हे शब्द ऐकून राजपुत्राला अत्यंत आनंद झाला आणि त्याने उत्तर दिले-

७. "मी जरी अपरिपक्व असलो तरी आपण ही जी पराकाष्ठेची दयाशीलता माझ्यावर दाखवीत आहात तिच्यामुळे मी अगदीच पूर्णत्वास पोहोचलो आहे असा मला भास होत आहे."

८. "म्हणून आपला सिद्धान्त काय आहे हे कृपा करून आपण मला सांगाल काय?"

९. आलारकालाम म्हणाले, "तुझ्या मनाची थोरवी, तुझ्या स्वभावातील प्रामाणिकपणा आणि तुझा निश्चय यांच्यामुळे मी इतका उत्साहित झालो आहे की, तुझ्या पात्रेतेची कसोटी पाहण्यासाठी तुझी कोणतीही पूर्वपरीक्षा घेण्याची आवश्यकता मला वाटत नाही."

१०. "हे श्रोतृश्रेष्ठा, आमची तत्वे ऐक!"

११. नंतर त्यांनी गौतमाला सांख्य तत्वज्ञानाची तत्वे स्पष्ट करून सांगितली.

१२. आपल्या प्रवचनाचा समारोप करताना आलारकालाम म्हणाले,

१३. "गौतमा, ही आमच्या तत्वज्ञानातील मूलतत्वे आहेत. मी तुला ती सारांशरूपाने सांगितली आहेत."

१४. आलारकालामांनी केलेल्या अगदी स्पष्ट अशा विवरणामुळे गौतम आनंदित झाला.

## ३. सभाधि-मार्गाचे शिक्षण

१. आपल्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी गौतम निरनिराळ्या मार्गाचे परीक्षण करीत असताना ध्यानमार्गाची (समाधीची ) माहिती करून घ्यावी असे त्याला वाटले.

२. ध्यानमार्गाचे तीन पंथ होते.

३. या सर्व प्रकारात एक गोष्ट समान होती आणि ती म्हणजे ध्यान-साधनेसाठी श्वासोच्छ्वासावर नियंत्रण ठेवणे.

४. एका पंथाने 'अनापानसति' नावाची श्वासनियंत्रणाची पद्धती अनुसरली होती.

५. दुसर्या पंथाने 'प्राणायाम' नावाची पद्धती अवलंबिली होती. या पद्धतीत श्वासोच्छ्वास प्रक्रियेचे तीन भाग पडतात : (१) श्वास आत घेणे (पूरक), (२) श्वास रोखून धरणे (कुंभक), आणि (३) श्वास बाहेर सोडणे (रेचक). तिसरा पंथ समाधी या नावाने ओलखिला जात होता.

६. आलारकालाम ध्यानमार्गावरील प्रभुत्वाबद्दल प्रसिद्ध होते. आलारकालामांच्या मार्गदर्शनाखाली आपणाला ध्यानमार्गाचे शिक्षण मिलाले तर फार चांगले होईल असे गौतमाला वाटले.

७. म्हणून तो आलारकालामांशी त्याविषयी बोलला आणि मला ध्यानमार्गाचे शिक्षण देण्याची कृपा कराल काय? असे त्याने त्यांना विचारले.

८. "मोठ्या आनंदाने!" आलारकालामांनी उत्तर दिले.

९. आलारकालामांनी ध्यानमार्गाचे तंत्र त्याला शिकविले. त्याच्या एकूण सात सिद्धी होत्या.

१०. गौतम त्या तंत्राचा दररोज अभ्यास करू लागला.

११. त्या तंत्रावर पूर्ण प्रभुत्व मिळविल्यावर 'आणखी शिकण्यासारखे काही आहे काय?' असे गौतमाने आलारकालामांना विचारले.
१२. आलारकालामांनी उत्तर दिले, "नाही. मित्रा, माझ्याजवळ शिकविण्यासारखे जे होते ते एवढेच." नंतर गौतमाने आलारकालामांचा निरोप घेतला.
१३. उद्दक रामपुत्त नावाचा दुसर्या एका योग्याविषयी गौतमाने ऐकले होते. आलारकालामांनी जे ध्यानतंत्र संशोधिले होते त्याच्यापेक्षा वरची एक पायरी ध्यानी पुरूषाला गाठता येईल असा एक ध्यानविधी शोधून काढण्याबद्दल त्याची ख्याती होती.
१४. त्याचा तो ध्यानविधी शिकवण्याचा आणि समाधीची सर्वोच्च पायरी अनुभवण्याचा गौतमाने विचार केला. म्हणून तो उद्दक रामपुत्ताच्चा आश्रमात गेला आणि त्याच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेऊ लागला.
१५. थोडक्याच काळात उद्दकाच्या ध्यानविधीची आठवी पायरी त्याने आत्मसात केली. उद्दक रामपुत्ताच्चा ध्यानविधीचे पूर्ण ज्ञान मिळविल्यावर गौतमाने आलारकलामांना जो प्रश्न विचारला होता तोच प्रश्न उद्दक रामपुत्तालाही विचारला की,"आणखी काही शिकण्याजोगे आहे काय?"
१६. आणि उद्दक रामपुत्ताने तेच उत्तर दिले, "नाही, मित्रा! तुला शिकविता येण्यासारखे यापेक्षा माझ्याजवळ काही नाही."
१७. आलारकालाम आणि उद्दक रामपुत्त हे ध्यानमार्गावरील प्रभुत्वासाठी कोशल देशात प्रसिद्ध होते. पण गौतमाने असे ऐकले होते की, मगध देशातही अशा प्रकारे ध्यानमार्गसंपन्न योगी आहेत. त्यांच्या पद्धतीचेही शिक्षण मिळवावे असा त्याने विचार केला.
१८. त्याप्रमाणे गौतम मगध देशात गेला.
१९. त्याला असे आढळून आले की, त्याची ध्यानमार्गाची प्रक्रिया जरी श्वासोच्छ्वास नियंत्रणावरच आधारलेली होती तरी कोशल देशातील प्रचलित प्रक्रियेपेक्षा ती निराळी होती.
२०. ही प्रक्रिया श्वासोच्छ्वास करण्याची नव्हती तर श्वासोच्छ्वास थांबवून चित्ताची एकाग्रता साधण्याची होती.
२१. गौतम ही प्रक्रिया शिकला. श्वासोच्छ्वास थांववून चित्ताची एकाग्रता करण्याचा जेव्हा त्याने प्रयत्न केला तेव्हा त्याला टोचणारे तीव्र आवाज आपल्या कानांतून बाहेर पडत आहेत आणि जणू काही तीक्ष्ण टोकाच्या सुरीने आपले डोके टोचले जात आहे असे आढळून आले.
२२. ती दुःखदायक प्रकिया होती. तरी पण ती आत्मसात करण्यात गौतम यशस्वी झाला.
समाधि-मार्गाचे त्याचे शिक्षण अशा प्रकारचे होते.

## ४. वैराग्याची कसोटी

१. गौतमाने सांख्य आणि समाधिमार्ग याची कसोटी घेतली होती. परंतु वैराग्य मार्गाची कसोटी घेतल्याशिवाय त्याने भृगुऋषींचा आश्रम सोडला होता.
२. त्याला असे वाटले की, त्या मार्गाचीही कसोटी घ्यावी आणि स्वतः अनुभव घ्यावा. म्हणजे त्याविषयी

आपल्याला अधिकारवाणीने बोलता येईल.

३. त्याप्रमाणे गौतम गयानगरीस गेला. तेथून सभोवतालज्या प्रदेशाची त्याने पाहणी केली, आणि उरुबेला येथे गयेचे राजर्षी नेगरी यांच्या आश्रमात वैराग्यमार्गाचा अभ्यास करण्यासाठी वसती करण्याचे त्याने निश्चित केले. वैराग्यमार्गाच्या अम्यासासाठी नेरंजना नदीच्या काठी ते निर्जन आणि एकान्तातील स्थल होते.

४. राजगृहात असताना त्याला जे परिव्राजक भेटले होते आणि शांततेची वार्ता ज्यांनी आणली होती ते पाच परिव्राजक त्याला उरुवेला येथे आढळले. ते देखील वैराग्याचा अभ्यास करीत होते.

५. त्या भिक्षूंनी त्याला तेथे पाहिले आणि त्याने आपणाला बरोबर घ्यावे म्हणून त्यांनी त्याला विनंती केली. गौतमाने त्यांची विनंती मान्य केली.

६. नंतर त्याचा आज्ञेत शिष्याप्रमाणे वागून त्यांनी त्याची आदरभावाने सेवा केली. ते नम्रतेने त्याच्या बरोबर राहू लागले.

७. गौतमाने सुरू केलेली तपश्चर्या व आत्मक्लेश याचे स्वरूप अत्यंत उग्र होते.

८. काही वेळ तो भिक्षेसाठी दोन घरी जाई; पण दर दिवशी सातापेक्षा अधिक घरी तो जात नसे. प्रत्येक घरी केवल दोन घासाची भिक्षा घेई; पण सातापेक्षा अधिक घासाची भिक्षा तो स्वीकारीत नसे.

९. दररोज तो फक्त एक वाटीभर अन्नावर जगत असे. पण सात वाट्यांपेक्षा अधिक अन्न तो स्वीकारीत नसे.

१०. काही वेळा तो दिवसाकाठी एकदाच किंवा दर दोन दिवसांनी एक वेळ याप्रमाणे जेवत असे. कधी आठवड्यातून एकदा तर कधी पंधरवड्यातून एकदा याप्रमाणे ठराविकच प्रमाणात अन्नभक्षण करण्याचा त्याचा कडक नियम असे.

११. त्याचा वैराग्यमार्गाचा अभ्यास अधिकाधिक होऊ लागल्यावर हिरव्या वनस्पति किंवा रानातले ज्वारी-बाजरीसारखे धान्य किंवा पाण्यातल्या वनस्पती किंवा भाताच्या तुसाच्या आंत सापडणारे तांबडे पीठ किंवा भातावरची पेज अथवा तेलबियांचे पीठ एवढाच त्याचा आहार असे.

१२. रानटी फळे व कंदमुळांवर किंवा वार्याने झाडांवरून पडलेल्या फळावर तो आपली गुजराण करीत असे.

१३. त्याचे कपडे तागाचे, धुळीच्या ढिगात सापडलेल्या तागासारख्या चिंध्यांचे, झाडांच्या सालींचे, काळविटाच्या सबंध किंवा अर्ध्या कातड्याचे, गवताचे, झाडाच्या सालीचे किंवा लाकडाच्या पट्टयांचे, माणसांचे किंवा जनावरांचे केस विणून केलेल्या घोंगडीचे किंवा घुबडाच्या पंखांचे असत.

१४. त्याने आपल्या डोक्याचे व दाढीचे केस उपटून टाकले. उभे राहून घेतलेले आसन तो बसण्यासाठी केव्हाही सोडून देत नसे. मांडी घालून बसल्यानंतर तो कधी उठत नसे. तर मांडी घालून बसलेल्या स्थितीत राहूनच तो हालचाल करीत असे.

१५. अशा प्रकारे निरनिराळ्या पद्धतींचा अवलंब करून तो वैराग्याच्या इतक्या पराकोटीला गेला की, आपल्या शरीराला पराकाष्ठेच्या यातना आणि वेदना देण्यासाठीच तो जगू लागला.

१६. शेवटी तो इतक्या किळसवाण्या अवस्थेला येऊन पोचला की, त्याच्या अंगावर चिखल आणि घाण याचे थरच्या थर इतके साचले की, शेवटी ते आपोआप पडू लागले.

१७. अरण्याच्या भयाण अशा अंतर्भागात त्याने आपली वस्ती केली होती. तो भाग कोणाच्याही अंगाचा थरकाप होईल इतका भयाण होता. त्यात जाण्याचे धाडस केवळ मूर्ख मनुष्यच करू शकला असता.

१७. जेव्हा हिवाळयात रत्री अत्यंत कडक थंडी पडत असे तेन्हा कृष्णपक्षाच्या रात्री तो उघड्या हवेत राहात असे आणि दिवसा तो काळयाकुट्ट गर्द झाडीत राहात असे.
१८. परंतु पावसाळयापूर्वी जेव्हा कडक उन्हाळयाचा शेवटचा महिना येई तेव्हा दिवसा तो अंग भाजून काढणार्या उन्हात राही आणि रत्री गुदमरवून टाकणार्या गर्द झाडीत राही.
१९. जळलेल्या हाडांची उशी करून तो स्मशानात झोपे.
२०. त्यानंतर गौतम दिवसाकाठी फक्त डाळीच्या एखाद्या दाण्यावर, एखाद्या तिळावर किंवा तांदळाच्या एखाद्या कणावर गुजराण करू लागला.
२१. ज्या वेळी दररोज तो फक्त एक फळ खाऊन राहू लागला त्या वेळी त्याचे शरीर अत्यंत क्षीण झाले.
२२. तो आपले पोट चाचपू लागला तर त्याच्या पाठीचा कणा त्याच्या हाताला लागे. आणि जर तो पाठीचा कणा चाचपू लागला तर त्याचे पोट त्याच्या हाती लागे. इतके त्याचे पोट त्याच्या पाठीच्या कण्याला चिकटले होते. आणि याचे कारण तो अत्यंत कमी खात होता.

## ५. वैराग्याचा त्याग

१. गौतमाने सुरू केलेली तपश्चर्या आणि त्याचे आत्मक्लेश याचे स्वरूप अत्यंत उग्र असे होते. अशा प्रकारची त्याची तपश्चर्या व आत्मक्तेश सहा वर्षेपर्यंत चालले होते.
२. सहा वर्षानंतर त्याचे शरीर इतके क्षीण झाले होते की, त्याला हालचालही करता येत नव्हती.
३. तरीही त्याला नवीन प्रकाश दिसला नव्हता, आणि ज्या प्रश्नावर त्याचे मन केन्द्रित झाले होते त्या ऐहिक दु:खाविषयीच्या प्रश्नाचा त्याला यत्किंचितही उलगडा झाला नव्हता.
४. तो स्वत:शीच विचार करू लागला, "हा मार्ग वासनामुक्त होण्याचा किंवा पूर्ण ज्ञानाचा अथवा मुक्तीचा नाही."
५. "काही जण इहलोकासाठी दु:ख भोगतात तर इतर लोक स्वर्गलोकासाठी कष्ट सहन करतात. आशेच्या पाठीमागे लागल्यामुलळे दु:खी ठरलेले आणि नेहमी ध्येयच्युत होणारे सर्व प्राणिमात्र सुखाच्या आशेने निश्चितपणे दु:खात पडतात."
६. "माझ्या बाबतीत देखील काहीसे असेच झाले नाही काय?"
७. "मी जो दोष देतो तो प्रयत्न नव्हे. कारण हा प्रयत्न हीन दर्जाचा मार्ग टाळून उच्च दर्जाचा मार्ग अनुसरण्याचा आहे."
८. "माझा प्रश्न असा आहे की,'शारीरिक क्लेशांना' धर्म म्हणता येईल काय?"
९. "ज्या अर्थी मनाच्या प्रेरणेने शरीर कार्य करते किंवा कार्य करण्याचे थांबते, त्या अर्थी विचारावर ताबा ठेवणे हेच योग्य होय. विचाराखेरीज शरीर हे कुत्र्याप्रमाणे आहे."
१०. "जर केवळ शरीराचाच विचार करावयाचा असता तर अन्नशुद्धीने पावित्र्य लाभले असते, पण मग कर्त्यामध्येही पावित्र्य असतेच; पण त्याचा काय उपयोग?"
११. "ज्याची शक्ती नष्ट झाली आहे, भूक, तहान आणि थकवा यांनी जो गळून गेला आहे, थकव्यामुळे ज्याचे मन

शांत राहिलेले नाही त्याला नवा प्रकाश प्राप्त होऊ शकत नाही."

१२. "जे ध्येय मनाच्या सहाय्याने गाठावयाचे आहे ते ज्याला संपूर्ण शांतता लाभलेली नाही तो ते कसे गाठू शकेल?"

१ ३. "खरी शांती आणि एकाग्रता शारीरिक गरजांच्या अखंड तृप्तीनेच योग्य प्रकारे लाभते."

१४. त्या वेळी उरुवेला येथे सेनानी नावाचा एक गृहस्थ राहात होता. सुजाता नावाची त्याला मुलगी होती.

१५. सुजाताने एका वटवृक्षाला नवस केला होता आणि तिला मुलगा झाल्यास दर वर्षी तो नवस फेडण्याचा तिने संकल्प केला होता.

१६. तिची इच्छा पूर्ण झाल्यावर तिने पन्ना नावाच्या दासीला नवस फेडण्याची जागा तयार करण्यासाठी पाठविले.

१७. त्या वटवृक्षाखाली गौतम बसलेला पाहून पन्नाला वाटले की, तो वृक्षदेवच अवतरला आहे.

१८. सुजाता आली आणि स्वतः शिजविलेले अन्न तिने एका सोन्याच्या पात्रात गौतमाला वाढले.

१९. ते पात्र घेऊन तो नदीकाठी गेला. सुप्पतीठ्ठ नावाच्या घाटावर त्याने आंघोळ केली आणि मग त्या अन्नाचे भक्षण केले.

२०. याप्रमाणे त्याची वैराग्यमार्गाची कसोटी संपली.

२१. तपश्चर्या आणि आत्मक्लेश यांचा गौतमाने त्याग केल्यामुळे त्याच्याबरोबर असलेले ते पाच तपस्वी त्याच्यावर रागावले आणि तिरस्काराने ते त्याला सोडून गेले.

# भाग चवथा: ज्ञानप्राप्ती आणि नव्या मार्गाची दृष्टी

## १. नव्या प्रकाशासाठी चिंतन

१. अन्नभक्षण करून ताजातवाना झात्यानतर गौतम आपत्या आतापर्यंतच्या अनुभवाविषयी विचार करू लागला सर्व मार्ग अयशस्वी झाल्याचे त्याला दिसून आले.
२. ते अपयश इतके मोठे होते की, कोणाही माणसाला त्यामुळे पूर्णपणे वैफल्य आले असते. त्याला अर्थातच वाईट वाटले. पण वैफल्याने मात्र त्याला स्पर्शही केला नाही.
३. एखादा मार्ग सापडेल अशी त्याला नेहमीच आशा वाटे. त्याला इतकी आशा वाटे की, सुजाताने पाठविलेल्या अन्नाचे सेवन ज्या दिवशी त्याने केले त्याच दिवशी रात्री त्याला पाच स्वप्ने पडली; आणि जेव्हा तो जागा झाला तेव्हा आपणाला खात्रीने ज्ञानप्राप्ती होणार असा त्याने त्या स्वप्नांचा अर्थ लावला.
४. त्याने आपले भविष्य जाणण्याचा प्रयत्न केला. सुजाताज्या दासीने आणलेल्या अन्नाचे पात्र नैरंजना नदीत फेकून तो म्हणाला, "जर मला ज्ञानप्राप्ती होणार असेल तर हे पात्र प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जाऊ दे! नसेल तर खालच्या दिशेने जाऊ दे!" आणि खरोखरच ते पात्र प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने वाहू लागले आणि शेवटी काळ नावाच्या नागराजाच्या निवासस्थानाजवळ ते बुडाले.
५. आशा आणि निश्चय यांच्यामुळे धीर येऊन त्याने उरुवेला सोडली आणि संध्याकाळच्या सुमारास तो गयेच्या मार्गाला लागला. तेथे त्याने एक पिंपळवृक्ष पाहिला. आपल्याला नवा प्रकाश दिसेल आणि आपला प्रश्न सोडविण्याचा मार्ग शोधून काढण्यास मदत होईल या आशेने चिंतन करण्यासाठी त्या वृक्षाखाली बसण्याचा त्याने विचार केला.
६. चारही दिशांची परीक्षा केल्यावर त्याने पूर्व दिशेची निवड केली. कारण, सर्व प्रकारची अपवित्रता घालविण्यासाठी मोठमोठे ऋषि नेहमी याच दिशेची निवड करतात.
७. गौतम पद्मासन घालून आणि पाठ सरळ ठेवून त्या पिंपळवृक्षाखाली बसला. ज्ञान प्राप्ती करून घेण्याच्या निश्चयाने तो स्वत:शीच म्हणाला, "कातडी, स्नायु आणि हाडे हवी तितकी सुकून गेली अणि माझ्या शरीरातील रक्तमांस शुष्क झाले तरी चालेल परंतु पूर्ण ज्ञान प्राप्ती झाल्याशिवाय हे आसन मी सोडणार नाही."
८. नंतर गजेंद्राप्रमाणे भव्य असा काळ नावाचा राजा आणि त्याची पत्नी सुवर्णप्रभा ही दोधे वटवृक्षांखाली बसलेत्या गौतमाचे स्वप्न पडून जागी झाली आणि तो पूर्ण ज्ञानप्राप्ती निश्चित करून घेणार दशा खत्रीने त्यांनी त्याची पुढीलप्रमाणे स्तुती केली-
९. "हे मुनी, ज्या अर्थी आपल्या चरणांनी दबलेली पृथ्वी पुन्हा पुन्हा निनादत आहे आणि आपले तेज सूर्याप्रमाणे प्रकाशत आहे त्या अर्थी आपले इच्छिलेले फळ आपल्याला मिळणारच!"
१०. "हे कमलनयना, ज्या अर्थी आकाशात, पंख फडफडवीत असलेले पक्ष्यांचे थवे आपल्याला आदराने वंदन करीत आहेत आणि आकाशात मंदमंद वायुलहरी वाहात आहेत, त्या अर्थी आपण आपले ईप्सित साध्य होऊन आपण बुद्ध होणार हे निश्चित!"

११. चिंतनासाठी तो जेव्हा बसला तेव्हा वाईट विचार आणि वाईट वासना ज्यांना पुराणांतरी माराची (कामाची) मुले असे म्हणतात त्यांनी त्याच्या मनावर आक्रमण केले.
१२. कदाचित माराची ही अवलाद आपल्याला पराभूत करतील आणि आपला हेतू निष्फळ होईल अशी गौतमाला भीती वाटली.
१३. दुष्ट वासनांबरोबर होणार्या या झगड्यात अनेक ऋषि आणि ब्राम्हण बळी पडले हे प्याला माहीत होते.
१४. म्हणून आपल्या अंगी असलेले सगळे धैर्य एकवटून तो माराला म्हणाला- "माझ्यामध्ये श्रद्धा आहे, शौर्य आहे आणि शहाणपण आहे. तुम्ही दुष्ट वासनांनी माझा पराभव कसा करू शकाल? नद्याचे प्रवाह देखील वार्यामुळे कोरडे पडतील. पण माझा निश्चय ढासळून टाकणे तुम्हाला शक्य नाही. जिवंत राहून पराभव पत्करण्यापेक्षा संग्रामात मरण पत्करणे मला अधिक श्रेयस्कर वाटते!"
१५. एखादा गोड घास मिळेल, या आशेने चरबीच्या गोळयाप्रमाणे दिसणार्या दगडावर झेप घेणार्या कावळयाप्रमाणे दुष्ट वासनांनी गौतमाच्या मनावर आक्रमण केले.
१६. गोड पदार्थ न आढळल्यामुळे कावळा तिथून निघून जातो. त्याचप्रमाणे खडकाशी धडक देणार्या कावळयाप्रमाणे दुष्ट वासनांनी निराशेने गौतमाला सोडून दिले.

## २. ज्ञानप्राप्ती

१. चिंतन काळात उपजीविका करण्यासाठी चाळीस दिवस पुरेल इतके अन्न गौतमाने गोळा केले होते.
२. मनाची चलबिचल करणारे दुष्ट विचार मनातून पार काढून टाकल्यानंतर गौतमाने अन्न सेवन केले व तो ताजातवाना झाला आणि त्याच्या अंगी शक्ती आली. अशाप्रकारे ज्ञान प्राप्ती करून घेण्याच्या उद्देशाने त्याने चिंतनाची पुन्हा तयारी केली.
३. ज्ञानप्राप्ती करून घेण्यासाठी गौतमाला चार आठवडे ध्यानमग्न राहावे लागले. चार पायर्यांनी त्याने संपूर्ण ज्ञान प्राप्ती करून घेतली.
४. पहिल्या पायरीच्या वेळी त्याने तर्कशक्ती आणि अन्वेषण याचा उपयोग केला. त्याच्या एकांतवासामुळे पहिली पायरी गाठण्यास त्याला मदत झाली.
५. दुसर्या पायरीच्या वेळी त्याने त्यात एकाग्रतेची भर टाकली.
६. तिस-या पायरीच्या वेळी त्याने मनाचा समतोलपणा व सावधानता याचे सहाय्य घेतले.
७. चवथ्या व शेवटच्या पायरीच्या वेळी मनाच्या समतोलपणात शुद्धतेची आणि सावधानतेत समतोलतेची अवस्था आणली.
८. अशा प्रकारे एकाग्र, पवित्र, निष्कलंक, निर्दोष, नम्र, चतुर, खबीर आणि वासनाविरहित अशा मनाने आपला उद्देश न विसरता गौतमाने ज्या समस्येने त्याला सतावून सोडले होते तिचे उत्तर शोधून काढण्याच्या प्रयत्नावर आपले सर्व लक्ष केंद्रित केले.
९. चवथ्या आठवड्याच्या शेवटच्या दिवशी त्याचा मार्ग प्रकाशित झाला. त्याला स्पष्टपणे दिसून आले की, जगात दोन समस्या आहेत. जगामध्ये दुःख आहे, ही पहिली समस्या; आणि हे दुःख कसे नाहीसे करावे व मानवजातीला

कसे सुखी करावे, ही दुसरी समस्या.
१०. याप्रमाणे शेवटी, चार अठवडे चिंतन केल्यानंतर अंधकार नाहीसा होऊन प्रकाशाचा उदय झाला; अज्ञान नष्ट होऊन ज्ञान उदयास आले. त्याला एक नवा मार्ग दिसला.

## ३. नव्या धम्माचा शोध

१. नव्या प्रकाशाच्या प्राप्तीसाठी गौतम जेव्हा चिंतनास बसला तेव्हा सांख्य तत्वज्ञानाची पकड त्याच्या मनावर होती.
२. त्याच्या मते जगातील व्यथा आणि दुःख याचे अस्तित्व ही एक निर्विवाद वस्तुस्थिती होती.
३. तथापि दुःख नाहीसे कसे करावे हे जाणण्यास गौतम उत्सुक होता. सांख्य तत्वज्ञानाने ह्या प्रश्नाचा विचार केला नव्हता.
४. आणि म्हणून दुःख नाहीसे कसे करावे या प्रश्नावर त्याने आपले चित्त केंद्रित केले.
५. स्वाभाविकपणे त्याने स्वतःला पहिला प्रश्न विचारला की, "व्यक्तिमात्राला भोगाव्या लागणार्या दुःखाची व कष्टाची कारणे कोणती?"
६. त्याचा दुसरा प्रश्न असा होता की; "दुःख नाहीसे कसे करता येईल?"
७. या दोन्ही प्रश्नांचे बिनचूक उत्तर त्याला मिळाले, ते उत्तर म्हणजे, सम्यक् संबोधी (खरी ज्ञानप्राप्ती).
८. याच कारणामुळे त्या पिंपळवृक्षाला 'बोधिवृक्ष' असे नाव मिळाले.

## ४. बोधिसत्व गौतम सम्यक संबोधीनंतर 'बुद्ध' होतात

१. ज्ञानप्राणीपूर्वी गौतम केवळ बोधिसत्व होता. ज्ञानप्राप्तीनंतर ते 'बुद्ध' झाले.
२. बोधिसत्व कोणाला म्हणावे? आणि बोधिसत्व म्हणजे काय?
३. बुद्ध होण्याचा प्रयत्न करणारा मनुष्य म्हणजे बोधिसत्व!
४. बोधिसत्व बुद्ध कसा होतो?
५. बोधिसत्व हा क्रमाने जीवनची दहा स्थित्यंतरे बोधिसत्व राहिला पाहिजे. बुद्ध होण्यासाठी बोधिसत्वाने काय केले पाहिजे?
६. बोधिसत्व आपल्या जीवनाच्या पहिल्या अवस्थेत 'मुदिता' (आनंद) प्राप्त करून घेतो. सोनार ज्याप्रमाणे चांदीतले कीट काढून टाकतो त्याप्रमाणे बोधिसत्व आपल्यातील अशुद्धता काढून टाकल्यावर असा विचार करू लागतो की, प्रथम अविचारी असलेला पण पुढे विचारी बनलेला मनुष्य ढगातून बाहेर पडलेल्या चंद्राप्रमाणे जगाला प्रकाशित करतो. हे जाणत्यावर त्याला आनंद होतो आणि त्याला सर्व प्राणिमात्राच्या कल्याणाची तीव्र तळमळ लागते.
७. जीवनाच्या दुसर्या अवस्थेत त्याला 'विमलता' (शुद्धता) प्राप्त होते. या वेळी बोधिसत्वाने कामवासनेचे सर्व

विचार मनातून काढून टाकलेले असतात. तो दयाशील होतो. तो सर्वांना दया दाखवितो. तो लोकांच्या दुर्गुणाची खुशामत करीत नाही किंवा त्याच्या सद्गुणाविषयी त्यांना नाउमेद करीत नाही.

८. जीवनाच्या तिसर्या अवस्थेत 'प्रभाकारी' अवस्था (तेजस्विता) प्राप्त करून घेतो. या वेळी बोधिसत्वाची बुद्धी आरशाप्रमाणे स्वच्छ झालेली असते. अनात्म व अनित्यता यांच्या सत्याचे त्याला पूर्ण ज्ञान आणि आकलन झालेले असते. आता त्याला फक्त सर्वोच्च ज्ञान मिळविण्याची इच्छा असते आणि त्यासाठी तो कशाचाही त्याग करण्यास तयार असतो.

९. जीवनाच्या चवथ्या अवस्थेत तो 'अर्चिष्मती' (अग्नीप्रमाणे तेजस्वी बुद्धिमत्ता) प्राप्त करून घेतो. या स्थितीत बोधिसत्व अष्टांगिक मार्ग, चतुर्विध ध्यान, चतुर्विध व्यायाम, चतुर्वीध इच्छाशक्ती आणि पंचशील यांच्यावर आपले चित्त केंद्रित करतो.

१०. जीवनाच्या पाचव्या अवस्थेत तो 'सुदुर्जया' (जिंकण्यास कठीण अशी स्थिती) प्राप्त करून घेतो. सापेक्ष आणि निरपेक्ष यांच्यातील सबंधाचे त्याला पूर्ण ज्ञान होते.

११. जीवनाच्या सहाव्या अवस्थेत तो 'अभिमुखी' होती. या अवस्थेत पदार्थाची उत्क्रांती आणि तिचे कारण याची 'बारा निदाने' पूर्ण आकलन करण्याची त्याची तयारी झालेली असते; आणि 'अभिमुखी' नावाच्या त्या ज्ञानामुने अविद्येने अंध झालेल्या सर्व प्राणिमात्रांविषयी त्याच्या अंत:करणात अगाध करुणा उत्पन्न होते.

१२. जीवनाच्या सातव्या अवस्थेत बोधिसत्व 'दूरग्ङमा' (दूर जाणे) ही अवस्था प्राप्त करतो. बोधिसत्व आता दिक्कालातीत असतो; तो अनंताशी एकरूप झालेला असतो. तथापि, सर्व प्राणिमात्रांविषयी वाटणार्या करुणेमुळे त्याने आपले नाम-रुप अद्यापही धारण केलेले असते. एका बाबतीत मात्र तो इनरांच्यापेक्षा अगदी निराळा असतो. कमलपत्रावर ज्याप्रमाणे पाणी ठरत नाही त्याप्रमाणे जगातीर मोह त्याला चिकटून राहात नाही. तो आपल्या सहचारांतील तृष्णा शांत करतो. परोपकारबुद्धी, सहनशीलता, व्यवहारचातुर्य, शक्ती, शांत वृत्ती, बुद्धी आणि सर्वश्रेष्ठ प्रज्ञा याची तो जोपासना करतो.

१३. या अवस्थेत असतांना त्याला धर्माचे ज्ञान होते, परंतु लोकांना समजेल अशा रीतीनेच तो त्याची त्यांना ओळख करून देतो आपण व्यवहारचातुर्याने आणि सहनशीलतेने वागने पाहिजे हे त्याला कळते. लोकांनी नत्याला कितीही त्रास दिला तरी तो शांत वृत्तीने तो त्रास सहन करतो; कारण केवल अज्ञानामुळेच लोकांनी त्याच्या हेतुबद्दल गैरसमज करुन घेतळे आहेत हे त्याच्या कळत असते. परंतु त्याच वेळी प्राणिमत्रांचे कल्याण करण्याविषयीचा त्याचा उत्साह यत्किंचितही कमी होत नाही किंवा प्रज्ञेकडेही तो पाठ फिरवीत नाही, म्हणून दुर्देव त्याला सन्मार्गावरून कधीही च्युत करू शकत नाही.

१४. जीवनाच्या आठव्या अवस्थेत तो 'अचल' होतो. या अढल अवस्थेत बोधिसत्वाला करावे लागणारे सर्व कष्ट संपतात. जे जे चांगले आहे ते ते तो स्वाभाविकतःच अनुसरतो; तो जी जी गोष्ट करील त्या त्या गोष्टीत तो यशस्वी होतो.

१५. जीवनाच्या नवव्या अवस्थेत तो 'साधुमति' होतो. ज्याने सर्व धर्म किंवा त्यांची शास्त्रे आणि सर्व दिशा जिंकल्या आहेत, आणि त्यांचे त्याला पूर्ण आकलन झालेले असून जो कालातीत होतो अशाची 'साधुमति' ही अवस्था असते.

१६. जीवनाच्या दहाव्या अवस्थेत तो 'धर्ममेध' होतो. बोधिसत्वाला बुद्धाचीं दिव्यदृष्टी प्राप्त होते.

१७. बोधिसत्व ही दहा सामर्थ्ये प्राप्त करून घेतो; कारण बुद्ध होण्यास त्यांची आवश्यकता असते.

१८. बोधीसत्वाची स्थित्यंतरे होत असताना त्याने ही दहा सामर्थ्ये मिळविली पाहिजेत, इतकेच नव्हे तर त्याने "दहा पारमितां" चाही परिपूर्ण अभ्यास केला पाहिजे.

१९. एक 'परमिता' ही जीवनाच्या एका अवस्थेची परिपूर्ती असली पाहिजे. पारमितांचा खास व्यासंग पायरीपायरीने केला पाहिजे. एका जीवनावस्थेत एकच पारमिता असली पाहिजे. एकीचा थोडा अंश आणि दुसरीचा थोडा अंश असे मिश्रण त्यात असता कामा नये.

२०. अशा प्रकारे बोधिसत्वाची दुहेरी तयारी झाल्यानंतरच तो 'बुद्ध' होतो. 'बुद्ध' हा बोधिसत्वाच्या जीवनातील कळस होय.

२१. बोधिसत्वाच्या या जीवनावस्थांचा किंवा जातकांचा हा सिद्धांत देवांच्या अवतारवादाच्या ब्राम्हणोक्त सिद्धांतासारखा वाटतो.

२२. जातकसिद्धांत हा बुद्धाच्या अत्युच्च शुद्धावस्थेच्या जीवनाचे सार यावर आधारलेला आहे.

२३. अवतारवादात देवाच्या जीवनाची घडण पवित्र असावी अशी अपेक्षा नाही. अवतारवादी ब्राम्हणोक्त कल्पनेचा अर्थ इतकाच की, देव निरनिराळे अवतार घेऊन आपल्या भक्ताचे रक्षण करतो; मग त्याचे वर्तन अतिशय अशुद्ध आणि अनैतिक असले तरी चालते.

२४. बुद्ध होण्यासाठी बोधिसत्व आवश्यक अशा दहा जीवनावस्थांतूनच गेला पाहिजे या सिद्धांताला दुसर्या कोणत्याही धर्मावर तोड नाही. दुसरा कोणताही धर्म आपल्या संस्थापकाला असल्या कसोटीला उतरण्याचे आव्हान देत नाही.

# भाग पाचवा: बुद्ध आणि त्यांचे पूर्वकालीन

## १. बुद्ध आणि वैदिक ऋषि

१. वेद हा एक मंत्रांचा म्हणजेच ऋचा किंवा स्त्रोत्रांचा संग्रह आहे. या ऋचांचे उच्चार करतात त्यांना 'ऋषि' म्हणतात.

२. मंत्र म्हणजे इंद्र, वरुण, अग्नि, सोम ईशान, प्रजापति, ब्रम्ह, महिर्द्धि, यम इत्यादी देवतांचा केवळ, धावा करणाऱ्या प्रार्थना होत.

३. धावा म्हणजे शत्रूविरुद्ध साहाय्य करण्यासाठी, धनप्रातीसाठी भक्ताकडून अन्न, मांस आणि मद्य याचा नैवेद्य स्वीकारण्याची विनंती करण्यासाठी केलेली प्रार्थना होय.

४. वेदामध्ये फारसे तत्वज्ञान नाही. परंतु असे काही वैदिक ऋषि होते की, ज्यांनी तात्विक स्वरूपाच्या काही कल्पना मांडल्या होत्या.

५. (१) अघमर्षण, (२) प्रजापति परमेष्ठि, (३) ब्रम्हणस्पति किंवा बृहस्पति, (४) अनिल, (५) दीर्घतमा, (६) नारायण, (७) हिरण्यगर्भ, आणि (८) विश्वकर्मा, हे ते ऋषी होत.

६. या वैदिक तत्ववेत्यांपुढील मुख्य समस्या पुढीलप्रमाणे होत्या. जग उत्पन्न कसे झाले? वस्तूची निर्मिती कोणत्या पद्धतीने करण्यात आली? त्यांचे ऐक्य व अस्तित्व का आहे? निर्मिती कशी झाली आणि कुणाच्या आज्ञेने झाली? जग कशापासून निर्माण झाले आणि ते कुठे जाणार आहे?

७. अघमर्षण म्हणतो की, जग तपसपासून (उष्णतेपासून) निर्माण झाले. हे निर्मितीक्षम तत्व होय. त्यापासून अनाद्यनन्त असा नियम आणि सत्य याचा जन्म झाला. यांच्यापासून रात्र (तमस) उत्पन्न झाली. तमाने पाणी निर्माण केले आणि पाण्यापासून काळाची उत्पत्ती झाली. काळाने चन्द्र आणि सूर्य, स्वर्ग आणि पृथ्वी, आकाश आणि प्रकाश यांना जन्म दिला आणि दिवस व रात्र यांची व्यवस्था निर्माण केली.

८. ब्रम्हणस्पतीने 'असत्' पासून 'सत्' ची उत्पत्ती होते असा सिद्धांत गृहीत धरला. त्याने 'असत' या शब्दाचा अर्थ अनादि अनंत असा सांगितला. सत् हे मूलतः असतपासून उत्पन्न झाले. जे जे सत् (अस्तित्वात असलेले) आहे, आणि जे जे शक्य आहे आणि तरीही असत् (अस्तित्वात नसलेले) आहे, त्या सर्वांचा असत् हा मूलाधार आहे.

९. प्रजापति परमेष्ठीने “असतपासून सत् निर्माण झाले काय?” या प्रश्नापासून सुरुवात केली. त्याचे म्हणणे असे की, या प्रश्नाचा प्रस्तुत विषयाशी संबधी नाही. त्यांच्या मते अस्तित्त्वात असलेल्या सर्व वस्तूंचे मूळ पाणी हे होय. त्यांच्या मते मूल पदार्थ जे पाणी ते सत् आणि असत् यांच्या व्याख्येत बसत नाही.

१०. परमेष्ठीने जडत्व आणि चेतना यांत भेद केला नाही. त्याच्या मते पाणी एका स्वाभाविक तत्वानुसार स्वतःचे रूपांतर विशिष्ट वस्तूमध्ये करून घेते. या तत्त्वाला 'काम' किंवा 'वैश्विक इच्छा' असे नाव त्याने दिले.

११. अनिल हा आणखी एक वैदिक तत्ववेत्ता होता. त्याच्या मते वायु हे मूलतत्त्व होय. त्याच्यात स्वाभाविक चैतन्यशक्ति असते. त्याव्यात निर्मितितत्व निसर्गतःच असते.

१२. दीर्घतम याने सांगितले की, सर्व प्राणिमात्र शेवटी सूर्यावर अवलंबून असतात. स्वतःच्या स्वाभाविक

सामर्थ्याचा आधार असलेला आणि त्यावरच हालचाल करणारा सूर्य पुढेमागे सरकत असतो.

१३. सूर्य करड्या रंगाच्या पदार्थाचा बनलेला असतो आणि विद्युत् व अग्नी ही देखील त्याप्रमाणेच बनलेली असतात.

१४. सूर्य, विद्युत व अग्नी हे पदार्थ पाण्याचे बीज होत. पाणी हे वनस्पतीचे बीज होय. याप्रमाणे दीर्घतम याचे विचार होते.

१५. नारायणाच्या मतानुसार पुरुष (परमेश्वर ) हे पहिले जगत्कारण होय. सूर्य, चंद्र, पृथ्वी, पाणी, अग्नी, वायु, अंतरिक्ष, आकाश, क्षेत्र, ऋतु, पक्षी, सर्व पशु, मानवाच्या सर्व जाती आणि सर्व मानवी संस्था यांची उत्पत्ती पुरुषापासूनच होते.

१६. तात्विकदृष्ट्या हिरण्यगर्भ हा परमेष्ठी आणि नारायण यांच्या मध्यभागी होता. हिरण्यगर्भ म्हणजे सुवर्णगर्भ (बीज) या विश्वाच्या महान शक्तीसूनच इतर सर्व शक्तींची आणि ऐहिक व पारलौकिक जीवांची उत्पत्ती झाली.

१७. हिरण्यगर्भ म्हणजे अग्नी. सौरतत्व नावाचे या विश्वाच्चा उत्मत्तीचे तत्व अग्नीपासूनच बनले आहे.

१८. अस्तित्वात असलेल्या सर्व वस्तूंचा मूल पदार्थ पाणी होय, असे गृहीत धरणे आणि मग त्याच्यावर चैतन्य शक्तीचा आरोप करून त्यापासून हे सर्व जग निर्माण झाले असा निष्कर्ष काढणे या गोष्टी विश्वकर्म्यच्या दृष्टीने अगदी अपुर्या आणि असमाधानकारक होत. रूपांतराचे तत्व अंगभूत असलेले पाणी हा जर मूळ पदार्थ असेल तर पाणी अस्तित्वात कसे आले आणि त्याने आपत्यातील चैतन्यशक्ती निर्मिति-तत्व, भौतिक सामर्थ्य नियम आणि इतर सर्व गोष्टी कशापासून अस्तित्वात आल्या हा प्रश्न आपल्यापुढे शिल्लक राहतोच.

१९. विश्वकर्म्याचे मत असे होते की, परमेश्वर हीच चैतन्यशक्ती होय. परमेश्वर हाच प्रारंभी असतो, आणि परमेश्वर हाच अंतीही असतो. तो दृश्य विश्वाच्या पूर्वीपासून आहे; सर्व वैश्विक शक्ती अस्तित्वात येण्यापूर्वी तो अस्तित्वात होता. ज्याने हे विश्व निर्माण केले आणि कार्यान्वित केले तो एकमेव परमेश्वरच होय. परमेश्वर एक आहे आणि एकमेव आहे. तो अज (जन्म नसलेला) आहे, आणि अस्तित्वात असलेल्या सर्व वस्तु त्याच्यातच वास करीत असतात. तो सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान असा आहे. तो निर्माता आणि संहारकर्ता आहे. जनक म्हणून त्याने आपल्याला उत्पन्न केले, आणि संहारक या नात्याने अस्तित्वातील सर्व वस्तूंचे भवितव्य त्याला माहीत आहे.

२०. बुद्धांना सर्वच वैदिक ऋषी आदरणीय वाटले नाहीत. फक्त दहा वैदिक ऋषींनाच त्यांनी अति प्राचीन आणि मंत्रांचे खरेखुरे जनक मानले.

२१. परंतु नैतिक पातळी उंचावणारे असे मंत्रांमध्ये त्यांना काहीही आढळले नाही.

२२. त्यांच्या मते वेद हे ओसाड वाळवंटाप्रमाणे निरुपयोगी आहेत.

२३. म्हणून ज्यापासून काही शिकता येईल असे मंत्रात काही नसल्यामुळे बुद्धांनी मंत्र बाजूला सारले.

२४. त्याचप्रमाणे वैदिक ऋषींच्या तत्वज्ञानात त्यांना काहीही आढळले नाही. सत्य प्राप्त करून घेण्यासाठी ते चाचपडत होते; परंतु ते त्या सत्याप्रत पोचले नाहीत.

२५. त्यांचे सिद्धांत म्हणजे तर्कशास्त्राचा किंवा वस्तुस्थितीचा आधार नसलेल्या केवळ कल्पना होत्या. तत्वज्ञानात त्यांनी जी भर घातली तिच्यामुळे कोणतीही सामाजिक मूल्ये निर्माण झाली नाहीत.

२६. म्हणून वैदिक ऋषींचे तत्वज्ञानही निरुपयोगी म्हणून त्यांनी ते अमान्य केले.

## २. तत्ववेत्ता कपिल

१. भारतवर्षातील प्राचीन तत्ववेत्यांत कपिल हा अग्रगण्य होता.

२. त्याचा तत्वज्ञानविषयक दृष्टिकोन अनन्य होता आणि तत्वज्ञ म्हणून त्याचे स्थान अद्वितीय होते. त्याच्या तत्वज्ञानाला सांख्य तत्त्वज्ञान असे ओळखले जाई.

३. त्याच्या विचारांतील मूलतत्वांचे स्वरूप थक्क करून टाकणारे होते.

४. सत्याला पुराव्याचा आधार पाहिजे. सांख्य तत्त्वज्ञानाचे हे पहिले तत्व होय. पुराव्याखेरीज सत्य असू शकत नाही.

५. सत्य सिद्ध करण्यासाठी कपिलाने सिद्धतेचे फक्त दोन मार्ग मानले.

(१) प्रत्यक्ष ज्ञान, आणि (२) अनुमान.

६. प्रत्यक्ष ज्ञान म्हणजे आपल्या समोरील वस्तुचे आपल्या मनाला होणारे आकलन.

७. अनुमान तीन प्रकारचे आहे. (१) कारणावरून कार्य ओळखणे, जसे ढगांच्या अस्तित्वावरून पावसाचे अनुमान काढणे; ( २ ) कार्यावरून कारण ओलखणे, जसे दरीतून वाहाणाऱ्या ओहोलाला पूर आल्यावरून डोंगरावर पाऊस पडत असल्याचे अनुमान काढणे; आणि (३) साम्य, जसे-मनुष्य जेव्हा हालचाल करतो तेव्हा तो जागा बदलत असतो असे आपण अनुमान काढतो. त्याचप्रमाणे ज्या अर्थी तारे निरनिराळ्या ठिकाणी दिसतात त्या अर्थी त्यांना गती असली पाहिजे.

८. त्याचे दुसरे तत्व सृष्टीच्या उत्पत्तीसंबंधी होते. सृष्टीची उत्पत्ती आणि तिचे कारण.

९. हे विश्व निर्माण करणारा कोणी तरी निर्माता आहे हा सिद्धान्त कपिलाने अमान्य केला. ज्याप्रमाणे मातीतून मडके तयार होते किंवा सुतापासून कापड तयार होते, त्याप्रमाणे उत्पन्न वस्तूंचे अस्तित्व पहिल्यापासूनच कारणात असते असे त्यांचे मत होते.

१०. विश्व एखाद्या निर्मात्याने निर्माण केले हा सिद्धान्त अमान्य करण्यासाठी कपिलाने पुढे केलेला हा पहिला आधार होय.

११. परंतु आपल्या मताच्या पुष्टयर्थ त्याने इतरही काही आधार दिले आहेत.

१२. असत् हे कोणत्याही कृतीचा विषय होऊ शकत नाही. वास्तवतः नवे असे काहीच उत्पन्न होत नाही. सुष्ट वस्तू ही ज्या पदार्थापासून बनते त्यापेक्षा ती निराळी नसते. ती ज्या पदार्थापासून बनलेली असते त्या पदार्थाच्या स्वरूपात ती अगोदरपासूनच अस्तित्वात असते. अशा निश्चित पदार्थापासून केवळ निश्चित स्वरूपाचीच वस्तु तयार होऊ शकते आणि काही विशिष्ट स्वरूपाच्या पदार्थापासूनच विशिष्ट स्वरूपाचा पदार्थ निर्माण होतो.

१३. मग या इंद्रियगोचर विश्वाचे मूळ कोणते?

१४. कपिल म्हणतो, उत्क्रान्त वस्तु (व्यक्त) आणि अनुत्क्रान्त (अव्यक्त) वस्तु यांनी हे इंद्रियगोचर विश्व बनले आहे.

१५. व्यक्त वस्तू या अव्यक्त वस्तूंचे मूळ असू शकत नाहीत.

१६. व्यक्त वस्तूंचा आकार मर्यादित असतो; आणि विश्वाच्या मुळाचे जे स्वरूप त्याच्याशी तर हे विसंगत आहे.

१७. सर्व व्यक्त वस्तूंचे परस्परांशी काही अशी साम्य असते, आणि म्हणून एक दुसरीचे अंतिम मूळ आहे असे

म्हणता येत नाही. शिवाय ज्या अर्थी त्या सर्व एखाद्या मुळापासून अस्तित्वात येतात त्था अर्थी त्या वस्तू स्वतः मूल घटक होऊ शकत नाहीत.

१८. नंतर कपिलाने असे विधान केले आहे की, जरी कार्य हे कारणाचे बनलेले असते तरीही ते कारणापेक्षा निराळे असले पाहिजे. म्हणून विश्व हे अंतिम कारण असू शकत नाही. दुसर्या एखाद्या अंतिम कारणाचा तो परिणाम असला पाहिजे.

१९. अव्यक्त वस्तूचे प्रत्यक्ष ज्ञान का होऊ शकत नाही. तिच्यायोगे तिचे प्रत्यक्ष ज्ञान होईल अशी क्रिया इंद्रियगोचर का होत नाही याचे कपिलाने पुढीलप्रमाणे उत्तर दिले आहे.

२०. "त्याची कारणे निरनिराळी असू शकतील. एक असे कारण असू शकेल की, ज्याप्रमाणे ज्यांच्या अस्तित्वाबद्दल शंका नसते अशा वस्तुही प्रत्यक्ष दिसत नाहीत त्याचप्रमाणे अव्यक्त वस्तूंच्या सूक्ष्म स्वरूपामुळे त्या इंद्रियगोचर होत नसतील; किंवा अतिशय दूर असल्यामुळे किंवा अतिशय सान्निध्य असल्यामुळे अथवा तिसरीच एखादी वस्तूची मध्येच असल्यामुळे किंवा तत्सदृश पदार्थाशी झालेल्या संकरामुळे किंवा एखाद्या अधिक तीव्र संवेदनेचे अस्तित्व किंवा निरीक्षकाचे अंधत्व किंवा त्याच्या ज्ञानेंद्रियाचा किंवा मनाचा एखादा दोष यामुलेही अव्यक्त वस्तु अदृश्य राहात असतील."

२१. कपिलाला विचारण्यात आले, "मग विश्वाचे मूळ कोणते? विश्वाचा व्यक्त भाग आणि अव्यक्त भाग यांतील फरक कशामुळे होती?" असे कपिलास विचारण्यात आले.

२२. कपिलाने उत्तर दिले, "व्यक्त वस्तूंना कारण असते आणि अव्यक्त वस्तूंनाही कारण असते. पण दोहोंचेही मूळ मात्र कारणातीत आणि स्वतंत्र असते."

२३. व्यक्त वस्तु संख्येने पुष्कळ आहेत आणि अवकाश व काल यांच्या बाबतीत मर्यादित आहेत. त्याचे मूळ एकच, -शाश्वत आणि सर्वव्यापी. व्यक्त वस्तू क्रियाशी आणि सावयव असतात; सर्वाचे मूळ कारण सर्व वस्तूंमध्ये अंतर्भूत असते परंतु ते निष्क्रिय आणि एकसंघ असते.

२४. कपिल म्हणतो की, अनुत्क्रान्त वस्तुच्या विकासाची प्रक्रिया सत्त्व, रजस आणि तमस या तिच्या तीन घटकांमुळे घडत असते. यांना तीन गुण असे म्हणतात.

२५. माणसाच्या सुखाचे कारण होणार्या आणि त्यांचा आविष्कार करणार्या नैसर्गिक प्रकाशाशी यापैकी पहिल्या घटकांचे सादृश्य आहे. दुसरा घटक प्रवृत्ती किंवा क्रियाशीलता निर्माण करतो; तिसरा घटक जड असून तो नियमन करतो आणि निष्क्रिय व उपेक्षेची स्थिती निर्माण करतो.

२६. या तीन घटकांचे परस्परांशी असलेले संबंध मूलतःच अत्यंत निकटचे असतात, ते एकमेकांवर मात करतात, एकमेकांना आधारही देतात आणि परस्परांत मिसळूनही जातात. हे घटक ज्योत, तेल आणि वात या दिव्याच्या घटकांप्रमाणे असतात.

२७. जेव्हा या तीन गुणांत समतोल असतो आणि एक दुसर्यापेक्षा वरचढ होत नाही, तेव्हा हे विश्व अचेतन होते व त्याची उत्क्रांति थांबते.

२८. जेव्हा या तीन गुणांचा समतोल नसतो आणि एक दुसर्यापेक्षा वरचढ होतो, तेव्हा हे विश्व सचेतन होते आणि त्याची उत्क्रांती सुरू होते.

२१. गुणांचा समतोल का जातो या प्रश्नाला उत्तर देताना कपिल म्हणतो की, दु:खाच्या अस्तित्वामुळे या तीन

गुणांचा समतोल बिघडतो.

३०. कपिलाच्या तत्वज्ञानातील हे असे सिद्धांत होते.

३१. सर्व तत्ववेत्यांपैकी कपिल मुनीच्या तत्वज्ञानाचा बुद्धावर फार मोठा प्रभाव पडला होता.

३२. ज्याची शिकवण तर्कशास्त्र आणि वास्तवता यांवर आधारलेली आहे. असा कपिल हा एकच तत्वज्ञ असल्याचे बुद्धांना आढळून आले.

३३. तथापि कपिलाने सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीचा त्यांनी स्वीकार केला नाही. बुद्धांनी कपिलाच्या फक्त तीन गोष्टी ग्रह्य धरल्या.

३४. सत्य हे पुराव्याने सिद्ध झाले पाहिजे व क्रियेला बुद्धिवादाचा आधार असला पाहिजे, हे त्यांनी मान्य केले.

३५. देव अस्तित्वात आहे किंवा त्याने विश्व निर्माण केले हे गृहीत धरण्यास तर्कशास्त्राचा किंवा वस्तुस्थितीचा कोणताही आधार नाही हे त्यांनी मान्य केले.

३६. जगात दुःख आहे हे त्यांनी मान्य केले.

३७. कपिलाच्या शिकवणुकीतील बाकीचा भाग आपल्या उद्दिष्टांच्या दृष्टीने अनावश्यक म्हणून त्यांनी सोडून दिला.

## ३. ब्राम्हणे

१. वेदानंतरचे धार्मिक ग्रंथ ब्राम्हणे या नावाने ओळखले जातात. दोहोंनाही पवित्र ग्रंथ मानले जात होते. वस्तुतः ब्राम्हणे हा वेदांचाच एक भाग होय; दोन्ही ग्रंथ सारख्याच महत्वाचे मानले जात असून त्यांना "श्रुति" या नावाने संबोधितात.

२. ब्राम्हण तत्वज्ञान हे चार सिद्धांतावर आधारलेले आहे.

३. पहिला सिद्धांत असा की, वेद हे केवळ पवित्र आहेत असे नसून ते अचूक आहेत आणि त्यांचा अधिकार वादातीत आहे.

४. ब्राम्हण तत्वज्ञानाचा दुसरा सिद्धांत असा की, योग्य ते वैदिक यज्ञ केले, धार्मिक विधी आणि समारंभ पार पाडले आणि ब्राम्हणांना दक्षिणा दिली तरच आत्म्याला मुक्ति मिळते. म्हणजे जन्ममरणाच्या फेर्यांतून त्याची सुटका होते.

५. वेदांत सांगितलेली आदर्श धर्माचीच कल्पना ब्राम्हणांपाशी होती असे नव्हे, तर आदर्श समाजाविषयीही त्यांची एक कल्पना होती.

६. या आदर्श समाजरचनेला त्यांनी चातुर्वर्ण्य असे नाव दिले. चातुर्वर्ण्याची कल्पना वेदांत सांगितलेली आहे आणि ज्या अर्थी वेद हे स्खलनातील व वादातीत आहेत त्याअर्थी समाजरचनेची. चतुर्वर्ण्य पद्धतीसुद्धा बंधनकारक आणि वादातील आहे.

७. ही समाजपद्धती काही विशिष्ट नियमांवर आधारलेली होती.

८. पहिला नियम असा की, समाज चार वर्णात विभागला जावा (१) ब्राम्हण, (२) क्षत्रिय, (३) वैश्य आणि (४) शूद्र.

९. दुसरा नियम असा की, या वर्णात सामाजिक समता असू शकत नाही; वर्गवार विषमतेच्या नियमाने ते

परस्परांशी बांधले गेले पाहिजेत.

१०. सर्वांच्यावर ब्राम्हण असले पाहिजेत; ब्राम्हणांचा खालोखाल पण वैश्यांच्या वर क्षत्रिय, क्षत्रियांच्या खालोखाल परंतु शूद्रांच्या वर वैश्य आणि शूद्र हे सर्वांच्या खाली असले पाहिजेत.

११. हक्क आणि अधिकार यांच्या बाबतीत या चार वर्णात समानता असू शकत नव्हती. हक्क व अधिकार यांचा प्रश्न वर्गवार विषमतेच्या नियमांवर आधारलेला होता.

१२. ब्राम्हणाला त्याच्या इच्छेप्रमाणे हवे असतील ते सर्व हक्क आणि अधिकार असत. पण ब्राम्हणांना जे हक्क व अधिकार मिळत ते क्षत्रियाला मिळत नसत. त्याला वैश्यापेक्षा जास्त हक्क व अधिकार मिळत. वैश्याला शूद्रापेक्षा अधिक हक्क व अधिकार असत पण क्षत्रियालामिळणारे हक्क व अधिकार त्याला मिळत नसत; आणि शूद्राला तर अधिकार नम्हतेच पण खास हक्क तर मुलीच नन्हते. तीन वरिष्ठ वणांना न दुखविता जगणे एवढाच त्याला हक्क होता.

१३. चातुर्वर्ण्याचा तिसरा नियम व्यवसायाच्या विभागणीसबंधी होता.अध्ययन, अध्यापन आणि धार्मिक विधी करणे हा ब्राम्हणांचा व्यवसाय होता. क्षत्रियाचा व्यवसाय लढाई करणे हा होता. व्यापार हा वैश्यांवर सोपविण्यात आला होता. आणि तीन वर्गाची सेवा करणे हा शूद्रांचा व्यवसाय होता. निरनिराळया वर्गाना दिलेले व्यवसाय हे खास त्या त्या वर्गासाठी होते. एका वर्गाच्या व्यवसायांत दुसर्याला शिरता येत नसे.

१४. चातुर्वर्ण्याचा चवथा नियम शिक्षणाच्या हक्कासंबंधी होता. चातुर्वर्ण्य पद्धतीने शिक्षणाचा हक्क ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य या पहिल्या तीन वर्णानाच दिला होता. शूद्रांना शिक्षणाचा हक्क नाकारण्यात आला. चातुर्वर्ण्याच्या नियमाने शिक्षणाचा हक्क केवळ शूद्रांनाच नाकारण्यात आला नव्हता; तर ब्राम्हण, क्षत्रिय आणि वैश्य या वर्णातील स्त्रियांना देखील तो नाकारण्यात आला.

१५. आणखी एक पाचवा नियम होता. या नियमानुसार माणसाचे आयुष्य चार आश्रमात किंवा टप्प्यांत विभागले गेले होते. पहिल्या आश्रमाला ब्रम्हचर्य म्हणत; दुसर्याचे नाव गृहस्थाश्रम असे होते. तिसर्याला वानप्रस्थ आणि चवथ्याला संन्यास अशी नावे होती.

१६. पहिल्या आश्रमाचे उद्दिष्ट अध्ययन व शिक्षण हे होते. दुसर्याचे उद्दिष्ट वैवाहिक जीवन जगणे हे होते. तिसर्याचे उदिष्ट वैराग्य जीवनाची म्हणजे गृहत्याग न करता कौटुंबिक बंध तोडून टाकणार्या जीवनाची ओळख करून देणे हे होते. चवथ्या आश्रमाचे उद्दिष्ट माणसाला ईश्वराचा शोध घेण्यास व त्याच्यात विलीन होष्यास समर्थ करणे हे होते.

१७. या आश्रमाचे फायदे फक्त तीन वरिष्ठ वर्णाच्या पुरुषांनाच घेता येत असत.पहिला आश्रम शूद्र व स्त्रिया यांच्यासाठी नव्हता. त्याचप्रमाणे चवथाही आश्रम शूद्र व स्त्रियांना वर्ज्य होता.

१८. चातुर्वर्ण्य नावाची अशी होती दिव्य आदर्श समाजरचना, तिला चातुर्वर्ण्य असे नाव देण्यात आले होते. ब्राम्हणांनी नियमाला आदर्शाचे स्वरूप दिले आणि कुठल्याही पळवाटा किंवा उणीवा न ठेवता तो आदर्श प्रत्यक्षात उतरविला.

१९. ब्राम्हण तत्वज्ञानातील चवथा सिद्धान्त कर्मवाद होय. आत्याच्या जन्ममरणाच्चा फेर्याच्या सिद्धान्ताचा तो एक भाग होता. ब्राम्हणांचे कर्मवादाचे तत्वज्ञान हे " पुनर्जन्म घेऊन जेव्हा आत्मा नव्या देहात प्रवेश करतो तेन्हा तो कुठे जातो?" या प्रश्नाला दिलेले उत्तर होय. यावर ब्राम्हणी तत्वज्ञानाचे उत्तर असे की, आत्मा कुठे जातो हे

माणसाच्या पूर्वजन्मातील कृत्यांवर अवलंबून आहे. दुसर्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे ते त्याच्या कर्मावर अवलंबून असते.

२० ब्राम्हणी तत्वज्ञानातील पहिल्या सिद्धान्ताला बुद्धाचा तीव्र विरोध होता. वेद हे स्खलनातीत आहेत व त्याचा अधिकार वादातीत आहे हे त्यांचे म्हणणे भगवान बुद्धाने नाकबूल केले.

२१. त्यांच्या मते निर्दोष व वादातीत असे काहीही नाही. कोणत्याही गोष्टीची फेरतपासणी आणि फेरविचार करण्यास प्रत्यवाय नसावा.

२२. माणसाला सत्य-यथार्थ सत्य-समजले पाहिजे. भगवान बुद्धाच्या मते विचारस्वातंत्र्य सर्वात महत्वाची. व आवश्यक बाब होती. आणि सत्य शोधून काढण्याचा विचारस्वातंत्र्य हा एकमेव मार्ग आहे अशी त्याची खात्री होती.

२३. वेद अपौरुषेय आहेत असे मानणे याचा अर्थ विचारस्वातंत्र्याला संपूर्ण नकार देणे असा होय

२४. या कारणास्तव ब्राम्हणी तत्वज्ञानाचा सिद्धान्त भगवान बुद्धांना दोषार्ह वाटला.

२५. ब्राम्हणी तत्वज्ञानातील दुसर्या सिद्धान्तालाही त्यांचा तितकाच विरोध होता. यज्ञामध्ये काही तथ्य असल्याचे त्यांना मान्य होते. परंतु खरा यज्ञ आणि खोटा यज्ञ यात त्यांनी भेद केला.

२६. दुसर्यांच्या हितासाठी स्वहिताचा त्याग करणे हा खरा यज्ञ होय असे त्यांनी मानले. वैयक्तिक स्वार्थासाठी देवाला प्रसन्न करण्यासाठी एखाद्या पशूचा बळी देणे हा त्यांच्या मते खोटा यज्ञ होय.

२७. वाम्हणांचे यज्ञ हे बहुधा देवाला संतुष्ट करण्यासाठी पशूंचे बळी देऊन केलेले यज्ञ असत. अशा यज्ञाचा खोटे यज्ञ म्हणून त्यानी धिक्कार केला. आत्म्याच्या मुक्तीसाठी जरी असे यज्ञ केले गेले तरीही त्यांना ते मान्य नव्हते.

२८. यज्ञविरोधी असलेले लोक ब्राम्हणांचा उपहास करून म्हणत, "पशूचा बळी देऊन जर एखाद्याला स्वर्गप्राप्ती होत असेल तर, मग त्याने स्वत:च्या बापाचाच बळी का देऊ नये? स्वर्गात जाण्याचा तो अधिक जलद मार्ग ठरेल."

२९. भगवान बुद्ध या विचाराशी अंत:करणपूर्वक सहमत होते.

३० यज्ञाचा सिध्दांत भगवान बुद्धांना जितका तिरस्करणीय वाटत होता तितका चातुर्वर्ण्याचाही सिद्धान्त त्याना नापसंत होता.

३१. चातुर्वर्ण्याच्या नावाने ब्राम्हणी धर्माने केलेली समाजरचना त्यांना नैसर्गिक समाजरचना वाटली नाही. तिच्यातील वर्गरचना सक्तीची आणि जुलमी होती. विशिष्ट वर्गाच्या मतलबानुसार तयार केलेली अशी ती समाजरचना होती. मोकळा आणि स्वतंत्र समाज त्याना पसंत होता.

३२. ब्राम्हणांची चातुर्वर्ण्यपद्धती ही कधीही न बदलनारी कायम स्वरूपाची अशी समाजरचना होती. एकदा ब्राम्हण झाला की तो कायमचा ब्राम्हण. एकदा क्षत्रिय झाला की, तो कायमचा क्षत्रिय, एकदा वैश्य झाला की, तो कायमचा वैश्य आणि शूद्र तो कायमचा शूद्र ही समाजरचना व्यक्तीच्या जन्मावरून प्राप्त झालेल्या दर्जावर आधारलेली होती. या व्यवस्थेत माणसाचा दुर्गुण कितीही भयंकर असला तरी त्यामुळे त्याचा दर्जा कमी होत नसे; आणि त्याचा सद्गुण कितीही मोठा असला तरी त्याचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने या सद्गुणाला काहीही किंमत नसे. योग्यता आणि प्रगति यांना या समाजरचनेत स्थान नव्हते.

३३. विषमता प्रत्येक समाजात असते; पण ब्राम्हणी धर्मात तिचे स्वरूप अगदी निराळे होते. ब्राम्हणांनी

सांगितलेली विषमता हे त्या समाजाचे अधिकृत तत्व होते. समाजावर वाढलेले ते केवळ बांडगूळ नव्हते. ब्राम्हणी. धर्माचा समतेवर विश्वास नव्हता. वस्तुत: समतेला त्याचा विरोध होता.

३४. ब्राम्हणी धर्माचे केवळ विषमतेने समाधान झाले नाही. वर्गवार विषमता हे त्याचे सार होते.

३५. समाजात सुसंवाद निर्माण करण्याचे तर दूरच राहो, पण वर्गवार विषमतेने समाजात चढत्या प्रमाणात द्वेष आणि उतरत्या प्रमाणात तिरस्कार निर्माण केला असून ती अखंड कलहाचे कारण होईल असे बुद्धाला वाटले.

३६. चार वर्णाचे व्यवसाय देखील निश्चित केले गेले होते. व्यवसायाची निवड करण्याचे स्वातंत्र्य कुणाला नव्हते. शिवाय हे व्यवसाय काम करष्याची कुशलता यानुसार निश्चित करण्यात आले नव्हते. तर ते जन्मावरून निश्चित केले गेले होते.

३७. चातुर्वर्ण्याच्या नियमांचे काळजीपूर्वक निरीक्षण केल्यावर भगवान बुद्ध अशा निष्कर्षाला येऊन पोहोचले की, ब्राम्हणी धर्माने ज्या तात्त्विक पायावर समाजरचना उभारली तो पाया, जरी स्वार्थी नसला तरी तो चुकीचा खास होता.

३८. त्याना हे स्पष्ट दिसले की, चातुर्वर्ण्याने सर्वांच्या हितसंबंधाकडे तर लक्ष दिले नाहीच आणि सर्वाच्या कल्याणाचा पुरस्कार तर मुळीच केला नाही, तर खरोखर मूठभर लोकांच्या हितासाठी बहुसंख्य लोकांना राबविण्यासाठीच चातुर्वर्ण्याची योजना जाणूनबुजून करण्यात आली होती. या योजनेनुसार स्वत:ला मानवश्रेष्ठ म्हणवून घेणार्या वर्गाची सेवा करणे माणसाला भाग पाडण्यात आले.

३९. दुर्बलांना दडपण्यासाठी व पिळण्यासाठी आणि त्यांना पूर्णपणे दास्यांत ठेवण्यासाठी ही योजना करण्यात आली होती.

४०. बंडाची प्रवृत्ति पूर्णपणे मारून टाकण्यासाठीच ब्राम्हणांनी कर्मवाद तयार केला होता असे बुद्धाचे मत होते. मनुष्याच्या दु:खाला त्याच्या स्वत:शिवाय दुसरा कोणीही जबाबदार नव्हता. दु:खाची स्थिती तो बंड करून बदलू शकत नव्हता. कारण पूर्वजन्मातील कर्मामुळेच या जन्मातील त्याची दु:खी अवस्था ठरविष्यात आली. होती.

४१. ब्राम्हण तत्वज्ञानाने ज्यांची माणुसकी पार नष्ट करून टाकली होती त्या शूद्र आणि स्त्रिया या दोन वर्गांना या समाज व्यवस्थेविरुद्ध बंड करण्याचे सामर्थ्य नव्हते.

४२. विद्यार्जनाचा हक्क त्यांना नाकारण्यात आला होता. याचा परिणाम असा झाला की, त्यांच्यावर लादलेल्या अज्ञानामुळे आपली अशी हीन अवस्था का झाली हे त्यांना कळत नव्हते. ब्राम्हणी धर्माने त्यांचे जीवन अर्थशून्य करून टाकले होते हे त्यांना समजले नव्हते. या ब्राम्हणी तत्वज्ञानाविरुद्ध बंड करण्याऐवजी ते त्याचे भक्त बनले व त्याचा ते पुरस्कार करू लागले.

४३. शस्त्र धारण करणे हा आपले मानवी स्वातंत्र्य मिळविण्याचा शेवटचा उपाय आहे. परंतु शूद्रांना शस्त्र धारण करण्याचा हक्क नाकारण्यात आला होता.

४४. ब्राम्हणी धर्माच्या वर्चस्वाखाली स्वार्थी ब्राम्हण, सामर्थ्यवान व भयंकर क्षत्रिय आणि धनवान वैश्य यांच्या कटाचे बळी म्हणून शूद्रांना असाहाय्य असे करून ठेवण्यात आले होते.

४५. अशा या समाजरचनेत बदल घडविणे शक्य होते काय? ही समाजव्यवस्था ईश्वरप्रणीत समजली जात असल्यामुळे ती बदलता येणे शक्य नाही हे बुद्धाला माहीत होते. ती फक्त नष्ट करून टाकणेच शक्य होते.

४६. या कारणांसाठी खर्या जीवनमार्गाला विरोधी म्हणून ब्राम्हणी तत्वज्ञान बुद्धाने अमान्य केले.

## ४. उपनिषदे आणि त्यांची शिकवण

१. उपनिषदे हे वाङमयातील वेगळ्या प्रकारचे ग्रंथ होत. उपनिषदे वेदांचा भाग नव्हेत. कोणताही धार्मिक कायदा यात सांगितलेला नाही.

२. असे असूनही उपनिषदे हा धार्मिक वाङमयाचाच एक भाग झाला.

३. उपनिषदांची संख्या बरीच मोठी आहे. त्यांतील काही महत्वाची अहेत, काही मूळीच महत्वाची नाहीत.

४. त्यांपैकी काही उपनिषदे वैदिक सिद्धान्ती, ब्राम्हण पुरोहित, यांच्या विरुद्ध असल्याबद्दल गणली जात.

५. वैदिक अभ्यास म्हणजे अज्ञान व अविद्या यांचा अभ्यास होय, याविषयी या सर्वांचे एकमत होते.

६. चार वेद आणि वैदिक शास्त्रे यांचे ज्ञान हे हलक्या दर्जाचे ज्ञान होय. याविषयी या सर्वांचे एकमत होते:.

७. वेद हे ईश्वरनिर्मित आहेत, हे अमान्य करण्यात त्यांचे एकमत होते.

८. यज्ञ व त्यांचे फल, और्ध्वदेहिक आहुती आणि ब्राम्हणांना द्यावयाची दक्षिणा या ब्राम्हणी तत्वज्ञानातील मूलभूत गोष्टींना चिकटविण्यात आलेले सामर्थ्य नाकारण्याच्या बाबतीत त्या सर्वांचे एकमत होते.

९. तथापि उपनिषदांचा हा काही मुख्य विषय नव्हता. त्यांनी केलेली चर्चा ब्रम्ह व आत्मा यांच्यावर केंद्रित झाली आहे

१० विश्वाला बंधनात ठेवणारे ब्रम्ह हे सर्वव्यापी तत्व असून आत्म्याने परमात्म्माचे ज्ञान करून घेण्यातच आत्म्याची मुक्ती आहे.

११. उपनिषदाचा मुख्य सिद्धान्त असा की, ब्रम्ह हे सत्य आहे आणि आत्मा म्हणजे ब्रम्हच होय. उपाधीत गुंतल्यामुळे आत्म्याला मी ब्रम्ह आहे याची जाणीव होत नाही.

१२. प्रश्न असा होता की, ब्रम्ह हे सत्य आहे काय? उपनिषदांचे सिद्धान्त मान्य करावयाचे की नाही हे या प्रश्नाच्या उत्तरावर अवलंबून होते.

१३. ब्रम्ह हे सत्य आहे हे सिद्ध करणारा कोणताही पुरावा बुद्धाला मिळाला नाही. म्हणून उपनिषदांचे म्हणणे त्यांनी.अमान्य केले.

१४. उपनिषदांच्या कर्त्यांना याविषयी प्रश्न विचारले गेले नव्हते असे नाही.जे प्रश्न विचारले गेले होते ते असे होते :

१५ अशा प्रकारचे प्रश्न याज्ञवल्क्यासारख्या महर्षीला विचारण्यात आले होते. बृहदारण्यकोपनिषदांत याज्ञवल्क्याने महत्वाची कामगिरी बजावली आहे.

१६. त्याला विचारण्यात आले, 'ब्रम्ह म्हणजे काय? आत्मा म्हणजे काय?' या प्रश्नावर "नेति! नेति! मला माहीत नाही! मला माहीत नाही !" एवढेच याज्ञवल्क्य सांगू शकला.

१७. "ज्याच्याविषयी कुणालाच काही माहीत नाही ते सत्य कसे असू शकेल?" असा बुद्धाचा प्रश्न होता. उपनिषदांचे म्हणणे केवळ कल्पनेवर आधारलेले असल्यामुळे ते नाकारण्यात बुद्धाला कोणतीही अडचण भासली नाही.

# भाग सहावा: बुद्ध आणि त्यांचे समकालीन

## १. बुद्धाचे समकालीन

१. ज्या काळात बुद्धाने परिव्रज्या घेतली त्या काळी देशात फार मोठी बौद्धिक खळबळ माजली होती. ब्राम्हण तत्वज्ञानांखेरीज तत्वज्ञानाचे निरनिराळे बासष्ट पंथ त्या वेली अस्तित्वात होते; त्या सर्वांचा ब्राम्हण तच्चज्ञानाला विरोध होता. यापैकी निदान सहा पंथ तरी लक्षात घेण्यासारखे होते.

२. या पंथांपैकी एक पंथ पूर्ण काश्यप याच्या नेतृत्वाखाली होता. त्याच्या तत्त्वज्ञानाला 'अक्रियावाद' असे म्हणत असत. त्याचे म्हणणे असे की, कर्माचा आत्म्यावर काहीही परिणाम होत नाही. कुणीही स्वतः काही काम करावे किंवा ते दुसर्याकडून करवून घ्यावे; स्वतः हत्या करावी किंवा दुसर्याकडून हत्या करवावी; स्वतः चोरी किंवा दरोडेखोरी करावी किंवा दुसर्याकडून ती करवून घ्यावी; स्वतः व्यभिचार करावा किंवा दुसर्याकडून तो करवावा; स्वतः खोटे बोलावे किंवा दुसर्याला खोटे बोलावयास लावावे. आत्म्यावर या कशाचाही परिणाम होत नाही. एखादे कृत्य कितीही दुराचारी असले तरी आत्म्याला त्याचे पाप लागत नाही. एखादे कृत्य कितीही चांगले असले तरी त्यामुळे आत्म्याला पुण्य लाभत नाही. आत्म्यावर कशाचीच 'क्रिया'( परिणाम ) होत नाही. ज्या वेळी मनुष्य मरतो त्यावेळी ज्या घटकांचा तो बनलेला असतो ते आपल्या मूळ स्वरूपात विलीन होतात. मृत्यूनंतर काहीही शिल्लक राहात नाही-शरीर राहात नाही आणि आत्माही राहात नाही.

३. दुसर्या एका पंथाचे नाव 'नियतिवाद' असे होते. त्याचा मुख्य प्रणेता मक्खली गोसाल हा होता. त्याचे तत्त्वज्ञान म्हणजे एकप्रकारचा दैववाद किंवा निश्चयवाद होता. कोणीही काहीही घडबवू शकत नाही, किंवा बिघडवू शकत नाही. घटना घडतात त्या कोणीही घडवीत नाहीत, दुःख कुणालाही नष्ट करता येत नाही, वाढविता येत नाही किंवा कमी करता येत नाही. जगाच्या अनुभवांचा आपला वाटा प्रत्येकाने उचलला पाहिजे, हे त्याचे तत्वज्ञान होते.

४. तिसर्या पंथाचे नाव 'उच्छेदवाद' असे होते. अजित केशकंबल हा त्याचा मुख्य प्रणेता होय. त्याचे तत्वज्ञान म्हणजे एक प्रकारचा 'विनाशवाद' होता. यज्ञ किंवा होम याला काहीही अर्थ नाही. आत्म्याला स्वतःच्या कृत्यासाठी भोगावी लागणारी किंवा उपभोगयास मिळणारी सुखदुःखाची फळे किंवा परिणाम-असला काहीही प्रकार नाही. स्वर्ग नाही की, नरक नाही. जगातील दुःखाच्या काही मूल तत्त्वांपासून मनुष्य बनला आहे. आत्मा ते टाळू शकत नाही. जगातल्या कोणत्याही दुःखातून आत्म्याची सुटका होऊ शकत नाही. या दुःखाचा अंत आपोआप होणार आहे. महाकल्पांतील जन्ममरणाच्या चौर्यांशी लक्ष योनीच्या फेर्यांतून आत्म्याने गेलेच पाहिजे. त्यानंतरच आत्म्याच्या दुःखाचा अंत होईल, त्यापूर्वी होणार नाही, किंवा दुसया कोणत्या उपायानेही होणार नाही.

५. चवथ्या पंथाचे नाव 'अन्योन्यवाद' असे होते. या पंथाचा प्रमुख 'पकुध कच्चायन' हा होता. त्याचे म्हणणे असे की, जीव हा पृथ्वी, आप, तेज, वायु, सुख, दुःख आणि आत्मा या सप्त महाभूतांचा बनलेला असतो. यांपैकी कोणतेही दुसर्यावर अवलंबून नसते; त्यांचा एकमेकांवर परिणामही होत नाही. ती स्वयंभू आणि शाश्वत आहेत. त्यांचा कशानेही नाश होऊ शकत नाही. जर, एखाद्याने माणसाचे डोके उडविले तर तो त्याला ठार करीत नाही.

शस्त्र सप्तमहाभूतांत प्रवेश करते, एवठाच त्याचा अर्थ समजावयाचा.

६. 'संजय बेलपुत्ता' चा स्वतःचा एक पंथ होता. त्याचे नाव 'विक्षेपवाद' हा एक प्रकारचा संशयवाद होता. संजय बेलपुत्त म्हणतो, "जर एखाद्याने मला स्वर्ग आहे काय असे विचारले आणि तो आहे असे मला वाटले तर मी होय म्हणेन. पण तो नाही असे मला वाटले तर मी नाही म्हणेन. मानवप्राणी निर्माण केले गेले काय, माणसाला त्याच्या बर्या-वाईट कृत्यांची फळे भोगावी लागतात काय, आणि मृत्यूनंतर आत्मा अस्तित्वात आहे काय? असे जर कोणी मला विचारले तर मी या सर्वांना नकारात्मक उत्तर देईन. कारण त्याचे अस्तित्व आहे असे मला वाटत नाही." याप्रमाणे संजय बेल्पुत्ताने आपल्या तत्त्वज्ञानाचे सार सांगितले.

७. सहाव्या पंथाचे नाव 'चतुर्यामसंवरवाद'. या पंथाचा प्रमुख महावीर. हा गौतम नव्या प्रकाशाच्या शोधत असतांना जीवंत होता. त्याला निगंठ नाथपुत्त म्हणत. महावीराने असे संगितले आहे की, पूर्वजन्मी आणि या जन्मी दुष्कर्मामुळे आत्म्याला पुंनर्जन्म घ्यावा लागतो. म्हणून माणसाने तपश्चर्येने दुष्कर्मातीत व्हावे असे त्याने सुचविले. या जन्मात दुष्कर्मे टाळण्यासाठी चातुर्याम धर्माचे म्हणजे चार नियमांचे पालन करावे असे महावीराने संगितले. ते चार नियम पुढीलप्रमाणे: (१) हिंसा न करणे, (२) चोरी न करणे, (३) खोटे न बोलणे, आणि (४) मालमत्ता न करणे किंवा ब्रम्हचर्य पाळणे.

## २. समकलीनांविषयी बुद्धाची वृत्ती.

१. नव्या तत्त्ववेत्त्यांची शिकवण बुद्धाने स्वीकारली नाही.

२. त्यांच्या शिकवणुकीला त्याने दिलेली अमान्यता अकारण नव्हती. तो म्हणतो:-

३. "पूर्ण काश्यप किंवा 'पकुध कच्चायन' यांचे तत्त्वज्ञान खरे मानले तर कोणीही वाटेल ती वाईट गोष्ट करू शकेल किंवा कोणताही उपद्रव देऊ शकेल. एखादा मनुष्य तर कोणतीही सामाजिक जवाबदारी न स्वीकारता किंवा सामाजिक परिणाम न भोगता, दुसर्याची हत्या करण्याइतकीही मजल मारू शकेल."

४. "जर 'मक्खली गोसला' चे तत्त्वज्ञान खरे मानले तर मनुष्य दैवाचा गुलाम बनेल. तो स्वतःला मुक्त करू शकणार नाही."

५. " 'अजित केशकंबला' चे तत्त्वज्ञान खरे मानले तर मनुष्य फक्त खाणे, पिणे व मजा करणे एवढ्याच गोष्टी करू शकेल."

६. " 'संजय बेलपुत्ता' चे तत्त्वज्ञान खरे मानले तर माणसाला भटक्याचे जीवन जगावे लागेल आणि त्याला जीवनचे निश्चित तत्त्वज्ञानच असणार नाही."

७. " 'निगंठ नायपूत्ता' चे तत्त्वज्ञान खरे मानले तर माणसाला आपले जीवन संन्यास व तपश्चर्या यांनाच वाहावे लागेल आणि मग त्याच्या सगळया सहजप्रवृत्ती व कामना यांचा बीमोड होऊन त्याला संपूर्ण दास्य पत्करावे लागेल."

८. याप्रमाणे तत्त्वज्ञान्यांनी सुचविलेल्या कोणताही जीवनमार्ग बुद्धला पटला नाही. हताश, असहाय्य आणि अविचारी माणसांचे हे विचार आहेत असेच त्याला वाटले; म्हणून त्याने या बाबतीत अन्यत्र प्रकाशचा शोध घेण्याचे ठरविले.

# भाग सातवा: साम्य आणि भेद

## १. बुद्धाने काय त्याज्य ठरविले ?

१. या तात्विक आणि धार्मिक विचारसरणीच्या अवलोकनावरून असे दिसते की, बुद्धाने ज्या वेळी आपल्या शासनाचा पाया रचला त्या वेळी काही रूढ कल्पनांनी लोकांच्या मनाची घट्ट पकड घेतली होती. त्या कल्पना अशा:-

(१). वेदप्रामाण्यावर विश्वास.

(२). आत्म्याची मुक्ति किंवा मोक्ष म्हणजेच त्याच्या पुनर्जन्माचा अंत, यावर विश्वास.

(३). मोक्षप्राप्तीची साधने या दृष्टीने धार्मिक विधी, समारंभ व यज्ञ यांवर विश्वास.

(४). समाज संघटनेसाठी चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा आदर्शावर विश्वास.

(५). विश्वाचा निर्माता म्हणून ईश्वरावर आणि विश्वाचे मूलाधार तत्त्व म्हणून ब्रम्हावर विश्वास.

(६). आत्म्यावर विश्वास.

(७). 'संसार' किंवा आत्म्याचा पुनर्जन्म यावर विश्वास.

(८). कर्म म्हणजेच माणसाच्या पूर्वजन्मींच्या कृत्यामुळे त्याचे या जन्मीचे स्थान निश्चित होते या तत्त्वावर विश्वास.

२. आपल्या शासनाची तत्त्वे ठरविताना बुद्धाने आपल्या पद्धतीने या जुनाट कल्पनांचा समाचार घेतला.

३. पुढील कल्पना त्याने त्याज्य ठरविल्या:-

(१). मी कोण आहे, कोठून आलो, कोठे जाणार, याविषयी कल्पना करीत बसण्याच्या वृत्तीचा त्याने धिक्कार केला.

(२). आत्म्याचे थोतांड त्याने धुडकावून लावले. आणि शरीर संवेदना, चेतना आणि विज्ञान यांपैकी कशालाही आत्मा मानण्याच्या कल्पनेचा त्याने त्याग केला.

(३). काही धर्मगुरूंनीज्याचा प्रसार केला होता अशी शून्यावादी मते त्याने त्याज्य ठरविली.

(४). पाखंडी मताचा त्याने धिक्कार केला.

(५). विश्वाच्या विकासाचा प्रारंभकाळ सांगता येतो हे म्हणणे त्याने अमान्य केले.

(६). देवाने माणसाला निर्माण केले, किंवा ब्रम्ह नावाच्या कोण्या एकाच्या शरीरातून त्याचा जन्म झाला हे म्हणणे त्याने त्याज्य ठरविले.

(७). आत्म्याच्या अस्तित्वाकडे त्याने दुर्लक्ष तरी केले किंवा ते नाकारले.

## २. बुद्धाने कोणते बदल केले?

१. (१) कार्यकारणभावाचा अत्यंत महत्त्वाचा नियम आणि त्याचे उपसिद्धान्त त्याने मान्य केले.
(२) जीवनाचा दैववादी दृष्टीकोन आणि मनुष्य व जग यांचे भवितव्य देवानेच पूर्वनियोजित केलेले आहे हा तितकाच मूर्खपणाचा दृष्टीकोन, हे दोन्हीही त्याने त्याज्य ठरविले.
(३) एखाद्या पूर्वजन्मी केलेल्या कृत्यात दुःख निर्माण करण्याचे आणि या जन्मातील कृत्ये परिणामशून्य करण्याचे सामर्थ्य आहे हे म्हणणे त्याने अमान्य केले. कर्माचा दैववादी दृष्टीकोन त्याने नाकारला. कर्माच्या या दृष्टीकोनाच्या ऐवजी त्याने अधिक शास्त्रीय दृष्टीकोन स्वीकारला. जुन्याच बाटलीत त्याने नवी दारू ओतली.
(४) आत्म्याचा फेरा-संसार या तत्त्वांच्या जागी त्याने पुनर्जन्माच्या सिद्धांताला स्थान दिले.
(५) आत्म्याची मुक्ति किंवा मोक्ष या तत्त्वांऐवजी त्याने निब्बान (निर्वाण) तत्त्व स्वीकारले.
२. या प्रमाणे बुद्धशासन हे संपूर्ण नव्या विचारांनी भरले आहे. त्यात जे थोडेसे जुने आहे ते फेरबदल करून घेतलेले किंवा निराळ्या दृष्टीकोनातून मांडलेले असे आहे.

## ३. बुद्धाने काय स्वीकारले?

१. बुद्धाच्या शिकवणीचे पहिले वैशिष्ट्य असे की, सर्व गोष्टींचा मध्यबिंदू मन आहे, हे त्याने मानले.
२. मन सर्व वस्तूंच्या अग्रभागी असते (सर्व वस्तूंत श्रेष्ठ आहे ), ते सर्व वस्तूंवर अंमल चालविते, यांची निर्मिती करते. मनाचे आकलन झाले की सर्व वस्तूंचे आकलन होते.
३. मन सर्व मानसिक क्रियांचे मार्गदर्शन करते. मन सर्व मानसिक शक्तीचे प्रमुख आहे. मन हे त्या शक्तींचेच बनलेले असते.
४. ज्या बाबीकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे अशी पहिली बाब म्हणजे मनाचे संस्कार.
५. बुद्धाच्या शिकवणीचे दुसरे वैशिष्ट्य असे की, आपल्यामध्ये निर्माण होणार्या आणि आपल्यावर बाहेरून ज्याचा परिणाम होतो अशा सर्व बर्या-वाईट गोष्टीचे मन हे उगमस्थान आहे.
६. जे जे वाईट आहे, वाईटाशी संबंधित आहे आणि त्याच्या आधीन आहे ते ते मनातूनच उत्पन्न होते. जे जे चांगले आहे, चांगल्याशी संबंधित आहे आणि त्याच्या आधीन आहे-ते ते सर्व मनातूनच उत्पन्न होते.
७. ज्याप्रमाणे गाडी ओढणार्या बैलांच्या पावलामागोमाग गाडीची चाके जातात त्याप्रमाणे अशुद्ध चित्ताने जो बोलतो किवा कृती करतो त्याच्या मागोमाग दुःख येते. म्हणून चित्तशुद्धी हे धर्माचे सार होय.
८. बुद्धांच्या शिकवणीचे तिसरे वैशिष्ट्य पापकृत्ये टाळणे हे होय.
९. त्यांच्या शिकवणीचे चवथे वैशिष्टय असे की, खरा धर्म हा धर्मग्रंथात नसून धर्मतत्वाचे पालन करण्यात आहे.
१०. बुद्धाचा धर्म ही त्याची स्वत:ची निर्मिती नव्हती असे कोणी म्हणू शकेल काय?

# द्वितीय खंड: धम्मदीक्षेची मोहीम

भाग पहिला - भगवान बुद्ध आणि त्याचा विषादयोग

भाग दुसरा - परिव्राजकांची धम्मदीक्षा

भाग तिसरा - उच्चकुलीन आणि पवित्र व्यक्तींची धम्मदीक्षा

भाग चवथा - घरचे निमंत्रण

भाग पाचवा - धम्मदीक्षेच्या मोहिमेस पुन्हा सुरुवात

भाग सहावा - कनिष्ठ आणि सामान्यजनांची धम्मदीक्षा

भाग सातवा - स्त्रियांची धम्मदीक्षा

भाग आठवा - पतित आणि गुन्हेगार यांची धम्मदीक्षा

# भाग पहिला: भगवान बुद्ध आणि त्यांचा विषादयोग

## १. धर्मोपदेश करावा की करू नये ?

१. ज्ञान प्राप्ती करून घेतल्यावर आणि आपल्या धम्म मार्गाची रूपरेखा निश्चित केल्यावर भगवान बुद्धाच्या मनात एक प्रश्न उभा राहिला. पुढे जाऊन दुसर्यांना धर्मोपदेश करावा की स्वतःची व्यक्तिगत पूर्णावस्था प्राप्त करुन घेण्यासाठी आपले जीवन व्यतीत करावे ?

२. ते स्वतःशीच म्हणाले, "नव्या तत्त्वज्ञानाचा मला लाभ झाला आहे हे खरे; परंतु सामान्य माणसाला ते तत्त्व मान्य करणे आणि त्याचे अनुकरण करणे अत्यंत कठीण आहे. बुद्धिमान लोकाना देखील ते सहजासहजी कळणार नाही."

३. "ईश्वर आणि आत्मा यांच्या गुंतागुंतीतून स्वतःची सुटका करून घेणे मानवाला कठीण आहे. धार्मिक विधी आणि समारंभ यांच्यावरील श्रद्धेचा त्याग करणे माणसाला कठीण आहे. माणसाला कर्मवादापासून स्वतःची मुक्तता करून घेणे कठीण आहे."

४. "आत्मा अमर आहे या श्रद्वेचा त्याग करणे आणि आत्म्याला स्वतंत्र अस्तिस्व नाही व तो मृत्यूनंतर अस्तित्वात राहात नाही, हा माझा सिद्धांत मान्य करणेही लोकांना कठीण आहे."

५. "मनुष्य जात स्वार्थरत आहे आणि त्यातच ती आनंद आणि सुख मानते. स्वार्थ सोडून सदाचरणाची शिकवण मान्य करणे मनुष्य जातीला कठीण आहे."

६. "जर मी माध्या सिद्धांताची शिकवण दिली आणि इतरांना ती समजली नाही किंवा समजल्यावरही त्यांनी ती मान्य केली नाही किंवा मान्य करूनही ते ती अनुसरले नाहीत तर त्यांना तो एक त्रास आणि मलाही तो एक तापच होऊन बसेल."

७. "जगापासून दूर असा एक संन्याशीच राहून माझ्या या तत्त्वज्ञानाचा उपयोग स्वतःला पूर्णावस्था प्राप्त करून घेण्यासाठी का करू नये?" त्यांनी स्वतःलाच प्रश्न केला, "निदान मी स्वतःचे तरी कल्याण करून घेऊ शकेन."

८. याप्रमाणे विचार करीत असताना भगवान बुद्धाचे मन त्यांच्या तत्वज्ञानाची इतरांना शिकवण देण्याकडे न वळता निष्क्रियतेकडे झुकले.

९. भगवान बुद्धाच्या मनात काय चालले आहे हे जाणून ब्रम्ह सहंपती विचार करू लागला, "खरोखर जग नष्ट होत आहे. सम्यक् संबुद्ध तथागत जर निष्क्रियतेकडे झुकतील व ते आपल्या धम्माची शिकवण इतरांना देणार नसतील तर या जगावर खरोखरीच विनाश ओढवेल."

१०. चिन्ताग्रस्त असा ब्रम्ह सहंपती ब्रम्हलोक सोडून आला व बुद्धाच्यापुढे उभा राहिला. आपले उत्तरीय वस्त्र खांद्यावर नीट सावरून नम्रतेने हात जोडून तो म्हणाला, "आपण आता सिद्धार्थ गौतम नसून भगवान बुद्ध आहात. आपण सम्यक् संबुद्धत्व प्राप्त झालेले भगवंत आहात. आपण तथागत आहात. आपण जगताला अंध:कारातून मुक्त करण्याचे कसे नाकारू शकता? सन्मार्गापासून चुकत असलेल्या मानव जातीचे रक्षण करण्याच्या कार्यापासून आपण कसे विन्मुख होऊ शकता?"

११. “आपला सद्धम्म ऐकावयास न मिळाल्यामुळे या जगात वावरणार्या अशुद्ध मनाच्या माणसाचा अध:पातपात होत आहे.”

१२. ब्रम्ह सहंपती पुढे म्हणाला, “भगवंत जाणतच आहेत की, प्राचीन कालापासून मगधवासीयांत अनेक दोषांनी भरलेला एक अशुद्ध धर्म प्रचलित आहे.”

१३. “आपल्या अविनाशी धम्माचे द्वार त्यांच्यासाठी भगवंत खुले करणार नाहीत काय?”

१४. “पर्वत शिखरावर उभा राहणारा मनुष्य ज्याप्रमाणे आपल्या सभोवताली खाली उभे असलेल्या सर्व लोकांकडे पाहातो, त्याचप्रमाणे प्रज्ञेच्या शिखरावर चढून त्या सर्वोच्च स्थानावर उभे राहून पाहाणार्या हे दु:खमुक्त भगवन्, दु:खाच्या सागरात बुडालेल्या या लोकांकडे पाहा !”

१५. “जन्मऋणांतून मुक्त झालेल्या हे विजयी वीरा, ऊठ, जगाकडे जा, त्याच्याकडे पाठ फिरवू नको.”

१६. “भगवन्, देव आणि मानव यांच्यावरील करुणा बुद्धीने त्यांना आपल्या सद्धम्माची शिकवण देण्याचा निश्चय करोत.”

१७. भगवान बुद्धानी उत्तर दिले, “थोर मानवश्रेष्ठ ब्रम्हा, मी माझ्या धम्माचा सार्वजनिक उपदेश केला नाही, याचे कारण मला तसे करणे तापदायक होईल असे वाटले.”

१८. जगामध्ये अतिशय दु:ख आहे हे जाणून भगवान बुद्धाला पटले की, हात जोडून सन्याशी म्हणून स्वस्थ बसणे आणि जगात जसे घडते आहे तसेच घडू देणे हे योग्य नाही.

१९. संन्यास निरुपयोगी असल्याचे त्याना दिसून आले. जगापासून दूर पळून जाण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ होय. सन्याशाला देखील जगापासून सुटका नाही. जगापासून दूर पळून जाण्यापेक्षा जग बदलून त्याची सुधारणा करणे हेच अवश्य आहे, हे त्यांनी जाणले.

२०. भगवान बुद्धांना हे पटले की, त्यांनी संसाराचा त्याग यासाठी केला की, जगात इतका संघर्ष आहे व त्यापासून जगात दु:ख व दैन्य निर्माण झाले आहे आणि त्यावर त्यांना कोणताच उपाय माहीत नव्हता. जर आपल्या धम्मप्रचाराने जगातील दु:ख आणि दैन्य दूर करता आले तर केवळ निष्क्रियतेचा पुतळा बनून स्वस्थ न बसता जगात पुनरपि जाऊन त्याची सेवा करणे हे आपले कर्तव्य आहे हे त्यांनी ओळखले.

२१. म्हणून भगवान बुद्धांनी ब्रम्ह सहंपतीची विनंती मान्य केली आणि आपल्या सिद्धांताची शिकवण जगाला देण्याचा त्यानी निश्चय केला.

## २. ब्रम्ह सहंपती सुवार्ता जाहीर करतो

१. भगवान बुद्धांनी आपला उपदेश जनतेला देण्यासाठी त्यांना प्रवृत्त करण्यात आपण यश मिळविले हा विचार मनात येऊन ब्रम्ह सहंपतीला अतिशय आनंद झाला. त्याने भगवान बुद्धांना वंदन केले, त्यांस प्रदक्षिणा घातली आणि त्यांच्याकडे एकदा वळून पाहून तो निघून गेला.

२. परत जाताना तो जगाला घोषित करीत होता की, “ही शुभवार्ता ऐकून आनंद व्यक्त करा. जगातील सर्व दु:खाचे व पापाचे मूळ भगवान बुद्धांनी शोधून काढले आहे. त्यातून बाहेर पडण्याचा मार्गही त्यांना सापडला आहे.”

३. “दु:खी व कष्टी जीवांना भगवान बुद्ध स्वास्थ्य देतील. युद्धपीडितांना ते शान्ती देतील. ज्यांचे हृदय विदीर्ण झाले आहे, ज्याचा धीर खचला आहे त्यांना ते धीर देतील. जे पददलित आहेत आणि जे जुलुमाखाली चिरडले गेले आहेत त्यांच्यात ते आशा आणि विश्वास निर्माण करतील.”

४. “जगातील दु:खग्रस्तांनो, जीवन जगण्यासाठी झगडणार्यांनो, न्यायासाठी तळमळणार्या जीवांनो, या शुभवार्तेने आनंदित व्हा !”

५. “जखमी झालेल्यांनो, आपल्या जखमा बर्या झाल्याच असे समजा. भुकेलेल्यांनो, आता पोटभर खा. थकलेल्यांनो, आता विश्रांती मिळालीच असे समजा. तृषार्तांनो, आपली तहान भागवून घ्या. अंधारात चाचपडणारांनो, आता प्रकाश प्राप्त करून घ्या. निरुत्साही जनहो, आता हर्षभरित व्हा !”

६. “भगवान बुद्धांच्या सिद्धांतात अशी उत्कट प्रेरणा आहे की, जे परित्यक्त अथवा अनाथ आहेत त्यांना आपले करण्याची उत्कट इच्छा निर्माण होते. जे अध:पतित आहेत त्याना आपला उद्धार करून घेण्याची उदात्त प्रेरणा मिळते. आणि जे पददलित आहेत त्यांना प्रगतिपथावर नेणारा समतेचा प्रकाशझोत मिळतो.”

७. “भगवान बुद्धांचा धम्म हा सदाचाराची शिकवण देणारा धम्म आहे, आणि पृथ्वीवर सदाचरणाचे राज्य प्रस्थापित करणे हे त्याचे उद्दीष्ट आहे.”

८. “त्यांचा धम्म म्हणजे सत्य, संपूर्ण सत्य, सत्याशिवाय दुसरे काहीही नसून ते केवळ सत्यच आहे.”

९. “धन्य आहेत भगवान बुद्ध, की त्यांचा मार्ग बुद्धिवादी मार्ग आहे आणि तो धार्मिक भोळसटपणातून मुक्तता करणारा मार्ग आहे! धन्य आहेत भगवान बुद्ध, की जे मध्यम मार्गाचा उपदेश करतात! धन्य आहेत भगवान बुद्ध, की जे सद्धम्मच शिकवितात! धन्य आहेत भगवान बुद्ध, की जे शांति देणार्या निब्बाणाची शिकवण देतात! धन्य आहेत भगवान बुद्ध, की जे मैत्री, करुणा, आणि भ्रातृभावाची शिकवण देतात की, जी माणसाला आपल्या बांधवांची बंधमुक्तता करण्यास सहाय्यभूत होते!”

## ३. धम्मदीक्षेचे दोन प्रकार

१. भगवान बुद्धांच्या धम्मदीक्षेच्या योजनेत धम्मदीक्षेला दोन अर्थ आहेत.

२. ज्याला संघ म्हटले जाते त्या भिक्खू वर्गाचा सभासद होणे हा धम्मदीक्षेचा एक अर्थ.

३. भगवान बुद्धांच्या धम्माचा सामान्य अनुयायी किंवा उपासफ म्हणून गृहस्थाने धम्म दीक्षा घेणे हा दुसरा अर्थ होय.

४. भिक्खू आणि उपासक यांच्या जीवन मार्गात चार बाबी वगळल्यास कोणताही फरक नाही.

५. उपासक हा गृहस्थच राहतो, तर भिक्खू हा गृहहीन परिव्राजक बनतो.

६. उपासक आणि भिक्खु या दोघांनाही आपल्या आयुष्यात काही नियमांचे पालन करावे लागते.

७. भिक्खुंच्या बाबतीत या नियमाचे उल्लंघन दंडनीय ठरते. उपासकाच्या बाबतीत हे नियम म्हणजे आज्ञा होत. त्याने आपल्या सामर्थ्यानुसार त्या शीलांचे जास्तीत जास्त पालन करावयाचे असते.

८. उपासकाला संपत्ती बाळगता येते. भिक्खूला ती बाळगता येत नाही.

९. उपासक होण्यासाठी कोणताही ‘संस्कार’ करावा लागत नाही.

१०. भिक्खू होण्यासाठी 'उपसंपदा' नावाचा संस्कारविधी करावा लागतो.

११. भगवान बुद्धांनी त्यांच्याकडे दीक्षेसाठी आलेल्यांना भिक्खु किंवा उपासक बनविले.

१२. आपण भिक्खू व्हावे असे वाटल्यावर कोणत्याही उपासकाला भिक्खु होता येते.

१३. जर भिक्खूने आपल्या मुख्य व्रतांचा भंग केला किंवा भिक्खू संघाचे सभासदत्व सोडून देण्याची त्याची इच्छा असली, तर तो भिक्खू राहात नसे.

१४. ज्यांची नावे पुढील पृष्ठांत आली आहेत त्यांनाच भगवान बुद्धांनी दीक्षा दिली असे समजू नये.

१५. जी निवडक उदाहरणे दिली आहेत ती आपल्या धम्माची शिकवण देण्याच्या किंवा आपल्या भिक्खू संघात प्रवेश देण्याच्या बाबतीत बुद्धांनी कोणत्याही प्रकारे स्त्रीपुरुष भेद किंवा जातिभेद मानला नाही, हे दाखविण्यासाठीच निवडली आहेत.

# भाग दुसरा: परिव्राजकांची धम्मदीक्षा

## १. सारनाथ येथे आगमन

१. आपल्या धम्माचा उपदेश करण्याचे ठरविल्यानंतर बुद्धाने स्वत:लाच विचारले की, "सर्वप्रथम मी धम्मोपदेश कुणाला देऊ?" त्याला आलारकालाम याची आठवण झाली. बुद्धाच्या मते तो विद्वान, शहाणा, बुद्धिमान व बराच शुद्धाचरणी होता. "त्यालाच मी प्रथम धम्मोपदेश दिला तर ?" परंतु आलारकाम मृत्यु पावल्याचे त्याला सांगण्यात आले.

२. नंतर त्याने उद्दक रामपुत्ताला आपला धम्मोपदेश देण्याचा विचार केला. परंतु तोही मृत्यु पावला होता.

३. त्यानंतर त्याने आपल्या जुन्या पाच सोबत्यांचा विचार केला. निरंजना नदीच्या काठी त्याने उग्र तपश्चर्या चालविली असताना ते त्याच्या बरोबर होते आणि त्याने तपश्चर्येचा त्याग केल्यामुळे रागावून ते त्याला सोडून गेले होते.

४. तो स्वत:शीच म्हणाला, "त्यांनी माझ्यासाठी पुष्कळच केले. त्यांनी माझी सेवा केली. त्यांनी माझी पुष्कळ काळजी घेतली. मग मी त्यांनाच माझ्या धम्माचा उपदेश प्रथम दिला तर काय हरकत आहे?"

५. त्याने त्यांच्या ठावठिकाण्याची चौकशी केली. तेव्हा त्याला समजले की, ते सारनाथला इसिपतनच्या मृगदायवनात राहात आहेत. तेव्हा तो त्यांच्या शोधार्थ तिकडे निघाला.

६. त्या पांच जणांनी जेव्हा बुद्ध येत असल्याचे पाहिले तेव्हा त्याचे स्वागत करावयाचे नाही असे त्यांनी ठरविले. त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, "मित्रांनो, हा श्रमण गौतम येत आहे. तपश्चर्येचा मार्ग सोडून देऊन हा समृद्धीच्या आणि चैनीच्या जीवनाकडे वळला होता. त्याने पाप केले आहे म्हणून आपण त्याचे स्वागत करता कामा नये, त्याला मान देण्यासाठी उभे राहता कामा नये, किंवा त्याचे भिक्षापात्र आणि चीवर आपण आपल्या हाती घेता कामा नये. आपण त्याच्यासाठी फक्त एक आसन बाजूला ठेवून देऊ. त्याची इच्छा असल्यास तो तेथे बसेल." सर्वांनी हे मान्य केले.

७. परंतु बुद्ध जेव्हा त्यांच्याजवळ आला तेव्हा ते पांच परिव्राजक आपल्या निश्चयानुसार वागू शकले नाहीत. बुद्धाच्या व्यक्तीमत्त्वाचा त्यांच्यावर इतका प्रभाव पडला की, ते आपल्या जागेवर उठून उभे राहिले. एकाने त्याचे पात्र घेतले, एकाने त्याचे चीवर सांभाळले. एकाने त्याच्यासाठी आसन तयार केले आणि एकाने त्याचे पाय धुण्यासाठी पाणी आणले.

८. खरोखर हे एका अप्रिय अतिथीचे असाधारण स्वागत होते.

९. अशाप्रकारे जे त्याचा उपहास करणार होते ते त्याची पूजा करू लागले.

## २. बुद्धाचे पहिले प्रवचन

१. परस्परांना अभिवादन करून कुशलक्षेम विचारल्यावर त्या पाच परिव्राजकांनी भगवान बुद्धाला विचारले, “तपश्चर्येवर तुमचा अजूनही विश्वास आहे काय?” बुद्धाने नकारात्मक उत्तर दिले.

२. बुद्ध म्हणाला, “जीवनाची आत्यंतिक अशी दोन टोके आहेत. एक सुखोपभोगाचे व दुसरे आत्मक्लेशाचे.”

३. “एक म्हणतो, खा, प्या, मजा करा. कारण उद्या आपण मरणारच आहोत. दुसरा म्हणतो, सर्व वासना मारून टाका. कारण त्या पुनर्जन्माचे मूळ आहेत.” हे दोन्ही मार्ग माणसाला न शोभण्यासारखे म्हणून त्याने ते नाकारले.

४. भगवान बुद्ध मध्यम मार्ग मानणारे होते - मज्जिमम पतिपद - मधला मार्ग, जो उपभोगाचाही मार्ग नाही आणि आत्मक्लेशाचाही नाही.

५. बुद्ध परिव्राजकांना म्हणाला, “माझ्या या प्रश्नाचे उत्तर द्या. जोपर्यंत तुमचे स्वत्व कार्यप्रवृत्त असते आणि त्याला ऐहिक व पारलौकिक भोगाची अभिलाषा असते तोपर्यंत सर्व आत्मक्लेश व्यर्थच नाहीत काय?” ते उत्तरले, “आपण म्हणता ते बरोबर आहे.”

६. “जर तुम्ही आत्मक्लेशाच्या मार्गाने आपला कामाग्नी शांत करू शकत नाही, तर आत्मक्लेशाचे दरिद्री जीवन जगून आपण स्वत:ला कसे काय जिंकू शकाल?” त्यानी उत्तर दिले, “आपण म्हणता ते बरोबर आहे.”

७. “जेव्हा तुम्ही स्वत:वर विजय मिळवू शकाल तेव्हाच फक्त तुम्ही कामतृष्णेपासून मुक्त होऊ शकाल. मग तुम्हाला ऐहिक सुखोपभोगाची इच्छा होणार नाही आणि नैसर्गिक गरजांच्या तृप्तीमुळे तुमच्यात मलीन विकार निर्माण होणार नाहीत. तुमच्या शारीरीक गरजेनुसार तुम्ही खा, प्या.”

८. “सर्व प्रकारची विषयासक्ती उत्तेजक असते. विषयासक्त मनुष्य कामवासनांचा गुलाम बनतो. सर्व प्रकारची सुखासक्ती अध:पतन करणारी व नीच कर्म असते. तथापि माझे तुम्हाला सांगणे असे की, जीवनाच्च्या स्वाभाविक गरजांची पूर्ती करणे ही वाईट गोष्ट नाही. शरीराचे आरोग्य राखणे हे आपले कर्तव्य आहे. नाहीतर तुम्ही तुमचे मन सुदृढ आणि स्वच्छ ठेवू शकणार नाही आणि प्रज्ञारूपी प्रदीपही प्रज्वलित राखू शकणार नाही.”

९. “हे परिव्राजक, ही गोष्ट समजून घ्यावी की, ही दोन अत्यंतिक टोके अशी आहेत की, माणसाने त्याचा कधीही अवलंब करू नये. एक टोक म्हणजे ज्या गोष्टीचे आकर्षण कामवासनेच्या तृष्णेमुळे होते, त्या गोष्टीत आणि विशेषत: विषयासक्तीत सतत डुंबत राहणे. तृप्ती मिळविण्याचा हा मार्ग अगदी हलक्या दर्जाचा, रानटीपणाचा, अयोग्य आणि हानिकारक आहे. दुसरे टोक म्हणजे तपश्चर्या किंवा आत्मक्लेश. हा मार्गही दु:खदायक, अयोग्य आणि हानिकारक आहे.”

१०. “ही दोन्ही आत्यंतिक टोके ज्यामुळे टाळता येतात असा एक मध्यम मार्ग आहे. ध्यानात ठेवा, मी त्याच मध्यम मार्गाची शिकवण देतो आहे.”

११. त्या पांच परिव्राजकांनी त्याचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकले. भगवान बुद्धाच्या मध्यम मार्गासंबंधी उत्तरादाखल काय बोलावे हे न समजल्यामुले त्यांनी त्याला विचारले की, “आपणाला आम्ही सोडून आल्यावर आपण काय काय केले?” तेव्हा आपण गयेला कसे गेलो, पिंपळाच्या झाडाखाली आपण चिंतन करीत कसे बसलो आणि चार आठवडे सतत चिंतन केल्यानंतर आपणास ज्ञानप्राप्ती झाल्यामुळे आपण नवा जीवनमार्ग कसा शोधून काढला हे सर्व भगवान बुद्धांनी त्याना सांगितले.

१२. हे ऐकल्यावर तो मार्ग कोणता हे जाणून घेण्यास ते परिव्राजक अधीर झाले आणि तो मार्ग स्पष्ट करून सांगण्याविषयी त्यांनी भगवान बुद्धाला प्रार्थना केली.

१३. भगवान बुद्धाने त्यांची विनंती मान्य केली.

१४. सुरुवातीलाच भगवान बुद्धाने त्यांना सांगितले की, आपला जो मार्ग  जो धम्म आहे त्याला ईश्वर आणि आत्मा यांच्याशी काहीही कर्तव्य नाही. त्याचा मरणोत्तर जीवनाशी कसलाही संबंध नाही. तसेच त्या धम्माचा कर्मकाण्डाशी काही संबंध नाही.

१५. माणुस आणि माणसाचे माणसाशी या जगातील नाते हा बुद्धाच्या धम्माचा केंद्रबिंदू आहे.

१६. बुद्धाने सांगितले की, आपल्या धम्माचे हे पहिले अधिष्ठान आहे.

१७. मनुष्यप्राणी दुःखात, दैन्यात आणि दारिद्र्यांत राहात आहे हे त्याचे दुसरे तत्व होय. हे सर्व जग दुःखाने भरले आहे, आणि जगातून हे दुःख नाहीसे करणे हा एकच धम्माचा उद्देश आहे. यापेक्षा धम्म म्हणजे दुसरे तिसरे काहीही नाही.

१८. दुःखाचे अस्तित्व मान्य करणे आणि ते नष्ट करण्याचा मार्ग दाखविणे हाच भगवान बुद्धाच्या धम्माचा पाया होय.

१९. हाच एक केवळ धम्माचा पाया होऊ शकतो आणि यावरच त्याचे समर्थन अवलंबून आहे. जो धर्म या प्राथमिक गोष्टीचा स्वीकार करीत नाही तो धर्मच नव्हे.

२०. "खरोखर, हे परिव्राजक हो! जगातील दुःख आणि त्या दुःखापासून मुक्तता करण्याचा उपाय हाच धम्माचा मुख्य प्रश्न आहे. हे ज्या श्रमणांना आणि ब्राम्हणांना (धर्मोपदेशकांना ) हे समजत नाही ते माझ्या मते, श्रमण आणि ब्राम्हण नव्हेतच. याच जीवनात धम्माचा खराखरा अर्थ काय आहे? स्वतःला श्रेष्ठ समजणार्यांना समजतच नाही."

२१. नंतर परिव्राजकांनी बुद्धाला विचारले, "दुःखाचे अस्तित्व मान्य करणे आणि दुःख नाहीसे करणे हाच जर आपल्या धम्माचा पाया असेल तर आपला धम्म दुःख कसे नाहीसे करतो सांगा."

२२. भगवान बुद्धाने सांगितले की, या धम्मानुसार जर प्रत्येकाने (१) पावित्र्याचा मार्ग अनुसरला, (२) सदाचरणाचा मार्ग स्वीकारला, आणि (३) शीलमार्गाचा अवलंब केला तर त्यामुळे या दुःखाचा निरोध होईल.

२३. आणि त्यांनी सांगितले की अशा धम्माचा आविष्कार आपण केला आहे.

## ३. भगवान बुद्धाचे पहिले प्रवचन--विशुद्धी मार्ग

१. परिव्राजकांनी नंतर भगवान बुद्धाला आपला धम्म समजावून सांगण्याची प्रार्थना केली.

२. भगवान बुद्धाने त्यांची विनंती आनंदाने मान्य केली.

३. त्याने पहिल्याप्रथम त्यांना विशुद्धी मार्ग समजावून सांगितला.

४. त्याने परिव्राजकांना सांगितले की, "ज्याला चांगला मनुष्य होण्याची इच्छा आहे त्याने जीवनाची तत्वे म्हणून काही तत्वे पाळली पाहिजेत, ही विशुद्धी मार्गाची शिकवण आहे."

५. "माझ्या विशुद्धीच्या मार्गानुसार चांगल्या जीवनाची पाच तत्वे आहेत: (१) कोणत्याही प्राण्याची हिंसा न करणे व त्याला इजा न करणे, (२) चोरी न करणे अर्थात् दुसर्याच्या मालकीची वस्तु न बळकावणे, (३) व्यभिचार न करणे, (४) असत्य न बोलणे, (५) मादक पेय ग्रहण न करणे."

६. "माझे असे म्हणणे आहे की, प्रत्येक माणसाने ही तत्वे मान्य करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण, प्रत्येक मनुष्य जे जे काही करतो त्याचे मूल्यमापन करण्यासाठी त्याच्यापाशी काही एक परिमापन असले पाहिजे की ज्याच्यामुळे तो आपल्या चांगल्या अथवा वाईट वर्तणुकीचे मोजमाप करू शकेल. आणि माझ्या शिकवणुकीप्रमाणे हीच पाच तत्वे किंवा शीले माणसाच्या चांगल्या अथवा वाईट कृतीचे मोजमाप करण्याचा मापदंड आहे.

७. "जगात सर्वत्र पतित लोक असतात. परंतु पतितांचे दोन वर्ग असतात; ज्यांच्यासमोर काही आदर्श आहे असे पतित आणि ज्यांच्यासमोर कोणताच आदर्श नाही असे पतित."

८. "ज्याच्यासमोर कोणताच आदर्श नाही, अशा पतिताला आपण पतित आहोत हेच कळत नाही. त्यामुळे तो नेहमीच पतित राहतो. याउलट ज्याच्यासमोर एखादा आदर्श आहे, असा पतित आपल्या पतितावस्थेतून वर येण्यासाठी प्रयत्न करीत असतो. कां? याचे उत्तर असे की, आपण पतित आहोत हे त्याला माहीत असते."

९. "मनुष्याचे जीवन नियमित करण्यासाठी त्याच्यासमोर एखादा आदर्श असणे आणि कोणताच आदर्श नसणे याच्यातील हा फरक आहे. महत्वाची गोष्ट माणसाचा अध:पात ही नसून त्या अवस्थेत मुक्त होण्याच्या आदर्शाचा अभाव हीच होय."

१०. "परिव्राजक, तुम्ही विचाराल की, जीवनाचा आदर्श म्हणून मान्य करण्यास हीच तत्वे योग्य का?"

११. "या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला स्वत:लाच सापडेल, जर तुम्ही स्वत:लाच असा प्रश्न केलात की, 'ही तत्वे व्यक्तीच्या हितासाठी आहेत काय?' किंवा 'ती सामाजिक हित साधणारी आहेत काय?'"

१२. "जर या प्रश्नांना तुमची उत्तरे होकारात्मक असतील तर माझ्या विशुद्धी मार्गाची तत्वे, जीवनाचा खरा आदर्श म्हणून मान्यता मिळविण्यास लायक आहेत, हेच त्यावरून सिद्ध होईल."

## ४. भगवान बुद्धाचे पहिले प्रवचन (चालू) --अष्टांगिक मार्ग किंवा सदाचाराचा मार्ग

१. नंतर भगवान बुद्धाने परिव्राजकांना अष्टांगिक मार्गाविषयी प्रवचन दिले. भगवान बुद्धाने सांगितले की, अष्टांगिक मार्गाचे आठ घटक आहेत.

२. अष्टांगिक मार्गाचे सर्वात पहिले महत्वाचे अग-सम्मा दिट्ठि (सम्यक् दृष्टी). याच्या स्पष्टीकरणाने भगवान बुद्धाने आपल्या प्रवचनास सुरुवात केली.

३. सम्यक् दृष्टीचे महत्व समजण्याकरिता भगवान बुद्ध परिव्राजकांना म्हणाला-

४. "परिव्राजक हो, जग ही एक अंधारकोठडी असून मनुष्य हा तिच्यातील एक कैदी आहे, हे तुम्ही लक्षात घेतले पाहिजे."

५. "ही अंधारकोठडी गडद अंधाराने भरलेली आहे. अंधार इतका आहे की, कैद्याला क्वचितच काही दिसू शकते. कैद्याला आपण कैदी आहोत हेही कळत नाही."

६. "दीर्घकाल अंधारात राहिल्यामुळे मनुष्य केवळ आंधळा होऊन राहिलेला आहे. इतकेच नाही तर ज्याला प्रकाश म्हणतात अशी एखादी वस्तु अस्तित्वात असू शकते याबद्दल त्याला शंका वाटते."

७. "मन हे एक असे साधन आहे की, ज्याच्यामुळे मनुष्याला प्रकाश मिळू शकतो."

८. "तथापि, या अंधारकोठडीतील कैद्यांच्या मनाची अशी अवस्था नाही की त्यांचे मन हे या बाबतीत एक साधन

ठरेल.”

९. “त्यांच्या मनाची अवस्था त्यांना केवळ दृष्टी असत्यामुळे, अंधारासारखी एक वस्तु अस्तित्वात आहे हे दाखविण्यापुरता अगदी थोडा प्रकाशच आत येऊ देते.”

१०. “अशा प्रकारे त्यांची आकलनशक्ती स्वभावत:च सदोष असते.”

११. “परंतु, परिव्राजक हो, या कैद्यांची स्थिती जितकी दिसते तितकी निराशाजनक नाही, हे लक्षात घ्या.”

१२. “कारण, माणसात इच्छाशक्ती या नावाची एक शक्ती असते. जेव्हा योग्य हेतू निर्माण होतात तेव्हा या इच्छाशक्तीला जागृत करता येते व तिला गती देता येते.”

१३. “कोणत्या दिशेने इच्छाशक्तीला गती द्यावी हे पाहण्याइतकाही जरी माणसाला प्रकाश मिळाला तरी तो मनुष्य अशा प्रकारे आपल्या इच्छाशक्तीला गतिमान करू शकेल की शेवटी त्याची इच्छाशक्ती त्याला बंधमुक्त करील.”

१४ “अशा प्रकारे मनुष्य जरी बंधनात असला तरी तो बंधमुक्त होऊ शकेल. शेवटी स्वातंत्र्याकडे नेणारी पावले टाकण्यास तो कोणत्याही क्षणी सुरुवात करील.”

१५. “आपणाला पाहिजे त्या दिशेने जाण्यासाठी आपल्या मनाला आपण वळण लावू शकतो, हे याचे कारण होय. मन हेच आपल्याला जीवनाच्या कारागृहात बंदिवान करीत असते आणि तेच आपल्याला तेथे डांबून ठेवते.”

१६. “पण मन जी गोष्ट निर्माण करते ती ते नष्टही करू शकते. जर मनाने माणसाला बंधनात टाकले असेल तर तेच मन योग्य दिशेने वळविल्यास त्याला बंधमुक्तही करू शकते.”

१७. “सम्यक् दृष्टी जे करू शकते ते हेच होय.”

१८. “सम्यक् दृष्टीचा अंतिम उद्देश काय आहे?” परिव्राजकांनी विचारले. भगवान बुद्धाने उत्तर दिले, “अविद्येचा विनाश हाच सम्यक् दृष्टीचा उद्देश आहे. सम्यक दृष्टी ही मिथ्या दृष्टीच्या अगदी उलट आहे.”

१९. “मनुष्याला दु:खाचे अस्तित्व आणि दु:खनिरोधाचा उपाय ही उदात्त सत्ये न समजणे न्हणजेच अविद्या होय.”

२०. “सम्यक दृष्टीचा हेतु माणसाने कर्मकांडाच्या विधींना व्यर्थ समजणे आणि शास्त्रांच्या पावित्र्यावरील मिथ्या विश्वास टाकून देणे हा आहे.”

२१. “सम्यक् दृष्टीकरिता माणसाने अद्भुत कल्पनांचा त्याग केला पाहिजे. निसर्गनियमाविरुद्ध कोणतीही गोष्ट होऊ शकते ही गोष्ट माणसाने मानता कामा नये.”

२२. “ज्या सिद्धांतांना वास्तवतेचा किंवा अनुभवाचा आधार नाही व ते केवळ काल्पनिक अनुमाने आहेत ते सिद्धांत सम्यक् दृष्टीसाठी त्याज्य आहेत.”

२३. “स्वतंत्र मन आणि स्वतंत्र विचार हे सम्यक् दृष्टीसाठी आवश्यक आहेत.”

२४. “प्रत्येक माणसाला काही ध्येये, आकांक्षा आणि महत्वाकांक्षा असतात.अशी ध्येये, आकांक्षा आणि महत्वाकांक्षा ही उदात्त आणि प्रशंसनीय असावी. ती क्षुद्र आणि अयोग्य नसावी. हा ‘सम्यक् संकल्पा’ चा आशय आहे.”

२५. ‘सम्यक वाचा’ पुढील शिकवण देते-

(१) माणसाने जे सत्य असेल तेच बोलावे.

(२) असत्य बोलू नये.
(३) माणसाने दुसर्याविषयी वाईट बोलू नये.
(४) माणसाने दुसर्याची निंदानालस्ती करण्यापासून परावृत्त व्हावे.
(५) माणसाने आपल्या लोकांविषयी रागाची किंवा शिवीगाळीची भाषा वापरू नये.
(६) माणसाने सर्वांशी आपुलकीने व सौजन्याने बोलावे.
(७) माणसाने अर्थहीन मूर्खपणाची बडबड करू नये. त्याचे बोलणे समंजसपणाचे व मुद्देसूद असावे.

२६. “मी सांगितल्याप्रमाणे सम्यक् वाचेचे पालन करणे हे कोणाच्या भीतीमुळे किंवा पक्षपाताने होता कामा नये. सम्यक् वाचेमुळे काय तोटा होईल किंवा आपल्या कृतीविषयी आपल्या वरिष्ठाला काय वाटेल याचा सम्यक् वाचेशी यत्किंचितही संबंध असता कामा नये.”

२७. “वरिष्ठाची आज्ञा किंवा वैयक्तिक फायदा हे सम्यक् वाचेचे प्रमाण नाही.”

२८. “ ‘सम्यक् कर्मान्त’ हे योग्य वर्तनाची शिकवण देते. दुसर्यांच्या भावना आणि त्यांचे हक्क यांचा मान राखून प्रत्येक कृती करावी अशी याची शिकवण आहे.”

२९. “सम्यक् कर्मान्ताचे प्रमाण कोणते? जीवनाच्या मूलभूत नियमांशी सुसंगत असे वर्तन, हे त्याचे प्रमाण होय.”

३०. “एखाद्याचे वर्तन ज्या वेळी या नियमांशी सुसंगत असते त्या वेळी ते सम्यक् कर्मान्ताशी सुसंगत आहे असे समजावे.”

३१. “प्रत्येक व्यक्तीला आपला चरितार्थ चालवावयाचा असतो. परंतु चरितार्थाचे अनेक मार्ग आहेत. काही वाईट आहेत, काही चांगले आहेत. ज्यांच्यामुळे इतरांची हानी होते किंवा इतरांच्यावर अन्याय होतो ते वाईट मार्ग होत. दुसर्यांची हानी किंवा त्यांच्यावर अन्याय न करता जगण्यापुरते मिळविण्याचे जे मार्ग ते चांगले होत.याला 'सम्यक् आजीविका' म्हणतात.”

३२. “‘सम्यक् व्यायाम’ म्हणजे अविद्या नष्ट करण्याचा प्राथमिक प्रयत्न होय.अविद्या नष्ट करणे म्हणजे या दु:खदायक कारागृहातून बाहेर जाण्याच्या दारापर्यन्त पोहोचून पुढील मार्ग मोकळा करणे होय.”

३३. “सम्यक् व्यायामाचे चार हेतू असतात.”

३४. “अष्टांग मार्गाशी विरोधी अशा चित्तवृत्तीचा प्रतिरोध करणे हा एक हेतू होय.”

३५. “अशा प्रकारच्या ज्या चित्तवृत्ती अगोदरच उत्पन्न झाल्या असतील तर त्या दाबून टाकणे हा दुसरा हेतू होय.”

३६. “अष्टांग मार्गाला आवश्यक अशा चित्तवृत्ती उत्पन्न करण्यास माणसाला साहाय्य करणे हा तिसरा हेतू होय.”

३७. “अशा प्रकारच्या ज्या चित्तवृत्ती अगोदरच अस्तित्वात आल्या असतील त्यांची वाढ आणि विकास करणे हा चवथा हेतू होय.”

३८. “सम्यक् स्मृतीला जागरूकपणा व विचारीपणा यांची आवश्यकता असते.मनाची सतत जागृति हा त्याचा अर्थ होय. दुष्ट वासनांवर मनाचा पहारा ठेवणे हे सम्यक् स्मृतीचे दुसरे नाव होय.”

३९. “परिव्राजकहो, सम्यक् दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक् वाचा, सम्यक् कर्मान्त,सम्यक् आजीविका, सम्यक् व्यायाम आणि सम्यक् स्मृती प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करणार्या माणसांच्या मार्गावर पाच अडथळे किंवा बंधने असतात.”

४०. “लोभ, द्वेष, आळस व सुस्ती, संशय आणि अनिश्चय हे ते पाच अडथळे होत  म्हणून हे अडथळे दूर करणे आवश्यक आहे. हे अडथळे म्हणजे बंधनेच होत; आणि ते दूर करण्याचा मार्ग समाधी हा होय. परंतु परिव्राजकहो, सम्यक् समाधी म्हणजे समाधि नव्हे हे लक्षात घ्या. तिचे स्वरूप अगदी निराळे आहे.”

४१. “समाधी म्हणजे केवळ चित्ताची एकाग्रता. वरील पाच अडथळयांना अटकाव करणार्या स्वयंप्रेरित अशा ध्यानावस्थांच्या मार्गावर ती आपत्याला नेते यात शंका नाही.”

४२. “परंतु ह्या ध्यानाच्या अवस्था तात्पुरत्या असतात. त्यामुळे अडथळयांना केलेला अटकाव हा देखील तात्पुरताच ठरतो. मनाला स्थायी स्वरूपाचे वळण लावणे हे आवश्यक आहे. अशा प्रकारचे कायम स्वरूपाचे वळण केवळ सम्यक् समाधीनेच लावता येईल.”

४३. “समाधीमुळे अडथळयांना फक्त तात्पुरता अटकाव होतो म्हणून ती केवळ नकारात्मक स्थिती होय. तिच्यात मनाला वळण लावले जात नाही, सम्यक् समाधि ही वास्तवात्मक असते. ती मनाला एकाग्रतेचे आणि एकाग्रतेच्या काळात कुशल कर्माचा विचार करण्याचे  शिक्षण देते; आणि त्याला अनुसरूनच अडथळयामुळे निर्माण होणार्या अकुशल कर्माकडे आकर्षित होण्याची मनाची प्रवृत्तीही ती नष्ट करते.”

४४. “सम्यक् समाधी मनाला चांगल्या गोष्टींचा विचार करण्याची व चांगल्या गोष्टीचाच नेहमीच विचार करण्याची सवय लावते. सम्यक् समाधि चांगल्या कृति करण्यास आवश्यक अशीच प्रेरणा मनामध्ये निर्माण करीत असते.”

## ५. भगवान बुद्धाचे पहिले प्रवचन--शीलमार्ग ( चालू )

१. नंतर भगवान बुद्धाने परिव्राजकांना शीलमार्ग तथा सद्गुणांचा मार्ग समजावून सांगितला.

२. त्याने त्यांना सांगितले की, शीलमार्ग म्हणजे पुढील गुणांचे पालन करणे होय :-

(१) शील, (२) दान, (३) उपेक्षा, (४) नैष्क्रम्य, (५) वीर्य, (६) शान्ति, (७) सत्य, (८) अधिष्ठान, (९) करुणा आणि (१०) मैत्री.

३. या सद्गुणांचा अर्थ परिव्राजकांनी भगवान बुद्धाला विचारला.

४. त्यांची इच्छा पूर्ण करण्यासाठी भगवान बुद्ध म्हणाले -

५. “शील म्हणजे नीतिमत्ता, वाईट गोष्टी न करण्याकडे आणि चांगल्या गोष्टी करण्याकडे असलेला मनाचा कल. अपराध करण्याची लाज वाटणे, शिक्षेच्या भीतीने वाईट गोष्ट करण्याचे टाळणे महणजे शील. शील म्हणजे पापभीरुता.”

६. “नैष्क्रम्य म्हणजे ऐहिक सुखाचा त्याग.”

७. “स्वार्थाची किंवा परतफेडीची अपेक्षा न करता दुसर्यांच्या भल्यासाठी स्वत:ची मालमत्ता, रक्त आणि देह अर्पण करणे, इतकेच नव्हे तर प्राणत्याग करणे म्हणजेच दान होय.”

८. “वीर्य म्हणजे योग्य (सम्यक्) प्रयत्न. हाती घेतलेले काम यत्किंचितही माघार न घेता अंगी असलेल्या सर्व सामर्थ्यानिशी पूर्ण करणे म्हणजे वीर्य.”

९. “शांती म्हणजे क्षमाशीलता. द्वेषाने द्वेषाला उत्तर न देणे हे याचे सार होय. कारण द्वेषाने द्वेष शमत नाही. तो

क्षमाशीलतेनेच शांत होऊ शकतो."
१०. "सत्य म्हणजे खरे. माणसाने कधीही खोटे बोलता कामा नये. त्याचे भाषण हे सत्यच असले पाहिजे. ते सत्याखेरीज दुसरे काहीही असता कामा नये."
११. "अधिष्ठान म्हणजे ध्येय गाठण्याचा दृढ निश्चय."
१२. "करुणा म्हणजे सर्व मानवाविषयीची प्रेमपूर्ण दयाशीलता."
१३. "मैत्री म्हणजे सर्व प्राण्यांविषयी-मित्राविषयीच नव्हे तर शत्रूविषयीदेखील, मनुष्यप्राण्याविषयीच नव्हे तर सर्व जीवमात्राविषयी बंधुभाव बाळगणे."
१४. "उपेक्षा म्हणजे औदासीन्याहून निराळी अशी अलिप्तता, अनासक्ती,आवड किंवा नावड नसलेली ती एक मनाची स्थिती होय. फलप्राप्तीने विचलित न होणे; परंतु निरपेक्षतेने सतत प्रयत्न करीत राहणे म्हणजेच उपेक्षा."
१५. "आपष्या कुवतीनुसार प्रत्येकाने या सद्गुणाचे पालन केले पाहिजे." म्हणूनच त्यांना पारमिता (पूर्णत्वाच्या अवस्था) असे म्हणतात."

## ६. भगवान बुद्धाचे पहिले प्रवचन (पूर्ण)

१. बुद्धाने आपला धम्म आणि त्यातील विषय समजावून सांगितल्यानंतर परिव्राजकांना विचारले :
२. " व्यक्तिगत शुद्धी हा जगातील चांगल्या गोष्टींचा पाया नाही काय?" त्यांनी उत्तर दिले, "आपण म्हणता ते बरोबर आहे!"
३. नंतर बुद्धाने विचारले, "लोभ, क्रोध, अज्ञान, प्राणहत्या, चौर्य, व्यभिचार आणि खोटे बोलणे यामुळे व्यक्तीगत शुद्धीचा पाया ढासळत नाही काय? या वाईट गोष्टीवर ताबा ठेवता यावा म्हणून व्यक्तीगत शुद्धीकरिता चारित्र्याचे सामर्थ्य वाढविणे आवश्यक नाही काय? माणसांमध्ये जर व्यक्तीगत शुद्धी नसेल तर तो चांगल्या गोष्टी करण्यास साधनभूत कसा होऊ शकेल?" आणि परिव्राजकांनी उत्तर दिले, "आपण म्हणता तसेच आहे."
४. "आणखी असे की, दुसर्यांना गुलाम करण्यात किंवा त्यांच्यावर सत्ता गाजविण्यात लोकांना हरकत का वाटत नाही? दुसर्याचे जीवन दुःखी करण्यात त्यांना काही का वाटत नाही? माणसे एकमेकाशी सदाचाराने वागत नाहीत हेच त्याचे कारण नव्हे काय?" आणि परिव्राजक उत्तरले, "बरोबर आहे."
५. "जवर प्रत्येकाने अष्टांग मार्गाचा-सम्यक दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक् वाचा, सम्यक आजीविका, सम्यक् कर्मान्त, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृती आणि सम्यक् समाधी, यांचा-थोडक्यात सदाचार मार्गाचा-अवलंब केला तर एक माणुस दुसर्या माणसावर करीत असलेला अन्याय आणि अमानुषपणा दूर होणार नाही काय?" त्यावर ते म्हणाले, "होय"
६. शील किंवा सद्गुणाच्या मार्गाचा उल्लेख करून बुद्धाने विचारले, "गरजू आणि गरीब लोकांचे दुःख नाहीसे करण्यासाठी आणि सर्व लोकांचे कल्याण करण्यासाठी दान आवश्यक नाही काय? जेथे दारिद्र्य आणि दुःख आहे तेथे तेथे लक्ष पुरवून ते दूर करण्यासाठी करुणा आवश्यक नाही काय? निस्वार्थपणे करावयाचा कार्यासाठी निष्काम भावाची आवश्यकता नाही काय? वैयक्तिक लाभ होत नसला तरीही सतत प्रयत्नशील राहण्यासाठी

उपेक्षा आवश्यक नाही काय?"

७. "माणसावर प्रेम करणे आवश्यक नाही काय?"? आणि ते म्हणाले, "होय."

८. "याच्याही पुढे जाऊन मी म्हणतो, केवळ प्रेम करणे पुरेसे नाही. खरी आवश्यकता आहे ती मैत्रीची. ती प्रेमापेक्षा जास्त व्यापक आहे. केवळ मानवाविषयच नव्हे तर सर्व प्राणिमात्त्राविषयी बंधुभाव वाटणे हा मैत्रीचा अर्थ आहे. ती मानवापुरत्ती मर्यादित नाही. अशा प्रकारची मैत्री आवश्यक नाही काय? आपले मन नि:पक्षपाती, मोकळे, प्रत्येकावर प्रेम करणारे, आणि कुणाचाही द्वेष न करणारे असे असावे म्हणून आपणा स्वत:ला जो आनंद हवा असतो तोच आनंद सर्व प्राणिमात्रांना मैत्रीखेरीज यापेक्षा दुसर्या कशाने मिळू शकेल?"

९. ते सर्व म्हणाले, "होय."

१०. "परंतु या सर्व सद्गुणांच्या आचरणास प्रज्ञेची-बुद्धीची-जोड दिली पाहिजे."

११. बुद्धाने विचारले, "प्रज्ञा आवश्यक नाही काय? " परिव्राजकांनी काहीच उत्तर दिले नाही. आपल्या प्रश्नाचे उत्तर देणे त्यांना भाग पडण्यासाठी भगवान बुद्ध पुढे म्हणाले, "दुष्कर्म न करणे, वाईटाचा विचार न करणे, उपजीविकेसाठी कुमार्गाचा अवलंब न करणे आणि जे वाईट आहे किंवा दुसर्याला दु:ख देणारे आहे असे काहीही न बोलणे हे चांगल्या माणसाच्या अंगचे गुण होत." परिव्राजक म्हणाले, "होय, ते बरोवर आहे."

१२. "परंतु आंधळेपणाने सत्कृत्य करणे हे उचित आहे काय? "भगवान बुद्धाने विचारले, "मी म्हणतो 'नाही' हे पुरेसे नाही." भगबान बुद्ध परिव्राजकांस पुढे म्हणाले, "हेच जर पुरेसे होते, तर तान्हे मूल नेहमीच चांगली कृत्ये करते असे म्हणावे लागेल. कारण, तान्ह्या मुलाला शरीर म्हणजे काय हे कळत नसते. पाय झाडण्याखेरीज ते आपल्या शरीराने दुसरे कोणतेही वाईट कृत्य करू शकणार नाही. बोलणे म्हणजे काय हे त्याला कळत नाही. त्या अर्थी रडण्यापलीकडे अधिक वाईट असे ते काही वोलूच शकणार नाही. आनंदाने किंकाळ्या मारण्यापलीकडे विचार म्हणजे काय हे त्याला कळत नाही. उपजीविका म्हणजे काय हे त्याला कळत नाही; त्या अर्थी आईचे स्तन चोखण्यापलीकडे जगण्याचा दुसरा कोणताही वाईट मार्ग ते अवलंबू शकणार नाही."

१३. "प्रज्ञेच्या कसोटीला सद्गुणमार्ग उतरला पाहिजे. म्हणून समज आणि बुद्धी हेच प्रज्ञेचे दुसरे नाव आहे."

१४. "प्रज्ञा पारमिता ही इतकी महत्वाची व आवश्यक का आहे याचे दुसरेही एक कारण आहे. दान आवश्यक आहे. परंतु प्रज्ञेशिवाय दानाचा दुष्परिणाम होऊ शकतो. करुणेची आवश्यकता आहे. परंतु प्रज्ञेशिवाय करुणेचा परिणाम वाईट गोष्टींना आधार देण्यात होण्याचा संभव आहे. पारमितेची प्रत्येक कृती ही प्रज्ञा पारमिताच्या कसोटीला उतरली पाहिजे. शहाणपण हे प्रज्ञा पारमिताचे दुसरे नाव आहे."

१५. "माझे म्हणणे असे की, अकुशल कर्म कोणते आणि ते कसे घडून येते याचे ज्ञान आणि जाणीव असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कुशल कर्म कोणते याचे ज्ञान व जाणीव असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अकुलश कर्म कोणते आणि कुशल कर्म कोणते याचे देखील ज्ञान आणि जाणीव असली पाहिजे. अशा ज्ञानाशिवाय कृती चागली असूनही खरा चांगुलपणा असू शकणार नाही. म्हणूनच मी म्हणतो की, प्रज्ञा हा एक आवश्यक असा सद्गुण आहे."

१६. नंतर परिव्राजकांना पुढीलप्रमाणे आदेश देऊन भगवान बुद्धाने आपले प्रवचन संपविले.

१७. "माझा धम्म निराशावादी आहे असे तुम्ही म्हणण्याचा संभव आहे. कारण तो दु:खाच्या अस्तित्वाकडे मानवजातीचे लक्ष वेधितो. मी असे सांगतो की, माझ्या धम्माविषयीचा हा दृष्टिकोन चुकीचा ठरेल."

१८. "माझा धम्म दुःखाचे अस्तित्व मान्य करतो. यात शंका नाही; परंतु दुःखाचे निरसन करण्यावरही तो तितकाच जोर देतो हे विसरू नका."

१९. "माझा धम्मामध्ये मानवी जीवनाचा उद्देश आणि आशा या दोहोंचाही अंतर्भाव आहे."

२०. "माझ्या धम्माचा हेतू अविद्या नष्ट करणे हा आहे; अविद्या म्हणजे दुःखाच्या अस्तित्वाविषयीचे अज्ञान होय."

२१. "त्यात आशा आहे. कारण मानवी दुखाचा अंत करष्याचा मार्ग तो दाखवितो."

२२. "तुम्हाला हे म्हणणे मान्य आहे की नाही? " आणि परिव्राजक म्हणाले, "होय, आम्हाला मान्य आहे."

## ७. परिव्राजकांची प्रतिक्रिया

१. हा खरोखरच एक नवीन धम्म आहे याची परिव्राजकांना ताबडतोब जाणीव झाली. जीवनाच्या प्रश्नाकडे पाहण्याच्या या नव्या दृष्टीचा त्यांच्यावर इतका परिणाम झाला की, ते एकमताने म्हणाले, "जगाच्या इतिहासात आजपर्यंत मानवी दुःखाचे अस्तित्व मान्य करणे हाच धर्माचा खरा पाया आहे हे कोणत्याही धर्मसंस्थापकाने सांगितलेले नाही."

२. "जगाच्या इतिहासात कोणत्याही धर्मसंस्थापकाने या दुःखाचा परिहार करणे हा धर्माचा खरा उद्देश आहे हे सांगितलेले नाही."

३. "जगाच्या इतिहासात यापूर्वी मूलतःच इतका सरळ आणि साधा, अदभूतता आणि अतिमानुषी शक्तीपासून इतका मुक्त, आत्मा, ईश्वर आणि मरणोत्तर जीवन यापरील श्रद्धेपासून इतका स्वतंत्र, इतकेच नव्हे तर अशा श्रद्धेला विरोध असणारा मुक्तीचा मार्ग कधीही पुढे मांडण्यात आला नाही!"

४. "जगाच्या इतिहासात यापूर्वी कुणीही अशा धर्माची योजना पुढे मांडली नाही की, ज्यामध्ये दैवी साक्षात्काराला थारा नाही आणि ज्याच्या आज्ञा ह्या ईश्वराच्या आज्ञा नसून त्या माणसाच्या सामाजिक गरजांच्या चिकित्सेपोटी निर्माण झालेल्या आहेत!"

५. "जगाच्या इतिहासात मोक्ष हे असे सुखाचे वरदान आहे की, जे माणसाने स्वप्रयत्नाने व सदाचाराने वागुन याच जन्मात आणि याच पृथ्वीतलावर राहून प्राप्त करावयाचे असते, हा मोक्षाचा अर्थ यापूर्वी कुणीही सांगितला नाही!"

६. भगवान बुद्धाचा नव्या धम्माचे प्रवचन ऐकल्यावर परिव्राजकांनी अशा भावना व्यक्त केल्या.

७. जो अत्युच्य नैतिक भावनेने प्रेरित झालेला आहे आणि जो आपल्या काळातील बौद्धिक ज्ञानात तज्ञ आहे, जो एक नव्या विचारांचा प्रणेता आहे. याच जगात, याच जीवनात आत्मविकास व आत्मसंयमन यांच्या योगाने झालेल्या आंतरिक हृदयपरिवर्तनाने मुक्ती मिळू शकते, हे आपले तत्व विरोधी प्रवृत्तीची जाणीव असूनही बुद्धिपुरस्सर पुढे मांडण्याचे ज्याच्यात धैर्य आहे अशा भगवान बुद्धाच्या रूपाने एक सूमाजसुधारक लाभला आहे असे त्यांना वाटले.

८. भगवान बुद्धाविषयी त्यांचा आदर इतका अमर्याद झाला की, ते त्यास ताबडतोब शरण गेले आणि आपले शिष्य म्हणून आपला स्वीकार करावा अशी त्यांनी त्यास विनंती केली.

९. “एहि भिक्खवे” (भिक्खुंनो, या.) हा मंत्र उच्चारून भगवान बुद्धाने त्यांना आपल्या धम्मात प्रविष्ट करून घेतले. ते पंचवर्गीय भिक्खू म्हणून पुढे ओळखले जाऊ लागले.

# भाग तिसरा: उच्चकुलीन आणि पवित्र व्यक्तींची धम्मदीक्षा

## १. यशसची धम्मदीक्षा

१. वाराणशी नगरात यशस नावाचा एक राजपुत्र राहात होता. तो वयाने तरुण आणि दिसावयास अत्यंत देखणा होता. तो आपल्या आईवडिलांचा अत्यंत आवडता होता. त्याच्याजवळ विपुल संपत्ती होती. त्याच्याजवळ मोठा लवाजमा असून त्याचे अंत:पुरही मोठे होते. तो आपला सर्व वेळ फक्त नृत्य, मद्यपान आणि विलासात घालवी.

२. काही काळ लोटल्यानंतर त्या सर्वांची त्याला शिसारी आली या गर्तेतून कसे बाहेर पडावे? असल्या जिण्यापेक्षा जीवनाचा अधिक चांगला असा एखादा मार्ग आहे काय? काय करावे हे न कलल्यामुळे आपल्या पित्याचे घर सोडून जाण्याचे त्याने ठरविले.

३. एका रात्री त्याने पित्याचे घर सोडले आणि तो इकडे तिकडे भटकू लागला.फिरता फिरता तो ऋषिपतनाच्या दिशेने वळला.

४. थकवा आल्यावर तो खाली बसला आणि स्वत:शीच मोठंमोठ्याने म्हणू लागला; “मी कुठे आहे? यातून आता मार्ग कोणता? अरेरे! काय ही दुर्दशा! केवढे हे संकट!”

५. ज्या दिवशी तथागताने पंचवर्गीय भिक्खुंना ऋषिपतन येथे पहिले प्रवचन दिले त्याच दिवशी रात्री हा प्रकार घडला. यशस ऋषिपतनला येत असतानाच तेथे राहात असलेले तथागत भगवान बुद्ध पहाटे उठून उघड्या हवेत इकडून तिकडे फेर्या घालीत होते. आपल्या भावना व्यक्त करीत येणार्या त्या उमद्या तरुण यशसला भगवंतानी पाहिले.

६. आणि त्याचा तो नैराश्याचा आक्रोश ऐकून भगवंत म्हणाले, “काही दु:ख नाही की काही संकट नाही; ये, मी तुला मार्ग दाखवितो” आणि भगवंतानी त्याला आपल्या धम्माचा उपदेश दिला.

७. आणि यशसने जेव्हा तो उपदेश ऐकला तेन्हा तो हर्षभरित झाला. मग त्याने आपली सोनेरी पादत्राणे काढली व तो भगवंताच्या सन्निध जाऊन बसला आणि आदराने त्याने त्यांना वंदन केले.

८. भगवान बुद्धाचे शब्द ऐकून तथागतांनी शिष्य म्हणून आपला स्वीकार करावा अशी त्याने विनंती केली.

९. नंतर भगवंतांनी त्याला बोलावूनं भिक्खु होण्याविषयी सांगितले. यशसने ते मान्य केले.

१०. आपला पुत्र नाहीसा झाल्याचे समजल्यावर यशसच्या आईवडिलांना अत्यंत दु:ख झाले. पित्याने त्याचा शोध लावण्यास सुरुवात केली. ज्या ठिकाणी भगवंत आणि यशस भिक्खुच्या वेषात बसले होते त्या ठिकाणी यशसचा पिता आला आणि त्याने भगवंतांना विचारले, “भगवान, माझा मुलगा यशस याला आपण पाहिले काय?”

११. भगवंत म्हणाले, “महाराज, आत या; आपल्या पुत्राला आपण भेटू शकाल. “तो आत गेला आणि आपल्या पुत्राजवळ बसला; पण त्याने त्याला ओळखले नाही.

१२. यशस आपल्याला कसा भेटला आणि आपले प्रवचन ऐकल्यावर तो भिक्खु कसा झाला हे भगवंतांनी त्याला सांगितले, तेव्हा पित्याने पुत्राला ओळखले आणि आपल्या पुत्राने योग्य मार्ग स्वीकारल्याबद्दल त्याला फार आनंद

झाला.
१३. “बाळ यशस,” पिता म्हणाला, “तुझी आई शोकाने आणि दु:खाने व्याकुळ झाली आहे. घरी परत ये आणि आपल्या आईला पुन्हा सुखी कर.”
१४. नतर यशसने तथागताकडे पाहिले आणि तथागत यशसच्या पित्याला म्हणाले, “यशएने पुन्हा त्या संसारी जीवनात जावे आणि पूर्वीप्रमाणेच ऐहिक सुखाचा उपभोग घ्यावा अशी आपली इच्छा आहे काय?”
१५. आणि यशसच्या पित्याने उत्तर दिले, “जर माझा पुत्र यशस याला आपल्याबरोबर राहण्यात फायदा आहे असे वाटत असेल तर त्याला राहू द्या.” यशसने भिक्खु म्हणून राहणेच अधिक पसंत केले.
१६. निरोप घेण्यापूर्वी यशसचा पिता म्हणाला, “भगवान् तथागताने माझ्या घरी माझ्या कुटुंबियांसमवेत भोजन करण्यास समती द्यावी.”
१७. तथागतांनी आपली वस्त्रे परिधान करून भिक्षापात्र घेतले आणि यशसबरोबर ते त्याचा पित्याच्या घरी. गेले.
१८. तेथे पोहोचल्यावर यशसची आई आणि त्याची पूर्वायुष्यातील पत्नी यांना ते भेटले. भोजनानंतर तथागतांनी त्या कुटुंबातील सर्व मंडळींना आपल्या धम्माचा उपदेश दिला. तो ऐकून त्यांना फार आनंद झाला आणि त्यांनी त्या उपदेशाचे पालन करण्याचे वचन दिले.
१९. वाराणशीतील एका श्रीमंत कुटुंबात यशसचे चार मित्र होते. विमल,सुबाहु, पुण्यजित आणि गवांपती अशी त्यांची नावे होती.
२०. यशसने बुद्ध आणि त्यांचा धम्म याचा आश्रय घेतला आहे असे जेन्हा त्यांना समजले तेम्हा जे त्यांना यशसच्या हिताचे ते आपल्याही हिताचे आहे असे वाटले
२१. म्हणून ते यशसकडे गेले आणि आपले शिष्य म्हणून आपला स्वीकार करण्याविषयी त्याने भगवान बुद्धाला प्रार्थना करावी असे त्यांनी त्याला सांगितले.
२२. यशसने ते मान्य केले आणि भगवान बुद्धाकडे जाऊन तो म्हणाला, “तथागतांनी माझ्या या चार मित्रांना आपला धम्मोपदेश ददेण्याची कृपा करावी.” तथागतांनी ते मान्य केले आणि यशसच्या त्या मित्रांनी धम्मदीक्षा ग्रहण केली.

## २. काश्यप बंधूंची धम्मदीक्षा

१. वाराणशीमध्ये काश्यप या नावाचे एक कुटुंब राहात होते. या कुटुंबात तीन पुत्र होते. ते उच्च विद्याविभूषित असून कर्मठ धार्मिक जीवन जगत होते.
२. काही काळानंतर मोठ्या मुलाने संन्यास घेण्याचा विचार केला. त्याप्रमाणे त्याने घर सोडले व संन्यास घेतला, आणि उरुवेला येथे जाऊन त्याने आपला आश्रम स्थापन केला.
३. त्याच्या धाकट्या दोन भावांनी त्याचे अनुकरण केले आणि तेही संन्याशी बनले.
४. ते सगळे अग्निहोत्री किंवा अग्निपूजक होते. त्यांनी लांब केस ठेवले असल्यामुळे त्यांना जटिल असे म्हणत.
५. हे तीन भाऊ उरुवेला काश्यप, नदी काश्यप ( निरांजना नदीचा काश्यप ),आणि गया काश्यप ( गया या गावचा

काश्यप ), या नावाने ओळखले जात.

६. यांपैकी उरुवेला काश्यपाचे पांचशे जटिल अनुयायी होते; नदी काश्यपाचे तीनशे जटिल शिष्य होते; आणि गया काश्यपाचे दोनशे अनुयायी होते. उरुवेला काश्यप हा त्याचा प्रमुख होता.

७. उरुवेला काश्यपाची कीर्ती फार दूरवर पसरलेली होती. तो जीवनमुक्त असल्याचे मानले जात होते. लोक दूरदूरच्या ठिकाणाहून फल्गु नदीवरील त्याच्या आश्रमात येत असत.

८. उरुवेला काश्यपाचे नाव आणि कीर्ती ऐकल्यामुळे तथागतांनी त्याला उपदेश देण्याचा आणि शक्य झाल्यास त्याला आपल्या धम्माची दीक्षा देण्याचा विचार केला.

९. त्याच्या वास्तव्याच्या ठिकाणाची माहिती मिळाल्यावर तथागत उरुवेला येथे गेले.

१०. तथागतांनी त्याची भेट घेतली आणि त्याला उपदेश व दीक्षा देण्याची संधी मिळावी म्हणून ते म्हणाले, “काश्यप, जर तुमचा विरोध नसेल तर मला तुमच्या आश्रमात एक रात्र राहू द्या.”

११. काश्यप म्हणाला, “आपली विनंती मला मान्य नाही. या प्रदेशावर राज्य करणारा मुचलिंद नावाचा एक रानटी नागराजा आहे. तो भयंकर शक्तीमान आहे.अग्नीपूजा करणानर्या सर्व सन्याश्यांचा तो कट्टा शत्रू आहे. तो रात्री आश्रमात येतो आणि अतिशय त्रास देतो. तो मला जसा त्रास देईल तसाच तो आपणाला त्रास देईल असे मला वाटते.”

१२. नागलोक तथागतांचे मित्र आणि अनुयायी झाले आहेत हे काश्यपाला माहीत नव्हते, परंतु तथागतांना ते माहीत होते.

१३. म्हणून तथागत पुन्हा विनंती करीत म्हणाले, “तो मला त्रास देण्याची शक्यता नाही. काश्यप, कृपा करा आणि आपल्या अग्निशाळेत मला एक रात्र राहाण्यासाठी जागा द्या.”

१४. काश्यप अनेक अडचणी सांगू लागला आणि तथागत त्याला पुन्हा पुन्हा आग्रह करू लागले.

१५. नंतर काश्यप म्हणाला, “वाद करष्याची माझी इच्छा नाही. मला फक्त काहीशी भीती वाटते, इतकेच. तुम्ही तुमच्या इच्छेप्रमाणेच करू शकता.”

१६. तथागतांनी ताबडतोब अग्निशाळेत प्रवेश केला. व तेथे ते जाऊन बसले.

१७. नागराज मुचलिंद नेहमीच्या वेळी त्या खोलीत आला. परंतु काश्यपाऐवजी तथागत त्या ठिकाणी बसलेले त्याला दिसले.

१८. भगवंत बसलेले आहेत आणि त्यांच्या चेहर्यावर शांती आणि प्रसन्नता झळकत आहे हे पाहून मूचलिंदाला वाटले की, आपण एका महान विभूतीच्या सान्निध्यात आलो आहोत, आणि तो नतमस्तक होऊन त्यांची पूजा करू लागला.

१९. आपल्या अभ्यागताचे काय झाले असेल या काळजीने अस्वस्थ झाल्यामुलळे काश्यपाला त्या रात्री झोप आली नाही. बहुधा त्याला भस्मसात केले असेल या शंकेनेच तो भीत भीत उठला.

२०. नंतर उजाडल्यावर काश्यप आणि त्याचे एकूण एक अनुयायी काय घडले असावे हे पाहण्यासाठी आले. मुचलिंदाकडून भगवन्तांना काही दुःखापत झालेली तर त्यांना दिसली नाहीच, उलट मुचलिंद भगवन्ताची पूजा करीत असत्याचे त्यांना आढळले.

२१. ते दृश्य पाहुन काश्यपाला वाटले की, आपण एक महान चमत्कार पाहात आहोत.

२२. या चमत्काराचा परिणाम होऊन काश्यपाने तथागतांना आपल्याजवळ राहाण्याची आणि आश्रम स्थापन करण्याची विनंती केली. त्यांची काळजी घेण्याचे त्याने आश्वासन दिले.

२३. तथागतांनी तेथे राहाण्याचे मान्य केले.

२४. त्या दोघांचे हेतू निरनिराळे होते. काश्यपाचा हेतू मुचलिंद नागापासून आपणास संरक्षण मिळावे हा होता. तथागतांना वाटले की, एके दिवशी काश्यपाला आपला धम्मोपदेश देण्याची आपल्याला संधी लाभेल.

२५. पण काश्यपाने त्याविषयी काहीच अनुकूलता दाखविली नाही. तथागत केवळ चमत्कार करणारे आहेत, बाकी काही नाही, असे त्याला वाटले.

२६. एके दिवशी आपण स्वतःच त्या बाबतीत पुढाकार घ्यावा असे तथागतांना वाटले आणि त्यांनी काश्यपाला विचारले, "तुम्ही अर्हन्त आहात काय?"

२७. "जर तुम्ही अर्हन्त नसाल तर या अग्नीहोत्रामुळे तुमचे काय हित होणार आहे?"

२८. काश्यप म्हणाला, "अर्हन्त होणे म्हणजे काय हे मला माहीत नाही. आपण ते मला स्पष्ट करून सांगाल का?"

२९. नंतर भगवंत काश्यपाला म्हणाले, "अष्टांग मार्गापासून च्युत करणार्या सर्व वासनांना ज्याने जिंकले आहे तो अर्हन्त. अग्नीहोत्रामुळे मनुष्य पापमुक्त होऊ शकत नाही."

३०. काश्यप हा एक अहंमन्य पुरुष होता. परंतु तथागताच्या विधानांतील सामर्थ्य त्याला जाणवले. प्रथम मनाची नम्रता व शालीनता व्यक्त करून आणि शेवटी खर्या धर्माला पात्र होण्याची तयारी करून त्याने हे मान्य केले की, जगद्वंद्य भगवंताच्या बुद्धिमत्तेशी आपल्या क्षुल्लक बुद्धिमत्तेची तुलना करता येणे शक्य नाही.

३१. आणि शेवटी खात्री पटल्यावर अत्यंत नम्रतेने भगवन्ताचा सिद्धांत मान्य करून उरुवेला काश्यप त्याचा अनुयायी झाला.

३२. गुरुला अनुसरून काश्यपाच्या अनुयायांनी तितक्याच नम्रतेने धम्माची शिकवण स्वीकारली. काश्यप आणि त्याचे अनुयायी यांना याप्रमाणे पूर्णपणे दीक्षा देण्यात आली.

३३. नंतर उरुवेला काश्यपाने आपल्या सर्व वस्तु आणि यज्ञपात्रे नदीत फेकून दिली. त्या सर्व वस्तु प्रवाहाच्या पृष्ठभागावरून तरंगत खाली वाहात गेल्या.

३४. प्रवाहाच्या खालच्या बाजूला राहात असलेल्या नदी काश्यप आणि गया काश्यप यांनी त्या वस्त्रादी सर्व वस्तू अस्ताव्यस्त स्थितीत प्रवाहातून वाहात येत असलेल्या पाहिल्या. तेव्हा ते म्हणाले, "या आपल्या बंधूच्या वस्तु आहेत; त्याने त्या का फेकून दिल्या? काही तरी असाधारण स्थित्यंतर घडले असावे." ते अतिशय दुःखी आणि अस्वस्थ झाले. ते दोघेही आपल्या पाचशे अनुयायांसह भावाला भेटण्यासाठी प्रवाहाच्या वरच्या बाजूला जाऊ लागले.

३५. त्याला आणि त्याच्या अनुयायांना श्रमण वेषात पाहून चमत्कारिक विचार त्यांच्या मनात आले आणि त्याच्या कारणांची त्यांनी चौकशी केली. बुद्धाच्या धम्माच्या दीक्षेची हकीकत उरुवेला काश्यपाने त्यांना सांगितली.

३६. "आपल्या भावाने जर असे केले आहे तर आपणही त्याचे अनुकरण करावे" असे ते म्हणाले.

३७. त्यांनी आपली इच्छा मोठ्या भावाजवळ प्रकट केली. नंतर त्या दोन भावांना त्यांच्या सर्व अनुयायांसह धम्म आणि अग्निहोत्र यांविषयी भगवन्ताचे तुलनात्मक प्रवचन ऐकण्याकरिता आणण्यात आले.

३८. त्या बंधुद्वयाला दिलेल्या प्रवचनात तथागत म्हणाले, "लाकडावर लाकूड घासल्यावर जसा अग्नि बाहेर पडतो तसा विचारांच्या गोंधळामुळे अग्नि निर्माण होतो,आणि अज्ञानाचा काला धूर वर येतो."
३१. "काम, क्रोध व अविज्ञा हे अग्नीप्रमाणे जगातील दुःखाला कारणीभूत होणार्या सर्व गोष्टींना भस्मसात् करतात."
४०. "एकदा हा मार्ग सापडला आणि काम, कोध व अविज्ञा यांचा नाश झाला की त्यांच्याबरोबरच नवी दृष्टी, ज्ञान आणि सदाचरण यांचा जन्म होतो."
४१. "म्हणून एकदा माणसाच्या अंतःकरणात पापाविषयी घृणा उत्पन्न झाली की तिच्यामुळे तृष्णा नाहीशी होते, आणि तृष्णा नाहीशी झाली की मनुष्य श्रमण बनतो."
४२. भगवान बुद्धाचे प्रवचन ऐकल्यानंतर त्या महर्षीचा, अग्नीपूजेविषयीचा आदर नष्ट झाला आणि बुद्धाचे शिष्य होण्याची त्यांनी इच्छा व्यक्त केली.
४३. काश्यपांची धम्मदीक्षा हा तथागतांचा महान विजय होता. कारण लोकांच्या मनावर त्यांचा जबरदस्त प्रभाव होता.

## ३. सारीपुत्त आणि मोग्गलान यांची धम्मदीक्षा

१. तथागत राजगृहांत राहात असताना तेथे संजय नावाचा एक प्रसिद्ध पुरुष राहात होता. सुमारे अडीचशे परिव्राजक त्याचे शिष्य म्हणून त्याच्याबरोबर राहात होते.
२. त्याच्या या शिष्यवर्गात सारीपुत्त आणि मोग्गलान या नावाचे दोन तरुण ब्राम्हण होते.
३. संजयाच्या उपदेशाने सारीपुत्त आणि मोग्गलान याचे समाधान झाले नव्हते आणि ते यापेक्षा चांगल्या तत्वज्ञानाच्या शोधात होते.
४. एके दिवशी सकाळी पंचवर्गीय भिक्खुंपैकी स्थविर अश्वजित आपले एक चीवर परिधान करून आणि भिक्षापात्र व दुसरे चीवर हाती घेऊन राजगृह नगरात भिक्षेसाठी आला.
५. अश्वजिताची धीर-गंभीर चालचलणूक पाहून सारीपुत्त चकित झाला. वंदनीय अश्वजितास पाहिल्यावर सारीपुत्त स्वतःशीच विचार करू लागला. "खरोखर हा पुरुष म्हणजे जगातील एक महान योग्यतेचा भिक्खू आहे. जर मी या भिक्खूकडे गेलो आणि, मित्रा, तू कुणामुळे हे वैराग्य प्राप्त करून घेतलेस? तुझा गुरु कोण? तू कोणता धम्म मानतोस, असे मी जर त्याला विचारले तर काय हरकत आहे?"
६. परंतु, मग सारीपुत्त मनाशी म्हणाला, "ह्या भिक्खुला हे विचारण्याची ही वेळ नव्हे. तो भिक्षेसाठी एका घराच्या आतल्या आवारात शिरला आहे. याचकांना उचित अशा पद्धतीने मी जर याच्या मागोमाग गेलो तर काय हरकत आहे?"
७. आणि राजगृहातील आपली भिक्षायात्रा संपविल्यावर वंदनीय अश्वजित मिळालेले अन्न घेऊन परत फिरला. नंतर ते ज्या ठिकाणी होते त्या ठिकाणी सारीपुत्त गेला. त्याच्यासमोर जाऊन त्याने त्याला अभिवादन केले आणि अदबीने त्याच्याशी बोलून तो त्याच्याजवळ उभा राहिला.
८. अश्वजिताच्या जवळ उभा राहून परिव्राजक सारीपुत्ताने त्याला विचारले, "मित्रा, आपली मुद्रा शांत आहे;

आपले रूप शुद्ध आणि तेजस्वी आहे. आपण कुणामुळे हे वैराग्य धारण केले आहे? आपला गुरु कोण? आपण कोणता धम्म मानता?

९. अश्वजित म्हणाला, “मित्रा, शाक्य कुळात जन्मलेला एक महान श्रमण आहे. त्याच्या नावाने मी ही परिव्रज्या धारण केली आहे. तोच माझा गुरु आहे, आणि त्याच्याच धम्माला मी अनुसरले आहे.”

१०. “वंदनीय महाराज, आपल्या गुरुचा कोणता सिद्धांत आहे आणि त्यांनी आपणाला कोणता उपदेश दिला आहे?”

११. “मित्रा, मी केवळ एक तरुण शिष्य आहे; मी नुकतीच दीक्षा घेतली आहे, आणि त्यांचा धम्म आणि त्यांचे शिष्यत्व मी नव्यानेच पत्करले आहे. मी तुला धम्माची तपशीलवार माहिती देऊ शकणार नाही. पण त्याचा अर्थ काय हे मी तुला थोडक्यात सांगेन.”

१२. नंतर प्ररिव्राजक सारीपुत्त स्थविर अश्वजितास म्हणाला, “ठीक आहे. आपणाला योग्य वाटेल त्याप्रमाणे विस्ताराने किंवा थोडक्यात सांगा. परंतु मला त्याचा अर्थ सांगा. मला फक्त त्याचा अर्थ हवा आहे. शब्दाचे अवडंबर कशाला?”

१३. नंतर अश्वजिताने सारीपुत्ताला भगवान बुद्धाच्या उपदेशाचा सारांश समजावून सांगितला. त्याने सारीपुत्ताचे संपूर्ण समाधान झाले.

१४. सारीपुत्त आणि मोग्गलान हे जरी सख्ये भाऊ नव्हते तरी ते सख्ख्या भावाप्रमाणे राहात असत. त्यांनी एकमेकांना तसे वचन दिले होते. ज्याला सत्य प्रथम सापडेल त्याने ते दुसन्याला सांगावे असे त्यांचे परस्परात ठरले होते.

१५. ठरल्याप्रमाणे मोग्गलान जेथे होता तेथे सारीपुत्त गेला. सारीपुत्ताला पाहून मोग्गलान म्हणाला, “मित्रा, तुझी मुद्रा शांत आहे. तुझे रूप शुद्ध आणि तेजस्वी आहे; सत्य तुला खरोखरच गवसले आहे काय?”

१६. “होय मित्रा, मला सत्याचे ज्ञान झाले आहे.” “मित्रा, ते ज्ञान तुला कसे झाले?” नंतर सारीपुत्ताने त्याला अश्वजिताबरोबर झालेल्या भेटीचा वृत्तांत सांगितला.

१७. नंतर मोग्गलान सारीपुत्ताला म्हणाला, “मिता, चल, आपण जाऊ आणि तथागताला भेटू. भगवान तथागतच आपले गुरु होतील.”

१८. सारीपुत्त उत्तरला, “मित्रा, हे अडीचशे परिव्राजक आपल्यामुळेच येथे राहात आहेत, आणि ते आपल्यालाच मानतात. त्यांचा निरोप घेण्यापूर्वी आपण त्यांना हे सांगू; मग त्यांना योग्य वाटेल त्याप्रमाणे ते करतील.”

१९. नंतर सारीपुत्त आणि मोग्गलान हे ते परिव्राजक जेथे होते त्या ठिकाणी गेले. त्यांच्या जवळ जाऊन ते त्यांना म्हणाले, “मित्रहो, आम्ही तथागत भगवान बुद्धांना शरण जाणार आहोत. तेच आमचे गुरु अहेत."

२०. ते उत्तरले, “महाराज, आम्ही आपल्यामुळेच येथे राहतो आणि आम्ही आपल्यालाच मानतो. महाराज, जर आपण त्या थोर महाश्रमणाच्या मार्गदर्शनानुसार पवित्र जीवन जगणार असाल तर आम्ही तोच मार्ग पत्करू.”

२१. नंतर सारीपुत्त आणि मोग्गलान जेथे संजय होता तेथे गेले. त्याच्याकडे जाऊन ते म्हणाले, “मित्रा, आम्ही भगवान बुद्धांना जाऊन मिळणार आहोत. तेच आमचे गुरु आहेत.”

२२. संजय उत्तरला, “छे, छे; मित्रांनो, जाऊ नका. आपण तिघेही ह्या सर्वांची काळजी घेऊ.”

२३. सारीपुत्त आणि मोग्गलान यांनी दुसर्यादा व तिसर्यादा हेच सांगितले आणि संजयने पूर्वीप्रमाणेच उत्तर दिले.

२४. नंतर अडीचशे परिव्राजकांना बरोबर घेऊन सारीपुत्त आणि मोग्गलान भगवान बुद्ध जेथे राहात होते त्या राजगृहातील वेळु-वनात गेले.
२५. सारीपुत्त आणि मोग्गलान दुरूनच येत असताना तथागताने पाहिले. त्यांना पाहून ते भिक्खूंना म्हणाले,”'ते पाहा, भिक्खूहो, दोन सोबती येत आहेत.” सारीपुत्त आणि मोग्गलान यांच्याकडे बोट दाखवून ते म्हणाले, “हे दोघे माझ्या श्रावकांपैकी प्रमुख आणि श्रेष्ठ शिष्यद्वय होतील.”
२६. वेळु-वनात पोहोचल्यावर जेथे भगवान बुद्ध होते तेथे ते गेले. त्यांच्यासमोर जाऊन त्यांनी त्यांना साष्टांग प्रणिपात केला आणि आपले मस्तक भगवंताच्या चरणांवर ठेवून ते भगवन्तास म्हणाले, “भगवन्तांनी आम्हाला दीक्षा द्यावी.”
२७. नंतर “एहि भिक्खवें” (भिक्खूंनो, या) हा मंत्र भगवन्तांनी उच्चारला आणि सारीपुत्त, मोग्गलान आणि अडीचशे जटिल बुद्धाचे शिष्य झाले.

## ४. राजा बिंबिसाराची धम्मदीक्षा

१. राजगृह ही मगधराजश्रेणीय बिंबिसाराची राजधानी होती.
२. एवढया मोठ्या संख्येने जटिलांचे दीक्षान्तर झाल्याचे ऐकून शहरातील प्रत्येक जण भगवान बुद्धाविषयी चर्चा करू लागला.
३. अशा प्रकारे राजा बिंबिसाराला भगवान बुद्ध शहरात आल्याचे कळले.
४. राजा बिंबिसाराने मनात विचार केला, “अत्यंत सनातनी आणि दुराग्रही अशा जटिलांना दीक्षांतर करावयास लावणे ही साधी गोष्ट- नव्हे. निश्चित तो अर्हत आणि सम्यक् सम्बुद्धच असला पाहिजे. तो विद्वान्, सद्वर्तनी, जगाचे संपूर्ण ज्ञान झालेला, यात्रिक लोकांना मार्गदर्शन करणारा सर्वश्रेष्ठ पुरुष, आणि देव व मानव यांचा गुरु असला पाहिजे. जे सत्य त्याला स्वतःला समजले आहे अशाच सत्याचा उपदेश तो करीत असला पाहिजे.
५. “ज्याचा आदी, मध्य आणि अंत कल्याणकारक आहे, ज्याचा आशय आणि शब्द हे दोन्ही अत्यंत सुंदर आहेत, असाच धम्म तो शिकवीत असला पाहिजे. संपूर्ण निर्दोष, शुद्ध आणि पवित्र जीवनाचाच तो प्रसार करीत असला पाहिजे. त्याच्या सारख्या माणसाचे दर्शन घेणे योग्य होय.”
६. म्हणून राजा बिंबिसार मगधातील द्वादश दशसहस्त्र ब्राम्हण आणि गुहस्थ यांच्यासह ज्या ठिकाणी भगवान बुद्ध होते तेथे गेला. भगवंताच्या समोर जाऊन त्यांना अभिवादन करून तो त्यांचाजवळ बसला. मगधातील ते दहा ब्राम्हण आणि गृहस्थ यांच्यापैकी देखील काहींनी तथागतास आदराने वंदन केले आणि त्यांच्याजवळ बसले. काहींनी तथागतास कुशलक्षेत्र विचारून त्याज्याजवळ जाऊन विनम्रपणे बसले. काही जण हात जोडून तथागतापुढे बसले. काहींनी तथागतास आपले नाव आणि गोत्र सांगून ते त्याच्याजवळ बसले. काही जण काही एक न बोलता जवळ बसले.
७. मगधातील त्या द्वादश दशसहस्त्र ब्राम्हणांनी आणि गृहस्थांनी भगवान बूद्धाच्या बरोबर आलेल्या भिक्खुंमध्ये उरुवेला काश्यपाला पाहिले. त्यांच्या मनात विचर आला, “हे कसे काय? हा थोर श्रमण उरुवेला काश्यपाचे अनुयायित्व पत्करून पवित्र जीवन अनुसरत आहे, की उरुवेला काश्यप ह्या थोर श्रमणाचे अनुयायित्व पत्करून

पवित्र जीवन जगत आहे?"

८. त्या सर्वांच्या मनात उद्भवलेला प्रश्न जाणून तथागत उरुवेला काश्यपाला म्हणाले, "हे उरुवेलवासी, तुला लोक महापुरुष म्हणतात. तुला असे काय आढळले की ज्यामुळे तू अग्नी-पूजा सोडून दिलीस? अग्नीहोत्राचा त्याग केलास, हे कसे काय घडले?"

९. काश्यपाने उत्तर दिले, "रूप, शब्द आणि रस यांनी युक्त असे पदार्थ आणि वासनाधीन स्त्रिया, या वस्तूंचीच यज्ञयागापासून प्राप्ती होऊ शकते. या वस्तू अशुद्ध आहेत हे मला समजल्यामुळेच मला यज्ञयाग आणि आहुती यात गोडी वाटली नाही."

१०. "पण तुमची हरकत नसेल तर हा विचार तुमच्या मनामध्ये कशामुळे आला ते सांगा."

११. नंतर उरुवेल काश्यप आपल्या आसनावरून उठला. आपले उत्तरीय वस्त्र त्याने एका खांद्यावर नीट ठेवले. भगवंतांच्या चरणी नतमस्तक होऊन त्याने साष्टांग प्रणिपात केला आणि भगवंतांना तो म्हणाला, "तथागत माझे गुरु आहेत, मी त्यांचा शिष्य आहे." तेव्हा मगधातील त्या ब्राह्मणांना आणि गृहस्थांना समजले की उरुवेल काश्यप हा या महाश्रमणाचे अनुयायित्व पत्करून पवित्र जीवन अनुसरत आहे."

१२. नंतर त्या द्वादश दशसहस्त्र ब्राह्मणांच्या आणि गृहस्थांच्या मनांत उद्भवलेला प्रश्न ओळखून भगवान बुद्धाने त्यांना आपला धम्माचा उपदेश दिला. एकही काळा डाग न पडलेल्या स्वच्छ वस्त्राला ज्याप्रमाणे रंग उत्तम चढतो, त्याप्रमाणे बिंबिसार ज्यांचा अधिपती आहे अशा त्या मगधवासीय हजारो ब्राम्हण गृहस्थांनी त्या शुद्ध आणि निष्कलंक धम्माचा रंग धारण केला. एक हजार लोकांनी तर आपण बुद्धाचे उपासक झाल्याची घोषणा केली.

१३. ते दृश्य पाहून, धम्म समजल्यावर व त्याचे आकलन झाल्यावर, अनिश्चितता नष्ट झाल्यावर, सर्व शंकांचे निरसन झाल्यावर, आणि पूर्ण ज्ञान प्राप्त झाल्यावर मगधराज श्रेणीय बिंबिसार भगवतांना म्हणाला, "भगवान्, पूर्वी मी राजपुत्र असताना माझ्या ज्या पाच इच्छा होत्या त्या आता पूर्ण झाल्या आहेत."

१४. भगवन्, पूर्वी मी राजपुत्र असताना माझ्या मनात विचार आला, मला राज्याभिषेक झाला तर काय बहार होईल ! भगवन्, ती माझी पहिली इच्छा होती, ती आता पूर्ण झाली आहे. आणि नंतर, एखादा अर्हत सम्यक्-सम्बुद्ध माझ्या राज्यात आला तर ती किती चांगली गोष्ट होईल ! ही माझी दुसरी इच्छा होती. हे भगवन्, ती आता पूर्ण झाली आहे. आणि त्या भगवंताची सेवा करणे मला शक्य झाले तर किती बरे होईल! ही माझी तिसरी इच्छा होती. आणि हे भगवन्, ती आता पूर्ण झाली आहे. आणि त्या भगवंताने मला आपला धम्म शिकवावा अशी माझी चवथी इच्छा होती. हे भगवन्, तीही आता पुरी झाली आहे. आणि त्या भगवंताचा धम्म मला कळावा अशी माझी पाचवी इच्छा होती. हे भगवन्, तीही आता पूर्ण झाली आहे. भगवन्, पूर्वी मी राजपुत्र असताना या अशा माझ्या पांच इच्छा होत्या.

१५. "आश्चर्य, हे भगवन् आश्चर्य जे विस्कळित झाले आहे त्याची घडी नीट बसवावी, किंवा जे गुप्त होते ते प्रकट करावे, किंवा वाट चुकलेल्याला मार्ग दाखवावा, किंवा ज्यांना डोळे आहेत त्यांना पाहता यावे म्हणून अंधारात दिवा आणावा त्याप्रमाणे भगवंतानी अनेक मार्गांनी धम्माची शिकवण दिली, हे केवढे आश्चर्य! भगवन्, भगवान बुद्धाला, या धम्माला, आणि त्याच्या भिक्खू संघाला मी शरण येत आहे. भगवंतांनी आजपासून मला आपला आजन्म शरणागत उपासक म्हणून माझा स्वीकार करावा."

## ५. अनाथपिंडकाची धम्मदीक्षा

१. सुदत्त. हा कोसल देशाची राजधानी श्रावस्ती येथील एक रहिवाशी होता. या देशात राजा प्रसेनजित् याचे राज्य होते. सुदत्त हा राजाचा कोषाध्यक्ष होता. गरिबांना उदार देणग्या देत असल्यामुळे सुदत्त हा अनाथपिंडक म्हणून ओळखला जात असे.

२. भगवान बुद्ध राजगृह येथे असताना आपल्या काही खाजगी कामानिमित्त अनाथपिंडक तेथे आला होता. राजगृह येथील ज्या व्यापारी संघाच्या श्रेष्ठीशी त्याचा बहिणीचा विवाह झाला होता त्याच्याकडेच तो उतरला होता.

३. तो आला त्या वेळी श्रेष्ठीकडे भगवान बुद्ध आणि त्यांचे भिक्खु यांच्यासाठी भोजनाची एवढ्या मोठ्या प्रमाणावर तयारी चालू असष्याचे त्याला आढळले, की येथे एखादा लग्नसमारंभ असावा किंवा राजाला आमंत्रण देण्यात आले असावे, असे त्याला वाटले

४. वस्तुस्थिती समजल्यावर भगवान बुद्धाच्या दर्शनासाठी तो अत्यंत उत्सुक झाला आणि तथागतास भेटण्यासाठी तो त्याच रात्री निघाला.

५. आणि तथागतांनी त्याच क्षणी त्थाच्या हृदयातील शुद्ध भाव ओलखून सांत्वनपर शब्दांनी त्यांनी त्याचे स्वागत केले. आसनस्थ झाल्यावर अनाथपिंडकाने एखाद्या धार्मिक विषयावर प्रवचन ऐकण्याची इच्छा व्यक्त केली.

६. तथागतानी त्याची इच्छा मान्य करून प्रश्न केला, "आपले जीवन कोण घडवितो? तो ईश्वर, वस्तुमात्राचा निर्माता आहे काय? जर तो निर्माता ईश्वर असता तर सर्व प्राणिमात्रांना आपल्या निर्मात्याच्या सत्तेच्या आधीन राहून निमूटपणे त्याच्यापुढ नमावे लागले असते. कुंभाराच्या हाताने घडविलेल्या मडक्याप्रमाणे त्यांची स्थिती झाली असती. जर ईश्वराने जग निर्माण केलेले असते तर दुःख, आपत्ती किंवा. पाप अशासारखी कोणतीच गोष्ट असायला नको होती. कारण चांगल्या आणि वाईट अशा दोन्हीही गोष्टींचा उद्भव त्याच्यापासूनच झाला पाहिजे. जर असे नसेल तर त्याच्याखेरीज दुसरे एखादे कारण असले पाहिजे आणि मग तो ईश्वर स्वयंभू असणे शक्य नाही. याप्रमाणे ईश्वरविषयक कल्पनांचा पाडाव होतो, हे तुमच्या लक्षात येईल."

७. "आणखी असे म्हटले जाते की, ब्रह्म हे जगत्कारण असू शकत नाही. बीपासून झाड होते त्याप्रमाणे आपल्या भोवतालच्या सर्व वस्तु कारणामुळे अस्तित्वात येतात. मग ब्रह्म हे सर्वच वस्तूंचे सारखेच कारण कसे असू शकेल? जर ते सर्वव्यापी असेल तर निश्चितपणे ते त्यांचा निर्माता होऊ शकत नाही."

८. "आणखी असे म्हटले जाते की, आत्मा हा निर्माता आहे. पण जर आत्मा हा निर्माता असेल तर त्याने सर्व वस्तु सुखकर का केल्या नाहीत? दुःख आणि सुख ही वास्तविक सत्य होत. ती आत्म्याने निर्माण केलेली असणे कसे शक्य आहे?"

९. "दुसरे असे की, निर्माता असा कोणी नाही. किंवा दैव असे काहीएक नाही, आणि कार्यकारणभावही नाही हे विधान तुम्ही मान्य केले तर आपली जीवने घडविण्याचा आणि साध्यानुसार साधने जुळवून घेण्याचे काय प्रयोजन?"

१० "म्हणून आमचे म्हणणे असे की, अस्तित्वात असलेल्या सर्व वस्तु या कारणाशिवाय अस्तित्वात आलेल्या

नाहीत. ईश्वर, ब्रह्म, आत्मा आणि कारणरहित असे दैव यांपैकी कोणीही निर्माता नाही; तर आपल्याच कृत्याचे बरेवाईट परिणाम होत असतात."

११. "सर्व विश्व 'प्रतीत्य-समुत्पाद' म्हणजे कार्यकारणभावाच्या सिद्धांतावर आधारलेले आहे. आणि जी कारणे क्रियाशील असतात ती अमानसिक नसतात. उदाहरणार्थ, पेला ज्या सुवर्णाचा केलेला असतो ते अंतर्बाह्य सुवर्णच असते."

१२. "म्हणून आपण ईश्वरपूजेच्या आणि त्याच्या प्रार्थनेच्या थोतांडाचा त्याग करु या. ज्यांच्यापासून काहीही फायदा नाही अशा गूढ गोष्टीविषयी निष्फळ कल्पना करीत बसून आपण स्वतःचेच नुकसान करून घेऊ नये. आत्मा आणि स्वार्थीपणा यांचा आपण त्याग करु या, आणि कुशल कर्म करु या, म्हणजे त्यांचे फळही आपणास चांगले मिळेल."

१३. अनाथपिंडक म्हणाला, "भगवतांनी जे सागितले त्यातील सत्य मला समजले, आणि आपले मन मोकळे करावे अशी माझी इच्छा आहे. माझे .बोलणे ऐकल्यावर मी काय करावे याविषयी भगवतांनी मला उपदेश करावा."

१४. "माझ्या आयुष्यांत मला खूप कामे आहेत आणि विपुल संपत्ती मिळविल्यामुळे मी चिंताग्रस्त झालो आहे. तरीही माझ्या कामांत मला आनंद वाटतो आणि मी त्यासाठी खूप परिश्रम करतो. माकझ्या पदरी पुष्कळ नोकर-चाकर आहेत. आणि माझ्या उद्योगधंद्याच्या यशावर त्यांचे जीवन अवलंबून आहे."

१५. "आपले शिष्य परिव्रज्येच्या सुखाची प्रशंसा करताना आणि जगातील अशांतीला दोष देत असताना मी ऐकले आहे. ते म्हणतात, तथागतांनी आपल्या राज्याचा आणि वारसा हक्काचा त्याग केला आहे आणि सदाचरणाचा मार्ग शोधून काढून निर्वाण कसे प्राप्त करावे याचे सबंध जगाला उदाहरण घालून दिले आहे,."

१६. "जे न्याय्य असेल ते करावे आणि आपल्या बांधवांना सुखी करावे याविषयी माझ्या मनाला उत्कंठा लागून राहिली आहे; म्हणून मला असे विचारायचे आहे की, माझी संपत्ती, माझे घर, माझा व्यापारउदीम याचा मी त्याग केलाच पाहिजे काय? आणि आपल्याप्रमाणे धार्मिक जीवनाचा आनंद मिळविण्यासाठी गृहहीन झाले पाहिजे काय?"

१७. आणि तथागत म्हणाले, "उदात्त आणि अष्टांग मार्गाने जो जातो त्या प्रत्येकाला धार्मिक जीवनाचा आनंद मिळतो. जो संपत्तीला चिकटून राहतो त्याने तिचे विष स्वतःच्या मनात पेरून घेण्यापेक्षा तिचा त्याग करणे अधिक चांगले. परंतु, जो संपत्तीला चिकटून राहात नाही आणि ती जवळ असूनसुद्धा तिचा उपयोग जो चांगल्या तर्‍हेने करतो तो आपल्या बांधवांना वरदान ठरेल."

१८. "माझे तुम्हांला असे सांगणे आहे की, तुमचा जो जीविनव्यवसाय आहे त्यातच तुम्ही रहा आणि परिश्रमपूर्वक आपल्या धंद्यात लक्ष द्या. जीवन, संपत्ती आणि सत्ता माणसाला गुलाम करीत नाहीत तर त्यांची. अभिलाषा त्यांना गुलाम करते."

१९. "'केवळ निष्क्रिय जिणे जगण्यासाठी जो भिक्खू संसारत्याग करतो त्याचा काहीही फायदा होत नाही. कारण आळसाचे जिणे घृणास्पद होय; निष्क्रियतेचा तिरस्कारच केला पाहिजे."

२० "'माणसाने गृहहीन व्हावे किंवा संसारत्यागाची आवश्यकता वाटल्याशिवाय त्याने संसारत्याग करावा असे तथागताचा धम्म सागत नाही. माणसाने स्वार्थाच्या भ्रमातून मुक्त व्हावे, आपले चित्त शुद्ध करावे,

सुखोपभोगाच्या तृष्णेचा त्याग करावा आणि सदाचरणाचे जीवन जगावे, असे तथागताचा धम्म सागतो."
२१. "आणि लोक काहीही करोत, कारागीर, व्यापारी किंवा राज्याचे अधिकारी म्हणून ते या जगात राहोत, किंवा संसारत्याग करून धार्मिक चिंतनात ते आपले आयुष्य घालवोत, मात्र आपल्या अंगीकृत कार्यात त्यांनी आपले अंतःकरण ओतले पाहिजे. त्यांनी मेहनती आणि उत्साही असले पाहिजे. पाण्यात वाढणार्या परंतु पाण्याचा स्पर्श न होणार्या कमलाप्रमाणे ते असतील; जीवनसंघर्षात कोणाचाही हेवा किंवा द्वेष करीत नसतील, आणि या जगात ते स्वार्थाचे नव्हे तर परमार्थाचे जीवन जगत असतील, तर आनंद, शांती आणि समाधान ही खात्रीने त्यांच्या मनात वास करतील."
२२. अनाथपिंडकाला सत्याचे हे दर्शन सर्वोत्कृष्ट, साधे आणि शहाणपणाचे असल्याचे दिसून आले.
२३. याप्रमाणे खर्या तत्वज्ञानात स्पथिर झाल्यामुळे त्याने भगवान बुद्धाच्या चरणाशी मस्तक नमविले, आणि हात जोडून त्याने त्यांना उपासकाच्या दीक्षेची विनंती केली.

## ६. राजा प्रसेनजित याची धम्मदीक्षा

१. नंतर, भगवान बुद्ध आल्याचे ऐकून राजा प्रसेनजित आपल्या राजेशाही इतमामासह जेतवन विहारात गेला. हात जोडून वंदन करीत तो म्हणाला,
२. "माझे हे क्षुद्र आणि अप्रसिद्ध राज्य खरोखर आज भाग्यवान झाले आहे.कारण आपल्यासारखा सत्याचा राजा, धर्मराज, जगन्नायक उपस्थित असताना या राज्यावर आपत्ती आणि संकटे कशी ओढवतील?"
३. "ज्या अर्थी आता मला आपल्या पवित्र चरणांचे दर्शन झाले आहे त्या अर्थी आपल्या धर्मामृताचे प्राशन करू द्या."
४. ऐहिक संपत्ती ही अनित्य आणि नाशवंत आहे, तर धर्मरूपी धन शाश्वत आणि अविनाशी आहे. ऐहिक जीवन जगणार्या राजाचेही जीवन दुःखी असते, परंतु पवित्र जीवन जगणार्या सामान्य माणसालाही मनःशाती लाभते."
५. सुखाची हाव आणि अभिलाषा ह्यांना कंटाळलेल्या राजाच्या मनाची स्थिती ओळखून आणि ही संधी योग्य आहे असे जाणून भगवंत म्हणाले,
६. "हीन स्थितीत जन्माला अलेल्या लोकांनी धर्मपरायण मनुष्य पाहिला तर त्यांना देखील त्याच्याबद्दल आदरभाव वाटतो; मग पूर्वपुण्याई लाभलेल्या अशा स्वतंत्र राजाला त्याच्याबद्दल किती आदर वाटत असेल?"
७. "आणि म्हणून मी माझा धम्म थोडक्यात समजावून सांगत असताना महाराजांनी माझे म्हणणे नीट लक्षपूर्वक ऐकावे व आत्मसात करावे."
८. "आपली बरीवाईट कृत्ये नेहमी छायेप्रमाणे आपला पाठपुरावा करतात."
९. "सर्वांत अधिक गरज कशाची असेल तर ती करुणामय हृदयाची!"
१०. "आपल्या प्रजाजनांना एकुलत्या एका मुलाप्रमाणे माना. त्यांच्यावर जुलूम करु नका; त्यांचा नाश करु नका, आपल्या शरीराचा प्रत्येक अवयव आपल्या ताब्यात ठेवा. कुमार्गाच्या विचारांचा त्याग करा व सन्मार्गाने जा, दुसर्यांना पायदळी तुडवून स्वतः उच्चपदी चढू नका. दुःखिताला सुख द्या आणि त्याला आपला मित्र माना."
११. "राजेशाही बडेजावास अधिक महत्व देऊ नका, किंवा तोंडपूजा करणार्यांची गोड शब्दांत केलेली स्तुती ऐकू

नका.”

१२. “तपश्चर्येने स्वतःला क्लेश करून घेण्यात काहीही लाभ नसतो. म्हणून धम्माचे चिंतन करा व सदाचरणाच्या नियमाचे महत्व ओळखा.”

१३. “दुःखाचे व अनिष्ट गोष्टींचे पर्वत आपल्याभोवती सर्वत्र उभे आहेत. आणि खर्या धम्माचा विचार केल्यानेच त्यातून आपली सुटका होऊ शकेल.”

१४. “मग अन्याय करण्यात काय फायदा आहे?”

१५. सर्व शहाणे लोक शारीरीक सुखोपभोगांची उपेक्षा करतात. ते कामवासनांचा तिरस्कार करतात आणि पवित्र जीवनाचा अवलंब करतात.

१६. “झाडाला आग लागली तर त्याच्यावर पक्षी कसे राहू शकतील? जिथे वासना असते तिथे सत्य राहू शकत नाही. हे ज्ञान ज्याला नाही तो विद्वान मनुष्य जरी ऋषी म्हणून त्याची स्तुती होत असली तरी तो अज्ञच समजला पाहिजे.”

१७. “ज्याला हे ज्ञान झाले आहे, त्यालाच प्रज्ञा प्राप्त होते. ही प्रज्ञा प्राप्त करून घेणे हा जीवनाचा एकमेव उद्देश आहे. तिच्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे जीवनाचे अपयशच होय.”

१८. “सर्व पंथांची शिकवण याच्यावरच केंद्रित झाली पाहिजे; कारण त्याच्याखेरीज ज्ञान अशक्य आहे.”

१९. “हे सत्य केवळ ऋषीमुनींच्यासाठी नाही. प्रत्येक मानव-प्राण्याशी त्याचा संबंध आहे. व्रतस्थ भिक्खु आणि कौटुंबिक जीवन जगणारा सामान्य मनुष्य यांच्यात या बाबतींत काहीही फरक नाही. ऋषींचीही अधोगती होऊ शकते, आणि सामान्य कुटुंबवत्सल माणसेही ऋषीपदाला पोहोचू शकतात.”

२० “कामवासनेच्या भरतीपासून सर्वांना सारखाच धोका असतो. सगळे जग त्या भरतीत वाहून जाते. जो तिच्या भोवर्यात सापडतो त्याची सुटका होत नाही. परंतु प्रज्ञा ही नौका आहे, आणि विचार हे तिचे सुकाणू आहे. धम्म तुम्हांला असा आदेश देतो की, तुमच्या या शत्रूपासून तुम्ही आपले संरक्षण करा.”

२१. “आपल्या कर्माचे परिणाम टाळणे आपल्याला अशक्य आहे, म्हणून आपण सत्कर्मेच करावीत.

२२. “आपल्या हातून दुष्कृत्ये होऊ नयेत म्हणून आपण आपले विचार तपासून पाहू या. कारण आपण जे पेरतो तेच आपणाला मिलते.”

२३. “प्रकाशातून अंधाराकडे आणि अंधारातून प्रकाशाकडे जाणारे मार्ग असतात. अंधारातून गडद अंधाराकडे आणि संधिप्रकाशातून अधिक उज्वल प्रकाशाकडे जाणारे मार्गही असतात. सूज्ञ मनुष्याला अधिक प्रकाश पाहिजे असतो, म्हणून तो प्रकाशाचाच उपयोग करील. तो अविरतपणे सत्य ज्ञानाच्या प्राप्तीसाठीच प्रगती करीत राहील.”

२४. “सद्वर्तनाने आणि बुद्धीचा उपयोग करून आपले खरे श्रेष्ठत्व दाखवा. ऐहिक वस्तूंच्या व्यर्थत्वाविषयी खोल विचार करा आणि जीवन चंचल आहे हे समजावून घ्या.”

२५. “मन उदात्त करा आणि निश्चित ध्येयावर निष्ठा असू द्या. सद्वर्तनाच्या राजधर्माच्या नियमांचे उल्लंघन करू नका, आणि तुमचा आनंद बाह्य वस्तूंवर अवलंबून न ठेवता तुमच्या स्वतःच्या मनावर अवलंबून ठेवा. असे कराल तर तुमची कीर्ती चिरकाल टिकेल.”

२६. भगवान बुद्धाची अमृतवाणी राजाने अत्यंत आदराने ऐकली आणि अंतःकरणात साठविली, आणि त्यांचा उपासक होण्याचे त्यांना वचन दिले.

## ७. जीवकाची धम्मदीक्षा

१. जीवक हा राजगृहातील शालवती नावाच्या वेश्येचा मुलगा होता.
२. अनौरस असल्यामुळे जन्मल्याबरोबरच ते मूल एका टोपलीत घालून मातीच्या ढिगावर टाकून देण्यात आले होते.
३. त्या मातीचा ढिगार्‍याजवळ बरेचसे लोक त्या मुलाकडे पाहात उभे राहिले होते. राजकुमार अभय त्या बाजूने जात होता. त्याने लोकांना विचारल्यावर त्यांनी सांगितले, “ते जिवंत आहे.”
४. म्हणून त्या मुलाला जीवक असे नाव मिळाले. अभयाने त्याला दत्तक घेतले आणि त्याचे पालनपोषण केले.
५. जीवक मोठा झाल्यावर आपण कसे वाचलो हे त्याला समजले आणि इतरांना वाचविण्याची तीव्र इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली.
६. म्हणून अभयाला न कळविता आणि त्याची संमती न घेताच तो तक्षशिला विद्यापीठात गेला आणि तेथे सात वर्षे त्याने वैद्यकीचा अभ्यास केला.
७. राजगृहाला परतल्यावर त्याने आपला वैद्यकीय व्यवसाय सुरू केला आणि थोड्याच काळात या व्यवसायात त्याने मोठे नाव कमाविले आणि कीर्ती मिळविली.
८. साकेत येथील एका श्रेष्ठीची बायको ही त्याला मिळालेला पहिला रोगी असून तिला बरी करण्याबद्दल त्याला सोळा हजार कार्षापण, एक गडी, एक मोलकरीण आणि एक घोडागाडी इतका मोबदला मिळाला.
९. त्याचा लौकिक ओळखून अभयाने त्याला राहाण्यासाठी आपल्या राजवाड्यातच जागा दिली.
१०. राजगृह येथे त्याने बिंबिसाराला त्रासदायक अशा भगंदर रोगापासून मुक्त केले; आणि त्यासाठी बिंबिसाराच्या पाचशे राण्यांचे सर्व अलंकार त्याला बक्षीस म्हणून मिळाले असे सांगतात.
११. जीवकाने उल्लेखनीय असे केलेले इतर काही उपचार म्हणजे राजगृहातील एका श्रेष्ठीवर केलेली कवटीची, आणि बनारस येथील एका श्रेष्ठीच्या मुलाला झालेल्या आतड्याच्या एका जुनाट रोगावरील शस्त्रक्रिया या होत.
१२. राजा आणि राजस्त्रिया यांचा राजवैद्य म्हणून जीवकाची नेमणूक झाली होती.
१३. परंतु जीवकाचा भगवान बुद्धाकडे फारच ओढा होता. त्यामुळे तो भगवंतांचा आणि त्यांच्या संघाचा वैद्य म्हणूनही काम करीत असे.
१४. तो भगवंताचा शिष्य झाला. तो आजारी आणि जखमी लोकांना उपचार करण्यास मोकळा राहावा म्हणून भगवंतांनी त्याला भिक्खूची दिक्षा दिली नाही.
१५. बिंबिसाराच्या मृत्यूनंतर जीवक त्याचा मुलगा अजातशत्रू याच्या पदरी राहिला; आणि अजातशत्रूने पितृवधाचा गुन्हा केल्यानंतर त्याला भगवंताकडे आणण्यास तोच कारणीभूत झाला.

## ८. रट्ठपालाचे धर्मांतर

१. एकदा बर्याचशा भिक्खूंसह कुरु देशात, भिक्षा मागीत फिरत असताना कुरुंची नगरी थुल्लकोठ्ठित येथे भगवंत राहिले.

२. कुरूंना हे समजल्यावर भगवंताचा आदर करण्यासाठी ते त्यांच्याकडे गेले.

३. ते बसल्यावर भगवंतांनी धम्मोपदेश केला. भगवंताचा उपदेश ऐकल्यावर थुल्लकोठ्ठीत येथील रहिवाशांच्या ब्राह्मण प्रमुखांनी भगवंताचे कृतज्ञतापूर्वक आभार मानले आणि वंदन करून ते निघून गेले.

४. त्यांच्यामध्ये तेथील एका प्रमुख घराण्यात जन्माला आलेला रट्ठपाल नावाचा एक तरुण होता. त्याच्या मनात विचार आला, "माझ्या समजुतीप्रमाणे भगवतांनी दिलेल्या उपदेशानुसार कौटुंबिक जीवन जगणार्या माणसाच्या दृष्टीने संपूर्ण शुद्ध आणि निर्दोष असे उच्च जीवन जगणे ही सोपी गोष्ट नाही."

५. "मी केस कापून टाकले, दाढी काढली, पीत वस्त्र धारण केले, गृहत्याग करून गृहहीन परिव्राजक झालो तर काय हरकत आहे ?"

६. ब्राह्मण फारसे दूर गेले नव्हते. अशा वेळी रट्ठपाल परत आला आणि भगवंतांना वंदन करून त्याने आपल्या मनातील विचार त्यांना सांगितला, आणि प्रवज्ज्या व उपसंपदा देऊन त्यांच्या संघात आपल्याला प्रवेश देण्याची त्याने विनंती केली.

७. भगवंतांनी विचारले, "असे करण्यास तुला तुझ्या मातापित्याची संमती आहे काय?"

८. "नाही, भगवन्."

९. "ज्यांना त्यांच्या मातापित्यांची सम्मती नाही त्यांना मी प्रवज्ज्या देत नाही."

१०. "महाराज, ती संमती मिळविण्याचा मी प्रयत्न करीन." तो तरुण मनुष्य म्हणाला आणि उठून मोठ्या आदराने भगवंताचा निरोप घेऊन तो आपत्या आई-वडिलांच्याकडे गेला. त्याने त्यांना आपले विचार सांगितले आणि भिक्खु होण्यासाठी त्यांची परवानगी मागितली.

११. आईवडिलांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिले, "बाबा रट्ठपाल, तू आमचा एकुलता एक मुलगा आहेस, आणि आमचा फार लाडका आहेस. तू सुखाने जगत आहेस आणि सुखातच वाढला आहेस. दुःखाचा तुला मुळीच अनुभव नाही. जा; खा,पी, मजा कर, आणि सुखाने सत्कृत्ये करीत राहा. आम्ही तुला संमती देत नाही."

१२. "तुझ्या मृत्यूने आम्ही अनाथ होऊ आणि आम्हाला हे जीवन सुखाचे वाटणार नाही; आमच्या जवळ असताना तू गृहत्याग करून भिक्खू व्हावेस याला आम्ही संमती का द्यावी ?"

१३. दुसर्यांदा आणि पुन्हा तिसर्यांदा रट्ठपालाने तीच विनंती केली, आणि त्याच्या आईवडिलांनी ती पुन्हा नाकारली.

१४. आईवडिलांची संमती न मिळाल्यामुळे, त्या तरुणाने उघड्या जमिनीवर लोळण घेतली आणि 'एक तर मी येथेच प्राण देईन, नाही तर भिक्खू तरी होईन' असे त्याने स्पष्ट सांगितले.

११. त्याला भिक्खू होण्यास विरोध दर्शवीत त्याचे आई-वडील त्याला उठून बसायला विनवणी करू लागले, पण तो तरुण मनुष्य एक शब्दही बोलला नाही. त्यांनी त्याला पुन्हा दोनदा-तीनदा विनवणी केली पण तरीही तो एक शब्दही बोलला नाही.

१६. म्हणून रट्ठपालाच्या आईवडिलांनी त्यांच्या मित्रांना भेटून सगळी हकीकत सांगितली आणि त्यांनी त्याला जे सांगितले होते तेच आग्रहपूर्वक त्याला सांगण्यास त्यांनी त्यांना सांगितले.

१७. त्याच्या मित्रांनी त्याला तीन वेळा विनंती केली पण तो एक शब्दही बोलला नाही. तेव्हा त्याचे मित्र त्याच्या आईवडिलांकडे आले आणि म्हणाले, "तिथेच उघड्या जमिनीवर पडून तो सांगत आहे की, 'मी एक तर मरून जाईन नाहीतर भिक्खु होईन. जर तुम्ही त्याला संमती दिली नाही तर तो कधीही जिवंत उठणार नाही.' पण तुम्ही संमती दिलीत तर तो भिक्खू झाल्यावर तुमच्या दृष्टीस तरी पडेल. जर भिक्खु होऊन राहाणे त्याला आवडले नाही तर तो दुसरे काय करू शकेल? तो येथेच परत येईल, म्हणून तुम्ही त्याला संमती द्या?"

१८. "ठीक, आम्ही संमती देतो, पण जेव्हा तो भिक्खू होईल तेव्हा त्याने इथे येऊन आमची भेट घेतली पाहिजे."

१९. रट्ठपालाचे मित्र त्याच्याकडे गेले आणि त्याच्या आईवडिलांनी संमती दिल्याचे त्यांनी त्याला सागितले. परंतु तो भिक्खू झाल्यानंतर त्याने त्यांना भेटण्यासाठी आले पाहिजे हेही त्यांनी सांगितले.

२०. तेव्हा तो उठला आणि थकवा दूर झाल्यावर तो भगवंताकडे गेला. त्यांना वंदन केल्यावर एका बाजूला बसून तो म्हणाला, "मी भिक्खु होण्याबद्दल आई-वडिलांची संमती मिळिवली आहे, मला संघात प्रवेश द्यावा अशी भगवंतांना माझी विनंती आहे."

२१. भगवंताच्या संघात त्याला प्रवेश देण्यात आला. थुल्लकोट्ठित येथे आवश्यक तितके दिवस राहून पंधरवड्यानंतर भगवान बुद्ध भिक्षा यात्रेसाठी श्रावस्तीस जावयास निघाले आणि त्या ठिकाणी अनाथ पिंडकाच्या सुखदायी जेतवनात त्यांनी वस्ती केली.

२२. ज्या आदर्शाच्या शोधासाठी तरुण लोक गृहत्याग करून गृहहीन भिक्कू होतात तो उपरतींच्या जीवनाचा सर्वश्रेष्ठ आदर्श भिक्खु रट्ठपालाला एकान्तवास, कष्ट, दृढता व नि:स्वार्थ यानी परिपूर्ण असे जीवन जगल्यावर लवकरच मिळाला.

२३. नंतर तो भगवंताकडे गेला आगि वंदन केल्यावर एका बाजूला बसून म्हणाला, "भगवंताच्या अनुज्ञेने आई-वडिलांना भेटावयास जाण्याची माझी इच्छा आहे."

२४. रट्ठपालाच्या मनातील विचारांची आपल्या मनात बारकाईने तपासणी करून आणि आपल्याला मिळालेल्या शिक्षणाचा त्याग करुन सामान्य माणसाचे खालच्या पातळीवरील जीवन जगण्याची इच्छा त्याला होणार नाही हे ओळखून भगवंतानी त्याला केव्हाही जाण्याची अनुज्ञा दिली.

२५. तेव्हा उठून अत्यंत आदराने भगवंताचा निरोप घेतल्यावर आपला बिछाना बाजूला ठेवून त्याने आपले चीवर व भिक्षापात्र घेतले आणि भिक्षा यात्रेसाठी तो थुल्ल-कोट्ठित येथे गेला. त्या ठिकाणी त्याने कुरुराजाच्या मृगवनात वस्ती केली.

२६. दुसर्या दिवशी सकाळी लवकरच चीवर-वस्त्र परिधान करून आणि भिक्षापात्र घेऊन तो भिक्षेसाठी नगरात गेला आणि तेथे भेदभाव न करता घरोघर फिरत असताना तो आपल्याच वडिलांच्या घरी आला.

२७. त्याचे वडिल घरातील दिवाणखान्यात आपले केस विचरीत होते. त्यांनी रट्ठपालास दुरून येत असताना पाहिले आणि ते म्हणाले, "या बैराग्याच्या कारट्यांनीच माझ्या एकुलत्या एक लाडक्या मुलाला भिक्खु करून टाकले."

२८. याप्रमाणे स्वत:च्या वडिलांच्याच घरी रट्ठपालाला काहीही मिळाले नाही; नुसता नकार तर नाहीच पण

शिव्या मात्र मिळाल्या.

२९. त्याच वेळी घरातील एक दासी आदल्या दिवशीचा शिळा भात फेकून देण्याच्या बेतात होती; तेव्हा रट्ठपाल तिला म्हणाला; "ताई, ते जर टाकून देणार असशील तर ते माझ्या या पात्रात घाल."

३०. त्याच्या भिक्षापात्रात भात घालीत असताना त्याचा आवाज, हात आणि पाय तिने ओळखले आणि सरळ मालकिणीकडे जाऊन मोठ्याने म्हणाली, "मालकीणबाई, धाकटे धनी परत आले आहेत."

३१. "तू म्हणतेस ते खरे असेल तर तू यापुढे दासी राहाणार नाहीस." आई म्हणाली आणि आपल्या मुलाच्या आगमनाची वार्ता ऐकल्याचे आपल्या पतीला सांगण्यासाठी घाईघाईने निघून गेली.

३२. कुंपणाजवळ बसून रट्ठपाल तो शिळा भात खात असतानाच त्याचा पिता तेथे येऊन उद्गारला, "बाळ, तू शिळा भात खात आहेस हे खरे आहे काय? तू आपल्या स्वतःच्या घरी का येत नाहीस?

३३. "गृहस्था, गृहत्याग करून गृहहीन बनलेल्या आम्हांला घर कसले? मी तुमच्या घरी आलो होतो; पण मला तेथे काहीही मिळाले नाही,नुसता नकारही मिलाला नाही. शिव्या मात्र मिळाल्या."

३४. "ये बाळ, आपण घरात जाऊ." "नको गृहस्था, आजचे माझे जेवण झाले आहे." रट्ठपाल म्हणाला.

३५. "ठीक आहे; पण बाळ, उद्या तुझे भोजन इथे करशील असे वचन दे."

३६. भिक्खु रट्ठपालने मौन धारण करून आपली संमती दिली.

३७. नंतर त्याचे वडील घरात गेले. तेथे त्यांनी सोन्यारुप्याच्या लगडी रचून त्यावर गालिचे अंथरण्याची आज्ञा दिली. पूर्वाश्रमीच्या रट्ठपालाच्या स्त्रिया असलेल्या आपल्या सुनांना आपल्या पतीला आवडत असलेला सर्व प्रकारचा साजशृंगार करण्यास सांगितले.

३८. रात्र संपल्यावर घरात भोजनासाठी उत्तम पदार्थ तयार करून ठेवण्याची आज्ञा त्याच्या पित्याने दिली. आणि तयारी झाल्यावर मुलाला कळविले. दुपार झाल्या बरोबर चीवरे परिधान करून आणि भिक्षापात्र घेऊन भिक्खू रट्ठपाल स्वतःसाठी ठेवलेल्या आसनावर येऊन बसला.

३१. नंतर त्या सोन्यारुप्याच्या राशीवरून गालीचे काढण्याची आज्ञा देऊन त्याचा पिता म्हणाला, " हे तुझे मातृधन आहे, ती तुझ्या पित्याची आणि ती तुझ्या पितामहाची संपत्ती आहे. आनंदाचा उपभोग आणि सत्कृत्ये या दोन्हीसाठी तुला भरपूर संपत्ती आहे."

४०. " ये बाळ, तुझी श्रमणचर्या सोडून दे. सामान्य माणसाच्या जीवनाचा पुन्हा अवलंब कर, भोग उपभोग आणि सत्कृत्ये कर."

४१. " गृहस्था, तुम्ही माझा सल्ला ऐका आणि या सगळ्या संपत्तीच्या राशी तुम्ही घेऊन जा आणि गंगा नदीत बुडवून टाका. का? कारण तिच्यामुळे तुम्हाला फक्त दुःख, शोक, संकटे, मानसिक व शारीरीक यातना आणि क्लेशच भोगावे लागतील."

४२. भिक्खू रट्ठपालाच्या पायांना मिठी मारून त्याच्या पूर्वाश्रमीच्या स्त्रिया त्याला विचारू लागल्या, " ज्यांच्यासाठी आपण हे उच्च जीवन जगत आहात त्या अप्सरा आहेत तरी कशा?"

४३. तो म्हणाला, " भगिनींनो कोणत्याही अप्सरांसाठी मी त्या जीवनाचा अवलंब केलेला नाही."

४४. आपल्याला त्याने भगिनी म्हटल्याचे ऐकल्याबरोबर त्या स्त्रिया मूर्च्छित होऊन जमिनीवर पडल्या.

४५. रट्ठपाल आपल्या पित्याला म्हणाला, "गृहस्था, मला अन्न द्यावयाचे असेल तर दे. मला त्रास देऊ नकोस."

४६. “ भोजन तयार आहे. बाळ, सुरुवात कर,”  पिता म्हणाला. आणि मुलगा पोटभर जेवेपर्यंत त्यांनी त्याला उत्तमोत्तम पदार्थांचे भोजन दिले.

४७. भोजन झाल्यावर कुरु  राज्याच्या मृगवनांत तो परतला आणि दुपारच्या भर उन्हात तो तेथे  एका झाडाखाली बसला.

४८. आपण पहायला येण्यापूर्वी ते वन स्वच्छ करून ठेवावे अशी राजाने त्याच्या पारध्याला आज्ञा दिली होती. आणि तो आज्ञाधारक शिकारी आपले काम करीत असताना तेथे एका झाडाखाली दुपारच्या भर उन्हात रट्ठपाल बसला असल्याचे  त्यानी पाहिले  आणि राजाला जाऊन बातमी दिली की, “ वन व्यवस्थित आहे. परंतु ज्याच्याविषयी महाराजांनी अनेक वेळा ऐकले आहे तो रट्ठपाल तेथेच एक झाडाखाली बसला आहे.”

४९. “आज वनाची काळजी करण्याचे कारण नाही.” राजा म्हणाला, “मी आज जाऊन त्या वंदनीय पुरुषाला भेटतो.”म्हणून प्रवासासाठी भोजनाची तयारी करण्याची आज्ञा देऊन तो रथात बसला आणि नगरातून राजेशाही मिरवणुकीने रट्ठपालाला भेटण्यासाठी निघाला.

५०. रथातून जिथपर्यंत जाता येईल तिथपर्यंत गेल्यावर राजा आपल्या परिवारासह पायी चालू लागला आणि रट्ठपालाकडे आला. परस्परांना अभिवादन केल्यावर राजाने उभे राहूनच रट्ठपालास एका पुष्पराशीवर बसण्याची विनंती केली.

५१. “नाही महाराज, आपण तेथे बसा. माझे हे आसन आहेच.”

५२. आसनस्थ झाल्यावर राजा म्हणाला, "रट्ठपाल, माणसाने चार हानी भोगाव्या लागतात. की, ज्याच्यामुळे तो आपल्या डोक्याचे व दाढीमिशांचे केस काढून टाकतो. पीतवस्त्रे धारण करतो आणि गृहत्याग करून गृहहीन होतो. त्या चार हानी म्हणजे (१ ) म्हातारपण (२ ) अनारोग्य (३ ) दारिद्रय (४ ) आणि नातलगांचा मृत्यू ह्या होत.”

५३. “समजा, एक बर्याच वयाचा म्हातारा मनुष्य आहे. वृद्धत्वामुळे थकलेला आणि मरणाच्या पंथास लागलेला आहे. आपली स्थिती तो ओळखतो आणि अधिक संपती मिळविण्यात किंवा मिळविलेल्या संपत्तीचा सदुपयोग करण्यातील अडचणींची त्याला जाणीव आहे, म्हणून तो परिव्राजक बनण्याचे ठरवितो. यालाच म्हातारपणाची हानी म्हणतात. परंतु तू तर भर ज्वानीत आहेस, तुझे केस काळेभोर असून वृद्धत्वाचा त्यांना स्पर्शही झालेला नाही. तू रूपयौवनसंपन्न आहेस. तुझा वृद्धत्वामुळे होणारा कोणताही तोटा झालेला नाही. मग तुला असे काय समजले किंवा तू असे काय पाहिलेस वा ऐकलेस की, ज्यामुळे तू गृहत्यागाचा मार्ग पत्करलास ?”

५४. “किंवा समजा की, रोगी यातना भोगणारा किंवा अतिशय आजारी असा मनुष्य आहे. तो आपली स्थिती ओळखतो आणि अधिक संपत्ती मिळविण्याकरिता किंवा मिळविलेल्या संपत्तीचा सदुपयोग करण्यातील अडचणीची त्याला जाणीव आहे. म्हणून तो परिव्राजक बनण्याचे ठरवितो. यालाच अनारोग्याची हानी म्हणतात. परंतु तू आजारी नाहीस की, यातनाही भोगीत नाहीस. तुझ्या नेमस्त प्रकृतीमुळे तुझी पचनशक्ती चांगली राहिली आहे; म्हणून अनारोग्यामुळे जो तोटा होतो तसा तुझा झालेला नाही. मग तुला असे काय समजले? किंवा तू असे काय पाहिलेस वा ऐकलेस की, ज्यामुळे तू गृहत्यागाचा मार्ग पत्करावा?”

५५. “किंवा तिसर्या एका माणसाचे उदाहरण घेऊ. श्रीमंत आणि वैभवशाली झाल्यानंतर आणि क्रमाक्रमाने ते वैभव गमावल्यानंतर तो आपली स्थिती ओळखतो. अधिक संपत्ती मिळविण्यातील किंवा मिळविलेल्या संपत्तीचा सदुपयोग करण्यातील अडचणीची त्याला जाणीव होते. म्हणून तो परिव्राजक होण्याचे  ठरवितो. याला

नातलगांच्या मृत्यूमुळे झालेला तोटा म्हणतात. परंतु तुला तर मित्र आणि नातलग खूप आहेत. नातलगांच्या मृत्यूमुळे जो तोटा होतो तसा सुझा तोटा झालेला नाही. मग तुला असे काय समजले किंवा यू काय पाहिलेस किंवा ऐकलेस की, ज्यामुळे गृहत्याग करण्याचा मार्ग तू पत्करलास?"

५६. रट्ठपाल उत्तरला, "महाराज, मी गृहत्याग करून गृहहीन झालो याचे कारण असे की, ज्ञानी आणि दार्शनिक सम्यक् सम्बुद्धांनी सांगितलेली चार तत्त्वे मी समजावून घेतली, पाहिली आणि ऐकली. ती चार तत्वे अशी-

( १ ) जग अनित्य असून सतत बदलत आहे.

( २ ) जगाला रक्षणकर्ता किंवा पालनकर्ता असा कोणीही नाही.

( ३ ) आपली कशावरही मालकी नाही, प्रत्येक वस्तु मागे ठेवूनच आपणाला गेले पाहिजे.

( ४ ) तृष्णेच्या आहारी गेल्यामुळे जगात दुःख आहे. आणि त्यामुळे जगात अनेक उणीवा असून ते सारखे धडपडत आहे."

५७. "विलक्षण! खरोखरच उत्कृष्ट!" राजा उद्गारला. " भगवंतांनी सांगितले ते किती बरोबर आहे!"

# भाग चवथा: घरचे निमंत्रण

## १. शुद्धोदनाची शेवटची भेट

१. सारिपुत्त आणि मोग्गलान यांच्या दीक्षेनंतर भगवान बुद्ध दोन महिने राजगृहात राहिले.
२. भगवंत राजगृहात रहात असल्याचे ऐकल्यावर शुद्धोदनाने निरोप पाठविला की, "मरणापूर्वी माझ्या मुलाला पाहण्याची माझी इच्छा आहे. त्याच्या उपदेशाचा फायदा इतरांना मिळाला परंतु त्याच्या पित्याला किंवा त्याच्या नातलगांना तो मिळाला नाही."
३. निरोप देणार्या दूताचे नाव कालुदायिन् असे असून तो शुद्धोदनाच्या एका दरबारातील मनुष्याचा मुलगा होता.
४. तेथे पोचल्यावर तो दूत म्हणाला, "जगद्वनदनीय तथागता, कमलपुष्प ज्याप्रमाणे सूर्योदयासाठी उत्सुक असते, त्याप्रमाणे आपले पिताजी आपली वाट पाहात आहेत."
५. तथागतांनी आपल्या पित्याची विनंती मान्य केली आणि आपल्या बर्याच शिष्यांसह ते पित्याच्या घरी जावयास निघाले.
६. भगवंत अधून मधून मुक्काम करीत चालले होते. परंतु ते येण्यासाठी निघाल्याची वार्ता शुद्धोदनाला सांगण्यासाठी कालुदायिन् पुढे निघून गेला.
७. लवकरच ही बातमी सर्व शाक्य जनपदात पसरली; "संबोधी प्राप्त करून घेण्यासाठी गृहत्याग केल्यावर गृहहीन होऊन फिरत असताना सिद्धार्थ आपला उद्देश सफल झाल्यामुळे कपिलवस्तुला आपल्या घरी परत येत आहे." ज्याच्या त्याच्या तोंडी हेच शब्द होते.
८. आपले नातलग आणि मंत्री यांच्यासह शुद्धोदन आणि महाप्रजापती ही दोघेही आपल्या पुत्राला भेटण्यासाठी निघाली. आपला मुलगा दुरूनच त्याना दिसला तेव्हा त्याचे सौंदर्य, गांभीर्य आणि तेज पाहून ते थक्क झाले आणि त्यांचे अंत:करण अत्यानंदाने भरून तो आनंद व्यक्त करण्यास त्याना शब्द सापडेनात.
९. हा खरोखरच त्यांचाच पुत्र होता. हेच ते सिद्धार्थाचे रूप ! तो महान श्रमण त्यांच्या हृदयाच्या किती जवळ होता आणि तरीही त्यांच्यातील अंतर किती दूर होते! तो मुनीश्रेष्ठ आता त्यांचा पुत्र सिद्धार्थ नव्हता. तो बुद्ध, भगवान, अर्हत, सत्यविद् आणि सगळया मानवजातीचा गुरु होता.
१०. आपल्या पुत्राचे धार्मिक श्रेष्ठत्व लक्षात घेऊन शुद्धोदन रथातून खाली उतरला आणि प्रथम त्याला वंदन करून म्हणाला, "आम्ही तुला पाहिल्याला आता सात वर्षे लोटली. या क्षणाची आम्ही किती आतुरतेने वाट पाहात होतो !"
११. नंतर भगवान बुद्ध आपल्या पित्यासमोर बसले. राजा आपल्या पुत्राकडे टक लावून पाहू लागला. त्याच्या नावाने त्याला हाक मारण्याची त्याची फार इच्छा होती. पण तसे धैर्य त्याला होईना. "सिद्धार्था," तो मनातल्या मनात उद्गारला, "सिद्धार्था, आपल्या पित्याकडे परत ये आणि पुन्हा त्याचा पुत्र हो !" परंतु आपल्या पुत्राचा निश्चय पाहून त्याने आपल्या भावना दाबून टाकल्या. तो आणि महाप्रजापती दोघेही उदास झाली.

१२. याप्रमाणे पिता आपल्या पुत्राच्या समोर बसला आणि दुःखात आनंद आणि आनंदात दुःख मानू लागला. त्याला आपल्या मुलाचा अभिमान वाटत होता. तरी पण आपला थोर पुत्र कधीही आपला वारस होणार नाही या कल्पनेमुळे त्याचा अभिमान लोप पावला.

१३. "मी तुला माझे राज्य देईन," राजा म्हणाला, "पण जर तुला ते दिले तर तू ते मातीमोल मानशील."

१४. आणि भगवन्त म्हणाले, " राजाचे अंतःकरण प्रेमाने भरलेले आहे व आपल्या पुत्राबद्दल त्याला अत्यंत दुःख होत आहे हे मी जाणतो. पण ज्या पुत्राला आपण मुकलात त्याच्याशी ज्या प्रेमबंधनानी आपल्याला जखडले आहे त्या बंधनांनी आपण स्वतःला सर्व मनुष्यमात्रांशी जखडून टाका. म्हणजे सिद्धार्थाच्या जागी आपल्याला त्याच्यापेक्षाही थोर पुत्र असल्याचे आढळून येईल. सत्य आणि सदाचार शिकविणारा पुत्र आपल्याला लाभेल आणि शांती व निर्वाण याचा प्रणेता आपल्या हृदयात प्रवेश करील."

१५. आपला पुत्र बुद्ध याची तो मधुर वाणी ऐकून शुद्धोदन आनंदाने बेहोष झाला आणि आपले हात घट्ट आवळून अश्रुपूर्ण नेत्रांनी तो उद्गारला, " हे अद्भुत परिवर्तन आहे! दुःखातिरेक आता नष्ट झाला आहे. प्रारंभी माले हृदय दुःखाने जड झाले होते; पण आता तुझ्या महान त्यागाचे फळ मला चाखावयास मिळत आहे. समर्थ अशा अनुकंपेने प्रेरित होऊन गेल्यामुळे आपले धर्मविषयक उदात्त असे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सत्तेची अभिलाषा तू सोडून द्यावीस हे योग्यच होते. मार्ग सापडल्यावर आता मुक्तीसाठी उत्सुक असलेल्या सर्वांना तू आपल्या धम्माची शिकवण देऊ शकशील."

१६. शुद्धोदन स्वगृही परतला आणि भगवान बुद्ध आपल्या शिष्यांसह वनातच राहिले.

१७. दुसर्या दिवशी सकाळी भगवंत आपले भिक्षापात्र घेऊन कपिलवस्तुमध्ये भिक्षेसाठी निघाले.

१८. त्या वेळी पुढील बातमी पसरली; "ज्या नगरातून सिद्धार्थ रथात बसून आपल्या सेवकांसह जात असे त्याच नगरात तो आता भिक्षा मागण्यासाठी घरोघर फिरत आहे. त्याने लाल मातीच्या रंगाचे चीवर परिधान केले असून त्याच्या हातात मातीचे एक भिक्षापात्र आहे!"

१९. ही विचित्र वार्ता ऐकून शुद्धोदन घाईघाईने गेला व भगवंताला म्हणाला, "तू माझ्या नावाला असा काळिमा का फासतोस? तुला आणि तुझ्या भिक्खुंना मी सहज अन्न पुरवू शकेन हे तुला माहीत नाही काय?"

२०. भगवन्त उत्तरले, "ही माझ्या संघाची प्रथा आहे."

२१. "पण हे कसे शक्य आहे ? अन्नासाठी भिक्षा मागणार्यांपैकी तू नाहीस."

२२. "होय पिताजी," भगवंत म्हणाले, "आपण राजाचे वंशज आहोत असे तुम्ही व तुमच्या वंशीयांनी वाटल्यास म्हणावे ; परंतु मी प्राचीन बुद्धांचा वंशज आहे. ते आपले अन्न भिक्षा मागून मिळवीत असत आणि भिक्षेवरच ते नेहमी आपला निर्वाह करीत असत."

२३. शुद्धोदन निरुत्तर झाला तेव्हा तथागत पुढे म्हणाले, "जेव्हा एखाद्याला गुप्त धन मिळते तेव्हा त्यातील मौल्यवान रत्नाची भेट त्याने पित्याला द्यावी अशी रीत आहे म्हणून माझ्या या धम्मरूपी धनाची भेट मला आपल्याला देऊ द्या."

२४. भगवंत पित्याला पुढे म्हणाले, "जर आपण आपल्या सुख स्वप्नांतून मुक्त व्हाल, आपले अंतःकरण सत्यासाठी उघडे कराल, आपण सदाचाराचा उत्साह बाळगाल आणि सत्धम्माचा मार्ग स्वीकाराल तर

आपल्याला शाश्वत असा आनंद लाभेल.”

२५. शुद्धोदनाने हे सर्व शांतपणे ऐकले व म्हटले, “बाळ ! तू जे म्हणतोस त्याप्रमाणे वागण्याचा मी प्रयत्न करीन.”

## २. यशोधरा व राहुल यांची भेट

१. शुद्धोदनाने तथागतांना आपल्या घरी आणले आणि घरच्या सर्व मंडळींनी त्याचे आदराने स्वागत केले.

२. पण राहुलची आई यशोधरा मात्र पुढे आली नाही. शुद्धोदनाने यशोधरेला बोलावणे पाठविले; परंतु ती म्हणाली “खरोखर, जर माझा काही मान ठेवावयाचा असेल तर सिद्धार्थ स्वतःच माझ्याकडे येतील आणि मला भेटतील.”

३. आपल्या सर्व नातलगांना व मित्रांना भेटल्यावर भगवन्तांनी विचारले, ‘यशोधरा कुठे आहे ?’ आणि तिने येण्याचे नाकारले हे समजल्यावर ते उठले आणि तडक तिच्या दालनात गेले.

४. आपले शिष्य सारिपुत्त आणि मोग्गलान यांना आपल्याबरोबर यशोधरेच्या दालनात येण्याची भगवन्तांनी आज्ञा दिली. ते त्यांना म्हणाले, “मी मुक्त आहे परंतु यशोधरा अद्याप मुक्त नाही. बरीच वर्षे मला पाहिले नसल्यामुळे ती अत्यंत दुःखी झाली आहे. तिचे दुःख हलके झाले नाही तर तिच्या मनाला यातना होतील. पवित्र तथागताला तिने स्पर्श केला तर तुम्ही तिच्या आड येऊ नये.”

५. यशोधरा आपल्या दालनात विचारमग्न स्थितीत बसली होती. भगवंतांनी प्रवेश केला तेव्हा काठोकाठ भरून वाहणार्या पाण्याच्या पात्राप्रमाणे ती इतकी प्रेमनिर्भर झाली की, तिला स्वत:ला सावरुन धरणे शक्य झाले नाही.

६. ज्याच्यावर आपण प्रेम केले तो पुरुष सत्याची शिकवण देणारा जगद्वंदनीय भगवान बुद्ध आहे हे विसरून तिने त्याचे पाय धरले आणि ती एकसारखी रडू लागली.

७. परंतु तेथे शुद्धोदन आहे याची आठवण झाल्यावर ती लज्जेने उठली आणि विनयाने थोड्या अंतरावर जाऊन बसली.

८. यशोधरेच्या वतीने क्षमा मागून शूद्धोदन म्हणाला, “हे तिचे वागणे तिच्या प्रेमातिशयामुळे असून ही काही क्षणिक भावनाविवशता नाही. पतिविरहाच्या सात वर्षाच्या काळात सिद्धार्थाने केशपवन केल्याचे तिने ऐकले तेव्हा तिनेही केशपवन केले. जेव्हा तिने ऐकले की, आपत्या पतीने सुगंधी द्रव्ये व अलंकार याचा त्याग केला आहे, तेव्हा तिनेही ती वापरण्याचे सोडून दिले. आपल्या पतीप्रमाणे ठराविक वेळीच मातीच्या पात्रातून ती अन्न सेवन करीत असते.”

९. “हे केवळ तात्पुरत्या भावनाविवशतेमुळे नसून ते तिच्या मनोधैर्याचे लक्षण होय.”

१०. भगवंतानी परिव्रज्या घेतली त्या वेळी यशोधरेने दाखविलेल्या महान धैर्याची व तिच्या अलौकिक महान गुणांची भगवंतानी प्रशंसा केली. ते बोधिसत्व असताना व मानवाचे सर्वश्रेष्ठ ध्येय जे बुद्धत्व ते प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील झाल्यावर, यशोधरेचे पावित्र्य, कोमलता आणि तिची भक्ती हे तिचे गुण त्याना अमोल व उपकारक ठरले होते. हे तिचे ‘कर्म’ होते आणि तिच्या थोर पुण्याचाच तो परिणाम होता.

११. तिचे दुःख शब्दातीत होते. आणि तिच्या जीवनातील उदात्त वृत्तीमुळे तिच्या आध्यात्मिक पुण्याईच्या कीर्तीत भर पडली होती आणि तिला अद्वितीय व्यक्तिमत्व प्राप्त झाले होते.

१२. नंतर यशोधरेने सात वर्षे वयाच्या राहुलाला राजकुमाराच्या वैभवाला साजेसे कपडे घातले आणि ती त्याला म्हणाली;

१३. "महान ब्रम्हाप्रमाणे दिसणारा तेजस्वी चेहर्याचा हा सत्पुरुष तुझा पिता आहे. मी अजूनही पाहिल्या नाहीत अशा द्रव्याचा मोठमोठ्या खाणी याच्याजवळ आहेत. त्याच्याकडे जा आणि ती संपत्ती तुझ्या ताब्यात देण्याविषयी त्याला विनंती कर. कारण पित्याची मालमत्ता वारसाहक्काने पुत्राकडेच आली पाहिजे."

१४. राहुल उत्तरला, "कोण माझा पिता? शूद्धोदनाखेरीज दुसरा पिता मला माहीत नाही."

१५. यशोधरेने मुलाला उचलून घेतले आणि तेथून जवळच भिक्खुंच्या बरोबर अन्न सेवन करीत असलेल्या भगवंताच्याकडे खिडकीखनू बोट दाखवून ती त्याला म्हणाली, "तो पहा तुझा पिता, तुझा पिता शुद्धोदन नव्हे."

१६. राहुल भगवंताकडे गेला आणि त्यांच्या चेहर्याकडे पाहुन निर्भयपणे आणि प्रेमाने म्हणाला,

१७. "आपण माझे पिता आहात ना ?" आणि त्यांच्याजवळ उभा राहून तो पुढे म्हणाला, "श्रमणा, आपली छायादेखील आनंदमय आहे!" भगवंत शांतच राहिले.

१८. भोजन आटोपल्यावर तथागतांनी त्याला आशीर्वाद दिला आणि ते राजवाड्यातून जाऊ लागले. परंतु राहुल त्यांच्या मागोमाग गेला आणि त्यांच्याकडे आपला वारसा मागू लागला.

१९. कोणीही त्याला अडविले नाही. स्वतः भगवंतानीही त्याला प्रतिबंध केला नाही.

२०. सारिपुत्ताकडे वळून भगवंत म्हणाले, "माझा पुत्र आपला वारसा मागतो आहे. चिंता आणि दुःख उत्पन्न करणारे नाशवंत असे धन मी त्याला देऊ शकत नाही. परंतु ज्याचा कधीही क्षय होणार नाही अशा पवित्र जीवनरूपी धनाचा वारसा मात्र मी त्याला देऊ शकेन."

२१. राहुलला उद्देशून अत्यंत आस्थेने तथागत म्हणाले, "सोने, रुपे आणि रत्ने यांपैकी माझ्याजवळ काहीही नाही, परंतु आध्यात्मिक धन स्वीकारण्यास तू तयार असशील आणि ते वाहून नेण्याइतका व जतन करून ठेवण्याइतका तू समर्थ असशील तर असले धन माझ्याकडे विपुल आहे. माझे आध्यात्मिक धन म्हणजे धम्माचा मार्ग. परमोच्च आनंदाच्या प्राप्तीसाठी मनाच्या संस्काराच्या साधनेला ज्यांनी आपले जीवन वाहिले आहे अशांचा संघात प्रवेश मिळावा अशी तुझी इच्छा आहे काय?"

२२. "होय," राहुलाने निश्चयपूर्वक उत्तर दिले.

२३. राहुल भिक्खुसंघात सामील झाल्याचे जेव्हा शुद्धोदनाने ऐकले तेव्हा त्याला अतिशय दुःख झाले.

## ३. शाक्यांनी केलेले स्वागत

१. भगवान बुद्ध शाक्य देशी परतले तेव्हा आपल्या देशबांधवांत दोन तट पडलेल त्यांना आढळून आले. एक त्यांच्या बाजूने होता व दुसरा त्याचा विरुद्ध होता.

२. मागे शाक्य व कोलिय यांच्यातील युद्धाच्या प्रश्नाबाबत जो वाद माजला होता आणि ज्यात त्यांनी फार महत्त्वाचा भाग घेतला होता, त्या वेळी शाक्य संघात झालेल्या मतभेदांची त्यांना आठवण झाली.

३. त्या वेळच्या त्यांच्या विरोधकांनी या वेळी सुद्धा त्यांना प्रणिपात करण्याचे किंवा त्यांचा मोठेपणा मान्य करण्याचे नाकारले. त्यांना अनुकूल असलेल्यांनी त्यांच्या अनुयायी वर्गात सामील होण्यासाठी प्रत्येक कुटुंबातून

एकेक मुलगा अर्पण करण्याचे अगोदरच ठरविले होते. त्यांनी आता भगवंताच्या संघात प्रवेश करण्याचे व ते राजगृहाला परततांना त्यांच्याबरोबर जाण्याचे ठरविले.

४. ज्या कुटुंबांनी एकेक मुलगा संघाला अर्पण करण्याचे ठरविले होते त्यात अमितोदनाचे कुटुंब होते.

५. अमितोदनाला दोन मुलगे होते. एकाचे नाव अनुरुद्ध. त्याला अगदी लाडात वाढविले होते. दुसर्याचे नाव होते महानाम.

६. महानाम अनुरुद्धाकडे जाऊन म्हणाला, "तू तरी संसारत्याग कर किंवा मी करतो." आणि अनुरुद्धाने उत्तर दिले. "माझी प्रकृती नाजूक आहे. कौटुंबिक जीवन सोडून गृहहीन अवस्थेत राहणे मला अशक्य आहे. म्हणून तूच तसे कर."

७. "परंतु प्रिय अनुरुद्धा, कौटुंबिक जीवनात कोणत्या गोष्टी घडत असतात ते मी तुला सांगतो ऐक. पहिल्या प्रथम तुला शेत नांगरावे लागेल. ते झाल्यावर पेरणी करावी लागेल. ते झाल्यावर तुला शेताला पाणी द्यावे लागेल. नंतर शेतातील पाण्याचा निचरा करावा लागेल. नंतर लावणी करावी लागेल. लावणीनंतर कापणी करावी लागेल. मग ते बाहेर न्यावे लागेल व त्याच्या जुड्या बांधाव्या लागतील. एवढे झाल्यावर त्याची मळणी करावी लागेल. मग पेंढा वेगळा करावा लागेल. नंतर त्यातील तूस काढून टाकावे लागेल. मग धान्य पाखडावे लागेल. नंतर ते कोठारात साठवून ठेवावे लागेल. आणि त्याच्या पुढल्या वर्षी पुन्हा या सगळ्याची पुनरावृत्ती करावी लागेल, आणि हे वर्षानुवर्षे असेच करावे लागेल."

८. "हे काम कधीच संपत नाही, आपल्या श्रमांना कधी अंतच नसतो. काम कधी संपेल? श्रमाचा शेवट केव्हा होईल. आपल्या पंचेंद्रियांच्या सुखोपभोगांना न मुकता आपल्याला विश्रांती कशी मिळेल? प्रिय अनुरुद्धा, काम हे कधीच संपत नाही; आपल्या श्रमांना कधी अंतच नसतो."

९. "मग कौटुंबिक कर्तव्ये करण्याचा विचार तू कर. मीच कौटुंबिक जीवन सोडून गृहहीन अवस्थेत राहण्यास जातो," अनुरुद्ध म्हणाला.

१०. आणि शाक्य अनुरुद्ध आपल्या आईकडे जाऊन म्हणाला, "आई कौटुंबिक जीवन सोडून गृहहीन अवस्थेत राहाण्यास जाण्याची माझी इच्छा आहे. त्यासाठी मला परवानगी दे."

११. शाक्य अनुरुद्धाने याप्रमाणे म्हटल्यावर त्याची आई त्याला म्हणाली; "लाडक्या अनुरुद्धा, तुम्ही दोघे माझे लाडके पुत्र आहात आणि तुमच्यात कोणताही दोष मला दिसत नाही. माझ्या इच्छेविरुद्ध केवळ मृत्यूमुळे एके दिवशी तुमची व माझी ताटातूट होईल. परंतु मी जिवंत असताना तुम्ही कौटुंबिक जीवन सोडून गृहहीन अवस्थेत जावे याला मी कशी समती देऊ?"

१२. पुन्हा एकदा अनुरुद्धाने तीच विनंती केली आणि त्याला तेच उत्तर मिळाले. अनुरुद्धाने आपल्या आईला तिसर्यानदा तीच विनंती केली.

१३. त्या वेळी शाक्य राजा भद्दीय याची शाक्यांवर सत्ता होती आणि तो अनुरुद्धाचा मित्र होता. त्यामुळे राजा संसारत्याग करणार नाही असे वाटून ती अनुरुद्धाला म्हणाली, "लाडक्या अनुरुद्धा, जर राजा शाक्य भद्दीय याने संसारत्याग केला तर तूही त्याच्याबरोबर जा."

१४. नंतर अनुरुद्ध भद्दीयाकडे गेला आणि त्याला म्हणाला; "प्रिय मित्रा, माझ्या संसारत्यागात तुझ्यामुळे अडथळा येतो आहे."

१५. "मग प्रिय मित्रा, मी तो अडथळा दूर करतो. मी तुझ्याबरोबरच आहे. तुझ्या इच्छेप्रमाणे तू संसारत्याग कर."
१६. "प्रिय मित्रा, आपण दोघेही संसारत्याग करू या!"
१७. "प्रिय मित्रा, संसारत्याग करण्यास मी असमर्थ आहे. तू दुसरे काहीही करावयास मला सांगितलेस तरी मी ते करीन. हु एकटाच संसारत्याग, कर." भद्दीय म्हणाला.
१९. "प्रिय मित्रा, जर तू संसारत्याग केलास तरच मीही करावा असे आईने सांगितले आहे. आणि तूही आत्ताच म्हणालास की 'जर तुझ्या संसारत्यागात माझ्यामुळे अडथळा येत असेल तर तो अडथळा दूर करतो. मी देखील संसारत्यागास तुझ्या इच्छेप्रमाणे तुझ्याबरोबर आहे. म्हणून प्रिय मित्रा, आपण दोघेही संसारत्याग करु या!"
१९. शाक्य राजा भद्दीय अनुरुद्धाला म्हणाला: "प्रिय मित्रा, सात वर्षे थांब, सात वर्षांनंतर आपण बरोबरच संसारत्याग करू."
२०. "प्रिय मित्रा, सात वर्षे हा फार दीर्घ काळ आहे. मी सात वर्षे थांबू शकत नाही."
२१. भद्दीयाने ती मुदत सहा वर्षांवर आणली आणि क्रमाक्रमाने ती एका वर्षावर आणली. मग सात महिन्यांवर आणि क्रमाक्रमाने ती एक महिन्यावर आणि मग एका पंधरवड्यावर आणली. प्रत्येक वेळी अनुरुद्ध म्हणाला: "इतका दीर्घकाळ मी थांबू शकत नाही."
२२. मग राजा म्हणाला, "मित्रा, माझ्या पुत्रावर व भावांवर राज्य सोपवीपर्यंत सात दिवस थांब."
२३. "सात दिवस म्हणजे काही फार नव्हते. तितका वेळ थांबण्यास मी तयार आहे." अनुरूद्धाकडून त्याला तसे उत्तर मिळाले.
२४. याप्रमाणे शाक्य राजा भद्दीय, अनुरुद्ध, आनंद, भगु, किंबिल आणि देवदत्त हे पूर्वी जसे क्रीडोद्यानावर चतुरंगसेनेसह मिळून जात असत तसे या वेळीही चतुरंग सेनेसह ते सहा जण आणि त्यांच्याबरोबर उपाली नावाचा न्हावी असे सगळे मिळून सात जण बाहेर पडले.
२५. काही अंतर चालून गेल्यानंतर त्यांनी आपल्या सेनेला परत पाठवले आणि शेजारच्या जनपदात त्यांनी प्रवेश केला. आपल्या चांगल्या चांगल्या वस्तु त्यांनी काढल्या आणि त्या आपल्या वस्त्रात गुंडाळून त्यांनी त्याचे एक गाठोडे बांधले आणि ते उपाली न्हाव्याला म्हणाले, "मित्रा, तू आता कपिल वस्तुला परत जा. तुझ्या उदरभरणासाठी या वस्तु तुला पुरतील. आम्ही आता भगवान बुद्धाकडे जातो." आणि मग ते पुढे गेले.
२६. ते पुढं चालू लागले आणि उपाली घरी जाण्यासाठी परतला.

## ४. बुद्धाला गृहस्थाश्रमी बनविण्याचा शेवटचा प्रयत्न

१. आपला मुलगा आता जात आहे आणि आपल्याला तो पुन्हा कधीही भेटणार नाही या विचाराने शुद्धोदन खूप रडला.
२. नंतर शुद्धोदनाने आपला मंत्री व आपल्या कुटुंबाचा पुरोहित यांच्याशी विचारविनिमय केला आणि कुटुंबात परत येऊन राहाण्याविषयी आपल्या पुत्राचे मन ते वळवू शकतील काय याबद्दल त्यांना विचारले.
३. राजाच्या इच्छेला मान देण्यासाठी तो पुरोहित मंत्र्याला बरोबर घेऊन निघाला आणि त्याने भगवान बुद्धास वाटेतच गाठले.

४. त्यांनी त्यास यथोचित अभिवादन केले आणि त्यांची संमती मिळविल्यावर ते त्यांच्याजवळ बसले.
५. झाडाच्या सावलीत बसलेल्या भगवंतांना उद्देशून पुरोहित म्हणाला :
६. "राजकुमार, आपला वियोगरुपी बाण हृदयात रुतल्यामुळे ज्यांच्या नेत्रातून अश्रूंचा पूर वाहात आहे त्या महाराजांच्या भावनांचा आपण क्षणभर विचार करा. त्यांनी आपल्याला घरी परतण्याची विनंती केली आहे. आपण घरी परतलात तर त्यांना शांतपणे मृत्यू येईल."
७. "आपला निश्चय धर्मावर केंद्रित आहे हे मला माहीत आहे आणि मला हेही माहीत आहे की, आपला हा संकल्प बदलणारा नाही. परंतु आपणही गृहहीन अवस्था पत्करल्यामुळे मानसिक यातनांच्या ज्वाला मला अग्नीप्रमाणे भाजून काढीत आहेत."
८. " आपण कर्तव्यावर प्रेम करीत असता म्हणून कर्तव्यासाठी या संकल्पाचा त्याग करा."
९. "काही काळ पृथ्वीच्या सार्वभौमत्वाचा उपभोग घ्या. शास्त्रानुसार योग्य वेळी आपण वानप्रस्थास जाऊ शकालच. आपल्या दु:खी नातलगांविषयी अनादर दाखवू नका. सर्व प्राणिमात्राविषयी करुणा हाच धर्म आहे."
१०. "धर्माची साधना काही केवळ अरण्यातच जाऊन होते असे नाही. नगरात राहून देखील साधूपुरुषांना मोक्षसाधना करता येते. विचार आणि प्रयत्न ही खरी साधने होत. अरण्य आणि श्रमणवेष ही केवळ भित्र्या माणसांची लक्षणे होत."
११. आपल्यामुळे निर्माण झालेल्या यातनांच्या लाटांनी भरलेल्या खोल दु:ख सागरात शाक्याचा राजा बुडून गेला आहे. म्हणून समुद्रात बुडणार्या बैलाप्रमाणे असहाय आणि अनाथ झालेल्या राजाला आपण सोडवावे."
१२. "जिने आपणाला लहानाचे मोठे केले आणि जिने अगस्त्य लोकांत अजून प्रवेश केला नाही, अशा त्या राणीचा देखील विचार करा. वासरू हरवलेल्या गाईप्रमाणे ती सतत शोक करीत आहे, तिची आपण थोडी देखील चिंता करणार नाही काय?"
१३. " नराचा वियोग झालेल्या हंसीप्रमाणे किंवा सहचराने अरण्यात टाकून दिलेल्या हत्तिणीप्रमाणे, पती जीवंत असतानाही विधवेप्रमाणे दु:खी-कष्टी असणार्या आपल्या पत्नीला आपण आपल्या दर्शनाने निश्चित संतुष्ट केले पाहिजे."
१४. पुरोहिताच्या तोंडचे शब्द ऐकल्यावर गुणीजनांचे गुण लक्षात घेणार्या भगवंतांनी क्षणभर विचार केला आणि नंतर शांतपणे पुढीलप्रमाणे उत्तर दिले.

## ५.भगवान बुद्धाचे उत्तर

१. "महाराजांच्या मनातील पित्याची माया, विशेषत: त्यांनी माझ्यावर केलेली माया मी जाणतो. तरी देखील दु:खाने आणि दुरिताने जगाला ग्रासले आहे याचा प्रत्यय आल्यामुळे माझ्या नातलगांना सोडून जाणे मला भाग पडत आहे."
२. प्रियजनांचा वियोग अनिवार्य नसतो, तर आपल्या आवडत्या नातलगांना भेटण्याची कोण इच्छा करू शकणार नाही? परंतु एकदा वियोग झाला तरीही तो पुन्हा होणारच आहे. म्हणूनच माझे पिताजी प्रेमळ असूनही मी त्यांना सोडून जात आहे."

३. “ परंतु महाराजांच्या दु:खाला मी कारण आहे असे जे आपल्याला वाटते ते मला मान्य नाही. कारण स्वप्नवत भेटीमुळे भविष्यांतील वियोगाच्या विचारांनी त्यांना दु:ख होत आहे.”
४. “ यासाठी याबाबत आपले मत निश्चित झाले पाहिजे. वियोगाची विविध स्वरूपे पाहिल्यावर तुम्हाला हे समजले पाहिजे की, पुत्र किंवा नातलग हे दु:खा चे कारणनाही, तर अज्ञान हेच दु:खाचे कारण आहे.”
५. “ वाटेत एकमेकांना भेटणार्या प्रवाश्यांप्रमाणे सर्व प्राणिमात्रांच्या बाबत केव्हा ना केव्हा वियोग होणारच. हे जर अपरिहार्य आहे तर कोणता शहाणा मनुष्य आपल्या प्रियजनांची ताटातूट झाली तर दु:ख करीत बसेल?”
६. “ माणुस स्वजनांना दुसर्या जगात सोडून तो या जगात येतो आणि त्यांना सोडून येथे आल्यावर तो पुन्हा दुसरीकडे जातो; ही मानवजातीची कहाणी आहे. जे मुक्त आहेत त्यांना भेटणारे आणि सोडून जाणारे याची काय खंत असणार?”
७. “ प्राणी गर्भ सोडून जन्माला येतो त्या क्षणापासून मृत्यु जर ठरलेलाच आहे, तर मग माझे अरण्यात जाणे अवेळी होत आहे असे तुम्ही का म्हणता?”
८. ऐहिक वस्तु साध्य करून घेताना एखादी वेळ-अवेळ असेलही. काळ हा सर्व वस्तूंशी अविभाज्यतेने संलग्न असतो असे वर्णन केले जाते. काळ हा जगाला आपल्या विविध परिवर्तनात नेत असतो; परंतु स्तुत्य अशा परमोच्च सुखप्राप्तीसाठी कुठलाही काळ अनुकूलच असतो.”
९. “ महाराजांनी आपले राज्य मला देण्याची इच्छा दर्शवावी हा पित्याला शोभणारा उदात्त विचार आहे. परंतु आजारी माणसाने हावरटपणाचे अपथ्यकारक अन्न स्वीकारण्या इतकेच मी हा विचार मान्य करणे अनुचित आहे.”
१०. “ जो राज्याधिकार आभासमय आहे, जेथे चिंता आहे, द्वेष आहेत, थकवा आहे, जेथे सेवेच्या भक्तीमुळे अन्याय उद्भवतो तो प्रज्ञावंताने स्वीकारणे कसे उचित ठरेल?”
११. “ सोनेरी प्रासाद मला आगीने पेटल्यासारखा वाटतो. मिष्टान्न भोजन विष कालवल्यासारखे वाटते. कमलफुलांनी आच्छादलेली शय्या मगरींनी ग्रासल्यासारखी वाटते.”

## ६.मंत्र्याचे प्रत्युत्तर

१. भगवान बुद्धाच्या सद्गुणाला व ज्ञानाला अनुरूप असे निरिच्छ, तर्कशुद्ध व भारदस्त प्रवचन ऐकल्यानंतर मंत्र्याने उत्तर दिले.
२. “ आपला हा निश्चय अति उत्तम आहे, तो अयोग्य नसला तरी या वेळी मात्र योग्य नव्हे. आपल्या पित्याला त्याच्या वृद्धापकाळी दु:खात लोटून त्याला अशा प्रकारे सोडून जाणे हे आपले कर्तव्य होऊ शकत नाही.”
३. “ आपले मन सूक्ष्मदर्शी निश्चित नाही. ते कर्तव्य, संपत्ती आणि सुख यांची सूक्ष्मदृष्टीने मीमासा करण्याइतके कुशल नाही. कारण अदृश्य अशा उद्दिष्टासाठी आपण दृश्य अशा उद्दिष्टाचा त्याग करीत आहात.”
४. “ दुसरे असे की, काहीजण पुनर्जन्म आहे असे मानतात, बाकीचे लोक पुनर्जन्म नाही असे आत्मविश्वासपूर्वक सांगतात; म्हणून ज्याअर्थी ह्या प्रश्नाबाबत संदेह आहे त्या अर्थी हाती आलेल्या भोगांचा उपभोग घेणे हेच योग्य होय.”

५. “जर मरणोत्तर जीवन अस्तित्वात असेल तर ते आपल्याला जसे मान्य होईल तसा आपण त्याचा उपभोग घेऊ; पण जर मरणोत्तर जीवन अस्तित्वात नसेल तर सर्व जगाला निश्चितपणे विनासायास मुक्ती मिळाली आहे.”

६. “ काही लोक पुनर्जन्म आहे असे मानतात. परंतु ते मुक्तीची शक्यता मानीत नाहीत. अग्नी ज्याप्रमाणे स्वभावतःच उष्ण असतो आणि पाणी प्रवाही असते त्याप्रमाणे आपल्या क्रियाशक्तीचाही एक विशिष्ट स्वभाव असतो असे ते मानतात.”

७. “काही लोक म्हणतात की, सर्व वस्तू चांगल्या आणि वाईट व सत् आणि असत् अशा स्वाभाविक गुणधर्मातून उत्पन्न होतात आणि ज्या अर्थी हे सर्व जग स्वाभाविकपणेच उत्पन्न झाले त्याअर्थी आपले सर्व श्रम व्यर्थ होत.”

८. “ ज्याअर्थी इंद्रियांची क्रिया निश्चित आहे आणि बाह्य वस्तूंचीही अनुकूलता किंवा प्रतिकूलता निश्चित झालेली असते, त्याअर्थी वृद्धापकाळ आणि दुःख यांच्याशी ज्या गोष्टी निगडीत झालेल्या आहेत त्या कितीही प्रयत्न केले तरी कशा बदलता येतील? त्या सर्व गोष्टी स्वाभाविकपणेच निर्माण होत नाहीत काय?”

९. “पाण्यामुळे अग्नि विझतो आणि अग्नि पाण्याची वाफही करतो ही निरनिराळी तत्वे एकजीव होऊन ती या जगाची निर्मिती करतात.”

१०. “गर्भाशयातील गर्भ, हात, पाय, पोट, पाठ आणि डोके यांच्या सहित साकार होतो. तो आत्म्याशी संलग्न असतो. हे स्वाभाविकरित्या होते, असे प्राज्ञ सांगतात.”

११. “काट्यांचा अणकुचीदारपणा कोण उत्पन्न करतो? पशुपक्ष्यांचे निरनिराळे स्वभाव कोण बनवतो? हे सर्व स्वभावतःच उत्पन्न होते; त्यांत इच्छेकडून कोणतीही क्रिया घडत नाही; मग इच्छाशक्ती या नावाची चीज कशी असू शकेल?”

१२. “ इतर काहीजण म्हणतात की ईश्वर सृष्टी निर्माण करतो तर मग आत्म्याने जाणीवपूर्वक प्रयत्नशील राहाण्याची आवश्यकता काय आहे? जो जगाला गतीमान करतो तोच त्या गतीला विरोध करतो.”

१३. “ काही लोक म्हणतात की जन्मास येणे आणि नाश पावणे या दोहोंचेही कारण आत्मा आहे; परंतु ते असे म्हणतात की, जन्मास येणे हे विनासायास होते, पण मोक्ष प्राप्ती मात्र प्रयासानेच लाभते.”

१४. “ मनुष्य संपत्ती निर्माण करून पूर्वजांचे ऋण फेडतो. तसेच तो विद्यार्जनाने ऋषींचे आणि यज्ञ करून देवांचे ऋण फेडतो. मनुष्य ह्या तीन ऋणाचे ओझे घेऊनच जन्माला येतो. या ऋणांतून मुक्त होतो त्यालाच खरी मुक्ती मिळते.”

१५. अशा प्रकारे सुज्ञांच्या मते जो या नियमक्रमानुसार प्रयत्न करतो त्यालाच मोक्षप्राप्ती होते; परंतु ते आपल्या सर्व शक्तीने प्रयत्न करण्यास तयार असले तरी त्यांना मोक्ष मिळत नाही. व्यर्थ सायास मात्र त्याच्या पदरी पडतात.”

१६. म्हणून तरुण पुरुषा, तुला मुक्तीचीच तळमळ असेल तर विहित नियमांचा अवलंब कर. याप्रमाणे तुला मुक्ती मिळेल आणि महाराजांच्या दुःखाचाही अंत होईल.”

१७. “ अरण्यातून स्वगृही पुनरागमन केल्यामुळे जीवनात निर्माण होणार्या दोषाविषयी जे चिन्तन करतोस त्याविषयी सांगायचे म्हणजे तू तो विचारच तूर्त सोडून द्यावा. प्राचीन काळीदेखील काही जण अरण्यातून घरी परतले होते.” अंबरीश, द्रुमकेश, राम इत्यादींची उदाहरणे त्याने या बाबतीत दिली.

## ७. भगवान बुद्धाचा मनोनिग्रह

१. राजाचा जणू काय डोळा असलेल्या त्या मंत्र्याचे ते प्रेमळ व राजनिष्ठ उद्गार ऐकल्यावर त्या राजपुत्राने आपला निश्चय जरासुद्धा न डळमळू देता ठामपणे उत्तर दिले. त्याचे उत्तर सुसंबद्ध होते. ते कंटाळवाणे किंवा उतावळेपणाचे नव्हते.

२. " एखादी वस्तु अस्सित्वात आहे की नाही या शंकेचे निरसन माझ्या दृष्टीने दुसर्यांच्या शब्दांनी होणार नाही. तपश्चर्येने किंवा चिंतनाने सत्य निश्चित केल्यावर त्या वस्तूविषयीच्या सत्याचे मी स्वत:च आकलन करीन."

३. "अज्ञेय व वादग्रस्त असा सिद्धांत आणि शेकडो पूर्वग्रहांनी युक्त असा कोणताही युक्तिवाद मी मान्य करू शकत नाही. कोणता सूज्ञ मनुष्य दुसर्याच्या श्रद्धेवर विसंबून राहील? मानवजात ही अंधारात आंधळ्याने दाखविलेल्या मार्गाने जाणार्या आंधळ्याप्रमाणे आहे."

४. " परंतु सत्य जरी स्पष्टपणे समजले नाही किंवा चांगल्या व वाईटा विषयी संदेह असेल, तरी माणसाने आपले मन चांगल्या गोष्टीवरच केंद्रित करावे. सत्प्रवृत्तीच्या माणसाला काही व्यर्थ श्रम सुद्धा शेवटी कल्याणकारक ठरतात."

५. "परंतु ही पवित्र परंपरा अनिश्चित आहे हे पाहिल्यानंतरही विश्वसनीय व्यक्तींनी जे सांगितले तेच बरोबर होय हे लक्षात घ्या. आणि विश्वसनीयता म्हणजेच निर्दोषता हे लक्षात ठेवा. जो सर्वस्वी निर्दोष आहे तो सत्याचा अपलाप करणार नाही."

६. "आणि घरी परतण्याविषयी आपण मला जे सांगितले त्याविषयी बोलावयाचे म्हणजे आपण दिलेली उदाहरणेही प्रमाण होऊ शकत नाहीत. कारण, कर्तव्य ठरविताना ज्यांनी प्रतिज्ञा-भंग केला आहे, अशांची उदाहरणे प्रमाण म्हणून कशी धरता येतील?"

७. "म्हण्न, सूर्यही कदाचित पृथ्वीवर पडेल, हिमालय पर्वतही आपले स्थान सोडील, परंतु इंद्रियसुखोपभोगासाठी संसारी मनुप्य बनून मी कधीही घरी परत जाणार नाही."

८. "मी भडकलेल्या अग्नीत प्रवेश करीन, पण माझे उद्दिष्ट साध्य केल्याविना मी घरी परत जाणार नाही." एवढे बोलून तथागत उठले आणि आपल्या वैराग्ययुक्त दृढनिश्चयानुसार पुढे चालू लागले.

९. त्यांचा अविचल निश्चय ऐकल्यानंतर दु:खाने भारावून विषण्ण नजरेने थोडा वेळ त्याच्या मागोमाग जाऊन तो मंत्री आणि ब्राम्हण अश्रु ढाळीत हळूहळू कपिलवस्तुला परतले.

१०. राजपुत्राविषयीच्या प्रेमामुळे आणि राजावरील त्याच्या भक्तीमुळे ते परत येताना पुन:पुन्हा थांबून मागे वळून पाहू लागले. आपल्या तेजाने तळपणार्या, कुणाच्याही हाती न गवसणार्या त्या तथागताकडे ते पाहूही शकत नव्हते किंवा त्यांच्यावरुन दृष्टीही काढू शकत नव्हते.

११. घरी परतण्यासाठी त्याचे मन वळविण्यात अयशस्वी झाल्यावर तो मंत्री आणि तो उपाध्याय अडखळत्या पावलांनी परत फिरले आणि एकमेकांना विचारू लागले, "आपष्या प्रिय पुत्रासाठी झुरत असलेल्या राजासमोर आपण जावे तरी कसे आणि त्याची भेट तरी कशी घ्यावी?"

# भाग पाचवा: धम्मदीक्षेच्या मोहिमेस पुन्हा सुरुवात

## १. खेडवळ ब्राम्हणांना धम्मदीक्षा

१. गृध्रकूट पर्वताच्या पाठीमागे राजगृहाजवळच एक खेडे होते. तेथे सुमारे सत्तर कुटुंबे होती; आणि ती सर्व ब्राम्हणांची होती.

२. या लोकांना आपल्या धम्माची दीक्षा देण्याच्या इच्छेने भगवान बुद्ध तेथे आले आणि एका झाडाखाली बसले.

३. त्यांचे तेजस्वी व्यक्तीमत्व व दिव्य कांती पाहून लोक त्यांच्या भोवती जमले. तेव्हा त्यांनी ब्राम्हणांना विचारले, "तुम्ही या पर्वताजवळ किती वर्षे राहात आहात? आणि तुम्ही कोणता व्यवसाय करता?"

४. यावर त्यांनी उत्तर दिले, "आमच्या येथे तीस पिढ्या होऊन गेल्या आहेत. आणि गुरेढोरे पाळणे हा आमचा व्यवसाय आहे."

५. त्यांच्या धार्मिक श्रद्धेविषयी विचारता ते म्हणाले, " निरनिराळ्या ऋतूनुसार आम्ही सूर्य, चंद्र, पर्जन्य आणि अग्नी यांची पूजा करतो, व त्यांना होमहवन करतो."

६. " जर एखाद्याला मृत्यु आला तर आम्ही एकत्र येतो आणि ब्रम्हलोकात त्याला जन्म मिळावा आणि अशा प्रकारे जन्ममरणाच्या फेर्यांतून तो मुक्त व्हावा म्हणून प्रार्थना करतो."

७. भगवान बुद्धांनी उत्तर दिले, " हा सुरक्षित मार्ग नव्हे. यापासून तुमचा काहीच फायदा होणार नाही. माझ्या मार्गाचे अनुकरण करणे, खरे श्रमण बनणे, आणि निर्वाणप्राप्तीसाठी आत्मसंयमाचा अभ्यास करणे हाच खरा मार्ग होय." आणि ते पुढे म्हणाले;

८. "जे थोतांडाचा अवलंब करून असत्याला सत्य आणि सत्याला असत्य समजतात त्यांना कधीही सद्गती प्राप्त होत नाही."

९. " परंतु सत्याला सत्य म्हणून ओळखणे आणि असत्याला असत्यच मानणे, ही खरी सम्यक् दुष्टी होय. हिच्यामुळेच तुम्हाला सद्गती लाभेल."

१०. जगात मृत्यु सर्वत्र आहे - त्याच्यापासून कोणाचीही सुटका नाही.

११. "ज्याला मृत्यु नाही असे काहीही जन्माला येऊ शकत नाही. ही गोष्ट सर्व प्राणिमात्राच्या बाबतीत लक्षात घेणे आणि म्हणून जन्ममृत्यूच्या बंधनातून सुटण्याची इच्छा करणे म्हणजेच खरी धर्मसाधना होय."

१२. हे शब्द ऐकल्याबरोबर त्या सत्तर ब्राम्हणांनी श्रमण होण्याची इच्छा प्रगट केली आणि भगवान बुद्धांनी त्यांना अनुमती दिल्यावर त्यांचे मुंडन करण्यात आले; आणि ते खरे श्रमण दिसू लागले.

१३. नंतर ते सर्व विहाराकडे जाण्यासाठी निघाले. वाटेत त्यांना आपल्या बायका मुलांविषयीचे विचार सतावू लागले. परंतु त्याच वेळी जोराची पर्जन्यवृष्टी झाल्यामुळे ते पुढे जाऊ शकले नाहीत.

१४. रसत्याच्या बाजूला सुमारे दहा घरे होती. त्यांत त्यांनी आसरा घेण्याचा प्रयत्न केला. परंतु एका घरात प्रवेश करताच, छप्परातून पाऊस गळत आहे आणि पावसापासून रक्षण करणे शक्य नाही, असे त्यांना दिसून आले.

१५. तेव्हा भगवान बुद्ध म्हणाले, "ज्याप्रमाणे घराचे छप्पर शाबूत नसले म्हणजे पावसाचे पाणी आत येते व घर

गळु लागते, त्याप्रमाणे ज्या वेळी आपल्या विचारावर आपले काळजीपूर्वक नियंत्रण नसते, त्या वेळी वासना (कामवासना ) आपल्या सर्व चांगल्या संकल्पांना पोखरून काढतात."

१६. "परंतु ज्या वेळी छप्पर मजबूत असते, त्या वेळी त्यातून पाणी गळत नाही; त्याप्रमाणे आपल्या चित्तवृत्तीवर नियंत्रण ठेवले आणि विचारपूर्वक वर्तन केले तर असल्या वासना निर्माण होत नाहीत किंवा आपल्याला विचलित करू शकत नाहीत."

१७. हे ऐकून त्या सत्तर ब्राम्हणांना आपल्या वासना दोषास्पद आहेत याबद्दल जरी खात्री झाली तरी ते संपूर्ण संशयमुक्त झाले नव्हते. तरीसुद्धा ते पुढे जाऊ लागले.

१८. पुढे जात असताना एक सुगंधित वेष्टण जमिनीवर पडलेले त्यांनी पाहिले आणि भगवान बुद्धांनी त्याकडे त्यांचे लक्ष वेधण्याची संधी घेतली. जरा पुढे गेल्यानंतर जवळच पक माशाचे आतडे पडलेले आढळले. त्याच्या दुर्गंधीकडे त्यांनी त्यांचे लक्ष वेधले आणि ते म्हणाले :

१९. "जो शुद्र आणि नीच स्वभावाच्या माणसाची संगत करतो त्याची स्थिती दुर्गंधीयुक्त पदार्थ हातात धरणार्या व त्यामुळे स्वतः दुर्गंधीत होणार्या माणसा सारखी होते. तो अधिकाधिक वाईट बनत जातो, आणि कोणतेही कारण नसताना दुष्टपणात तरबेज होतो."

२०. "परंतु ज्याप्रमाणे सुगंधी द्रव्य हातात घेणार्याचा देहही सुगंधित होतो त्याप्रमाणे ( सज्जनांची संगत धरणारा ) शहाणा माणूसही अधिक सज्जन होतो. तो उत्तरोत्तर अधिक ज्ञानी, शीलवान व गुणवान होतो. त्याला या गुणात पूर्णत्व लाभून त्याला संतोष प्राप्त होतो."

२१. या गाथा ऐकून घरी परतण्याची व वैषयिक सुखात निमग्न होण्याची आपली इच्छा म्हणजे आपल्याला लागलेला कलंक होय अशी खात्री पटल्यानंतर त्या सत्तर ब्राम्हणांनी तो विचार सोडून दिला अणि शेवटी ते विहारात आले व काही काळाने त्यांनी अर्हतपद प्राप्त करून घेतले.

## २. उत्तरावतीच्या ब्राम्हणांना धम्मदीक्षा

१. एकदा भगवान बुद्ध श्रावस्ती येथे जेतवनात राहात असताना मनुष्ये व देव यांच्या कल्याणार्थ आपल्या धम्माची शिकवण देत होते. त्या वेळी पूर्वेच्या बाजूला उत्तरावती नावाच्या प्रदेशात पाचशे ब्राम्हण राहात होते.

२. अंगाला चिखल वगैरे फासून ऋषी होण्याच्या आकांक्षेने गंगेच्या काठावर राहणार्या एक निर्ग्रंथ संन्याश्याच्या निवासस्थानी सर्वांनी मिळून जावे असे त्यांनी ठरविले होते.

३. जाता जाता वालवंटात त्यांना तहान लागली. एक झाड दृष्टीस पडताच जवळपास मनुष्यवस्ती असावी या आशेने ते घाईघाईने तिकडे गेले. परंतु जेव्हा ते तेथे पोहोचले तेव्हा त्यांना मनुष्यवस्तीचे एकही चिन्ह आढळले नाही.

४. अशा परिस्थितीत ते मोठमोठ्याने आक्रोश करू लागले. अकस्मात त्या झाडातून त्यांना तेथे झाडावर राहणार्या समंधाचा आवाज ऐकू आला. त्यांच्या आक्रोशाचे कारण त्याने विचारले आणि ते कारण ऐकल्यावर त्याने त्यांना यथेच्छ खाण्यापिण्यास दिले.

५. पुढे जाण्यास निघण्याची तयारी केल्यावर ब्राम्हणांनी त्या समंधास अशा स्वरूपाचा जन्म त्याला कसा प्राप्त

झाला याचा पूर्वेतिहास विचारला.

६. त्यावर त्या वृक्ष-समंधाने सांगितले की, “ज्या वेळी अनाथ पिंडक सुदत्ताने भगवान बुद्धाला जेतवन उद्यान अर्पण केले त्या वेळी तेथे जमलेल्या भिक्खुंच्या सभेत तो गेला असताना तो त्या धम्मावरील प्रवचन रात्रभर ऐकत बसला, आणि परत जाताना त्याचा पाण्याचा पेला भरून त्याने तो त्या भिक्षूंना दान दिला.

७. दुसर्या दिवशी सकाळी तो घरी परत आल्यावर “कसला त्रास झाला म्हणून तुम्ही रात्रभर घराबाहेर राहिलात?” असे त्याच्या पत्नीने त्याला रागाने विचारले. त्यावर तो म्हणाला, “मला कसलाही त्रास झाला नाही. परंतु जेतवनात भगवान बुद्धाचे प्रवचन ऐकण्यासाठी मी गेलो होतो.”

८. तेव्हा त्याच्या पत्नीने भगवान बुद्धाला शिव्याशाप देण्यास सुरुवात केली व ती म्हणाली, “हा गौतम म्हणजे लोकांची फसवणूक करणारा एक वेडा धर्मोपदेशक आहे.” इत्यादि.

९. “ तेव्हा तिच्या म्हणण्याला मी विरोध केला नाही; उलट त्या म्हणण्यापुढे मी मान तुकविली म्हणून मी मेल्यावर समंध झालो. परंतु माझ्या भित्रेपणामुळे मला या झाडावर डांबून ठेवण्यात आले आहे आणि नंतर त्याने पुढील अर्थाचे श्लोक म्हटले;

१०. “यज्ञ इत्यादि क्रियाकर्म म्हणजे दु:खाचा उगम होय आणि रात्रंदिवस सहन करावे लागणारे ते एक चिंतेचे ओझे होय.”

११. “दु:खमुक्त होण्यासाठी आणि शरीरधर्माचे निर्मूलन करण्यासाठी मनुष्याने ( बुद्धाच्या ) धम्माचे पालन करावे आणि ( ऋषींनी ) सांगितलेल्या ऐहिक धर्माच्या नियमांतून आपली सुटका करून घ्यावी.”

१२. हे शब्द ऐकल्यावर ब्राम्हणांनी श्रावस्तीला ज्या ठिकाणी भगवान बुद्ध होते त्या ठिकाणी जाण्याचे ठरविले. आपल्या भेटीचा उद्देश त्यांनी सांगितल्यावर जगद्वंद्य भगवान बुद्ध त्यांना म्हणाले;

१३. “मनुष्य जरी केसांच्या जटा वाढवून नग्न राहू लागला किंवा शरीरावर त्याने थोडीशी पाने किंवा वल्कले धारण केली, जरी त्याने अंगाला चिखल फासला किंवा तो दगडावर झोपू लागला तरी दुर्विचारासून मुक्त होण्याच्या दृष्टीने त्याचा काय उपयोग?”

१४. “जो कलह करीत बसत नाही किंवा हत्या करीत नाही किंवा अग्नीच्या साहाय्याने नाश करीत नाही, ज्याला विजयाची इच्छा नसते, जो सगळया जगाविषयी सदिच्छा बाळगतो त्याच्या बाबतीत द्वेष किंवा तिरस्काराची भावना निर्माण होण्यास कारण मिळत नाही.”

१५. “ पुण्य लाभावे म्हणून भुताखेतांना जो बळी देतो किंवा परलोकी सुखाच्या फळाची अपेक्षा करतो त्याला मिळणारे सुख हे सत्पुरुषाचा आदर करणार्या माणसाच्या सुखाच्या एक चतुर्थांशही बरोबर नसते.

१६. “ जो सदाचाराविषयी तत्पर असतो आणि इतरांचा योग्य तो मान राखतो व वयोवृद्धांविषयी नेहमी आदर बाळगतो त्याला सौंदर्य, सामर्थ्य, आयुष्य आणि शांती या चार सुखांची प्राप्ती होते.”

१७. पतीकडून हे ऐकल्यावर त्याची ती पत्नी शांत झाली.

# भाग सहावा: कनिष्ठ आणि सामान्यजनांची धम्मदीक्षा

## १. उपाली न्हाव्यास धम्मदीक्षा

१. परत जात असताना उपाली न्हावी विचार करू लागला. "शाक्य हे भयंकर लोक आहेत. या अलंकारांसह मी परत गेलो तर मी माझ्या सोबत्यांना ठार मारले आणि त्यांचे अलंकार घेऊन पळालो असे समजून ते मला ठार मारतील. मग शाक्य कुळातील हे तरुण ज्या मार्गाने गेले त्या मार्गाने मी का जाऊ नये?"

२. "खरोखरच मी का जाऊ नये?" उपालीने स्वत:लाच विचारले आणि ते अलंकाराचे गाठोडे पाठीवरून खाली उतरून एक झाडाला ते टांगून तो म्हणाला, "ज्वाला, हे सापडेल त्याने भेट म्हणून ते घेऊन जावे." आणि तो शाक्य तरुणांच्या मागोमाग जाण्यासाठी मागे फिरला.

३. शाक्यांनी त्याला दूरूनच येताना पाहिले आणि ते त्याला म्हणाले, "उपाली, तू परत का आलास?"

४. तेव्हा त्याने आपल्याला काय वाटले ते त्यांना सांगितले. त्यावर ते म्हणाले, "उपाली, तू परत गेला नाहीस हे बरे केलेस; कारण शाक्य हे भयंकर लोक आहेत आणि त्यांनी तुला ठार मारले असते."

५. आणि जेथे भगवान बुद्ध होते तेथे ते उपाली न्हाव्याला बरोबर घेऊन गेले. तेथे पोहोचल्यावर त्यांनी भगवन्तांना वंदन केले आणि ते एका बाजूला बसले. याप्रमाणे बसल्यावर ते तथागतास म्हणाले, "भगवन्त, आम्ही शाक्य गर्विष्ठ आहोत. आणि हा उपाली न्हावी बर्याच दिवसांपासून आमची सेवा करीत आहे.भगवन्तांनी आमच्या अगोदर त्याला आपल्या भिक्खु संघात घ्यावे. म्हणजे त्याला आम्ही योग्य तो आदर आणि मान देऊ आणि आमच्यातील जेष्ठ म्हणून आम्ही त्याला हात जोडून वंदन करू. म्हणजे अशा रीतीने आमच्यातील शाक्यत्वाचा गर्व नष्ट होईल."

६. तेव्हा तथागताने पहिल्या प्रथम उपाली न्हाव्याला प्रव्रज्ज्या देऊन भिक्खु संघात सामील करुन घेतले आणि त्यानंतर त्या शाक्य कुळातील तरुणांना भिक्खू संघाची दीक्षा दिली.

## २. सुनीत नावाच्या भंग्यास धम्मदीक्षा

१. राजगुहात सुनीत नावाचा एक भंगी राहात होता. लोकांनी रस्त्यावर टाकलेला केरकचरा व घाण काढणारा रसत्यावरील झाडूवाला म्हणून काम करून तो आपला उदरनिर्वाह करीत असे. हलका आणि पिढीजात असा त्याचा धंदा होता.

२. एके दिवशी पहाटे भगवन्त उठले, त्यांनी चीवर धारण केले व बर्याचशा भिक्खूंसह भिक्षा मागण्यासाठी ते राजगृहात गेले.

३. या वेळी सुनीत रस्ता झाडीत, कचर्याचे व घाणीचे ढीग गोळा करीत होता व ते टोपलीत भरून हातगाडीवर ओढीत नेत होता.

४. आणि ज्या वेळी त्याने भगवन्तांना आणि त्यांच्यामागून चालणार्या भिक्खूगणांना येताना पाहिले त्या वेळी

त्याचे अंत:करण आनंदाने भरून गेले. परंतु त्याला त्यांची भीतीही वाटली.
५. लपून राहण्यास रसत्यावर जागा न मिळाल्यामुळे त्याने आपल्या गाडीचे जोखड भिंतीच्या एका वाकणावर ठेवले व तो भिंतीला चिकटून उभा राहिला आणि हात जोडून त्याने भगवन्तांना नमस्कार केला.
६. त्याच्या जवळ आल्यावर भगवंत आपल्या दिव्य, मधुर वाणीने त्याला म्हणाले, “सुनीता, असल्या दरिद्री जिण्याचा तुला काय उपयोग आहे? गृहत्याग करून तू माझ्या संघात येतोस का?”
७. आणि अमृतवर्षावाचा आनंद अनुभवीत सुनीत म्हणाला, “या जीवनात भगवन्तासारखे थोर पुरुषही जर या संघात आहेत तर मी का जाऊ नये! भगवन्तांनी मला कृपा करून संघात सामील करून घ्यावे.”
८. तेव्हा भगवन्त म्हणाले, “भिक्खू ये!” आणि त्या शब्दोच्चाराबरोबर सुनीताला प्रवज्ज्या आणि उपसंपदा मिळाली आणि त्याला चीवर आणि भिक्षापात्र देण्यात आले.
९. भगवन्तांनी त्याला विहारात नेऊन धम्म आणि विनय यांची शिकवण दिली आणि ते म्हणाले, “शील, संयम आणि दमन यांमुळे मनुष्य पवित्र होतो.”
१०. सुनीत इतका थोर कसा झाला हे विचारले असता भगवान बुद्ध म्हणाले, “राजमार्गावर टाकलेल्या उकिरड्यावर ज्याप्रमाणे सुगंधित व सुंदर कमलपुष्प उमलावे, त्याप्रमाणे अंतर्दृष्टी नसलेल्या ह्या क्षुद्र प्राण्याच्या आंधळ्या जगात बुद्धपुत्र प्रकाशमान होतो.”

## ३. सोपाक आणि सुप्पीय या अस्पृश्यांना धम्मदीक्षा

१. सोपाक हा श्रावस्तीचा एक अस्पृश्य होता. त्याच्या जन्माच्या वेळी प्रसूति वेदनेमुळे त्याची आई बराच वेळ मूर्च्छित होऊन पडली होती. त्यामुळे तिच्या पतीला व नातलगांना वाटले की, ती मेली. त्यांनी तिला स्मशानात नेले व तिचे प्रेत जाळण्याची तयारी केली.
२. परंतु वारा आणि पाऊस यांच्या मार्यामुळे अग्नी पेट घेऊ शकला नाही. म्हणून सोपाकाच्या आईला चितेवर ठेवून ते निघून गेले.
३. सोपाकाची आई त्या वेळी मेलेली नव्हती. ती नंतर मेली. मृत्यूपूर्वी तिने मुलाला जन्म दिला.
४. स्मशानाच्या पहारेकर्याने त्या मुलाला दत्तक घेतले आणि सुप्पीय नावाच्या स्वत:च्या मुलाबरोबरच त्याचेही पालनपोषण केले. त्या मुलाच्या आईच्या जातीचे नाव सोपाक होते, त्यामुळे ते मूलही त्या नावाने ओळखले जाऊ लागले.
५. एके दिवशी भगवान बुद्ध त्या स्मशानाजवळून जात होते. भगवंताना पाहून सोपाक त्यांच्यासमोर आला. भगवंतांना वंदन करुन त्यांचा शिष्य म्हणून त्यांच्या बरोबर येण्यास त्याने त्यांची अनुज्ञा मागितली.
६. सोपाक त्या वेळी फक्त सात वर्षांचा होता. म्हणूनन भगवंतांनी त्याला वडिलांची संमती मिळविण्यास सांगितले.
७. सोपाक गेला आणि आपल्या वडिलांना घेऊन आला. वडिलांनी भगवंतांना वंदन केले आणि आपल्या मुलाला त्यांच्या संघात घेण्याविषयी त्यांना विनंती केली.
८. तो जरी अस्पृश्य जातीचा होता तरीही भगवंतांनी त्याला आपल्या संघात घेतले आणि त्यांनी आपला धम्म व

विनय यांची शिकवण त्याला दिली.
९. काही काळानंतर सोपाक एक 'स्थविर' झाला.
१०. सुप्पीय आणि सोपाक हे लहानपणापासून एकत्र वाढलेले होते आणि सोपाकाला सुप्पीयाच्या वडिलांनीच दत्तक घेऊन वाढविल्यामुळे सुप्पीय अपपला सोबती सोपाक याच्याकडून भगवंताचे धम्म व विनय शिकला. आणि जरी सोपाक हा सुप्पीयाच्या जातीपेक्षा हलक्या जातीतील होता तरी सुप्पीयाने सोपाकाला आपणाला प्रव्रज्ज्या देऊन संघात घेण्याची विनंती केली.
११. सोपाकाने ते मान्य केले आणि स्मशानातील पहारेकर्याचे काम करणार्या हीन दर्जाच्या जातीतील सुप्पीय हा एक भिक्खू बनला.

## ४. सुमंगल इत्यादि हीन जातीतील लोकांना धन्मदीक्षा

१. सुमंगल हा श्रावस्तीचा एक शेतकरी होता. विळा, नांगर आणि कुदळ यांच्या साहाय्याने शेतात काम करून तो आपली उपजीविका करीत असे.
२. छन्ना हा कपिलवस्तूचा रहिवाशी असून शूद्धोदनाज्या घरातील एक नोकर होता.
३. धन्नीय हा राजगृहाचा रहिवाशी असून एक कुंभार होता.
४. कप्पत-कुर हा श्रावस्तीचा रहिवाशी होता. फाटक्या चिंध्या घालून, हातात थाळी घेऊन तांदळाच्या दाण्याची भीक मागत इकडे तिकडे फिरणे हा एकच जगण्याचा मार्ग त्याला माहीत होता. म्हणूनच तो कप्पत-कुर ( चिंध्या आणि तांदूळ ) या नावाने ओळखला जाऊ लागला. मोठा झाल्यावर गवत विकून तो आपली उपजीविकाकरीत असे.
५. या सर्वांनी भगवान बुद्धांकडे भिक्खू होण्याची आणि त्यांच्या संघात सामील होण्याची अनुज्ञा मागितली. भगवान बुद्धांनी अनमान न करता आणि त्यांचा हीन जातीतील जन्म किंवा त्यांची पूर्वीची स्थिती यांची पर्वा न करता त्यांना आपल्या संघात घेतले.

## ५. महारोगी सुप्रबुद्धाची धम्मदीक्षा

१. एकदा भगवंत राजगृहाजवळील वेळुवनात जेथे खारींना दाणे चारले जात असत त्या ठिकाणी राहात होते.
२. त्या सुमारास राजगृहात सुप्रबुद्ध नावाचा एक दीन, दुःखी आणि दरिद्री असा महारोगी राहात होता.
३. त्यावेळी एका मोठ्या जनसमुदायात बसून भगवंत धम्माचा उपदेश करीत होते.
४. महारोगी सुप्रबुद्धाने तो जनसमुदाय दुरूनच पाहिला आणि तो विचार करू लागला, “त्या ठिकाणी पलीकडच्या बाजूला अन्नाची-ते बरे असो को वाईट असो भिक्षा वाढली जात आहे हे निःसंशय. समजा, मी पलीकडच्या जमावाकडे गेलो तर मला देखील थोडेसे बरेवाईट अन्न खायला मिळेल.”

५. म्हणून महारोगी सुप्रबुद्ध त्या जमावाजवळ गेला आणि उपदेश करीत असलेल्या भगवंतांना त्याने त्या प्रचंड समुदायात पाहिले. भगवंतांना पाहून त्याच्या मनात विचार आला, "नाही, या ठिकाणी अन्नाची भिक्षा वाढली जात नाही. श्रमण गौतम या लोकांना आपल्या धम्माचा उपदेश करीत आहे. मीही त्यांचा उपदेश ऐकला तर काय हरकत आहे?"

६. म्हणून एका बाजूला बसून तो विचार करू लागला, "मी देखील हा उपदेश ऐकेन."

७. त्या सबंध जनसमूहांचे विचार आपल्या विचारशक्तीने जाणणारे भगवंत स्वतःशीच म्हणाले, "येथे उपस्थित असलेल्यांपैकी सत्याचे आकलन करण्यास कोण समर्थ असावा बरे?" नंतर त्या समुदायात बसलेल्या सुप्रबुद्ध महारोग्याला त्यांनी पाहिले आणि त्याला पाहिल्याबरोबर त्यांनी जाणले की, "हाच सत्याचे ग्रहण करू शकेल."

८. म्हणून महारोगी सुप्रबुद्धासाठी भगवंतांनी प्रवचन केले आणि त्यांत दानशील आणि स्वर्ग या विषयांवर उपदेश दिला. त्यांनी विषयवासनांचा क्षुद्रपणा आणि दुष्टपणा स्पष्ट करून सांगितला आणि वासनांपासून मुक्त होण्याचा लाभही दाखवून दिला.

९. महारोगी सुप्रबुद्धाचे अंतःकरण मृदु, लवचिक, बंधमुक्त, प्रमुदित आणि श्रद्धापूर्ण झाल्याचे भगवंतांनी जेन्हा पाहिले तेव्हा त्यांनी त्याला बुद्धाचा सर्वश्रेष्ठ धम्म सांगितला. म्हणजेच दुःख, दुःखाचे कारण, दुःखनिरोध आणि दुःखनिरोधाचा मार्ग यांचा उपदेश केला.

१०. निष्कलंक असे शुभ्र वस्त्र ज्याप्रमाणे कोणताही रंग धारण करण्यास तयार असते, त्याप्रमाणे महारोगी सुप्रबुद्धाच्या अंतःकरणात, तो त्याच स्थळी बसला असताना ज्याला आरंभ आहे आला अंत असलाच पाहिजे, या सत्याची शुद्ध आणि निष्कलंक जाणीव उत्पन्न झाली. महारोगी सुप्रबुद्धाने सत्य पाहिले. तो सत्याप्रत पोहोचला. त्याला सत्याचे ज्ञान झाले. तो सत्यात निमग्न झाला. तो संदेहाच्या पलीकडे गेला. संदेहमुक्त झाला. त्याच्यामध्ये विश्वास उत्पन्न झाला आणि आणखी कशाचीही गरज नसल्यामुळे, भगवंताचा उपदेश आत्मसात केल्यामुळे तो आपल्या जागेवरून उठला, त्यांच्या जवळ गेला आणि तेथे एका बाजूला बसला.

११. याप्रमाणे बसल्यानंतर तो भगवंतांना म्हणाला, "सर्वोत्तम, हे भगवन सर्वोत्तम! ज्याप्रमाणे पतिताला वर उचलावे, लपलेल्याला शोधून काढावे, गांगरून गेलेल्याला मार्ग दाखवावा आणि 'ज्यांना पाहण्याची इच्छा आहे त्यांना साकार पदार्थ पाहता येतील' असे म्हणून अंधारात प्रकाश दाखवावा, त्याप्रमाणे भगवंतानी निरनिराळ्या पद्धतींनी सत्याचे विवरण केले. मी, भगवान, मी देखील बुद्ध, धम्म आणि संघ यांना शरण आलो आहे. या क्षणापासून आयुष्याच्या अंतापर्यंत आपला शरणागत उपासक म्हणून भगवंतांनी माझा स्वीकार करावा."

१२. नंतर भगवंतांच्या पवित्र वाणीने चैतन्ययुक्त, सिद्ध आणि जागृत झालेल्या व समाधान पावलेल्या महारोगी सुप्रबुद्धाने भगवंतांच्या उपदेशाचे स्तुतिपूर्वक स्वागत करून त्यांचे आभार मानले आणि आपल्या जागेवरून उठून, भगवंतांना वंदन करून तो तेथून निघून गेला.

१३. दुर्दैवाची गोष्ट अशी की, पुढे एका खोंडाने महारोगी सुप्रबुद्धाला खाली पाडले आणि शिंगांनी भोसकून ठार केले.

# भाग सातवा: स्त्रियांची धम्मदीक्षा

## १. महाप्रजापती गौतमी, यशोधरा आणि तिच्या मैत्रिणी यांना धम्मदीक्षा

१. जेव्हा भगवान बुद्धांनी कपिलवस्तूला भेट दिली तेव्हा शाक्य पुरुषांप्रमाणे शाक्य स्त्रियांनादेखील संघात प्रविष्ट होण्याची उत्सुकता होती.

२. अशा स्त्रियांचे नेतृत्व महाप्रजापती गौतमीकडे होते.

३. ज्या वेळी भगवंत शाक्यासह न्यग्रोधारामात राहात होते त्या वेळी महाप्रजापती गौतमी त्यांच्याकडे जाऊन म्हणाली: "भगवान तथागतांनी सांगितलेल्या धम्म आणि विनयानुसार स्त्रियांना प्रवज्ज्या देऊन त्यांना संघात प्रवेश देण्याची अनुज्ञा दिली तर फार चांगले होईल!"

४. "नको गौतमी, असा विचार तुझ्या मनात येऊ देऊ नकोस!" पुन्हा दुसर्यांदा आणि तिसर्यांदा गौतमीने तीच विनंती त्याच शब्दात केली आणि दोन्ही वेळा बुद्धाने तिला तेच उत्तर दिले.

५. नंतर निराश आणि दु:खी झालेल्या गौतमीने भगवन्तांना वंदन केले आणि अश्रु ढाळीत रडत ती परत गेली.

६. पुढील प्रवासाकरिता भगवतांनी न्यग्रोधाराम सोडल्यानंतर महाप्रजापती आणि शाक्य स्त्रिया एकत्र बसल्या आणि आपली संघप्रवेशाची विनंती व भगवंतांनी त्या विनंतीला दिलेला नकार याविषयी त्या विचार करु लागल्या.

७. भगवंतांचा नकार अंतिम आहे असे मानण्यास शाक्य स्त्रिया तयार नव्हत्या. त्यांनी यापुढे जाऊन परिव्राजिकेचा स्वत:च वेष धारण करुन भगवंतांसमोर उभे राहण्याचे आणि आपण अगोदरच प्रव्रज्ज्य घेतली असल्याचे भगवंतांच्या निदर्शनास आणून देण्याचे ठरविले.

८. तदनुसार महाप्रजापतीने मुंडन केले. पीतवस्त्रे धारण केली आणि शाक्य कुळातील अनेक स्त्रियांसह ती भगवंतांना भेटण्यासाठी निघाली. भगवंतांनी त्या वेळी वैशाली येथे महावनातील कूटागार भवनात वास्तव्य केले होते.

९. महाप्रजापती गौतमी आपल्या सोबतिणींसह धीरे धीरे वैशालीला येऊन पोहोचली आणि धुळीने माखलेल्या व सुजलेल्या पायांनी ती कूटागाराच्या सभागृहात आली.

१०. तथागत न्यग्रोधारामात वास्तव्य करीत असताना त्यांना तिने जी विनंती केली होती तीच विनंती तिने पुन्हा एकदा केली आणि भगवंतांनी ती पुन्हा नाकारली.

११. आपल्या विनंतीला दुसर्यांदा नकार मिळाल्यानंतर महाप्रजापती मागे फिरून सभागृहाच्या प्रवेशद्वारापाशी जाऊन उभी राहिली. काय करावे हे तिला सुचेना. ती याप्रमाणे उभी राहिली असतानाच सभागृहाकडे येत असलेल्या आनंदाने तिला पाहिले आणि ओळखले.

१२. तेव्हा त्यांनी महाप्रजापतीला विचारले, "सुजलेल्या आणि धुळीने माखलेल्या पायांनी प्रवेशद्वाराबाहेर अशी दु:खाने रडत आणि अश्रु ढाळीत का उभी आहेस?" "कारण, आनंदा, गृहत्याग करुन भगवंताचा धम्म व विनय याचा स्वीकार करुन गृहहीन जीवन जगण्याची अनुज्ञा तथागत स्त्रियांना देत नाहीत" महाप्रजापती म्हणाली.

१३. नंतर स्थविर आनंद ज्या ठिकाणी तथागत होते त्या ठिकाणी गेला. त्याने तथागतास अभिवादन केले आणि एका बाजूला बसल्यावर तो भगवंतांना म्हणाला, "पहा भगवन्, महाप्रजापती गौतमी प्रवेशद्वाराबाहेर उभी आहे; तिचे पाय सुजलेले आहेत आणि ते धुळीने माखलेले आहेत; दुःखी कष्टी होऊन रडत ती अश्रु ढाळीत आहे. कारण गृहत्याग करुन आणि भगवंतांचा धम्म व विनय याचा स्वीकार करुन गृहहीन जीवन जगण्याची अनुज्ञा भगवंत स्त्रियांना देत नाहीत. भगवन्, तिच्या इच्छेनुसार स्त्रियांना अनुज्ञा दिली तर बरे होईल."

१४. "महाप्रजापतीने मावशी आणि दाई या नात्याने तथागतांचे पालनपोषण केले, त्यांना दूध दिले, आणि तथागतांच्या मातेच्या मृत्यूनंतर तिने त्यांना अंगावर पाजले. याप्रमाणे तिने आपली उपयुक्तता सिद्ध केली नाही काय? म्हणून हे भगवन्, संसारत्याग करुन गृहहीन जीवन जगण्याची आणि तथागतांनी सांगितलेला धम्म आणि विनय पाळण्याची अनुज्ञा स्त्रियांना देणे योग्य होईल."

१५. "नको, आनंदा, स्त्रियांना तसे करण्याला संमती देणे योग्य नाही." आनंदाने पुन्हा दुसर्यांदा आणि तिसर्यांदा त्याच शब्दांत तीच विनंती केली आणि त्याला तेच उत्तर मिळाले.

१६. नंतर स्थविर आनंदाने तथागतास विचारले, "स्त्रियांना परिव्रज्ज्या घेण्यास आपण अनुज्ञा देत नाही याचे कारण काय?"

१७. "शूद्र आणि स्त्रिया अस्वच्छ आणि हीन दर्जाच्या असल्यामुळे त्यांना मोक्ष मिळू शकत नाही असे ब्राम्हण मानतात, हे भगवंतांना माहीत आहे. म्हणून ते शूद्र आणि स्त्रिया यांना परिव्रज्ज्या घेऊ देत नाहीत. तथागतांचे मत ब्राम्हणांप्रमाणेच आहे काय?"

१८. "ब्राम्हणाप्रमाणेच शूद्रांनादेखील परिव्रज्ज्या घेऊन संघप्रवेश करण्यास तथागतांनी संमती दिली नाही काय? भगवन्, स्त्रियांच्या बाबतीत असा भेदभाव करण्याचे कारण काय?"

१९. "तथागतांनी सांगितलेला धम्म आणि विनय यांचा स्वीकार करून निब्बाण प्राप्त करून घेण्यास स्त्रिया समर्थ नाहीत असे तथागतांना वाटते काय?"

२०. तथागतांनी उत्तर दिले, "आनंदा, गैरसमज करून घेऊ नकोस. निब्बाणाप्रत पोहोचण्यास पुरुषाइतक्याच स्त्रिया समर्थ आहेत असे माझे मत आहे. आनंदा! माझ्याविषयी गैरसमज करून घेऊ नकोस स्त्रीपुरुषांतील विषमतेच्या तत्वांचा मी पुरस्कर्ता नाही. महाप्रजापतीच्या विनंतीला मी दिलेला नकार हा स्त्रीपुरुषांतील विषमतेवर आधारलेला नाही. तो व्यावहारिक करणांवर आधारलेला आहे."

२१. "भगवन्, खरे कारण समजल्यामुळे मला फार आनंद झाला आहे; परंतु व्यावहारिक अडचणीमुळे भगवन्तांनी तिची विनंती अमान्य केलीच पाहिजे काय? या कृत्यामुळे धम्माला कमीपणा येणार नाही काय? आणि स्त्रीपुरुषांतील असमानतेच्या निंदेला तो पात्र ठरणार नाही काय? भगवन्तांना ज्याची काळजी वाटते अशा प्रकारच्या व्यावहारिक अडचणीतून पार पडण्यासाठी काही नियम भगवंतांना तयार करता येणार नाहीत काय?"

२२. "ठीक आहे; आनंदा ! माझा धम्म आणि विनय यांचे पालन करुन परिव्रज्ज्या घेण्याची अनुज्ञा स्त्रियांना दिलीच पाहिजे असा जर महाप्रजापती गौतमीचा आग्रह असेल तर मी त्याला संमती देतो. पण आठ अटींवर मी ती संमती देतो. ते आठ मुख्य नियम अंमलात आणण्याची जबाबदारी महाप्रजापती गौतमीने स्वतः घ्यावी. तोच तिचा संघ प्रवेशाचा प्रारंभ ठरेल."

२३. नंतर तथागताकडून या आठ मुख्य नियमांचे ज्ञान करून घेतल्यावर स्थविर आनंद महाप्रजापती गौतमीकडे

गेला आणि तथागतांचे सर्व म्हणणे त्याने तिला सांगितले.
२४. "आनंदा, अलंकारप्रिय कुमार किंवा कुमारिका ज्याप्रमाणे स्नानानंतर कमलपुष्पांच्या, जाईच्या फुलांच्या किंवा स्तिमुतक पुष्पांच्या मालेचा दोन्ही हातांनी स्वीकार करील आणि ती आपल्या शिरावर धारण करील त्याचप्रमाणे या आठ मुख्य नियमांचा मी स्वीकार करीत आहे आणि मी माइया आयुष्यात त्या नियमांचा कधीही भंग करणार नाही." महाप्रजापती गौतमी आनंदास म्हणाली.
२५. नंतर स्थविर आनंद तथागताकडे परत गेला आणि त्यांना वंदन करुन तो त्यांच्या एका बाजूला बसला. याप्रमाणे बसल्यावर स्थविर आनंद तथागतास म्हणाला; "भगवन्, आठ मुख्य नियम अमलात आणण्याची जबाबदारी महाप्रजापती गौतमीने स्वीकारली आहे. म्हणून तिने उपसंपदा घेतली आहे आणि संघप्रवेश केला आहे भसे मानावे."
२६. महाप्रजापतीला उपसंपदा मिळाली आणि तिच्यासह आलेल्या पाचशे शाक्य स्त्रियांनाही त्याच वेळी दीक्षा देण्यात आली. याप्रमाणे दीक्षा मिळाल्यावर महाप्रजापती भगवंतांसमोर आली आणि त्यांना अभिवादन करून एका बाजूला उभी राहिली व तथागतांनी तिला धम्म व विनय यांचा उपदेश दिला.
२७. इतर पाचशे भिक्षुणींना तथागतांचा एक शिष्य नंदक याने उपदेश दिला.
२८. महाप्रजापतीबरोबर ज्या शाक्य स्त्रिया भिक्खुणी झाल्या त्यात यशोधराही होती. तिच्या संघप्रवेशानंतर ती भद्दाकच्चाना ( भद्रा कात्यायना ) म्हणून ओळखली जाऊ लागली.

## २. चंडालिका प्रकृतीची धम्मदीक्षा

१. एकदा श्रावस्ती येथे अनाथपिंडकाच्या जेतवन आश्रमात भगवान बुद्ध राहात होते.
२. भगवंतांचा शिष्य आनंद एकदा नगरात भिक्षा मागण्यासाठी गेला होता. भोजन केल्यावर पाणी पिण्यासाठी आनंद नदीवर जात होता.
३. त्याने तेथे भांड्यात पाणी भरत असलेली एक मुलगी पाहिली. आनंदाने तिच्याजवळ थोडेसे पाणी मागितले.
४. प्रकृती नावाच्या त्या मुलीने "मी चांडालिका आहे" असे म्हणून पाणी देण्याचे नाकारले.
५. आनंद म्हणाला, "मला पाणी हवे आहे. मला तुझ्या जातीशी कर्तव्य नाही." मग त्या मुलीने आपल्या भांड्यातील थोडेसे पाणी त्याला दिले.
६. नंतर आनंद जेतवनाकडे जाण्यासाठी निघाला. ती मुलगी त्याच्या मागोमाग गेली. तो कुठे राहतो हे तिने पाहिले आणि तिला असे समजले की त्याचे नाव आनंद असून तो भगवान बुद्धाचा शिष्य आहे.
७. घरी आल्यावर तिने आपली आई मातंगी हिला सगळी हकीकत सांगितली आणि जमिनीवर पडून ती रडू लागली.
८. आईने तिला रडण्याचे कारण विचारले. सगळी हकीकत सांगून ती मुलगी म्हणाली, "जर माझे लग्न करण्याची तुझी इच्छा असेल तर मी आनंदाशीच लग्न करीन; मी दुसर्या कुणाशीही लग्न करणार नाही."
९. आईने चौकशीला सुरुवात केली. परत आल्यावर तिने सांगितले की, " हे लग्न अशक्य आहे; कारण आनंदाने ब्रम्हचर्याचे व्रत धारण केले आहे."

१०. हे ऐकल्यावर त्या मुलीला अत्यंत दुःख झाले आणि तिने अन्नत्याग केला. ही परिस्थिती म्हणजे काही विधिलिखितच आहे असे मानावयास ती तयार नव्हती. म्हणून ती म्हणाली, "आई! तुला चेटुकाची कला अवगत आहे ना? मग आपला हेतू साध्य करण्यासाठी तू त्याचा उपयोग का करीत नाहीस?" आई म्हणाली, "काय करता येईल ते मी पाहते."

११. मातंगीने आनंदाला आपल्या घरी भोजनाचे निमंत्रण दिले. मुलीला फारच आनंद झाला. त्या वेळी मातंगी आनंदाला म्हणाली, "माझी मुलगी आपल्याशी लग्न करायला फार उत्सुक आहे." आनंदाने उत्तर दिले, "मी ब्रम्हचारी राहण्याचे व्रत घेतले आहे आणि म्हणून कोणत्याही स्त्रिशी मी विवाह करू शकत नाही."

१२. "जर आपण माझ्या मुलीशी लग्न केले नाही तर ती आत्महत्या करील; इतकी ती आपल्याकडे आकर्षित झालेली आहे." मातंगीने आनंदाला सांगितले. "पण मला नाइलाज आहे." आनंदाने उत्तर दिले.

१३. मातंगी आत गेली आणि तिने आपल्या मुलीला आनंदाने लग्न करण्यास नकार दिल्याचे सांगितले.

१४. मुलीने ओरडून विचारले, "आई, तुझी ती चेटुक-विद्या गेली कुठे?" आई म्हणाली, "माझे चेटुक तथागतांच्या विरुद्ध चालू शकत नाही."

१५. मुलगी ओरडून म्हणाली, "दार बंद कर आणि त्यांना बाहेर जाऊ देऊ नकोस. म्हणजे आज रात्रीच मी त्याना माझे पती व्हावयास लावते."

१६. आईने मुलीच्या इच्छेप्रमाणे केले. रात्र झाल्यावर आईने एक बिछाना खोलीत आणला. उत्कृष्ट पोषाख करून मुलीने आत पाऊल टाकले. परंतु आनंद अचल राहिला.

१७. आईने शेवटी चेटुकाचा प्रयोग केला. त्यामुळे खोलीत आग भडकली. आईने आनंदाचे वस्त्र धरले आणि ती म्हणाली, "जर तुम्ही माझ्या मुलीबरोबर लग्न करणार नसाल, तर तुम्हाला मी या आगीत फेकून देईन." तथापि आनंद शरण गेला नाही. आईने व मुलीने असहाय होऊन त्याला सोडून दिले.

१८. आनंदाने परत आल्यावर तथागतांना सर्व हकीकत सांगितली.

११. दुसर्या दिवशी आनंदाचा शोध करीत ती मुलगी जेतवनात आली. आनंद भिक्षेसाठी बाहेर पडला होता. त्याने तिला पाहिले आणि तो तिला टाळू लागला. परंतु तो जिथे गेला तिथे तिथे ती मुलगीही त्याच्या मागोमाग गेली.

२०. जेव्हा आनंद जेतवनात परतला तेव्हा आपल्या विहाराजवळ ती मुलगी उभी असल्याचे त्याने पाहिले.

२१. या मुलीने आपला कसा पिच्छा पुरविला आहे हे आनंदाने तथागतांना सांगितले. भगवंतांनी तिला बोलाविण्या सांगितले.

२२. मुलगी समोर आल्यावर तथागतांनी तिला प्रश्न केला, "तू आनंदाचा पिच्छा का पुरवीत आहेस?" मुलगी म्हणाली, "त्यांच्याशी मला लग्न करायचे आहे. ते अविवाहित असल्याचे ऐकले आहे व मीही अविवाहित आहे."

२३ भगवंत म्हणाले, "आनंद हा भिक्खु आहे; आणि त्याच्या डोक्यावर केस नाहीत. जर तूही संपूर्ण मुंडन केलेस तर मग काय करता येईल ते मी पाहीन."

२४. मुलीने उत्तर दिले, "माझी तयारी आहे" भगवंत म्हणाले, "मुंडन करण्याविषयी तू आपल्या आईची संमती मिळविली पाहिजेस."

२५. मुलगी आईकडे आली आणि म्हणाली, "आई, तुला जे करता आले नाही ते मी केले आहे. मी मुंडन केले तर आनंदाशी माझे लग्न करण्याचे वचन भगवंतांनी दिले आहे."

२६. आई रागावली आणि म्हणाली, "तू तसे मुळीच करता कामा नये. तू माझी मुलगी आहेस आणि तू केस राखलेच पाहिजेस. आनंदासारख्या श्रमणांशी लग्न करण्यास तू इतकी का उतावीळ झाली आहेस? त्यापेक्षा चांगल्या माणसाशी मी तुझे लग्न लावून देईन."

२७. तिने उत्तर दिले, "मी आनंदाशीच लग्न करीन किंवा प्राण देईन माझ्यापुढे तिसरा पर्याय नाही."

२८. आई म्हणाली, "तू माझा अपमान का करीत आहेस?" मुलगी म्हणाली, "जर तुझे माझ्यावर प्रेम असेल तर माझ्या इच्छेप्रमाणे मला करू दे."

२९. आईने आपला विरोध मागे घेतला आणि मुलीने मुंडन करून घेतले.

३०. नंतर ती तथागतांच्या समोर गेली आणि म्हणाली, "आपण सांगितल्या प्रमाणे मी मुंडन केले आहे."

३१. तथागतांनी तिला विचारले, "तुला काय पाहिजे आहे? त्याच्या शरीराचा कोणता भाग तुला आवडतो?" मुलगी म्हणाली, "माझे त्यांच्या नाकावर प्रेम आहे. त्यांच्या मुखावर प्रेम आहे, त्यांच्या कानावर माझे प्रेम आहे, त्यांच्या आवाजावर माझे प्रेम आहे, त्यांच्या डोळयांवर माझे प्रेम आहे. आणि त्यांच्या चालण्याच्या पद्धतीवर माझे प्रेम आहे."

३२. तेम्हा भगवंत त्या मुलीला म्हणाले, "डोळे हे अश्रूंचे घर आहे, नाक हे घाणीचे घर आहे, तोंड हे थूंकीचे घर आहे, कान हेही मळाचे घर आहे आणि शरीर हे मलमूत्राचे आगर आहे, हे तुला माहित आहे काय ?"

३३. "जेव्हा स्त्रि-पुरुष एकत्र येतात तेव्हा ते संतती निर्माण करतात. परंतु जेथे जन्म आहे तेथे मृत्यूही आहे; जेथे मृत्यु आहे तेथे दुःखही आहे. मुली, आनंदाशी लग्न करून तुला काय मिळणार आहे, हे मला कळत नाही."

३४. मुलगी विचार करू लागली आणि आनंदाशी लग्न करण्याचा तिने जो इतका आग्रह धरला होता त्यात काही अर्थ नाही हे तिने मान्य केले व भगवंतांना तसे सांगितले.

३५. भगवंतांना वंदन करून ती त्यांना म्हणाली, "अज्ञानामुळे मी आनंदाच्या मागे लागले होते. आता माझ्या मनात प्रकाश पडला आहे. माझी स्थिती वादळात सापडलेल्या पण नंतर किनार्यास सुरक्षित पोचलेल्या नौकेवरील नाविकासारखी झाली आहे. निराश्रित झालेल्या वृद्धाला आश्रय मिळावा अशी मी झाले आहे. आंधळयाला नवी दृष्टी लाभावी अशी माझी स्थिती झाली आहे. भगवन्तानी आपल्या सदुपदेशाने मला झोपेतून जागे केले आहे."

३६. "प्रकृती, तू भाग्यवान आहेस; कारण तू चांडालिका असलीस तरी कुलीन स्त्रि-पुरुषांपुढील आदर्श आहेस. तू हीन जातीची आहेस पण ब्राम्हणही तुझ्यापासून धडा घेतील. न्याय आणि सदाचरण यांच्या मार्गावरुन तू ढळू नकोस म्हणजे सिंहासनावरील राजवैभव भोगणार्या राण्याही तुझ्यापुढे फिक्या पडतील."

३७. विवाहाचा प्रश्न मिटल्यामुळे भिक्खुणींच्या संघात प्रवेश करणे हा एकच मार्ग तिच्यापुढे होता.

३८. त्याप्रमाणे तिने आपली इच्छा प्रकट केल्यावर जरी ती अंत्यज होती तरीही तिला संघात प्रवेश देण्यात आला.

# भाग आठवा: पतित व गुन्हेगार यांची धम्मदीक्षा

## १. एका उडाणटप्पूची धम्मदीक्षा

१. प्राचीनकाळी राजगृहात एक गुंड राहात होता. तो आईवडिलांना आणि वरिष्ठांना मुळीच मान देत नसे. आपल्या हातून काही चूक झाली तरी पुण्यप्राप्तीच्या आशेने तो यज्ञयाग आणि सूर्य, चन्द्र व अग्नी यांची पूजा करी आणि मगरमस्त राही.
२. परंतु, पूजा आणि बलिदान यांसारखे शारीरीक कष्टाचे विधी कितीही केले तरी, सतत तीन वर्षे दीर्घोद्योग करूनही त्याच्या मनाला शांती लाभेना.
३. शेवटी श्रावस्तीला जाऊन भगवान बुद्धांची चौकशी करण्याचे त्याने ठरविले. तेथे पोहोचल्यावर बुद्धाचे तेजस्वी व्यक्तीमत्व पाहून त्याने त्यांच्या पायांवर लोटांगण घातले आणि आपल्याला किती आनंद झाला आहे, हे सांगितले.
४. नंतर भगवंतांनी त्याला पशुंना बळी देण्यातील मूर्खपणा आणि ज्या विधीचा हृदयावर काहीही परिणाम होत नाही, आणि ते ज्यांच्यासाठी करावयाचे त्यांच्याविषयी कसलाही आदरभाव किंवा कर्तव्यबुद्धी यांची जाणीव होत नाही, अशा विधींचा निरुपयोगीपणा समजावून सांगितला. आणि शेवटी भगवंतांनी अशा काही तेजस्वी गाथा म्हटल्या की, त्यांच्या मुद्रेवरील तेजामुळे आजूबाजूच्या सर्व प्रदेशासह ते स्थान प्रकाशमान झाले.
५. तेव्हा ग्रामस्थ आणि विशेषत: मुलाचे आईबाप त्यांची पूजा करण्यासाठी तेथे आले.
६. मुलाच्या त्या मातापित्यांना पाहुन आणि आपल्या मुलाच्याविषयी त्यांनी सांगितलेली हकीकत ऐकून बुद्धांनी स्मित केले आणि पुढील गाथा म्हटल्या.
७. "थोर पुरुष हा संपूर्णपणे निरिच्छ असतो. तो स्वतः स्वयंप्रकाशित असतो आणि तो प्रकाशातच राहतो. जर एखाद्या वेळी त्याच्यावर दुःखाचा आघात झाला तरी तो विचलित होत नाही. निर्भयपणे तो आपली बुद्धिमत्ता व्यक्त करतो."
८. "शहाणा मनुष्य (भद्र) ऐहिक व्यवहाराशी आपला संबंध ठेवीत नाही; संपत्ती, संतती, जमीनजुमला यांची त्याला इच्छा नसते. नेहमी शीलाचे सावधानतेने पालन केल्यामुळे आणि प्रज्ञेचा मार्ग अनुसरल्यामुळे तो भलत्याच सिद्धान्ताच्या (संपत्तीच्या किंवा मानाच्या) नादी लागत नाही."
९. "अस्थिर जीवन हे वाळवंटातील वृक्षाप्रमाणे असते. हे ओलखून प्रज्ञावान मनुष्य अस्थिर मनाच्या आपल्या मित्राला सुधारण्याचा आणि अपवित्रतेतून सद्गुणाकडे (पावित्र्याकडे ) त्याला वळविण्याचा प्रयत्न करीत असतो."

## २. अंगुलीमाल नावाच्या दरोडेखोराची धम्मदीक्षा

१. कोशल देशाचा पसेनदी (प्रसेनजित ) नावाचा राजा होता. त्याच्या राज्यात अंगुलीमाल नावाचा एक आडदांड दरोडेखोर होता. खून आणि रक्तपात यामुळे त्याचे हात नेहमी रक्ताने बरबटलेले असत आणि तो

कुणालाही कधी दया दाखवीत नसे. त्याच्यामुळे गावे ओसाड झाली होती; नगराची नासधूस झाली होती आणि प्रदेश उद्ध्वस्त झाले होते.

२. ठार मारलेल्या प्रत्येक माणसाचे एक एक बोट कापून घेऊन तो त्यांची माळ गळयात घालीत असे आणि म्हणूनच त्याचे नाव "अंगुलीमाल" असे पडले.

३. एकदा भगवन्त श्रावस्ती येथे जेतवनात राहात असताना त्यांनी अंगुलीमालाने केलेल्या नासधुशीविषयी ऐकले. तथागतांनी त्याला सदाचरणी मनुष्य बनविण्याचे ठरविले. म्हणून एके दिवशी भोजन झाल्यावर आपला बिछाना बाजूला ठेवला आणि आपले चीवर व भिक्षापात्र घेऊन ते दरवडेखोर अंगुलीमाल याला शोधण्यासाठी निघाले.

४. ते त्या बाजूला प्रवास करीत चाललेले पाहून गुराखी, मेंढपाळ, शेतकरी आणि वाटसरू मोठयाने ओरडले, "श्रमण, त्या वाटेने जाऊ नका! त्या वाटेने तुम्ही डाकू अंगुलीमालाच्या हाती पडाल."

५. "दहा, वीस, तीस, इतकेच नव्हे तर चाळीस माणसे देखील जरी एकत्र जमुन त्या वाटेने गेली तरी तो सगळा जथा त्या डाकूच्या हाती सापडतो." परंतु एकही शब्द न बोलता भगवंत आपल्या वाटेने चालू लागले.

६. दुसर्यांदा आणि पुन्हा तिसर्यांदा जवळपास असलेल्या लोकांनी त्यांना पुन्हा इशारा दिला. तरीदेखील एकही शब्द न बोलता भगवंत आपल्या वाटेने चालतच राहिले.

७. काही अंतरावरून त्या दरवडेखोराने भगवंतांना येत असताना पाहिले आणि जेथे चाळीस पन्नास प्रवाश्यांचा जथा देखील त्याच्या वाटेने जाण्यास धजत नसे तेथे हा तपस्वी त्या वाटेने एकटाच येत असलेला पाहून त्याला फार आश्चर्य वाटले; आणि 'या तपस्व्याला' ठार मारण्याचा विचार त्याच्या मनात आला. म्हणून ढाल-तलवार आणि धनुष्यबाण घेऊन तो भगवंताचा पाठलाग करू लागला.

८. भगवंत जरी आपल्या नेहमीच्याच चालीने चालत होते. तरी सर्व प्रयत्न करूनही तो दरोडेखोर त्यांना गाठू शकला नाही.

९. तो विचार करू लागला की, "ही मोठी आश्चर्याची आणि विचित्र गोष्ट आहे. यापूर्वी हत्ती, घोडा, गाडी किंवा हरीण भरवेगात धावत असताना देखील मी त्यांना पकडीत असे आणि आता हा तपस्वी आपल्या नेहमीच्या चालीने चालत असताना सर्व प्रयत्न करूनही मी त्याला गाठू शकत नाही!" म्हणून तो थांबला आणि मोठ्याने ओरडून त्याने भगवन्तांना थांबण्यास सांगितले.

१०. दोघांची भेट झाल्यावर भगवंत म्हणाले, "अंगुलीमाला, मी तुझ्यासाठी थांबलो आहे. दुष्कर्म करण्याचा आपला व्यवसाय तू सोडून देशील काय? तुला आपलासा करावा, सदाचरणाच्या मार्गावर तुला आणावा म्हणून मी तुझ्या मागोमाग आलो आहे. तुझ्यातील साधुत्व अजून मेलेले नाही. जर त्याला तू संधी देशील तर त्यामुळे तुझ्यात बदल घडून येईल."

११. भगवतांच्या शब्दांनी भारल्यासारखे अंगुलीमालाला वाटले आणि तो म्हणाला, "अरेरे, या ऋषीने माझा माग काढलाच."

१२. त्याने उत्तर दिले, "आपण आपल्या दिव्य वाणीने मला आपल्या दुष्कर्माचा त्याग करावयास सांगता आहात म्हणून मी तसा प्रयत्न करावयास तयार आहे."

१३. स्वतः ठार केलेल्या लोकांच्या बोटाची आपल्या गळयातील माळ त्याने एका खोल खड्डयात फेकून दिली

आणि भगवंताचे पाय धरून संघप्रवेशाची इच्छा व्यक्त केली.
१४. देवांचे आणि मानवांचे मार्गदर्शक भगवान बुद्ध म्हणाले, “हे भिक्खू, माझ्या मागोमाग ये.” आणि ही आज्ञा झाल्यापासून अंगुलीमाल भिक्खु बनला.
१५. आपल्या परिवारातील एक भिक्खु म्हणून अंगुलीमालाला बरोबर घेऊन भगवंत श्रावस्तीला आपल्या सुखनिवासाकडे निघाले. त्या वेळी राजा पसेनदीच्या अन्तःप्रासादाच्या दाराशी लोकांचा प्रचंड समुदाय जमला होता आणि “आपण जिंकलेल्या प्रदेशात अंगुलीमाल या नावाचा एक दांडगा डाकू अत्याचार करुन निरुपद्रवी लोकांना ठार करतो आहे, किंवा जखमी करतो आहे आणि स्वतः मारलेल्या लोकांच्या बोटांची एक माळ आपल्या गळयात घालण्यात धन्यता मानतो आहे, त्याचा निःपात करा” असे तो समुदाय ओरडत होता. पसेनजिताने त्याला मारण्याचे आश्वासन दिले; पण त्यात प्याला यश आले नाही.
१६. एके दिवशी सकाळी राजा प्रसेनजित भगवंताना भेटण्यासाठी जेतवनात गेला. भगवंतानी विचारले, “राजा, काय झाले? मगधाच्या सेनीय बिंबिसाराचा, वैशालीच्या लिच्छवींचा किंवा दुसर्या एखाद्या शत्रूचा त्रास सुरू झाला आहे काय?”
१७. “नाही भगवन्; तशा प्रकारचा कोणताही त्रास नाही. माझ्या राज्यात अंगुलीमाल या नावाचा एक दरोडेखोर आहे. त्याने माझ्या राज्यात धुडगूस घातला असून तो माइया प्रजाजनांवर अतिशय अत्याचार करीत असतो. त्याचा मला निःपात करावयाचा आहे; पण मी त्यात अयशस्वी ठरलो आहे.”
१८. “राजा, मुंडन केलेला काषायवस्त्र धारण करून भिक्खुसारखा दिसणारा, जो कोणाला मारीत नाही, जो चोरी करीत नाही, खोटे बोलत नाही, जो दिवसातून एक वेळच जेवतो आणि श्रेष्ठ जीवन जगतो, अशा अंगुलीमालाला तू पाहिलेस तर तू काय करशील?”
१९. “भगवन, मी त्याला वंदन करीन, त्याला भेटण्यासाठी उठून उभा राहीन, किंवा त्याला बसण्याचे आवाहन करीन अथवा वस्त्रे व इतर आवश्यक वस्तु स्वीकारण्या विषयी त्याला विनंती करीन किंवा त्याच्या रक्षणाची आणि सुरक्षितेची व्यवस्था करीन. परंतु असल्या दुष्ट आणि पापी माणसावर सद्गुणाची छाया तरी पडणे कधी शक्य आहे काय?”
२०. त्या क्षणी आपल्या अगदी जवळ बसलेल्या अंगुलीमालाकडे आपला उजवा हात दाखवून भगवंत म्हगाले, “राजा, हा पहा अंगुलीमाल!”
२१. हे ऐकताच राजा भयाने निःशब्द झाला आणि त्याच्या अंगावरील केस न् केस ताठ उभे राहिले. हे पाहून भगवंत म्हणाले, “भिऊ नकोस, राजा. भिऊ नकोस. या ठिकाणी भिण्याचे काही कारण नाही.”
२२. त्यामुळे राजाची भीती कमी झाली आणि तो स्थविर अंगुलीमालाजवळ जाऊन म्हणाला, “आपण खरोखर अंगुलीमाल आहात काय?” होय, “महाराज!”
२३. “महाशय, आपल्या पित्याचे गोत्र कोणते होते? आणि आपल्या मातेचे कोणते?” “माइया पित्याचे गोत्र गार्ग्य होते आणि माझ्या मातेचे गोत्र मंत्राणी (मैत्रायणी) होते.
२४. “गार्ग्य मैत्रायणीपुत्रा, सुखी हो, आपल्या सर्व गरजा पुरविण्याची मी काळजी घेईन.”
२५. परंतु आता अंगुलीमालाने वनवासाची, भिक्षेवर जगण्याची व तिहीपेक्षा अधिक चिवरे न वापरण्याची प्रतिज्ञा केली होती. म्हणून आपल्याला तीन वस्त्रे वापरायला मिळाली आहेत या कारणास्तव त्याने राजाने देऊ

केलेले साहाय्य नाकारले.

२६. नंतर राजा भगवंताच्या जवळ गेला आणि त्यांना वंदन करून एका बाजूला बसल्यावर म्हणाला, “आश्चर्य आहे भगवंत, खरोखर हे आश्चर्य आहे. अमानुषाला माणसाळविण्याची, अपराजिताला पराभूत करण्याची आणि अशांताला शांत करण्याची भगवंतांची केवढी ही किमया! हा असा पुरुष आहे. ज्याला काठीने किंवा तरवारीने मी जिंकू शकलो नाही, परंतु काठी किंवा तरवार यांचा मुळीच उपयोग न करता भगवन्तांनी त्याला जिंकले! भगवंत, मला आता गेलेच पाहिजे. कारण बरीच कामे मला अद्याप उरकावयाची आहेत.

२७. “राजन, आपल्या मर्जीप्रमाणे होऊ द्या.” नंतर आपल्या आसनावरून उठून राजाने भगवंतांना अत्यंत आदराने अभिवादन केले व तो निघून गेला.

२८. एके दिवशी चीवर परिधान करून आणि हातात भिक्षापात्र घेऊन अंगुलीमाल भिक्षेसाठी श्रावस्तीत गेला असताना एका माणसाने त्याला वीट फेकून मारली, तर दुसर्याने सोटा मारला; तिसर्याने खापरीचा तुकडा त्याच्यावर फेकून मारला. त्यामुळे त्याचे डोके रक्तबंबाळ झाले. त्याच्या भिक्षापात्राचे तुकडे तुकडे झाले व त्याची वस्त्रे फाटून गेली आणि तशा स्थितीत तो भगवंताच्या समोर येऊन उभा राहिला. तो जवळ येत असताना भगवंत त्याला म्हणाले, “हे सगळे सहन कर. हे सगळे सहन कर.”

२९. याप्रमाणे भगवान बुद्धाची शिकवण स्वीकारून डाकू अंगुलीमाल एक संतपुरुष बनला.

३०. मुक्तीचा आनंद व्यक्त करीत तो म्हणाला, “ज्याच्या ठायी पूर्वी अनास्था होती तो आता आस्था दाखवू लागतो, आपले पूर्वजीवन जो सद्गुणांनी झाकून टाकतो आणि आपल्या तारुण्यात जो बुद्धाला शरण जातो तो वादळातून मुक्त झालेल्या चंद्राप्रमाणे सर्व पृथ्वीला प्रकाशमान करतो.”

३१. “माझ्या शत्रूंनी ही शिकवण समजून घ्यावी व या मार्गाचा अवलंब करावा आणि सतत त्या मार्गाने अवलंबन करणार्या प्रज्ञापुत्रांना त्यांनी अनुसरावे. माझ्या शत्रूंनी विनम्रता आणि क्षमाशीलतेचा संदेश वेळीच ऐकावा आणि आपल्या जीवनात तो आचरणात आणावा.”

३२. “स्वत:ला ‘अंगुलीमाल’ म्हणवून व प्रवाहपतित होऊन मी दरोडेखोराचे जीवन जगत होतो, पग भगवंतांनी त्या प्रवाहातून मला किनार्याला आणले. ‘अंगुली माल’ म्हणून मी रक्ताने माखलेला होतो; आता माझा उद्धार झाला आहे.”

## ३. इतर गुन्हेगारांची धम्मदीक्षा

१. राजगृहाच्या दक्षिणेस शुमारे २०० योजने दूर एक पर्वत होता.

२. या पर्वतात एक घोर आणि निर्जन अशी दरी होती आणि तिच्यातून दक्षिण भारताकडे जाणारा एक रस्ता होता.

३. पाचशे दरवडेखोर या ठिकाणी राहात असत अरणि त्या वाटेने जाणार्या प्रवाश्यांची लूटमार आणि खून करीत.

४. त्यांना पकडण्यासाठी राजा आपले सैन्य पाठवीत असे; परंतु ते नेहमी निसटून जात.

५. जवळच राहात असलेल्या भगवान बुद्धांनी या लोकांच्या स्थितीचा विचार केला. त्यांना स्वत:च्या वर्तनाचे स्वरूप कळत नव्हते आणि जरी भगवंत त्यांना शिकविण्यासाठी त्या जगात आले होते तरी ते त्या लोकांच्या

दृष्टीस पडले नव्हते. किंवा त्यांच्या धम्माची माहितीही त्यांच्या कानांवर पडली नव्हती म्हणून भगवंतानी त्यांच्याकडे जाण्याचे ठरविले.

६. आपल्या निश्चयानुसार त्यांनी श्रीमंत माणसाचा वेष धारण केला. खड्ग आणि धनुष्य यांसह, उत्तम झूल घातलेल्या उमद्या घोड्यावर ते स्वार झाले. त्याच्या जीनाला सोन्या-चांदीच्या पिशव्या लटकत ठेवल्या होत्या व घोड्याचा लगाम मौल्यवान जडजवाहीर लावून सजविला.

७. दरीत शिरल्याबरोबर त्यांचा घोडा जोराने खिंकाळला; तो आवाज ऐकल्या बरोबर ते पाचशे दरवडेखोर निघाले आणि त्या प्रवाशाला पाहुन उद्गारले : " लूट करण्याची अशी संधी आपल्याला कधी मिळाली नव्हती; चला, जल्दी करून आपण त्याला पकडू या."

८. तो प्रवासी निसटून जाऊ नये म्हणून ते त्याला घेरू लागले. पण त्याला पाहाता क्षणी ते जमिनीवर पडले.

९. ते जमिनीवर पडल्यानंतर उद्गारले, " अरे देवा हे काय आहे? अरे देवा हे काय आहे?"

१०. त्यावर त्या प्रवाश्याने त्या डाकूंना समजावून सांगितले की, ह्या सर्व संसाराला घेरून टाकणारे दु:ख एवढे प्रचंड आहे की, त्याच्या मानाने ते डाकू दुसर्याला जे दु:ख देतात किंवा स्वत: सोसतात त्याच्या यातना काहीच नाहीत. अश्रद्धा आणि संदेह यामुळे ज्या जखमा आणि यातना निर्माण होतात, त्या, ते डाकू दुसर्यांना ज्या जखमा आणि यातना करतात किंवा स्वत: सोसतात त्यापेक्षा अधिक आहेत. धर्मोपदेश एकाग्रतेने ऐकण्याने जी प्रज्ञाजागृती होते त्यांनीच ह्या अश्रद्धा व संदेहाच्या जखमा भरुन येऊ शकतात. दुसर्या कशाने त्या भरु शकत नाहीत. नंतर तो प्रवासी पुढे म्हणाला:

११. " दु:खासारखी यातना देणारी जखम दुसरी कोणतीही नाही. दुष्कृत्या सारखा खोलवर रुतणारा दुसरा कोणताही तीक्ष्ण बाण नाही. धार्मिक शिकवणुकीच्या एकनिष्ठ परिपालनाखेरीज यावर दुसरा कोणताही उपाय नाही. या शिकवणुकीमुळे आंधळ्याला दुष्टी मिळते, भ्रांत झालेल्यांना ज्ञान प्राप्त होते."

१२. "आंधळ्यांना दृष्टी मिळावी त्याप्रमाणे या शिकवणुकीमुळे लोकांना या प्रकाशामुळे मार्गदर्शन होते."

१३. " म्हणुन, अश्रद्धा दूर करण्यास, दु:ख नाहीसे करण्यास आणि आनंद मिळवून देण्यास ही धम्माची शिकवण समर्थ आहे. जे ती ऐकतात त्यांनाच ही सर्व श्रेष्ठ प्रज्ञा प्राप्त होते."

१४. " ज्याने सर्वांत अधिक पुण्य संपादिले आहे तोच ह्या पदवीला पात्र ठरतो."

१५. हे ऐकल्यावर त्या दरोडेखोरांना आपल्या दुष्ट जीवनाचा पश्चात्ताप झाला. त्यांच्या अंगात रुतलेले बाण गळून पडले आणि त्यांच्या जखमा भरून निघाल्या.

१६. नंतर ते भगवंतांचे शिष्य झाले. आणि त्यांना स्वास्थ व शांति यांचा लाभ झाला.

## ४. धम्मीक्षेची जोखीम

१. पूर्वी भगवान बुद्ध राजगहापासून ५०० योजने अंतरावर असलेल्या एका पर्वतमय प्रदेशात राहात होते. त्या पर्वतमय प्रदेशात १२२ लोकांची एक टोळी राहात होती. हे लोक शिकार करून मारलेल्या जनावरांचे मांस खाऊन आपला उदरनिर्वाह करीत.

२. भगवान बुद्ध त्या ठिकाणी जातात आणि नवरे शिकारीला गेले असताना तेथे दिवसा घरी एकट्याच

राहिलेल्या स्त्रियांना ते धम्मदीक्षा देतात. त्या वेळी ते पुढीलप्रमाणे उपदेश करतात.

३. "जो दयाळू आहे तो प्राण्याची हत्या करीत नाही. (किंवा प्राण्याची हत्या न करणे हा दयाळू माणसाचा धर्म होय. ) तो प्राण्यांच्या जीवाचे रक्षण करण्यास नेहमी समर्थ असतो."

४. धर्म अमर आहे; या धर्माचे पालन करणार्यांवर कधीही संकट कोसळणार नाही."

५. "विनयशीलता, ऐहिक भोगाविषयीची उपेक्षा, कोणाला कष्ट न देणे, कोणाला क्रोध येईल असे न करणे, हे ब्रम्हलोकाचे लक्षण आहे."

६. दुर्बलाविषयी कणव, बुद्धाच्या शिकवणुकीनुसार शुद्ध जीवन, किती आवश्यक आहे याची जाणीव, आवश्यक ते मिळाल्यावर थांबणे जन्ममरणाच्या फेर्यातून सुटण्याचे हे साधन आहे. हे शब्द ऐकताच त्या स्त्रियांचे परिवर्तन झाले. आणि पुरुष परत आल्यानंतर भगवंतांना ठार मारण्याची जरी त्या पुरुषांची इच्छा होती तरी त्यांच्या स्त्रियांनी त्यांना आवरुन धरले आणि हे मैत्रीचे सूक्त ऐकताच त्यांचेही परिवर्तन झाले.

७. आणि भगवन्तांनी पुढील उद्गार काढले.

८. "जो प्राणिमात्रांशी मैत्रीभावाने वागतो आणि त्यांच्याविषयी दयाशील असतो अशा माणसाला अकरा गोष्टींचा लाभ होतो."

९. "त्यांचे शरीर नेहमी निरोगी (सुखी) असते; त्याला शांत झोप येते आणि तो अभ्यासमग्न असतो. त्या वेळीही त्याला एकाग्रता लाभते."

१०. "त्याला वाईट स्वप्ने पडत नाहीत. देव त्याचे रक्षण करतात आणि माणसे त्याच्यावर प्रेम करतात. विषारी वस्तूंचा त्याला त्रास होत नाही. आणि युद्धातील नाशापासून त्याचा बचाव होतो; अग्नी व पाणी यांचा उपसर्ग त्याला पोहोचत नाही."

११. तो जिथे जिथे राहातो तिथे तिथे यशस्वी होतो आणि मेल्यानंतर ब्रम्ह लोकात जातो. हेच ते अकरा लाभ होत.

१२. हा उपदेश ऐकल्यावर भगवंतांनी त्या स्त्रिया आणि पुरुषांना संघात प्रवेश दिला आणि त्यामुळे त्यांना शांती लाभली.

# तृतीय खंड: भगवान बुद्धाने काय शिकविले?


भाग पहिला - धम्मामध्ये बुद्धाचे स्थान

भाग दुसरा - भगवान बुद्धाच्या धम्मासंबंधी

भाग तिसरा - धम्म म्हणजे काय?

भाग चवथा - अधम्म म्हणजे काय?

भाग पाचवा - सदधम्म म्हणजे काय?

# भाग पहिला: धम्मामध्ये बुद्धाचे स्थान

## १. भगवान बुद्धाने आपल्या धम्मात स्वतःसाठी विशेष स्थान राखलेले नाही

१. ख्रिस्त हा स्वतःला खिश्चन धर्माचा प्रणेता मानीत असे.
२. शिवाय तो आपणाला देवपुत्र मानीत असे.
३. माणसाने ख्रिस्त हा देवपुत्र आहे असे जोपर्यंत मानले नाही, तोपर्यंत त्याला मुक्ती नाही अशी ख्रिस्ताची अट होती.
४. अशा रीतीने ख्रिस्ताने ख्रिस्ती धर्मीयांची मुक्ती, ख्रिस्ताला प्रणेता व देवपुत्र मानण्यावर अवलंबून ठेवल्याने त्याने ख्रिस्ती धर्मात स्वतःसाठी विशेष स्थान निर्माण केले.
५. इस्लाम धर्माचा प्रणेता, महंमद हा स्वतःला परमेश्वराचा पैगंबर ( प्रेषित ) मानीत असे.
६. याशिवाय तो असे मानीत असे की, माणसाने दोन अटी मान्य केल्या शिवाय त्याला निजात (मुक्ती ) नाही.
७. इस्लाम धर्मातील मुमुक्षूने प्रथम महंमदास देवाचा ( प्रेषित ) मानले पाहिजे.
८. इस्लाम धर्मातील मुमुक्षूने नंतर महंमद हा परमेश्वराचा शेवटचा पैगंबर आहे असे मानले पाहिजे.
९. इस्लाम धर्मात वरील दोन अटी मानण्यार्यांनाच मोक्षाचा मार्ग खुला आहे.
१०. मुसलमानांचा मोक्ष हा महंमदाला 'देवप्रेषित' समजण्यावर अवलंबून ठेवल्यामुळे महंमदाने आपणा स्वतःला इस्लामी धर्मात स्थान निर्माण केले आहे.
११. भगवान बुद्धाने अशी कधीही अट घातली नाही.
१२. शुद्धोदन आणि महामाया यांचे आपण औरस पुत्र आहोत ह्यापलीकडे स्वतःसंबधी तो अधिक काही म्हणत नाही.
१३. येशू ख्रिस्त आणि महंमद यानी आपापल्या धर्मशासनात स्वतःसाठी जशी विशेष स्थाने निर्मिली, मोक्षाच्या मार्गात आपले महत्व सांगितले, तसे भगवान बुद्धाने केलेले नाही.
१४. ह्यामुळेच त्यांच्या वैयक्तीक जीवनासंबंधी विपुल माहिती उपलब्ध असता नाही ती आपल्यापर्यंत येऊन पोहोचली नाही.
१५. पहिली बुद्धसंगीती ही बुद्धाच्या निर्वाणानंतर लवकरच भरविली गेली हे सर्वश्रुतच आहे.
१६. या संगीतीच्या अध्यक्षस्थानी काश्यप हा होता आणि त्या वेळी बुद्धाच्या कपिलवस्तुचेच रहिवाशी आणि ज्यांनी त्याच्याबरोबर त्याच्या निर्वाणकाळापर्यंत परिभ्रमण केले ते आनंद आणि उपाली त्या संगीतीला उपस्थित होते.
१७. परंतु अध्यक्ष काश्यपाने काय केले?
१८. त्याने आनंदाला धम्माचे पठण करायला सांगून संगीतीला प्रश्न केला, ‘हे बरोबर आहे काय?’ ज्या ज्या वेळी संगीती होकारात्मक उत्तर देई, त्या त्या वेळी काश्यप त्या प्रश्नावर अधिक चर्चा होऊ न देता तो प्रश्न तिथेच संपवी.

१९. यानंतर त्याने उपालीला विनयाचे पाठ म्हणायला सांगितले आणि संगीतीला विचारले, 'हे बरोबर आहे काय?' संगीतीने होकारात्मक उत्तर देताच त्या प्रश्नावर अधिक चर्चा न वाढविता अध्यक्ष काश्यप तो प्रश्न तिथेच संपवी.
२०. ह्या पठणानंतर वस्तुत: काश्यपाने संगीतीत उपस्थित असलेल्या कोणाला तरी भगवान बुद्धांच्या जीवनातील काही महत्वाच्या घटना कथन करण्याची आज्ञा द्यावयास हवी होती.
२१. परंतु काश्यपाने असे काहीच केले नाही. त्याने असा विचार केला असावा की, संघाला आपण विचारलेल्या केवळ दोन प्रश्नांशीच कर्तव्य आहे.
२२. काश्यपाने भगवान बुद्धाच्या जीवनातील प्रमुख घटनांचे संकलन केले असते तर आज आपणाला भगवान बुद्धाचे संपूर्ण चरित्र उपलब्ध झाले असते.
२३. भगवान बुद्धाच्या जीवनातील घटनांचे संकलन करण्याचे काश्यपाला का सुचले नसावे?
२४. केवळ उपेक्षा हे त्याचे उत्तर होऊ शकत नाही. ह्याचे उत्तर म्हणजे भगवान बुद्धाने आपल्या धम्मशासनात आपणा स्वत:साठी विशेष स्थान निर्मिलेले नाही हेच होय.
२५. भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म या दोन अगदी अलग गोष्टी होत.
२६. भगवान बुद्ध स्वत:ला आपल्या धम्मशासना पासून अलग मानीत असे. याचे दुसरे उदाहरण म्हणजे आपला उत्तराधिकारी नेमण्यास त्याने दिलेला नकार.
२७. दोन तीन वेळेला त्याच्या अनुयायांनी, त्याच्या पश्चात अधिकार ज्याने चालवायचा त्याचा निर्देश करण्याची विनंती केली.
२८. आणि प्रत्येक वेळी भगवान बुद्धाने तसे करण्याचे नाकारले.
२९. धम्म हाच आपला स्वत:चा उत्तराधिकारी, असे त्याचे प्रत्येक वेळी उत्तर असे.
३०. धम्म हा स्वत:च्या अंगच्या सामर्थ्यानेच जगला पाहिजे. त्याच्या मागील माणसांच्या सत्तेने नव्हे.
३१. ज्या धम्माला जगायला पाठीमागे माणसांच्या सत्तेचे बळ लागते, तो धम्मच नव्हे.
३२. धम्माची सत्ता चालावयास प्रत्येक वेळी, संस्थापकाचे नाव घेणे आवश्यक भासत असेल, तर तो धम्मच नव्हे.
३३. धम्म आणि त्यातील आपले स्थान यांसबंधी भगवान बुद्धाचा दुष्टीकोन अशा प्रकारचा होता.

## २. बुद्धाने मोक्षदानाचे आश्वासन दिले नाही. तो म्हणे, मी 'मार्गदाता' आहे, ' मोक्षदाता' नव्हे.

१. बहुतेक धर्म हे साक्षात्कारी धर्म म्हणून वर्णिले जातात, परंतु भगवान बुद्धाचा धम्म हा साक्षात्कार नव्हे.
२. साक्षात्कारी धर्म म्हणजे 'मी तुमचा निर्माता आहे, माझी पूजा करून आत्म्याला मोक्ष मिळवून द्या' असे प्राणिमात्रास सांगणारा देवाचा संदेश.
३. हा संदेश बहुधा एखाद्या नियुक्त व्यक्तीच्या म्हणजे प्रेषिताच्या मार्फत पाठविलेला असतो. त्या संदेशाचा प्रेषिताला साक्षात्कार झालेला असतो. आणि प्रेषित लोकांना तो साक्षात्कार उघड करून सांगतो. मग त्याला धर्म

असे म्हणतात.

४. प्रेषिताचे काम म्हणजे त्याच्या धर्माशी इमान राखणार्यांचा मोक्ष-लाभ निश्चित करणे.

५. धर्माशी इमान राखणार्यांचा मोक्ष म्हणजे, जर ते प्रेषिताला देवदूत मानीत असतील आणि त्याने आणलेल्या देवाच्या आज्ञा पाळीत असतील तर त्याची नरकातील पाठवणीपासून सुटका करणे.

६. भगवान बुद्ध आपण प्रेषित किंवा देवदूत आहोत, असला अधिकार कधीच सांगत नसे आणि असे कोणी मानल्यास त्याचे खंडण करीत असे.

७. अधिक महत्वाचा मुद्दा म्हणजे भगवान बुद्धाचा धम्म हा एक शोध होता आणि म्हणून जे धर्म साक्षात्कारी म्हणून समजले जातात त्यापासून तो अगदी वेगळा समजला पाहिजे.

८. भगवान बुद्धाचा धम्म हा एक शोध आहे, असे म्हणण्याचे कारण पृथ्वीवरील मानवी जीवनाच्या सखोल अभ्यासातून तो उद्भवलेला आहे. ज्या स्वाभाविक प्रवृत्तीत मनुष्य जन्म घेतो, त्यांच्या क्रिया-प्रक्रिया आणि इतिहास व परंपरा ह्यांच्यामुळे त्यांना मिळालेले इष्टानिष्ट वळण ह्यांच्या संशोधनाचा परिणाम म्हणजे बुद्ध धम्म.

९. सर्व प्रेषित मोक्षाचे आश्वासन देतात. मोक्षाचे आश्वासन न देणारा भगवान बुद्ध हाच एक गुरु आहे. मोक्षदाता आणि मार्गदाता यांमध्ये त्याने विभाजक रेषा काढली आहे. एक मोक्ष देणारा आहे तर दुसरा केवळ मार्ग दाखविणारा आहे.

१०. भगवान बुद्ध हा केवळ मार्गदाता होता. मोक्ष हा ज्याचा त्याने आपल्या श्रमाने मिळवावयाचा आहे.

११. आपले हे मत, मोग्गलान ह्या ब्राम्हणाला खालील सूक्तात भगवान बुद्धाने स्पष्ट करून सांगितले आहे.

१२. एकदा भगवान श्रावस्तीत मिगार मातेच्या पूर्वाराम प्रासादात उतरले होते.

१३. नंतर मोग्गलान हा गणक ( हिशेब ठेवणारा ) ब्राम्हण तथागतांजवळ आला आणि स्नेहाने अभिवादन करून त्यांच्या बाजूला बसला. कुशलक्षेम विचारल्यावर तो गणक मोग्गलान तथागताला म्हणाला.

१४. "श्रमण गौतमा, ज्याप्रमाणे माणसाला या प्रासादाचे दर्शन क्रमश: होते. पाऊल पुढे पडते, क्रमश: पुढील मार्ग दिसतो. हळूहळू पायर्या चढून शेवटची पायरी येते, त्याप्रमाणे आम्हा ब्राम्हणांचे शिक्षण क्रमश: घडते, म्हणजेच आमचे वेदाध्ययन घडते."

१५. "श्रमण गौतमा, ज्याप्रमाणे अंकगणनेत आणि धनुर्विद्येत पायरी पायरीने प्रगती होते, त्याप्रमाणेच आम्हा ब्राम्हणांची आपल्या शिक्षणक्रमात क्रमश: प्रगती होते.

१६. "जेव्हा आम्ही शिकवणी देतो तेव्हा शिष्याला एकी एक, दुरकी दोन, तिरकी तीन, चौके चार, असे शंभरांपर्यंत पाढे शिकवितो. गौतमा, आता सांग, तुझ्या धम्मामध्ये अशाच तर्हेचे प्रगतीशील शिक्षण तुझ्या शिष्यांना मिळते काय?"

१७. "होय ब्राम्हणा, असेच मिळते. ब्राम्हणा, एखाद्या अश्वविद्येतील निपुण पुरुषाचे उदाहरण घेऊ. तो प्रथम जातिवंत घोडा घेऊन, त्याला लगाम घालून पहिला धडा देतो. नंतर तो त्याला अधिकाधिक शिकवू लागतो."

१८. "ब्राम्हणा, अगदी त्याप्रमाणेच तथागत शिकाऊ माणसाला हाताशी धरतात आणि त्याला पहिला पाठ असा देतात. बंधु! शीलवान हो आणि कर्तव्याच्या जाणीवेने स्वत:ला संयमित कर."

( प्रतिमोक्षाचे नियम पाळीत जा. )

१९. "सदाचारसंपन्न हो! क्षुद्र दोषातही भय आहे, हे ओळखून स्वत:चे वर्तन ठेव. विनयाचे परिपालन कर."

२०. हे सर्व तो शिकल्यानंतर तथागत त्याला असा दुसरा पाठ देतात, " ये! श्रमणा ये! डोळयांनी वस्तु पाहिली असता तिच्या बाह्य देखाव्याने अथवा तपशिलाने भारला जाऊ नकोस."

२१. संयमरहित चक्षुरिंद्रियाने रूपग्रहण करताना ज्या सतृष्ण वृत्ती पाण्याच्या पुराप्रमाणे माणसाच्या चित्ताला बुडवून टाकतात त्या दुर्वृत्तींना ताब्यात ठेवण्याचा सतत प्रयत्न करीत रहा. चक्षुरिंद्रियाविषयी सावधान रहा. चक्षुरिंद्रिये संयमित ठेव.

२२. इतर इंद्रियांबाबतही असाच निग्रह कर. जेव्हा कानाने एखादा आवाज ऐकतोस, नाकाने वास घेतोस, जिव्हेने रुची घेतोस, शरीराने वस्तुला स्पर्श करतोस आणि ज्या वेळी तुझ्या मनाला त्या वस्तूंची जाणीव होते, त्या वेळी त्या वस्तुंच्या सामान्य दर्शनाने अथवा तपशिलाने मोहून जाऊ नकोस."

२३. शिष्यांनी असे इंद्रिय-प्रभुत्व मिळविले की, नंतर तथागत त्याला दुसरा असा पाठ देतात, "श्रमणा ये, हात राखून खात जा, खाताना चित्त सावध राहू दे. केवळ एक खेळ, किंवा शरीराचे चोचले अथवा वैयक्तीक शरीरसौष्ठव राखण्यासाठी म्हणून खाऊ नकोस. तर शरीरयष्टी ठीक राहावी, तिचे पोषण व्हावे, तिला इजा होऊ नये आणि श्रेष्ठ जीवन जगता यावे यासाठी अन्न भक्षण करावे. भोजनसमयी मनात सदोदित हा विचार असावा की, मी माझ्या पहिल्या वेदनांचा (Feelings) निग्रह करीत आहे. नव्या वेदना उत्पन्न होऊ देणार नाही. माझी जीवनयात्रा निर्दोष आणि सुखपूर्ण होईल."

२४. नंतर हे ब्राम्हणा, श्रमण अन्नभक्षणाचा निग्रह शिकला की, तथागत त्याला पुढे असा पाठ देतात, " श्रमणा, ये! जागृततेचा ( सती ) अभ्यास कर. दिवसा, चालता बसता, तू चित्तशुद्धीचा प्रयत्न कर! रात्रीच्या पहिल्या प्रहरीसुद्धा येरझार्या करीत किंवा एका जागी बसून चित्तशुद्धीची साधना करीत राहा. दुसर्या प्रहरी उजव्या कुशीवर सिंहासारखा एक पाय दुसर्या पायावर ठेवून पडून राहा आणि सावध राहून बुद्धीपुरस्सर व एकाग्रतेने चित्तशुद्धीचा विचार कर. तिसर्या प्रहरी ऊठ आणि येरझारा करीत किंवा बसून आपले चित्त, चित्तमलापासून परिशुद्ध कर."

२५. हे ब्राम्हणा, तो श्रमण जागृततेचा अभ्यासी झाल्यावर तथागत त्याला दुसरा पाठ देतात, तो असा "श्रमणा ये! जागरूकता आणि स्मृती ( सम्यक् जाणीव ) यांनी युक्त हो. पुढे जाताना किंवा मागे येताना आत्मसंयम राखीत जा. पुढे किंवा मागे पाहताना, वाकताना किंवा विसावा घेताना, अंगात वस्त्रे घालताना किंवा वस्त्रे आणि भिक्षापात्र नेत असताना, खाताना, चघळताना, स्पर्श करताना, शरीर व्यापार करताना चालताना, उभे असताना, निद्रिस्त असताना किंवा सावध असताना, बोलताना किंवा मौन धारण केलेले असताना सदैव स्मृतीयुक्त म्हणजेच जाणीवपूर्वक संयम राखीत जा."

२६. नंतर हे ब्राम्हणा, त्या शिष्याला आत्मसंयम साधता आला तर तथागत त्याला पुढील पाठ देतात. "श्रमणा ये. एखादे एकांताचे स्थान शोधून, मग ते अरण्य असो, एखादा वृक्ष असो, पर्वतगुहा असो, पर्वतगुंफा असो, स्मशानस्थान असो, वनगुल्म असो, आकाशाखालील मोकळी जागा असो, अथवा गवत-पें ढ्यांच्या राशी जवळची जागा असो. तसे एखादे एकांत स्थान तू शोधून काढ आणि अन्नभक्षण केल्यानंतर आसनमांडी ठोकून, शरीर ताठ ठेवून चार प्रकारच्या ध्यानांचा अभ्यास कर."

२७. "हे ब्राम्हणा, जे श्रमणशिष्य आहेत, ज्यांनी मनोनिग्रह अद्यापी साधलेला नाही; परंतु तो तसा साधण्याची ज्यांना इच्छा आहे त्याना मी असे क्रमिक शिक्षण देतो."

२८. "परंतु ज्यांनी अर्हतपद प्राप्त केले आहे, ज्यांनी आसवांचा नाश केला आहे, ज्यांनी आपल्या जीवनाचा उद्देश साधला आहे, जे कृतकृत्य झाले आहेत, ज्यांनी आपल्या शिरावरील भार उतरून दिला आहे, मोक्ष मिळविला आहे, ज्यांनी भवबंधनाचा उच्छेद केला आहे, प्रज्ञेने जे विमुक्त झाले आहेत, त्यांना वरील अभ्यासक्रम आपले वर्तमान जीवन सुखपूर्ण आणि जागरूकतेने संयमित राखण्यास उपकारक ठरतो."

२९. तथागताचे हे भाषण ऐकून तो गणक ब्राह्मण म्हणाला.

३०. "परंतु गौतमा, मला हे सांग की, तुझे सर्व शिष्य अशा तर्हेची परिपूर्णता किंवा निर्वाण मिळवू शकतात काय ? किंवा काहीना ते मिळविताना अपयश येते काय?"

३१. "ब्राम्हणा, माझ्या काही श्रावकांना असा उपदेश केला असताना आणि त्याचा त्यांनी अभ्यास केला असताना काहीना निर्वाण साधता येते आणि काहीना ते साधता येत नाही."

३२. परंतु गौतमा, याचे कारण काय ? तिथे ते निर्वाण आहे, इथे हा निर्वाणाकडे जाण्याचा मार्ग आहे. इथे श्रमण गौतमासारखा थोर गुरु आहे. मग ज्यांना तू असा उपदेश केला आहेस, शिक्षण दिले आहेस, त्यांच्यापैकी काहीनाच फक्त निर्वाण साध्य व्हावे व काहीना होऊ नये हे कसे?"

३३. "ब्राम्हणा, त्या प्रश्नाचे तुला मी उत्तर देतो. परंतु प्रथम माझ्या एका प्रश्नाचे तुला योग्य वाटेल तसे उत्तर द्यावे लागेल. सांग, तुला राजगृहाचा रस्ता पुरा माहीत आहे काय?"

३४. "होय; मला तो पूर्ण माहीत आहे."

३५. "बरे. मग ह्या रसत्यासंबधी पुरी माहिती दिली असताना एक मनुष्य चुकीचा मार्ग धरतो आणि पश्चिमेकडे चालू लागतो."

३६. "नंतर दुसरा मनुष्य येतो, तो मार्गनिर्देशासबंधी तुला विनंती करतो, तू त्याला त्याच सूचना करतोस, तो तुझ्या सूचनेप्रमाणे वागतो आणि सुरक्षितपणे राजगृहाला जाऊन पोहोचतो."

३७. ब्राम्हण बोलू लागला, "त्याला मी काय करणार? फक्त मार्ग दाखविणे हे माझे काम आहे."

३८. "ब्राम्हणा, मग मी काय करतो, हे तू ताडले असशीलच. तथागत फक्त मार्गच दाखवितो."

३९. या सूक्तावरून स्पष्ट होते की, बुद्ध हा मोक्षाची आश्वासने देत नाही. तो फक्त मार्ग दाखवितो.

४०. आणि मोक्ष म्हणजे काय?

४१. महंमद आणि येशू ख्रिस्त यांच्या शिकवणुकीत मोक्ष म्हणजे प्रेषिताच्या मध्यस्थीने नरकात जाण्यापासून जीवाला वाचवणे.

४२. भगवान बुद्धाच्या शिकवणुकीप्रमाणे मोक्ष म्हणजे निर्वाण ! आणि निर्वाण म्हणजे रागलोभादी विकाराचा निग्रह.

४३. अशा धर्मात मोक्षाचे वचनबद्ध आश्वासन कसे मिळणार?

## ३. भगवान बुद्धाने स्वत:संबंधी अथवा आपल्या धममासंबंधीअपौरुषेयतेचा दावा मांडला नाही. त्याचा धम्ममाणसाने माणसासाठी शोधून काढलेला आहे. तो अपौरुषेय म्हणजे साक्षात्कारी स्वरूपाचा नाही.

१. प्रत्येक धर्माच्या संस्थापकाने आपण किंवा आपली शिकवणूक दैवी असल्याचा हक्क सांगितला आहे
२. मोझेसने आपली उत्पत्ती दैवी असल्याचे म्हटले नाही, परंतु आपल्या शिकवणुका मात्र दैवी असल्याचे म्हटले आहे. त्याने आपल्या अनुयायांना सांगितले आहे की, दुधामधाच्या प्रदेशात ज्यांना जावयाचे असेल त्यांनी ही शिकवणूक मान्य केली पाहिजे. कारण तो जिव्होवाची म्हणजे ईश्वराचीच शिकवण आहे.
३. येशू ख्रिस्ताने आपण देवपुत्र असल्याचे स्वतःच सांगून दैवीपणावर हक्क सांगितला आहे, स्वाभाविकपणे त्याची शिकवणही दैवी झाली आहे.
४. कृष्ण तर म्हणत असे, मी स्वतः देव आहे आणि गीता हा माझा शब्द आहे.
५. भगवान बुद्धाने मात्र आपल्या शासनासंबंधी किंवा स्वत:संबंधी कधीही असा दावा मांडला नाही.
६. तो तर असे म्हणत असे की, आपण इतर माणसासारखे आहोत आणि आपला संदेश म्हणजे एका माणसाने आपणास दिलेला संदेश आहे.
७. आपला संदेश प्रमादातीत आहे, असे त्याने कधीच म्हटले नाही.
८. तो म्हणतो, माझा संदेश म्हणजे माझ्या मताप्रमाणे मोक्षाकडे जाण्याचा एकमेव सत्य मार्ग आहे.
९. त्याचे अधिष्ठान म्हणजे जगातील सर्व माणसांचा जगासंबंधीचा अनुभव !
१०. तो म्हणत असे की, त्यात कितपत सत्य आहे, हे पाहण्यासाठी त्यासंबंधी कोणताही प्रश्न विचारायला आणि त्याचे परीक्षण करायला सर्वांना स्वातंत्र्य आहे.
११. कोणाही धर्मसंस्थापकाने आपल्या धर्माला अशा प्रकारची कसोटी लावण्याचे आव्हान दिलेले नाही.

# भाग दुसरा: भगवान बुद्धाच्या धम्मसंबंधी

## १. इतरांच्या मताने बुद्धाने काय शिकविले ?

१. भगवान बुद्धाची शिकवणूक कोणती?

२. त्या प्रश्नासंबंधी त्याच्या कोणत्याही दोन अनुयायांत किंवा बौद्ध धम्माच्या अभ्यासकांत एकमत नाही.

३. काहीच्या मते समाधी हा त्याच्या शिकवणकोचा मुख्य गाभा आहे.

४. काहीच्या मते त्यात विपश्यना (म्हणजे एक प्रकारचा प्राणायाम) महत्वाची आहे.

५. काहीच्या मते बौद्ध धम्म म्हणजे केवळ दीक्षितांनाच सांगावयाचा गुप्त मंत्र आहे. तर इतरांना, तो एक, सर्वांना उद्देशून उघडपणे सांगितलेला धम्म वाटतो.

६. काहींच्या मते ती एक रूक्ष दर्शनपद्धती आहे.

७. काहीच्या मते तो केवळ गूढवाद आहे.

८. काहीच्या मते ते एक ऐहिक जीवनापासून स्वार्थी पलायन आहे.

९. काहीच्या मते हृदयातील सर्व वासना आणि भावना यांचा पद्धतशीर विरोध शिकविणारे ते शास्त्र आहे.

१०. बौद्ध धम्मासबंधीचा आणखी पुष्कळच भिन्नमतांचा संग्रह करता येईल.

११. ही मतभिन्नता आश्चर्यकारक आहे.

१२. यांपैकी काही मते एकांगी विचारवंतांची आहेत. असे लोक म्हणजे ज्यांना बौद्धधम्माचे सार, समाधी, विपश्यना किंवा दीक्षितांना प्राप्त होणार्या गुप्त मंत्रात आहे असे वाटते ते लोक.

१३. दुसरी मते, प्राचीन भारतीय इतिहासाच्या अम्यासकांनी बौद्धधम्मासंबंधी जे लिहिले त्या बहुसंख्य लेखकांच्या लेखनाचा परिणाम होय. या लेखकांचा बौद्ध धम्म हा मूळ अभ्यासाचा विषय नसतो. त्यांचा या विषयाचा अभ्यास केवळ आकस्मिक आणि नैमित्तिक स्वरूपाचा असतो.

१४. त्यांच्यापैकी कोणीही बौद्ध धम्माचे अभ्यासक नसतात.

१५. धम्माचा उद्गम आणि विकास याचा विचार करणारे जे मानवशास्त्र त्याचेही ते अभ्यासक नसतात.

१६. प्रश्न असा उद्भवतो की, भगवान बुद्धाला काही सामाजिक संदेश सांगावयाचा नव्हता काय?

१७. या प्रश्नाचे उत्तर देण्याचा आग्रह धरला असता बौद्ध धम्माचे विद्यार्थी दोन मुद्यांचा हवाला देतात. ते म्हणतात-

१८. भगवान बुद्धाने अहिंसा शिकविली.

१९. भगवान बुद्धाने शांती शिकविली.

२०. त्यांना आणखी असा प्रश्न केला की, भगवान बुद्धाने त्याशिवाय दुसरा काही सामाजिक संदेश दिला काय?

२१. भगवान बुद्धाने न्याय शिकविला काय?

२२. भगवान बुद्धाने प्रेम ( मैत्री ) शिकविले काय?

२३. भगवान बुद्धाने स्वातंत्र्य शिकविले काय?

२४. भगवान बुद्धाने समता शिकविली काय?
२५. भगवान बुद्धाने बंधुता शिकविली काय?
२६. भगवान बुद्ध कार्ल मार्क्सला उत्तर देऊ शकतो काय?
२७. बौद्ध धम्माची चर्चा करताना हे प्रश्न प्रायः क्वचितच उपस्थित केले जातात.
२८. माझे असे उत्तर आहे की, भगवान बुद्धाला एक सामाजिक संदेश द्यावयाचा होता. तो वरील सर्व प्रश्नांची उत्तरे देतो; परंतु ही सर्व उत्तरे आधुनिक लेखकांनी आपल्या लेखनात अगदी गाडून टाकली आहेत.

## २. भगवान बुद्धाने स्वतः केलेले वर्गीकरण

१. भगवान बुद्धाने आपल्या धम्माचे एक वेगळेच वर्गीकरण केले आहे.
२. पहिल्या वर्गाला त्याने धम्म ही संज्ञा दिली.
३. त्याने एक नवा वर्ग निर्मिला आणि त्याला अधम्म असे नाव दिले. तथापि तो धम्म ह्याच नावाने ओळखला गेला.
४. त्याने तिसराही एक वर्ग निर्मिला आणि त्याला सद्धम्म अशी संज्ञा दिली.
५. हा तिसरा वर्ग म्हणजे धम्माच्या तत्वज्ञानाचे दुसरे नाव होय.
६. भगवान बुद्धाचा धम्म समजण्यासाठी धम्म, अधम्म आणि सद्धम्म ह्या तीनही वर्गांची ओळख करून घेतली पाहिजे.

# भाग तिसरा: धम्म म्हणजे काय ?

## १. जीवन-शुचिता राखणे म्हणजे धम्म

(क)

(१) १. जीवन-शुचितेचे तीन प्रकार आहेत. देहशुचिता म्हणजे काय?

२. माणसाने हिंसा, चोरी आणि मिथ्याचार यांच्यापासून विरत होणे याला देहशुचिता म्हणतात.

३. वाकशूचिता म्हणजे काय?

४. वाकशूचिता म्हणजे असत्य भाषणापासून विरत होणे.

५. आणि मनःशुचिता म्हणजे काय?

६. मनःशुचितेत भिक्षूला कामवासना झाल्यास कळते की, आपल्यामध्ये वैषयिक कामवासना उत्पन्न झाली आहे आणि जर तशी उत्पन्न झाली नसेल तर तेही त्याला कळते. त्याप्रमाणेच आता उत्पन्न न झालेली कामवासना कशी उत्पन्न होते आणि तशी उत्पन्न झाल्यावर तिचा त्याग कसा करता येतो आणि अशी कोणत्या प्रकारे पुढे कधीही उत्पन्न होणार नाही, हे सर्व त्याला कळते.

७. त्याच्या ठिकाणी द्वेष ( व्यापाद ) उत्पन्न झाल्यास त्याला कळते. त्याप्रमाणेच द्वेषाचा उद्भव, त्याचा त्याग आणि भविष्यात द्वेष कसा उत्पन्न होणार नाही, हे सर्व त्याला कळते.

८. त्याच्या ठिकाणी आळस, तंद्रा (स्त्यान-मृद्ध ) उद्धटपणा, शंका, गोंधळ उत्पन्न झाल्यास त्याची त्याला जाणीव होते. त्याप्रमाणेच या सर्व मानसिक दुःस्थितींचा उद्गम कसा होतो, त्याचा त्याग कसा करता येतो आगि तद्विरहित चित्तस्थिती कशी साधायची असते यांचे ज्ञान असणे म्हणजेच मानसिक शुचिता.

९. "जो काया वाचा मन शुद्ध पवित्र आहे, जो निष्पाप, स्वच्छ आणि पावित्र्ययुक्त आहे,

१०. त्याला लोक 'निष्कलंक' म्हणतात."

(ख)

(२) १. शुचितेचे तीन प्रकार आहेत कायेची, वाचेची आणि मनाची शुचिता.

२. कायेची शुचिता म्हणजे काय?

३. कायाशुचितेत मनुष्य हिंसा, चोरी, काम-मिथ्याचार यापासून परावृत्त होतो. याला कायाशुचिता म्हणतात.

४. वाकशुचिता म्हणजे काय?

५. वाकशुचितेत मनुष्य असत्य आणि व्यर्थ बडबड यांपासून दूर राहतो. त्याला वाकशुचिता म्हणतात.

६. मन:शुचिता म्हणजे काय?

७. मनःशुचितेत मनुष्य लोभ आणि ईर्षा यांपासून परावृत्त होऊन सम्यक् दृष्टी धारण करतो. याला मन:शुचिता म्हणतात, शुचितेचे हे तीन प्रकार आहेत.

(ग)

(३) १. पाच प्रकारच्या दुर्बलता आहेत. त्या साधनेला बाधक ठरतात. त्या कोणत्या?

२. जीवहिंसा, चोरी, काममिथ्याचार, असत्य भाषण, आळस वाढविणार्या मद्याचे सेवन.

३. ह्या पाच दुर्बलता साधनेतील अपयशाची पाच कारणे आहेत.

४. साधनेतील ह्या पाच बाधा दूर केल्यावर चार प्रकारच्या सावधानतेचा ( स्मृति-उपस्थानांचा ) मनात उद्भव घडेल असे वागले पाहिजे.

५. पहिल्या सावधानतेत भिक्षु, ऐहिक जीवनातील सर्वसामान्य असा लोभ आणि असंतोष यांवर विजय मिळवून, प्रयत्नपूर्वक जागरूकतेने आणि स्वाधीन चित्ताने, कायेला ती केवळ काया असे मानून ( कायानुपश्यना करीत ) जीवन व्यतीत करतो.

६. वेदनांना (Feelings) त्या केवळ वेदना आहेत असे मानून ( वेदनानुपश्यना करीत ) जीवन व्यतीत करतो.

७. चित्त, हे चित्त आहे असे मानून ( चित्तानुपश्यना करीत ) जीवन व्यतीत करतो.

८. चित्तात उत्पन्न होणारे विचार ( धर्म ) ते केवळ चित्तधर्म आहेत, असे मानून ( धर्मानुपश्यना करीत ) प्रयत्नपूर्वक, जागरूकतेने आगि स्वाधीनचित्ताने सर्व सामान्य लोभ आणि असंतोष यांच्यावर विजय मिळवितो.

९. जेव्हा साधनेतील पाच दुर्बलता दूर होतात तेव्हा चार सावधानतांचा ( स्मृति-उपस्थानाचा ) उदय होतो.

(घ)

(४) १. घात ( अपयश ) तीन प्रकारचे आहेत. शीलघात, चित्तघात, आणि दृष्टिघात.

२. शीलघात म्हणजे काय? जीवहत्या, चोरी कामभोगासंबंधी मिथ्याचार, असत्य भाषण, निंदा, कटु भाषण, व्यर्थ बडबड-हे सर्व शीलघातात अंतर्भूत होतात.

३. चित्तघात कोणत्या प्रकारचे असतात?

४. लोभ आणि दुष्टपणा हे चित्तघात होत.

५. दृष्टिघात कोणत्या प्रकारचे असतात?

६. दुष्टिघातामुळे माणुस असा विकृत दृष्टिकोन स्वीकारतो की, दान, त्याग, परित्याग यांमध्ये काहीच गुण नाही. सदाचार आणि दुराचार यांना काही फल नाही की त्याचा परिणामही घडत नाही. इहलोक नाही की परलोक नाही, आई नाही की बाप नाही, आणि प्राणी स्वोत्पन्नही नाही. या जगामध्ये ज्यांनी अत्युच्च शिखर गाठले आहे, पूर्णता मिळविली आहे, ज्यांना आपल्या आंतरिक शक्तीने या ऐहिक जगापली कडल्या जगाचा साक्षात्कार झाला आहे, आणि जे त्या जगाच्या अस्तित्वाची घोषणा करू शकतात असे श्रमण आणि ब्राम्हण या जगात नाहीत, असे जे समजतात त्या लोकांच्या ठिकाणी हे भिक्षूहो, दृष्टिघात झाला आहे असे समजावे.

७. भिक्खुंनो ! शीलघात, चित्तघात आणि दृष्टिघात या तीन घातांमुळे प्राण्याला मरणानंतर दुर्गती प्राप्त होते, असे हे तीन घात आहेत.

८. भिक्खुंनो, लाभ तीन प्रकारचे असतात. ते म्हणजे शीललाभ, चित्तलाभ, दृष्टिलाभ.

९. शीललाभ म्हणजे काय?

१०. “हिंसा, चोरी, मिथ्याचार, असत्य भाषण, निंदा, कटु भाषण, व्यर्थ बडबड यांच्यापासून परावृत्त होणे म्हणजे शीललाभ होय.”

११. चित्तलाभ म्हणजे काय?

१२. “लोभ आणि दुष्टपणा यांपासून दूर राहणे म्हणजे चित्तलाभ होय.”

१३. दृष्टिलाभ म्हणजे काय?

१४. “दान, त्याग, परित्याग यांमध्ये काही पुण्य आहे, सदाचार आणि दुराचार यांची फळे आणि परिणाम भोगावे लागतात, इहलोक आपिा परलोक आहे, आईबाप आणि स्वोत्पन्न प्राणी आहेत, ज्यांना या जगापलीकडील दुसर्या जगाचा साक्षात्कार झाला आहे आणि जे तशी त्याची घोषणा करू शकतात असे श्रमण आणि ब्राम्हण आहेत, अशी दृढ समजूत म्हणजे दृष्टिलाभ. भिक्षुन्नो! या समजुतीला दृष्टिलाभ म्हणतात.”

१५. या तीन लाभांमुळेच प्राण्याला शरीरनाशानंतर दैववान स्वर्गीय सुगती लाभते. भिक्खुंनो, असे हे तीन लाभ आहेत.

## २. जीवनात पूर्णता साधणे म्हणजे धम्म होय

१. तीन प्रकारच्या पूर्णता असतात.

२. कायिक, वाचिक आणि मानसिक.

३. मानसिक पूर्णता कोणत्या प्रकारची असते?

४. आसवे अथवा चित्तमल पुरा नष्ट होऊन ह्या जीवनात संपूर्ण चित्त-विमुक्तीचा अनुभव घेणे, प्रज्ञेने आसवांपासून विमुक्ती मिळवून त्याच अवस्थेत सतत वर्तणे ह्यासच मानसिक पूर्णता म्हणतात.

५. आणखीही पारमिता आहेत, आणि भगवान बुद्धाने त्या सुभूतीला सांगितल्या.

६. सुभूति: बोधिसत्वाची दान-पारमिता कोणत्या प्रकारची असते?

७. तथागत: बोधिसत्व चित्ताच्या अवस्थांची जाणीव ठेवून अंतर्बाह्य वस्तुचे दान करतो आणि त्या सर्व प्राणिमात्रांना दिल्यावर ‘बोधि’ ला त्या अर्पण करतो. दुसर्यांनाही तो तसे करण्याची प्रेरणा देतो. कुठल्याही वस्तूबद्दल त्याच्या मनात आसक्ती नसते. ह्या अवस्थेला दान-पारमिता म्हणतात.

८. सुभूति: बोधिसत्वाची शील-पारमिता कशी असते?

९. तथागत: या पारमितेत तो स्वत: सदाचाराची दहा पथ्ये पाळीत असतो, आणि इतरांना तसे करण्याची प्रेरणा देतो.

१०. सुभूति: बोधिसत्वाची क्षान्ति-पारमिता कशी असते?

११. तथागत: या पारमितेत तो स्वत: क्षमाशील होऊन इतरांना तसे होण्याची प्रेरणा देतो.

१२. सुभूति: बोधिसत्वाची वीर्य-पारमिता कशी असते?

१३. तथागत: या पारमितेत तो पाचही पारमितांच्या परिपूर्तीत अखंड मग्न राहतो, आणि इतरांनाही तसेच करण्याची प्रेरणा देतो.

१४. सुभूति: बोधिसत्वाची समाधी ही पारमिता कशी असते?
१५. तथागत: या पारमितेत कौशल्याने तो ध्यान साधतो; तथापि तो तत्संबंधित रूप-लोकात परत जन्म घेत नाही, आणि इतरांनाही तो तसेच करण्याची प्रेरणा देतो.
१६. सुभूति: बोधिसत्वाची प्रज्ञा-पारमिता कशी असते?
१७. तथागत : या पारमितेत तो कोणत्याही एका धर्मात ( भौतिक अथवा आधिभौतिक ) मग्न न राहता सर्व धर्माच्या अभिजात स्वरूपाचे चिंतन करीत असतो, आणि तसे करण्यास इतरांना प्रेरणा देतो.
१८. अशा पारमिता अंगी बाणविणे यालाच धम्म म्हणतात.

## ३. निब्बाण प्राप्त करणे हा धम्म आहे

१. निब्बाणासारखे परमसुख दुसर्या कशानेही लाभत नाही असे भगवान बुद्धाचे वचन आहे.
२. भगवान बुद्धाने शिकविलेल्या सर्व सिद्धांताचा निब्बाण हा केन्द्रवर्ती सिद्धान्त आहे.
३. निब्बाण म्हणजे काय? बुद्धप्रणीत निब्बाण हे बुद्धपूर्व लोकानी सांगितलेल्या निब्बाणापेक्षा अर्थाने आणि आशयाने वेगळे आहे.
४. बुद्धपूर्व लोक निब्बाण म्हणजे आत्म्याचा मोक्ष असे मानीत असत.
५. चार प्रकारचा मोक्ष पूर्वी मानला जात असे. पहिला लौकिक म्हणजे खा-प्या, मजा करा-या जड-स्वरूपाचा. दुसरा यौगिक, तिसरा ब्राम्हणी आणि चौथा औपनिषदिक.
६. ब्राम्हणी आणि औपनिषदिक निब्बाण कल्पनेत एक साम्य होते. या दोनही कल्पनांत आत्म्याला स्वतंत्र अस्तित्व आहे, असे मानले जाई. भगवान बुद्धाने या सिद्धांतांचा निषेध केला आहे म्हणून निब्बाणविषयक ब्राम्हणी आणि औपनिषदिक शिकवणुकीचे खंडन करणे भगवान बुद्धाला कठीण गेले नाही.
७. निब्बाणाची लौकिक-कल्पना ही अत्यंत जड स्वरूपाची असल्यामुळे भगवान बुद्धास ती कधीच प्रिय नव्हती. कारण या लौकिक-कल्पनेत माणसाच्या प्राणी म्हणून ज्या ऐंद्रिय भुका असतात, त्यांचे शमन करणे, ह्यापलीकडे दुसरा आशय नाही. त्यात आध्यात्मिक असे काहीच नव्हते.
८. असली निब्बाणाची कल्पना मान्य करणे म्हणजे बुद्धाच्या मते मानवाची अत्यंत हानी करण्यासारखे आहे.
९. कारण ऐंद्रिय भुकांचे शमन करणे म्हणजे अधिक भुका निर्माण करण्यासारखे आहे. अशा प्रकारचा जीवनमार्ग कोणत्याही प्रकारचे सौख्य मिळवून देऊ शकत नाही. उलट त्याने येणार्या सुखाने अधिक दुःख निश्चितपणे वाट्यास येते.
१०. योगातील निब्बाण कल्पना म्हणजे एक केवळ तात्पुरती अशी अवस्था होती. त्याने मिळणारे सुख हे नकारात्मक स्वरूपाचे होते, आणि ते मिळविण्यासाठी सर्व संसार-पराडमुख व्हावे लागते. त्याच्या योगाने वेदना टाळता येतात; परंतु सुख मिळत नाही, आणि सुख मिळालेच तर ते योग चालू आहे तोपर्यंतच. ते स्थायी स्वरूपाचे नव्हते. अस्थायी स्वरूपाचे होते.
११. भगवान बुद्धाची निब्बाणविषयक कल्पना त्याच्या पूर्वीच्या मतप्रणाली पेक्षा वेगळी होती.
१२. त्याच्या निब्बाण कल्पनेत तीन विचारांचा अंतर्भाव होतो.

१३. आत्म्याच्या मोक्षाऐवजी प्राण्याचे सुख हा एक विचार.

१४. जिवंतपणी ह्या सर्व संसारात असताना मिळणारे सुख हा दुसरा विचार. आत्म्याचा मोक्ष आणि मृत्यूनंतर आत्म्याला मोक्ष मिळणे हे दोन विचार बुद्धाच्या निब्बाण कल्पनेला अगदी अपरिचित आहेत.

१५. भगवान बुद्धाच्या निब्बाण कल्पनेतील मूल आधार असा तिसरा विचार म्हणजे सदैव प्रज्वलित असणार्या विकारांच्या ज्वालांवर निग्रह साधणे.

१६. गयेत राहात असताना बुद्धाने भिक्खूंना जे प्रवचन दिले त्याचा मुख्य विषय राग आणि द्वेष हे प्रज्वलित अग्नीसारखे होत हा आहे. तो म्हणाला,

१७. "भिक्खू, अखिल संसार हा म्हणजे एक पेटता अग्नीच आहे आणि संसारातील कोणकोणत्या वस्तु जळत आहेत ?

१८. भिक्खुंनो! चक्षुरिंद्रिय हे पेटलेले आहे. रूप पेटलेले आहे. चक्षुसंस्कार हे पेटलेले आहेत. डोळयांनी होणारी जाणीव ( चक्षुसंस्कार ) ही पेटलेली आहे. चक्षुसंस्कारा पासून उद्भवणार्या सुखकारक, दुःखकारक, अदुःखकारक गोष्टी ह्याही जळत आहेत.

१९. आणि त्या कशामुळे पेटलेल्या आहेत?

२०. त्या रागाग्नीने, द्वेषाग्नीने, मोहाग्नीने, जन्म, जरा, मृत्यु, दुःख, दौर्मनस्य त्याप्रमाणेच उपायास आणि निराशा यामुळे जळत आहेत.

२१. भिक्खुंनो! श्रोत्रेंद्रिय जळत आहे. शब्द जळत आहे. घ्राणेंद्रिय जळत आहे. गंध जळत आहे. जिव्हा जळत आहे. रस जळत आहे. शरीर जळत आहे. चित्तातील संकल्प-विकल्प जळत आहेत. चित्तसंस्कारापासून ज्या सुखवेदना, दुःखवेदना, अदुःखवेदना उत्पन्न होतात. त्या सर्व वेदना जळत आहेत.

२२. आणि ह्या कशामुळे जळत आहेत?

२३. त्या रागाग्नीने, मोहाग्नीने, जन्म, जरा, मृत्यु, दुःख, दौर्मनस्य याप्रमाणेच उपायास त्यांच्यामुळे जळत आहेत.

२४. हे जाणल्यावर, भिक्षूंनो! प्रज्ञावान श्रेष्ठांच्या मनात उपेक्षा ( विरक्ती )उत्पन्न होते. या उपेक्षेमुळे त्यांच्या ठिकाणचे रागाग्नी आदि विकार मावळतात आणि विकाराच्या अभावामुळे तो मुक्त होतो आणि मुक्त झाल्यावर त्याला आपल्या मुक्तीची जाणीव होते.

२५. निब्बाणामुळे सुख कसे मिळते? या दुसर्या प्रश्नाचे उत्तर देणे आता आवश्यक आहे.

२६. एक सर्वसामान्य समजूत आहे की, माणसाला पुरेसे मिळाले नाही की, तो दुःखी होतो, परंतु ही समजूत काही त्रिकाळ सत्य नाही. भोवती समृद्धी आणि संपन्नता असूनसुद्धा मनुष्य दुःखी राहतो.

२७. हा लोभाचा परिणाम आहे आणि लोभ हा गरीब आणि श्रीमंत या दोघांच्याही जीवनाचा शाप आहे."

२८. हा विचार भिक्खूंना दिलेल्या एका प्रवचनात भगवान बुद्धाने स्पष्ट केला आहे.

२९. लोभाने लुब्ध आणि रागाने क्षुब्ध, मोहाने मूढ झाल्यामुळे माणसे स्वतःच्या व इतरांच्या दुःखाबद्दलचे विचार मनात घोळवू लागतात आणि त्यामुळे त्यांना मानसिक वेदना आणि पीडा अनुभवाव्या लागतात.

३०. परंतु जर लोभ, राग, मोह यांचा पूर्ण उच्छेद केला तर माणुस स्वतःच्या दुःखाने दुःखी होत नाही, त्याचप्रमाणे दुसर्याच्या दुःखाने दुःखी होत नाही. अथवा मानसिक वेदना आणि पीडा अनुभवीत नाही.

३१. आणि असे झाले की, बंधूंनो! ते हवेसे वाटणारे आणि आकर्षक आणि जे बुद्धिवान श्रावकांनाच साध्य असे ते

निब्बाणभविष्य जीवनात नव्हे तर ते इहजन्मी हस्तगत होऊ शकते.

३२. माणसाला दग्ध करणारे आणि त्याला असुखी करणारे असे, दुःखाचे मूळ कशात आहे, हे वरील प्रवचनात स्पष्ट झाले आहे. माणसांच्या रागद्वेषावर अग्नीचे रूपक योजून बुद्धाने येथे माणसाच्या असुखाचे परिणामकारक स्पष्टीकरण केले आहे.

३३. रागद्वेषाच्या आधीन होने मनुष्य दुःखी होतो. राग, द्वेष हे विकार म्हणजे मनुष्याच्या निब्बाणस्थितीपर्यंत पोहोचण्याच्या मार्गात अडचणी निर्माण करणार्या शृंखलाच आहेत. ज्या क्षणी मनुष्य ह्या विकारांपासून मुक्त होतो त्या क्षणीच तो निब्बाण मार्ग आक्रमू लागतो.

३४. भगवान बुद्धाच्या मते ह्या विकारांचे तीन प्रकारचे वर्ग आहेत.

३५. पहिल्या वर्गात तृष्णेतून उद्भवणारे कामुकता आणि लोभ हे विकार येतात.

३६. दुसर्या वर्गात वितृष्णेतून उद्भवणारे घृणा, क्रोध आणि द्वेष हे दोष येतात.

३७. तिसर्या वर्गात अविद्येतून उद्भवणारे जडता, मूर्खता आणि मूढता हे दोष येतात.

३८. पहिल्या (राग) व दुसर्या (द्वेष) अग्नीचा संबंध भावना आणि दुसर्या संबंधीचा दृष्टिकोन आणि भूमिका यांच्याशी निगडित आहे. तर तिसर्या प्रकारचा अग्नी (मोह) हा जे सर्व विचार सत्यापासून भिन्न असतात त्यांच्याशी निगडित आहे.

३९. भगवान बुद्धाच्या निब्बाण सिद्धांतासंबंधी काही गैरसमजुती आहेत.

४०. निब्बाण शब्दाचा व्युत्पत्तीदृष्टया अर्थ फुंकर घालून विझविणे किंवा मालविणे असा आहे.

४१. या शब्दाच्या व्युत्पत्तीचा आधार घेऊन टीकाकारांनी निब्बाणसिद्धांत अर्थहीन बनविला आहे.

४२. ते असे मानतात की, निब्बाण म्हणजे सर्व मानवी विकार मालविणे , आणि ही क्रिया मृत्यूसमान आहे.

४३. असा वाकडा अर्थ लावून त्यांनी निब्बाण सिद्धांत हास्यास्पद बनविण्याचा प्रयत्न केला आहे.

४४. टीकाकार लावतात तसा निब्बाणाचा अर्थ बुद्धाला अभिप्रेत नव्हता. हे जो कोणी अग्नी-प्रवचना ( अग्निस्कंधोपम सूक्ताचा ) भाषादृष्ट्या अभ्यास करतील त्यांच्या लक्षात येईल.

४५. अग्निस्कंधोपम सूक्तात जीवन म्हणजे अग्नी आणि मृत्यु म्हणजे तो मालविणे असे म्हटलेले नाही. तिथे म्हटले आहे की, रागाग्नी, द्वेषाग्नी आणि मोहाग्नी जळत आहेत.

४६. सर्व प्रकारज्या प्रवृत्तींना पूर्णपणे मालवून टाकावे असे अग्नीसूक्त म्हणत नाही. ते एवढेच म्हणते की, पेटत्या ज्वालेला अधिक इंधन पुरवू नका.

४७. दुसरी गोष्ट अशी की, टीकाकार निब्बाण आणि परिनिब्बाण यांत भेद न करण्यात चुकले आहेत.

४८. उदानात असे सांगितले आहे, “जेव्हा शरीर नाश पावते, पाहाणे थांबते, संज्ञा नाहीशा होतात, चलन-वलनादी क्रिया थांबतात, चेतना जाते, तेव्हा परिनिब्बाण घडते. परिनिब्बाण म्हणजे पूर्णपणे मालविणे, नाहीसे होणे.”

४९. निब्बाण ह्या शब्दाच्या ठिकाणी वरील अर्थ नाही. निब्बाण म्हणजे धम्म मार्गावर वाटचाल करता येईल इतका पुरेसा आपल्या प्रवृत्तीवर ताबा असणे. यापेक्षा निब्बाण शब्दात अधिक अर्थ अभिप्रेत नव्हता.

५०. निब्बाण हा निर्दोष जीवनाला प्रतिशब्द आहे हे बुद्धाने राधला एके ठिकाणी स्पष्ट करून सांगितले आहे.

५१. एकदा स्थविर राध तथागताकडे गेला. तथागतांना अभिवादन केल्यावर त्यांच्या समीप बसून त्याने

विचारले, "भगवान, निब्बाण म्हणजे काय?"
५२. भगवंतानी उत्तर दिले, "निब्बाण म्हणजे निर्दोष जीवन."
५३. "भगवान्, परंतु निब्बाणाचा उद्देश काय?"
५४. "राध, निर्दोष जीवन हा निब्बाणाचा उद्देश आहे. निब्बाण हे जीवनाचे ध्येय आणि साध्य आहे."
५५. निब्बाण म्हणजे मालविणे किंवा नाश नव्हे हे बुद्धाने सारिपुत्ताला पुढील प्रवचनात स्पष्ट केले आहे :
५६. एकदा भगवान श्रावस्तीतील अनाथ पिंडिकांच्या आश्रमात वास करीत होते. सारीपुत्तही त्या वेळी त्या ठिकाणी राहात होता.
५७. भिक्खुंना उद्देशून भगवन्त म्हणाले, "भिक्षुंनो, ऐहिक संपदेऐवजी धम्माचे तुम्ही दायाद व्हा. तुमच्याविषयी वाटणार्या करुणेने तुम्हाला धम्मातील वाटा मिळावा, म्हणून मी तुम्हांला धम्माचे दायाद बनवीत आहे.
५८. असे बोलून भगवान आपल्या गंधकुटीत गेले.
५९. सारीपुत्त मागे राहिला आणि भिक्षूंनी त्याला निब्बाणाचा अर्थ स्पष्ट करण्यास सांगितले.
६०. तेव्हा सारीपुत्त म्हणाला, "लोभ हा दोष आहे. द्वेष हा दोष आहे."
६१. "हा लोभ आणि हा द्वेष घालविण्याचा मार्ग, मध्यममार्ग होय. हा मार्ग आपल्याला पाहायला शिकवितो, जाणायला शिकवितो आणि ज्ञान देतो. तो आपणाला शांती, अभिज्ञा, बोधी आणि निब्बाण यांजकडे नेतो."
६२. "हा मध्यममार्ग कोणता? हा मध्यममार्ग म्हणजे अष्टांगमार्ग होय. त्याशिवाय दुसरा नाही. सम्यक् दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक् वाणी, सम्यक् कर्मान्त, सम्यक् आजीविका, सम्यक् प्रयत्न (व्यायाम ), सम्यक् स्मृती आणि सम्यक् समाधी. भिक्षूंनो, हा मध्यममार्ग आहे."
६३. "होय. क्रोध, द्वेष, ईर्षा, मत्सर, कृपणता, लालचीपणा, ढोंग, लबाडी, उद्धटपणा, मोह, प्रमाद, हे सर्व दुष्ट विकार आहेत."
६४. मोह आणि प्रमाद यांचा परिहार मध्यममार्गाने होतो; त्याच्या योगाने पाहायला दृष्टी मिळते. हा मार्ग आपणाला पाहायला शिकवितो आणि ज्ञान देतो आणि आपणाला शांती, अभिज्ञा, बोधी आणि निब्बाण यांकडे नेतो.
६५. निब्बाण हे दुसरे काही नसून तो अष्टांगमार्ग आहे.
६६. अशा रीतीने सारिपुत्ताने निब्बाणाचे प्रवचन केले आणि भिक्षूंना ते ऐकून आनंद वाटला.
६७. निब्बाणात जो मूलभूत विचार आहे तो म्हणजे अष्टांगमार्ग. अष्टांगमार्गाशिवाय निब्बाणाला दुसरा अर्थ नाही.
६८. प्रवृत्तींचा संपूर्ण अच्छेद आणि परिनिब्बाण ही दोन टोके आहेत आणि निब्बाण हा त्यातील मध्यममार्ग आहे.
६९. हे लक्षात घेतले असता निब्बाणाच्या कल्पनेसंबधीच्या गोंधळाचा निरास होईल.

## ४. तृष्णा-त्याग म्हणजे धम्म

१. धम्मपदामध्ये भगवान बुद्ध म्हणतो, सर्वात अधिक लाभदायक गोष्ट म्हणजे आरोग्य आणि सर्वात मौल्यवान धन म्हणजे संतोष.

२. या संतोषवृत्तीचा अर्थ दीनपणा किंवा परिस्थितीपुढील शरणागती हा नव्हे.

३. कारण तसा अर्थ करणे बुद्धाच्या शिकवणुकीविरुद्ध आहे.

४. निर्धन लोक धन्य होत असे बुद्धाने कधीही म्हटलेले नाही.

५. पीडिताने आपली परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करू नये, असे बुद्धाने कधीही सांगितलेले नाही.

६. उलट तो ऐश्वर्याचे स्वागतच करतो. दीनपणे प्राप्त परिस्थितीत खितपत पडण्यापेक्षा वीर्याने म्हणजे उत्साहपूर्वक प्रयासाने ती परिस्थिती बदलण्याचा तो उपदेश करतो.

७. जेव्हा भगवान बुद्ध म्हणतो की, संतोष हे सर्वश्रेष्ठ धन होय, तेव्हा त्याच्या म्हणण्याचा अर्थ एवढाच की, माणसाने अमर्याद अशा लोभाच्या आधीन होऊ नये.

८. भिक्खु रथपाल म्हणतो, 'माझ्यासमोर कित्येक श्रीमंत मनुष्य आहेत की, ते मुर्खपणाने यत्किंचितही दान न करता केवळ धन जमविण्याच्या उद्योगात गर्क असतात; त्यांची तृष्णा कधीही शमत नाही. ज्या राजांची राज्ये समुद्रापर्यंत पसरलेली असतात त्यांचाकडे पाहावे तर ते आपले साम्राज्य समुद्रापलीकडे फैलावण्यासाठी सारखे धडपडत असतात. प्राप्त आहे त्यापेक्षा अधिक प्राप्त व्हावे अशी इच्छा करीत राजे आणि त्यांची प्रजा या पृथ्वीतलावरून नष्ट होते. पाहिजे होते ते मिळालेले नाही या विचारातच त्यांचा देहत्याग घडतो. कामभोगाचे पुरेपूर माप कोणाच्याच पदरात पडत नाही.

९. महानिदान सूक्तांत भगवान बुद्धाने आनंदाला लोभ-संयमनाची महती सांगितली आहे; तेथे तो म्हणतो,

१०. "आनंद, लाभाच्या इच्छेने तृष्णा निर्माण होते, आणि जेव्हा त्या इच्छेचे मालमत्ता मिळविण्याच्या इच्छेत पर्यवसान होते, आणि जेव्हा ही स्वामित्वाची इच्छा मिळविलेले हातातून निसटू द्यायचे नाही असा चिवटपणा धारण करते, तेव्हा त्या इच्छेचे लोभात रूपान्तर होते."

११. लोभ अथवा अमर्याद धनसंग्रहाच्या इच्छेसंबंधी सतत सावध राहिले पाहिजे.

१२. ही तृष्णा किंवा हा लोभ आक्षेपार्ह का समजायचा? याचे कारण बुद्ध आनंदाला सांगतो ते असे की, पुष्कळच वाईट आणि दुष्ट गोष्टींचा त्याच्यापासून उद्भव होतो. मारामारी, आघात, झगडे, वादप्रतिवाद, भांडण, निंदा, असत्य ह्या सर्वांचे मूळ तृष्णा अथवा लोभ यांत आहे.

१३. वगकलहाचे हे यथातथ्य विश्लेषण आहे यात शंका नाही.

१४. म्हणूनच भगवान बुद्धाने लोभ आणि तृष्णा आपल्या काबूत ठेवली पाहिजे या शिकवणुकीवर भर दिला.

## ५. सर्व संस्कार अशाश्वत आहेत असे मानणे म्हणजे धम्म

१. अनित्यतेच्या सिद्धांताला तीन पैलू आहेत.

२. अनेक तत्वांनी बनलेल्या वस्तु अनित्य आहेत.

३. व्यक्तीगत रूपाने प्राणी अनित्य आहे.

४. प्रतीत्य समुत्पन्न वस्तुचे आत्मतत्व अनित्य आहे.

५. अनेक तत्वे मिळून बनलेल्या वस्तूंची अनित्यता बौद्धतत्ववेत्ता असंग याने चांगल्या प्रकारे स्पष्ट केली आहे.

६. असंग म्हणतो, 'सर्व वस्तु ह्या हेतू आणि प्रत्यय ह्यांमुळे उत्पन्न होतात. त्यांना त्यांचे असे अगदी स्वतंत्र

अस्तित्व नसते. हेतू प्रत्ययांचा उच्छेद झाला की, वस्तूंचे अस्तित्व ठरत नाही.

७. सजीव प्राण्याचे शरीर म्हणजे पृथ्वी, आप, तेज, आणि वायू-या चार महाभूतांचा परिणाम होय; आणि ह्या चार भूतांचे पृथक्करण झाले की, हा प्राणी, प्राणी म्हणून उरत नाही.

८. अनेक तत्वे मिळून झालेली वस्तु अनित्य आहे ह्या वचनाचा अभिप्राय वरील प्रकारचा आहे.

९. सजीव प्राण्याच्या अनित्यतेचे वर्णन 'तो नाही, तो होत आहे', ( Being is Becoming ) ह्या शब्दात करता येईल.

१०. ह्या अर्थाने पाहिले असता, जो प्राणी भूतकाळात जीवन व्यतीत करीत होता तोच प्राणी वर्तमानकाळात असू शकत नाही. आणि तोच प्राणी भविष्यकाळात असू शकणार नाही. भविष्यकाळी जो प्राणी असेल तो पूर्वी नव्हता आणि तोच आजही नाही. वर्तमानकाळी जो प्राणी आहे तोच पूर्वी नव्हता आणि पुढेही तोच असणार नाही.

११. थोडक्यात सांगायचे म्हणजे मनुष्यप्राणी हा परिवर्तनशील आणि संवर्धनशील आहे. आपल्या जीवनाच्या कोणत्याही दोन क्षणी तो तोच असू शकत नाही.

१२. अनित्यतेच्या सिद्धांताचा तिसरा पैलू सामान्य माणसाला समजायला कठीण आहे.

१३. प्रत्येक सजीव प्राणी केव्हा ना केव्हा तरी मरणार हे समजायला सोपे आहे.

१४. परंतु तो जिवंत असताना सारखा बदलत आहे किंवा बनत आहे हे समजावयास कठीण आहे.

१५. हे परिवर्तन कसे शक्य आहे? याला भगवान बुद्धाचे उत्तर असे : 'सर्वच अनित्य असल्यामुळे हे शक्य आहे.'

१६. ह्याच विचारसरणीतून पुढे शून्यवादाचा उदय झाला.

१७. बौद्ध शून्यवाद म्हणजे पूर्णपणे अनास्तित्ववाद नव्हे. त्याचा अर्थ एवढाच की, ह्या ऐहिक जगात प्रतिक्षणी परिवर्तन चालू आहे.

१८. शून्यतेमुळेच सर्व अस्तित्व शक्य होते ही गोष्ट फार थोड्यांच्या लक्षात येते. शून्यतेशिवाय काहीही शक्य झाले नसते. सर्व वस्तूंच्या स्वभावाच्या अनित्यतेवरच इतर दुसर्या वस्तूंचे अस्तित्व अवलंबून आहे.

१९. जर वस्तु सतत परिवर्तनशील नसत्या, नित्य व अपरिवर्तनशील असत्या, तर एका प्रकारापासून दुसर्या प्रकारात जीवनाचे जे उत्क्रमण आणि सजीव वस्तूंचा जो विकास चालला आहे त्याला विराम मिळाला असता.

२०. जर मनुष्यप्राणी मरणाधीन अथवा परिवर्तनशील नसता आणि एकाच स्थितीत तसाच राहिला असता, तर काय परिणाम झाला असता? असे झाले असते तर मानवजातीची प्रगती खुंटली असती.

२१. शून्य म्हणजे अभाव असे मानले असते तर मोठीच अनवस्था उद्भवली असती.

२२. परंतु तसे मानलेले नाही. शून्य हा एक बिंदूसमान पदार्थ असून त्याला आशय आहे, परंतु त्याला लांबी रुंदी नाही.

२३. भगवान बुद्धाचा उपदेश असा की, सर्व वस्तु अनित्य आहेत.

२४. भगवान बुद्धाच्या ह्या सिद्धांतापासून बोध काय घ्यावयाचा हा अति महत्वाचा प्रश्न आहे.

२५. या अनित्यतेच्या सिद्धांतापासून असा बोध घ्यावयाचा की, कोणत्याही वस्तुसंबंधी आसक्ती राखू नका.

२६. लोकांनी मालमत्ता, मित्र इत्यादीसंबंधी अनासक्तीचा अभ्यास करण्यासाठीच भगवान बुद्धाने म्हटले की, सर्व वस्तु अनित्य आहेत.

## ६. ‘कर्म’ हे जगातील नैतिक व्यवस्थेचा आधार आहेहे मानणे म्हणजे धम्म

१. ह्या पार्थिव जगात एक प्रकारची सुव्यवस्था आहे. खालील घटनांनी ती सिद्ध होते.

२. आकाशातील ग्रहगोलांच्या चलनवलनात-गतीत-एक प्रकारची सुव्यवस्था आहे.

३. ऋतुचक्रामध्येही सुव्यवस्था आहे.

४. काही विशिष्ट व्यवस्थेनुसारच बीजांचे वृक्ष होतात. वृक्षांपासून फळ उत्पन्न होते आणि फळापासून परत ‘बीज’ निर्माण होते.

५. बौद्ध परिभाषेत या व्यवस्थेला नियम म्हणतात. एकामागून एक सुव्यवस्थित निर्मिती दर्शविणार्या नियमांना ऋतुनियम, बीजनियम असे संबोधितात.

६. समाजामध्येही याच प्रकारचा नैतिक क्रम आहे. तो कसा उत्पन्न होतो? कसा राखला जातो?

७. जे ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेवतात त्यांना या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण नाही. त्याचे उत्तर सरळ आहे.

८. ते म्हणतात, ‘संसाराचा नैतिक क्रम हा ईश्वराच्या इच्छेचा परिणाम आहे. ईश्वराने संसार निर्माण केला आणि ‘ईश्वर’ हाच या संसाराचा कर्ता, धर्ता आहे. तोच भौतिक आणि नैतिक नियमांचा कर्ता आहे.

९. त्यांच्या मते नैतिक नियम माणसांच्या भल्यासाठी असतात; कारण ते ईश्वरी आज्ञास्वरूप आहेत. आपल्या निर्मात्या ईश्वराची आज्ञा पाळणे त्यांना क्रमप्राप्त आहे आणि ईश्वराच्या आज्ञेच्या परिपालनाने हा नैतिक क्रम चालू राहतो.

१०. जे नैतिक व्यवस्था ही ईश्वरी इच्छेचा परिणाम आहे असे मानतात त्यांचे विचार वरील प्रमाणे असतात.

११. ही व्याख्या मुळीच समाधानकारक नाही. कारण ईश्वर हा नैतिक नियमांचा जनक असेल, ह्या नैतिक नियमांचा आरंभ आणि अंत तोच असेल आणि माणसाला ईश्वराची आज्ञा पाळण्यापासून सुटका नसेल तर ह्या संसारात इतकी नैतिक अव्यवस्था का आढळते?

१२. ह्या ईश्वरी नियमाच्या मागे असा कोणता अधिकार आहे? ईश्वरी नियमांचा व्यक्तीवर काय अधिकार आहे? हे सयुक्तिक प्रश्न आहेत. परंतु जे लोक नैतिक व्यवस्था ही ईश्वरी इच्छेचा परिणाम आहे असे मानतात त्यांच्या जवळ या प्रश्नांना उत्तर नाही.

१३. ही अडचण दूर करण्यासाठी हा सिद्धान्त थोडा बदलला गेला आहे.

१४. असे म्हटले जाते की, परमेश्वराच्या आज्ञेनेच सृष्टी निर्माण झाली. हेही सत्य आहे की, ह्या सर्व विश्वाने परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे व मार्गदर्शनाप्रमाणेच आपल्या कार्यास आरंभ केला. हेही खरे आहे की, त्याने त्या सर्व विश्वाला एकदाच कायमची गती, शक्ती दिली आणि तीच त्या विश्वाच्या सर्व क्रियाशीलतेचे मूळ आहे.

१५. परंतु या उपरान्त ईश्वराने सृष्टीला प्रारंभी जे नियम घालून दिले आहेत. त्या नियमांनुसार कार्य करण्याचे स्वातंत्र्य बहाल केले आहे.

१६. म्हणूनच नैतिक व्यवस्था ईश्वरी इच्छेनुसार घडत नसेल तर तो दोष सृष्टीचा (प्रकृतीचा ) आहे, ईश्वराचा नाही.

१७. सिद्धान्तांत असा बदल करूनही वरील अडचण सोडविली जात नाही. या सिद्धांतातील बदलामुळे ईश्वरावर जबाबदारी (नैतिक व्यवस्थेची) फक्त पडत नाही. परंतु प्रश्न उरतोच की, ईश्वराने आपल्या नियमाचे परिपालन

करण्याचे सृष्टीवर (प्रकृतीवर) का सोपवावे? असल्या गैरहजर ईश्वराचा उपयोग काय?

१८. सृष्टीत नैतिक क्रम कसा राखला जातो या प्रश्नाला भगवान बुद्धाने दिलेले उत्तर अगदी भिन्न आहे.

१९. तथागतांचे उत्तर सोपे आहे. ते असे, नैतिक व्यवस्था ही ईश्वर सांभाळीत नसून ती कम्म (कर्म) नियमाप्रमाणे सांभाळली जाते.

२०. सृष्टीची नैतिक व्यवस्था चांगली असेल अथवा वाईट असेल, परंतु भगवान बुद्धाच्या मते ती माणसावर सोपविलेली आहे. इतर कोणावर नाही.

२१. 'कम्म' (कर्म) म्हणजे मनुष्याकडून केले जाते ते कार्य आणि विपाक म्हणजे त्याचा परिणाम. जर नैतिक व्यवस्था वाईट असेल तर त्याचे कारण मनुष्य अकुशल कम्म करतो हे आहे. नैतिक व्यवस्था चांगली असेल तर त्याचा अर्थ इतकाच की, मनुष्य कुशल कम्म (सत्कर्म ) करीत आहे.

२२. भगवान बुद्ध केवळ कर्मासंबंधीच बोलत नाहीत. ते ज्यांना कम्मनियम म्हणून ओळखतात त्या कम्माच्या नियमांचेही विवेचन करतात.

२३. कम्मनियमाचा बुद्धप्रणीत अभिप्राय असा की, ज्याप्रमाणे दिवसामागून रात्र येते त्याप्रमाणेच कर्मामागून त्याचा परिणाम येतो. हा एक नियम आहे.

२४. कुशल कर्मापासून होणारा लाभ प्रत्येक कुशल कर्म करणाराला मिळतो आणि अकुशल कर्माचा दुष्परिणाम कुणालाही टाळता येत नाही.

२५. म्हणून भगवान बुद्धाचा उपदेश असा; असे कुशल कर्म करा म्हणजे मानवतेला चांगल्या नैतिक व्यवस्थेचा लाभ होईल. कारण कुशल कम्मानेच नैतिक व्यवस्था राखली जाते. अकुशल कम्म करू नका, कारण त्यामुळे नैतिक व्यवस्थेची हानी होते आणि मानवता दु:खी होते.

२६. हे शक्य आहे की, कम्म आणि कम्माचा होणारा परिणाम, या दोहोंमध्ये काही कालांतर असते. असे बहुधा घडते.

२७. या दृष्टीने कम्माचे तीन विभाग करता येतात : (१) दिट्ठ धम्म वेदनीय कम्म ( तात्काळ फल देणारे कम्म ), (२) उपपज्जवेदनीय कम्म ( ज्याचा परिणाम फार कालांतराने होतो ते कम्म, (३) अपरापरियवेदनीय कम्म ( अनिश्चित काळाने फळ देणारे कम्म ).

२८. कम्म हे कधी कधी 'अहोसी' कम्म होऊ शकते, म्हणजे त्याचा काहीच परिणाम होत नाही. अहोसी कम्मामध्ये ज्या कम्मांचा त्यांच्या अंगच्या दुर्बलतेमुळे. विपाक अथवा परिणाम होत नाही, किंवा जी कम्मे अन्य सबळ कम्मामुळे बाद होतात त्यांचा समावेश होतो.

२९. या सर्व गोष्टी विचारात घेऊनही भगवान बुद्धाच्या 'कम्माचा नियम अनिवार्य आहे' या सिद्धान्ताला बाधा येत नाही.

३०. कम्माचा विपाक फक्त कर्त्याला भोगावा लागतो आणि याशिवाय दुसरा त्यात काहीच आशय नाही, एवढेच काही कम्म सिद्धान्तात अभिप्रेत नाही. एवढाच त्यात अभिप्राय आहे असे मानणे चूक आहे. कधी कधी एकाच्या कम्माचा त्याच्याऐवजी दुसर्यालाच परिणाम भोगावा लागतो; तथापि हे सर्व कम्म नियमाचेच परिणाम आहेत, कारण तोच कम्मनियम नैतिक व्यवस्था सांभाळतो किंवा मोडतो.

३१. व्यक्ती येतात, जातात; पण विश्वाची नैतिक व्यवस्था कायम राहते आणि त्याप्रमाणेच ही व्यवस्था

बनविणारा कम्मनियमही अप्रतिहत राहतो.

३२. याच कारणास्तव भगवान बुद्धाच्या धर्मामध्ये अन्य धर्मांत ईश्वराला जे स्थान दिले आहे ते नीतीला प्राप्त झाले आहे.

३३. यास्तव विश्वातील नैतिक व्यवस्था कशी राखली जाते याला भगवान बुद्धाने दिलेले उत्तर इतके सरळ आणि निर्विवाद आहे.

३४. असे असूनही या उत्तराचा खरा अर्थ क्वचितच समजावून घेतला जातो. प्रायः जवळजवळ नेहमीच त्याचा चुकीचा अर्थ लावला जातो, चुकीचा सांगितला जातो, अथवा त्याची चुकीची व्याख्या केली जाते. नैतिक व्यवस्था कशी राखली जाते या प्रश्नाला उत्तर म्हणूनच भगवान बुद्धाने कर्मसिद्धान्त मांडला. या सत्याची फारच थोड्यांना जाणीव असते.

३५. तथापि कम्म सिद्धान्त मांडण्यात बुद्धाचा हाच हेतू होता.

३६. कम्म नियमांचा संबंध केवळ सर्वसाधारण नैतिक व्यवस्थेशी आहे. व्यक्तीच्या सद्भाग्याशी किंवा दुर्भाग्याशी त्याचा संबंध नाही.

३७. त्याचे प्रयोजन विश्वातील नैतिक व्यवस्था राखणे हे आहे.

३८. ह्या कारणास्तव ‘कम्मनियम’ हा धम्माचे एक प्रमुख अंग आहे.

## भाग चवथा: अधम्म म्हणजे काय?

### १. दैवी चमत्कृतीवर विश्वास ठेवणे म्हणजे अधम्म !

१. जेव्हा जेव्हा एखादी घटना घडते तेव्हा ती कशी घडली, त्याचे कारण काय आहे हे जाणण्याची मनुष्यमात्राला आवश्यकता वाटते.

२. कधी कधी कारण व कार्य ही एकमेकांच्या इतकी जवळ जवळ असतात की, कार्याच्या कारणाचा पत्ता लागणे अवघड नसते.

३. परंतु कधी कधी कार्य (परिणाम ) हे कारणापासून इतके दूर असते की, तेथे कार्यकारणाचा शोध लागत नाही. ढोबळ दृष्टीने पाहता असे वाटते की, या परिणामाला कारणच नव्हते.

४. तेव्हा असा प्रश्न उत्पन्न होतो की, ही घटना घडली कशी?

५. अशा वेळी सर्वसामान्य उत्तर असे असते की, ही घटना काही तरी दैवी कारणाने म्हणजे चमत्काराने घडली असावी.

६. भगवान बुद्धाच्या पूर्वजांनी ह्या प्रश्नाचे विविध प्रकारे उत्तर दिले आहे.

७. पकूद कच्चान हा प्रत्येक घटनेला कारण असल्याचे मानीत नसे. तो म्हणत असे, घटना कारणाविना स्वतंत्रपणे घडत असतात.

८. मक्खली घोशल मानीत असे की, घटनेला कारण असले पाहिजे, परंतु तो असा प्रचार करीत असे की, ते कारण मानवी शक्तीबाहेर कुठे तरी ‘प्रकृती’, ‘अनिवार्य आवश्यकता’, ‘वस्तुजातातील अंतर्गत नियम’, ‘पूर्वनियोजित दैव’ अशांसारख्या गोष्टींत शोधले पाहिजे.

९. भगवान बुद्धाने अशा सिद्धान्ताचे खंडण केले. त्याचे म्हणणे असे की, प्रत्येक घटनेला कारण असते. एवढेच नव्हे तर प्रत्येक कारण हेही मानवी अथवा प्राकृतिक कारणांचा परिणाम आहे.

१०. काळ, प्रकृती, अनिवार्य आवश्यकता इत्यादींना कोणत्याही घटनेचे कारण मानणे ह्याला त्याचा विरोध होता.

११. जर काळ, प्रकृती, अनिवार्य आवश्यकता हीच फक्त घटनेची एकमात्र कारणे असतील तर मग आमची स्थिती काय?

१२. मनुष्य हा काळ, प्रकृती, आकस्मिकता, ईश्वर, दैव, अनिवार्य आवश्यकता यांच्या हातांतील एक बाहुले आहे काय?

१३. जर मनुष्य स्वतंत्र नाही तर माणसाच्या अस्तित्वाचे प्रयोजन काय? तो जर दैवी चमत्कृतीवर विश्वास ठेवू लागला तर त्याच्या बुद्धीचा उपयोग काय?

१४. जर मनुष्य स्वतंत्र असेल तर प्रत्येक घटनेला मानवी प्राकृतिक कारण असले पाहिजे. कोणत्याही घटनेचा दैवी चमत्कृतीत उगम असणे शक्य नाही.

१५. कदाचित हे संभवनीय आहे की, घटनेचे वास्तविक कारण सापडत नसेल, परंतु जर तो बुद्धिमान असेल तर

कधी तरी एके दिवशी ते त्याला सापडल्याशिवाय राहणार नाही.
१६. दैवी चमत्कृतीवादाचे खंडन करण्यात भगवान बुद्धाचे तीन हेतू होते.
१७. त्याचा पहिला हेतू माणसाला बुद्धिवादी बनविणे.
१८. त्याचा दुसरा हेतू माणसाला स्वतंत्रतापूर्वक सत्याचा शोध लावण्यासाठी सिद्ध करणे.
१९. त्याचा तिसरा हेतु ज्या भ्रामक समजुती माणसाची शोध करण्याची प्रवृत्ती मारतात त्यांचे उगमस्थानच नष्ट करणे.
२०. यालाच बुद्ध धम्माचा कम्मसिद्धान्त अथवा हेतूवाद म्हणतात.
२१. हा हेतूवाद बुद्ध धम्माचा मुख्य सिद्धान्त आहे. तो बुद्धिवाद शिकवितो आणि बुद्ध धम्म बुद्धिवादापेक्षा वेगळा नाही.
२२. याच कारणास्तव दैवी चमत्कृतीची पूजा अधम्म मानली जाते.

## २. ईश्वरावर विश्वास हे धम्माचे आवश्यक अंग नव्हे

१. हे जग कोणी निर्माण केले? हा एक सर्वसामान्य प्रश्न आहे. हे जग ईश्वराने निर्माण केले हे त्याला एक सर्वसामान्य उत्तर आहे.
२. ब्राम्हणीय योजनेत या ईश्वराला 'प्रजापती', 'ईश्वर', 'ब्रम्ह', 'महाब्रम्ह' इत्यादी नावे आहेत.
३. हा ईश्वर कोण आहे आणि तो कसा अस्तित्वात आला या प्रश्नाला तेथे उत्तर नाही.
४. जे लोक ईश्वरावर विश्वास ठेवतात ते त्याचे वर्णन सर्वशक्तीमान, सर्वव्यापक आणि सर्वज्ञ असे करतात.
५. ईश्वराच्या ठिकाणी काही नैतिक गुण असल्याचेही सांगतात. असे म्हणतात की ईश्वर, शिव ( चांगला, कल्याणकारी ) न्यायी आणि दयाळू आहे.
६. भगवान बुद्धाने ईश्वराचा सृष्टिकर्ता म्हणून स्वीकार केला आहे काय असा प्रश्न आहे.
७. उत्तर आहे, "नाही." त्याने स्वीकार केलेला नाही."
८. अशी अनेक कारणे आहेत की, ज्यांसाठी त्याने ईश्वराच्या अस्तित्वाचा सिद्धान्त मान्य केला नाही.
९. कोणीही ईश्वराला पाहिलेले नाही. लोक फक्त ईश्वरासंबंधी बोलतात.
१०. ईश्वर अज्ञात आणि अदृश्य आहे.
११. कोणीही असे सिद्ध करू शकत नाही की, ईश्वराने हे सर्व जग रचले. जग हे रचलेले नसून विकास पावलेले आहे.
१२. ईश्वरावर विश्वास ठेवण्यात काय लाभ आहे? काहीही लाभ नाही.
१३. भगवान बुद्ध म्हणतो की, ईश्वराधीन धर्म हे कल्पनाश्रीत धर्म आहेत.
१४. म्हणून ईश्वरावर आधारलेला धर्म हा काही उपयोगाचा नाही.
१५. त्याचा परिणाम म्हणून केवळ भ्रामक समजुती उत्पन्न होतात.
१६. भगवान बुद्धाने हा प्रश्न येथेच सोडलेला नाही. त्याने या प्रश्नाच्या विविध पैलूंचा विचार केला आहे.
१७. ज्या कारणांस्तव त्याने ईश्वराच्या अस्तित्वाचा सिद्धान्त अमान्य केला आहे ती अनेक आहेत.

१८. त्याने असा विचार मांडला आहे की, ईश्वराच्या अस्तित्वाचा सिद्धान्त हा सत्यावर आधारलेला नाही.

१९. हा विचार त्याने वासेट्ठ आणि भारद्वाज या दोन ब्राम्हणांबरोबर केलेल्या संभाषणात स्पष्ट केलेला आहे.

२०. वासेट्ठ आणि भारद्वाज या दोघांमध्ये मुक्तीचा सत्य मार्ग कोणता व असत्य मार्ग कोणता यासंबंधी विवाद उत्पन्न झाला.

२१. या समयी तथागत आपल्या महान् भिक्खु संघासमवेत कोशल जनपदामध्ये विहार करीत होते. तेथे मनसाकद् नावाच्या ब्राम्हणगावी अचिरवती नदीच्या तटावरील एका आम्रवनात ते थांबले होते.

२२. वासेट्ठ आणि भारद्वाज दोघेही मनसाकद् गावात राहात असत. जेव्हा त्यांनी ऐकले की, तथागत त्यांच्या गावी उतरलेले आहेत. तेव्हा ते त्यांच्याकडे गेले. आणि दोघांनीही तथागतांसमोर आपला दृष्टिकोन निवेदन केला.

२३. भारद्वाज म्हणाला, "तरुक्ख याने दाखविलेला मार्ग सरल मार्ग आहे. त्यात सरळ मुक्तीचा मार्ग आहे; आणि जो कोणी त्या मार्गाप्रमाणे वागतो त्याला तो मार्ग ब्रम्हसायुज्य मिळवून देतो."

२४. वासेट्ठ बोलला, "हे गौतम! पुष्कळसे ब्राम्हण पुष्कळसे मार्ग दाखवितात. अध्वर्यु ब्राम्हण, तैत्तिरिय ब्राम्हण, कंछोक ब्राम्हण, त्याचप्रमाणे भीहुवर्गीय ब्राम्हण हे प्रत्येक जण आपण दाखविलेल्या मार्गाने ब्रम्हसायुज्य मिळते असे म्हणतात.

२५. ज्या प्रकारे एखाद्या गावाला अथवा नगराला अनेक रस्ते असतात तरीही ते सर्व रस्ते त्या गावाला आणून पोहचवितात. त्याप्रमाणेच या ब्राम्हणांनी दाखविलेले मार्ग शेवटी ब्रम्हसायूज्याकडे नेतात.

२६. भगवान बुद्धाने त्याला विचारले, "वासूट्ठ, तुझे म्हणणे असे आहे काय? की, सर्वच मार्ग बरोबर आहेत?" वासेट्ठ बोलला, "श्रमण गौतम! होय, हेच माझे म्हणणे आहे."

२७. "पण वासेट्ठ, या तीनही वेद जाणणार्या ब्राम्हणांपैकी एकाने ब्रम्हाचे साक्षात् समोरासमोर दर्शन घेतले आहे काय?"

२८. "नाही. गौतमा नाही."

२९. "ह्या तीनही वेद जाणणार्या ब्राम्हनांच्या गुरुने तरी ब्रम्हाला समोरा समोर पाहिले आहे काय?"

३०. " नाही, गौतमा, नाही."

३१. "कोणीही ब्रम्ह पाहिलेले नाही, कोणालाही ब्रम्हसाक्षात्कार झाला नाही." वासेट्ठ बोलला, "होय, असेच आहे." " तर मग तू असे कसे मानतोस की, हे जे ब्राम्हण सांगतात ते सत्यावर आधारलेले आहे?"

३२. "वासेट्ठ, ज्या प्रमाणे एकमेकांना धरून चालणारी आंधळयांची माळ असते, त्यातील सर्वांच्या पुढे असलेल्यांना दिसत नाही, मध्यभागी असलेल्यांना दिसत नाही, शेवटी असलेल्यांना दिसत नाही. त्याप्रमाणेच मला वाटते, ह्या ब्राम्हणांचे शब्द आंधळयांच्या शब्दासारखे आहेत. त्यांच्यापैकी पुढे असणार्याला दिसत नाही. मध्यभागी असणाराला दिसत नाही. अगदी शेवटी असणार्याला दिसत नाही. ह्या ब्राम्हणांचे शब्द उपहासास्पद आहेत; ते केवळ पोकळ, व्यर्थ शब्द असून त्यांत काही अर्थ नाही.

३३. " वासेट्ठ, ही गोष्ट कधीच न पाहिलेल्या एखोद्या स्त्रीवर प्रेम करणार्या माणसासारखी नाही काय?" " हो, तशीच आहे." वासेट्ठाने उत्तर दिले.

३४. " वासेट्ठ मग मला सांग, जर लोकांनी तुला विचारले, मित्रा, ज्या अति सुंदर स्त्रीवर तू इतके प्रेम करीत आहेस, आणि जिची तू वांछा धरीत आहेस, ती आहे तरी कोण? ती क्षत्रीय जातीची आहे, की ब्राम्हण आहे, की

वैश्य जातीची आहे, की शूद्र जातीची आहे?"

३५. सृष्टीचा तथाकथित निर्माता महाब्रम्ह याच्या उत्पत्तीसंबंधी चर्चा करीत असताना तथागत भारद्वाज आणि वासेट्ठ यांना उद्देशून म्हणाला. " मित्रांनो, तो प्रथम जन्मास येणारा प्राणी म्हणतो, मी ब्रम्ह आहे, महाब्रम्ह आहे, विजेता आहे, अपराभूत आहे, सर्वद्रष्टा आहे, सर्वाधिकारी आहे, मालक आहे, निर्माता आहे, रचणारा आहे, मुष्य आहे, व्यवस्थापक आहे, मीच माझा स्वामी आहे; आणि जे आहेत आणि पुढे होणारे आहेत त्यांचा मी जनक आहे. माझ्याच पासून हे सर्व प्राणी जन्मास आले आहेत."

३६. याचा अर्थ असा की; जे आज आहेत आणि भविष्यकाळात होणारे आहेत त्यांचा ब्रम्ह हा पिता आहे.

३७. तुझे म्हणणे असे आहे की, " पूज्य, विजेता, अपराभूत, जे आहेत आणि होणारे आहेत त्यांचा जनक, ज्यांच्यामुळे सर्वांची उत्पत्ती झाली असा जो ब्रम्ह, तो स्थायी आहे, सतत राहणारा आहे, नित्य आहे, अपरिवर्तनशील आहे. तो अनंत काळ असाच राहणारा आहे. तर मग त्या ब्रम्हाने उत्पन्न केलेले आम्ही इहलोकी येउन अस्थायी, अनित्य, परिवर्तनशील, अल्पजीवी, मरणधर्मी कसे झालो?"

३८. ह्या प्रश्नाला वासेट्ठाजवळ उत्तर नव्हते.

३१. तथागतांचा तिसरा विचार हा ईश्वराच्या सर्व शक्तीमत्तेसंबंधी होता. " जर ईश्वर सर्वशक्तीमान आहे आणि सर्व सृष्टीचे तो बलवत्तर कारण आहे, तर त्यामुळे माणसाच्या मनात काहीही कार्य करण्याची स्वतःची अशी इच्छा असणे शक्य नाही. त्याला काही करण्याचीही आवश्यकता नाही. काही करण्याची त्याला इच्छा किंवा प्रयत्न करण्याचा संकल्पही स्फुरणार नाही. यामुळे मनुष्यप्राणी म्हणजे या जगातील कोणतेही कार्य ज्याला करावे लागत नाही, असा एक निष्क्रिय प्राणी ठरेल. असे जर आहे, तर ब्रम्हाने माणसाला निर्माणच का केले?

४०. यालाही वासेट्ठाजवळ उत्तर नव्हते.

४१. तथागताचा चवथा विचार असा होता की, जर ईश्वर शिवस्वरूप ( कल्याणकारी ) आहे, तर माणसे खुनी, चोर, व्यभिचारी, खोटे बोलणारी, निंदक; बकवा करणारी, लोभी, द्वेषी, विकृत अशी का होतात? याचे कारण ईश्वरच असला पाहिजे. शिवस्वरूप ईश्वराच्या अस्तित्वात हे कसे शक्य आहे?

४२. तथागताचा पाचवा विचार ईश्वराची सर्वज्ञता, न्यायीपणा, दयाळूपणा या संबंधात होता.

४३. जर कोणी महान सृष्टिकर्ता असेल आणि तो न्यायी व दयाळू असेल तर मग जगामध्ये इतका अन्याय का फैलावतो? असा प्रश्न तथागतांनी केला. ते पुढे म्हणाले, " ज्याला दृष्टी आहे त्याला सभोवार किळसवाणे दृश्य दृष्टीस पडेल. बम्ह आपली रचना का सुधारीत नाही? जिला मर्यादा नाही अशी त्याची शक्ती व्यापक असेल, तर त्याचे हात कल्याण करण्यासाठी पुढे का सरसावत नाहीत? त्याने निर्माण केलेली सृष्टी दुःखोपभोगात का बुडालेली आहे. तो सर्वांना का सुख देत नाही? अफरातफरा, चोरी, अज्ञान का फैलावत राहते? असत्य सत्यावर का मात करते? सत्य आणि न्याय पराभूत का होतात? माझ्या मते अन्यायाला आश्रय देण्यासाठी जग निर्माण करणारा हा तुमचा ब्रम्ह परम अन्यायी ठरतो."

४४. ' सर्व प्राणिमात्रांना व्यापणारा तुमचा जो ईश्वर आहे, जो त्या प्राणिमात्रांना सुखी वा दुःखी बनवितो, त्यांच्याकडून पाप अथवा पुण्य करवितो, तो ईश्वर स्वत: पापाने कलंकित आहे. एक तर मनुष्य त्या ईश्वराच्या इच्छेप्रमाणे वागत नसावा किंवा तो ईश्वर तरी न्यायी आणि चांगला नसावा, अथवा तो आंधळा असावा.'

४५. तथागताचा ईश्वराच्या अस्तित्वाच्या सिद्धान्तासंबंधीचा शेवटचा विचार असा होता की, ईश्वराच्या

अस्तित्वाच्या सिद्धान्तासंबंधी चर्चा करण्यापासून काहीही लाभ नाही.

४६. तथागतांच्या मते धर्माचे केंद्र हे मनुष्याचा देवाशी असणारा संबंध यामध्ये नाही. ते माणसामाणसांच्या संबंधात आहे. धर्माचा हेतू सर्व माणसे सुखी होतील अशा रीतीने माणसाशी कसे वागावे हा आहे.

४७. तथागत देवाच्या अस्तित्वावरील विश्वासाविरुद्ध असण्याचे आणखीही एक कारण होते.

४८. तथागत धार्मिक क्रियाकलापाच्या विरोधी होते. याविरुद्ध असण्याचे कारण म्हणजे हे क्रियाकलाप म्हणजे भ्रामक समजुतीचे आगरच असते; आणि भ्रामक समजुती ह्या अष्टांग मार्गातील जे महत्वाचे तत्व सम्मादिठ्ठी तिचे शत्रू आहेत.

४९. तथागताच्या दृष्टीने ईश्वरावरील विश्वास ही अतिशय भयानक गोष्ट आहे. कारण ईश्वरावरील विश्वास हा पूजा आणि प्रार्थना ह्यांचा उत्पादक आहे. पूजा आणि प्रार्थना यांच्या जरूरीतून पुरोहितपद उत्पन्न होते आणि पुरोहित हा असा दुष्टबुद्धी आहे की, तो सर्व प्रकारच्या खुळया समजुती निर्माण करतो व त्यामुळे सम्मादिठ्ठीचा विकास अशक्य होतो.

५०. ईश्वराच्या अस्तित्वावरील विश्वासासंबंधीचे हे विचार व्यवहारी होते पण ते बव्हंशी सैद्धान्तिक होते. तथागत जाणत होते की, ते विचार ईश्वराच्या अस्तित्वा वरील विश्वासाला एकदम मारक असे नव्हते.

५१. तथापि अशी मात्र कल्पना करू नये की, मारक असा विचार त्यांच्याजवळ नव्हता. त्यांनी एक असा विचार मांडला आहे की, तो नि:संदेह देवावरील विश्वासाचे खंडन करणारा आहे, हा विचार प्रतित्यसमुत्पाद या सिद्धांतात अंतर्भूत आहे.

५२. ह्या सिद्धांतानुसार ईश्वर आहे किंवा नाही हा प्रश्न महत्वाचा नाही. त्याचप्रमाणे ईश्वराने ही सुष्टी निर्माण केली किंवा नाही, हाही प्रश्न मुख्य नाही. खरा प्रश्न असा आहे की, निर्मात्यांनी ही सृष्टी कशी निर्माण केली? ईश्वराच्या अस्तित्वावरील विश्वासाचे समर्थन हे जग कसे निर्माण झाले ह्या प्रश्नाच्या उत्तराचा निष्कर्ष आहे.

५३. महत्वाचा प्रश्न हा आहे की, ईश्वराने सृष्टी भाव (काही पदार्थ ) यातून उत्पन्न केली की अभाव ( शून्य ) यातून निर्माण केली?

५४. "काही तरी" हे "काहीच नाही" मधून उत्पन्न केले गेले यावर विश्वास ठेवणे हे शक्य नाही.

५५. जर तथाकथित ईश्वराने 'काही तरी' हे 'काही तरी' मधून निर्मिले असे म्हटले तर, ज्या 'काही तरी'तून जे नवे 'काही तरी' निर्मिले ते निर्मितीपूर्वच अस्तित्वात असले पाहिजे. म्हणून ईश्वराला त्याच्यापूर्वीच अस्तित्वात असलेल्या 'काही तरी' चा निर्माता म्हणता येणार नाही.

५६. जर ईश्वराने काही वस्तु निर्माण करण्यापूर्वी 'कोणी तरी' 'काही तरी' निर्मिलेले असेल तर ईश्वराला निर्माता अथवा आदिकारण असे म्हणता येणार नाही.

५७. ईश्वराच्या अस्तित्वासंबंधीच्या विश्वासाविरुद्ध तथागताचा शेवटचा असा निर्विवाद विचार होता.

५८. ईश्वर हा सर्व सृष्टीचा निर्माता आहे, हा विश्वास तर्कदुष्ट असल्यामुळे तो अधर्म आहे. तो विश्वास म्हणजे केवळ असत्यावरील विश्वास ठरतो.

## ३. ब्रम्ह-सायुज्यावर भाधारीत धर्म अधर्म आहे

१. जेव्हा भगवान बुद्ध आपल्या धर्माचा प्रचार करीत होते तेव्हा एक सिद्धान्त प्रचलित होता त्यास 'वेदांत' असे म्हणत.

२. ह्या सिद्धान्ताची तत्वे थोडकी व सरळ होती.

३. ह्या सर्व विश्वामागे एक सर्वव्यापक जीवन-तत्व विद्यमान असून त्याला ब्रम्ह अथवा ब्रम्हन् म्हणतात.

४. हे ब्रम्ह एक वास्तविकता आहे.

५. आत्मन् आणि ब्रम्हन् एकच होत.

६. आत्मा आणि ब्रम्हन् एकरूप करण्याने माणसाला मोक्ष मिळतो; हे या सिद्धांताचे दुसरे तत्व आहे.

७. आत्मा आणि ब्रम्हन् ही एकच आहेत. या ज्ञानाने आत्मा ब्रम्हाशी एकरूपता साधतो.

८. आत्म्याला आपण ब्रम्ह आहोत हे ज्ञान होण्यासाठी संसाराचा त्याग करणे आवश्यक आहे.

९. या सिद्धांताला वेद म्हणतात.

१०. भगवान बुद्धाच्या मनात या सिद्धांताबद्दल आदर नव्हता. त्याच्या मते या सिद्धांताचा आधार मिथ्या होता. त्याचा काही उपयोग नव्हता आणि त्यामुळे तो स्वीकारण्याजोगा नव्हता.

११. हे आपले मत भगवान बुद्धाने भारद्वाज काणि वासेट्ठ या दोन ब्राम्हणांसमोर झालेल्या संवादात स्पष्ट केले आहे.

१२. भगवान बुद्धाचे म्हणणे असे होते की, कोणतीही गोष्ट सत्य म्हणून स्वीकारण्याला तिला काही ना काही प्रमाण असले पाहिजे.

१३. प्रमाणाचे 'प्रत्यक्ष' आणि 'अनुमान' असे दोन प्रकार आहेत.

१४. भगवान बुद्धाचा प्रश्न असा होता, "कोणी ब्रम्ह प्रत्यक्ष अनुभवले आहे काय? तू ब्रम्ह पाहिले आहेस काय? तू ब्रम्हाबरोबर गोष्टी केल्या आहेस काय? तू ब्रम्हाचा वास घेतला आहेस काय?"

१५. वासेट्ठाने उत्तर दिले, "नाही."

१६. ब्रम्हाच्या अस्तित्याचे दुसरे प्रमाण अनुमानाचे. ते त्याचे अस्तित्व सिद्ध करण्यास अपुरे आहे.

१७. भगवान बुद्धाने प्रश्न केला, "कोणत्या एका गोष्टीच्या होण्यावरून आम्ही ब्रम्हाचे होणे ( अस्तित्व ) अनुमानायचे काय?" याचेही उत्तर मिळाले नाही.

१८. काही लोक म्हणतात की, वस्तू अदृश्य असूनही तिला अस्तित्त्व असते. म्हणून ते म्हणतात की, ब्रम्ह अदृश्य असले तरी त्याला अस्तित्व आहे.

१९. हे एक ढोबळ विधान असून ते असंभव स्थापन करण्यासाठी केलेले आहे.

२०. तरीसुद्धा तर्कासाठी हे मान्य करू या की, वस्तु अदृश्य असली तरी तिला अस्तित्व असू शकते.

२१. ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे वीज हे आहे. वीज अदृश्य असूनही तिला अस्तित्व आहे.

२२. परंतु हा तर्कही पर्याप्त नाही.

२३. अदृश्थ वस्तुनेही आपले अस्तित्व दुसर्या कोणत्या तरी रूपाने प्रकट करणे जरूर आहे. तेव्हाच तिची वास्तविकता मान्य होऊ शकते.

२४. परंतु जर अदृश्य वस्तु दुसर्या कोणत्याही रूपाने आपले अस्तित्व प्रकट करू शकत नसेल तर तिची वास्तविकता मान्य होऊ शकणार नाही.

२५. वीज अदृश्य असली तरी तिजपासून उत्पन्न होणारे परिणाम पाहूनच आपण तिचे अस्तित्व मानतो.

२६. वोजेपासून प्रकाश उत्पन्न होती. प्रकाश उत्पन्न होण्यावरूनच वीज अदृश्य असूनही आपण वीजेची वास्तविकता मान्य करतो.

२७. परंतु हे अदृश्य ब्रम्ह दृश्य अशी कोणती वस्तु उत्पन्न करते?

२८. उत्तर आहे की, कोणतीच नाही.

२९. दुसरे एक उदाहरण देता येते. कायद्यामध्येही अशी पद्धत आहे की, काही एक निष्कर्ष स्थापन करण्यासाठी एक विधान मान्य केले जाते. ते सिद्ध करता येत नाही. ते केवळ कायद्यातील 'कल्पना' (Fiction) असते.

३०. आणि आपण अशा कायद्यातील कल्पनेला ( Legal fiction ) मान्यता देतो.

३१. पण आपण अशा कायद्यातील कल्पनेला का मान्यता देतो?

३२. कायद्यातील कल्पनेला मान्यता देण्याचे कारण या मान्यतेपासून न्यायाशी सुसंगत असे उपयुक्त परिणाम संभवतात हे आहे.

३३. ब्रम्ह ही सुद्धा एक कल्पना आहे; परंतु त्यापासून कोणते उपयुक्त परिणाम संभवतात?

३४. वासेट्ठ आणि भारद्वाज यांच्याजवळ काही उत्तर नव्हते, ते स्तब्ध होते.

३५. आपली विचारप्रणाली त्यांना पूर्ण ग्रहण करता यावी म्हणून वासेट्ठाकडे वळून तथागताने विचारले, "तुम्ही ब्रम्ह पाहिले आहे काय?"

३६. "तीनही वेद जाणणार्या क ब्राम्हणांमध्ये एक तरी ब्राम्हण असा आहे काय, की ज्याने ब्रम्ह प्रत्यक्ष समोरासमोर पाहिले आहे?"

३७. " 'नाही गौतमा,' निश्चित पाहिलेले नाही."

३८. "त्या तीनही वेद जाणणार्या ब्राम्हणांच्या एका तरी गुरूने ब्रम्ह प्रत्यक्ष समोरासमोर पाहिले आहे काय?"

३९. "नाही. गौतमा, निश्चित पाहिलेले नाही."

४०. "वासेट्ठ, त्या ब्राम्हणाच्या सात पिढ्यांत एक तरी ब्राम्हण असा झाला काय, की ज्याने ब्रम्ह समोरासमोर पाहिले?"

४१. "नाही, गौतमा, निश्चित पाहिलेले नाही."

४२. "ठीक वासेट्ठ ! ब्राम्हणाच्या पुरातन ऋषींनी तरी असे म्हटले होते काय, की आम्ही ब्रम्ह जाणतो, आम्ही ते कुठे आहे, इथे आहे की तिथे आहे ते पाहिलेले आहे."

४३. "नाही, गौतमा, नाही!"

४४. तथागत त्या दोन ब्राम्हण तरुणांना प्रश्न विचारीत राहिला.

४५. "मग वासेट्ठा, तुला असे वाटत नाही काय, की यावरून त्या ब्राम्हणाच्या ब्रम्ह सायुज्याच्या गोष्टी मूर्खपणाच्या थापा होत्या?"

४६. "वासेट्ठा, ज्याप्रमाणे एकमेकांना धरून चालणारी आंधळ्यांची माळ असते, त्यातील सर्वांच्यापुढे असणार्यांना दिसत नाही, मध्यभागी असलेल्यांना दिसत नाही, शेवटी असलेल्यांना दिसत नाही. त्याप्रमाणेच, मला वाटते, ह्या ब्राम्हणांचे शब्द आंधळयांच्या शब्दासारखे आहेत. त्यांच्यापैकी पुढे असणार्याला दिसत नाही, मध्यभागी असणार्याला दिसत नाही, अगदी शेवटी असणार्याला दिसत नाही. त्या ब्राम्हणाचे शब्द उपहासास्पद

आहेत. ते केवळ पोकळ व्यर्थ शब्द असून त्यांत काही अर्थ नाही."

४७. "वासेट्ठ, ही गोष्ट कधीच न पाहिलेल्या एखाद्या स्त्रीवर प्रेम करणार्या माणसासारखी नाही काय?"

४८. आणि लोक त्याला विचारणार, "मित्रा, ज्या अति सुंदर स्त्रीवर तू इतके प्रेम करीत आहेस आणि तिची वांछा करीत आहेस, ती आहे तरी कोण? ती क्षत्रिय जातीची आहे, की ब्राम्हण जातीची आहे, की वैश्य जातीची आहे, की शूद्र जातीची आहे?"

४९. "आणि जेव्हा लोक त्याला असे विचारतील तेव्हा तो 'नाही' असेच उत्तर देणार."

५०. " जेव्हा लोक त्याला पुन्हा विचारतील, बरे, मित्रा, ही सर्व प्रदेशातील स्त्री अति सुंदर स्त्री आहे. जिच्यावर तू प्रेम करतोस, जिची वांछा धरतोस, पण तिचे नाव तरी काय आहे? तिच्या कुळाचे नाव काय आहे? ती उंच आहे, को ठेंगणी आहे, की, मध्यम उंचीची आहे? ती कृष्ण वर्णाची आहे, की गव्हाळ वर्णाची आहे, की सुवर्ण वर्णाची आहे? ती कोणत्या खेड्यात, गावात अथवा शहरात राहते? परंतु हे सर्व प्रश्न विचारले असता प्रत्येक प्रश्नाला तो नाही असेच उत्तर देणार."

५१. "वासेट्ठा, हे सर्व तुला आता कसे वाटते? तुला असे वाटत नाही काय, की त्या माणसाचे सर्व कथन मूर्खतापूर्ण आहे?"

५२. ते दोन्हीही ब्राम्हण तरुण बोलले, " होय, खरोखर तसेच आहे."

५३. यास्तव ब्रम्ह हेच वास्तव नसून त्यावर आधारलेला धर्म हा व्यर्थ आहे.

## ४. आत्म्यावरील विश्वास हा अ-धर्म आहे

१. भगवान बुद्धाने म्हटले आहे की, आत्म्यावर आधारलेला धर्म हा कल्पनाश्रित धर्म आहे.

२. कोणीही आत्मा पाहिलेला नाही किंवा आत्म्याशी संभाषण केलेले नाही.

३. आत्मा अज्ञात आणि अदृश्य आहे.

४. जी गोष्ट वास्तव आहे ती गोष्ट आत्मा नसून मन आहे. मन हे आत्म्या पासून भिन्न आहे.

५. तथागत म्हणाले, " आत्म्यावर विश्वास ठेवणे निरुपयोगी आहे."

६. म्हणून आत्म्यावर आधारलेला धर्म आपल्याला योग्य नाही.

७. असा धर्म केवळ भ्रामक समजुतींचा जनक ठरतो.

८. भगवान बुद्धाने हा प्रश्न येथेच सोडलेला नाही. त्याने त्या प्रश्नांची सांगोपांग चर्चा केली आहे.

९. आत्म्याच्या अस्तित्वावरील विश्वास हा देखील विश्वासाइतकाच सर्व साधारण आहे.

१०. आत्म्याच्या अस्तित्वावरील विश्वास हे ब्राम्हणी धर्माचे एक अंग होते.

११. ब्राम्हणी धर्मात जीवाला 'आत्मा' किंवा 'आत्मन्' संबोधितात.

१२-१३. ब्राम्हणी धर्मात आत्मा हे त्या तत्वविशेषाला नाव देण्यात आले आहे, की जे शरीरापासून वेगळे; परंतु शरीराच्या आत आणि जन्मापासून शरीरात वास्तव्य करते. आत्म्याच्या अस्तित्वावरील विश्वासात तदनुषगिक दुसरेही विश्वास अंतर्भूत होतात.

१४. आत्मा शरीराबरोबर मरण पावत नाही. तो दुसर्या जन्माच्या वेळी दुसर्या शरीरात जन्म घेतो.

१५. शरीर हे आत्म्याचा एक पेहरावच आहे.

१६. भगवान बुद्ध आत्म्यावर विश्वास ठेवीत असे काय? नाही, तो विश्वास ठेवीत नसे. आत्म्यासंबंधी त्याच्या सिद्धांताला अनात्मवाद असे म्हणतात.

१७. अशरीरी आत्मा मानला तर त्याच्यासंबंधाने अनेक प्रश्न उद्भवतात. आत्मा काय आहे? तो कोठून आला? शरीराच्या मृत्यूनंतर त्याचे काय होते? तो कोठे जातो? शरीराच्या मृत्यूनंतर तो परलोकात कोणत्या स्वरूपात राहतो? किती काळ तो तेथे राहतो? या सर्व प्रश्नांची उत्तरे बुद्धाने आत्म्याचे अस्तित्व मानणार्या लोकांकडून मागितली.

१८. आपल्या फेरतपासणीत आत्म्याची कल्पना किती अस्पष्ट आहे हे त्याने आपल्या नेहमीच्या पद्धतीने दाखविले.

१९. जे आत्म्याच्या अस्तित्वावर विश्वास ठेवीत त्यांना आत्म्याचा आकार व आकृती कशी आहे हे विचारले.

२०. आनंदाला त्याने सांगितले, 'आत्म्यासंबंधी नानाविध मते आहेत. काही लोक म्हणतात, माझ्या आत्म्याला आकार आहे, आणि तो अत्यंत सूक्ष्म आहे. दुसरे काही म्हणतात की, आत्म्याला रूप आहे आणि तो अनंत आहे आणि सूक्ष्मही आहे. आणखी काही असे म्हणतात की, तो निराकार आणि अनंत आहे.

२१. "आनंद, आत्म्यासंबंधी नानाप्रकारची मते आहेत."

२२. "जे आत्म्याच्या अस्तित्वावर विश्वास ठेवतात त्यांची आत्म्यासंबंधी कल्पना काय आहे?" हाही बुद्धाचा दुसरा प्रश्न होता. कोणी म्हणतात आत्मा हा सुखदु:खाच्या अनुभवाची क्रिया आहे. दुसरे कोणी म्हणतात की, नाही माझा आत्मा सुखदु:खाच्या अनुभवाची क्रिया नाही, तो अननुभवशील आहे. आणखी दुसरे म्हणतात, नाही; माझा आत्मा सुखदु:खाच्या अनुभवाची क्रिया असून अनुभवशीलता हा त्याचा धर्म आहे. आत्म्यासंबंधी अशा विविध कल्पना आहेत."

२३. यानंतर बुद्धाने जे आत्म्याच्या अस्तित्वावर विश्वास ठेवतात त्यांना शरीराच्या मरणोत्तर आत्म्याची काय स्थिती होते असा प्रश्न विचारला.

२४. त्याने असाही प्रश्न विचारला की, शरीराच्या मृत्यूनंतर आत्मा पाहता येतो काय?

२५. त्याला अगणित उत्तरे अस्पष्ट मिळाली.

२६. शरीराच्या मृत्यूनंतर आत्मा आपला आकार कायम राखू शकतो काय? यासंबंधी त्याला आठ भिन्न काल्पनिक उत्तरे मिळाली.

२७. आत्मा शरीराबरोबर मरण पावतो काय? यासंबंधीही त्याला अगणित कल्पना आढळल्या.

२९. तथागताने शरीराच्या मृत्यूनंतर आत्मा सुखी असतो की दु:खी असतो, हाही प्रश्न विचारला, शरीराच्या मृत्यू नंतर आत्मा सुखी असतो काय? यासंबंधी श्रमण ब्राम्हणांची मते भिन्न होती. काही म्हणाले की? तो अतिशय दु:खी असतो. काही म्हणाले, तो सुखी असतो. इतर काही म्हणाले की, तो सुखी व दु:खी असतो; व इतर म्हणाले, तो सुखी अथवा दु:खीही नसतो.

२१. आत्म्याच्या अस्तित्वाच्या विश्वासावरील ह्या सर्व सिद्धान्ताला त्यांनी दिलेले उत्तर चुन्दाला त्यांनी दिलेल्या उत्तरासारखेच होते.

३०. चुन्दाला तो म्हणाला "हे चुन्द, जे श्रमण ब्राम्हण या मतांपैकी कोणत्याही एका मतावर विश्वास ठेवतात त्यांच्याकडे जाऊन मी त्यांना विचारतो, 'मित्रांनो, हे तुमचे म्हणणे ठीक आहे काय?' आणि ते उत्तर देतात, ' होय.

माझेच मत खरे आहे. दुसरी मते मूर्खपणाची आहेत' मी त्यांचे मत स्वीकारीत नाही. का? कारण, लोकांची या विषयासंबंधी भिन्न मते आहेत. त्यांची मते मी माझ्या मतापेक्षा श्रेष्ठ मानीत नाही. एवढेच काय, ती माझ्या मताच्या तोडीचीही मी मानीत नाही."

३१. आता एक महत्वपूर्ण प्रश्न पुढे येतो, तो असा की, आत्म्यावरील विश्वासाच्या सिद्धान्ताविरुद्ध भगवान बुद्धाची विचारसरणी काय होती?

३२. आत्म्याच्याविरुद्ध भगवान बुद्धाने जी सर्वसामान्य विचारसरणी मांडली आहे, तीच त्याने ईश्वराचे अस्तित्त्व नाकारताना मांडलेली आहे.

३३. त्याने असा विचार मांडला आहे की, आत्म्याच्या अस्तित्वाची चर्चा ही देवाच्या अस्तित्वाच्या चर्चेइतकीच निरुपयोगी आहे.

३४. देवाच्या अस्तित्वावरील विश्वास हा सम्मादिठ्ठीला जितका बाधक आहे, तितकाच आत्म्याच्या अस्तित्वावरील विश्वास बाधक आहे.

३५. त्याने असे विवेचन केले आहे की, देवावरील विश्वास हा ज्या प्रकारे भ्रामक समजुती निर्माण करतो, त्याच प्रकारे आत्म्याच्या अस्तित्वावरील विश्वास भ्रामक समजुतींना कारणीभूत होतो. त्याच्या मते तर आत्म्याच्या अस्तित्वावरील विश्वास हा देवाच्या अस्तित्वावरील विश्वासापेक्षा भयंकर आहे. कारण त्यामुळे पुरोहितवर्ग निर्माण होतो. भ्रामक समजुतींचा मार्ग मोकळा होतो. एवढेच नव्हे तर तो पुरोहित वर्गाला माणसाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत सत्ता गाजविण्याचा अधिकारही बहाल करतो.

३६. ह्या सर्वसाधारण विचारसरणीमुळेच भगवान बुद्धाने आत्म्याच्या अस्तित्वासंबंधी काही दृढपूर्वक मत व्यक्त केलेले नाही असे म्हणतात. दूसरे काही म्हणतात की, त्याने आत्म्याच्या अस्तित्वाच्या सिद्धांताचे खंडन केले नाही. आणखी दुसरे काही म्हणतात, त्याने ह्या प्रश्नाच्या उत्तराला बगल दिलेली आहे.

३७. ही सर्व मते चूक आहेत. कारण त्याने महालीला स्पष्टपणे आणि निश्चित शब्दात सांगितले आहे की, आत्मा काही वस्तू नाही. म्हणुनच त्याच्या सिद्धान्ताला अनात्मवाद असे म्हणतात.

३८. आत्म्याच्याविरुद्ध या सर्वसामान्य विचारसरणीपेक्षाही भगवान बुद्धाने त्याविरुद्ध अगदी खास अशी खंडनकारक विचारसरणी मांडलेली आहे.

३९. आत्म्याचे वेगळे असे अस्तित्व स्थापन करणार्या सिद्धान्ताविरुद्ध भगवान बुद्धाने आपला नामरूप सिद्धान्त मांडला.

४०. हा नामरूप सिद्धान्त विभज्ज-वादाच्याद्वारे केलेल्या परीक्षणाचा परिणाम आहे. मानव व्यक्तित्वाचा अथवा मानवाच्या अतिशय सूक्ष्म, काटेकोर विश्लेषणाचा हा परिणाम आहे.

४१. नामरूप ही प्राण्याची सामूहिक संज्ञा आहे.

४२. भगवान बुद्धाच्या मतानुसार प्राणी हा काही भौतिक तत्वे आणि काही मानसिक तत्वे यांच्या संमिश्रणाचा परिणाम आहे. या भौतिक आणि मानसिक तत्वांना स्कंध म्हणतात.

४३. रूपस्कंध हे प्राधान्याने पृथ्वी, जल, अग्नी आणि वायु या चार तत्वांचा परिणाम आहे. हे स्कंधरूप अथवा शरीराचे घटक होत.

४४. रूपस्कंधाशिवाय मानसस्कंध हीही एक गोष्ट आहे, तेही प्राण्यांच्या रचनेचे घटक आहेत.

४५. ह्या नामस्कंधाला विज्ञान (चेतना) असे म्हणतात. या नामस्कंधात तीन मानसिक घटकतत्वे आहेत. वेदना (सहा इंद्रियांचा त्यांच्या त्यांच्या विषयाशी संपर्क झाल्यामुळे होणारी अनुभूती ), संय्या (संज्ञा ), संकार (संस्कार), विज्ञान (चेतना) या तीन नामस्कंधात समाविष्ट केले जाते. आधुनिक मानसशास्त्रज्ञ कदाचित असे म्हणेल की, विज्ञान (Consciousness) हाच इतर मानसिक क्रियांचा मूळ स्त्रोत आहे. विज्ञान कोणत्याही प्राण्याचा केंद्रबिंदु आहे.

४६. पृथ्वी, जल, तेज आणि वायु या चार तत्वांच्या संमिश्रणाने विज्ञान उत्पन्न होते.

४७. भगवान बुद्धाने प्रतिपादित केलेल्या या विज्ञानाच्या उत्पत्तीच्या सिद्धान्ता वर एक आक्षेप घेतला जातो.

४८. हे सिद्धान्तवरोधी असे विचारतात की विज्ञान (चित्त ) याची उत्पत्ती कशी होते?

४९. हे सत्य आहे की, माणसाच्या जन्माबरोबर विज्ञानाची (चित्ताची ) उत्पत्ती होते आणि त्याच्या मरणाबरोबर विज्ञानाचा विनाश होतो. तथापि विज्ञान हे चार भौतिक तत्वांच्या मिश्रणाचा परिणाम असे कसे म्हणता येईल?

५०. भगवान बुद्धाचे उत्तर असे नव्हते की, या चार भौतिक तत्वांच्या सद्य:स्थितीमुळे किंवा त्याच्या संमिश्रणाने विज्ञानाची उत्पत्ती होते. भगवान बुद्धाने म्हटले आहे की, जेथे शरीर अथवा रूप-काया आहे तेथे त्याच्यासह नाम-कायाही ( विज्ञान ) राहात असते.

५१. आधुनिक विज्ञानातील एक उदाहरण देता येईल. जेथे जेथे विद्युत क्षेत्र (Electric Field) असते. तेथे तेथे त्याच्यासह आकर्षण क्षेत्र ( Magnetic Field ) असते. हे आकर्षण क्षेत्र कसे निर्माण होते किंवा कोणत्या प्रकाराने अस्तित्वात येते हे कोणालाही ज्ञात नाही. परंतु ते नेहमीच विद्युतक्षेत्राबरोबर असते.

५२. शरीर आणि विज्ञान (Consciousness) यांच्यामध्ये अशाच प्रकारचा संबंध आहे, असे का म्हणू नये?

५३. आकर्षण क्षेत्र हे विद्युत क्षेत्राच्या संदर्भात प्रेरित क्षेत्र (Induced Field ) असे समजले जाते. विज्ञान हेही रूप-कायांच्या संदर्भात प्रेरित क्षेत्र का म्हणू नये?

५४. भगवान बुद्धाची आत्म्याच्या विरुद्ध तर्कसरणी येथेच समाप्त होत नाही. ह्याशिवाय त्याला आणखी काही महत्वपूर्ण सांगायचे होते.

५५. जेव्हा विज्ञानाचा ( चित्त अथवा चेतना यांचा ) उदय होतो तेव्हा मनुष्य जीवित प्राणी बनतो. म्हणूनच विज्ञान हे माणसाच्या जीवनातील प्रधान वस्तु आहे.

५६. विज्ञानाची प्रकृती ज्ञानमूलक, भावनामूलक आणि क्रियाशील आहे.

५७. विज्ञान जेव्हा ज्ञान प्रदान करते तेव्हा ते ज्ञानमूलक असते. हे ज्ञान सहज ग्रहण झालेले असेल किंवा समजून ग्रहण झालेले असेल, ते आपल्या आत घडणार्या घटनांचे असेल किंवा बाह्य घटनांचे असू शकेल.

५८. सुखकर किंवा दु:खकर लक्षणांनी युक्त अशा चित्ताच्या अवस्थेत जेव्हा विज्ञान असते, तेव्हा त्याला भावनामूलक विज्ञान म्हणतात. भावनामूलक विज्ञान वेदनांची अनुभूती निर्मिते.

५९. विज्ञान आपल्या क्रियाशील अवस्थेत माणसाला विशिष्ट उद्देश्य साध्य करण्यासाठी क्रियेची प्रेरणा देते. क्रियाशील विज्ञान हे संकल्पाचे जनक आहे.

६०. यावरून असे स्पष्ट होते की, प्राणी जेवढी क्रिया करतो ती ही सर्व विज्ञानाच्या द्वारा अथवा त्याचा परिणाम म्हणून करतो.

६१. ह्या विश्लेषणानंतर भगवान बुद्ध प्रश्न करतो की, आता आत्म्याने करावयाचे कोणते कार्य होते? आत्म्याची

म्हणून जी कार्ये मानली जातात, ती सर्व विज्ञानाच्या द्वारेच होत असतात.
६२. ज्याचे काही कारण नाही. असा आत्मा मानणे तर्कविसंगत आहे.
६३. या पद्धतीने भगवान बुद्धाने आत्म्याच्या अस्तित्वाचे खंडन केले आहे.
६४. याच कारणास्तव आत्म्याचे अस्तित्व हे धम्माचे अंग असू शकत नाही.

## ५. यज्ञयागावर विश्वास ठेवणे हा अधम्म आहे

( १ )

१. ब्राम्हणी धर्म हा यज्ञावर आधारलेला होता.
२. काही यज्ञांना नित्य यज्ञ म्हणत. काहींना नैमित्तिक.
३. नित्य यज्ञ हे अनिवार्य कर्तव्य होते आणि त्यापासून फळ मिळो किंवा न मिळो, ते करणे आवश्यक होते.
४. नैमित्तिक यज्ञ हे याजक संसारिकाच्या काही इच्छापूर्तीसाठी केले जात.
५. ब्राम्हणी यज्ञात सुरापान, पशुबलिदान आणि स्वच्छंद आचरण घडत असे.
६. तरीसुद्धा हे यज्ञ धार्मिक कृत्ये समजली जात.
७. अशा यज्ञावर आधारलेल्या धर्माला भगवान बुद्धाने मान्यता दिली नाही.
८. जे अनेक ब्राम्हण भगवान बुद्धाजवळ यज्ञ हा धर्माचे अंग नव्हे, या त्याच्या मताबद्दल वाद घालण्यासाठी जात, त्यांना भगवान बुद्धाने आपल्या मताची आधारभूत कारणे सांगितलेली आहेत.
९. असे लिहिलेले आहे की, तीन ब्राम्हणांनी त्यांच्याशी वाद केला.
१०. ते तीन ब्राम्हण म्हणजे-कूटदंत, उज्जय आणि उदायी.
११. कूटदंत ब्राम्हणाने भगवान बुद्धाला यज्ञाबाबत त्यांची मते विचारली.
१२. तथागत बोलले, " ठीक आहे, ब्राम्हणा, मी बोलतो ते सावधान चित्ताने ऐक."
१३. कूटदंत उत्तरला, ' ठीक आहे' आणि तथागत खालीलप्रमाणे बोलले.
१४. " हे ब्राम्हणा, फार प्राचीन काळी महाविजेता नावाचा एक पराक्रमी, धनसंपन्न राजा होऊन गेला. सोने, रुपे, उपभोगाच्या वस्तु, धान्य आणि इतर माल, यानेत्याची भांडारे आणि कोठारे भरून गेलेली होती."
१५. " एकदा राजा महाविजेता एकटाच विचारमग्न होऊन बसला होता. त्याच्या मनात एक प्रबल विचार आला, माणसाच्या सुखोपभोगाला लागणार्या सर्व सामानाची माझ्याजवळ समृद्धी आहे. मी पृथ्वीचा चक्रवर्ती राजा आहे. जर मी महायज्ञ करून माझे दीर्घकाल कल्याण निश्चित केले तर ठीक होईल."
१६. " तेव्हा त्या राजाचा पुरोहित ब्राम्हण राजाला म्हणाला, ' राजन, या समयी आपली प्रजा अगदी हैराण आहे, लुटली जात आहे, डाकू नगरातून लुटमार करीत फिरत आहेत आणि त्यामुळे सर्व रस्ते असुरक्षित आहेत. जोपर्यंत अशी अवस्था आहे तोपर्यंत महाराजांनी प्रजेवर यज्ञासाठी कर लागू केला तर ती खरोखर वाईट गोष्ट होईल."
१७. " परंतु महाराजांनी जर असा विचार केला की, ' मी तात्काळ या दुष्ट लोकांच्या सर्व कारवाया थांबवीन,

त्यांना पकडून हद्दपार करीन, त्यांना दंड करीन, त्यांना शिक्षा करीन, त्यांना देहांत शासन करीन.' तर या रीतीने या लोकांचा स्वेच्छाचार समाधानकारक रीतीने थांबविता येणार नाही. जे शिक्षा केल्याविना मागे राहातील ते प्रजेला हैराण केल्याशिवाय सोडणार नाहीत."

१८. "ही दुरावस्था थांबविण्याचा एक मार्ग आहे तो असा. आपल्या राज्यात जो कोणी गुरे-ढोरे पाळतो, शेती करतो, त्यांना महाराज आपण भोजन द्यावे, शेती पेरण्याला बी-बियाणे द्यावे. आपल्या राज्यात जे कोणी व्यापार करणारे लोक आहेत त्यांना महाराजांनी व्यापार करण्यासाठी भांडवल द्यावे. जे कोणी आपल्या राज्यात सरकारी कर्मचारी आहेत त्यांना महाराजांनी भोजन आणि वेतन द्यावे."

१९. "मग हे सर्व लोक आपापली कामे करीत राहतील आणि देशात उत्पात होणार नाही. राजाचा अधिकार होऊ लागेल. देश सुखाने शांती अनुभवू लागेल आणि जनता एकमेकांवर संतुष्ट राहून आपली मुले कडेखांद्यावर घेऊन नाचेल. आणि आपल्या घराची दारे उघडी ठेवून निर्धास्त वावरेल."

२०. तेव्हा राजा, महाविजेता याने आपल्या पुरोहिताचा सल्ला मानून त्याप्रमाणे केले, लोक आपापल्या कामात मग्न झाले आणि देशात उत्पात करण्याचे त्यांनी सोडून दिले. राजाचा करभार वाढत राहिला. देश सुख, शांती, अनुभवू लागला आणि जनता एकमेकांवर संतुष्ट होऊन सुखी झाली; आपली मुले कडेखांद्यावर घेऊन नाचू लागली आणि दरवाजे उघडे ठेवून वावरू लागली.

२१. जेव्हा सर्व उत्पात शांत झाला तेव्हा राजा महाविजेत्याने आपल्या पुरोहिताला बोलाविले आणि म्हटले, "सर्व उत्पात शांत झाला आहे. देश खुशालीत आहे, मला आता महायज्ञ करावयाचा आहे. तेव्हा माझे दीर्घकालीन कल्याण साधेल असा महायज्ञ कसा करावा हे आपण मला सांगावे."

२२. पुरोहिताने राजाला उत्तर दिले, "राजा, आपल्या राज्यात जे जे मांडलिक क्षत्रिय असतील त्याप्रमाणेच राज्यात जे जे मंत्री, अधिकारी, आणि प्रतिष्ठित ब्राम्हण असतील त्याप्रमाणेच जे जे संपन्न गृहस्थ असतील त्या सर्वांना आमंत्रणे पाठवून कळवावे की, मी एक महायज्ञ करू इच्छितो. तेव्हा माझे हित आणि कल्याण जो दीर्घकाळ राखू शकेल अशा त्या महायज्ञास अनुमती द्यावी."

२३. " हे ब्राम्हण कूटदंता, त्या राजाने आपल्या पुरोहिताचा सल्ला मानला आणि त्याने सांगितल्याप्रमाणे केले. क्षत्रिय, मंत्री, ब्राम्हण आणि गृहस्थ या सर्वांनी असे उत्तर पाठविले की, 'महाराज आपण यज्ञ करावा, यज्ञाला हीच वेळ योग्य आहे.'

२४. राजा विजेता हा सूज्ञ आणि गुणसंपन्न होता. त्याचा पुरोहितही तितकाच सूज्ञ आणि गुणसंपन्न होता.

२५. ब्राम्हण हो, तो यज्ञ सुरू होण्यापूर्वी त्या पुरोहिताने त्या यज्ञासाठी काय करावे लागणार होते हे राजाला स्पष्ट करून सांगितले."

२६. तो पुरोहित बोलला, "महाराज, यज्ञाचा प्रारंभ करण्यापूर्वी किंवा महायज्ञात आहुती देत असताना किंवा त्यानंतर जर महाराजांना अनुताप वाटू लागला की, अरेरे! मी माझ्या संपत्तीचा केवढा मोठा भाग या यज्ञात खर्च केला? तर ते योग्य होणार नाही. महाराजांनी असला विचार मनात येऊ देता कामा नये."

२७. हे ब्राम्हणहो, त्या पुरोहिताने यज्ञाचा प्रारंभ होण्यापूर्वी यज्ञात भाग घेणार्या लोकांच्यापुढे यज्ञानंतर मनःस्ताप होऊ नये यासाठी राजाला उद्देशून म्हटले, " महाराज आपल्या या यत्रात जीवहिंसक, त्याप्रमाणेच अहिंसक, चोर, त्याचप्रमाणे चोरी न करणारे, विषयोपभोगी, दुर्वर्तन करणारे, त्याचप्रमाणे त्यापासून परावृत्त

असलेले, असत्यवादी, त्याचप्रमाणे सत्यवादी, निंदक, त्याचप्रमाणे निंदेपासून परावृत्त असलेले, उद्धट,त्याचप्रमाणे उद्धटपणा न करणारे, व्यर्थ बडबडणारे, त्याचप्रमाणे व्यर्थ न बडबडणारे,द्वेष करणारे, त्याचप्रमाणे द्वेष न करणारे, लोभी, त्याचप्रमाणे निर्लोभी, दुष्ट दृष्टीचे,त्याचप्रमाणे सम्यक् दृष्टीचे, असे नाना प्रकारचे लोक येतील. त्यांपैकी दुष्कृत्ये करणार्या दुर्जनांना दूर आपल्याच कार्यात मग्न राहू द्या; परंतु जे सत्कृत्य करणारे असतील त्यांच्यासाठी सर्व विधी महाराजांनी करावेत. त्यांना संतुष्ट राखवे. त्यांच्याच संतोषाने महाराजांना शांती लाभणार आहे."

२८. " आणि ब्राम्हण हो, त्या यज्ञात बैलांचे बळी दिले गेले नाहीत. बकर्यांची, कोंबड्यांची, पुष्ट डुकरांची किंबहुना कोणत्याही सजीव प्राण्याची हिंसा करण्यात आली नाही. यज्ञयूपासाठी झाडे तोडण्यात आली नाहीत. यज्ञभूमीवर पसरण्यासाठी दर्भाची कापणी झाली नाही. जे दास, दूत आणि कर्मचारी या यज्ञातील कार्यासाठी नेमले होते, त्यांना काम करायला लावण्यासाठी काठी वापरली गेली नाही, की भय दाखविले गेले नाही. आपले काम करताना त्यांच्या डोळ्यांतून अश्रु ओघळले नाहीत. ज्याला काम करावेसे वाटले त्याने ते काम केले; ज्याला वाटले नाही त्याने काम केले नाही; ज्याला जे योग्य वाटले ते काम त्याने केले; ज्याला जे योग्य वाटले नाही ते काम केले गेले नाही. केवळ तूप, तेल, लोणी, दूध, मध आणि साखर यांच्याच आहुतीने तो यज्ञ तडीस गेला."

२९. " जर तुम्हाला यज्ञ करावयाचा असेल तर त्या राजा विजेत्यासारखा यज्ञ करा; अन्यथा यज्ञ व्यर्थ आहेत. प्राण्यांचे बळी देणे ही निर्दयता आहे. यज्ञ हा धर्माचा भाग होऊच शकत नाही. जो धर्म जीवहिंसेने तुम्हाला स्वर्गप्राप्ती मिळवून देईन म्हणतो, तो धर्म हीन धर्म आहे."

३०. कूटदन्ताने भगवान बुद्धाला प्रश्न केला, " गौतमा! जीवहिंसेपेक्षा अधिक फळ देणारा, अधिक लाभदायक असा दुसरा काही यज्ञाचा प्रकार आहे काय?"

३१. " होय, ब्राम्हणा आहे."

३२. " असा तो यज्ञ कोणता?"

३३. " तो यज्ञ म्हणजे श्रद्धाशील अंत:करणाने हिंसा, स्तोम, कामपूर्तीसाठी मिथ्याचार, असत्य भाषण आणि बेसावधपणाचे मूळ म्हणजे जे उत्तेजक मद्याचे पान, यांपासून परावृत्त होण्याची प्रतिज्ञा करणे हा तो यज्ञ आहे. उदार दान, निरंतर दान, गृहदान आणि उपदेशग्रहण या सर्वांहूनही तो श्रेष्ठ प्रकारचा यज्ञ आहे."

३४. गौतमाने असे भाषण केल्यानंतर कूटदंत ब्राम्हण तथागतांना म्हणाला, "श्रमण गौतमा, तुझे शब्द सर्वश्रेष्ठ आहेत."

( २ )

१. उज्जय नावाचा ब्राम्हण तथागतांना म्हणाला,

२. "गौतमा, यज्ञ स्तुत्य समजतात काय?"

३. "नाही. ब्राम्हणा, मी यज्ञाची स्तुती करीत नसतो. तरीसुद्धा कुठल्याच यज्ञाबद्दल चांगले म्हणत नाही असे नाही. ब्राम्हणा, ज्या ज्या यज्ञामध्ये गोवध करतात, बकर्या आणि मेंढरांची कत्तल उडते, कोंबड्या आणि डुकरे कापली जातात आणि विविध प्रकारच्या सजीव प्राण्याचा नाश होतो, म्हणजे ज्या ज्या यज्ञात हिंसा घडते ते ते

यज्ञ माझ्या मते स्तुतीस पात्र नाहीत.” “असे का?”
४. “ब्राम्हणा! कारण असल्या हिंसेपासून व हिंसक यज्ञापासून सज्जन अथवा सन्मार्गगामी लोक दूर राहतात.”
५. “परंतु हे ब्राम्हणा, ज्या यज्ञात गोवध होत नाही आणि सजीव प्राण्यांची हिंसा घडत नाही असल्या अहिंसक यज्ञाची मी स्तुती करतो. असले यज्ञ म्हणजे उदाहरणार्थ, प्राचिनकाळापासून रूढ असलेले दानधर्म आणि कुटुंबपरिवाराच्या हितासाठी केलेला त्याग.”
६. “असे का?” “कारण हे ब्राम्हणा, सज्जन व सन्मार्गी लोक असल्या हिंसारहित यज्ञाच्या समीप जातात.”

( ३ )

१. उदायन ब्राम्हणानेही उज्जयाने विचारलेल्या प्रश्नासारखेच प्रश्न तथागताला विचारले.
२. तो म्हणाला, “श्रमण गौतमा, तुम्ही यज्ञाची स्तुती करता काय?” बुद्धाने उज्जयाला जसे उत्तर दिले, तसेच त्यालाही दिले.
३. भगवान बुद्ध म्हणाले, “ऋतूत केलेले योग्य यज्ञ, ज्यात निर्दयता नाही अशा यज्ञाच्या जवळ ज्यांचे डोळ्यावरील इहलोकीचे अज्ञानपटल नाहीसे झालेले आहेत असे सत्प्रवृत्त लोक जात असतात. ज्यांची जन्ममरणाची ये जा आता संपली आहे, तेही या यज्ञाजवळ जातात. प्रज्ञावान आणि पुण्यशील माणसे सांगतात, यज्ञात अथवा श्रद्धायुक्त कर्मकृत्यात श्रद्धाशील अंतःकरणाने आहुती दिली तर ते याजक पुण्यमार्ग चालू लागतात. अशा श्रेष्ठ मार्गगामी लोकांनी उदारपणे दिलेल्या आहुतीने देव संतुष्ट होतात. अशा आहुतीने विचारवान माणसे प्रज्ञावान बनतात आणि सर्व दुःखरहित होऊन आनंदमय जगात वावरू लागतात.

## ६. काल्पनिक अनुमानावर आधारलेला धर्म, हा धर्मच नव्हे.

( १ )

१. असे प्रश्न नेहमी विचारले जात. (१) मी गतयुगात होतो काय? (२) मी गतयुगात नव्हतो काय? (३) मी तेव्हा काय होतो ? (४) मी काय होऊन काय झालो? (५) मी भविष्यकाळातही असेन काय? (६) मी भविष्यकाळात नसेन काय ? (७) मी तेव्हा कोण असेन ? (८) मी तेव्हा कसा असेन ? (९) मी कोठून कोठे जाईन ? अथवा कदाचित आज तो आपल्या स्वत्वासंबंधी साशंक होऊन विचारीत असेल (१) मी आहे काय ? (२) मी नाही काय? (३) मी काय आहे? (४) मी कसा आहे ? (५) माझे अस्तित्व कोठून आले ? (६) ते कोठे जाणार ?
२. विश्वासंबंधी विविध प्रश्न विचारले जात त्यांपैकी काही असे होते.
३. विश्व कसे निर्माण झाले? ते चिरंतन आहे काय?
४. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरादाखल काही असे म्हणत की, विश्व ब्रम्ह याने निर्माण केले. दुसरे काही म्हणत, ते प्रजापतीने निर्माण केले आहे.
५. दुसर्या प्रश्नाचे उत्तर असे दिले जाई की, विश्व चिरंतन आहे; काही म्हणत ते सान्त आहे ; तर काही म्हणत ते

अनंत आहे.
६. असल्या प्रश्नांना भगवान बुद्धाजवळ थारा नसे. त्यांच्या मते केवळ असले प्रश्न विकृत बुद्धीचेच लोक विचारू शकतात.
७. कारण अशा प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे देणार्यांच्या ठिकाणी सर्वज्ञता असली पाहीजे आणि ती कोणाच्याही ठिकाणी नाही.
८. तो म्हणत असे, " या प्रश्नांची उत्तरे देण्याइतका मी सर्वज्ञ नाही. जे काही जाणण्याजोगे आहे ते आपण सर्व जाणतो असे कोणीच म्हणू शकणार नाही. किंवा एका विशिष्ट वेळी जे जाणण्याची आपण इच्छा करतो ते त्या वेळी आपण जाणलेले असतेच असे नाही. नेहमी काही तरी अज्ञातच राहते."
९. याच कारणास्तव भगवान बुद्धाने आपल्या धर्मात वरील प्रश्नविषयक सिद्धांताला स्थान दिलेले नाही.
१०. जो धर्म असल्या सिद्धान्ताला आपल्या धर्माचा एक भाग समजतो तो भगवान बुद्धाच्या मते स्वीकारार्ह नाही.

( २ )

१. भगवान बुद्धाच्या समकालीन आचार्यांनी ज्या सिद्धांताना आपल्या धर्माचे आधार बनविले होते ते आत्मा आणि विश्वोत्पत्ती यासंबंधीचे होत.
२. आत्म्यासंबंधी ते काही प्रश्न विचारीत ते असे : ( १ ) मी गतयुगात होतो काय? ( २ ) मी गतयुगात नव्हतो काय? ( ३ ) मी तेव्हा काय होतो ? ( ४ ) मी काय होऊन काय झालो? ( ५ ) मी भविष्यकाळातही असेन काय? ( ६ ) मी भविष्यकाळात नसेन काय? ( ७ ) मी तेव्हा कोण असेन? ( ८ ) मी तेव्हा कसा असेन? ( ९ ) मी कोठून कोठे जाईन? अथवा कदाचित आज तो आपल्या स्वत्वासंबंधी साशंक होऊन विचारीत असेल:- ( १ ) मी आहे काय? ( २ ) मी नाही काय? ( ३ ) मी काय आहे? (४ ) मी कसा आहे? ( ५ ) माझे अस्तित्व कोठून आले ? आणि ते येथून कोठे जाणार?
३. दुसरे काही आचार्य विश्वोत्पत्तीसंबंधीचा प्रश्न विचारीत.
४. काही म्हणत ब्रम्ह याने विश्व निर्मिले.
५. काही म्हणत, प्रजापतीने आत्मयज्ञाने ते निर्मिले.
६. इतर काही आचार्य दुसरेच प्रश्न विचारीत. जग चिरंतन आहे काय? चिरंतन नाही काय? ते सान्त आहे काय? ते अनंत आहे काय? शरीर म्हणजे जीव आहे काय? शरीर एक वस्तु आहे आणि जीवही दुसरी वस्तु आहे काय? सत्य ज्ञात्याला मृत्यूनंतर अस्तित्व आहे काय? त्याला मृत्यूनंतर अस्तित्व आहेही आणि नाहीही असे आहे काय? तो मृत्यु तर असत नाही व असत नाही असेही नाही.
७. भगवान बुद्धाच्या मते असले प्रश्न फक्त विकृत मनाचे लोकच विचारू शकतात.
८. तीन कारणास्तव बुद्धाने या धार्मिक सिद्धान्ताचा धिक्कार केला.
९. प्रथम या सिद्धान्तांना धर्माचा एक भाग मानण्याचे कारण नाही.
१०. दुसरे असे, या प्रश्नांची उतरे द्यायला अंगी सर्वज्ञता पाहिजे आणि ती कोणाच्याही अंगी नसते. या गोष्टीवर

त्याने आपल्या प्रवचनातून भर दिलेला आहे.

११. तो म्हणतो एकाच वेळेला कोणालाही सर्वच दिसत नाही किंवा जाणता येत नाही. ज्ञानाला अंत नाही. कारण नेहमीच अधिकाधिक जाणायचे बाकी राहाते.

१२. भगवान बुद्धाचा या सिद्धान्तावरील तिसरा आक्षेप म्हणजे हे सर्व सिद्धान्त केवळ काल्पनिक अनुमानाच्या रूपाचे आहेत. त्यांची कधीच कसोटी घेतलेली नसते; आणि त्यांना कधीही कसोटी लावता येत नाही.

१३. अनिर्बंध कल्पनेचे ते परिणाम आहेत. त्याच्यामागे वास्तवता अशी काहीच नाही.

१४. शिवाय या काल्पनिक अनुमानांचा माणसामाणसांच्या संबंधात काय उपयोग आहे? अर्थात काहीच नाही.

१५. जगाची निर्मिती एकदम झाली आहे यावर भगवान बुद्धाचा विश्वास नव्हता. जगाची उत्क्रांती झाली आहे असे तो मानीत असे.

## ७. धर्मग्रंथांचे केवळ पठण म्हणजे धर्म नव्हे

१. ब्राम्हण विद्येवर भर देत असत. त्यांच्या मते विद्या हाच प्रारंभ; विद्या हाच अंत. विद्येव्यतिरिक्त दुसर्या गोष्टींचा विचार त्यांच्या मते अनावश्यक होता.

२. उलटपक्षी भगवान बुद्ध हा सर्वांना शिक्षण असावे या मताचा होता.

३. मनुष्य आपल्या विद्येचा उपयोग कसा करतो यालाच तो, केवळ विद्येपेक्षा अधिक महत्व देतो. आणि म्हणूनच जो विद्वान आहे त्याच्या ठिकाणी शीलही असले पाहिजे. कारण शीलरहित विद्या नाशकारक आहे.

४. विद्या आणि शील यांपैकी शीलाचे महत्व कसे अधिक आहे हे भगवान बुद्धाने भिक्खु पटिसेनाला जे सांगितले त्यावरून स्पष्ट होते.

५. प्राचीन काळी जेव्हा भगवान बुद्ध श्रावस्तीत राहात होता, त्या वेळी तेथे स्वभावाने तिरसट आणि मठ्ठ, ज्याला एक गाथाही कधी पाठ करता आली नाही असा पटिसेन नावाचा म्हातारा भिक्खु होता.

६. म्हणून भगवान बुद्धाने पाचशे अर्हतांना पटिसेनाला प्रतिदिनी शिक्षण द्यावे अशी आज्ञा केली; परंतु तीन वर्षांनंतरही पटिसेनाला एकही गाथा पाठ म्हणता येईना.

७. तेव्हा जनपदातील सर्व भिक्खू, भिक्खूणी, उपासक आणि उपासिका पटिसेनाचे हे अज्ञान पाहून त्याचा उपहास करू लागले. भगवान बुद्धाला त्याची दया आली. त्याने पटिसेनाला आपल्याजवळ बोलाविले आणि सौम्यपणे त्याच्यापुढे पुढील गाथा म्हटली, "जो राखून बोलतो, विचारांचा संयम करतो, जो आपल्या देहाने दुसर्याला उपद्रव करीत नाही, असा मनुष्य निब्बाण मिळवू शकतो."

८. तथागतांनी दाखविलेल्या या सदभावनेने प्रेरित झाल्यामुळे त्याचे अंतःकरण प्रफुल्ल झाले. त्याने ती गाथा पाठ म्हणून दाखवली.

९. तेव्हा भगवान बुद्धाने पुन्हा त्यास उद्देशून म्हटले, "वृद्ध मनुष्या ! आता तुला फक्त एकच गाथा पाठ म्हणता येते. हे जेव्हा लोकांना कळेल तेव्हा तुझा उपहास करू लागतील. म्हणून मी तुला त्या गाथेचा अर्थ समजावून सांगतो आणि तू तो नीट कान देऊन ऐक."

१०. नंतर भगवान बुद्धाने तीन कायिक अकुशल कर्मे; चार मौखिक अकुशल कर्मे आणि तीन मानसिक अकुशल

कर्मे, ज्यांच्या विनाशाने माणसाला निब्बाण साधता येते ती सांगितली. बुद्धाने केलेल्या विवेचनाचा अर्थ त्या भिक्खूला समजला आणि लवकरच त्याला अर्हतपद प्राप्त झाले.

११. या सुमारास एका विहारात पांचशे भिक्खूणी राहात होत्या. त्यांनी आपल्यापैकी एकीला भगवान बुद्धाकडे पाठवून तिच्यामार्फत बुद्धाला एक धर्मोपदेशक पाठविण्याची विनंती केली.

१२. ही विनंती ऐकून भगवान बुद्धाने त्या म्हातार्या पटिसेनाला त्यांच्याकडे पाठविण्याचे ठरविले.

१३. या व्यवस्थेची वार्ता त्या भिक्खूणींच्या कानी येताच त्या सर्व हसू लागल्या आणि म्हातार्या भिक्खूसमोर गाथांचे पठण उलटे म्हणजे शेवटच्या अक्षरापासून करून त्यांनी त्याला गोंधळात टाकण्याचे आणि लज्जित करण्याचे ठरविले.

१४. नंतर दुसर्या दिवशी सकाळी सर्व लहान थोर भिक्खूणी, पटिसेन येताच त्याला नमस्कार करण्यासाठी पुढे गेल्या. नमस्कार करीत असता त्या एकमेकींकडे पाहुन मिस्किलपणे हसत होत्या.

१५. खाली बसल्यावर त्यांनी त्या भिक्खूपुढे अन्न ठेविले. पटिसेनाने भोजन करूत हात आणि तोंड धुतल्यावर त्या भिक्युणींनी त्याला प्रवचनाला प्रारंभ करण्याची विनंती केली. तेव्हा तो वृद्ध भिक्खु व्यासपीठावर जाऊन बसला आणि म्हणाला,

१६. "भगिनींनो ! माझी बुद्धी अल्प आहे. माझे शिक्षण अल्प आहे. मला फक्त एकच गाथा येते ती म्हणून दाखवून तिचा अर्थ मी तुम्हाला सांगेन. सावधान चित्ताने ऐका आणि त्याचा अर्थ समजून घ्या."

१७. तेव्हा भिक्खुंनींनी ही गाथा शेवटच्या अक्षरापासून उलटी म्हणण्याचा प्रयत्न केला; परंतु आश्चर्य हे की, त्यांना तोंडसुद्धा उघडता येईना. लज्जित होऊन दुःखाने त्यांनी आपल्या माना खाली घातल्या.

१८. पटिसेनाने ती गाथा म्हटली आणि भगवान बुद्धाने जशी त्याला स्पष्ट करुन सांगितली होती त्याप्रमाणेच त्याने त्या गाथेचा अर्थ विशद केला.

१९. त्या सर्व भिक्खूणी त्याचे प्रवचन ऐकताच आश्चर्यचकित झाल्या. एकाग्रचित्ताने आणि प्रमुदित मनाने त्यांनी ते प्रवचन ग्रहण केले आणि त्या अर्हत झाल्या. ( आणि त्यांना अर्हतपद प्राप्त झाले. )

२०. दुसर्या दिवशी प्रसेनजित राजाने भगवान बुद्धाला आणि त्यांच्या भिक्खू संघाला आदरातिथ्यासाठी आमंत्रण दिले.

२१. पटिसेनाची चर्या सर्व भिक्खूहून श्रेष्ठ प्रतीची आणि पवित्र दिसते हे ओळखून भगवान बुद्धाने आपले भिक्षापात्र त्याच्या हाती देऊन तो त्याच्यामागून चालू लागला.

२२. परंतु जेव्हा राजवाड्याच्या दारी आले तेव्हा पटिसेनाला ओळखणार्या तेथील द्वारपालाने त्याला आत जाण्याची मनाई केली आणि म्हटले, "ज्याला फक्त एकच गाथा येते अशा भिक्खूसाठी येथे आदरातिथ्याचा समारंभ नाही. चल चालता हो आणि तुझ्या वरिष्ठांना आत येण्यासाठी जागा दे."

२३. तेव्हा पटिसेन राजवाड्याच्या द्वाराबाहेरच बसून राहिला.

२४. नंतर भगवान बुद्ध व्यासपीठावर गेला आणि तेथे त्याने हात धुतले आणि आश्चर्य हे की, भिक्षापात्र धरलेला पटिसेनाचा हात त्या खोलीत दिसू लागला.

२५. तेव्हा राजा आणि त्याचा प्रधान आश्चर्याने उद्गारले, "अरे हा कोण?"

२६. तेव्हा भगवान बुद्धाने उत्तर दिले, "तो पटिसेनाचा हात आहे. त्याला नुकतीच बोधीस्थिती प्राप्त झाली आहे

आणि माझ्यामागे भिक्षापात्र हाती धरण्यास मी त्यास सांगितले आहे; परंतु द्वारपालाने त्याला आत येऊ दिलेले नाही.”

२७. हे भगवान बुद्धाचे शब्द ऐकल्यावर पटिसेनाला आत प्रवेश मिळाला आणि तो त्या सभेत सामील झाला.

२८. तेव्हा प्रसेनजित भगवान बुद्धाकडे वळून म्हणाला, “मी तर ऐकत होतो. की पटिसेन हा एक अल्प बुद्धीचा, एकच गाथा जाणणारा मनुष्य आहे. मग तो प्रज्ञावान केव्हापासून झाला?”

२९. त्यावर भगवान बुद्धाने उत्तर दिले, “ विद्या अधिक नसली तरी चालते. कारण शील हीच सर्वोत्तम वस्तु आहे.”

३०. ह्या पटिसेनाच्या अगदी मनोरंध्रात या गाथेचा अर्थ भरला आहे. त्याचे शरीर आणि मन ही पूर्ण शांत झाली आहेत. माणसाला ज्ञान असले तरी जोपर्यंत त्याचे ह्या ज्ञानानुसार आचरण होत नाही तोपर्यंत ते ज्ञान त्याला अध:पातापासून वाचवू शकत नाही.

३१. नंतर तथागत म्हणाला,

३२. “माणसाला जरी हजारो गाथा पाठ म्हणता येत असल्या तरी जोपर्यंत त्याला त्यातील ओळीचा अर्थ कळत नसेल तर त्याच्यापेक्षा एकच गाथा जाणून तदनुसार आपल्या विचारांचा जो संयम करू शकतो तो मनुष्य श्रेष्ठ आहे. हजारो शब्द न समजता पाठ म्हणण्यात काय अर्थ आहे ? ऐकलेले शब्द समजून त्याप्रमाणे आचरण करणे म्हणजे आपल्या मोक्षाचा मार्ग चोखाळण्यासारखे आहे.”

३३. “ माणसाला पुष्कळशी पुस्तके पाठ येत असली तरी जोपर्यंत तो त्याचा आशय विशद करून सांगू शकत नाही तोपर्यंत त्या पठणाचा उपयोग काय? धर्माचे एकच वाक्य समजावून घेतले आणि जर त्याप्रमाणे आचरण ठेवले, तर त्यायोगे सर्वोत्तम प्रज्ञेच्या मार्गाची वाटचाल होणार आहे.”

३४. भगवान बुद्धाचे हे शब्द ऐकून तेथे जमलेले दोनशे भिक्खु, राजा, मंत्रिगण हे आनंदीत झाले.

## ८. ‘धर्म पुस्तके’ प्रमादातीत आहेत असे मानणे म्हणजे अधर्म आहे.

१. वेद हे केवळ पवित्र आहेत, एवढेच नव्हे तर, ते स्वतः प्रमाण आहेत असे ब्राम्हण उद्‌घोष करीत होते.

२. वेद हे केवळ स्वतः प्रमाण आहेत एवढेच नव्हे तर ते प्रमादातीत आहेत. असे ब्राम्हण म्हणत.

३. ब्राम्हणांच्या त्या मुद्याला भगवान बुद्धाचा विरोध होता.

४. वेद पवित्र आहेत, स्वतः प्रमाण आहेत आणि वेद प्रमादातीत आहेत या तीनही गोष्टी भगवान बुद्धाने नाकारल्या आहेत.

५. त्याच्यासारखी भूमिका पुष्कळ धर्मोपदेशकांनी घेतली होती. तथापि आपल्या तात्विक दर्शनाला ब्राम्हणांकडून संमती आणि सन्मान मिळावा यासाठी त्यांनी पुढे वेदविरोधी भूमिकेचा त्याग केला; परंतु भगवान बुद्धाने या बाबतीत कधीच पाऊल मागे घेतले नाही.

६. तेवीज्यसूत्तामध्ये भगवान बुद्धाने, वेद म्हणजे एक निर्जल वाळवंट, निष्पथ अरण्य आणि खरोखर एक नरकच आहे असे म्हटले आहे. बौद्धिक आणि नैतिक तृष्णेने आर्त झालेल्या कोणाही मनुष्याने वेदापासून आपल्या तृषेचे शमन होईल अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे.

७. वेद प्रमादातीत आहेत यासंबंधी त्याचे म्हणणे असे की, वेदच काय कोणतेही वाङ्मय प्रमादातीत नाही. प्रत्येक गोष्टीची परीक्षा आणि पुन्हा परीक्षा ही झालीच पाहिजे.

८. कालाम लोकांच्यापुढे झालेल्या आपल्या प्रवचनात भगवान बुद्धाने हे मत स्पष्ट केले आहे.

९. एकदा एका मोठ्या भिक्खू संघासमवेत कोसल जनपदातून जात असता भगवान बुद्ध कालामांच्या केसपुत्त या नगरात आला.

१०. जेव्हा कालामाला भगवान बुद्धाच्या आगमनाची वार्ता मिळाली, तेव्हा ते तथागताजवळ गेले आणि त्याच्या बाजूला बसून त्या केसपुत्त गावच्या कालामांनी तथागताला उद्देशून म्हटले,

११. "भगवान ! केसपुत्त गावी येणारे काही श्रमण ब्राम्हण, आपापली मते मांडतात आणि ती सर्वश्रेष्ठ आहेत असा दावा सांगतात. ते दुसर्यांच्या मताचे खंडन करतात. त्यांचे मत हीन मत आहे अशी त्याची संभावना करतात. त्याप्रमाणेच दुसरेही श्रमण ब्राम्हण केसपुत्ताला येतात, आपापल्या धर्मसमजुतीचे प्रवचन करतात. त्यांचा महिमा गातात; परंतु त्याबरोबरच ते दुसर्यांच्या धर्मसमजुतीचे खंडण आणि निर्भत्सना करतात."

१२. "आणि म्हणून भगवान ! त्या श्रमण ब्राम्हणांपैकी कोणाचे सत्य मानावयाचे व कोणाचे असत्य मानावयाचे हे आम्हाला समजत नाही. त्यामुळे आमचे मत अनिश्चित आणि शंकाधीन झाले आहे."

१३. तथागताने उत्तर दिले, "तुमच्या मनात अनिश्चितता आणि शंका उद्भवावी याला योग्य कारण झाले आहे आणि ही अनिश्चिती आणि शंका खरोखर तुमच्या मनात योग्य वेळीच उत्पन्न झाली आहे."

१४. भगवान पुढे म्हणाले, "हे कालामांनो, तुम्ही जे केवळ ऐकता त्यावर विश्वास ठेवू नका. जे केवळ पुष्कळ लोक सांगतात म्हणून त्यावर विश्वास ठेवू नका. जे केवळ धर्मपुस्तकात लिहिलेले आहे म्हणून त्यावर विश्वास ठेवू नका. जे केवळ तर्कशास्त्रानुसार आहे म्हणून ते मानू नका. जे केवळ न्याय शास्त्रानुसार आहे म्हणून ते मानू नका. जे केवळ सकृद्दर्शनी पटण्यासारखे आहे म्हणून त्यावर विश्वास ठेवू नका. ज्या समजुती आणि मते अनुकूल वाटतात म्हणून त्याच्यावर विश्वास ठेवू नका. जे केवळ बाह्यात्कारी खर्यासारखे दिसते ते केवळ बाह्यात्कारी सत्य म्हणून त्यावर विश्वास ठेवू नका. एखादे वचन कोणा एका यतीने अथवा आचार्याने सांगितले एवढ्यानेच त्यावर विश्वास ठेवू नका."

१५. कालामाने विचारले, " मग आम्ही करावयाचे तरी काय? आम्ही कोणती कसोटी लावायची?"

१६. तथागताने उत्तर दिले, " कसोटया ह्या स्वत:लाच विचारा. ह्या गोष्टी हितकर आहेत काय? शहाण्या माणसाने त्या टाकाऊ मानल्या आहेत काय? त्या केल्या असता कष्ट आणि दु:ख ओढवते काय?

१७. कालामांनो, यापुढेही जाऊन तुम्ही असे विचारले पाहिजे की, " हे सिद्धांत तृष्णा, द्वेष, मूढता आणि हिंसा यांना सहाय्यक नाहीत ना?"

१८. " एवढेच पुरे नाही तर कालामांनो, आणखीही पुढे जाऊन तुम्ही पाहिले पाहिजे की, सिद्धान्त माणसाला इंद्रियाधीन करणारे नाहीत ना ? हिंसेला प्रवृत्त करणारे तर नाहीत ना? चोरी करण्याला प्रेरणा देणारे नाहीत ना? कामेच्छापूर्तीसाठी मिथ्याचार शिकविणारे तर नाहीत ना? ते असंख्य भाषण करायला लावणारे तर नाहीत ना?"

१९. " आणि शेवटी तुम्ही त्या सिद्धान्ताबाबत असा प्रश्न विचारला पाहिजे की, या सिद्धान्ताचा परिणाम अहित आणि दु:खात तर होणार नाही ना?"

२०. आता कालामांनो, सांगा-

२१. " त्या श्रमण ब्राम्हणांचे सिद्धान्त हित साधणारे आहेत की अहित साधणारे आहेत?"

२२. कालामांनी उत्तर दिले, ' भगवान, ते अहिताकडे नेणारे आहेत.'

२३. ' ते लाभकारक आहेत की हानिकारक आहेत ?'

२४. ' भगवान, ते हानिकारक आहेत.'

२५. ' ते निंद्य आहेत काय, कालामांनो ?'

२६. कालामाने उत्तर दिले, ' भगवान, ते निंद्य आहेत.'

२७. ' शहाण्या माणसांना ते मान्य आहेत की त्यांच्या मते ते निषिद्ध आहेत?'

२८. ' शहाणी माणसे त्याना टाकाऊ समजतात.'

२९. ' त्यांचा आचार केला असता त्याचे पर्यवसान कष्टात आणि दु:खात होते काय?'

३०. ' होय भगवान, त्यांचे पर्यवसान कष्टात आणि दु:खात होते.'

३१. ' जे धर्मग्रंथ असले सिद्धान्त शिकवितात ते तुमच्या मते स्वत:प्रमाण आणि प्रमादातीत ठरतात काय?'

३२. 'नाही', कालामाने उत्तर दिले, ' भगवान, ते स्वत:प्रमाण आणि प्रमादा तीत ठरत नाहीत.'

३३. " आणि कालामांनो, मीही नेमके हेच म्हणतो आहे, मीही हेच म्हणालो आहे. जे केवळ ऐकीव आहे, परंपरागत आहे, ज्यात केवळ वादविवादाची कुशलता आहे किंवा तर्काची सूक्ष्मता आहे, तेवढ्यावरूनच त्यावर विश्वास ठेवू नका. जे केवळ वरवर पाहता विश्वसनीय वाटते म्हणून मानू नका. ज्या समजुती आणि दृष्टिकोण केवळ अनुकूल वाटतात म्हणून स्वीकारू नका. ते केवळ श्रमण ब्राम्हणाचे शब्द आहेत म्हणून त्यावर भाळून जाऊ नका."

३४. " जेव्हा तुम्हाला आत्मानुभवाने वाटेल की, ह्या गोष्टी अहितकर, दोषार्ह, सुज्ञांनी निषिद्ध ठरविलेल्या किंवा परिणामी कष्टात आणि दु:खात नेणार्या आहेत, तेव्हा त्या गोष्टींचा तुम्ही त्याग केला पाहिजे."

३५. 'भगवान ! फार छान, फार छान! आम्ही भगवन्ताला आणि त्याच्या धर्माला शरण आलो आहोत. आपले उपासक म्हणून भगवान, आमचा स्वीकार करावा. आजपासून आमरण आम्ही भगवन्तांना शरण आलो आहोत.'

३६. भगवान बुद्धाच्या ह्या विचारसरणीचा सारांश अगदी स्पष्ट आहे. कोणाचीही शिकवण ती अधिकारी आहे म्हणून स्वीकारू नका. ती धर्मग्रंथनिविष्ट आहे, त्यांत तर्काची सूक्ष्मता आहे, किंवा तिचे बाह्यरूप ग्राह्य आहे, म्हणून ती मानू नका. उपदेशिलेले विचार किंवा दृष्टिकोन अनुकूल वाटतात, ते बाहेरून सत्यस्वरूप दिसतात किंवा ते कोणा महान आचार्याचे आहेत म्हणून त्यावर विश्वास ठेवू नका.

३७. उपदेशिलेले विचार किंवा दृष्टिकोन हितकर आहेत की निंदनीय आहेत, सदोष आहेत की काय, ते कल्याणकारक आहेत की अकल्याणकारक आहेत याचा विचार करा.

३८. या कसोटीवर उतरणारा कोणाचाही उपदेश मान्य करावयास प्रत्यवाय नाही.

# भाग पाचवा: सद्धम्म म्हणजे काय?

## १. मनाची मलिनता दूर करणे

१. एकदा तथागत हे श्रावस्तीस वास करीत असताना कोसलराजा प्रसेनजित त्याच्या निवासस्थानी आला, आणि आपल्या रथातून उतरून भक्तीभावाने तो तथागतांच्या सन्निध गेला.

२. सकाळी नगरात प्रवेश करून आपले आदरातिथ्य स्वीकारावे असे त्याने तथागताला विनविले. यामध्ये त्याचा हेतू लोकांना भगवान बुद्धाचे सर्वोत्तम दर्शन घडावे, त्याचा धर्म कळावा, त्याच्यावर श्रद्धा बसावी हा होता.

३. भगवान बुद्धाने त्याचे आमंत्रण स्वीकारले, आणि दुसर्या दिवशी सकाळी आपल्या सर्व भिक्षु संघासह नगरात प्रवेश केला; आणि चौरस्ते ओलांडून पूर्वनियोजित स्थानी येऊन विराजमान झाला.

४. भोजन संपल्यानंतर राजाच्या विनंतीनुसार चौरस्त्यावर एका मोठया श्रोतृसमूहासमोर त्याने धर्मोपदेशाला प्रारंभ केला.

५. या वेळी त्या श्रोतृवंदात दोन व्यापारी त्याचे भाषण ऐकत होते.

६. त्यांपैकी एक मनात विचार करू लागला, असल्या धर्म-सिद्धान्ताचा उपदेश सार्वजनिक रीतीने घडवून आणावा यात राजाचे किती थोर शहाणपण दिसते; किती सर्वव्यापी व शोधक बुद्धीचे सिद्धान्त आहेत हे!

७. दुसर्याच्या मनात विचार आला, असल्या माणसाला धर्मोपदेशक करायला येथे आणणे यात राजाचा किती मूर्खपणा आहे!

८. गाय जे वाहन ओढीत असते त्याला बांधलेले वासरू गाईच्या मागून जाते, आणि जात असताना हंबरत असते. त्याप्रमाणे भगवान बुद्ध ह्या राजामागून जात आहे. ते नगर सोडल्यानंतर ते दोघे व्यापारी ज्या सराईमध्ये उतरले होते तेथे एकत्र आले.

९. मद्यपान करीत असताना जो व्यापारी भला होता त्याला चार्तुमहाराजिक देवतांनी संयमित आणि संरक्षित ठेवला.

१०. उलट दुसरा मात्र पिशाच्चाने पिसाळल्याप्रमाणे एकसारखा पीत होता. शेवटी झोप आल्याने तो गुत्याच्या जवळच्या रस्त्यावर पहुडला.

११. दुसर्या दिवशी सकाळी त्या पहिल्या व्यापार्याच्या गाडीखाली तो रस्त्यावर पडलेला व्यापारी, सारथ्याला न दिसल्यामुळे चिरडला गेला आणि मरण पावला.

१२. पहिला व्यापारी एका दूर देशात आला असताना, त्या देशाचा एका पवित्र अश्वाने त्याच्यापुढे गुडघा वाकविल्यामुळे तो त्या देशाचा राजा म्हणून निवडला गेला आणि त्याला सिंहासनाधिष्ठित करण्यात आले.

१३. त्यानंतर या आपल्या जीवनाला मिळालेली ही विलक्षण कलाटणी मनात आणून तो भगवान बुद्धाकडे गेला आणि आपल्या देशात येऊन आपत्या प्रजेला उपदेश करण्यासाठी त्यांना आमंत्रण दिले.

१४. त्या वेळी त्या जगद्वंद्य बुद्धाने त्या दुष्टबुद्धी व्यापार्याच्या मृत्यूचे आणि त्या सदबूद्धी व्यापार्याच्या भरभराटीचे कारण त्यांना सांगितले आणि म्हटले,

१५. 'मन सर्वाचे मूळ आहे, मन हे स्वामी आहे. मन हे कारण आहे.'

१६. 'मनात दुष्ट विचार असतील तर माणसाचे विचार, माणसाचे शब्द आणि कार्ये ही दुष्ट बनतात. पापोद्भव दु:खे, ज्याप्रमाणे रथाची चाके रथाच्या घोड्यामागे जातात त्याप्रमाणे त्याचा पाठपुरावा करीत असतात.'

१७. 'मन हे सर्वाचे मूळ आहे. तेच आज्ञा करते आणि तेच घटना घडवून आणते.'

१८. 'मनात सद्विचार असतील तर त्या माणसाचे शब्द आणि कार्ये दोन्हीही चांगली असतात, आणि अशा सदाचारापासून उद्भवणारे सुख, पदार्थाच्या सावलीप्रमाणे सदोदित त्या माणसामागे जात असते.'

१९. हे शब्द ऐकून राजा, त्याचे प्रधान आणि इतर असंख्य लोकांनी भगवान बुद्धाची धर्मदीक्षा ग्रहण केली आणि ते त्याचे शिष्य झाले.

## २. जग हे धम्मराज्य बनविणे

१. धम्माचे प्रयोजन काय?

२. याची भिन्न धर्मानी भिन्न भिन्न उत्तरे दिली आहेत.

३. माणसाला ईश्वरप्राप्तीच्या मार्गी लावून त्याला आपल्या आत्म्याच्या मोक्षाचे महत्व शिकविणे, हे सामान्यत: वरील प्रश्नाला उत्तर येते.

४. बहुतेक धर्म तीन प्रकारच्या राज्यासंबंधी बोलतात.

५. एकाला स्वर्गाचे राज्य म्हणतात, दुसर्याला इहलोकीचे राज्य म्हणतात आणि तिसर्याला नरकाचे राज्य म्हणतात.

६. असे म्हणतात की, स्वर्ग-राज्यात देवांचे शासन चालते. नरक-राज्यात दुष्टांचे राज्य चालते. इहलोकीच्या राज्यासंबंधी वाद आहेत. ते सैतानाच्या मांडलिकत्वाखाली नसते, त्याप्रमाणेच देवांचे सार्वभौमत्वही त्यावर पसरलेले नसते. एक दिवस ते पसरेल, अशी अपेक्षा मात्र असते.

७. काही धर्मांमध्ये स्वर्गराज्य प्रत्यक्ष ईश्वराच्या शासनाखाली असल्याने तेथे धर्मराज्य असते.

८. इतर काही धर्मात स्वर्गराज्य हे इहलोकी असत नाही. ते फक्त स्वर्गाचेच दुसरे नाव आहे. जो कोणी ईश्वर आणि त्याच्या प्रेषितावर श्रद्धा ठेवील त्यालाच तेथे पोहचता येते. स्वर्गलोकी पोहोचल्यावर त्या धर्मनिष्ठांना जीवनातील सर्व भोगविलास तेथे लाभतात.

९. सर्व धर्म असे उपदेशीतात की, ह्या स्वर्गराज्याची प्राप्ती हे प्रत्येक माणसाचे साध्य असावे; आणि ते कसे साधावे हे सांगणे त्या सर्व धर्माचे कार्य असावे.

१०. धर्माचा उद्देश काय? याला भगवान बुद्धाचे उत्तर अगदी वेगळे होते.

११. जीवनाचा उद्देश काही तरी काल्पनिक स्वर्गाची प्राप्ती आहे, असे त्याने लोकांना सांगितले नाही. त्याचे म्हणणे असे की, धर्माचे राज्य इहलोकीचे आहे आणि त्याची प्राप्ती धर्मशील आचारानेच घडते.

१२. त्याने असे सांगितले आहे की, "दु:ख निराकरणासाठी प्रत्येक माणसाने दुसर्या प्रत्येक माणसाशी धर्मानेच वागले पाहिजे; आणि अशा व्यवहारानेच इहलोकी धर्मराज्य स्थापन केले पाहिजे."

१३. यामुळेच त्याचा धर्म इतर धर्मापासून वेगळा पडतो.

१४. त्याचा धर्म पंचशील, अष्टांगमार्ग आणि पारमिता यावर भर देतो.

१५. भगवान बुद्धाने या त्रयीवरच आपला धर्म का आधारला? कारण जीवन-मार्गाचे हे तीन घटक असून त्यांच्या योगानेच मनुष्य सदाचारी बनू शकतो.

१६. माणसाचे दुःख, हे माणसामाणसातील अनुचित व्यवहाराचाच परिणाम आहे.

१७. हा अनुचित व्यवहार आणि त्यापासून उद्भवणारी दुःखे, ही धर्मानेच नाहीशी होऊ शकतात.

१८. म्हणूनच धर्माने नुसता उपदेश करून भागणार नाही. तर त्याने माणसाला आपल्या व्यवहारात सदाचाराची किती आवश्यकता आहे, हे त्याच्या मनावर पूर्णपणे ठसविले पाहिजे.

१९. ही सदाचाराची आवश्यकता माणसाच्या मनावर ठसविण्यासाठी धर्माला इतरही काही कार्ये करावी लागतात, असे तो म्हणतो.

२०. धर्माने माणसाला आचरण्यास योग्य कुशल कर्म कोणते हे ओळखण्याचे आणि त्या आधारे आचार करण्याचे शिकविले पाहिजे.

२१. धर्माने आचरण्यास अयोग्य ( अकुशल कर्म ) कोणते हे ओळखण्याचे आणि टाळण्याचे शिकविले पाहिजे.

२२. ह्याशिवाय अतिशय महत्वपूर्ण असे मानलेले धम्माचे दोन उपदेश भगवान बुद्धाने शिकविले.

२३. धर्माचा पहिला उद्देश म्हणजे माणसाला प्रार्थना, धार्मिक विधी, यज्ञयाजन शिकविण्याऐवजी त्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीला वळण लावणे, म्हणजे सुसंस्कृत करणे.

२४. देवदाह सूत्रात, जैन धर्माची चर्चा करताना भगवान बुद्धाने हा उद्देश स्पष्ट केला आहे.

२५. जैन धर्माचा संस्थापक असे मानीत असे की, सर्व वैयक्तिक सुखकर अथवा दुःखकर अनुभव हे गतजन्मी केलेल्या कर्मांचे फळ आहे.

२६. असे असल्यामुळे गतजन्मीच्या दुष्कर्मांचे विवेचन केले असता, आणि नवी दुष्कर्मे न केल्यास भविष्यकाळात भोगायचे काहीच राहात नाही. भविष्यकाळात भोगायला लावणारे दुष्कर्माचे परिणाम उरले नाहीत की दुष्कर्म क्षय पावते, आणि दुष्कर्म क्षय पावले की दुःखाचा क्षय होतो, आणि सर्व दुःखाचेच मुळापासून उच्चाटन होते.

२७. असा जैन धर्माचा दृष्टिकोन आहे.

२८. यावर भगवान बुद्धाने एसा प्रश्न केला, ‘ तुम्हाला असे सांगता येईल का? की, या इथे आता दुष्ट वृत्तीचा उच्छेद केला की त्या क्षणी तिथे सत्प्रवृत्तीची स्थापना होते?’

२९. याचे उत्तर ‘नाही’ असेच आले.

३०. तेव्हा भगवान बुद्धाने विचारले, ‘ जोपर्यंत तुम्ही दुष्टवृत्तीचा त्याग करून सत्प्रवृत्तींचा अंगिकार करण्याचे मनास शिक्षण दिले नाही, तोपर्यंत गत दुष्कर्माचे विरेचन आणि नव्या दुष्कर्माचा प्रारंभ न करणे या क्रियांना काय अर्थ आहे?’

३१. भगवान बुद्धाच्या मते, हा त्या धर्मातील एक गंभीर दोष होता. सत्प्रवृत्ती हीच चिरस्थायी चांगुलपणाचे अधिष्ठान आणि हमी आहे.

३२. म्हणूनच भगवान बुद्धाने चित्ताच्या साधनेला म्हणजेच माणसाच्या वृत्तीला सुसंस्काराने वळण लावण्याला अगदी पहिले स्थान दिले आहे.

३३. धर्माचा जो दुसरा उद्देश भगवान बुद्ध आत्यंतिक महत्वाचा मानतो, तो म्हणजे एखादे तत्व उचित म्हणून

समजल्यावर, जरी कोणी साथी नसला तरी धैर्याने तत्वाच्या मार्गापासून विचलित न होणे.

३४. सल्लेखसुत्तामध्ये भगवान बुद्धाने या मुद्द्यावर भर दिला आहे.

३५. तेथे तो म्हणतो,

३६. "जरी दुसरे लोक हानिकारक वर्तन करीत असले तरी. मी काही हानिकारक कृत्य करणार नाही; अशा निश्चयाने तुम्ही आपले मन निर्मल बनविले पाहिजे.

३७. जरी दुसरे लोक हत्या करीत असले तरी तुम्ही हत्या करता कामा नये.

३८. जरी दुसरे लोक चोरी करीत असले तरी तुम्ही चोरी करता कामा नये.

३९. दुसर्या लोकांचे जीवन श्रेष्ठ नसले तरी तुमचे जीवन श्रेष्ठच असले पाहिजे.

४०. दुसरे लोक खोटे बोलत असले, निंदा करीत असले, जोरजोराने निषेध करित असले, बडबडत असले तरी तुम्ही तसे करता कामा नये.

४१. जरी दुसरे लोक लोभी असले तरी तुम्ही लोभी असता कामा नये.

४२. जरी दुसरे लोक द्वेष करीत असले तरी तुम्ही द्वेष करता कामा नये.

४३. जरी दुसरे लोक मिथ्या दृष्टीचे, मिथ्या संकल्पाचे, मिथ्या वाणीचे, मिथ्या क्रियेचे, मिथ्या समाधीचे असले तरी मी मात्र सम्यक् दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक् वाणी, सम्यक् कर्म, सम्यक् आजीविका, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृती आणि सम्यक् समाधी या अष्टांग मार्गापासून विचलित होणार नाही.

४४. जरी दुसरे सत्य आणि निर्वाण याबाबत चुकत असले तरी तुम्ही सत्य आणि निर्वाण यांच्या मार्गापासून विचलित होता कामा नये.

४५. जरी दुसरे लोक आळस आणि तंद्री यांच्या आधीन असले तरी तुम्ही मात्र या दोषांपासून विमुक्त असले पाहिजे.

४६. जरी दुसरे लोक गर्विष्ठ असले तरी तुम्ही मात्र विनम्र असले पाहिजे.

४७. जरी दुसरे लोक शंकाकुल असले तरी तुम्ही मात्र नि:शंक असले पाहिजे.

४८. जरी दुसरे लोक क्रोध, द्वेष, मत्सर, कृपणता, लोभ, ढोंग, कपट, निरबुद्धपणा, उद्धटपणा, आगाऊपणा, दुष्टसंगत, आळशीपणा, अश्रद्धा, निर्लज्जपणा, सत्-असत्विवेकाचा अभाव, अडाणीपणा, निष्क्रियता, गोंधळ, शहाणपणाचा अभाव इ. दोषांनीयुक्त असले तरी तुम्ही मात्र या दोषांच्या विरोधी असलेले गुण अंगी बाणविले पाहिजे.

४९. दुसरे लोक जरी लौकिक वस्तूंना चिकटून असले, त्यावरील आपली पकड सैल होऊ देत नसले तरी तुम्ही मात्र अशा वस्तूंना न चिकटता त्यागशील राहिले पाहिजे.

५०. मी असे म्हणतो की, चेतनाशक्ती विकसित झाल्याने वाणी आणि कर्मच काय तर समग्र विज्ञान ( जाणीव) सुद्धा प्रभावित होते. म्हणून हे चुंद, माणसाने करावयाचे संकल्प, मी जे वर तपशिलाने सांगितले आहेत, ते करावयास लावणार्या चेतनाशक्तीचा विकास केला पाहिजे."

५१. भगवान बुद्धाच्या मतानुसार धम्माचा उद्देश हा असा आहे.

## (ख) धर्म हा तेव्हाच सद्धम्म असतो जेव्हा तो सर्वांना ज्ञानाचा मार्ग मोकळा करतो.

## १. धम्माला सद्धम्माच रूप येण्यासाठी त्याने प्रजेला उत्तेजन दिले पाहिजे. जेव्हा धम्म विद्या सर्वांस मोकळी करतो तेव्हा तो सद्धम्म होय

१. ज्ञानार्जनाची मुभा सर्वांस मोकळी ठेवता येत नाही, असा ब्राम्हणी सिद्धान्त होता. या सिद्धान्तानुसार ती फक्त थोडक्याच लोकांना असली पाहिजे.

२. ब्राम्हण, क्षत्रिय आणि वैश्य या त्रैवर्णिकांनाच ब्राम्हणी सिद्धान्ताप्रमाणे ज्ञानार्जनाची अनुज्ञा होती; आणि त्या पैकीही ती फक्त या त्रैवर्णिकांतील पुरुषवर्गालाच होती.

३. स्त्रिया ह्या ब्राम्हण, क्षत्रिय अथवा वैश्य असोत, त्याप्रमाणेच शूद्र पुरुष असो अथवा स्त्री असो त्या सर्वांना ज्ञानार्जनाचाच काय पण साक्षरतेचाही अधिकार नव्हता.

४. ब्राम्हणांच्या ह्या भयंकर सिद्धान्ताविरुद्ध भगवान बुद्धाने बंड उभारले.

५. ज्ञानमार्ग, मग तो पुरुष असो अथवा स्त्री असो, तो सर्वांना मोकळा असला पाहिजे, असे भगवान बुद्ध शिकवीत असे.

६. पुष्कळ ब्राम्हणांनी त्याच्या मताल विरोध केला. लोहिच्च ब्राम्हणाबरोबर झालेला त्याचा वादविवाद त्याच्या या मतावर चांगलाच प्रकाश टाकतो.

७. एकदा कोसल जनपदासून आपल्या संघातील अनेक भिक्षुंसह परिभ्रमण करीत, असता तथागत शालवाटिका या नावाच्या शालवृक्ष रांगांनी परिवेष्टित अशा एका खेडेगावी आले.

८. या वेळी, शालवाटिकेत लोहिच्च नावाचा एक ब्राम्हण राहात असे. ही शालवाटिका चांगली गजबजलेली कुरणे, झाडी आणि धनधान्याने भरलेला प्रदेश होता. हा प्रदेश कोसलचा राजा प्रसेनजित याने त्या ब्राम्हणाला सर्वाधिकारासहित दान केलेला होता.

९. जर एखाद्या श्रमणाने किंवा ब्राम्हणाने ज्ञानार्जन केले तर त्याने ते ज्ञान स्त्री अथवा शूद्रांना देऊ नये जसे त्या लोहिच्च ब्राम्हणाचे मत होते.

१०. तथागत शालवाटिकेत राहात आहेत हे लोहिच्च ब्राम्हणाला कळले.

११. हे कळल्यावर लोहिच्चाने आपला न्हावी भेसिक यास सांगितले, “भेसिका, इकडे ये, ऐक. तो श्रमण गौतम जेथे उतरला आहे तेथे जा, आणि नाव सांगून त्याला विचार, तुझा आजार आता बरा आहे ना? तुझे प्रकृतिस्वास्थ्य ठीक आहे ना?” हे कुशल प्रश्न झाल्यावर त्याला सांग, “उद्या आपण आपल्या भिक्खूसंघासह लोहिच्च ब्राम्हणाकडे भोजनास यावे.”

१२. तो न्हावी म्हणाला, “ठीक आहे महाराज.”

१३. लोहिच्चाच्या आज्ञेप्रमाणे त्याने तथागताकडे जाऊन सांगितल्याप्रमाणे त्याला आमंत्रण दिले. तथागताने त्या विनंतीला मुक संमती दिली.

१४. दुसर्या दिवशी सकाळी वस्त्र परिधान करून व आपले भिक्षापात्र हाती घेऊन तथागत आपल्या

भिक्खूसंघासह शालवाटिकेकडे निघाले.

१५. भगवान बुद्धाला आणण्यासाठी लोहिच्चाने पाठविलेला दूत भगवान बुद्धाच्यामागे एक एक पाऊल टाकीत चालला होता. रसत्यात त्याने तथागताला लोहिच्चाचे ते दुष्ट मत म्हणजे श्रमण अथवा ब्राम्हणाने ज्ञान अथवा विद्या स्त्री आणि शूद्रांना शिकवू नये, हे सांगितले.

१६. तथागताने उत्तर दिले, "भेसिका, ठीक आहे, ठीक आहे."

१७. तथागत त्या लोहिच्च ब्राम्हणाच्या निवासस्थानी गेले आणि त्यांच्यासाठी जे स्थान करून ठेवलेले होते त्या ठिकाणी जाऊन बसले.

१८. त्या लोहिच्च ब्राम्हणाने बुद्ध संघप्रमुखाला आपल्या हाताने गोड, कठीण आणि मऊ प्रकारचे अन्न तो नको नको म्हणे पर्यंत वाढले.

१९. तथागताचे भोजन संपल्यानंतर त्यांनी आपले भिक्षापात्र आणि हात धुतले. नंतर लोहिच्चाने एक ठेंगणे आसन आणून तो तथागताच्या बाजूला त्या आसनावर बसला.

२०. लोहिच्च अशा रितीने बसल्यावर तथागताने विचारले, " लोक म्हणतात की, श्रमण अथवा ब्राम्हणाने ज्ञान अथवा विद्या, स्त्री अथवा शूद्रांना शिकवू नये असे तुझे मत आहे ही गोष्ट खरी आहे काय?"

२१. लोहिच्च म्हणाला, " होय, गौतमा माझे मत तसेच आहे."

२२. " लोहिच्च, तुला काय वाटते, तू शालवाटिकेत नांदत आहेस, नाही का?" " होय गौतमा, मी शालवाटिकेत नांदत आहे."

२३. " लोहिच्च, मग कल्पना कर, की जर कोणी असे बोलला, ' या शालवाटिकेत लोहिच्च ब्राम्हणाचे राज्य आहे. त्याला एकट्यालाच या शालवाटिकेचे उत्पन्न आणि त्यात उत्पन्न होणारा माल याचा उपभोग घेऊ द्या. दुसर्या कोणालाही काही देऊ नका. असे बोलणार्याला, तुझ्यावर अवलंबून असणार्यांना तो संकटात टाकणारा आहे असे तू मानशील की नाही?"

२४. ' अर्थात गौतमा! मी त्याला संकटनिर्माताच समजेन.'

२५. ' अशा संकटनिर्मात्याला तू त्यांचा हितकर्ता मानशील काय?'

२६. लोहिच्चाने उत्तर दिले, ' अर्थात नाही, गौतमा! मी त्याला त्यांचा हितकर्ता मानणार नाही.'

२७. ' अशा रीतीने त्यांच्या हिताची पर्वा न करणार्या माणसाचे अंतःकरण प्रेमभावयुक्त आहे की वैरभावयुक्त आहे असे तू म्हणशील?'

२८. ' गौतमा, मी ते वैरभावयुक्त आहे असे मानीन.'

२९. ' पण ज्यामुळे माणसांचे अंत:करण वैरभावयुक्त, होते तो सिद्धान्त तू चांगला का वाईट मानशील?'

३०. ' गोतमा, मी तो सिद्धान्त वाईट आहे असेच मानीन.'

३१. ' मग लोहिच्च! मला सांग, कोसलचा प्रसेनजित राजा काशी आणि कोसल प्रांताचा अधिपती नाही काय?'

३२. ' होय. गौतमा! तो कोसल आणि काशीचा अधिपती आहे.'

३३. ' मग लोहिच्च कल्पना कर! कोणी तरी असे बोलला की, कोसल चा प्रसेनजित राजा याच्या छत्राखाली काशी आणि कोसल प्रांत आहेत. त्याला एकटयालाच त्या काशी कोशलचे उत्पन्न आणि तेथे उत्पन्न होणारा माल यांचा उपभोग घेऊ द्या. दुसर्या कोणाला काही देऊ नका. तर असे बोलणार्या मनुष्याला तू आणि जे इतर

प्रसेनजिताचे आश्रित आहात, त्यांना संकटात टाकणारा मनुष्य म्हणून तू मानशील की नाही?
३४. ‘ होय. गौतमा! मी त्याला संकट-कर्ताच समजेन.’
३५. ‘ अशा संकटकर्त्या माणसाला तू हितकर्ता मानशील काय?’
३६. ‘ नाही गौतमा! तो त्यांचा हितकर्ता नव्हे.’
३७. ‘ आणि जर तो त्यांचा हितकर्ता नसेल तर त्याचे अंतःकरण लोकांसंबंधी प्रेमयुक्त आहे की वैरयुक्त आहे?’
३८. ‘ गौतमा, ते वैरयुक्त आहे.’
३९. ‘ ज्या सिद्धान्ताने माणसाचे अंतःकरण वैरयुक्त होते, तो सिद्धान्त तुझ्या मते वाईट की चांगला?’
४०. ‘ गौतमा! तो सिद्धान्त वाईट आहे.’
४१. “मग लोहिच्चा, तू हे मान्य करतोस की, जर तुला कोणी सांगू लागले की, तू शालवाटिकेचा स्वामी असल्यामुळे तिच्या उत्पन्नाचा आणि मालाचा तू एकट्यानेच उपभोग घ्यावा, दुसर्या कोणालाही त्यातील काही देऊ नये; त्याप्रमाणे कोणी असे बोलू लागला की, कोसलचा प्रसेनजित राजा काशी कोसलचा राजा असल्यामुळे त्याचे सर्व उत्पन्न त्याने एकट्यानेच भोगावे, दुसर्या कोणाला त्याने काही देऊ नये, तर तो तुजवर अवलंबून असणार्या लोकांना आणि त्याप्रमाणेच तुला आणि तुझ्यासारख्या राजाच्या आश्रितांना संकटात टाकणारा ठरेल. असे जे दुसर्यांना संकटात टाकतात त्यांच्या ठिकाणी प्रेमभावनेचा अभाव आणि वैरभावाचा प्रभाव दिसतो आणि अंतःकरणात वैरभावाचा प्रादुर्भाव करणारा सिद्धान्त हा गैर आहे.”
४२. “तद्वत् हे लोहिच्च, जो कोणी श्रमण अथवा ब्राम्हण विद्या आणि ज्ञान स्त्री-पुरुषांना देऊ नये असे म्हणतो, त्याचे ते मत, वैरभावावर आधारल्यामुळे तो संकट निर्माता ठरतो.”
४३. ‘ अशा प्रकारे जो कोणी स्त्री-शूद्रांना ज्ञान आणि विद्या देऊ नये असे म्हणतो तो दुसर्याच्या मार्गात अडचणी उभ्या करतो. तो त्यांचा हितचिंतक ठरत नाही. अशा प्रकारे जो मनुष्य दुसर्याचे हित चिंतीत नाही तो त्यांचा शत्रू ठरतो.’
४४. “ आणि जो सिद्धान्त एकाला दुसर्याचा शत्रू बनवितो तो सिद्धान्त गैर आहे.”

## २. धम्म जेव्हा केवळ विद्या पुरेशी नाही, कारण त्यामुळे पोकळ पांडित्य निर्माण होते, असे शिकवितो तेव्हा त्याला सद्धम्मरूप प्राप्त होते

१. एकदा भगवान बुद्ध कोसांबीच्या ‘सुस्वर’ विहारात राहात होता. तेथे जमलेल्या ज्या लोकांना तो उपदेश करीत होता, त्यांच्यामध्ये एक ब्रम्हचारी होता.
२. त्या ब्रम्हचार्याला अभिमान वाटत असे की, वेदज्ञानात आपण अद्वितीय आहोत. वादविवादात हरविणारा कोणी न आढळल्यामुळे, तो ज्या ज्या ठिकाणी जाई त्या त्या ठिकाणी हातात एक मशाल घेऊन मिरवीत असे.
३. एके दिवशी एका शहराच्या चौरसत्यावर त्याला एक मनुष्य भेटला. त्याने त्या ब्रम्हचार्याला त्याच्या त्या विक्षिप्त वर्तनाचे कारण विचारले. त्यावर तो ब्रम्हचारी म्हणाला,
४. ‘जग अंधकारमय व लोक भ्रांत आहेत. त्यामुळे जितका प्रकाश करता येईल तितका करण्यासाठी मी ही मशाल

बरोबर घेत असतो.'
५. त्याला (जमलेल्या लोकात ) पाहिल्यावर भगवान बुद्धाने हाक मारून विचारले, 'या मशालीने तू काय करीत आहेस ?'
६. त्या ब्रम्हचार्याने उत्तर दिले, 'लोक (सर्व ) अज्ञानाच्या अंधकारात चाचपडत असल्यामुळे, त्यांना मार्ग दाखविण्यासाठी मी ही मशाल धारण केली आहे.'
७. नंतर तथागताने त्याला परत विचारले, 'खरोखर तू इतका विद्वान आहेस? धर्मग्रंथांतील चार विद्या, म्हणजे शब्दविद्या, ज्योतिर्विद्या, राजविद्या आणि युद्धविद्या तू जाणतोस काय?'
८. या विद्यांशी आपण अपरिचित असल्याचे त्या ब्रम्हाचार्याला कबूल करावे लागले. त्याने ती मशाल फेकून दिली. भगवान बुद्धाने त्याला उद्देशून म्हटले,
९. 'मनुष्य कितीही विद्वान असला तरी, तो जर इतरांचा तिरस्कार करण्याइतका स्वतःला मोठा मानू लागला, तर तो हातात मेणबत्ती धरलेल्या आंधळ्या माणसासारखा आहे. स्वतः आंधळा आणि इतरांना तो काय प्रकाश दाखविणार?

## ३. धम्म जेव्हा प्रजेची आवश्यकता शिकवितो तेव्हा तो सद्धम्मरूप पावतो

१. ब्राम्हण, विद्या ही विद्या म्हणून महत्वाची मानीत. माणुस विद्वान असला आणि मग तो जरी सद्गुणी नसला तरी ते त्यास पूजार्ह मानीत.
२. ते म्हणत की, राजाला स्वदेशी पूज्य मानतात. परंतु विद्या ही सर्वत्र पूजनीय समजली जाते. त्यांना सुचवावयाचे असे की, विद्वान हा राजापेक्षा थोर आहे.
३. भगवान बुद्धाने विद्या आणि प्रज्ञा यांत भेद केला आहे. तो भेद म्हणजे ज्ञान आणि शहाणपणा यांच्यामधील भेद आहे.
४. असेही कोणी म्हणेल की, ब्राम्हणही प्रज्ञा आणि विद्या यांमध्ये भेद करीत आहे.
५. ते कदाचित खरेही असेल. परंतु भगवान बुद्धाची प्रज्ञा आणि ब्राम्हणाची प्रज्ञा यांत महदंतर आहे.
६. अंगुत्तर निकायातील एका प्रवचनात भगवान बुद्धाने हा भेद फार चांगल्या रीतीने स्पष्ट केला आहे.
७. एका प्रसंगी तथागत राजगृहाजवळच्या वेळूवनात रामाच्या कलन्दक निवासात उतरला होता.
८. त्या वेळी मगधाचा एक मोठा अमात्य वर्षकार ब्राम्हण तथागतांना भेटण्या साठी आला. आदराने तथागतांना अभिवादन केल्यावर तो त्यांच्या समीप बसला आणि म्हणाला,
९. 'श्रमण गौतमा, जेव्हा पुरुषांच्या अंगी चार गुण असतात तेव्हा त्याला मोठा शहाणा आणि थोर मानतात. हे चार गुण कोणते?'
१०. "पहिली गोष्ट म्हणजे तो विद्वान असला पाहिजे; म्हणजे कोणतेही वचन उच्चारताक्षणीच त्या वचनाचा तत्काळ अर्थ समजून त्याला तो सांगता आला पाहिजे. त्याशिवाय त्याची स्मरणशक्ती चांगली असली पाहिजे. पूर्वी घडलेल्या किंवा बोललेल्या गोष्टींचे स्मरण असले पाहिजे, आणि करता आले पाहिजे."
११. "गृहस्थी माणसाच्या सर्व कर्तव्यांत तो कुशल आणि तत्पर असला पाहिजे. कोणते करणे योग्य आणि कोणती

कारणे उचित, हे ठरविण्यात तो तरबेज असला पाहिजे.”

१२. “श्रमण गौतमा, माणसाच्या ठिकाणी हे गुण असले की आम्ही त्याला श्रेष्ठ पुरुष समजतो. जर हे गुण गौतमांना प्रशंसनीय वाटत असतील तर याच गुणांच्या आधारे त्यांनी माझी प्रशंसा करावी. उलटपक्षी त्यांच्या मते मी जर दोषास्पद असेन तर ह्याच गुणांच्या आधारे त्यांनी मला दोष द्यावा.”

१३. “ब्राम्हणा, या गुणांच्या आधारे मी तुझी स्तुतीही करू शकत नाही किंवा तुला दोषही देऊ शकत नाही.”

१४. ‘तू सांगितलेस त्यापेक्षा अगदी वेगळे असे चार गुण पुरुषाच्या अंगी असले तरच मी त्याला प्रज्ञावान मानतो. हे चार गुण म्हणजे, प्रथम असा गुणसंपन्न मनुष्य बहुजनहितरत आणि बहुजनसुखरत असला पाहिजे. स्वभावत: रम्य आणि स्वभावत:च लाभदायक आहे, अशा आर्य मार्गाचे, त्याने पुष्कळशा माणसांना अनुयायी बनविलेले असले पाहिजे.’

१५. ‘ज्या विचारांशी समरस होण्याचे तो ठरवितो त्या विचारांशी त्याला समरस होता आले पाहिजे; आणि ज्या विचारांना मनात स्थान द्यायचे नाही असे ठरवितो त्या विचारांपासून त्याला दूर राहता आले पाहिजे.’

१६. ‘जे संकल्प, तो मनात उत्पन्न व्हावे असे म्हणतो, ते त्याला मनात उत्पन्न करता आले पाहिजेत किंवा जे संकल्प मनातून काढण्याचे तो इच्छितो, ते मनात उत्पन्न होणार नाहीत अशी खबरदारी त्याला घेता आली पाहिजे म्हणजे विचाराबाबतीत तो स्वत:च्या मनाचा पूर्णाधिकारी असला पाहिजे.’

१७. ‘त्याप्रमाणेच लोकोत्तर विचाराशी निगडित अशी जी चार ध्याने-ज्यांत रममाण होणे ह्या जीवनातही सुखकर आहे, ती त्याला स्वेच्छेने, सहजपणे विनासायास साधता आली पाहिजेत.

१८. ‘तो जीवनाच्या संपूर्ण ज्ञानाने बंधनकारक अशा आसवांचा नाश करतो. अशा रीतीने चित्त विमुक्त करण्याचे ज्ञान प्राप्त करतो. प्रज्ञेमुळे लाभलेल्या ह्या विमुक्तीचा तो इहजन्मी उपभोग घेतो.’

१९. ‘म्हणून हे ब्राम्हणा, नाही. तू सांगितलेल्या गुणदोषांच्या आधारे मी तुझी स्तुती करू शकत नाही. अथवा तुला दोष देऊ शकत नाही; परंतु मी सांगितलेले चार गुण ज्याच्या ठिकाणी असतात त्याला मात्र मी प्रज्ञावान आणि थोर मनुष्य समजतो.’

२०. ‘श्रमण गौतमा, हे खरोखर आश्चर्य आहे. किती चांगल्या रीतीने तू हे सांगितले आहेस.’

२१. ‘मी स्वत: गौतमाच्या अंगी हे चार गुण आहेत असे मानतो. तो बहुजनाच्या हितासाठी आणि सुखासाठी झटत असतो. तो त्यांना स्वभावत: सुंदर आहे आणि हितकारक आहे हे दाखविणार्या आर्यमार्गात आणून सोडतो.’

२२. खरोखर, गौतम हा ज्या विचारावर आपले चित्त एकाग्र करावे असे ठरवितो त्यावर तो आपले चित्त एकाग्र करू शकतो. तो आपल्या विचारांचा स्वामी आहे.

२३. खरोखर, गौतम हा इच्छेनुसार चार ध्याने करू शकतो. खरोखर तो आसवनाशाने आपले अंत:करण विमुक्त करतो. ही विमुक्ती तो प्रज्ञेने साधतो, आणि त्या स्थितीत तो सदैव राहतो.

२४. या ठिकाणी भगवान बुद्धाची प्रज्ञा आणि ब्राम्हणाची प्रज्ञा यांमधील भेद अगदी स्पष्ट शब्दात केला आहे.

२५. या ठिकाणी भगवान बुद्ध प्रज्ञेला अधिक महत्वाची का मानतो हे त्याने स्पष्ट केले आहे.

## ( ग ) धम्माला सद्धम्मरूप प्राप्त व्हावयाला त्याने मैत्रीला उत्तेजन दिले पाहिजे.

## १. केवळ प्रजा ही पुरेशी नसून तिच्यासमवेत शीलही असले पाहिजे असे धम्म जेव्हा शिकवितो तेव्हाच तो सद्धम्मरूप पावतो

१. प्रज्ञा ही आवश्यक आहे; परंतु शील त्यापेक्षा अधिक आवश्यक आहे. शीलाशिवाय प्रज्ञा भयकारक आहे.
२. केवळ प्रज्ञा ही भयकारक आहे.
३. प्रज्ञा ही माणसाच्या हातातील तलवारीसारखी आहे.
४. शीलवान माणसाच्या हाती, दुसर्याला वाचविण्यासाठी तिचा उपयोग केला जाईल.
५. परंतु शीलरहित माणसाच्या हातून तिचा उपयोग हत्या करण्यासाठी होईल.
६. म्हणूनच प्रज्ञा ही शीलापेक्षा महत्वाची आहे.
७. प्रज्ञा हा विचारधम्म म्हणजे योग्य विचार करण्याची पद्धती. शील हा आचारधम्म म्हणजे योग्य वागण्याची पद्धती.
८. शीलाविषयी भगवान बुद्धाने पाच मूलतत्वे सांगितली आहेत.
९. पहिले जीवहत्येसंबंधी.
१०. दुसरे चोरीसबंधी.
११. तिसरे वैषयिक अनीतीसंबंधी.
१२. चौथे खोटे बोलण्यासंबंधी.
१३. आणि पाचवे मद्यपानासंबंधी.
१४. आणि ह्यांपैकी प्रत्येकासंबंधाने भगवान बुद्धाने असे सांगितले आहे की, हत्या करू नये, चोरी करू नये, खोटे बोलू नये, वैषयिक अनीती करू नये आणि मद्यपान करू नये.
१५. बुद्धाने प्रज्ञेपेक्षा शीलाला महत्व का दिले आहे याचे कारण स्पष्ट आहे.
१६. ज्ञानाचा उपयोग माणसाच्या शीलावर अवलंबून आहे. शीलाशिवाय ज्ञान मूल्यहीन आहे; असे तो एके ठिकाणी म्हणतो.
१७. दुसर्या ठिकाणी तो म्हणतो, 'शीलासमान या जगात दुसरे काही नाही.'
१८. शील हा प्रारंभ आणि शेवट आहे. सर्व कल्याणाचे ते उगमस्थान आहे. सर्व चांगल्या अवस्थांतील ती सर्वोत्तम अवस्था आहे, म्हणून आपले शील 'शुद्ध करा.'

## २. धम्म जेव्हा प्रज्ञा आणि शील ह्यांच्याशिवाय करुणेची आवश्यकता प्रतिपादतो तेव्हाच तो सद्धम्मरूप पावतो

१. बुद्ध धम्माचे अधिष्ठान काय? यासंबंधी काही अशी मतभिन्नता आहे.
२. प्रज्ञा हीच केवळ त्याच्या धम्माचे अधिष्ठान आहे की, करुणा हीच त्याच्या धम्माचे अधिष्ठान आहे?
३. या वादामुळे बुद्धानुयायांत दोन शाखा उत्पन्न झाल्या. एक शाखा म्हणते की प्रज्ञा हीच बुद्ध धम्माचे अधिष्ठान

आहे. दुसरी शाखा म्हणते की करुणा हीच बुद्ध धम्माचे अधिष्ठान आहे.

४. ह्या दोन्ही शाखा अद्यापिही एकमेकांपासून विभक्त झालेल्या आहेत.

५. भगवान बुद्धाच्या शब्दांची कसोटी ह्या दोन्हीही शाखांना लावली असता त्या दोन्हीही शाखा चुकीच्या वाटतात.

६. प्रज्ञा ही बुद्ध धम्माचा एक आधारस्तंभ आहे, याबद्दल मतभेद नाही.

७. वाद आहे तो हा की, करुणासुद्धा भगवान बुद्धाच्या धम्माची आधारस्तंभ आहे काय?

८. करुणा ही त्याच्या धम्माची आधारस्तंभ आहे हे संशयातीत आहे.

९. याचे समर्थन बुद्धवचनानेच करता येईल.

१०. पूर्वी गांधार नावाच्या देशात एका भयानक रोगाने पछाडलेला एक वृद्ध भिक्खु होता. तो ज्या ज्या ठिकाणी उठत अथवा बसत असे ती जागा मलिन होई.

११. तो गांधार देशातील एका विहारात राहात असे. कोणीही त्याच्याजवळ जात नसे किंवा प्याला संकटात सहाय्य करीत नसे.

१२. एकदा भगवान बुद्ध आपल्या अनुयायांसह तेथे गेला आणि आवश्यक पाने, भांडी, गरम पाणी घेऊन, तो म्हातारा भिक्खू जेथे पडलेला होता त्या ठिकाणी सर्व भिक्खुंसह येऊन पोहोचला.

१३. त्या जागेला एवढी दुर्गंधी येत होती की, त्या सर्व भिक्खुंना त्या माणसासंबंधी घृणा वाटू लागली. परंतु तथागताने शुक्रदेवाला गरम पाणी ओतायला सांगून आपल्या स्वतःच्या हाताने त्या भिक्खूचे शरीर धुण्यास आणि त्याच्या रोगावर उपचार करण्यास प्रारंभ केला.

१४. असे म्हणतात की, तेव्हा धरणीकंप झाला आणि ते स्थान एका दिव्य प्रकाशाने इतके भरून गेले की, राजा, त्याचे प्रधान, देव आणि नाग लोक तेथे सत्वर धावत आले आणि भगवान बुद्धाची पूजा करू लागले.

१५. तथागताला उद्देशून त्यांनी विचारले, “इतक्या थोर, उदात्त, महापुरुषाने असले घाणेरडे काम का करावे?” यावर भगवान बुद्धाने आपल्या कृतीचे असे स्पष्टीकरण केले.

१६. या जगात जे गरीब आहेत, असाहाय्य आणि अनाथ आहेत त्यांचा तथागत मित्र आहे. शारीरीक व्याधींनी पछाडलेले आहेत, मग ते श्रमण असोत अथवा इतर कोणीही असोत त्यांची सेवा करण्यासाठी, जे दरिद्री, अरक्षित आणि वृद्ध आहेत त्यांना सहाय्य करण्यासाठी आणि इतरांना आपल्यासारखेच करायला प्रेरणा देण्यासाठी तथागताचा जन्म आहे.

## ३. जेव्हा धम्म करुणेपेक्षाही मैत्रीचे महत्त्व अधिक प्रतिपादतो तेव्हा सद्धम्मरूप पावतो

१. भगवान बुद्ध केवळ करुणा शिकवून थांबला नाही.

२. करुणा म्हणजे प्राणिमात्रासंबंधी दया. भगवान बुद्धाने यापलीकडे जाऊन मैत्री शिकविली. मैत्री म्हणजे अखिल जीव-जाती संबंधी प्रेम.

३. केवळ करुणेपर्यंत जाऊन न थांबता, पूढे जाऊन अखिल जीव-जातीवर प्रेम केले पाहिजे अशी बुद्धाची शिकवण आहे.

४. श्रावस्ती येथे राहात असताना एका सूत्रात भगवान बुद्धाने हे चांगल्या प्रकारे स्पष्ट केले आहे.

५. मैत्रीसंबंधी बोलताना भगवान बुद्ध भिक्खूंना म्हणाला,

६. "समजा, मनुष्य एक विहीर खणतो आहे. भूमी त्यामुळे रागावते काय?"

७. "नाही भगवान, नाही!" ते भिक्खू उत्तरले.

८. "समजा, एक मनुष्य लाख आणि रंग घेऊन हवेत चित्रे रंगवू लागला. तो चित्र रंगवू शकेल असे तुम्हांला वाटते काय!"

९. "नाही भगवान!"

१०. "का नाही?" भिक्खु म्हणाले, "कारण हवेत असे काळे फलक नाहीत की, ज्यावर रंग भरता येईल."

११. "त्याप्रमाणेच तुमच्या मनातही काळे किल्मिष असता कामा नये. कारण किल्मिषे ही दुर्विचाराचीच प्रतिबिंबे असतात."

१२. "समजा, एखादा मनुष्य हातात पेटती मशाल घेऊन गंगेला आग लावण्यासाठी निघाला, तर त्याला आग लावता येईल काय?"

१३. "नाही. नाही भगवान."

१४. "का नाही?" "कारण गंगेच्या पाण्यात ज्वालाग्राहीपणा नाही."

१५. आपले प्रवचन संपवीत भगवंत म्हणाले, "ज्याप्रमाणे भूमीला इजा झाल्यासारखे वाटत नाही आणि ती रागावत नाही, ज्याप्रमाणे हवा आपल्यावर कसलीच प्रतिक्रिया होऊ देत नाही आणि ज्याप्रमाणे अग्नीने विचलित न होता गंगाजळ सारखे वाहात राहते, त्याप्रमाणे भिक्खुंनो, तुम्ही दुसर्याने केलेल्या अपमान आणि अन्याय सहन करून त्याच्याशी मैत्रीनेच वागत राहिले पाहिजे."

१६. भिक्खूंनो ! मैत्री ही सतत आणि अप्रतिहत वाहत राहिली पाहिजे. आपले मन पृथ्वीसारखे खंबीर, हवेसारखे विमल आणि गंगेसारखे गंभीर ठेवणे हे तुमचे पवित्र कर्तव्य आहे. असे जर तुम्ही कराल तर कितीही दु:सह गोष्ट घडली तरी तुम्ही सहसा विचलित होणार नाही. कारण जे कोणी उपद्रव देतात ते शेवटी दमून जातात.

१७. "तुमच्या मैत्रीचा परिसर विश्वासासारखा अमर्याद असावा, तुमचे विचार भव्य आणि अपार असावेत आणि त्यात द्वेषाचा लवलेश नसावा."

१८. "माझ्या धम्मानुसार केवळ करुणेने वागणे हे पुरेसे नाही; त्यात मैत्रीने वागणे आवश्यक आहे."

१९. या प्रवचनात भगवंतांनी भिक्खूंना एक कथा सांगितली ती संस्मरणीय आहे.

२०. पूर्वी एकदा श्रावस्ती नगरात विदेशिका नावाची एक कुलीन स्त्री राहात असे. ती सभ्यता, लीनता आणि सौम्यता या गुणांबद्दल प्रसिद्ध होती. तिची एक मोलकरीण होती. तिचे नाव काली. मोठी चलाख, सकाळी लवकर उठणारी आणि कामसू अशी मुलगी होती ती. कालीने स्वत:शी विचार केला, "माझ्या मालकिणीची ख्याती आहे की, तिला क्रोध असा येतच नाही; किंवा तो ती प्रकट करीत नाही, किंवा कदाचित मी आपले काम इतक्या चोखपणे बजावते म्हणून तिचा क्रोध अप्रकट राहात असावा. मी तिला कसोटी लावून पाहते."

२१. म्हणून ती दुसर्या दिवशी उशीरा उठली. तिच्या मालकिणीने तिला हाक मारून विचारले, ' तू इतक्या

उशीरा का उठलीस?' मोलकरीण म्हणाली, 'त्यात काय बाईसाहेब?' रागावून आणि चिडून ती मालकीण मनाशी म्हणाली, ' त्यात काही नाही काय? लबाड कुठली!'

२२. मोलकरणीने विचार केला, ' राग हा विकार तिच्या ठिकाणी आहे तर! ती दाखवीत नाही एवढेच! मी माझे काम चोख बजाविते म्हणून ती रागावत नसावी. आणखी मी तिची कसोटी घेईन! म्हणून ती दुसर्या दिवशी अधिक उशीरा उठली. मालकिणीने विचारले, 'काले, तू उशीरा का उठलीस!' मोलकरणीने उत्तर दिले, ' त्यात काय आहे?' आपला राग आणि चीड शब्दात व्यक्त करीत मालकीण म्हणाली, ' अस्सं ! त्यात काही नाही काय? लबाड कुठली!'

२३. 'अस्सं तर,' त्या मोलकरणीने विचार केला, ' राग हा विचार तिच्या ठिकाणी आहे; पण माझे काम नीट करते मी म्हणून ती तो दाखवित नाही. मी आणखी अधिक तिची कसोटी घेईन.' म्हणून ती दुसर्या दिवशी फारच उशीरा उठली. मालकिणीने तिला हाक मारून विचारले, 'इतक्या उशीरा का उठलीस?' मोलकरणीने उत्तर दिले, ' अं! त्यात काय आहे?'

२४. ' असं तर!' इतक्या उशीरा उठणे म्हणजे काहीच नाही काय? लबाड मुली! असे उदगार काढून मालकिणीने चिडून रागाने एक अडसर उचलला आणि रक्त येईल इतक्या जोराने तो तिच्या डोक्यात घातला.

२५. खोक पडून रक्तबंबाळ झालेले आपले डोके धरून कालीने आरोळ्या ठोकून सर्व शेजारी जागे केले आणि ओरडत सुटली, ' पाहा बाई माझी मालकीण! किती लीन आहे, सौम्य आहे माझी मालकीण! हे एवढे कशासाठी! तर तिची एकुलती एक मोलकरीण उशीरा उठली म्हणून! ती इतकी रागावली, चिडली होती की, हातात अडसर घेऊन माझ्यावर झेप घेऊन तिने माझे डोके फोडले!'

२६. याचा परिणाम असा झाला की, विदेशिका ही कोणी लीन आणि सौम्य स्त्री नसून ती अत्यंत चिडखोर स्वभावाची आहे अशी तिची खात्री झाली.

२७. याप्रमाणेच जोपर्यंत चीड आणण्याजोगे काही म्हटले नाही तोपर्यंतच, भिक्खू सौम्य, सभ्य आणि लीन असण्याचा संभव आहे. जेव्हा त्याला चीड येण्यासारखे शब्द बोलले जातात तेव्हाच त्याच्या ठिकाणी मैत्री म्हणजे बंधुभाव आहे की नाही याची खात्री पडते.

२८. ही गोष्ट सांगून भगवंतांनी म्हटले, 'केवळ वस्त्र आणि अन्न मिळविण्यासाठी भिक्खूने मैत्रीभाव व्यक्त केला तर त्याच्या ठिकाणी मैत्री-भावना आहे असे मी समजत नाही. ज्याची मैत्री-भावना ही धम्म सिद्धान्तातून उगम पावते, त्यालाच मी खरा भिक्खू समजतो.'

२९. 'पुण्यार्जनासाठी केलेली कृत्ये ही मैत्रीच्या एक षोडशांशाच्याही मोलाची नाहीत. मैत्री म्हणजे चित्ताची स्वतंत्रता. ती आपल्यामध्ये सर्व पुण्य कृत्यांना समाविष्ट करून घेते. ती चमकते, प्रकाशते, ती प्रज्वलित होते.'

३०. 'भिक्खुंनो! सर्व तार्यांचे तेज चंद्रप्रभेच्या एक षोडशांशही नसते. चंद्रप्रभा त्यांचे सर्व तेज आपणांत सामावून घेऊन स्वतः चमकते, प्रज्वलीत होते. त्याप्रमाणेच पुण्यार्जनासाठी केलेली कृत्ये मैत्रीच्या एक षोडशांशही मोलाची नाहीत. मैत्री म्हणजे अंतःकरणाची स्वतंत्रता; ती सर्व पुण्यकृत्यांना स्वत:मध्ये सामावून चमकते, प्रकाशते, प्रज्ज्वलीत होते.'

३१. 'त्याप्रमाणेच. भिक्खूंनो! जसा वर्षाऋतूअखेर सूर्य स्वच्छ, निरभ्र अशा आकाशात उगवून सारे किल्मिष नाहीसे करतो आणि स्वतः चमकतो, प्रकाशतो आणि प्रज्वलीत होतो, अगदी त्याप्रमाणेच पुण्यार्जनासाठी

योजलेली सर्व साधने ही मैत्रीच्या एक षोडशांश इतकीही मोलाची नाहीत. मैत्री म्हणजे अंत:करणाची स्वतंत्रता. ती सर्व पुण्यकृत्यांना आपल्यामध्ये सामावून घेऊन चमकते, प्रकाशते आणि प्रज्वलीत होते.'

## ( घ ) धम्माला सद्धम्मरूप येण्यासाठी त्याने सामाजिक भेदाने उत्पन्न झालेले निर्बंध नाहीसे केले पाहिजेत

## १. धम्मालाला सद्धम्मरूप प्राप्त व्हायला त्याने माणसामाणसांत भेद करणारे अडसर मोडून काढले पाहिजेत

१. आदर्श समाज कोणता? ब्राम्हणांच्या मते वेदामध्ये ध्येयरूप समाजाची व्याख्या आहे, आणि वेद हे स्वतः प्रमाण असल्यामुळे, वेदप्रणीत आदर्श समाज हाच एकमेव माणसाने मान्य करण्यासारखा आहे.

२. वेदप्रणीत आदर्श समाज म्हणजे चातुर्वर्ण्य.

३. वेदानुसार अशा समाजाने तीन अटी पाळल्या पाहिजेत.

४. पहिली अट म्हणजे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे त्या समाजात चार वर्ण असले पाहिजेत.

५. या वर्गांचे परस्परसंबंध क्रमिक विषमतेच्या तत्वावर आधारलेले असले पाहिजेत. दुसर्या शब्दात सांगावयाचे म्हणजे हे सर्व समान असता कामा नयेत. तर प्रतिष्ठा, अधिकार आणि विशेष हक्क यांच्या प्रमाणात ते एक दुसर्यावर अशा रीतीने आधारलेले असले पाहिजेत.

६. ब्राम्हण हे सर्वांच्या वरती. क्षत्रिय त्यांच्या खाली पण वैश्यांच्या वरती. वैश्य क्षत्रियांच्या खाली, परंतु शूद्राच्या वर आणि शूद्र हे सर्वांच्या खाली.

७. चातुर्वर्ण्याचा दुसरा विशेष म्हणजे प्रत्येक वर्गाने त्याला विहित असाच व्यवसाय केला पाहिजे. ब्राम्हणांचा व्यवसाय म्हणजे अध्ययन, अध्यापन आणि धार्मिक संस्कार करणे. क्षत्रियांचा शस्त्र धारण करणे आणि युद्ध करणे. वैश्यांचा व्यवसाय व्यापारधंदा, शूद्रांचा व्यवसाय वरील तीनही उच्च वर्णांची सेवा.

९. कुठल्याही एका वर्गाने आपल्या व्यवसायाचे उल्लंघन करून दुसर्याच्या व्यवसायावर आक्रमण करावयाचे नाही.

१०. ह्या आदर्श समाजाच्या सिद्धान्ताचा आग्रह धरून ब्राम्हणांनी तो लोकांना शिकवला.

१०. या सिद्धान्ताचा आत्मा विषमता आहे हे स्पष्टच आहे. ही सामाजिक विषमता ऐतिहासिक विकासामुळे आली नसून ती ब्राम्हणी धर्माचा शास्त्रसम्मत सिद्धांत आहे.

११. भगवान बुद्धाचा ह्या सिद्धान्ताला आमूलाग्र विरोध होता.

१२. तो जातिसंस्थेचा सर्वश्रेष्ठ विरोधक असून, समतेचा सर्वात पहिला आणि अत्यंत खंबीर असा समर्थक होता.

१३. जाती आणि विषमता यांच्याशी संलग्न असा एकही विचार नाही, की ज्याचे त्याने खंडन केलेले नाही.

१४. या मुद्यावर भगवान बुद्धाला ब्राम्हणांनी पुष्कळच आव्हान दिले. परंतु बुद्धाने त्या सर्वांना पूर्णपणे गप्प बसविले.

१५. अश्वलायन सूक्तांत एक कथा आली आहे. एकदा ब्राम्हणांनी आपल्यापैकी अश्वलायन नावाच्या पुरुषाला बुद्धाकडे जाऊन, त्याच्या जात आणि विषमता या मताविषयी वाद घालण्यास प्रवृत्त केले.

१६. अश्वलायन भगवान बुद्धाकडे गेला आणि त्याने ब्राम्हणाचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करणारा पक्ष मांडला.

१७. तो म्हणाला, ' हे गौतमा, ब्राह्मण असे मानतात की ते स्वत: सर्वश्रेष्ठ वर्ण असून इतर सर्व कृष्ण वर्णातील आहेत. पावित्र्य हे केवळ ब्राम्हणात वसत असते. अब्राम्हणांत ते वसत नाही. केवळ ब्राम्हणच ब्रम्हाचे औरसपुत्र आहेत. ते त्याच्या मुखातून जन्मास आले. तेच त्याच्यापासून उत्पन्न झालेले, त्याने पैदा केलेले आणि त्याचे वारस आहेत. यावर गौतमा, तुझे काय म्हणणे आ हे?'

१८. भगवान बुद्धाच्या उत्तराने अश्वलायन अगदी गारठूनच गेला.

१९. भगवान बुद्ध म्हणाले, 'अश्वलायना, ब्राम्हणांच्या ब्राम्हण्या ह्या ऋतुमती होत नाहीत काय? त्या गर्भधारणा करीत नाहीत काय? त्या बाळंत होऊनच मुलाला जन्म देतात ना? असे असूनसुद्धा, म्हणजे स्त्रीपासून जन्मास येऊनसुद्धा तू जे काही म्हणतोस ते सर्व ब्राम्हण खरे मानतात का?'

२०. अश्वलायन निरुत्तर झाला.

२१. भगवान बुद्धाने अश्वलायनाला पुढे दुसरा प्रश्न विचारला.

२२. 'अश्वलायना, समज, एखाद्या क्षत्रियाने ब्राम्हण स्त्रीशी संभोग केला तर काय जन्माला येईल? चतुष्पाद प्राणी येईल की, मनुष्य प्राणी?'

२३. अश्वलायनाने काहीच उत्तर दिले नाही.

२४. 'नैतिक विकासाच्या शक्यतेसंबंधी बोलायचे तर ह्या देशात केवळ ब्राम्हणाच्याच अंतःकरणात द्वेष आणि दुरिच्छा यांपासून दूर असलेली प्रेमभावना उत्पन्न होईल की इतर वर्णियांच्याही हृदयांत ती उत्पन्न होईल?'

२५. अश्वलायन म्हणाला, ' चारही वर्णांच्या अंतःकरणात प्रेमभावना उत्पन्न होऊ शकतात.'

२६. भगवान बुद्धाने विचारले, 'अश्वलायना, योन आणि कंबोज, आणि त्यांच्या सन्निध असलेल्या देशांत, स्वामी आणि दास हे दोनच वर्ण आहेत आणि तेथे स्वामीचा दास आणि दासाचा स्वामी असे स्थित्यंतर होऊ शकते, हे तू ऐकले आहेस काय?'

२७. अश्वलायनाने उत्तर दिले, 'होय, मी ऐकले आहे.'

२८. 'तुमचे चातुर्वर्ण्य ही आदर्श समाजरचना असेल, तर ती सर्व देशांत का आढळत नाही?'

२९. या कोणत्याही मुद्दयावर अश्वलायनाला जाती काणि विषमता यांविषयीच्या आपल्या सिद्धान्तांचे समर्थन करता येईना. तो पूर्णपणे निरुत्तर झाला आणि शेवटी त्याने भगवान बुद्धाचे अनुयायित्व पत्करले.

३०. वसिष्ठ नावाचा एका ब्राम्हणाने बुद्धधर्म स्वीकारलेला होता. ब्राम्हण त्याच्या या धर्मान्तराबद्दल त्याला शिवीगाळ करीत असत.

३१. एके दिवशी तो भगवान बुद्धाकडे गेला आणि ब्राम्हण त्याला काय म्हणत असतात हे त्याने बुद्धाकडे कथन केले.

३२. वसिष्ठ म्हणाला, 'भगवान, ब्राम्हण म्हणतात की, ब्राम्हण हाच समाजातील सर्वांत उच्च थरातील असून इतर सर्व वर्ण नीच थरातील आहेत. ब्राम्हण फक्त शुक्लवर्ण आहेत. इतरांचे वर्ण कृष्ण आहेत. फक्त ब्राम्हण हे शुद्ध वंशातील आहेत. अब्राम्हण शुद्ध वंशातील नाहीत. फक्त ब्राम्हणच ब्रम्ह्यचे खरेखुरे औरस पुत्र आहेत. ते त्याच्या

मुखातून जन्मले आहेत. तेच त्याच्यापासून उत्पन्न झालेले, त्याने पैदा केलेले त्याचे वारसपुत्र आहेत.'

३३. 'आणि तू तर आपला अभिजात वर्गाचा त्याग करून त्या नीच वर्गाच्या शिरमुंड्या भिक्खुंच्या, त्या असंस्कृत श्रीमंताच्या, त्या कृष्णवर्णाच्या, ब्रम्ह्यच्या पायापासून जन्मलेल्या लोकांच्या वंशजात सामील झाला आहेस, हे चांगले नाही. हे काही उचित नव्हे. आपला अभिजात वर्ग सोडून त्या नीच, शिरमुंड्या, कृष्णवर्णीय गावंढळ आणि आमच्या पूर्वजांच्या पायापासून निर्माण झालेल्या लोकांत सामील झाला आहेस!'

३४. ' भगवान, या शब्दांनी ते ब्राम्हण मला दोष देतात; शेलक्या, बेछूट शिव्या मला घालतात.'

३५. यावर बुद्ध म्हणाला, ' वसिष्ठा, खरोखर ब्राम्हण जेव्हा असे बोलतात तेव्हा ते आपली प्राचीन परंपरा विसरलेले दिसतात. इतर वर्गांतील स्त्रियांप्रमाणे ब्राम्हणीही गर्भार राहतात, प्रसवतात, आपत्या अर्भकांचे संगोपन करतात, तथापि हे गर्भजात ब्राम्हण मात्र आपण ब्रम्ह्यच्या मुखातून जन्माला आलेली खरी मुले, त्यांच्यापासून उत्पन्न झालेले, त्याने पैदा केलेले, त्याचे खरे वारसपुत्र म्हणून स्वत:ला म्हणवून घेतात. यामुळे ते ब्रम्ह्याची नालस्ती मात्र करतात.'

३६. एकदा येसुकारी हा ब्राम्हण भगवान बुद्धाजवळ तीन प्रश्नांवर वाद करण्यासाठी गेला.

३७. त्याने पहिला प्रश्न जो मांडला तो म्हणजे, कर्माची शाश्वत विभागणी. ह्या पद्धतीच्या समर्थनार्थ तो म्हणाला, ' मी तुला एक प्रश्न विचारण्यासाठी आलो आहे. ब्राम्हण म्हणतात, ते सर्वांहून श्रेष्ठ असल्यामुळे, ते कोणाचीच सेवा करणार नाहीत. इतर सर्व वर्ण सेवा करण्यासाठी जन्मास आले आहेत.'

३८. ' हे गौतमा, सेवा ही चार वर्णात विभागलेली आहे. ब्राम्हणांची सेवा, क्षत्रियांची सेवा, वैश्यांची सेवा आणि शूद्रांची सेवा. शूद्रांची सेवा दुसरा शूद्रच करणार, दुसरे कोण करणार?'

३९. भगवान बुद्धाने त्याच्या प्रश्नाला एक प्रश्न विचारून उत्तर दिले, 'ब्राम्हणांनी केलेली ही सेवेची चतुर्विध विभागणी सर्व जगात मान्य आहे का?

४०. माझ्यासंबंधी विचारशील तर मी सर्व सेवा ( धंदा ) करायची किंवा न करावयाची यांपैकी कशाचाच आग्रह धरीत नाही. सेवेचा परिणाम आपणाला वाईट बनविण्यात होत असेल आणि चांगले बनविण्यात होत नसेल तर ती सेवा करू नये. परंतु जर त्या सेवेने मनुष्य चांगला होत असेल, वाईट होत नसेल तर ती सेवा करावी.

४१. 'क्षत्रियाचे, ब्राम्हणाचे, वैश्याचे अथवा शुद्राचे वर्तन या मार्गदर्शक तत्वानुसार झाले पाहिजे. ज्या सेवेने व्यक्तीला वाईटपणा येतो, ती सेवा तिने नाकारली पाहिजे. जिच्या योगे ती व्यक्ती अधिक चांगली होते तेवढीच सेवा तिने केली पाहिजे.'

४२. येसुकारीने दुसरा प्रश्न विचारला, ' माणसाचा सामाजिक दर्जा ठरविताना त्याचा वंश आणि कूळ यावरून का ठरवू नये?'

४३. या प्रश्नाला भगवान बुद्धाने उत्तर दिले, 'वंशपरंपरेच्या अभिमानावरून माणुस ज्या घरात जन्माला येतो त्याचा नामनिर्देश केला जातो. ज्या पदार्थापासून अग्नी पेटवला जातो त्या पदार्थावरून तो ओंडक्याचा अग्नी आहे की, ढलप्याचा अग्नी आहे, काटयाकुटयाचा अग्नी आहे की, शेणीचा अग्नी आहे हे ठरविले जाते. त्या प्रमाणेच धम्माचा उदात्त सिद्धान्त हा प्रत्येक माणसाच्या खर्या संपदेचे उगमस्थान आहे. जन्मावरून माणूस कोणत्या वर्गात जन्मास आला याचा फक्त नामनिर्देश होतो.'

४४. ' कुळावरुन माणसाचा चांगुलपणा किंवा वाईटपणा ठरत नाही. तीच गोष्ट स्वरूप व संपत्तीची आहे. कारण

तुला असे आढळून येईल की, थोर कुळात जन्माला आलेला मनुष्य हाही कधी कधी खुनी, चोर, व्यभिचारी, खोटे बोलणारा, निंदक, शिवीगाळ करणारा, बडबड करणारा, लोभी, दीर्घद्वेषी, अथवा चुकीची मते असलेला आढळेल. म्हणून मी म्हणतो की, जन्म थोर कुळात झाला म्हणून मनुष्य सत्पुरुष होत नाही. त्याप्रमाणेच थोर कुळात जन्माला आलेला पुरुष ह्या दुर्गुणांपासून अलिप्त असलेलाही आढळेल. म्हणून मी म्हणतो, कुळामुळे मनुष्य वाईट होतो असेही नाही.'

४५. येसुकारीने जो तिसरा प्रश्न विचारला तो वर्णप्राप्त कर्मानुसार उपजीविकेचा.

४६. येसुकारी तथागतांना म्हणाला, 'ब्राम्हण उपजीविकेच्या साधनांचे चार प्रकार मानतात. दानापासून ब्राम्हणाची उपजीविका, क्षत्रियाची धनुष्यबाणापासून, कृषी आणि पशुपालनापासून वैश्याची, आणि खांद्यावर धान्याची कावड वाहून नेण्याने शूद्राची. जर या चारांपैकी कोणाही एकाने आपला व्यवसाय सोडून दुसर्याचा व्यवसाय स्वीकारला तर त्याने जे करू नये ते केल्यासारखे होते. असे करणे म्हणजे रक्षकाने परक्याच्या धनाचा अपहार करण्यासारखे आहे. यावर श्रमण गौतमाचे मत काय आहे?'

४७. ' ब्राम्हणांचे हे वर्गीकरण सर्व जगास मान्य आहे काय?' बुद्धाने विचारले

४८. येसुकारीने उत्तर दिले, ' नाही.'

४९. वसिष्ठाला भगवान बुद्धाने सांगितले, ' उच्च कुळात जन्म घेण्यापेक्षा जीवनात उच्च आदर्श असणे हे महत्वाचे आहे.'

५०. 'जाती, विषमता, उच्चता, कनिष्ठता हे भेदभाव असूच शकत नाहीत. सर्व सारखेच आहेत.' असा भगवान बुद्धाचा उपदेश होता.

५१. ' जसे दुसरे तसाच मी. जसे आम्ही तसेच दुसरे. या विचाराने दुसर्याशी समरस व्हा!' हा भगवान बुद्धाचा उपदेश होता.

## २. धम्माला सद्धम्मरूप यावयाला त्याने माणसाचे मोठेपण त्याच्या जन्मावरून नव्हे तर कार्यावरून ठरवावे; अशी शिकवण दिली पाहिजे

१. ब्राम्हणप्रणीत चातुर्वर्ण्याचा सिद्धान्त जन्मावर आधारलेला होता.

२. ब्राम्हण म्हणजे ब्राम्हण आईबापांच्या पोटी जन्माला येणारा मनुष्य. वैश्य म्हणजे वैश्य आईबापांच्या पोटी जन्माला येणारा मनुष्य, आणि शूद्र म्हणजे शूद्र आईबापांच्या पोटी जन्मास येणारा मनुष्य.

३. ब्राम्हणाच्या मते माणसाचे मोठेपण त्याच्या जन्मापेक्षा दुसर्या कशावरही अवलंबून नाही.

४. चातुर्वर्ण्याप्रमाणे हा सिद्धान्तही भगवान बुद्धाला घृणास्पद वाटत असे.

५. त्याचा सिद्धान्त ब्राम्हणी सिद्धान्ताच्या अगदी विरुद्ध होता. त्याच्या सिद्धान्ताप्रमाणे माणसाचे मोठेपण त्याच्या जन्मावर अवलंबून नसून त्याच्या अंगच्या योग्यतेवर अवलंबून आहे.

६. ज्या प्रसंगी भगवान बुद्धाने आपला हा सिद्धान्त मांडला तो प्रसंग विशेष महत्वाचा आहे.

७. एकदा भगवान अनाथ पिंडीकाच्या जेतवनारामांत राहात होते. एके दिवशी दुपारी येण्यापूर्वी हातात

भिंक्षापात्र घेऊन त्यांनी श्रावस्ती नगरात भिक्षेसाठी प्रवेश केला.

८. त्यावेळी होमाग्नी प्रज्वलित करून यज्ञाची तयारी चालली होती. भिक्षाटन करता करता भगवान अग्निक नावाच्या ब्राम्हणाच्या दारी आले. त्याच्या घरात होमाग्नी पेटला होता. आहुतीची तयारी चालू होती.

९. भगवंतांना आपल्या दाराशी येताना पाहून अग्निक रागाने म्हणाला, ‘ हे केशकुंचिता, थांब, तेथेच थांब. हे करंट्या भिक्खू, तेथेच थांब. हे दीनवृषला, बहिष्कृत माणसा, तेथेच थांब.’

१०. ब्राम्हणाचे हे शब्द ऐकून भगवान म्हणाले, ‘ हे ब्राम्हणा, वृषल ( बहिष्कृत ) कोणाला म्हणावयाचे? माणुस कोणत्या कारणांनी बहिष्कृत ठरतो हे तुला माहित आहे काय?’

११. ‘नाही गौतमा, कोणाला वृषल ( बहिष्कृत ) म्हणावे आणि कोणत्या कारणांनी मनुष्य वृषल ( बहिष्कृत ) ठरतो हे मला काही माहिती नाही.’

१२. भगवान त्याला म्हणाले, ‘वृषल ( बहिष्कृत ) कोणाला म्हणावयाचे याचे ज्ञान तुला झाल्यास काही वावगे होणार नाही.’ यावर अग्निक ब्राम्हण म्हणाला, ‘ त्याचे ज्ञान मला व्हावे याचा जर आग्रहच तू धरीत आहेस तर सांग तुला काय सांगायचे आहे ते.’

१३. ब्राम्हणाची संमती मिळताच भगवान म्हणाले,

१४. ‘ जो मनुष्य स्वभावाने रागीट, दीर्घद्वेषी, दुर्गुणी, निंदाप्रिय, मिथ्यादृष्टी आणि वंचक आहे त्याला वृषल ( बहिष्कृत ) समजावे.’

१५. ‘जो सजीव प्राण्यांना, पशुंना आणि पक्ष्यांना उपद्रव करतो, ज्याच्या ठिकाणी सजीव प्राण्यासबंधी अनुकंपा नाही तो वृषल ( बहिष्कृत ) समजावा.’

१६. ‘ जो खेड्यापाड्यांना वेढा घालून त्यांचा नाश करतो आणि जो अत्याचारी म्हणून प्रसिद्ध आहे तो वृषल ( बहिष्कृत ) समजावा.’

१७. ‘ जो गावात अथवा जंगलात परक्याचे धन चोरीने हिरावून नेतो तो वृषल ( बहिष्कृत ) समजावा.’

१८. ‘जो ऋण घेऊन पळून जातो किंवा फेडीची मागणी केली असता मी तुमचे काही लागत नाही, असे म्हणतो तो वृषल (बहिष्कृत ) समजावा.’

१९. ‘जो एखाद्या क्षुद्र वस्तुच्या वासनेने वाटसरूला लुबाडतो व प्रसंगी त्याची हत्याही करतो तो वृषल ( बहिष्कृत ) समजावा.’

२०. जो साक्षीच्या वेळी स्वत:साठी किंवा दुसर्यासाठी किंवा द्रव्यलाभाच्या आशेने खोटे बोलतो तो वृषल ( बहिष्कृत ) समजावा.’

२१. ‘जो संमतीने अथवा बलात्काराने आप्त अथवा मित्रांच्या स्त्रियांशी मर्यादाति क्रमण करतो, तो वृषल ( बहिष्कृत ) समजावा.’

२२. ‘जो संपन्न असूनही आपल्या गतयोवनात वृद्ध अशा मातापितरांचे पोषण करीत नाही, तो वृषल ( बहिष्कृत ) समजावा.’

२३. ‘जो चांगले कोणते म्हणून विचारले असता वाईटाचा सल्लामसलत देतो, आणि कपटीपणाने शिकवितो तो वृषल ( बहिकृत ) समजावा.’

२४. ‘ जन्माने कोणीच वृषल ( बहिष्कृत ) नसतो. त्याप्रमाणेच जन्माने कोणीही ब्राम्हण ठरत नाही.’
२५. भगवंताचे हे शब्द ऐकून त्यांना केलेल्या शिवीगाळीबद्दल त्या अग्निकाला आपली लाज वाटू लागली.

## ३. धम्माला सद्धम्मरूप यावयाला त्याने *(* धम्माने *)* माणसामाणसांमधील समतेच्या भावनेची अभिवृद्धी केली पाहिजे

१. जन्माने माणसे विषम असतात.
२. काही बलकट तर काही दुबळी असतात.
३. काहींना अधिक बुद्धी असते तर काहींना थोडी अथवा मुळीच नसते.
४. काहींच्या अंगी थोर कर्तृत्वशक्ती असते तर काहींच्या अंगी ती फारच थोड्या प्रमाणात असते.
५. काही सधन असतात तर काही दरिद्री असतात.
६. या सर्व प्रकारच्या माणसांना जीवनसंघर्षात प्रवेश करावयाचा असतो.
७. या जीवनसंघर्षात विषमता ही स्वाभाविक स्थिती आहे, असे मानले तर दुबळयांची स्थिती असाहाय्य होईल.
८. विषमता जीवनाचा नियम करून चालेल काय?
९. या नियमाचा परिणाम म्हणजे जीवन-संघर्षात जे योग्यतम ते टिकतील, असा असल्यामुळे काही लोक वरील प्रश्नाचे उत्तर होकारार्थी देतात.
१०. परंतु प्रश्न असा आहे की, संघर्षात जे योग्यतम ते समाजाच्या दृष्टीने श्रेष्ठतम ठरतात काय?
११. याला कोणीही होकारार्थी उत्तर देऊ शकणार नाही.
१२. याच कारणास्तव धर्म समता शिकवितो. जरी श्रेष्ठतम मनुष्य योग्यतम नसला तरी समाजात समतेस मान्यता दिल्यास तो जगू शकेल.
१३. समाजाला जर कोणाची गरज असेल तर ती श्रेष्ठतम पुरुषाची, योग्यतम पुरुषाची नव्हे.
१४. याच कारणास्तव मुख्यत: धर्म समतेच्या तत्वाचा पुरस्कार करतो.
१५. हा बुद्धाचा दृष्टिकोन आहे. यास्तव जो धर्म समता शिकवीत नाही तो स्वीकारणीय नाही असे त्याचे म्हणणे होते.
१६. स्वत:ला सुखी करण्यासाठी दुसर्याला दु:खी करा, अथवा दुसर्याला सुखी करण्यासाठी स्वत:ला दु:खी करा, अथवा स्वत:ला आणि दुसर्यालाही दु:खी करा,-अशा तर्हेच्या कर्माचा उपदेश करणार्या धर्मावर तुम्ही विश्वास ठेवाल काय? त्यावर श्रद्धा ठेवाल काय?
१७. जो धर्म आपल्या सुखाबरोबरच दुसर्याच्याही सुखाची वाढ करण्याची आणि कोणताही अत्याचार सहन न करण्याचा उपदेश करतो तो श्रेष्ठतम धर्म नव्हे काय?
१८. जे ब्राम्हण समतेच्या तत्वाला विरोध करीत, त्यांना हे आणि अशासारखे मोठे खोचक प्रश्न बुद्ध विचारीत असे.
१९. भगवान बुद्धाचा धम्म म्हणजे माणसाच्या सत्प्रवृत्तीतून उद्भवणारा अत्यंत न्यायप्रधान असा धर्म आहे.

# चतुर्थ खंड: धर्म ( Religion ) आणि धम्म

भाग पहिला -- धर्म *( Religion )* आणि धम्म

भाग दुसरा -- पारिभाषिक शब्द साम्यामुळे मौलिक भेद कसे अस्पष्ट राहतात?

भाग तिसरा -- बौद्ध जीवन मार्ग

भाग चवथा -- बुद्धाची प्रवचने

# भाग पहिला: धर्म ( RELIGION) आणि धम्म

## १. धर्म ( Religion) म्हणजे काय ?

१. धर्म ( Religion) हा एक अनिश्चित शब्द असून त्याचा एक ठराविक असा अर्थ नाही.

२. तो शब्द अनेक अर्थी आहे.

३. याचे कारण धर्म ( Religion) हा निरनिराळ्या अवस्थांतून गेलेला आहे. एका अवस्थेतील त्याचा अर्थ मागील किंवा पुढील अवस्थांतील अर्थाशी समान नाही. तरी त्या सर्व अवस्थांसंबंधी हा एकच शब्द वापरला जातो.

४. धर्माचा आशय कधीही निश्चित असा नव्हता.

५. तो वेळोवेळी बदलत गेला आहे.

६. वीज, पाऊस, पूर इत्यादी ज्या घटनांचे कार्यकारणभाव आदिमानवाला स्पष्ट करता येत नसत, तेव्हा त्यांच्या निग्रहाच्या नावाने तो जे काही चमत्कारिक प्रयोग करी त्यांना जादू म्हणत. प्रारंभी धर्म आणि जादू ही एकरूपच होती.

७. धर्माच्या विकासाच्या दुसर्या अवस्थेत धर्माने विश्वास, धार्मिक, कर्मकांड, विधी, प्रार्थना आणि यज्ञ असे स्वरूप धारण केले.

८. परंतु ह्या गोष्टी धर्माचा मूळ गाभा नसून, त्या धर्मापासून उद्भवलेल्या म्हणजे गौण आहेत.

९. धर्माच्या केंद्रबिंदूला ज्या विश्वासापासून प्रारंभ होतो तो विश्वास असा की, अशी एक शक्ती आहे की, जिच्यामुळेच सर्व चमत्कार घडून येतात, परंतु जी आदिमानवाच्या ज्ञानसामर्थ्याच्या पलीकडे आहे. ह्या अवस्थेत जादूची महती कमी झाली.

१०. प्रारंभी ती अज्ञात व अज्ञेय शक्ती सैतानी समजली जाई, परंतु पुढे असे वाटू लागले की ती कल्याणकारीही आहे.

११. ती कल्याणकारी शक्ती प्रसन्न करून घ्यावयाला आणि त्या सैतानी शक्तीला संतुष्ट करण्यासाठी विश्वास, कर्मकांड, विधी आणि यज्ञ यांची आवश्यकता भासली.

१२. यानंतर ह्या शक्तीला ईश्वर अथवा निर्माता अशी संज्ञा देण्यात आली.

१३. यानंतरच्या धर्माच्या तिसर्या अवस्थेत ' देवानेच हे सर्व जग आणि माणसे निर्माण केली' अशी समजूत रूढ झाली.

१४. या अवस्थेनंतर माणसाला आत्मा आहे, तो अमर आहे आणि माणसाच्या इहलोकीच्या कर्माबद्दल त्याला देवासमोर जाब द्यावा लागणार आहे अशी समजूत रूढ झाली.

१५. धर्म विचाराचा विकास थोडक्यात वरील प्रमाणे सांगता येईल.

१६. देवावर श्रद्धा, आत्म्याच्या अस्तित्वासंबंधी विश्वास, ईश्वरपूजा, चुकणार्या आत्म्याची सुधारणा, प्रार्थनाविधी व यज्ञ-याग इत्यादींनी देवाला प्रसन्न करणे म्हणजे धर्म आणि हे सर्व आशय धर्म या शब्दाने व्यक्त होतात.

## २. धम्म धर्मापासून (Religion) वेगळा कसा ?

१. भगवान बुद्ध ज्याला धम्म म्हणून संबोधितो तो धर्मापासून मूलत: भिन्न आहे.

२. भगवान बुद्ध ज्याला धम्म म्हणतो तो युरोपियन धर्मवेत्ते ज्याला Religion म्हणून संबोधितात त्याच्याशी काही अंशी समान आहे.

३. परंतु त्या दोहोमध्ये विशेष अशी समानता नाही. त्या दोहोंमधील भेदही थोर आहेत.

४. याच कारणास्तव युरोपियन धर्मवेत्ते बुद्धाच्या धर्माला Religion म्हणून मानायला तयार नाहीत.

५. यागोष्टीबद्दल विषाद वाटण्याचे कारण नाही. धम्माला Religion म्हणून मानण्यात तोटा त्यांचाच आहे. त्यामुळे त्यांच्या Religion मधील वैगुण्य स्पष्ट होते.

६. या वादात पडण्यापेक्षा धम्माची कल्पना देऊन तो Religion पासून वेगळा कसा आहे हे दाखविणे अधिक श्रेयस्कर ठरेल.

७. असे म्हणतात की, Religion हा वैयक्तिक असून ज्याने त्याने तो स्वत: पुरताच मर्यादित ठेवावा. सार्वजनिक जीवनात त्यास अवसर देऊ नये.

८. याच्या उलट धम्म हा सामाजिक आहे. मूलत: व तत्वत: तो सामाजिक आहे.

९. धम्म म्हणजे सदाचरण. म्हणजेच जीवनाच्या सर्व क्षेत्रांत माणसा-माणसातील व्यवहार उचित असणे.

१०. यावरून स्पष्ट होते की, मनुष्य एकटाच असला तर त्याला धम्माची आवश्यकता नाही.

११. परंतु ज्या वेळी दोन माणसे कोणत्याही संबंधाने एकत्र येतात, तेव्हा त्यांना आवडो अगर न आवडो धम्म हा पाहिजेच. त्यापासून सुटका व्हावयाची नाही.

१२. दुसर्या शब्दात सांगायचे म्हणजे समाज धम्माशिवाय असूच शकत नाही.

१३. समाजाला खालीलपैकी कोणता तरी एक पर्याय पसंत करावा लागतोच.

१४. समाज वाटेल तर शासनाचे साधन म्हणून धम्माची निवड करणार नाही. कारण धम्म हे तर शासनाच्या साधनाहून वेगळे नाही.

१५. असा समाज (जो धम्माचा शासनासाठी स्वीकार करणार नाही तो ) अराजकाचा मार्ग स्वीकारील.

१६. दुसरा पर्याय म्हणजे समाज पोलिस, म्हणजेच हुकूमशाही, याचीच शासनासाठी निवड करू शकेल.

१७. तिसरा पर्याय म्हणजे समाज धम्माबरोबरच धम्माचे उल्लंघन करणार्या लोकांना शासन करणारा मेजिस्ट्रेट याचा स्वीकार करू शकेल.

१८. अराजक आणि हुकूमशाही या दोन पर्यायांत स्वातंत्र्याचा नाश होतो.

१९. फक्त तिसर्या पर्यायात स्वातंत्र्य टिकू शकते.

२०. ज्यांना स्वातंत्र्य पाहिजे त्यांनी धम्माचा स्वीकार केला पाहिजे.

२१. धम्म म्हणजे काय आणि धम्माची आवश्यकता काय?

२२. प्रज्ञा म्हणजे काय आणि तिची आवश्यकता का असावी ? प्रज्ञा म्हणजे निर्मळ बुद्धी. खुळ्या समजुतीला जागा राहू नये म्हणून भगवान बुद्धाने प्रज्ञेला आपल्या धम्माच्या दोन कोनशिलांपैकी एका कोनशिलेइतके महत्व दिले.

२३. करुणा म्हणजे काय? आणि करुणेची आवश्यकता काय ? करुणा म्हणजे प्रेम. करुणेशिवाय समाज जगू शकत

नाही किंवा त्याची उन्नती होऊ शकत नाही. म्हणूनच बुद्धाने करुणेला आपल्या धम्मात दुसर्या कोनशिलेइतके महत्व दिले आहे.
२४. ही झाली बुद्धाच्या धम्माची व्याख्या.
२५. ( Religion ) च्या व्याख्येपेक्षा धम्माची व्याख्या किती वेगली आहे.
२६. बुद्धाची धम्माची व्याख्या अगदी प्राचीन असली तरी ती आधुनिक युगाला जुळणारी वाटावी अशी आहे.
२७. ती जितकी पुरातन तितकीच अभिनव आहे.
२८. ती कोणापासून उसनी घेतलेली नाही, आणि ती किती सत्य आहे.
२९. प्रज्ञा आणि करुणेचे अपूर्व मिश्रण म्हणजेच भगवान बुद्धाचा धम्म.
३०. ( Religion ) आणि धम्म यांमध्ये महदंतर आहे.

## ३. धर्माचे प्रयोजन आणि धम्माचे प्रयोजन

१. धर्माचे प्रयोजन काय? धम्माचे प्रयोजन काय? ती प्रयोजने एकच आहेत का भिन्न आहेत?
२. या दोन प्रश्नांची उत्तरे बुद्धाच्या सुनक्खत आणि पोट्ठपाद या ब्राम्हणांबरोबर झालेल्या संवादात आढळतात.
३. एकदा भगवान मल्लांच्या अनुपिय ह्या नगरात राहात होते.
४. त्या प्रसंगी एके दिवशी अगदी सकाळी चीवरे धारण करून, हातात भिक्षापात्र व दुसरे चीवर घेऊन त्यांनी भिक्षाटनासाठी नगरात प्रवेश केला.
५. रस्त्यात त्यांना असे वाटले की, भिक्षेसाठी इतक्या सकाळी जाणे योग्य नव्हे, म्हणून ते परिव्राजक भग्गवा याच्या आश्रमात त्याला भेटण्यास गेले.
६. भगवानांना पाहुन भग्गवा उठला आणि अभिवादन करून म्हणाला, ‘भगवान, या आसनावर बसावे.’
७. भगवान बसल्यावर भग्गवा एका लहान आसनावर बसला आणि भगवंतांना म्हणाला.
८. “काही दिवसांपूर्वी सुनक्खत्त लिच्छवी मजकडे येऊन म्हणाला, ‘मी अलीकडे तथागतांचे शिष्यत्व सोडले असून त्यांचा शिष्य म्हणून त्यांजकडे राहात नाही.’ सुनक्खत्ताचे म्हणणे खरे आहे काय?”
९. भगवतांनी उत्तर दिले, “होय. सुनक्खत्त लिच्छवी जे म्हणतो ते खरे आहे.”
१०. “सुनक्खत्त मला ते म्हणाला. त्यानंतर मी त्याला विचारले, सुनक्खत्त, तू माझ्याबरोबर राहा आणि माझा शिष्य हो, असे मी कधी तरी तुला म्हणालो होतो काय?”
११. सुनक्खत्ताने मला उत्तर दिले, “नाही, तुम्ही कधीच तसे मला सांगितले नाही.”
१२. “मी त्याला विचारले, आणि तू तरी असे कधी म्हणाला होतास काय की, शिष्य म्हणून मी भगवंताच्या छत्राखाली राहीन.”
१३. “नाही, भगवान नाही.”
१४. “नंतर मी त्याला विचारले, ‘जर मी तुला सांगितले नव्हते आणि तूही विचारले नव्हतेस तर मग सोडून जाण्याची भाषा तू करतोस याचा अर्थ काय? वेड्या, यात दोष तुझा की माझा?”
१५. “पण भगवान, आपण सामान्य माणसाच्या शक्तीबाहेरील असे चमत्कार मला करून दाखवीत नाही.”

सुनक्खत्त बोलला.

१६. “अरे सुनक्खत्ता, मी तुला असे कधी तरी म्हटले होते काय की, तू मला गुरु म्हणून स्वीकार कर आणि मी तुझ्यासाठी असामान्य चमत्कार करून दाखवीन.”

१७. “नाही, भगवान, तुम्ही असे कधीच आश्वासन दिले नव्हते.”

१८. “तू कधी तरी आपला असा विचार मजपाशी व्यक्त केला होतास काय? की, मी भगवंताचे शिष्यत्व स्वीकारीन. कारण तसे केल्यास ते माझ्यासाठी असामान्य चमत्कार करून दाखवितील?”

१९. “नाही, भगवान, नाही.”

२०. “जर मी तसे बोललो नसेन आणि तूही तसा बोलला नसशील, तर वेड्या माणसा, मला सोडून जाण्याच्या तुझ्या भाषेचा अर्थ काय? तुला असे वाटते काय की, माझ्या धम्माचे प्रयोजन असामान्य चमत्कार करून दाखविणे अथवा न दाखविणे हा आहे? माझ्या धम्माचा उद्देश जो त्या धम्मानुसार आचरण करतो तो आपल्या दुःखाचा नाश करू शकतो हा नाही काय?”

२१. “भगवान, असामान्य चमत्कार करून दाखवा अथवा दाखवू नका. तथागताच्या धम्माचे उद्देश धम्मानुसार जो आचरण करतो त्याच्या दुःखाचा परिहार होऊ शकतो हा आहे.”

२२. “सुनक्खत्त, जर धम्माच्या उद्देश्याच्या दृष्टीने पाहता असामान्य चमत्कार केले न केले तरी त्याचे महत्व नाही, तर मग तुला चमत्काराच्या प्रदर्शनाचे एवढे महत्व का वाटते? पाहा मूर्खा, ह्या सर्व प्रकारात दोष तुझ्याकडेच येतो.”

२३. “भगवान, परंतु आपण मला वस्तुजातीचा आरंभ कसा झाला याचा साक्षात्कार घडवीत नाही.”

२४. “सुनक्खत्ता, मी तुला कधी तरी असे म्हटले होते काय, की तू माझा शिष्य हो आणि तुला मी वस्तुजातीच्या आरंभाचा साक्षात्कार घडवीन?”

२५. “नाही, भगवान नाही.”

२६. “किंवा तू तरी मला असे कधी म्हणाला होतास काय, की तुम्ही मला वस्तुजातीच्या आरंभाचा साक्षात्कार घडवा. म्हणजे मी तुमचा शिष्य बनेन.”

२७. “नाही, भगवान, नाही.”

२८. “जर मीही तुला तसे आश्वासन दिले नव्हते आणि तूही तशी मागणी केली नव्हतीस, मग हे वेड्या माणसा, मला सोडून जाण्याची भाषा करतोस याचा अर्थ काय? माणसाचे पाप नाहीसे करण्यासाठी वस्तुजाताच्या आरंभाचा साक्षात्कार घडविणे अथवा न घडविणे हे माझ्या धम्माचे प्रयोजन आहे, असे तुला वाटते काय? माझ्या धम्माचे उद्देश जो त्या धम्मानुसार आचरण करतो तो आपल्या दुःखाचा परिहार करू शकतो हे नव्हे काय?”

२९. “भगवान, वस्तुजाताच्या आरंभाचा साक्षात्कार घडविला अथवा न घडविला तरी तो तथागतांच्या धम्माचा उद्देश नाही. तथागतांच्या धम्माचे उद्देश जो त्या धम्मानुसार आचरण करील तो आपल्या दुःखाचा परिहार करू शकतो हे आहे.”

३०. “सुनक्खत्त, जर धर्माच्या उद्देशाच्या दृष्टीने वस्तुजाताच्या आरंभाचा साक्षात्कार घडविला वा न घडविला हे जर महत्वाचे नाही तर मग तुला तरी त्या साक्षात्काराची आवश्यकता काय आहे?”

३१. ह्या संवादावरून स्पष्ट होते की, धर्म ( Religion ) ह्या कल्पनेत वस्तुजाताच्या आरंभाचा साक्षात्कार ह्याला महत्व आहे. धम्माच्या कल्पनेत ते नाही.

## ४. धर्म आणि धम्म यांमधील इतर भेद भगवान आणि पोट्ठपद यांच्यामधील संवादांत व्यक्त झाले आहेत

१. एकदा भगवान श्रावस्ती येथे अनाथ पिंडकाच्या जेतवनातील आरामात होते. त्या समयी पोट्ठपद नावाचा परिव्राजक, राणी मल्लिकेने तत्वदर्शनावरील वादविवादासाठी जो एक प्रासाद तयार केला होता तेथे राहात होता.

२. त्याच्याबरोबर त्याच्या तीनशे अनुयायांचा जथा होता. भगवान आणि पोट्ठपद या दोघांमध्ये एक प्रसंगी खालील संवाद घडून आला.

३. पोट्ठपद म्हणाला, “जग शाश्वत आहे काय? आणि ते शाश्वत आहे आणि इतर सर्व तत्संबंधी मते चुकीची आहेत असे आपले म्हणणे आहे काय?”

४. “पोट्ठपद, ह्या विषयावर मी काहीच मत व्यक्त केलेले नाही.”

५. यानंतर पोट्ठपदाने भगवंताला खालील प्रश्न विचारले : ( अ ) जग शाश्वत नाही काय? ( आ ) जग सान्त आहे काय? ( इ ) जग अनंत आहे काय? ( ई ) आत्मा आणि शरीर ह्या दोन भिन्न वस्तू आहेत काय? ( उ ) ज्याला सत्य सापडले आहे त्याला मरणोत्तर अस्तित्व आहे काय? ( ऊ ) त्याला मरणोत्तर अस्तित्व नाही काय? ( ए ) त्याला मरणोत्तर अस्तित्व आहे आणि नाही असे आहे काय? ( ऐ ) त्याला मरणोत्तर परत अस्तित्व नाही अथवा त्याला मरणोत्तर अस्तित्व नाही असे नाही?

६. या प्रत्येक प्रश्नाला भगवंतांनी एकच प्रकारचे उत्तर दिले.

७. “पोट्ठपद, या विषयावर मी आपले मत व्यक्त केलेले नाही.”

८. “या विषयावर भगवंतांनी का मत व्यक्त केलेले नाही?”

९. “कारण या प्रश्नाच्या उत्तरापासून काहीच लाभ नाही. त्याचा धम्माशी संबंध नाही. ते सदाचरणाच्या कोणत्याही घटकाला उपकारक नाही. त्यापासून अनासक्ती रागद्वेषापासून मुक्ती, शांती, शमन, सत्यज्ञान, अष्टांग मार्गाच्या उच्चतर अवस्थांचे ज्ञान किंवा निर्वाण साधत नाही म्हणूनच मी यावर आपले मत व्यक्त केलेले नाही.”

१०. “मग भगवंतांनी निश्चित असे काय केले आहे?”

११. “पोट्ठपदा, मी दुःख म्हणजे काय? दुःखाचे कारण काय? दुःखाचा निरोध म्हणजे काय? आणि दुःखाचा निरोध कसा साधता येईल हे स्पष्ट केलेले आहे.”

१२. “भगवंतांनी हे तरी का स्पष्ट केले?”

१३. “पोट्ठपद, कारण त्यापासून लाभ आहे. तो धम्माचा विषय आहे. सदाचरण, अनासक्ती, रागद्वेषापासून मुक्ती, शांती, शमन, सत्यज्ञान, अष्टांगमार्गातील उच्चतर अवस्थांसंबंधी दृष्टी आणि निर्वाण साधता येते, म्हणूनच

तर मी दुःख, दुःखकारण आणि दुःख निरोधाचे साधन यासंबंधी विधान केले आहे.”

१४. या संवादात धर्माचा विषय आणि धम्माचा विषय या दोहोंचे स्वरुप स्पष्ट झाले आहे. ते दोन विषय एकमेकांपासून अगदी भिन्न आहेत.

१५. धर्माचे प्रयोजन जगत्प्रारंभाचे स्पष्टीकरण आणि धम्माचे प्रयोजन जगाची पुनर्रचना ही आहेत.

## ५. नीति आणि धर्म ( Religion )

१. नीतीचे धर्मात स्थान कोणते?

२. वस्तुत: धर्मात नीतीला स्थान नाही.

३. धर्माचे विषय म्हणजे देव, आत्मा, प्रार्थना, पूजाकर्मकांड, विधी, समारंभ आणि यज्ञ हे होत.

४. एका माणसाचा दुसर्या माणसाशी संबंध येतो तेव्हा नीतीला प्रारंभ होतो.

५. शान्ति आणि सुव्यवस्था राखण्यासाठीच धर्मात नीतीचा समावेश होतो.

६. धर्म हा एक त्रिकोण आहे.

७. आपल्या शेजार्याशी चांगुलपणे वागा; कारण तुम्ही दोघेही परमेश्वराची लेकरे आहात.

८. ही धर्माची विचारसरणी आहे.

९. प्रत्येक धर्म नीति शिकवितो. परंतु नीति ही काही प्रत्येक धर्माचे मूळ नव्हे.

१०. ती त्याला जोडलेला एक डबा आहे. वेळ पडेल त्याप्रमाणेच तो त्याला जोडता किंवा त्यापासून सोडविता येतो.

११. धर्माच्या व व्यवहारात नीतीचे कार्य हे आकस्मिक किंवा प्रासंगिक आहे.

१२. म्हणून नीति ही धर्मात प्रभावशाली ठरत नाही.

## ६. धम्म आणि नीति

१. धम्मात नीतीचे स्थान कोणते?

२. याचे साधे उत्तर म्हणजे नीति म्हणजे धम्म आणि धम्म म्हणजे नीति.

३. दुसर्या शब्दात बोलायचे म्हणजे, धम्मात जरी देवाला स्थान नाही तरी त्याचे स्थान नीतीने पटकावले आहे.

४. धम्मात प्रार्थना, तीर्थयात्रा, कर्मकांड, विधी अथवा यज्ञ यांना स्थान नाही.

५. नीति हे धम्माचे सार आहे. त्याशिवाय धम्म नाही.

६. धम्मात माणसाने माणसावर प्रेम केलेच पाहिजे; यातूनच नीतीचा उगम होतो.

७. त्यासाठी देवाच्या आज्ञांची आवश्यकता नाही. देवाला संतुष्ट करण्यासाठी काही माणसाने नीतीमान व्हायचे नाही तर स्वहितासाठीच माणसाने माणसावर प्रेम कले पाहिजे.

## ७. केवल नीति पुरेशी नाही. ती पवित्र आणि सर्वव्यापक असली पाहिजे

१. वस्तु पवित्र केव्हा ठरते? ती का पवित्र ठरते?

२. प्रत्येक प्राथमिक अथवा प्रगल्भ समाजात काही वस्तू अथवा समजुती पवित्र मानल्या जातात व काही अपवित्र मानल्या जातात.

३. जेव्हा वस्तू अथवा समजूत पवित्रतेच्या अवस्थेला पोहोचते तेव्हा तिचे उल्लंघन करता येत नाही. किंबहुना तिला स्पर्शही करता येत नाही. असे करणे निषिद्ध समजले जाते.

४. याच्या उलट जी वस्तु अथवा समजूत अपवित्र म्हणजे पावित्र्याच्या क्षेत्राबाहेरची असते, तिचे उल्लंघन केले तरी चालते. म्हणजे अशा अपवित्र वस्तू अथवा समजुती यांच्याविरुद्ध वागताना मनात भय अथवा विवेकबुद्धीची टोचणी उद्भवत नाही.

५. जे पवित्र ते मंगल होय. त्याचे उल्लंघन केले म्हणजे धर्मबाह्य वर्तन ठरते.

६. एखाद्या वस्तुला पावित्र्य का दिले जाते? प्रस्तुत विषयाच्या अनुरोधाने प्रश्नाचे क्षेत्र मर्यादित करण्यासाठी असा प्रश्न विचारता येईल की, नीतीला पावित्र्य का दिले गेले?

७. नीतीला पावित्र्य देण्यात तीन घटक कारणीभूत झाले असावेत.

८. पहिला घटक म्हणजे, श्रेष्ठांचे संरक्षण करण्याची सामाजिक हिताच्या दृष्टीने आवश्यकता.

९. ह्या प्रश्नांची पार्श्वभूमी 'जीवनकलह' आणि जीवनसंघर्षात योग्यतम माणसे टिकून राहिली पाहिजेत, या सिद्धान्तात आहे.

१०. ह्या प्रश्नाचा विकासवादाशी संबंध आहे. हे सर्वश्रुतच आहे की, मानवसमाजाचा विकास जीवनसंघर्षामुळे घडला; कारण प्रारंभिक युगात अन्नसामुग्री अति मर्यादित होती.

११. हा संघर्ष अत्यंत भयानक स्वरूपाचा होता. निसर्गाचे दांत आणि नखे रक्तलांछित आहेत असे म्हणतात.

१२. या भयानक रक्तरंजित संघर्षात योग्यतम तेच टिकाव धरू शकतात.

१३. ही समाजाची अगदी प्रारंभीची स्थिती झाली.

१४. प्राचीन काळी केव्हा तरी आणि कोणी तरी असा प्रश्न उपस्थित केला असेल की, जो सर्वांत अधिक शक्तिमान तोच योग्यतम आहे काय? की जो अत्यंत दुर्बल आहे त्याला संरक्षण दिले तर परिणामी समाजाचे हेतू आणि साध्य साधावयाला तोच अधिक योग्य ठरणार नाही काय?

१५. तत्कालीन सामाजिक स्थितीने त्याचे उत्तर होकारार्थी दिलेले दिसते.

१६. नंतर असा प्रश्न उद्भवतो की, कमजोर ( दुर्बल ) माणसाचे संरक्षण करण्याचा मार्ग कोणता?

१७. जे योग्यतम म्हणजे सर्वांत अधिक शक्तिमान आहेत त्यांच्यावर काही निर्बंध घातल्याने ते शक्य होणार आहे.

१८. याच उत्तरात नीतीचा उगम आणि आवश्यकता सामावलेली आहे.

१९. प्रारंभी हे निर्बंध योग्यतम ( सर्वांत अधिक शक्तिमान ) माणसांना लागू केल्यामुळे ते पवित्र मानण्याची आवश्यकता होती.

२०. यापासून होणारे परिणाम फार गंभीर स्वरुपाचे आहेत.

२१. पहिला प्रश्न असा निर्माण होतो की सामाजिक स्वरू:प धारण केल्याने नीति असामाजिक ( समाजहित विरोधिनी ) तर होत नाही ना?

२२. चोरांमध्ये आपापसात नीति नसते असे नाही. व्यापार्यांतही आपापसात नीति असते. एकाच जातीच्या माणसात आपापसांत नीति असते. दरोडेखोरांच्या टोळीतही आपापसांत नीति असते.

२३. परंतु या नीतीचे स्वरूप, वेगळेपणाची जाणीव आणि आपल्यापुरतीच क्रियाशीलता निर्माण करणारे असते. ही नीति म्हणजे एका विशिष्ट समूहाच्या हिताचे संरक्षण करण्यापूरतीच मर्यादित, म्हणजेच समाजहित-विरोधक असते.

२४. या प्रकारच्या नीतीतील वेगळेपणाची जाणीव आणि आपल्यापुरतीच क्रियाशीलता ही तिचे समाजविरोधकरूप अगदी उघडे करतात.

२५. जेव्हा जेव्हा एखादा विशिष्ट समूह आपलाच स्वार्थ राखण्यासाठी नीति पाळतो, तेव्हा तेव्हा त्या नीतीचे समाजविरोधक रूप स्पष्ट होते.

२६. अशा प्रकारे होणार्या समाजातील समूह संघटनांचे परिणाम दूरगामी असतात.

२७. जर समाज असा परस्पर विरोधक समूहाचा बनला तर तो समाज असंघटित व शकलित राहील.

२८. असंघटित व विभागलेल्या समाजापासून जे भय उद्भवते ते हे की, तो आपल्यासमोर भिन्न भिन्न आदर्श आणि मूल्यमापनाचे भिन्न भिन्न मानदंड ठेवतो.

२९. आणि सर्वसामान्य आदर्श आणि सर्वसामान्य मूल्यमापनांचे मानदंड नसल्यास सर्व समाज हा मिळतेजुळते घेणारा असा एकजिनसी राहात नाही.

३०. असे भिन्न भिन्न आदर्श आणि मूल्यमापनाचे भिन्न भिन्न मानदंड रूढ असलेल्या समाजात व्यक्तीला आपल्या विचारात सुसंगती राखणे अशक्य होते.

३१. न्याय व आपल्या संख्याबलाचा विचार बाजूला ठेवून भरमसाट हक्क सांगणार्या समूहाच्या वर्चस्वावर जो समाज आधारलेला असतो, त्या समाजात संघर्ष हा अटळ असतो.

३२. अशा प्रकारच्या संघर्षाला खीळ घालण्यासाठी सर्वांना पवित्र वाटणार्या अशा सर्वसामान्य नीति-नियमांची आवश्यकता असते.

३३. तिसर्या एका कारणास्तव नीति पवित्र आणि सर्वव्यापक असण्याची आवश्यकता आहे, आणि ते म्हणजे व्यक्तीच्या विकासाला संरक्षण देण्यासाठी.

३४. जीवनसंघर्षात अथवा समूहशासनात व्यक्तीचे हित हे सुरक्षित नसते.

३५. व्यक्तीला ज्या समाजात सर्वसामान्य ध्येये आणि सर्वसामान्य आदर्श यांना सार्वत्रिक मान्यता असते, त्या समाजात जी मानसिक सुसंगती साधता येते, ती जो समाज समूहात विभागलेला असतो, त्यात साधता येत नाही. समूहाप्रमाणे आदर्श आणि ध्येये भिन्न असली की, समाजातील व्यक्तीचे विचार बहकतात आणि समाज व्यवहाराकडे साकल्याने पाहण्याची दृष्टी सुसंगत राहू शकत नाही; ती विकृत होते.

३६. दुसरे असे की, समूह व्यवस्थेमुळे पक्षपातीपणा वाढतो आणि न्याय मिळत नाही.

३७. समूह व्यवस्थेमुळे समाजाचे वर्गप्रधान थर बनतात. जे मालक असतात ते मालकच राहतात आणि जे दास्यात जन्मास येतात ते दासच राहतात. धनी ते धनीच राहतात, कामगार ते कामगारच राहतात.

अधिकारसंपन्न ते अधिकारसंपन्नच राहतात आणि गुलाम ते गुलामच राहतात.

३८. याचा अर्थ  असा की, अशा व्यवस्थेत स्वातंत्र्याचा लाभ काही थोड्यांना होतो. सर्वांना होत नाही. अल्पसंख्याकांना समतेचा लाभ होतो. बहूसंख्याकांना मात्र त्यापासून वंचित राहावे लागते.

३९. यावर उपाय काय? यावर उपाय म्हणजे बंधुता; ही सर्वत्र प्रभाव पाडणारी शक्ती बनविणे.

४०. बंधुता म्हणजे काय? बंधुता म्हणजे मानवाभानवातील मातृभाव, म्हणजेच नीति.

४१. म्हणूनच भगवान बुद्धाने शिकविले, 'धम्म म्हणजे निती आणि धम्म पवित्र आहे तशीच नीतीही पवित्र आहे.'

# भाग दुसरा: पारिभाषिक शब्दसाम्यामुळे होणारे मौलिक भेद कसे अस्पष्ट राहतात?

## पुनर्जन्म

## १. प्रास्ताविक

१. मृत्यूनंतर काय होते? हा प्रश्न वारंवार विचारला जातो.
२. भगवान बुद्धाच्या समकालीनांमध्ये ह्याविषयी दोन भिन्न मते होती. पहिले मत शाश्वततावाद आणि दुसरे मत म्हणजे उच्छेदवाद.
३. आत्मा अमर असल्यामुळे जीवन शाश्वत आहे. पुनर्जन्माने जीवन पुढे चालू राहते असे शाश्वततावादी मानीत असत.
४. मृत्यु म्हणजे सर्वनाश, मृत्यूनंतर काही उरत नाही, हा उच्छेदवाद्यांचा सिद्धान्त.
५. भगवान बुद्ध हा शाश्वततावादी नव्हता. कारण शाश्वततावादात पृथक् आणि अमर अशा आत्म्याचे अस्तित्व कल्पावे लागते आणि त्यास तर बुद्धाचा विरोध होता.
६. भगवान बुद्ध हा उच्छेदवादी होता काय? आत्म्याचे अस्तित्व मानीत नसल्याने, बुद्ध हा स्वाभाविकत: उच्छेदवादी असेल अशी अपेक्षा असणार.
७. परंतु आपण वस्तुत: उच्छेदवादी नसता आपणावर तसा आरोप केला जातो अशी बुद्धाने अलगद्दूप्पम्म सुत्तात तक्रार केली आहे.
९. तो म्हणतो, "माझी शिकवण वेगळी असता, काही श्रमण आणि ब्राम्हण चुकीने आणि अप्रामाणिकपणाने वस्तुस्थिती धाब्यावर बसवून मी उच्छेदवादी आहे आणि मानवजातीचे विघटन, विनाश आणि संपूर्ण उच्छेद होणार आहे असे शिकवितो, असा मजवर आरोप करतात."
१०. "खरोखर मी तसे शिकवीत नाही आणि तरीसुद्धा हे भले लोक चुकीने किंवा अप्रामाणिकपणाने मजवर खोटा आरोप करून मला उच्छेदवादी बनवू पाहतात!"
१०. हे विधान जर खरोखर बुद्धाचे असेल, बुद्ध धम्मावर ब्राम्हणी सिद्धान्त लादण्यासाठी घुसडलेले प्रक्षिप्त विधान नसेल, तर एक गंभीर समस्या उभी राहते ( ती समस्या अशी ) :
११. भगवान बुद्ध तर आत्म्याचे स्वतंत्र अस्तित्व मानीत नाही, मग तो आपण उच्छेदवादी नाही असे कसे म्हणू शकतो?
१२. यातून एक प्रश्न उद्भवतो तो असा की, भगवान बुद्ध पुनर्जन्म मानतो काय?

## २. पुनर्जन्म कशाचा

१. भगवान बुद्ध पुनर्जन्म मानतो काय?

२. याचे उत्तर 'होय' असे आहे.

३. या प्रश्नाचे दोन भाग पाडणे योग्य ठरेल (अ ) पुनर्जन्म कोणत्या वस्तुचा आणि ( आ ) पुनर्जन्म कोणत्या व्यक्तीचा?

४. या दोन प्रश्नांचा एकेक प्रश्न वेगळा घेऊन विचार करणे बरे पडेल.

५. पुनर्जन्म कशाचा? या प्रश्नाचा प्रथम विचार करू या.

६. या प्रश्नाकडे बहुधा दुर्लक्ष केले जाते. हे दोन्ही प्रश्न एकत्र केल्यामुळेच अतिशय वैचारिक गोंधळ उत्पन्न झालेला आहे.

७. भगवान बुद्धाच्या मते माणसाच्या अस्तित्वाचे चार घटक पदार्थ आहेत; (अ) पृथ्वी, (आ) आप, ( इ) तेज, ( ई) वायु.

८. प्रश्न असा आहे की, मनुष्यदेह मृत झाल्यावर त्याच्या या चार भौतिक घटकांचे काय होते? मृत शरीराबरोबर तेही मृत होतात काय? काही लोक म्हणतात, 'होय'.

९. भगवान बुद्ध म्हणतो, 'नाही', ते घटक पदार्थ आकाशात जे समान पदार्थ सामूहिक रूपाने आहेत त्यात मिळून जातात.

१०. जेव्हा हे चार घटक आकाशात तरंगणार्या समूहाला ( Mass ) मिळतात तेव्हा एक नवा जन्म घडतो.

११. पुनर्जन्माचा भगवान बुद्धाला अभिप्रेत असणारा अर्थ असा आहे.

१२. या नव्या जन्मातील घटक पूर्वीच्या एका विशिष्ट मृत शरीरातील असू शकतील.

१३. इथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, शरीर मरते पण त्याचे भौतिक घटक पदार्थ सदैव जगत राहतात.

१४. अशा प्रकारचा पुनर्जन्म बुद्ध मानतो.

१५. सारीपुत्त आणि महाकोट्ठीत्त यांच्या संवादात या विषयावर चांगलाच प्रकाश पडला आहे.

१६. असे म्हणतात की, एकदा भगवान श्रावस्ती येथील अनाथपिंडकाच्या जेतवन आरामात वस्ती करीत असता महाकोट्ठीत्त आपले सायंकाळचे ध्यान संपवून सारीपुत्ताकडे गेला आणि त्याने सारीपुत्ताला आपल्या मनात डाचत असलेल्या काही प्रश्नांचे स्पष्टीकरण विचारले.

१७. खालील प्रश्न त्यांपैकी होते.

१८. महाकोट्ठित्त :- ध्यानाच्या पहिल्या अवस्थेत किती गोष्टी दूर केल्या जातात आणि किती मागे राखल्या जातात?

१९. सारीपुत्त :- पाच दूर केल्या जातात; पाच मागे राखल्या जातात. विषय वासना, दुर्बुद्धी, आळस, चिंता आणि शंका या दूर केल्या जातात आणि निरीक्षण, चिंतन, उत्साह, समाधान आणि चित्ताची एकाग्रता ह्या मागे राखल्या जातात.

२०. महाकोट्ठीत्त - डोळे, कान, नाक, जिव्हा आणि स्पर्श ही पंचेन्द्रिये घ्या. त्यांचे विषय पृथक् आणि क्षेत्रे पृथक् आहेत. त्याचा विचार करू लागलो असता असा प्रश्न पडतो की, त्यांचे अंतिम अधिष्ठान कोणते? या पंचेन्द्रियाचे विषय आणि त्यांची क्षेत्रे यांचा उपभोक्ता कोण?

२१. सारीपुत्त :- मन.

२२. महाकोट्ठित्त - ही पंचेन्द्रिये कशावर अवलंबून आहेत?

२३. सारीपुत्त :- चेतनेवर ( Vitality ).

२४. महाकोट्ठित्त : -चेतना कशावर अवलंबून असते?

२५. सारीपुत्त - उष्णतेवर.

२६. महाकोट्ठित्त :- उष्णता कशावर अवलंबून असते?

२७. सारीपुत्त :- चेतनेवर.

२८. महाकोट्ठित्त - तुम्ही म्हणता उष्णता चेतनेवर अवलंबून असते व चेतना उष्णतेवर अवलंबून असते, याचा खरोखर अर्थ तरी काय लावायचा?

२९. सारीपुत्त :- मी तुला एक उदाहरण देऊन स्पष्ट करतो. ज्याप्रमाणे दिव्यातील प्रकाश ज्योतीचे दर्शन घडवितो आणि ज्योतीमुळे प्रकाश उद्भवतो, त्याप्रमाणेच चेतना ही उष्णतेवर आणि उष्णता चेतनेवर अशी ती दोन्हीही तत्वे अन्योन्याश्रयी आहेत.

३०. महाकोट्ठित्त :- शरीर हे निश्चेतन काष्ठासारखे दूर फेकण्यापूर्वी शरीरातील कोणत्या गोष्टी त्यास सोडून जातात?

३१. सारीपुत्त - चेतना, उष्णता आणि विज्ञान ( जाणीव ).

३२. महाकोट्ठित्त :- इंद्रिय संज्ञा आणि भाव-भावना ज्या भिक्खूने आपल्या समाधीत निग्रहित आणि शांत केल्या आहेत तो भिक्खू आणि मृत शरीर या दोहोंमध्ये भेद काय?

३३. सारीपुत्त - मृत शरीरात काया, वाचा आणि मन ह्यांच्याच क्रिया केवळ थांबलेल्या असतात, तर इंद्रियाचे सामर्थ्यही उच्छिन्न झालेले असते. उलटपक्षी, ध्यानस्थ भिक्खूमध्ये चेतना व उष्णता ही कायम असून इंद्रियशक्ती शाबूत असते, जरी त्याचे श्वासोच्छ्वास, वितर्क-विचार आणि संज्ञा थांबलेल्या आणि शांत असल्या तरी.

३४. मृत्यु अथवा उच्छेद यांचे हे श्रेष्ठ आणि परिपूर्ण विवेचन ठरण्याचा संभव आहे.

३५. या संवादात एक व्यंग आहे. महाकोट्ठित्ताने सारीपुत्ताला एक प्रश्न विचारावयाला हवा होता, तो म्हणजे उष्णता म्हणजे काय?

३६. याचे सारीपुत्ताने काय उत्तर दिले असते याची कल्पना करणे सोपे नाही. एक गोष्ट मात्र निःस्संदेह आहे की, उष्णता म्हणजे शक्ती ( Energy ).

३७. अशा रीतीने स्पष्ट केल्यास, 'शरीर मृत झाल्यावर काय होते?' या प्रश्नाचे योग्य उत्तर 'शरीर शक्ती ( Energy ) उत्पन्न करण्याचे थांबविते' असे होते.

३८. परंतु हाही उत्तराचा एकच भाग ठरतो. कारण मृत्यूचा एक अर्थ असाही आहे की, 'शरीरातून जी शक्ती बाहेर पडते ती विश्वात संचार करणार्या शक्तिसमूहात मिळून जाते.

३९. म्हणून मृत्यूचे अथवा उच्छेदाचे दोन अर्थ आहेत. एका पैलूचा अर्थ शक्तीचे ( Energy ) उत्पादन थांबणे. दुसर्या पैलूचा अर्थ विश्वात संचार करणार्या शक्तिसंग्रहात नवी भर पडणे.

४०. उच्छेद या शब्दाच्या अर्थाला असे दोन पैलू पडत असल्याने बुद्ध स्वतःला पूर्णतया उच्छेदवादी म्हणत नसे.

आत्म्याच्या कक्षेपर्यंतच तो उच्छेदवादी होता. शरीराच्या भौतिक घटका ( Matter ) बाबत मात्र तो उच्छेदवादी नव्हता.

४१. असा अर्थ लावला तर बुद्ध स्वत:ला उच्छेदवादी का म्हणवून घेत नसे हे कळणे सोपे होते. तो शरीर घटकाचे ( Matter ) पुनर्जीवन मानतो; तो आत्म्याचा पुनर्जन्म मानत नाही.

४२. भगवान बुद्धाच्या मताचा असा अर्थ लावला तर तो शास्त्राशी सुसंवादी आहे.

४३. याच अर्थाने बुद्ध केवळ पुनर्जन्म मानतो असे म्हणता येईल.

४४. शास्त्र म्हणते, शक्ती ( Energy ) कधीही नाश पावत नाही. मृत्यूनंतर सर्व उच्छेद होतो आणि मागे काहीच उरत नाही ही विवारसरणी भौतिक शास्त्राविरुद्ध आहे. कारण ही विचारसरणी शक्तीचे ( Energy ) सामूहिक सातत्य या प्रमाणाशी जुळत नाही.

४५. केवळ याच रीतीने वर सांगितलेली पुनर्जन्माची समस्या सोडविता येते.

## ३. पुनर्जन्म कोणाचा ?

१. सर्वात बिकट प्रश्न म्हणजे पुनर्जन्म कोणाचा?

२. एखादा मृत झालेला मनुष्य परत नवा जन्म घेतो का?

३. या सिद्धांतावर बुद्धाचा विश्वास होता काय? असणे असंभाव्य दिसते.

४. मृत मनुष्याचे सर्व भौतिक अंश एकत्र येऊन, त्यांनी एक नवा देह बनविला तरच त्या मनुष्याचा पुनर्जन्म घडणे शक्य आहे.

५. जर नवा देह वेगवेगळ्या मृत मनुष्यांच्या भिन्न, भिन्न भौतिक अंशांच्या मिश्रणांनी बनत असला तर पुनर्जन्म शक्य आहे, परंतु तो त्या एकाच मृत मनुष्याचा पुनर्जन्म असू शकत नाही.

६. भिक्खूणी खेमा हिने हा मुद्दा पसेनदी राजाला चांगलाच स्पष्ट करून सांगितला आहे.

७. एकदा तथागत श्रावस्तीजवळील अनाथपिंडिकाच्या जेतवनारामात राहात होते.

८. त्या समयी कोशल जनपदात परिभ्रमण करून खेमा ही श्रावस्ती आणि साकेत ह्या नगरांच्या दरम्यान असलेल्या तोरणवत्थूमध्ये राहात होती.

९. या वेळी कोसल राजा पसेनदी साकेतहून श्रावस्ती येथे जात होता. एक रात्र तो तोरणवत्थू येथे राहिला.

१०. पसेनदीने एका माणसाला बोलावून सांगितले, “हे बघ. सन्माननिय अशा एखाद्या भिक्खूला किंवा ब्राम्हणाला घेऊन ये.”

११. “ठीक आहे,” असे बोलून तो तोरणवत्थूत राजसन्मानास योग्य असा भिक्खु अथवा ब्राम्हण शोधू लागला; परंतु तसा कोणीही त्याला आढळला नाही.

१२. शेवटी तोरणवत्थूमध्ये राहावयास आलेली भिक्खूणी खेमा त्याला दिसली. तिला भेटून तो कोसलराज पसेनदीकडे गेला आणि म्हणाला,

१३. “महाराज, आपल्या सन्मानास योग्य असा भिक्खू अथवा ब्राम्हण येथे कोणी दिसत नाही. परंतु येथे खेमा नावाची तथागतांची एक शिष्या आहे. तिच्यासंबंधी अशी वार्ता प्रसृत आहे की, ती विचारसंपन्न, विचक्षण,

बहुश्रुत, वादविवादात कुशल आणि प्रत्युत्पन्नमतीची अशी अर्हत् स्ती आहे. महाराजांनी तिचा सन्मान केल्यास तो योग्यच होईल.”

१४. हे ऐकल्यावर कोसलराज पसेनदी भिक्खुणी खेमाला भेटण्यास गेला. तिच्या समीप गेल्यावर तिला अभिवादन करून तो बाजूला बसला आणि म्हणाला,

१५. या विषयासंबधी आपले म्हणणे काय आहे? “मृत्यूत्तर तथागताचे अस्तित्व राहते काय?”

१६. “महाराज, हे गूढ तथागतांनी स्पष्ट केलेले नाही.”

१७. “तथागतांचे मृत्यूनंतर अस्तित्व राहते काय? असा प्रश्न विचारला असता त्याचे उत्तर तथागतांनी सांगितले नाही असे म्हणतात व दुसर्या प्रश्नाचीही तशीच उत्तरे देतात. तथागतांनी हे गूढ उकलून न सांगण्याचे काय कारण असावे बरे?”

१८. “महाराज, या बाबतीत मी आपणालाच एक प्रश्न विचारीन आणि आपणास योग्य वाटेल तसे त्याचे उत्तर द्या. महाराज, आपणाजवळ असा कोणी गणिती आहे काय की जो गंगेतील वाळूकणांची शेकड्यांनी, हजारांनी अथवा लक्षांनी गणती करू शकेल?”

१९. “नाही तसा कोणीच नाही.”

२०. “मग तुमच्यावजवळ असा कोणी गणिती आहे काय की जो समुद्रात इतके करोड, इतके हजार, इतके लाख माप पाणी आहे हे सांगू शकेल?”

२१. “नाही. असा कोणीच नाही.”

२२. “असे का?”

२३. “कारण, समुद्र खोल, अमर्याद, अगाध आहे.”

२४. “त्याप्रमाणे महाराज, तथागतांनी देह परित्यक्त केल्यावर ते मुळापासून छेदलेल्या तालवृक्षासारखे परत पुन्हा उगवणार नाहीत. तथागतांच्या देहासंबंधी काय सांगता येईल? तथागत शरीर विमुक्त झाल्यावर समुद्रासारखेच अमर्याद आणि अगाध आहेत. अशा स्थितीत तथागतांना मृत्यूनंतर अस्तित्व आहे अथवा नाही किंवा आहे आणि नाही असे कोणतेही विधान लागू शकत नाही.”

२५. “तथागतांची त्याच्या वेदनांवरून व्याख्या करू गेल्यास त्या वेदना तथागतांनी परित्यक्त केलेल्या आहेत. आमूलाग्र नाहीशा केलेल्या आहेत. वेदना विमुक्त असे तथागत, थोर समुद्राप्रमाणे अमर्याद आणि अगाध आहेत. तेव्हा मृत्यूनंतर तथागतांचे अस्तित्व राहते अथवा राहात नाही; किंवा राहते आणि राहात नाही, ही विधाने तथागतांना लागू पडत नाहीत.”

२६. “त्याप्रमाणेच संज्ञा, संस्कार, विज्ञान यांच्या आधारे तथागतांची व्याख्या करू लागल्यास तीही त्याना लागू पडत नाही. कारण या सर्वांपासून समूळ विमुक्त झालेले तथागत हे थोर समुद्रासारखे अमर्याद आणि अगाध आहेत. तेव्हा मृत्यूनंतर तथागतांच्या अस्तित्वासंबधी अथवा अनस्तित्वासंबंधी विधान त्यांना लागू पडत नाही.”

२७. खेमाचे हे शब्द ऐकून कोसल राजा पसेनदी आनंदित झाला. आपल्या जागेवरून उठला, तिला नमस्कार केला आणि तो निघून गेला.

२८. दुसर्या एका प्रसंगी पसेनदी तथागताकडे गेला असता त्यांना अभिवादन करून त्याने विचारले,

२९. “भगवान, मग तथागतांना मृत्यूत्तर अस्तित्व नाही असे म्हणता येईल काय?”

३०. “महाराजा, यासंबंधी मी काहीच म्हटलेले नाही.”
३१. “भगवान, मग तथागतांना मृत्यूत्तर अस्तित्व आहे असे म्हणता येईल काय?”
३२. “महाराज, मी तसेही म्हटलेले नाही.”
३३. नंतर त्याने खेमाला विचारलेलेच दुसरे प्रश्न विचारले.
३४ “भगवान, मी जेव्हा आपणाला विचारतो, मृत्यूत्तर तथागतांना अस्तित्व आहे काय अथवा नाही काय, तर आपण म्हणता, ‘मी ते सांगितलेलेच नाही.’ तर भगवान, ह्या न सांगण्याचे कारण काय?”
३५. “महाराजा, मी आता तुला एक प्रश्न विचारतो आणि तुला योग्य वाटेल तसे उत्तर दे.” त्या ठिकाणी भगवंतांनी खेमासारखेच पसेनदीला प्रश्न विचारले.
३६. “भगवान. ही खरोखर आश्चर्याची गोष्ट आहे की, गुरुशिष्यांनी दिलेली उत्तरे अर्थशा आणि अक्षरश: समान, सुसंवादी, सुसंगत आणि उच्चतम आहेत.
३७. “भगवान, एका समयी मी भिक्खुणी खेमाकडे गेलो होती आणि तिला याच गोष्टीसंबंधी विचारले होते आणि भगवंतासारखेच तिने अक्षरश: उत्तर दिले.”
३८. “भगवान, आम्ही कामाची माणसे. आम्हांला पुष्कळ कामे आहेत. आम्ही जातो.”
३९. “जा, या वेळी जे तुला करणे उचित आहे ते कर.”
४०. या शब्दांनी आनंदित होऊन भगवंतांना अभिवादन करून कोसल राजा पसेनदी आपल्या मार्गाला लागला.

## कर्म

## १. बौद्ध आणि ब्राम्हणी कर्मसिद्धान्त समान आहेत काय ?

१. बौद्धधम्मात कर्मसिद्धान्ताइतका इतर कोणत्याही सिद्धान्ताने गोंधळ निर्माण केलेला नाही.
२. बौद्ध धर्मात त्याचे स्थान कोणते? आणि त्याचा विशेष अर्थ काय आहे हे अगोदरच सांगितलेले आहे.
३. अज्ञ हिंदू न समजता केवळ शब्दसाम्यावरून असे म्हणतात की, बौद्धधर्म अथवा ब्राम्हणी वा हिंदुधर्म एकच आहेत.
४. सूज्ञ आणि सनातनी ब्राम्हणही असेच म्हणतात, परंतु त्यात त्यांचा हेतु अज्ञ बहुजनसमाजाची बुद्धि-पुरस्सर गैरसमजूत करणे हा असतो.
५. सुशिक्षित ब्राम्हणांना माहित असते की, बुद्धाचा कर्मसिद्धान्त ब्राम्हणी कर्मसिद्धान्तापेक्षा भिन्न आहे आणि तरीही ते म्हणत राहतात की, बौद्धधर्म आणि ब्राम्हणी अथवा हिंदुधर्म एकच आहेत.
६. त्यांच्या द्वेषबुद्धीने चालविलेल्या अपप्रचाराला या दोन धर्मांतील कर्म सिद्धान्तविषयक समान परिभाषेने साहाय्य होते.
७. म्हणून वस्तुस्थिती काय आहे याचे सूक्ष्म परीक्षण करणे आवश्यक आहे.
८. शब्दांचे कितीही साम्य असले तरी बुद्धाच्या कर्मसिद्धान्ताचा अभिप्राय हा ब्राम्हणी कर्मसिद्धान्ताच्या

अभिप्रायापेक्षा वेगळा आहे.

९. या दोन्ही सिद्धान्तांत आधारभूत प्रमाणे ही इतकी भिन्न आहेत की, त्यापासून निष्पन्न होणारा निष्कर्ष समान असणे शक्य नाही.

१०. हिंदू कर्मसिद्धान्ताची मुख्य तत्वे खालीलप्रमाणे आहेत.

११. हिंदू कर्मसिद्धान्त हा आत्म्याच्या अस्तित्वावर आधारलेला आहे. उलटपक्षी बौद्ध धर्म आत्म्याचे अस्तित्व मानीत नसल्यामुळे तो आत्म्यावर आधारलेला नाही.

१२. ब्राम्हणी कर्मसिद्धान्त हा आत्म्याच्या जन्माजन्मावर आधारलेला आहे.

१३. आत्म्याचा पुनर्जन्म होतो असे मानल्यामुळे कर्म हे जन्मजन्मान्तरी चालू राहते.

१४. बौद्ध धर्म आत्माच मानीत नसल्यामुळे हेही बौद्ध कर्मसिद्धान्तास लागू होत नाही.

१५. देहाव्यतिरिक्त आत्म्याला अस्तित्व आहे यावर हिंदूधर्म आधारलेला आहे. देह मृत झाला तरी आत्मा मरत नाही. आत्मा देहातून निघून जातो.

१६. ही विधाने बौद्ध सिद्धान्ताला लागू नाहीत.

१७. हिंदू कर्मसिद्धान्ताप्रमाणे माणसाने कर्म केले तर त्या कर्माचे विविध परिणाम होतात. त्याचा पहिला परिणाम म्हणजे कर्त्यावर होणारा आणि दुसरा आत्म्यावर होणारा.

१८. कर्त्याच्या प्रत्येक कर्माचा आत्म्यावर संस्कार होतो.

१९. जेव्हा मनुष्य मरतो आणि त्याचा आत्मा त्याला सोडून जातो त्या वेळी त्याच्या आत्म्यावर असे अनेक संस्कार झालेले असतात.

२०. आणि या संस्कारामुळे पुढील जन्मी त्याला कोणते अधिकार मिळणार हे ठरत असते.

२१. हिंदूंचा हा सिद्धान्त आत्म्याचे अस्तित्व न मानणार्या बौद्ध कर्मसिद्धान्ताशी विसंगत आहे.

२२. वरील कारणास्तव बौद्ध कर्मसिद्धान्त आगि हिंदू कर्मसिद्धान्त हे एकच असू शकत नाहीत.

२३. म्हणून हे दोन्हीही एकच आहेत असे मानणे केवळ मूर्खपणाचे ठरेल.

२४. जास्तच जास्त इतकेच म्हणता येईल की, या शाब्दिक मायाजाळापासून सावध राहा.

## २. गतकर्माचा भविष्य जन्मावर परिणाम होतो असे बुद्ध मानतो काय ?

१. कर्मसिद्धान्त बुद्धाने सांगितला. 'कराल तसे भराल' असे सांगणारा तो पहिलाच होय.

२. तो कर्मसिद्धान्तावर इतका भर देत असे की, त्याच्या म्हणण्याप्रमाणे कर्मसिद्धान्ताच्या दृढ परिपालनाविना नैतिक सुव्यवस्था अशक्य आहे.

३. भगवान बुद्धाचा कर्मसिद्धान्त हा 'कर्म' आणि त्याचा वर्तमान जीवनावर परिणाम ह्यापुरता मर्यादित होता.

४. तथापि अधिक विस्तृत असाही एक कर्मसिद्धान्त आहे आणि या कर्मसिद्धान्ताप्रमाणे गतजन्मीच्या कर्माचा कर्मात अंतर्भाव होतो.

५. माणुस गरीब कुळात जन्मास आला तर या सिद्धान्ताप्रमाणे त्याचे कारण त्याचे गतजन्माचे दुष्कर्म. तो श्रीमंताच्या घरात जन्मला तर त्याचे कारण गतजन्मीचे सत्कर्म.

६. जन्मत:च माणसात काही व्यंग असले तर त्याचेही कारण त्याचे गतजन्मीचे दुष्कर्म.

७. हा अत्यंत दुष्ट सिद्धान्त आहे. कर्माचा असा अर्थ लावला तर माणसाच्या श्रमाला काहीच स्थान उरणार नाही. सर्व काही गतजन्मीच्या त्याच्या कर्माने पूर्वनियोजित केल्यासारखे होईल.

८. हा विस्तृत कर्मसिद्धान्त बोद्धप्रणीतच आहे, असा अनेक वेळा भगवान बुद्धावर आरोप करण्यात येतो.

९. परंतु भगवान बुद्ध खरोखरच हा सिद्धान्त मानीत होता काय?

१०. ह्या सिद्धान्ताची बरोबर परीक्षा करण्यासाठी तो ज्या शब्दांत सामान्यत: सांगितला जातो त्यापेक्षा वेगळ्या शब्दात सांगणे योग्य होईल.

११. गत कर्म हे माणसासमवेत जाते असे म्हणण्यापेक्षा ते वारसा म्हणून येते हे म्हणणे अधिक सयुक्तिक आहे.

१२. शब्दाच्या ह्या परिवर्तनामुळे वांशिकतेच्या नियमांवर कर्मसिद्धांताची कसोटी लावता येते. त्याप्रमाणेच ह्या शब्दपरिवर्तनाने त्या सिद्धांताच्या अभिप्रेत आणि रूढ अर्थाला बाध येत नाही.

१३. जे दोन प्रश्न येरव्ही माणसाला या सिद्धान्ताविषयी विचारणे शक्य झाले नसते, ते तोच सिद्धान्त निराळ्या भाषेत मांडल्यामुळे, शक्य झाले आहे. हे जे दोन प्रश्न आहेत त्या दोन प्रश्नांची उत्तरे दिल्याशिवाय हा सिद्धान्त स्पष्ट होत नाही.

१४. पहिला प्रश्न हा की, गत कर्माचा वारसा कसा लाभतो? त्याची प्रक्रिया कशी असते?

१५. दुसरा प्रश्न असा की, वांशिकतेच्या दृष्टीने गत कर्माचे रूप कसे असते? ते वंशानुगत मातापितरांपासून चालत आलेले असते, की नंतर स्वत: संपादलेले असते?

१६. आपल्या मातापितरांपासून आपल्याला काय मिळते?

१७. शास्त्र सांगते, जेव्हा वीर्यजंतूचा ( Sperm ) गर्भाशयातील अंड्यांशी संयोग होतो तेव्हा प्राण्याच्या जीवनाला प्रारंभ होतो. वीर्यजंतूच्या शिराचा अंड्यातील केन्द्राणूत प्रवेश होणे म्हणजे उत्पत्तीचा प्रारंभ.

१८. प्रत्येक मनुष्यप्राण्याचा उगम हा मातेच्या गर्भाशयातील अंडे आणि पित्याचा वीर्यजंतू यांच्या संयोगाने म्हणजे दोन सजीव पदार्थांच्या दोन कणांच्या युतीने होत असतो.

१९. ह्या विषयासंबंधी चर्चा करण्यासाठी जो यक्ष बुद्धाकडे आला होता, त्याला माणसाची उत्पत्ती मातापितरांमुळेच होते, असे बुद्धाने सांगितले.

२०. त्या वेळी भगवान बुद्ध राजगृहाजवळील इंद्रकर पर्वतावर वास करीत होते.

२१. यक्ष त्यांच्या जवळ जाऊन म्हणाला, "भगवान म्हणतात, पार्थिव आकार ( रूप ) म्हणजे जीव नव्हे; मग जीव सशरीर कसा होतो? जीवाला ह्या अस्थि, हे जठर कोठून मिळतात! आईच्या गर्भाशयात हा आत्मा कसा लटकलेला असतो?"

२२. याला भगवंतांनी उत्तर दिले, "प्रथम कलल होतो. नंतर अर्बुद. त्यापासून पेशी वाढते आणि पेशीपासून घन होऊन तो वृद्धी पावत राहतो. या घनांत पुढे केस, लव, नखे येऊ लागतात आणि जे काही अन्न, पेय आई घेते त्यावरच पर्यायाने आईच्या गर्भाशयातील बालक जगते आणि वाढते.

२३. हिन्दु सिद्धान्त मात्र वेगळा आहे.

२४. तो सिद्धान्त म्हणतो की, शरीर वंशानुगत मातापित्यांपासून प्राप्त होते. परंतु आत्म्याचे तसे नाही. तो शरीरात बाहेरून आत ठेवलेला आहे अर्थात कोठून? हे काही हा सिद्धान्त सांगू शकत नाही.

२५. आता गतकर्माचे स्वरूप कसे असते? या दुसर्या प्रश्नाकडे वळताच एका गोष्टीसंबंधी निश्चिती केली पाहिजे. ती म्हणजे, कर्म हा वंशानुगत गुणविशेष समजावयाचा की स्वत:च संपादलेला गुण समजावयाचा?

२६. या प्रश्नाचे उत्तर आल्याशिवाय वंशानुक्रमाच्या शास्त्रीय सिद्धान्ताची त्याला कसोटी लावता येत नाही.

२७. परंतु या किंवा त्या दृष्टीने त्याचे उत्तर आले तरी हा कर्मसिद्धान्त हा अर्थपूर्ण आहे किंवा अर्थहीन आहे, हे ठरविण्यास शास्त्र सहाय्य करू शकेल काय?

२८. शास्त्रानुसार मुलात आईबापाचे गुण विशेष उतरतात.

२९. हिंदू कर्मसिद्धान्ताप्रमाणे बालकाला त्याच्या आईबापापासून देहापलीकडे काहीच मिळत नाही. हिंदू सिद्धान्ताप्रमाणे गत कर्म हे मुलाने आपल्या जन्माबरोबर, स्वतः आपण आपल्यासाठी, आणलेला वारसा आहे.

३०. त्यात आईबापाचा काहीच भाग नसतो. सर्व काही बालक आपल्याबरोबरच आणते.

३१. अशा प्रकारचा सिद्धान्त बुद्धीस पटणारा ठरत नाही.

३२. वर सांगितल्याप्रमाणे बुद्ध असल्या बुद्धिविसंगत सिद्धान्तावर विश्वास ठेवीत नाही. ( या विषयाची चर्चा करताना मनुष्य आपल्या चांगल्या वाईट कर्माच्या परिणामांपासून मुक्त होतो काय? त्या प्रश्नाचे स्थाविर नागसेनाने राजा मिलिंदाला उत्तर दिले आहे.)

३३. "जर पुनरुत्पत्ती झाली नाही तर तो आपल्या कर्माच्या परिणामापासून मुक्त होतो. जर पुनरुत्पत्ती झाली तर तो मुक्त होणार नाही."

३४. राजा मिलिंद म्हणाला, "नागसेन, एक उदाहरण देऊन आपले म्हणणे अधिक स्पष्ट कर."

३५. "राजा, असे समज, एक मनुष्य दुसर्या माणसाचे आंबे चोरतो. चोरणारा शिक्षापात्र ठरतो काय?"

३६. "होय."

३७. "परंतु दुसर्या माणसाने ज्या आंब्याचे बीज जमिनीत लावले होते ते आंबे त्याने चोरलेले नाहीत, मग तो शिक्षापात्र का?"

३८. "कारण, त्याने जे आंबे चोरले ते लावलेल्या आंब्याचेच परिणामस्वरूप होते."

३९. "त्याप्रमाणेच हे राजा, हे नामरूप चांगले अथवा वाईट कर्म करते आणि त्या कर्मापासून दुसरे नामरूप जन्मास येते म्हणून पाहिले नामरूप आपल्या दुष्कर्मापासून विमुक्त राहू शकत नाही."

४०. "वा! छान नागसेना!"

४१. राजा पुढे म्हणाला, "जेव्हा ह्या नामरूपाने कर्म केले तेव्हा त्या कर्माचे पुढे काय होते?

४२. " ज्याप्रमाणे सावली माणसाला सोडीत नाही, त्याप्रमाणे गत कर्मही त्याच्याबरोबर जाईल."

४३. " पण मग ही कर्मे आहेत असे म्हणून कोणाला ती कर्मे दाखविता येतात का?"

४४. " नाही."

४५. " एक उदाहरण देऊन हे अधिक स्पष्ट कर."

४६. " वृक्षाला जी फळे अद्यापि यावयाची आहेत ती, हे राजा, दाखविता येतील काय?"

४७. "ती भावी फळे येथे आहेत किंवा तेथे आहेत, असे कोणाला म्हणता येईल काय?"

४८. "निसंशय नाही."

४९. “त्याप्रमाणेच हे राजा, जोपर्यंत जीवनाचे सातत्य खंडित झाले नाही, तोपर्यंत कृतकर्मे दाखविता येत नाही.”
५०. “वा, छान नागसेना.”

## ३. गतकर्मांचा भविष्यजीवनावर परिणाम होतो, असे बुद्ध मानतो काय ? ( पुढे चालू )

१. अशा रीतीने बुद्धाचा कर्मसिद्धान्त शास्त्रास धरून आहे.
२. पूर्वजन्मीचे कर्म वारसा म्हणून भावी जन्मात प्राप्त होते. यावर तो विश्वास ठेवीत नाही.
३. जन्म हा मातापितरांपासून आहे आणि बालकाला जन्मत: जो वारसा लागतो तो त्याच्या आईबापांकडून; असे बुद्ध मानीत असल्यामुळे बालक हे स्वतःच वारसा घेऊन येते, यावर तो कसा विश्वास ठेवणार?
४. त्याच्या विश्वासासंबंधीचे अनुमान स्वीकारले नाही तरी चालेल; कारण या विषयासंबंधी प्रत्यक्ष पुरावा एका सूत्रात आढळतो. ते सूत्र म्हणजे, ‘चूळ, दुःख-खंद सूत्त’ या सुत्तात भगवान बुद्ध आणि जैन यांचा संवाद आहे.
५. या संवादात भगवान बुद्ध म्हणतो - तुम्ही म्हणता की, आम्ही पूर्वी पाप केले होते, त्याचे आम्ही आपल्या कठोर तपस्येने परिमार्जन करतो. वर्तमानकाळात काया, वाचा आणि मन यांचा निरोध केल्याने आमच्या पूर्वजन्मींच्या पापाचा निरास होईल. मग तपस्येने मागिल पापांचा निगम झाल्यावर आणि नवी पापकर्मे करावयाचे थांबल्यावर आमचा भविष्यकाळ शुद्ध होतो. भविष्यकाळ शुद्ध केल्याने गतकाळ परिणामहीन होतो. गतकाळ परिणामहीन झाल्याने दुःखाचा निरास होऊ लागतो आणि त्यामुळे दुःखकारक वेदना नाहीशा होतात. दुःखकारक वेदना नाहीशा झाल्यावर दुःखच नाहीसे हाते.
६. ह्या माझ्या भाषणाला त्या निगण्ठांनी होकार दिल्यावर मी त्यांना विचारले, ‘पूज्य माणसांनो, तुम्हांला पूर्वजन्म होता किंवा पूर्वजन्म नव्हता हे तुम्हांस माहीत आहे काय?’
७. ‘नाही! आम्हांला काहीच माहीत नाही!’
८. ‘गतजन्मी पापामुळे तुम्ही सदोष अथवा निर्दोष होता याबद्दल तुम्हांला काही ज्ञान आहे काय?’
९. ‘नाही! आम्हांस काहीच माहीत नाही!’
१०. ‘गतजन्मी या किंवा त्या विशिष्ट पापामुळे तुम्हांला दोष लागला होता किंवा नाही हे तुम्हांला माहीत आहे का?’
११. ‘नाही; ते आम्हांस काहीच माहित नाही.’
१२. दूसरी गोष्ट अशी की, माणसाची स्थिती आनुवंशिकतेपेक्षा त्याच्या भोवतालच्या परिस्थितीवर अधिक अवलंबून असते. असे बुद्ध मानतो.
१३. देवधम्म सुत्तात तो म्हणतो, काही श्रमण ब्राम्हण अशा मताचे आहेत की, जे काही सुखकर अथवा दुःखकर अनुभव व्यक्तीला येतात ते गतजन्मीचेच परिणाम होत. म्हणून ते म्हणतात, गतजन्मीच्या पापकर्माचे परिमार्जन केल्याने आणि नवी पापकर्मे करण्याचे थांबविल्याने भविष्य काळात सोसावयाचे काहीच उरत नाही. पापकर्मे क्षय पावतात नि पाप कर्माचा क्षय झाल्याने दुःखाचा उच्छेद होतो. दुःखाचा उच्छेद झाल्याने वेदना नाहीशा

होतात आणि वेदनांचा क्षय झाल्याने अखिल दु:खाचा उच्छेद होतो, असे निगण्ठांचे म्हणणे आहे.

१४. प्राण्यांचे सुखकारक आणि दु:खकारक अनुभव हे जन्मकाळच्या परिस्थिती मुळे उद्भवतात असे निगण्ठ म्हणत असतील तर त्यांचे ते म्हणणे दोषास्पद आहे; आणि जन्मकालीन परिस्थिती त्याचे कारण नाही असे ते म्हणत असले तरीसुद्धा त्यांचे म्हणणे दोषास्पद ठरते.

१५. भगवान बुद्धाची ही विधाने आपल्या प्रश्नांच्या दृष्टीने महत्वाची आहेत. जर बुद्ध गतजन्मीच्या कर्मावर विश्वास ठेवीत असेल तर त्यासंबधी शंका का निर्माण करतो? वर्तमान जीवनातील सुखकर अथवा दु:खकर अनुभव हे परिस्थितिसापेक्ष आहेत असे मानणारा बुद्ध गतजन्मीच्या कर्मावर विश्वास कसा ठेवील ?

१६. गतजन्मीच्या कर्माचा सिद्धान्त हा शुद्ध ब्राम्हणी सिद्धान्त आहे. ते आत्म्याचे अस्तित्व मानतात, आत्म्याचे अस्तित्व आणि पूर्वकर्माचा आत्म्यावर परिणाम होतो असे मानतात म्हणून 'गतजन्मीचे कर्म वर्तमान काळात प्रभावशाली ठरते!' याच्याशी ते सुसंगत आहे परंतु आत्म्याचे अस्तित्व न मानणार्या बौद्ध सिद्धान्ताशी ते अगदी विसंगत आहे.

१७. ज्याला भगवान बुद्धाचा सिद्धान्त समजला नाही किंवा जो बुद्धिपुरस्सर बौद्ध धर्म आगि हिंदू धर्म सदृश आहेत असे दाखविण्याचा अट्टाहास करतो त्याने हा सिद्धांत बौद्ध धर्मात घुसडविला असला पाहिजे.

१८. भगवान बुद्धाने हा सिद्धान्त शिकविलेला असण्याची शक्यता नाही, हे वरील कारणावरून स्पष्ट होईल.

१९. याशिवाय भगवान बुद्धाने हा सिद्धान्त शिकविला नसावा या म्हणण्याला दुसरा एक सर्वसामान्य आधार आहे.

२०. पूर्वकर्म हे भावी जीवनाचे नियंत्रण करते. हा हिंदु सिद्धान्त अन्यायमूलक आहे. असल्या सिद्धान्ताचा शोध लावण्याचा हेतू काय असावा?

२१. त्याचा एकमेव हेतू शासन अथवा समाज यांना दरिद्री लोकांच्या दु:स्थितीच्या उत्तरदायित्वातून मुक्त करणे हा असावा.

२२. नाहीतर असल्या अमानुष आणि बुद्धिविसंगत सिद्धान्ताचा शोधच लागला नसता.

२३. महाकारुणिक हे ज्याचे बिरुद प्रसिद्ध आहे तो असला सिद्धान्त उचलून धरील, अशी कल्पनाही करवत नाही.

# अहिंसा

## १. अहिंसेचे भिन्न अर्थ आणि तिचे आचरण

१. अहिंसा म्हणजे जीवहिंसा न करणे, हा बुद्धाच्या शिकवणूकीचा अत्यंत महत्वाचा भाग आहे.

२. करुणा आणि मैत्री या दोहोंशी तिचा जिव्हाळयाचा संबंध आहे.

३. तथापि असा एक प्रश्न विचारला जातो की, बुद्धप्रणित अहिंसा ही सर्वकालीन अनुलंघ्य असे कर्तव्य होते की ती प्रसंगसापेक्ष होती?

४. जे लोक भगवान बुद्धाची शिकवणूक मानतात त्यांना तिला सर्वकालिन अनुल्लंघ्य असे कर्तव्य मानणे कठीण

जाते. ते म्हणतात की, सर्वकाळ अहिंसेनेच वागले तर पुष्कळ वेळा सतचे असतला आणि गुणाचे दुर्गुणाला बलिदान द्यावे लागते.

५. ह्या प्रश्नाचे अधिक स्पष्टीकरण करणे सयुक्तिक होईल. अहिंसा या विषयाने पुष्कळच गोंधळ निर्माण केला आहे.

६. बौद्ध देशातील लोकांनी तिचा अर्थ काय लावला आणि कसे परिपालन केले आहे?

७. हा प्रश्न महत्वाचा असून तो विचारार्ह आहे.

८. सिलोनमधील भिक्खु स्वतः रणांगणात उतरले होते. आणि लोकांनाही परकीय आक्रमणाविरुद्ध यूद्ध करण्यास त्यांनी उद्युक्त केले होते.

९. उलटपक्षी ब्रम्हदेशातील भिक्खुंनी परकीय आक्रमणाविरुद्ध स्वतः शस्त्र धरले नाही आणि लोकांनाही शस्त्र न धरण्याचा उपदेश केला.

१०. ब्रम्ही लोक अंडी खातात पण मासे खात नाहीत.

११. अशा रीतीने दोन भिन्न देशांत अहिंसेचा वेगळा अर्थ लावून तिचे परिपालनही वेगळ्या रीतीने केलेले दिसते.

१२. अलीकडे जर्मन बौद्ध मंडळाने एका ठरावाने पंचशीलेतील अहिंसा सोडून चार शीले मान्य केली आहेत.

१३. अहिंसेच्या सिद्धान्ताबाबत अशी वस्तुस्थिती आहे.

## २. अहिंसेचा खरा अर्थ

१. अहिंसेचा अर्थ काय?

२. भगवान बुद्धाने अहिंसेची व्याख्या कोठेच दिलेली नाही. वस्तुतः अहिंसेचा निश्चित शब्दांत तो क्वचितच उल्लेख करतो.

३. म्हणून प्रासंगिक पुराव्याच्या आधाराने अहिंसेचा उपदेश करण्यात त्याचा काय उद्देश होता त्याचा शोध घेतला पाहिजे.

४. यावरील प्रासंगिक पुरावा म्हणजे कोणी भिक्षा म्हणून मांस देऊ केले तर ते ग्रहण करण्याला बुद्धाचा विरोध नव्हता.

५. ज्या प्राण्याची हत्या करण्यात भाग घेतला नाही त्या प्राण्याचे मांस ग्रहण करण्याला भिक्खुंना प्रतिबंध नव्हता.

६. भिक्षा म्हणून दिलेले मांस भिक्खूंनी खाऊ नये, या देवदत्ताच्या आग्रहाला बुद्धाचा विरोध होता.

७. दुसरा यासंबंधीचा पुरावा म्हणजे यज्ञांत प्राण्याचा बळी देऊ नये ह्याला त्याचा विरोध होता आणि असे त्यांनी स्वतः म्हटलेलेही आहे.

८. 'अहिंसा परमो धर्मः' हा आत्यंतिक सिद्धान्त जैन धर्मात आहे; बौद्ध धर्मात नाही.

९. दुसरा एक अधिक प्रत्यक्ष आणि प्रासंगिक असा पुरावा आहे आणि त्यात बुद्धाने जवळ जवळ अहिंसेची व्याख्याच केली आहे. त्यात तो म्हणतो. 'सर्वांवर प्रेम करा म्हणजेच तुम्हाला कोणाचीही हत्या करण्याची इच्छा

होणार नाही.' अहिंसेच्या तत्वाचे हे नकारार्थी स्पष्टीकरण नसून स्वीकारात्मक स्पष्टीकरण आहे.
१०. असे दिसते की, ह्यावरून बुद्धाचा अहिंसेचा सिद्धान्त हत्या करू नका, असे सांगण्याऐवजी सर्वांवर प्रेम करा असे सांगणारा होता.
११. वरील विधानावरून बुद्धाला अहिंसेचा कोणता अर्थ अभिप्रेत होता हे सहज समजून येईल.
१२. जीवहत्येची इच्छा व जीवहत्येची आवश्यकता ह्यांमध्ये बुद्ध फरक करीत असे, हे स्पष्ट होते.
१३. ज्या ठिकाणी जीवहत्या करण्याची आवश्यकता असते त्या ठिकाणी त्याने जीवहत्येला प्रतिबंध केला नाही.
१४. ज्या ठिकाणी जीवहत्येची इच्छा ह्याशिवाय जीवहत्येला कारण नव्हते त्या ठिकाणी त्यांनी जीवहत्येला प्रतिबंध केला.
१५. भगवान बुद्धाच्या अहिंसा सिद्धान्ताचा असा अर्थ लावल्यास वैचारिक गोंधळ उत्पन्न होणार नाही.
१६. हा सिद्धान्त चांगला भक्कम आणि सर्वांस मान्य होण्याजोगा नैतिक सिद्धान्त आहे.
१७. ही गोष्ट खरी की, जीवहत्येची आवश्यकता आहे की नाही याचा निर्णय तो व्यक्तीवर सोपवितो. परंतु नाही तरी हा निर्णय दुसर्या कुणावर कसा सोपविता येणार? माणसाच्या अंगी प्रज्ञा ( शहाणपण ) असते आणि त्याने तिचा उपयोग केला पाहिजे.
१८. जीवहत्येची आवश्यकता वा अनावश्यकता यामध्ये व्यवच्छेदक रेषा नीतिमान माणसाला ओढता येते एवढा विश्वास त्याच्यावर ठेवला पाहिजे.
१९. ब्राम्हणी धर्मात हिंसेची इच्छा आहे.
२०. जैन धर्मात कधीही हिंसा न करण्याची इच्छा आहे.
२१. भगवान बुद्धाची अहिंसा हे त्याच्या मध्यम मार्गास धरून आहे.
२२. दुसर्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे बुद्धाने तत्व ( Principle ) आणि नियम ( Rule ) यांत भेद केलेला आहे. त्याने अहिंसेला नियमाचे रूप दिले नाही. ते एक तत्व किंवा जीवनाची पद्धती म्हणून त्याने तिचे विवेचन केले आहे.
२३. आणि असे करण्यात तो अत्यंत शहाणपणाने वागला यात संशय नाही.
२४. तत्वामध्ये तुम्हाला तदनुसार वर्तन करण्याचे स्वातंत्र्य असते, नियमांत नसते. नियम तुम्हाला मोडतो अथवा तुम्ही नियमाला मोडता.

## संसरण

# १. आत्म्याचा एका देहातून दुसर्या देहात प्रवेश *(संसरण)*

१. भगवान बुद्धाने पुनर्जन्म प्रवचिला आहे; परंतु त्याने आत्म्याचे संसरण ( एका देहातून दुसर्या देहात प्रवेश ) प्रवचिले नाही.
२. भगवान बुद्धानी दोन परस्परविरोधी सिद्धान्तांचे प्रवचन केले, असे त्यांच्यावर दोषारोपण करणारे काही कमी

लोक नव्हते.

३. असे टीकाकार प्रश्न करीत की, ‘संसरणाशिवाय पुनर्जन्म कसा शक्य आहे?

४. ते म्हणत, ‘आणि इथे तर संसरणाशिवाय पुनर्जन्माची गोष्ट केली आहे. हे संभवनीय तरी आहे काय?’

५. ( परंतु बुद्धाच्या सिद्धान्तात ) परस्परविरोधी असे काहीच नाही. संसरणाशिवाय पुनर्जन्म शक्य आहे.

६. हे सर्व नागसेनाने राजा मिलिंदाला दिलेल्या उत्तरात चांगल्या प्रकारे स्पष्ट होते.

७. बेक्ट्रियाचा राजा मिलिंद याने नागसेनाला विचारले, ‘भगवान बुद्ध संसरण मानीत होते काय?’

८. नागसेनाने उत्तर दिले, ‘होय.’

९. ‘ह्यामध्ये परस्परविरोध नाही काय?’

१०. नागसेन-‘नाही.’

११. ‘आत्म्याशिवाय पुनर्जन्म संभवनीय आहे काय?’

१२. नागसेन – ‘अर्थात; निश्चित शक्य आहे.’

१३. ‘हे कसे शक्य आहे, हे समजावून सांग बरे?’

१४. ‘नागसेन, जिथे संसरण नाही तिथे पुनर्जन्म कसा शक्य आहे?’ राजाने विचारले.

१५. ‘हो शक्य आहे.’

१६. ‘कसे शक्य आहे हे उदाहरणाने स्पष्ट कर.’

१७. ‘राजा, समज, माणसाने एक दिवा दुसर्या दिव्याने पेटवला तर असे म्हणता येईल काय की, पहिल्या दिव्याने दुसर्या जागी संसरण केले?’

१८. ‘अर्थात नाही.’

१९. ‘राजा, त्याप्रमाणे संसरणाविना पुनर्जन्म शक्य आहे.’

२०. ‘ह्याची अधिक उदाहरणे देऊन स्पष्ट कर बरे.’

२१. ‘बालपणी आपल्या गुरूपासून शिकलेली एखादी कविता, हे राजा, तुला आठवते काय?’

२२. ‘होय, आठवते!’

२३. ‘तर मग त्या कवितेचे गुरुमुखापासून संसरण होऊन ती तुमच्या मुखात आली काय?’

२४. ‘अर्थात नाही.’

२५. ‘याप्रमाणेच संसरणाविना पुनर्जन्म होतो.’

२६. ‘वा, छान! नागसेन!’

२७. ‘नागसेन, आत्मा अशी काही चीज आहे काय?’

२८. ‘यथार्थ दृष्टीने पाहिले असता, राजा, आत्मा अशी काही चीज नाही.’

२९. ‘वा, छान! नागसेन!’

## २. गैरसमजुतीचे कारण-

१. भगवान बुद्ध जो उपदेश करीत तो ऐकणारा श्रोतृवृंद भिक्खुंचा असे.

२. कोणत्याही एका विषयावर भगवान बुद्धाचे म्हणणे काय आहे ते भिक्खुंनीच लोकांपर्यंत पोहोचविले.

३. लेखनकला अद्यापि विकसित झाली नव्हती. त्यामुळे भिक्खुंनी जे ऐकले ते पाठ करुन ठेवावे लागे. प्रत्येक भिक्खूने जे काही ऐकले ते जसेच्या तसे पाठ करुन ठेवण्याची त्यानी काळजी घेतली नाही. परंतु असे काही भिक्खू होते त्यांनी ते पाठ करून ठेवणे हा आपला व्यवसायच केला. त्यांना भणक म्हणत.

४. बौद्ध त्रिपिटक आणि अट्ठकथा हे साहित्य समुद्रासारखे विशाल आहे. ते सर्व पाठ करणे म्हणजे असाधारण काम होते.

५. पुष्कल वेळा भगवान बुद्धाने जो उपदेश केला त्याचे वृत्तांत-कथन यथातथ्य झाले नाही.

६. भगवान बुद्धांच्या जीवनकाळी त्यांच्या उपदेशाचे गैर कथन झाल्याच्या गोष्टी त्यांच्या निदर्शनास आल्या होत्या.

७. उदाहरण म्हणून अशा पाच स्थळांचा उल्लेख करता येईल. पहिला उल्लेख 'अलग द्दुपम' सुत्तात आहे. दुसरा 'महाकम्मविभाग' सुत्तात, तिसरा 'कण्णकट्ठल' सुत्तात, चौथा 'महातण्हासंखय' सुत्तात, आणि पाचवा 'जीवन' सुत्तात.

८. अशा प्रकारे तथागताच्या उपदेशाचे गैर निवेदन कदाचित अनेक स्थळी झालेले असावे. कारण भिक्खु भगवान बुद्धापाशी जाऊन अशा प्रसंगी, आम्ही काय करावे, असे विचारताना आढळतात.

९. 'कर्म' आणि 'पुनर्जन्म' ह्या विषयासंबंधी विशेषत: बुद्धोपदेशाचे निवेदन अनेक वेळा वस्तुस्थितीस सोडून झालेले आहे.

१०. कर्म आणि 'पुनर्जन्म' ह्या विषयाच्या सिद्धान्तांना ब्राम्हणी धर्मातही स्थान आहे. ह्याचा परिणाम असा झाला की, ब्राम्हणी सिद्धान्त सहजगत्या बौद्ध धम्मात घुसडता आले.

११. यासाठी त्रिपिटकात जे बुद्धवचन म्हणून मानले गेले आहे ते बुद्धवचनच आहे असे मानताना फार सावधगिरी राखली पाहिजे.

१२. यासंबंधी एक कसोटी विद्यमान आहे.

१३. भगवान बुद्धाच्या बाबतीत एक विधान निश्चितपणे करता येते की, बुद्धीला विसंगत आणि तर्काला सोडून आहे ते ते बुद्धाचे नव्हे. म्हणून इतर गोष्टी यथायोग्य असून जे जे बुद्धीला व तर्काला धरून असे ते ते बुद्धवचन मानायला प्रत्यवाय नाही.

१४. दुसरी गोष्ट अशी की, जी चर्चा मनुष्याच्या कल्याणाला पोषक नाही अशा चर्चेच्या फंदात भगवान बुद्ध कधीच पडत नाहीत. म्हणून जे जे माणसाच्या कल्याणाला पोषक नाही ते ते बुद्धाच्या नावावर खपविले जात असले तरी वस्तुत: ते बुद्धवचन म्हणून मानता येणार नाही.

१५. तिसरीही एक कसोटी आहे. ती ही की, भगवान बुद्धांनी ज्या विषयासंबंधी ते निश्चित आहेत, आणि ज्या विषयासंबंधी ते निश्चित नाहीत अशी विषयांची दोन प्रकारांत वर्गवारी केली होती. जे विषय पहिल्या वर्गात पडतात त्यांच्यासंबंधी त्याने आपले विचार निश्चयात्मक व अंतिम अशा रूपाने मांडले आहेत. जे विषय दुसर्या वर्गात पडतात त्यासंबंधीही त्याने आपले विचार व्यक्त केले आहेत. परंतु ते तात्पुरते (म्हणजे बदलूही शकतात. )

१६. ज्या तीन प्रश्नांसंबंधी संदेह अथवा मतभेद आहेत त्या विषयांबाबत भगवान बुद्धाचे विचार काय होते हे ठरविताना त्या चर्चेच्या वेळी वरील तिन्हीही कसोट्या लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

# भाग तिसरा: बौद्ध जीवन मार्ग

## १. सत, असत् आणि पाप

१. शुभ कार्य करीत राहा. अशुभ कर्मात सहयोगी बनू नका. पापकर्म करू नका.
२. हा बौद्ध जीवनमार्ग आहे.
३. माणसाने एकदा शुभ कर्म केले की, परत परत शुभ कर्म करीत राहिले पाहिजे. शुभ कर्म इतके अविरत करीत राहावे की, त्यायोगे अंतकरणातील सर्व इच्छाही शुभ कर्माकडे लागाव्यात. शुभ कर्माचा संचय करीत राहणे सुखकर आहे.
४. शभ कार्य मला साधणार नाही असे म्हणू नका. थेंबाथेंबाने पात्र भरते. थोड्याथोड्या शुभ कर्माने शुभकर्म वाढत राहते.
५. जे केल्यानंतर खंत किंवा खेद वाटत नाही, ज्याचे फळ आनंदाने आणि समाधानाने स्वीकारण्यात येते ते कर्म चांगल्या रीतीने झाले असे समजावे.
६. जे कर्म केल्याने पश्चात्तापाची पाळी येत नाही, ज्याचे फळ आनंदाने आणि समाधानाने स्वीकारता येते ते काम चांगले झाले समजावे.
७. जर मनुष्य शुभ कर्म करीत असेल तर ते त्याने वारंवार करीत राहावे, त्यांत त्याने आनंद मानावा. शुभ कर्माचा संचय आनंदकारक असतो.
८. जोपर्यंत शुभ कर्माला परिपक्वता येत नाही तोपर्यंत सज्जन मनुष्यालाही दुर्दिन भोगावे लागतात; परंतु त्यांचे शुभ कार्य परिपक्व झाले की त्यांना चांगले दिवस दिसू लागतात.
९. 'ते मला बरोबर साधणार नाही' असे माणसाने शुभ कर्मासंबंधी कधीच बोलू नये. थेंब पडून पात्र भरते. सुज्ञ मनुष्य जरी थोडे थोडे शुभ कर्म करीत राहिला तरी परिणामी तो चांगुलपणाने भरून जातो.
१०. चंदन, धूप, कमळ, मधुमालती यांच्या सुगंधापेक्षा शीलाचा (सदाचाराचा ) सुगंध अधिक असतो.
११. धूप आणि चंदनाचा सुवास मंद असतो. परंतु शीलाचा सुवास उच्चपदी दरवळत जातो.
१२. अशुभ हे क्षुद्र समजू नका. ते मजकडून घडणार नाही असे म्हणू नका. थेंबाथेंबाने भांडे भरते. थोडे अशुभ घडता ते वाढत राहते.
१३. ज्याच्या योगाने मागाहून खेद किंवा खंत वाटते आणि ज्याचे फळ स्वीकारताना अश्रु ढाळावे लागतात आणि शोक करावा लागतो असे काम करणे बरे नाही.
१४. जर मनुष्य दुष्टपणे बोलू लागला किंवा वागू लागला तर ज्याप्रमाणे गाडीच्या बैलाच्या खुरामागून गाडीचे चाक धावत असते त्याप्रमाणेच अशा माणसाच्या मागून दुःख धावत राहते.
१५. पापाला अनुसरू नका. या बाबतीत अनवधानी राहू नका. मिथ्या कल्पना उराशी बाळगू नका.
१६. दुर्विचारांचे दमन करून परिपूर्णतेकडे जाण्याची त्वरा करा. जो शुभ कर्मात मागासलेला राहतो त्याचे मन पापामध्ये रममाण होते.

१७. जे कृत्य केले असताना खेद वा खंत वाटते, ज्याचे फळ स्वीकारताना अश्रु ढाळावे लागतात आणि शोक करावा लागतो ते काम करणे इष्ट नव्हे.

१८. पापकर्म करणार्याला सुद्धा जोपर्यंत त्याची पापे पक्व झाली नाहीत तोपर्यंत सुख दिसत राहते. परंतु ज्या वेळी त्याची पापे परिपक्व होतात त्या वेळी त्याला दु:खाशिवाय काहीच दिसत नाही.

१९. अशुभ मजपर्यंत येऊन भिडणार नादी असे बोलत माणसाने अशुभाला कमी लेखू नये. थेंबाथेंबाने भांडे भरते. अगदी अल्प, अल्प दुष्कृत्ये करता करता, मूर्ख मनुष्य पापमय होऊन जातो.

२०. माणसाने आपले विचार अशुभ कर्मापासून परावृत्त करून शुभ कर्मासंबंधी प्रवृत्ती वाढविण्याची त्वरा करावी. जर माणुस शुभ कर्म आचरण्यात आळस करू लागला तर त्याचे मन अशुभामध्ये रममाण होते.

२१. माणसाने एकदा पाप केले तरी त्याने परत परत पाप करू नये आणि पापात आनंद मानू नये. पापाची वाढ ही दु:खकारक होते.

२२. कुशल कर्म करीत जा, अकुशल कर्म करू नका. कुशल कर्मे करणारे इहलोकी धन्यता पावतात.

२३. कामुकतेने दु:ख निपजते. कामुकतेने भय निपजते. कामुकतेपासून मुक्त होतो तो दु:ख आणि भय यांपासून विमुक्त होतो.

२४. भूक हा सर्वांत वाईट असा रोग आहे. संसार हे सर्वांत मोठे दु:ख आहे. हे सत्य उमगले की, निब्बाण हे सर्वश्रेष्ठ सुख वाटू लागते.

२५. ज्याप्रमाणे वज्र एखाद्या मौल्यवान रत्नाचा भंग करते तसे स्वनिर्मित, स्वपोषित पाप कर्त्याचा नाश करते.

२६. ज्याप्रमाणे वृक्षाला वेढणारी लता वृक्षाला खाली ओढते, त्याप्रमाणेच ज्याच्या अंगी अतिशय दुष्टपणा असतो, तो त्याच्या शत्रुलाही आनंद वाटावा अशा अधोगतीला स्वत:ला नेऊन पोहचवितो.

२७. दुष्कृत्ये आणि स्वत:ला मारक ठरणारी कृत्ये माणसाला सहज करता येतात. परंतु जी उपकारक आणि हितकारक कृत्ये असतात ती मात्र करायला कठीण असतात.

## २. लोभ आणि तृष्णा

१. लोभ व तृष्णा यांच्या आहारी जाऊ नका.

२. त्यांच्या आहारी न जाणे हा बौद्ध जीवनमार्ग आहे.

३. धनाचा सारखा वर्षाव होत राहिला तरी कामना शमत नाही. सुज्ञ लोक जाणतात की, कामना ही अशक्य व दु:खकर आहे.

४. जो स्वर्लोकीच्या कामभोगातही आनंद मानीत नाही, जो तृष्णेचा क्षय करण्यात सदैव रत असतो तो सम्यक् सम्बुद्धाचा शिष्य होय.

५. लोभातून दु:ख उत्पन्न होते. लोभातून भय निर्माण होते; लोभापासून पूर्णपणे विमुक्त झाल्याने दु:ख आणि भय यांपासून मुक्तता लाभते.

६. तृष्णेतून दु:ख उत्पन्न होते, तृष्णेपासून भय निर्माण होते. तृष्णेपासून पूर्णपणे विमुक्त झाल्याने दु:ख आणि भय यांपासून मुक्तता लाभते.

७. जो जीवनाचे खरे ध्येय विसरून कामभोगाच्या मागे लागतो आणि अहंकारी बनतो तो ध्यानचिंतनात काळ व्यतीत करणाराचा द्वेष करू लागतो.

८. जवळची कुठलीही वस्तू हरवली तर दुःख वाटते म्हणून माणसाने कशासंबंधीही आसक्ती ठेवू नये. ज्यांना कोणतेही अति प्रिय अथवा द्वेष करण्याजोगे वाटत नाही त्यांना कोणतीच बंधने नसतात.

९. कामभोगापासून दुःख आणि भय उत्पन्न होते. जो कामभोगासक्त नाही त्याच्या वाट्याला भय आणि दुःख येत नाही.

१०. आसक्तीमुळे दुःख आणि भय ही उत्पन्न होतात. जो आसक्तीच्या बंधनातून मुक्त आहे, त्याला दुःख नाही, भय नाही.

११. कामुकतेपासून दुःख उत्पन्न होते. कामुकतेपासून भय उत्पन्न होते. जो कामुकतेच्या बंधनातून मुक्त आहे त्याला दुःख नाही, भय नाही.

१२. लोभापासून दुःख उत्पन्न होते. लोभापासून भय उत्पन्न होते. जो लोभमुक्त आहे त्याला दुःख नाही, भय नाही.

१३. जो शीलवान व प्रज्ञावान आहे, तो न्यायी आणि सत्यवादी आहे. जो आपले कर्तव्य पुरे करणारा आहे अशा पुरुषावर लोक प्रेम करतात.

१४. पुष्कळ दिवस बाहेर लांब प्रवास केल्यानंतर परत घरी आलेल्या पुरुषाचे आप्त, मित्र आणि हितैषी स्वागत करतात.

१५. त्याचप्रमाणे ह्या लोकातून परलोकात गेलेल्या पुण्यात्म्याचे सत्कर्म आप्तेष्टाप्रमाणे त्याचे स्वागत करते.

## ३. क्लेश आणि द्वेष

१. कोणालाही क्लेश देऊ नका व दुसर्यांसंबंधी द्वेषभावना बाळगू नका.

२. हा बौद्ध जीवनमार्ग आहे.

३. ज्याप्रमाणे तेजस्वी घोडा हा चाबकाचा फटकारा अंगावर पडण्याला संधी देत नाही, त्याप्रमाणे लोकांना आपली निंदा करायला संधी देत नाही असा या जगात दोषरहित पुरुष कोण आहे?

४. श्रद्धा, शील, वीर्य, समाधी, सत्यशोध, विद्या आणि आचरण यांची पूर्तता आणि जागरूकता यांच्या योगाने महान दुःखाचा अंत करा.

५. क्षमा परमतप आहे. निर्वाण परमपद आहे असे बुद्ध सांगतात. दुसर्याची हिंसा करणारा व दुसर्यांना त्रास देणारा प्रव्रजित खरा श्रमण होऊ शकत नाही.

६. कोणाचीही निंदा न करणे, कोणालाही क्लेश न देणे व प्रतिमोक्षांच्या नियमांचे पालन करणे हा बुद्धाचा उपदेश आहे.

७. स्वतः हिंसा करू नका किंवा हिंसा करणार्या दुसर्या लोकांना साहाय्यही करू नका.

८. जो स्वतः सुखाच्या शोधात आहे, त्याप्रमाणेच जो सुखाची इच्छा करणार्या प्राण्याची हत्या करीत नाही किंवा त्यांना कष्ट देत नाही त्याला सुख प्राप्त होईल.

९. विभग्न झालेल्या घंटेप्रमाणे जो क्रोध जिंकल्यामुळे मूक आहे त्याला निब्बाणपद लाभलेलेच आहे.

१०. जो निष्पाप निरुपद्रवी माणसाला कष्ट देतो त्याला लवकरच कष्ट करण्याची पाळी येते.

११. जो क्षमारूप वस्त्रपरिधान केल्यामुळे स्तब्ध, शांत, संयत आणि शुद्धाचरणी आहे, जो दुसर्याचे दोष काढत बसत नाही तो खरोखर श्रमण अथवा भिक्खू होय.

१२. चाबकाचा फटकाराही अंगाला लागू नये याची जसा तेजस्वी घोडा काळजी घेतो, त्याप्रमाणे या जगात आपल्याल्या दुसर्याचा शब्द लागू नये म्हणून आपल्या आचरणाचा, लज्जे ने संयम करणारा असा या जगात एक तरी मनुष्य आहे काय?

१३. जर माणसाने निरुपद्रवी, शुद्धाचरणी आणि निष्पाप मनुष्याला उपद्रव केला तर ज्याप्रमाणे वार्यावर फेकलेली धूळ फेकणार्यावरच येऊन पडते त्याप्रमाणेच त्या माणसाला त्या उपद्रवाचा दुष्परिणाम भोगावा लागतो.

## ४. क्रोध आणि वैर

१. मनात क्रोधभावना ठेवू नका. वैरभाव विसरा व आपल्या शत्रूलाही प्रेमान जिंका.

२. हा बौद्ध जीवनमार्ग आहे.

३. क्रोधाग्नी शमन करा.

४. तो मला अपशब्द बोलला, त्याने मला वाईट रीतीने वागविले, त्याने माझ्यावर कुरघोडी केली, मला लुबाडले असे विचार ज्याच्या मनात वावरत असतात, त्याचा क्रोधविकार कधीही शमत नाही.

५. ज्याच्या मनात असे विचार उठत नाहीत, त्याचा क्रोध शांत झालेला असतो.

६. शत्रू शत्रूच्या वाईटावर, द्वेष्टा द्वेष्टचाच्या वाईटावर टपलेला असतो.

७. माणसाने अक्रोधाने क्रोधाला जिंकावे, असाधुत्वाला साधुत्वाने जिंकावे.

८. खरे बोलावे, रागावू नये. मागितल्यानंतर थोडे तरी द्यावे.

९. क्रोध सोडावा, अभिमानाचा त्याग करावा. सर्व बंधनांवर जय मिळवावा- येणेप्रमाणे जो नामरूपाविषयी अनासक्त असतो असा अपरिग्रही दुःख भोगत नाही.

१०. वाढत्या क्रोधाला जो बहकलेल्या रथाप्रमाणे थांबवून धरतो, त्यालाच मी खरा सारथी म्हणतो. बाकीचे नुसते लगाम धरणारेच आहेत.

११. ज्यामुळे वैर वाढते, पराजित मनुष्य दुःखात मग्न होऊन बसतो; परंतु ज्याने जयापजयाच्या कल्पनेचाच त्याग केला आहे असा शांत पुरुष सुखाने झोप घेतो.

१२. कामाग्नीसारखा अग्नी नाही आणि द्वेषासारखे दुर्दैव नाही. उपादान स्कंधासारखे दुःख नाही. निर्वाणापेक्षा मोठे सुख नाही.

१३. वैराने वैर कधीही शांत होत नाही. अवैरानेच ते शांत होते; हा सनातन धर्म आहे.

## ५. मनुष्य, मन आणि मनोमल

१. मन घडविते तसा मनुष्य होतो.

२. जो सत् आहे त्याचा शोध मनाला करायला लावणे, हा संस्कार पुण्यमार्गांतील पहिले पाऊल होय.

३. बौद्ध जीवनमार्गाची ही मुख्य शिकवणूक आहे.

४. मनुष्याच्या सर्व व्यवहाराचे उगमस्थान मन आहे. त्याचे सर्व व्यवहार मनःप्रधान आहेत.

५. मनुष्य जर दुष्ट चित्ताने बोलेल किंवा वागेल तर चालत्या बैलगाडीचे चाक बैलाच्या पायाचा पाठलाग करते, त्याप्रमाणे दुःख अशा दुष्ट चित्ताने वागणार्या मनुष्याच्या मागे लागते.

६. मनुष्य जर शुद्ध चित्ताने बोलेल किंवा वागेल तर कधी न सोडणारी मनुष्याची छाया ज्याप्रमाणे त्याच्या बरोबरच असते त्याप्रमाणे सुख सदोदित त्याच्या बरोबर राहते.

७. मन हे ओढाळ, चंचल, दुर्निवार व दुर्धर आहे. बाण करणारा जसा बाणाला सरळ करतो तसा बुद्धिमान पुरुष मनाला, एकाग्र व सरळ करतो.

८. पाण्याबाहेर काढलेली मासोळी ज्याप्रमाणे तडफडते, त्याप्रमाणे माराच्या म्हणजे कामदेवाच्या तावडीतून सुटण्यासाठी मन व्याकुळ असते.

९. ज्याचा निग्रह करणे फार कठीण आहे, जे फार चंचल आहे, जे सदैव सुखासाठी वखवखलेले असते अशा मनाचे दमन करणे फार उत्तम आहे. कारण दमन केलेले मन फार सुखदायक असते.

१०. तू आपल्या स्वतःस एक द्वीप (बेट) बनव. परिश्रमाने चित्तमळ नाहीसा होईल. दोषरहित झाल्यावर तू दिव्य भूमीला पोहोचशील.

११. ज्याप्रमाणे सोनार क्षणाक्षणाने रुप्यातील हिण कणाकणाने जाळून टाकतो त्याप्रमाणे बुद्धिमान मनुष्य क्षणाक्षणाने चित्ताचा मळ थोडा थोडा नाहीसा करतो.

१२. लोखंडापासून निघणारा गंज हा ज्याप्रमाणे लोखंडातून जन्मास येऊन लोखंडाचा नाश करतो त्याप्रमाणेच पापी माणसाचे कर्म त्याला दुर्गतीकडे नेत असते.

१३. सर्वात अतिशय वाईट कलंक म्हणजे अविद्येचा कलंक. भिक्खुंनो, या कलंकाचा त्याग करा आणि निष्कलंक व्हा.

१४. जो मनुष्य कावळयासारखा निर्लज्ज आहे, उचापती करणारा आहे, अपमान करणारा आहे, बेछूट आहे आणि नीच आहे अशा माणसाला जीवन सुकर आहे.

१५. परंतु जो विनम्र आहे, पवित्र-अपवित्र याचा विचार करतो, अनासक्त आहे, शांत आहे, निर्मल आहे अशा बुद्धियुक्त मनुष्याला जीवन कठीण आहे.

१६. जो हिंसा करतो, असत्य भाषण करतो, जो न दिलेले हिरावून घेतो, जो परदारागमन करतो,

१७. आणि जो मनुष्य उन्मादक मद्यपानात मग्न राहातो. तो मनुष्य इहलोकी आपले थडगे खणीत असतो.

१८. माणसा, हे लक्षात ठेव. संयमहीनांची स्थिती चांगली नव्हे; लोभ आणि पापकर्म तुला चिरकाल दुःखात लोटणार नाही याची काळजी घे.

१९. जग आपल्या श्रद्धेप्रमाणे किंवा इच्छेप्रमाणे फळ देत असते, जर मनुष्य दुसर्याला दिलेल्या अन्नपाण्याबद्दल

मनात जळत राहिला तर त्याला दिवसा अथवा रात्री कधीही विश्रांती लाभणार नाही.
२०. परंतु ज्याच्या मनातून ह्या असल्या विचाराचे निर्मूलन झाले आहे त्याला दिवसा आणि रात्री केव्हाही विश्रांती लाभते.
२१. कामासारखा अग्नी नाही आणि लोभासारखा लोंढा नाही.
२२. परदोष हे सहज दिसतात. परंतु स्वतःचे दोष क्वचितच दिसतात. ज्याप्रमाणे धान्याचा तूस पाखडावा, त्याप्रमाणे माणुस आपल्या शेजार्याचे दोष पाखडीत असतो. परंतु ज्याप्रमाणे कपटी जुगारी, अपेशी फासा लपवून ठेवतो त्याप्रमाणेच मनुष्य स्वतःचे दोष लपवीत असतो.
२३. जो मनुष्य परदोषच पाहात राहतो आणि स्वतःचे दोष उघड होताच चिडू लागतो त्याचे दोषविकार वाढतात आणि तो त्या विकारांच्या विनाशापासून दूर दूर जात राहातो.
२४. पापापासून दूर राहा. पुण्य करीत राहा. स्वतःचे विचार हे शुद्ध करीत राहा ही भगवान बुद्धाची शिकवण आहे.

## ६. आपण आणि आत्मविजय

१. जर स्वत:ला स्वत्व असेल तर त्या स्वत्वावर विजय मिळविण्याचा (आत्मविजय ) परिपाठ ठेवावा.
२. हा बौद्ध जीवनमार्ग आहे.
३. मनुष्य हा स्वतःचाच स्वामी आहे. दुसर्या कोणाचा स्वामी असू शकणार? मनुष्य जेव्हा स्वतःचा संयम करू शकतो तेव्हा त्याच्यासारखा स्वामी मिळणे कठीण.
४. जो मुर्ख मनुष्य अर्हत, आर्य, शीलवान माणसाचे शासन उल्लंघितो आणि खोट्या धर्मसिद्धान्ताच्या मागे लागतो, त्याचे ते दुष्कृत्य कथ्थक बोरूच्या फळासारखे त्याच्या स्वत:च्याच विनाशाला कारणीभूत होते.
५. आपणच पाप करतो आणि आपणच त्यामुळे मलीन होतो. आपणच पापाचा त्याग करतो, आपणच आपणाला शुद्ध करू शकतो; शुद्धी आणि अशुद्धी ह्या स्वत:वरच अवलंबून असतात. कोणी दुसर्याला शुद्ध करू शकत नाही.
६. जो केवळ सुखोपभोगांसाठी हपापलेला आहे, जो असंयमित, खादाड, आळशी आणि दुबळा आहे, तो आपल्याच आतताईपणाने नाश पावेल. ज्याप्रमाणे वार्याने दुबळे झाड नाश पावते त्याप्रमाणे.
७. ज्याच्या ठिकाणी भोगलालसा नाही, ज्याने इंद्रियदमन केलेले आहे, जो खाण्यात नेमस्त असतो, जो विश्वासार्ह व बळकट असतो तो ज्याप्रमाणे वज्रकायपर्वत वार्याने उलथून पडत नाही त्याप्रमाणे तो पतन पावत नाही.
८. जर माणसाला स्वत:संबंधी प्रेम असेल तर त्याने स्वतःवर दक्षतेने लक्ष ठेवले पाहिजे.
९. प्रथम स्वत:ची सन्मार्गावर स्थापना करावी. मग दुसर्याला त्याचा उपदेश करावा. शहाण्या माणसाने स्वत:ला दोष लागेल असे वर्तन करता कामा नये.
१०. स्वतःचे दमन करणे हे फार कठीण आहे असे म्हणतात. जर माणूस दुसर्याला ज्याप्रमाणे उपदेश करतो त्याप्रमाणे स्वतः वागला तर असा आत्मसंयमी हाच खरा दुसर्यावर स्वामित्व गाजविणारा होऊ शकतो.
११. स्वतः केलेल्या पापाबद्दल स्वतःलाच भूर्दंड भरावा लागतो. माणुस स्वतःला स्वतःच शुद्ध करू शकतो. तेथे दुसरा कोणी शुद्ध करण्याला येत नाही.

१२. युद्धांत शेकडो वीरांना जिंकणारा परमवीर नसून, जो आत्मविजय मिळवितो तोच परमवीर होय.
१३. प्रथम स्वतःचीच सन्मार्गावर स्थापना करावी व मग दुसर्याला त्याचा उपदेश करावा. शहाण्या माणसाने स्वतःला दोष लागेल असे वर्तन करता कामा नये.
१४. स्वतःचे दमन करणे हे फार कठीण आहे असे म्हणतात. जर माणुस दुसर्याला ज्याप्रमाणे उपदेश करतो त्याप्रमाणे स्वतः वागला तर असा आत्मसंयमी हाच खरा दुसर्यावर स्वामित्व गाजविणारा होऊ शकतो.
१५. मनुष्य हा स्वतःच स्वतःचा संरक्षक असतो. त्याला दुसरा कोण संरक्षक असणार? जो स्वतःच स्वतःचे रक्षण करू शकतो त्याला स्वत:सारखा दुसरा संरक्षक मिळणे दुर्लभ आहे.
१६. जर माणसाला स्वत:सबंधी प्रेम असेल तर त्याने स्वत:वर दक्षतेने लक्ष ठेवले पाहिजे.
१७. स्वतः केलेल्या पापाबद्दल स्वतःलाच भूर्दंड भरावा लागतो. माणुस स्वतःला स्वतःच शुद्ध करू शकतो. तेथे दुसरा कोणी शुद्ध करण्याला येत नाही.
१८. मनुष्य हा स्वतःच स्वत:चा संरक्षक असतो. त्याला दुसरा कोण संरक्षक असणार? जो स्वत:च स्वत:चे संरक्षण करू शकतो त्याला स्वत:सारखा दुसरा संरक्षक मिळणे दुर्लभ आहे.

## ७. प्रज्ञा, न्याय आणि सत्संगती

१. बुद्धिमान व्हा, न्यायी व्हा, आणि सत्संगती धरा.
२. हा बौद्ध जीवनमार्ग आहे.
३. जो मनुष्य काय वर्ज्य करावे हे तुम्हाला दाखवितो, जो तुमच्या दोषाबद्दल तुम्हाला वाक्ताडन करतो आणि जो बुद्धिमान आहे अशा माणसाच्या मागून, ज्याप्रमाणे गुप्त धन दाखविणार्या माणसामागून तुम्ही जाता त्याप्रमाणे तुम्ही जात रहा. अशा सत्पुरुषांचे अनुयायित्व हे तुमचे वाईट करणार नाही. भले करील.
४. जो चुकल्यास रागे भरतो; जो शिकवितो, अनुचित करण्याचा प्रतिबंध करतो तो सुजनांना प्रिय आणि दुर्जनांना अप्रिय वाटतो.
५. पापी आणि नीच मनुष्याची संगत करू नका. सदाचारी पुरुषाची मैत्री करा. श्रेष्ठ पुरुषाची मैत्री करा.
६. जो धर्मामृताचे सेवन करतो त्याचे मन गंभीर असते आणि जीवन सुखी असते. सज्जन हे श्रेष्ठ पुरुषाने उपदेशिलेल्या धर्माने आनंद पावतात.
७. पाटकार माळी कालव्यातून आपल्या इच्छेप्रमाणे पाण्याला वळण देतो, बाणाकार वाणाला नीट वळवितो, सुतार लाकडाच्या ओंडक्याला वळण देतो, त्याप्रमाणे शहाणे लोक स्वत:ला नियमानुसार वागण्याचे वळण देतात.
८. ज्याप्रमाणे भरभक्कम कातळ हा वार्याने कंप पावत नाही. त्याप्रमाणे शहाणी माणसे निंदा अथवा स्तुतीने विचलित होत नाहीत.
९. ज्याप्रमाणे खोल आणि निष्कंप तळे शांत दिसते त्याप्रमाणे धम्म श्रवणानंतर शहाणी माणसे शांत, गंभीर बनतात.
१०. सत्पुरुष कोणत्याही परिस्थितीत दक्षतेने चालतात. ते इच्छातृप्तीच्या निमित्ताने बोलत नसतात. सुखाचा

स्पर्श होवो अथवा दुःखाचा स्पर्श होवो ते कधीही आनंदाने उन्नत झाले किंवा निराशेने पछाडलेले दिसत नाहीत.

११. जोपर्यंत पापाची घडी भरलेली नाही तोपर्यंत मूर्ख माणसाला पाप हे मधासारखे गोड वाटते. परंतु जेव्हा पाप पक्व होते तेव्हा मूर्ख माणसाला दुःखात बुडून जावे लागते.

१२. मूर्ख मनुष्याला आपण पाप केव्हा करीत आहोत हे कळत नाही; परंतु दुष्ट मनुष्य मात्र आपल्याच दुष्कृत्याने अग्नीप्रमाणे जळत असतो.

१३. जो जागा आहे त्याला रात्र प्रदीर्घ वाटते. जो थकलेला आहे त्याला एक मैलाचा पल्ला लांबलचक वाटतो. ज्याला धर्माचे ज्ञान नाही अशा मूर्खाला जीवनही प्रदीर्घ वाटते.

१४. जीवनप्रवाशाला स्वतःहून श्रेष्ठ किंवा स्वतःच्या योग्यतेचा पुरुष भेटला नाही तर त्याने निग्रहाने एकलेपणानेच प्रवास करावा. परंतु मूर्खाचा सहवास मात्र कधीही करु नये.

१५. ही माझी दौलत, हे माझे पुत्र, ह्या विचाराने मूर्ख मनुष्याला सारखी पीडा होत असते. तो स्वतःचाच स्वामी नसतो; तर मग स्वतःच्या दौलतीचा आणि पुत्रांचा स्वामी तो कसा होणार?

१६. मूर्ख ज्या प्रमाणात स्वतःचा मूर्खपणा ओळखतो, त्या प्रमाणात तो शहाणा असतो; परंतु जो मूर्ख स्वतःला शहाणा समजतो तो खरोखर पुरा मूर्ख होय.

१७. मूर्ख मनुष्याला आयुष्यभर सत्यंगती लाभली तरी ज्याप्रमाणे पळीला आमटीची चव कळत नाही त्याप्रमाणे त्याला लाभलेल्या सत्संगतीचे सत्य समजत नाही.

१८. बुद्धीमान माणसाला एक पळभर शहाण्या माणसाचा सहवास लाभला तरी ज्याप्रमाणे जिभेला आमटीची चव कळते त्याप्रमाणे त्याला तत्काळ सत्संगतीचे सत्य कळून आल्याशिवाय राहणार नाही.

१९. अल्पबुद्धीचे मूर्ख हे स्वतःचेच शत्रू असतात; कारण ते दुष्कृत्ये करतात आणि त्याची कटु फळे त्यांना चाखावी लागतात.

२०. ज्या कर्माबद्दल पश्चात्ताप करावा लागतो आणि ज्याचे फळ रडत भोगावे लागते ते कर्म नीट झाले नाही असेच समजावे.

२१. जे कर्म केले असता पश्चात्ताप करावा लागत नाही आणि ज्याचे फळ आनंदाने भोगता येते, ते कर्म चांगल्या रीतीने झाले आहे असे समजावे.

२२. जोपर्यंत दुष्कर्माचे फळ भोगावे लागत नाही तोपर्यंत मूर्खाला ते मधासारखे गोड वाटते; परंतु ते कर्म जेव्हा पतन होते तेव्हा मूर्खाला दुःख भोगावे लागते.

२३. दुष्कर्म जगतप्रसिद्ध झाले की ते दुःखात पर्यवसित होते आणि ते करणार्या मूर्खाचे सुदैव नष्ट होते. फार काय ते त्याचा शिरच्छेदही करते.

२४. मूर्खाला खुशाल खोटी प्रसिद्धी, भिक्खूमध्ये अग्रमान, विहारात स्वामित्व, लोकांमध्ये सन्मान याची खुशाल हाव धरू द्या.

२५. केस पिकले म्हणून काही मनुष्य वडील ठरत नाही. त्याचे वय कितीही होऊ द्या. त्याला लोक पोकळ डौलाचा म्हातारा म्हणुनच म्हणणार.

२६. जो सत्यवान, सद्गुणी, कारुणिक, संयमी, नेमस्त, शुद्धाचरणी आणि शहाणा आहे त्यालाच लोक वडील समजतात.

२७. कितीही बहुभाषी असला, वर्णाने कितीही सुंदर असला तरीही जो मत्सरी, कृपण, अप्रामाणिक आहे तो सन्मानास पात्र ठरत नाही.

२८. ज्याच्या ठिकाणी हे सर्व दुर्गुण नाहीत, ज्याचे दुर्गुणाचे आमूलाग्र उच्चाटन झालेले असते, जो दोषमुक्त आणि शहाणा असतो तोच सन्माननीय होय.

२९. जो मनुष्य एखादी गोष्ट हौसेने तडीस नेतो, जो न्यायी नव्हे, उलट जो सत् आणि असत् यात भेद करतो, जो स्वतः पंडित असून इतरांना मार्ग दर्शवितो, जो स्वतः धर्मरक्षक असून हिंसेऐवजी बुद्धीने आणि धर्माने मार्गदर्शन करतो त्यालाच न्यायी पुरुष म्हणतात.

३०. फार बोलतो एवढ्यावरूनच कोणीही पंडित ठरत नाही. जो क्षमाशील आहे, जो द्वेष आणि भय यांच्यापासून मुक्त झाला आहे तोच पंडित होय.

३१. फार बोलतो एवढ्यावरूनच कोणी धम्माचा आधारस्तंभ ठरत नाही. जरी माणसाचे ज्ञान अल्प असले तरी जो धम्माला साक्षात पाहतो, जो धम्माची कधीही हेळसांड करीत नाही तोच धम्माचा आधारस्तंभ असतो.

३२. माणसाला दूरदर्शी, शाहणा, संयमी सहचारी भेटला तर त्याने त्याचा सहवास करावा. त्याच्याबरोबर आल्या संकटावर मात करावी, आनंदाने परंतु विचारीपणाने त्याची संगत धरावी.

३३. जर माणसाला दूरदृष्टीचा, शहाणा, संयमी सोबती लाभला नाही तर त्याने जसा एखादा राजा जिंकलेला प्रदेश मागे सोडून वनराजाप्रमाणे एकटाच पुढे जातो, त्याप्रमाणे त्याने आपला जीवनपथ एकट्यानेच आक्रमावा.

३४. एकान्त पत्करला; परंतु मूर्खाची संगत नको. पाप करू नये आणि अगदी थोडक्याच इच्छा ठेवून वनराजाप्रमाणे एकटेच आपला जीवनपथ आक्रमीत राहावे.

३५. प्रसंग पडेल तर मित्र सुखदायक आहेत. कारण काही असले तरी भोगसामग्री सुखदायक आहे. कारण काही असले तरी सत्कर्म हे सुखदायक आहे. मरणाची

घडी जवळ आली असताना सत्कर्म सुखदायक आहे. दुःखाचा त्याग सुखदायक आहे.

३६. जगात मातेची अवस्था सुखकर आहे; पित्याची अवस्था सुखकर आहे. श्रमणाची अवस्था सुखकर आहे.

३७. वार्धक्यातही टिकणारा सद्गुण सुखदायक आहे. खोलवर मुळे जाऊन दृढ झालेली श्रद्धा सुखकर आहे. ज्ञानार्जन सुखदायक आहे. पापत्याग सुखदायक आहे.

३८. मूर्खाचा सहवास दीर्घकाळ दुःख देतो. शत्रूच्या सोबतीप्रमाणे मूर्खाची सोबत दुःखदायक आहे. आप्तेष्टांच्या भेटीप्रमाणे सत्संगतीही सुखकर आहे.

३९. म्हणून माणसाने शहाण्या, बुद्धिमान, पंडित, क्षमाशील, कर्तव्यदक्ष श्रेष्ठाच्या मार्गाने जावे. ज्याप्रमाणे चन्द्र नक्षत्रांच्या मार्गाने जातो त्याप्रमाणे अशा प्रज्ञावान् सुजनांचे अनुयायी व्हावे.

४०. डामडौल, प्रीती आणि आसक्ती ह्यांच्या उपभोगाची कास धरू नका. ज्याच्या ठिकाणी कळकळ आहे त्याच्या वाट्याला पुरेसा आनंद येतो.

४१. आंतरिक तळमळीने पंडित जेव्हा अंगच्या गर्वाचा निरास करतो तेव्हा तो शहाणपणाच्या एकाहून एक उंच अशा शिखरावर चढून मूर्खाकडे तुच्छतेने पाहात असतो. दुःखापासून विमुक्त झालेल्या माणसांना पाहात असतो, त्याप्रमाणेच दुःखात मग्न असलेल्या जनसंमर्दाकडे दृष्टिक्षेप करीत असतो.

४२. अविचारी माणसात विवेकशील, निद्रिस्तात जागृत असा तो शहाणा मनुष्य दुबळयांना मागे सारून पुढे सरत असतो.

## ८. विवेकशीलता आणि एकाग्रता

१. प्रत्येक बाबतीत विवेक ठेवीत जा. सावधान राहात जा. आस्थायुक्त आणि धैर्यशील राहात जा.
२. हा बौद्ध जीवनमार्ग होय.
३. आपण जे काही आहोत ते आपल्या विचाराचा परिणाम आहे. ते सर्व आपल्या विचारावर अधिष्ठित आहे आणि आपल्या विचाराचेच बनलेले आहे. जर मनुष्य दुर्विचाराने बोलू लागेल, कृती करु लागेल तर दुःख त्याचा पाठलाग करीत राहते. शुद्ध विचाराने बोलले आणि चालले तर सौख्य चालून येते. म्हणून शुद्ध विचारांना अतिशय महत्व आहे.
४. अविचारी बनू नका. आपल्या विचारावर लक्ष असु द्या. कर्दमात रुतलेला हत्ती ज्याप्रमाणे आपली मोकळीक करण्यासाठी झटतो त्याप्रमाणे असत्मार्गापासुन आपली मुक्तता करा.
५. शहाण्या माणसांनी आपल्या विचाराची राखण करावी. कारण ते कळायला कठीण, अतिशय धूर्त असून, जिकडे वाट मिळेल तिकडे ते सैराटासारखे धावत राहातात. सुरक्षित विचार हे सौख्यदाते आहेत.
६. कशा तरी शाकारलेल्या घरात पावसाचे पाणी गळत राहाते त्याप्रमाणे चिंतरहित मनात विकार प्रवेश करतात.
७. ज्याप्रमाणे व्यवस्थित शाकारलेल्या घरात पावसाचे पाणी गळत नाही त्याप्रमाणे चिंतनयुक्त मनात विकाराला प्रवेश लाभत नाही.
८. माझे मन एका काळी वाट मिळेल तिकडे आणि वाटेल तसे भरकटत होते; परंतु ज्याप्रमाणे माहूत अंकुशाने क्षुब्ध गजाला वळवीत असतो त्याप्रमाणे मी आता आपल्या मनावर स्वामित्व गाजवीत आहे.
९. दुर्निवार आणि सैराट अशा मनाला काबूत ठेवणे ही उत्तम गोष्ट आहे काबूत ठेवलेले मन सुखाचे उगमस्थान आहे.
१०. दूरवर भटकणार्या मनाला लगाम घालणारे काम-बंधनापासून विमुक्त होतात.
११. जर माणसाची श्रद्धा अचल नसली, जर सद्धर्म त्यास अज्ञात असेल, आणि जर त्याची मनःशान्ती बिघडलेली असेल तर त्याची प्रज्ञा दोषरहित असु शकत नाही.
१२. एक द्वेष्टा दुसर्या द्वेष्टट्याला किंवा एक शत्रू दुसर्या शत्रूला जितका उपद्रव देतो त्यापेक्षा वाईट मार्गाकडे वळलेले माणसाचे मन अधिक उपद्रव निर्मिते.
१३. आईबाप, आप्तेष्टांपेक्षाही चांगल्या मार्गाकडे वळलेले मन आपले अधिक
हित करते.

## ९. जागरूकता, कळकळ आणि धर्यै (अप्रमाद आणि वीयर्य)

१. शहाणा मनुष्य आपल्या जागरूकतेने निष्काळजीपणा बाजूला सारून प्रज्ञेच्या शिखरावर चढतो आणि दुःखविमुक्त होऊन तो तेथून दुःखात सापडलेल्या मानवजातीकडे पाहात असतो. शहाण्या माणसाच्या दृष्टीस मूर्ख हा पर्वतशिखरावरून दरीतील दिसणार्या माणसासारखा आहे.

२. निष्काळजी लोकांमध्ये जागरूक, निद्रितांमध्ये जागृत असा तो शहाणा मनुष्य उमदा घोडा जसा अडेलतट्टूला मागे टाकून पुढे जात असतो तशी प्रगती करीत असतो.

३. निष्काळजीपणाच्या आधीन होऊ नका. कामभोगापासून दूर राहा. जागरुक मनुष्य चिंतनशील असतो.

४. दक्षता ( अप्रमाद ) अमर आहे. अविचार (प्रमाद ) मृत्यूचे पद आहे. अप्रमादी हे कधीच मरत नाहीत. उलट प्रमादी हे मृतवतच आहेत.

५. दुसरा हेतू कितीही मोठा असला तरी आपल्या ठरविलेल्या हेतूपासून विचलित होऊ नये. एकदा ध्येय हाताशी लागले की निग्रहाने ते धरून ठेवा.

६. सावधान-चित्त राहा. आळस सोडा. सम्यक् मार्गाचा अवलंब करा. जो या जगात सम्यक् मार्गाचा अवलंब करतो तो खरोखरच सुखी असतो.

७. आळशीपणा म्हणजे अपयश, सुस्तपणा म्हणजे अपवित्रता. सतत प्रयत्न आणि सम्यक् दृष्टी ह्यांच्या साहाय्यानेन शरिरात घुसलेला आळशीपणा-हा विषारी बाण उपटून काढा.

८. प्रमादात फसू नका. विषयोपभोगात आसक्त राहू नका. अप्रमत्त बना व ध्यानात मग्न राहून विपुल सुख संपादन करा.

९. जो अप्रमत्त आणि जागरूक आहे, स्मृतिमान आहे, सुविचारपूर्वक काम करणारा आहे; जो संयमी आहे, जो विचारपूर्वक आचरण करणारा आहे व अप्रमत्त आहे-अशा पुरुषाचे यश सारखे वाढत असते.

## १०. दुःख आणि सुख; दान आणि कर्म

१. दारिद्र्य हे दुःखाचे उगमस्थान आहे.

२. परंतु दारिद्र्यनाशाने सुख लाभेलच असे नाही.

३. सुख लाभते ते उच्च राहणीवर अवलंबून नसून ते उच्च संस्कृतीवर अवलंबून आहे.

४. हा बौद्ध जीवनमार्ग होय.

५. क्षुधा हा एक भयंकर रोग आहे.

६. आरोग्य ही सर्वश्रेष्ठ देणगी आहे. समाधान ही सर्वश्रेष्ठ संपत्ती आहे. विश्वास हे सर्वश्रेष्ठ नाते आहे आणि निर्वाण हे सर्वश्रेष्ठ सुख आहे.

७. जे आपला द्वेष करतात त्यांचा द्वेष न करता आपण सुखाने राहायला शिकले पाहिजे.

८. रुग्णाईत माणसांत आरोग्य राखून आपण सुखाने राहायला शिकले पाहिजे.

९. लोभी माणसांत आपण निर्लोभता ठेवून सुखाने राहायला शिकले पाहिजे.

१०. शेत जसे तणाने नाश पावते त्याप्रमाणे मानवजात दुर्विकाराने नाश पावते. म्हणून वीतराग पुरुषांना दिलेले

दान महान फलदायी होते.
११. शेत जसे तणाने नाश पावते त्याप्रमाणे मानवजात गर्वाने नाश पावते; म्हणून गर्वरहित पुरुषांना केलेले दान महान फलदायक होते.
१२. शेत जसे तणाने नाश पावते त्याप्रमाणे मानव जात विषयोपभोगाने नाश पावते. म्हणून विषयानासक्त पुरुषांना केलेले दान महान फलदायक होते.
१३. धर्मासाठी केलेले दान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. धर्माचे माधुर्य सर्व माधुर्यात श्रेष्ठ आहे. धर्मापासून होणारा आनंद हा सर्व आनंदात श्रेष्ठ आहे.
१४. विजयातून द्वेष उत्पन्न होतो. कारण जित हा दुःखी असतो. जय पराजयाची भावना सोडून जो समाधान वृत्तीत राहतो तो सुखी होतो.
१५. कामासारखा दुसरा अग्नी नाही. द्वेषासारखे चुकीचे निशाण नाही. शरीरासारखे दुसरे दुःख नाही. शान्तीसारखे सुख नाही.
१६. दुसरे काय अपशब्द बोलतात, काय दुष्कृत्ये करतात, काय पूर्ण करतात व काय अपुरे सोडतात यावर दृष्टी ठेवू नका. आपण काय पूर्ण केले आणि काय अपुरे सोडले यावर लक्ष ठेवणे अधिक चांगले.
१७. जे विनयशील आहेत, जे चित्तशुद्धी व्हावी म्हणून इच्छितात, जे अनासक्त आहेत, एकान्तप्रिय आहेत, ज्यांचे आचरण शुद्ध आहे, जे विवेकशील आहेत. त्यांचे जीवन नेहमीच खडतर असते.
१८. तेजस्वी घोड्याला भरधाव धावण्यासाठी चाबकाचा फटकारा लागत नाही. जगामध्ये त्या तेजस्वी घोड्यासारखा कोणी आहे काय? की, जो दोषास्पद नाही, ज्याला ठपका लावण्याची वेळ पडलेली नाही.
११. कोणाशीही कठोरतेने बोलू नका. दुसर्याशी जसे बोलाल तसे प्रत्युत्तर येईल. क्रोधयुक्त भाषण दुःखकारक आहे आणि आघात केला तर प्रत्याघात होईल.
२०. रथाच्या चाकाला जशी खीळ त्याप्रमाणेच ह्या जीवनाला स्वातंत्र्य, नम्रता, सदिच्छा, निःस्वार्थीपणा आहेत.
२१. हा बौद्ध जीवनमार्ग आहे.

## ११. ढोंग

१. खोटे बोलू नये. खोटे बोलण्यास दुसर्याला प्रवृत्त करू नये. खोटे बोलण्याच्या कृत्याला संमती देऊ नये. सर्व प्रकारचे असत्य भाषण टाळावे.
२. तथागत जसे बोलतात तसे वागतात, तथागत जसे वागतात तसे बोलतात. ते यथा भाषी तथाकारी आणि यथाकारी तथाभाषी असल्यामुळे त्यांना तथागत म्हणतात.
३. हा बौद्ध जीवनमार्ग आहे.

## १२. सम्यक मार्गनुसरण

१. सम्यक् मार्ग निवडा आणि त्यापासून विचलित होऊ नका.
२. मार्ग विपुल आहेत. परंतु सर्वच काही सम्यक् मार्गाकडे नेत नसतात.
३. सम्यक् मार्ग हा केवळ थोडक्यांच्या सुखासाठी नाही. तो बहुजन सुखासाठी आहे.
४. तो प्रारंभी, मध्ये आणि शेवटीही कल्याणप्रद असला पाहिजे.
५. सम्यक् मार्गाचे अनुसरण म्हणजे बौद्ध जीवनमार्गाचे अनुसरण होय.
६. अष्टांगमार्ग हा श्रेष्ठ मार्ग आहे. सर्वश्रेष्ठ सत्यांमध्ये सत्यचतुष्ठ्य आहे, श्रेष्ठ वैषयिक अनासक्ती हा सर्वश्रेष्ठ गुण आहे आणि ज्याला हे पाहण्याची दृष्टी आहे तो श्रेष्ठ पुरुष होय.
७. प्रज्ञाशुद्धीचा हा एकमेव मार्ग आहे. दुसरा नाही, याच मार्गाने जा.
८. जर तुम्ही या मार्गाचे अनुकरण केले तर तुमच्या दु:खाचा निरास होईल. दु:खकंटक कसे काढून टाकता येतील हे कळल्यावर, मी या मार्गाचा उपदेश केला.
९. तथागत हे केवळ पथ-दर्शक आहेत. ( स्वोन्नतीचा ) प्रयत्न ज्याचा त्याने स्वतः करावयाचा असतो.
१०. सर्व सृष्टपदार्थ हे विनाशाधीन आहेत, हे जो ओळखतो त्याला दुःख विचलित करू शकत नाही.
११. सर्व रूपे अनित्य आहेत. जो हे ओळखतो त्याला दु:ख स्पर्श करीत नाही.
१२. जेव्हा जागे व्हायला पाहिजे तेव्हा जो जागा होत नाही, जो तरूण आणि बळकट असूनही सुस्तपणाच्या आहारी गेलेला असतो, ज्याची इच्छा आणि विचार झोपी गेलेले असतात, त्या आळशी मनुष्याला कधीही ज्ञान होणार नाही.
१३. भाषणात सावध असणे, विचारात संयम राखणे, कायेने कोणतेही पाप न करणे, हे काया-वाचा-मनसा आचरावयाचे तीन मार्ग अवलंबिल्यावर प्रज्ञावंतांनी निर्देशिलेल्या मार्गाने माणसाला जाता येते.
१४. वास्तविक ज्ञानाने लाभ होतो आणि त्याच्या अभावाने नाश होतो. लाभाचे आणि नाशाचे हे दुहेरी मार्ग ओळखून ज्ञान वाढेल असा माणसाने उद्योग करावा.
१५. शरदऋतूतील कमळाप्रमाणे माणसाने आत्मप्रीती खुडून काढावी. शान्तीचा मार्ग जवळ करावा. सुगताने निर्वाणाचा मार्ग निर्दिष्ट केला आहे.
१६. अधर्माने वागू नका. अविचाराने जगू नका. दुष्ट सिद्धान्ताचे अनुकरण करू नका.
१७. जागे व्हा. सुस्त पडू नका. सद्गुणाची कास धरा. सद्गुणी इहलोकी सुखी असतात.
१८. जो पूर्वी अविचारी होता आणि नंतर सुविचारी झाला तो घनविमुक्त चन्द्राप्रमाणे जग तेजस्वी करतो.
१९. जो दुष्कृत्ये सोडून सत्कृत्ये करू लागला आहे तो घनविमुक्त चन्द्राप्रमाणे जगाला प्रकाशित करतो.
२०. एका धर्मनियमाचे उल्लंघन करून जो असत्य बोलतो तो कोणते दुसरे दुष्कृत्य करणार नाही, हे सांगवत नाही.
२१. जे सदैव सावधान असतात, जे रात्रंदिवस अभ्यास करतात जे निर्वाणासाठी आटोकाट प्रयत्न करीत असतात, त्यांचे दुर्विकार ( आसव ) शेवटी लोप पावतात.
२२. अशी एक जुनी म्हण आहे की, जो स्तब्ध बसतो, त्याला लोक दूषण लावतात. जो फार बोलतो त्याला लोक दूषण लावतात आणि जो अगदी थोडे बोलतो त्यालाही दूषण लावतात. खरोखर, ज्याला दूषणच लावले जात नाही असा या जगात

कोणीच नाही.
२३. ज्याला सदैव दूषण देतात किंवा ज्याची सदैव स्तुती करतात असा पुरुष पूर्वी नव्हता, आता नाही, आणि पुढेही कधी होणार नाही.
२४. वाणीच्या क्रोधापासून सावध राहा आणि जिभेचा संयम करा. मानसिक पापांचा त्याग करा आणि आपल्या मनानेही सद्गुणाचा आचार करा.
२५. अप्रमाद हा निर्वाणाचा मार्ग आहे. प्रमाद मृत्यूचा मार्ग आहे. जे अप्रमादी आहेत ते अमर आहेत आणि जे प्रमादी आहेत ते मृतवत् आहेत.

## १३. सद्धर्म आणि असद्धर्म यांचा संकर करु नका

१. जे खोट्याला खरे आणि खर्याला खोटे समजतात ते आपल्या दुर्बुद्धीमुळे कधीही सत्यापर्यंत पोहचू शकत नाहीत.
२. जे खर्याला खोटे आणि खोट्याला खरे समजतात ते आपल्या दुर्बुद्धीमुळे कधीही सत्यापर्यंत पोहचू शकत नाहीत.
३. जे सत्याला सत्य आणि असत्याला असत्य म्हणून ओळखतात त्यांच्या ठिकाणी सम्यक् दृष्टी आहे. त्यांना सत्य लाभते.
४. घर नीट शाकारलेले नसले तर ज्याप्रमाणे त्यात पावसाचे पाणी गळू लागते त्याप्रमाणेच असंस्कृत मनात तृष्णा प्रवेश करते.
५. घर नीट शाकारलेले असले की, त्यात ज्याप्रमाणे पावसाचे पाणी शिरू शकत नाही त्याप्रमाणेच सुसंस्कृत मनात तृष्णा प्रवेश करू शकत नाही.
६. उठा! प्रमादी राहू नका. धर्माच्या शिकवणुकीप्रमाणे वागत राहा. जो त्याप्रमाणे वागतो तो इहलोकी आणि इतर सर्व लोकी सुखी होतो.
७. सन्मार्गाचा अवलंब करा. कुमार्गाचा अवलंब करू नका. सन्मार्गाने जाणारे लोक इहलोकी आणि इतर सर्व लोकी सखी होतात.

# भाग चवथा: बुद्धाची प्रवचने

## गुहस्थासाठी प्रवचन

### १. सुखी गुहस्थ

१. एकदा अनाथपिंडक भगवन्ताकडे आला आणि त्यांना अभिवादन करून जवळच्या आसनावर बसला.
२. गुहस्थाचे सुख कशात आहे हे जाणण्याची अनाथपिंडकाला उत्सुकता लागली होती.
३. म्हणून अनाथपिंडकाने गृहस्थाच्या सुखाचे रहस्य सांगण्याची भगवन्तांना विनंती केली.
४. भगवंत म्हणाले, ‘ गृहस्थाचे पहिले सुख स्वामित्वात आहे. गृहस्थाजवळ धन असते. त्याने ते न्यायाने, भलेपणाने, उद्योगाने, शरीरसामर्थ्याने आणि निढळाच्या घामाने कमावलेले असते. मी हे धन न्यायाने मिळविलेले आहे, या विचाराने गुहस्थाला सुख वाटते.
५. दुसरे सुख उपभोगाचे. गृहस्थाजवळ धन असते ते त्याने न्यायाने, भलेपणाने, उद्योगाने, शरीरसामर्थ्याने आणि निढळाच्या घामाने कमावलेले असते. त्या धनाचा तो उपयोग घेतो आणि पुण्यकृत्य करतो. न्यायाने मिळविलेल्या माझ्या धनाच्या जोरावर मी पुण्यकृत्य करीत आहे, या विचाराने त्याला सुख लाभते.
६. तिसरे सुख म्हणजे अन्-ऋण. गृहस्थ कोणाचेही लहानमोठे ऋण लागत नाही यामुळे तो सुखी असतो. मी कोणाचेच काही ऋण लागत नाही, ह्या व अशा विचाराने तो सुखी होतो.
७. चौथे सुख निर्दोषतेचे. काया, वाचा, मनसा निर्दोष कृत्ये करीत राहिल्याने गृहस्थ सुखी होतो.
८. ‘ अनाथपिंडक, जर गृहस्थ प्रयत्न करील तर खरोखर त्याला ह्या चारही प्रकारचे सुख लाभेल.’

### २. पुत्रापेक्षा कन्या बरी

१. एकदा भगवान श्रावस्ती येथे राहात असता कोसलराजा पसेनदी त्यांना भेटण्यासाठी आला.
२. राजा भगवंतांशी संभाषण कर असता, राजवाड्यातून एक दूत आला आणि राजापाशी जाऊन त्याची राणी मल्लिका प्रसूत होऊन तिला कन्या झाल्याचे त्याने वृत्त सांगितले.
३. ते वृत्त ऐकून राजा खिन्न झालेला दिसला. भगवंतांनी राजाला त्याच्या खिन्नतेचे कारण विचारले.
४. राजाने सांगितले की, राणी मल्लिका प्रसूत होऊन कन्या झाल्याचे वाईट वृत्त नुकतेच कळले आहे.
५. यावर परिस्थिती ओळखून भगवंत म्हणाले, ‘राजा, कन्या ही पुत्रापेक्षा अधिक चांगली निपजण्याचा संभव आहे. ती शहाणी आणि सद्गुणी कन्या, पत्नी, माता अशा त्रिविध भूमिका करणारी आहे.
६. ‘तिला जो पुत्र होईल तो पराक्रमी कृत्ये करील, मोठे राज्य करील. खरोखर अशा थोर पत्नीचा मुलगा आपल्या देशाचा मार्गदाता होईल.’

## ३. पती आणि पत्नी

१. एकदा भगवंत मदुरा आणि निरंजना यांच्यामधील राजरस्त्याने चालले होते. या रस्त्यावर त्यांना पुष्कळ गृहस्थ व त्यांच्या पत्नी भेटल्या.

२. तेव्हा भगवंतांनी रस्ता सोडून एका झाडाखाली आसन स्वीकारले. गृहस्थ आणि त्यांच्या पत्नींनी त्यांना अशा रीतीने स्थानापन्न झाल्याचे पाहिले.

३. ते सर्व भगवंताजवळ आले. त्यांनी भगवंतांना अभिवादन केले आणि जवळच बसून त्यांना विचारले, 'पति-पत्नींतील सुयोग्य संबंध कोणता?' यावर भगवंतांनी त्यांना उत्तर दिले,

४. 'हे गृहस्थ हो, पती-पत्नींना चार प्रकारे एकत्र राहता येते. दुष्ट पुरुष दुष्ट स्त्रीबरोबर राहात असेल. दुष्ट पुरुष देवतेबरोबर राहात असेल. सत्पुरुष दुष्ट स्त्रीबरोबर राहात असेल आणि कदाचित सत्पुरुष एखाद्या देवतातुल्य स्त्रीबरोबर राहात असेल.'

५. 'गृहस्थ हो! दुष्ट पुरुषाचे जीवन म्हणजे हत्या, चोरी, अपवित्रता, असत्भाषण, मद्यपान, दुष्ट आणि पापी वर्तणूक, मोहाविष्ट मन आणि सत्पुरुषांची निंदा याने भरलेले असते आणि त्याच्या दुष्ट स्त्रीचे जीवनही तद्वतच असते. अशा प्रकारे सदगृहस्थहो, दुष्ट पुरुष दुष्ट स्त्रीबरोबर जीवन व्यतीत करीत असतो.'

६. 'गृहस्थ हो, दुष्ट पती आणि देवतातुल्य पत्नी यांच्या जीवनात पती वर सांगितल्या प्रमाणे वर्तत असतो. परंतु पत्नी हत्या, चोरी, व्यभिचार, असत्य भाषण, मद्यपान यांपासून परावृत्त असते. तिची वर्तणूक सद्गुणी आणि हितकर असते. अंतःकरण मोहाधीन नसते. ती आपल्या कौटुंबिक जीवनात सद्गुणी माणसाची निंदा करीत नाही किंवा त्यांना उद्देशून अपशब्द बोलत नाही. याप्रमाणे गृहस्थ हो, दुष्ट मनुष्य देवतातुल्य पत्नीसह राहात असतो.

७. गृहस्थहो सज्जन, देवतुल्य पुरुष आणि दुष्ट पत्नी यांचे जीवन असे असते. या जीवनात पति हत्या, चोरी, व्यभिचार, असत्य भाषण, मद्यपान यापासून परावृत्त होऊन राहतो. त्याची वागणूक गुणयुक्त व हितकर असते. मोहाधीन होऊन आपल्या कौटुंबिक जीवनात तो सद्गुणी पुरुषाची कधी निंदा करीत नाही किंवा त्यांना उद्देशून अपशब्द बोलत नाही. परंतु त्याची पत्नी मात्र वर वर्णिलेल्या दुष्ट स्त्रीसारखी वागत असते.

८. 'गृहस्थहो, चौथ्या प्रकारची पति-पत्नी जीवनात जणू काय देव, देवतेबरोबर राहात आहे अशी वागतात. कारण ते दोघेही पति-पत्नी हत्या, चौर्यकर्म, असत्य-भाषण, व्यभिचार, मद्यपान यांचा आपल्या वर्तनाला स्पर्श होऊ देत नाहीत. आणि मोहाधीन होऊन सत्पुरुषांच्या निंदेने आपली जीभ विटाळीत नाहीत.

९. 'गृहस्थहो, पति-पत्नीच्या एकत्र जीवनाचे असे चार प्रकार आहेत.'

## शील परिपालनाच्या आवश्यकतेवरील प्रवचने

## १. माणसाची अधोगती कशाने होते ?

१. एके समयी भगवान श्रावस्ती येथील जेतवनातील अनाथ पिंडिकाच्या विहारात राहात होते.
२. त्या वेळी मध्यरात्र उलटल्यानंतर आपल्या तेजाने जेतवन दीप्तिमान करीत एक देव भगवंतांच्या जवळ आला आणि त्यांच्या सन्निध जाऊन आदराने त्यांना अभिवादन करून बाजूला उभा राहिला आणि भगवतांना उद्देशून पुढील श्लोक म्हणाला-
३. 'गौतमा, मी तुला अध:पतन पावणार्या माणसाविषयी काही प्रश्न करणार आहे. कृपा करून अधपतनाची कारणे काय असतात ते मला सांग!' भगवंतांनी ती सांगण्याचे मान्य केले आणि ते म्हणाले-
४. 'कोणाची उन्नती होत आहे आणि कोण अधोगतीला जात आहे हे सहज समजण्यासारखे आहे. धर्मप्रेमी हा उन्नतपथावर, तर धर्मद्वेष्टा हा अधोगतीच्या पथावरील वाटसरू आहे.
५. 'अधोगतीच्या वाटसरूला दुर्गुणी माणसे प्रिय वाटतात आणि सद्गुणी माणसे अप्रिय वाटतात. त्याची दुर्गुणी माणसांवर श्रद्धा असते हे त्याच्या अधोगतीचे दुसरे कारण होय.
६. 'झोपाळूपणा, गप्पा मारण्याची आवड, निरुद्योगीपणा, आळस, क्रोधाविष्टता ही सर्व अधोगतीचे तिसरे कारण होय.
७. 'आईबाप वृद्ध झाले असताना जवळ संपत्ती असूनही त्यांचे पालनपोषण न करणे हे अधपाताचे चौथे कारण होय.
८. 'ब्राम्हण, श्रमण किंवा अन्य साधूंना असत्य भाषणांनी ठकविणे हे अधोगतीचे पाचवे कारण होय.
९. 'जवळ विपुल द्रव्य, सुवर्ण, धनधान्य असूनही त्या सर्वांचा एकट्यानेच उपभोग घेणे हे अध:पाताचे सहावे कारण होय.
१०. 'आपले कुळ, संपत्ती, जात यांचा अभिमान बाळगून आपल्या आप्तेष्टांचा तिरस्कार करणे हे अध:पाताचे सातवे कारण होय.
११. 'व्यभिचार, मद्यपान, जुगार यांमध्ये द्रव्याचा अपव्यय करणे हे अध:पाताचे आठवे कारण होय.
१२. स्वस्त्रीमध्ये समाधान न पावता वेश्या, गणिका आणि परस्त्रिया यांचा समागम करणे हे अध:पाताचे नववे कारण होय.
१३. 'असंयमी, उधळी स्त्री अथवा पुरुष यांच्या हाती आपल्या व्यवहाराची सत्ता देणे हे अध:पाताचे अकरावे कारण होय.
१४. 'जवळची साधने अल्प असूनही क्षत्रिय कुळात जन्म झाला, या जोरावर अफाट महत्वाकांक्षा आणि सार्वभौमतेची इच्छा बाळगणे हे अध:पाताचे बारावे कारण होय.'
१५. ' हे कुलोत्तम देवा, ही सर्व अध:पाताची कारणे आहेत. या सर्वांवर विजय मिळवलास तरच तू वाचशील.'

## २. दुष्ट मनुष्य

१. एका चारिकेत आपल्या नेहमीच्या रिवाजाप्रमाणे भगवंतांनी आपल्या सहचारी भिक्खुंना खालील प्रमाणे प्रवचन दिले.
२. 'भिक्खूंनो, दुष्ट मनुष्य कसा ओळखावयाचा हे तुम्हांस माहीत आहे काय?' भिक्खूंनी 'नाही', म्हणताच भगवंत

बोलले,
३. ‘ तर मग मीच तुम्हाला दुष्ट माणसाची लक्षणे सांगतो.
४. ‘दुष्ट मनुष्य न विचारताच दुसर्याचे दोष दाखवितो आणि त्याला दुसर्याबद्दल विचारले तर मग बघायलाच नको. तेव्हा तर तो दुसर्याचे दोष किंवा व्यंगे न लपवता रसाळपणे तपशीलवार सांगू लागतो.
५. ‘जो मनुष्य विचारले असता दुसर्याचे सद्गुण दाखवीत नाही, पुन्हा पुन्हा विचारल्यावरच तो दुसर्याचे गुण सांगतो.
६. ‘तो मनुष्य विचारले असताही आपले दोष उघड करीत नाही, मग न विचारता तर बोलायलाच नको. वारंवार विचारले तरच तो आपले दोष दाखवितो परंतु त्याचा तपशील छपवितो असा मनुष्य दुष्ट मनुष्य होय.
७. ‘ भिक्खूहो, असाही मनुष्य असतो की, जो विचारले नाही तरी आपल्या चांगल्या गोष्टी उघड करीत असतो. विचारल्यावर तर सांगायलाच नको. तो अगदी सर्व तपशील देऊन आपल्या गुणांचे भरमसाट वर्णन करीत असतो. भिक्खुंनो, असा मनुष्य दुष्ट मनुष्य समजावा.’

## ३. सर्वोत्तम पुरुष

१. एका चारिकेत आपल्या नेहमीच्या रिवाजाप्रमाणे भगवंतांनी आपल्या सहचारी भिक्खुंना खालीलप्रमाणे प्रवचन दिले-
२. भिक्खुंना उद्देशून भगवान म्हणले, ‘जगात चार प्रकारची माणसे आढळतात.
३. ‘ पहिल्या प्रकारचा मनुष्य म्हणजे जो स्वत:च्या अथवा इतरांच्या कल्याणासाठी झटत नाही. दुसर्या प्रकारचा मनुष्य स्वत:चे हित सोडून दुसर्याच्या हितासाठी झटतो. तिसर्या प्रकारचा मनुष्य स्वत:च्या हितासाठी झटतो पण दुसर्याच्या नाही. चौथ्या प्रकारचा मनुष्य स्वत:च्या त्याप्रमाणेच दुसर्यांच्या हितासाठी झटत असतो.
४. ‘ जो स्वत:च्या अथवा दुसर्याच्या हितासाठी झटत नाही तो मनुष्य दोन्ही बाजूला पेटलेल्या आणि मध्ये शेणाने माखलेल्या चितेवरील मशालीसारखी आहे, ती गावात वा वनात इंधन म्हणून उपयोगी येत नाही. त्याप्रमाणेच तो मनुष्य जगाला आणि स्वत:लाही निरुपयोगी आहे.
५. ‘जो स्वत:च्या कल्याणाचा त्याग करून दुसर्याच्या कल्याणासाठी झटतो, तो तिसर्या प्रकारच्या माणसाहून अधिक चांगला पुरुष होय.
६. ‘आणि जो स्वत:च्या आणि इतरांच्या कल्याणासाठी झटतो तो सर्वात उत्तम पुरुष समजावा.’

## ४. ज्ञानी पुरुष

१. एके समयी भगवान उकट्ठ काणि सेतब्ब ह्या दोन नगरांच्या मधील राजरस्त्यापर्यंत पोहोचले असता, त्यांना द्रोण नावाचा एक ब्राम्हण त्यांच्यासारखाच प्रवास करीत असता भेटला.
२. अकस्मात भगवंतांनी रस्ता सोडला आणि एका वृक्षातळी पद्मासन ठोकून ते बसले. भगवंताच्या पावलांमागून

जात असणार्या त्या ब्राम्हण द्रोणाला, त्या तेजस्वी, सुंदर, संयमी, शांत आणि संयत मनाच्या आणि सामर्थ्यशाली मनाच्या भगवंताचे दर्शन झाले. भगवंताजवळ जाऊन तो म्हणाला,

३. " आदरणीय महाशय आपण देव तर नाहीत?"

" नाही. ब्राम्हणा, मी खरोखर देव नाही."

" आपण गंधर्व तर नव्हेत?"

" नाही, नाही! ब्राम्हणा मी गंधर्व नाही!"

" मग आपण यक्ष तर नव्हेत?"

" नाही, नाही! ब्राम्हणा, मी यक्ष नव्हे."

" तर मग आपण मनुष्य नाही काय?"

" नाही. ब्राम्हणा, मी मनुष्यही नाही!"

४. भगवंतांची अशी उत्तरे ऐकल्यावर तो ब्राम्हण द्रोण म्हणाला, ' तुम्हाला तुम्ही देव आहात का, गंधर्व आहात का, यक्ष आहात किंवा मनुष्य आहात असे विचारले असता आपण नाही म्हणता, तर मग आदरणीय महाशय, आपण आहात तरी कोण?'

५. ' ब्राम्हणा, जोपर्यंत मी माझ्या अंगच्या आसवाचा निरास केला नव्हता तोपर्यंत मी खरोखर देव, गंधर्व, यक्ष आणि मनुष्य होतो; पण आता मी आसवापासून मुक्त झालो आहे आणि मुळाचे विच्छेदन करून बैठकच नाहीशी केलेल्या तालवृक्षासारखा झालो आहे. त्या वृक्षाला जसे अंकुर फुटणार नाहीत त्याप्रमाणे माझेही आहे.

६. ' ज्याप्रमाणे जलात जन्म घेणारी कमललता पाण्यातून वर येते आणि तरी-
सुद्धा पाण्याचा कलंक तिला चिकटत नाही. त्याप्रमाणे हे ब्राम्हणा, मी जगात जन्मास आलो, जगात वाढलो आणि जगावर विजय मिळवून जगाच्या कलंकाला अस्पृष्ट असा राहिलो आहे.

७. ' म्हणून हे ब्राम्हणा, तू मला एक तथागत ( ज्ञानी पुरुष ) असे समज.'

## ५. न्यायी आणि सज्जन असा पुरुष

१. भिक्खूंना उद्देशून भगवान म्हणाले, ' माणसे चार प्रकारची असतात. जर तुम्हाला सज्जन आणि न्यायी पुरुष ओळखायचा असेल तर या चार प्रकारचे भेद तुम्ही जाणले पाहिजेत.

२. ' भिक्खुंनो, एका प्रकारची माणसे स्वकल्याणासाठी झटतात; परंतु परकल्याणाचा विचार ही करीत नाहीत.

३. ' अशा प्रकारची माणसे स्वत:मधील विषयवासनेचे निर्मूलन करतात, परंतु दुसर्यांनी विषयवासनेचा त्याग करावा म्हणून त्यांना कधीही आग्रहाने सांगत नाहीत. ते आपल्या मनातील क्रोधाचे निर्मूलन करतात; परंतू दुसर्यांना क्रोधाचा त्याग करण्याबद्दल निक्षून सांगत नाहीत. ते स्वत:मधील अविद्येचे निर्मूलन करतात; परंतु ते दुसर्यांना त्यांच्या अविद्या निर्मूलनासंबंधी आग्रहाने सांगत नाहीत.

४. ' असा पुरुष स्वत:च्या कल्याणाचा मार्ग चोखाळीत असतो; परंतु तो दुसर्याच्या कल्याणासाठी झटत नाही.

५. 'दुसर्या प्रकारची माणसे ही परहितासाठी झटतात. स्वहितासाठी झटत नाहीत.

६. 'अशी माणसे आपल्या अंगच्या विषयवासना, क्रोध आणि अविद्या यांच्या निर्मूलनाचा प्रयत्नही न करता

दुसर्यांना मात्र तसे करण्यासाठी आग्रहाने सांगत असतात.
७. 'भिक्खूहो, अशा प्रकारची माणसे दुसर्याच्या हितासाठी निश्चित झटतात, परंतु स्वतःच्या नाही.
८. 'भिक्खूहो, तिसर्या प्रकारची माणसे स्वहितासाठी अथवा परहितासाठीही झटत नसतात.
९. 'असा माणुस स्वतःच्या ठिकाणची विषयवासना, क्रोध आणि अविद्या यांचे निर्मूलन करीत नाही; त्याप्रमाणेच दुसर्यांनाही तसे करण्यास सांगत नाही.
१०. 'हा मनुष्य स्वतःचे अथवा दुसर्याचेही हित साधण्यासाठी प्रयत्न करीत नाही.
११. 'भिक्खूंनो, चौथ्या वर्गाची माणसे स्वकल्याण आणि परकल्याणासाठी झटत असतात.
१२. 'अशी माणसे स्वत:मधील विषयभावना, क्रोध आणि अविद्या यांच्या नाशासाठी झटत असतात. त्याप्रमाणेच दुसर्यांना ते विषयवासना, क्रोध आणि अविद्या यांच्या निर्मूलनासंबंधी आग्रहाने सांगतात.
१३. 'अशी माणसे स्वहित व परहितासाठी झटणारी होत. या शेवटल्या प्रकारच्याच माणसांना न्यायी आणि सज्जन मानावे.'

## ६. शुभकर्मांची *(कुशल कर्मांची)* आवश्यकता

१. एके समयी भगवान भिक्खूंना म्हणाले,
२. "सत्कर्म करण्याचे भय बाळगू नका. सौख्य, ईप्सित, प्रिय आणि आनंददायक या सर्वांचे दुसरे नाव म्हणजे सत्कर्म. सत्कर्माचा लाभ म्हणजे ईप्सित, प्रिय आणि आनंददायक वस्तूंचा लाभ. या गोष्टीचा मी अनुभव घेतला आहे नि त्याची ग्वाही मी देऊ शकतो."
३. "मी वारंवार स्वतःला विचारतो, हे जे मी फळ चाखीत आहे, तो कोणत्या कृत्याचा परिणाम? मला जे सध्या सौख्य आणि शांति लाभली आहे तो कोणत्या सत्कर्माचा परिपाक आहे?"
४. "आणि त्याचे उत्तर मला असे मिळते की, हे तीन प्रकारच्या सत्कर्मांचे फळ आहे. तो तीन प्रकारच्या सत्कर्माचा परिपाक होय. दान, शील, संयम, ह्या तीन सत्कर्माचा परिपाक होय.
५. "शुभ, उत्सवमय, आनंददायक आणि धन्य ती प्रभात! तोच खरा शुभ दिन. तोच खरा सुखमय क्षण. जेव्हा सत्पात्री दान दिले जाते, ज्या वेळी शुभ कर्मे, शुभ वचन, शुभ विचार आणि शुभ इच्छा ह्या त्यांच्या कर्त्याला शुभ लाभ घडवून देतात. ती वेळ आणि तो दिवस खरोखरच शुभ आणि आनंददायक होय.
६. 'ज्यांना असा लाभ होतो, समृद्धी मिळते ते खरोखरच सुखी होत. तुम्हीही त्याप्रमाणेच समृद्ध, निरामय आणि आपल्या आप्तेष्टांसह सुखी व्हावे.

## ७. शुभ संकल्पाची आवश्यकता

१. एके समयी श्रावस्तीतील जेतवनात राहात असता भगवान भिक्खूंना उद्देशून म्हणाले,
२. 'पवित्र आणि सुखी जीवनासाठी शुभ संकल्प करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.'

३. ‘कोणते शुभ संकल्प करावेत हे मी तुम्हाला सांगतो ते ऐका.’
४. ‘असा शुभ संकल्प करा की, आयुष्यभर मी आपल्या माता-पितरांचे परिपालन करीन. मी माझ्या कुळाच्या कुलपतीचा आदर करीन. माझी वाणी सदैव मृदू राहील. मी कोणासंबंधी वाईट बोलणार नाही. स्वार्थाचा कलंक प्रक्षाळून मी माझे अंतःकरण स्वच्छ करीन. औदार्याने, शुद्ध हस्ताने दान करण्यात आनंद मानीत राहीन. आपल्याला जे लाभेल त्याचा भाग दुसर्याला देण्यात समाधान मानीन. वर मागण्यास योग्य असा मी पुरुष होईन.
५. ‘आयुष्यभर शांत राहीन, क्रोध उत्पन्न झालाच तर त्याचा तात्काळ मी निरोध करीन.’
६. ‘भिक्खूंनो, असे हे सात प्रकारचे संकल्प आहेत. जे केले असता तुम्ही सुखी आणि पवित्र व्हाल.’

## सदाचरणावरील प्रवचने

## १. सदाचरण म्हणजे काय ?

१. एके समयी भगवान एका थोर भिक्खूसंघासह कोसल जनपदात चारिका करीत असता ते कोसलच्या झाला नावाच्या गावी आले.
२. ही वार्ता झालामधील ब्राम्हण कुलपतींच्या कानी आली.
३. त्या भगवान बुद्धाचे दर्शन घेणे बरे असे वाटल्यावरून ते झाला ग्रामचे ब्राम्हण भगवंताकडे आले आणि कुशल विचारून बाजूला स्थानापन्न झाले.
४. त्यांनी भगवंताना सदाचरणाचा अर्थ स्पष्ट करण्यास सांगितले.
५. त्या श्रवणोत्सुक ब्राम्हणांस भगवंतानी सांगितले, ‘ शारीरिक दुराचरणाचे आणि दुष्टपणाचे तीन प्रकार आहेत. वाचिक आणि वैचारिक दुराचरणाचे अनुक्रमे चार व तीन प्रकार आहेत.
६. ‘ शारीरिक दुराचरणाचे प्रकार येणेप्रमाणे : यांत मनुष्य पारधी म्हणून आपल्या रक्तरंजित हाताने हिंसाधीनतेने सजीव प्राण्याची निर्दयतेने हत्या करीत असतो. दुसर्या प्रकारच्या शारिरिक दुराचरणात मनुष्य जे आपले नाही ते घेतो. गाव आणि जंगल यांमधील लोकांची मालमत्ता चोरून आपलीशी करतो. तिसर्या प्रकारच्या दुराचरणात मातापिता, बंधुभगिनी यांच्या स्वाधीन असलेल्या, वाङगनिश्चय होऊन वाङगनिश्चयाच्या माला धारण करणार्या कन्येशी व्यभिचार करणे यांचा समावेश होतो.
७. ‘वाचिक दुराचरणात प्रथम खोटेपणा मोडतो. यांमध्ये सभेत अथवा गावाच्या, कुटुंबाच्या, राजाच्या अथवा आपल्या व्यवसायाच्या श्रेणीच्या परिषदेसमोर साक्ष देताना जे माहीत नाही ते माहीत आहे, जे माहीत आहे ते माहीत नाही, जे पाहिले नाही ते पाहिले, पाहिले ते पाहिले नाही, अशा तर्हेची स्वार्थासाठी अथवा कुणा माणसासाठी अथवा यःकश्चित लाभाच्या अभिलाषेने मनुष्य जाणूनबुजून साक्ष देतो. दुसर्या वाचिक दुराचरणांत चुगलखोरीचा समावेश होती. या दुराचरणांनी मुक्त असलेला मनुष्य, माणसाची मने दुसर्या माणसाविरुद्ध कलुषित करण्यासाठी इथे कानी पडलेल्या गोष्टी तिथे सांगत सुटतो. असा मनुष्य माणसा-माणसांतील ऐक्य मोडणारा, कलागती लावणारा असतो; कलागती लावण्याची त्याची नियत त्याला बोलायला लावते. कलागती हे

त्याचे सुख आणि आनंद होय. तिसर्या प्रकारच्या वाचिक दुराचरणाने युक्त असलेल्या मनुष्याची वाणी कडवट असते. त्याचे शब्द असंस्कृत, कठोर, तीव्र, मर्मभेदी, क्रोध आणणारे आणि चित्त विचलित करणारे असतात. चौथ्या प्रकारच्या दुराचरणांनी युक्त असलेला मनुष्य म्हणजे सदैव बडबड करणारा माणुस. तो बडबडताना आपण सत्य सांगतो की नाही, काही हितकर बोलतो आहोत किंवा नाही याचा विचार करीत नाही. त्याच्या बोलण्यात धर्मही नसतो. नीतीही नसते. काही तरी क्षुद्र, अनुचित, पोरकट, ज्याला बुंधा नाही, शेंडा नाही अशी निरर्थक बडबड तो नेहमी करीत असतो.

८. ' वैचारिक दुराचरणाच्या पहिल्या प्रकारात, लोभविकृतीचा समावेश होतो. असा मनुष्य परधनाचा सारखा हव्यास धरीत असतो. दुसर्या प्रकारच्या दुराचरणात दुसर्याचा दु:स्वास, द्वेष यांचा अंतर्भाव होतो. असा मनुष्य दान, त्याग, दक्षिणा अशा काही गोष्टीच नाही असे मानतो. त्याला वाटते सत्कर्म किंवा असत्कर्म यांची फळे भोगावी लागतात हे खरे नव्हे; इहलोक आणि परलोक हे सर्व झूट आहे असे तो मानतो. आईबाप, आप्तेष्ट यांनाही तो मानत नाही. ज्यांनी सम्यक् मार्गाने जाऊन इहपरलोकाचे ज्ञान मिळवले आहे आणि दुसर्यांना ते ज्ञान दिले आहे असे श्रमण आणि ब्राम्हण या जगात आहेत, या गोष्टीवर त्यांचा विश्वास नसतो.

९. ' याच्या उलट शारीरिक, वाचिक आणि वैचारिक सदाचरणाचे अनुक्रमे तीन, चार आणि तीन प्रकार आहेत.

१०. ' शारीरिक सदाचरणाच्या पहिल्या प्रकारात मनुष्य कोणत्याही जीवाची हत्या करण्यापासून पराङ्मुख असतो. आपला दंडा किंवा तलवार याचा त्याग करतो. तो निरपराधी व दयामय बनतो. सर्व सजीव प्राण्यांसंबंधी करुणामय असे जीवन जगत असतो. दुसर्या प्रकारचे शारीरिक सदाचरण म्हणजे, दिल्याशिवाय दुसर्याचे न घेणे आणि प्रामाणिकपणे जगणे. तिसर्या प्रकारात सर्व प्रकारच्या वैषयिक मिथ्याचारांचा त्याग करणे, अव्यभिचारी राहणे यांचा समावेश होतो. असा सदाचरणी मनुष्य आई-बाप, बंधुभगिनी, आप्तेष्ट यांच्या स्वाधीन असलेल्या, जिच्या गळयात वाङगनिश्चयाची माळ आहे अशा कन्येशी तो वैषयिक संबंध ठेवत नाही.

११. ' वाचिक सदाचरणाच्या पहिल्या प्रकारात मनुष्य असत्य भाषण सोडून देतो. असत्याचा त्याग करतो. त्यापासून दूर राहतो. त्याला सभेसमोर किंवा गाव कुटुंब, राजकुल अथवा आपल्या व्यवसायाच्या श्रेणीसमोर साक्ष द्यावयास सांगितली असता, जे माहीत नाही ते तो माहीत नाही म्हणून सांगतो, जे माहीत आहे ते माहीत आहे म्हणून सांगतो. जे पाहिले नाही ते पाहिले नाही म्हणून सांगतो आणि जे पाहिले ते पाहिले म्हणून सांगतो. स्वार्थासाठी, दुसर्यासाठी अथवा क्षुद्र लाभासाठी तो कधीही बुद्धीपुरस्सर खोटे बोलत नाही. दुसर्या प्रकारच्या वाचिक सदाचरणात मनुष्य चुगलखोरीचा त्याग करतो. निंदेपासून परावृत्त होतो. लोकांमध्ये कलागती लावण्यासाठी जे इथे ऐकले ते तिथल्या लोकांना सांगत नाही आणि जे तिथे ऐकले ते इथल्या लोकांना सांगत नाही. तो ऐक्यनिर्माता आणि प्रेमभाव वाढविणारा असतो. माणसामाणसांत सुसंवाद, ऐक्य राखणे हेच त्याचे सूख आणि आनंद होत. तिसर्या प्रकारच्या वाचिक सदाचरणात मनुष्य कटु शब्दांचा त्याग करतो. त्यापासून परावृत होतो. तो जे काही बोलतो त्यात खवचटपणा नसतो. त्याचे भाषण आल्हाददायक, मैत्रीचे, कळकळीचे, सुसंस्कृत, हितकर आणि सर्वांना स्वागतार्ह असते. चौथ्या प्रकारच्या वाचिक सदाचरणात मनुष्य व्यर्थ बडबड करीत नाही. तो उचित आणि वास्तविक आणि नेहमी लाभदायक असे बोलतो. योग्य, संस्मरणीय, उद्बोधक, व्यवस्थित आणि अति हितकर अशा रीतीने तो धर्म आणि नीतीसंबंधी भाषण करतो.

१२. 'वैचारिक सदाचरणाच्या पहिल्या प्रकारात मनुष्याच्याठिकाणि लोभाविष्टपणाचा अभाव असतो. परधन

आपले व्हावे अशी हाव तो कधीही धरीत नाही. ( २ ) दुसर्यासंबंधी दु:स्वास अथवा द्वेष यांना तो आपल्या विचारात स्थान देत नाही. आपल्या भोवतालचे प्राणी निर्वैर, सुखी, सुरक्षित आणि कोणत्याही प्रकारच्या शत्रुत्वापासून आणि छळापासून दूर रहावे अशी त्याची इच्छा असते. ( ३ ) त्याची दृष्टि सम्यक आणि संकल्प हे प्रमादरहित असे असतात.

१३. ' दुराचरण आणि सदाचरण यांचा मी असा अर्थ लावतो.'

## २. सदाचरणाची आवश्यकता

१. एकदा भगवंतांनी पाटली गावातील आपल्या उपासकांना असा उपदेश केला.

२. ' गृहस्थहो, दुष्ट आणि अनीतिमान गृहस्थाला असे दुष्परिणाम सोसावे लागतात.

३. ' दुष्ट आणि अनीतिमान मनुष्याला आळसामुळे द्रव्यहानी सोसावी लागते.

४. ' नंतर त्याची अपकीर्ती जगात पसरते आणि लोक त्याला मान देईनासे होतात.

५. ' ज्या लोकांच्या समाजात तो जातो, मग ते क्षत्रिय असोत, ब्राम्हण असोत, गृहपती असोत, अथवा श्रमण असोत, त्यांच्यामध्ये तो लाजतो आणि मनात गोंधळतो. तो निर्भय नसतो. हा त्याचा तिसरा तोटा होय.

६. ' परत त्याला मानसिक शांती लाभत नाही. अशाच मानसिक अशांततेत त्याचे मरण ओढवते. हा त्याचा चौथा तोटा होय.

७. ' दुष्ट आणि अनीतीमान माणसाची, हे गृहस्थहो, अशा प्रकारची हानी होते.

८. 'याच्या उलट जी माणसे सज्जन, शीलवान आहेत त्यांना काय लाभ होतो याचा विचार करा.

९. ' सज्जन, शीलवान मनुष्याला त्याच्या परिश्रमामुळे विपुल द्रव्यलाभ होतो.

१०. ' त्याची सत्कीर्ती जगभर पसरते. त्याला सर्वत्र मान मिळतो.

११. ' तो क्षत्रियांच्या, ब्राम्हणांच्या, गृहपतींच्या अथवा श्रमणांच्या समाजात जाऊन तेथे नि:संकोच आणि आत्मविश्वासाने प्रवेश करीत असतो.

१२. ' त्याला मानसिक शांती लाभलेली असते कधीही, मरतेसमयीही तो शांत चित्ताने देहत्याग करतो.

१३. ' मूर्ख मनुष्याला, तो मूर्खपणाने जे पाप करीत असतो त्यातील मूर्खपणा कळत नाही. अग्नीप्रमाणे त्याची पापे त्याचा नाश करीत असतात.

१४. ' जो कोणी निरुपद्रवी, निष्पाप अशा प्राण्याला दुःख देतो त्याच्या वाट्याला महान आपदा, मानसिक अशांति, आप्तेष्टांचा वियोग अरणि द्रव्यहानी येत असते.'

## ३. सदाचार आणि जगाचे अधिकार

१. एके समयी भगवान्, खारींना जेथे दाणे खायला घालीत त्या राजगृहातील वेळू-वनात राहात होते. त्या वेळी स्थविर सारीपुत्त एका मोठ्या भिक्खु संघासह दक्षिण पहाडामध्ये चारिका करीत होता.

२. वाटेत राजगृहामध्ये राहिलेला एक भिक्खू सारीपुत्ताला भेटला. औपचारिक अभिवादनादी प्रकार झाल्यावर सारीपुत्ताने त्याला भगवंताचा कुशल समाचार विचारला. भिक्खूने भगवंत व भिक्सूसंघ यांचे कुशल सांगितले. त्याप्रमाणेच सारीपुत्ताने विचारल्यावरुन राजगृह नगरात तंडूलपालदारपालाशी राहणार्या धनंजानी ब्राम्हणाचा कुशल समाचार सांगितला.

३. सारीपुत्ताने त्याला पुढे विचारले. 'ब्राम्हण धनंजानी अप्रमादपूर्वक वागतो का?'

४. भिक्खूने उत्तर दिले, ' धनंजानी कसला अप्रमादपूर्वक राहू शकणार? तो राजाचा उपयोग ब्राम्हण आणि गृहस्थ यांना नागवण्यासाठी आणि ब्राम्हण आणि गृहस्थ यांचा उपयोग राजाला लुबाडण्यासाठी करतो. सुशील कुळातून आलेली त्याची सुशील पत्नीही मरण पावलेली आहे आणि त्याने अलीकडे दुसरी पत्नी केली आहे. ती सुशील कुळातली नाही व स्वतःही सुशील नाही.'

५. यावर सारीपुत्त बोलला, धनंजानीची प्रमादशीलता ही फार वाईट वार्ता आहे; फार वाईट. एखाद्या वेळी एखाद्या ठिकाणी तो मला भेटेल, त्या वेळी यासंबंधी मी त्याच्याशी बोलेन.

६. दक्षिण पहाडातील आपला वास पुरा केल्यानंतर सारीपुत्ताने आपली चारिका पुढे चालू केली आणि तो राजगृहाला आला. तेथे त्याने वेळूवनात वस्ती केली.

७. सकाळी वस्त्र परिधान करून,भिक्षापात्र हाती घेऊन तो राजगृहात भिक्षेसाठी गेला. त्या वेळी ब्राम्हण धनंजानी हा त्याच्या गाईचे दूध ज्या कुरणात काढले जात होते तेथे देखरेख करण्यासाठी गेला होता.

८. भिक्षा संपवून परत आल्यावर सारीपुत्ताने भोजन केले आणि नंतर धनंजानीला गाठले. त्यांना येत असलेले पाहून ब्राम्हण त्याला भेटायला पुढे गेला आणि म्हणाला, ' भोजनापूर्वी आपण दुग्धपान करू या.'

९. सारीपुत्ताने उत्तर दिले, ' नको ब्राम्हणा, माझे जेवण झाले आहे आणि दुपारच्या वेळी मी एका झाडाखाली विश्रांती घेणार आहे. तूच तेथे ये.'

१०. धनंजानीने ते मान्य केले आणि आपल्या भोजनानंतर तो सरिपुत्ताला भेटावयाला गेला. सारीपुत्ताला अभिवादन करुन तो त्याच्या बाजूला बसला.

११. सारीपुत्ताने त्याला विचारले, ' सदाचरणासंबंधीचा तुझा उत्साह आणि कळकळ कमी झाली ना?

१२. तो ब्राम्हण म्हणाला, ' ती कशी कायम राहणार? कारण मला आता माझे आईबाप, पत्नी, कुटुंबदास, कामकरी यांचे पालनपोषण करावयाचे असते. याशिवाय ओळखीचे लोक, मित्र, आप्त-इष्ट आणि पाहुणे-अतिथी यांना पाहुणचार करावयाचा असतो. माझ्या मृत पूर्वजांचे श्राद्ध करायचे असते. देवदेवतांना बळी द्यायचे असतात. राजाला करभार चुकवयाचा असतो आणि उपरान्त मला स्वत:साठी मांस आणि पेयाची तरतूद करायची असते.'

१३. सारीपुत्ताने विचारले, ' धनंजानी, तुला असे वाटते काय की एखाद्या माणसाने आपल्या आईबापासाठी सदाचरण आणि न्याय यांना सोडून वर्तन केले आणि ह्यासंबंधी त्याला जाब विचारला असताना तो अशी सबब सांगू शकेल काय की, मी माझ्या आईबापासाठी हे सर्व केले! त्यांच्यासाठी सदाचरण आणि न्याय यांचे उल्लंघन केले म्हणून मला शिक्षा करू नका.

१४. 'नाही.' धनंजानी म्हणाला, 'अशा काहीही सबबी दिल्या तरी दैवीचा कारावास चुकणार नाही.'

१५. सारीपुत्त : ' तो स्वतः किंवा त्याची पत्नी आणि कुटुंब त्याच्यासंबंधी असे समर्थन करू लागले की, त्याने

केलेले न्याय आणि सदाचरणाचे उल्लंघन हे आमच्यासाठी केले, तर त्याचा काही उपयोग होईल काय?'

१६. धनंजानी : ' नाही.'

१७. सारीपुत्त : ' त्याचे दास म्हणू लागले की, हे सर्व त्यांनी आमच्यासाठी केले तर त्याचा काही उपयोग होईल का?'

१८. धनंजानी : ' नाही. तिळमात्र उपयोग होणार नाही.'

१९. सारीपुत्त : ' किंवा त्याचे मित्र आणि ओळखीपाळखीचे लोक त्याचे समर्थन करू लागले तर त्याचा उपयोग होईल का?

२०. धनंजानी : 'नाही! तिळमात्रही उपयोग होणार नाही.'

२१. ' किंवा त्याचे आप्तेष्ट आणि अतिथी त्याचे समर्थन करू लागले तर त्याचा काही उपयोग होईल का?'

२२. ' नाही ! तिळमात्रही नाही.'

२३. ' किंवा जर त्याचे भूत-पितर देवदेवतांसाठी किंवा राजासाठी त्याने हे केले असे समर्थन करू लागले तर ते चालेल काय?'

२४. ' नाही! तिळमात्रही चालणार नाही.'

२५. तो किंवा इतर लोक त्याने केलेले सदाचरणाचे आणि न्यायाचे उल्लंघन हे सर्व आम्हाला अन्न आणि पेय मिळवून देण्यापायी केले असे समर्थन करू लागले तर त्याचा काही उपयोग होईल का?'

२६. ' नाही!'

२७. सारीपुत्त : ' जो आपल्या आईबापासाठी न्याय आणि सदाचरणाचे उल्लंघन करतो, आणि जो कसलीही वेळ आली तरी न्याय आणि सदाचरणाचा मार्ग सोडीत नाही, यांपैकी धनंजानी, कोणता मनुष्य अधिक चांगला ठरतो?'

२८. धनंजानीने उत्तर दिले, ' दुसर्या प्रकारचा. कारण न्याय आणि सदाचरणाने वागणे हे अर्थात त्याच्या उल्लंघनापेक्षा श्रेयस्कर आहे.'

२९. ' धनंजानी, आपल्या आईबापांचे पोषण करण्याचे न्याय आणि सदाचरणाचे असे दुसरे मार्ग आहेत. त्यासाठी दुष्कृत्ये करण्याची आवश्यकता नाही आणि हे मार्ग पत्नी, कुटुंब आणि इतर सर्वांच्याही परिपोषणाला मोकळे नाहीत का ?' सारीपुत्ताने विचारले.

३०. धनंजानी : ' सारीपुत्ता ते मार्ग मोकळे आहेत.'

३१. यानंतर सारीपुत्ताच्या ह्या भाषणाने प्रसन्न होऊन त्याचे आभार मानून धनंजानी उठला आणि आपल्या गृही परत गेला.

## ४. सदाचरणात परिपूर्णता कशी साधता येईल ?

१. श्रावस्ती येथील जेतवनात भगवान वास करीत असता त्यांच्याकडे पाचशे उपासक आले. त्यात धाम्मिक हा होता.

२. धाम्मिकाने भगवंतांना विचारले, ' कोणत्या तत्वाच्या परिपालनाने आपल्या अनुयायांना सदाचरणात पूर्णता

साधता येते?’

३. ‘ मी आपणाला हा प्रश्न विचारीत आहे, याचे कारण माणसाचे कल्याण कशात आहे, हे ठरविण्यात आपल्यासारखा दुसरा कोणी नाही.’

४. ‘ सुशिक्षित जैन आणि परिव्राजक यांनाही आपले मतखंडनात यश आले नाही. वयोवृद्ध सुशिक्षित ब्राम्हण आणि ज्यांना आपले मत मांडण्याची फार हौस, त्या सर्वांनी आपला विमोचक सिद्धान्त मान्य केला. आपला विमोचक सिद्धान्त समजायला कठिण असला तरी तो आपण इतका सुलभ करून दाखविता की, तो ऐकण्यासाठी सर्व उत्सुक असतात. भगवान, म्हणून माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या.’

५. ‘ ही दैवी विद्या आपल्या मुखातून आम्हा उपासकांना ऐकू द्या.’

६. उपासकांच्या संबंधीच्या करुणेने भगवंताने उत्तर दिले, ‘ ऐका तर. मी आपणाला शुद्धाचरणाची तत्वे सांगत आहे; ती ऐकावी आणि तदनुसार वर्तन करावे.’

७. ‘ हत्या करू नका, देहान्त शासन करु नका. हिंसेला अनुज्ञा देऊ नका. कोणत्याही प्रकारच्या जीवाला, मग तो सबल असो अथवा दुर्बल असो, दुःख देऊ नका.

८. उपासकांनी स्वतः चोरी करु नये. दुसर्याला चोरी करण्याची परवानगी देऊ नये. अथवा चोरीला संमतीही दर्शवू नये. जे स्वेच्छेने दिले जाते तेवढेच घ्यावे.

९. ‘अब्रम्हचर्य जणू काय अग्नीची गर्ता आहे असे समजून त्याचा त्याग करावा. ब्रम्हचर्य साधत नसेल तर निदान विवाहित परस्त्रीशी समागम करू नये.

१०. ‘सभांत, न्यायगृहात अथवा नेहमीच्या संभाषणात असत्य बोलू नये. त्याप्रमाणेच असत्य भाषणाला प्रोत्साहन अथवा संमती देऊ नये. असत्याचा त्याग करावा.

११. ‘उपासकांनी मद्यपान करू नये. दुसर्याला मद्य पाजू नये. मद्यपानाला संमती देऊ नये. मद्यपानाने बुद्धीभ्रंश होतो. हे लक्षात ठेवा.

१२. ‘ मद्यपान करणारे मूर्ख पाप करतात आणि आपल्या इतर उपासक बांधवाना पापास प्रवृत्त करतात. तेव्हा हे बुद्धीभ्रंश करणारे व्यसन हा मूर्खपणा, आणि ‘ मूर्खाचा स्वर्ग’ ह्यांपासून परावृत व्हा.

१३. ‘ हत्या करू नका. चोरी करू नका. खोटे बोलू नका. उन्मादक पेय सेवन करू नका. व्यभिचार करू नका. भर रात्री कुग्रास अन्न सेवन करू नका.

१४. ‘ गंधमाला धारण करू नका. आपला बिछाना भूमीवर पसरा. प्रत्येक उपोषणाच्या दिवशी हे व्रत ग्रहण करा आणि शुद्ध अंतःकरणाने हे अष्टांगिक व्रत सणासारखे पाळा.

१५. ‘प्रातःकाळी हे व्रत ग्रहण करून धर्मशाली व श्रद्धायुक्त चित्ताने याचकांना अन्नपाणी दान करा.

१६. ‘ आपल्या आईबापांचा मान राखा. चांगला व्यवसाय करीत जा. या मार्गाचे एकनिष्ठतेने अवलंब करणारा उपासक उच्चपद प्राप्त करील.’

## ५. सदाचरणाच्या मार्गावर सहचार्यासाठी वाट पाहण्याची आवश्यकता नाही

१. ‘ रणसंग्रामातील हत्ती शरप्रहार सहन करतो त्याप्रमाणे या जगात मी माणसाचे कटु शब्द सहन केले पाहिजेत.

२. ‘ हत्तीला माणसाळवून युद्धात नेतात. माणसाळवलेल्या हत्तीवरच राजा आरोहण करतो. त्याप्रमाणेच ज्याला कटु शब्दाने राग येत नाही तोच सर्वोत्कृष्ट सुसंस्कृत मनुष्य होय.

३. ‘ शिकवलेली खेचरे चांगली असतात. सिंधु देशातील जातिवंत अश्व आणि बलवान गजराज हे सर्व खरोखर चांगले असतात; परंतु या सर्वांहून आत्मसंयमी पुरुष श्रेष्ठ होय.

४. ‘ अश्व, गज ही सर्व वाहने, आपणाला निर्वाणाला नेऊ शकत नाहीत. त्या मार्गावर आत्मसंयमाचे आत्मवाहनच चालू शकते.

५. ‘ अप्रमादी राहण्यात आनंद माना. आपल्या विचारावर अविश्रान्तपणे लक्ष असू द्या. ज्याप्रमाणे चिखलात रुतलेल्या हत्तीला मोठ्या श्रमाने बाहेर काढतात त्याप्रमाणेच प्रयासाने स्वतःचे कुमार्गापासून विमोचन करा.

६. ‘ सद्वर्तनी, दृढ मनाचा आणि बुद्धीमान असा सहप्रवासी तुम्हाला आढळला तर आपल्या सर्व चिंता मागे टाकून, आनंदाने त्याच्या मागून चालू लागा.

७. ‘ सद्वर्तनी, दृढ मनाचा आणि बुद्धीमान सहप्रवासी तुम्हाला सापडला नसेल तर शत्रूने पाठलाग चालविलेला राजा ज्याप्रमाणे आपले राज्य सोडून वनातील गजराजा प्रमाणे एकटाच पुढे जातो त्याप्रमाणेच तुम्ही आपल्या मार्गावर एकटेच जात रहा.

८. ‘एकांत पत्करला, परंतु मूर्खाची मैत्री नको. दुष्कृत्ये न करता एकटेच रहा. आपल्या गरजा मर्यादित करून एकटेच रहा. वनातील गजराज एकटाच खात फिरतो, त्याप्रमाणे एकांत पत्करा.

९. ‘ कुविचार मनातून उखडून टाका.

१०. ‘ ते उखडून टाकण्याचा मार्ग असा आहे.

११. ‘ जरी दुसरे उपद्रव करीत असले तरी मी उपद्रव करणार नाही असा निग्रह करून कुविचार उखडून टाका.

१२. ‘ जरी दुसरे हत्या करीत असले तरी मी हत्या करणार नाही.

१३. ‘ जरी दुसरे चोरी करीत असले तरी मी चोरी करणार नाही.

१४. ‘ जरी दुसरे पवित्र जीवन आचरीत नसले तरी मी ते आचरणारच.

१५. ‘ जरी दुसरे खोटे बोलत असले, निंदा करीत असले, विरुद्ध बोलत असले तरी मी तसे करणार नाही.

१६. ‘ जरी दुसरे लोभाविष्ट असले तरी मी परधनाचा लोभ धरणार नाही.

१७. ‘ जरी दुसरे मत्सरी असले तरी मी इतरांच्याबद्दल सदिच्छा बाळगीन.

१८. ‘जरी दुसर्याची दृष्टी, संकल्प, वाणी, कृती, उपजीविकेचे मार्ग, साधना, स्मृती, समाधी चुकीची असली तरी तुम्ही मात्र सम्यक् दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक् वाचा, सम्यक् कर्म, सम्यक् उपजीविका, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृती, आणि सम्यक् समाधी -- या अष्टांग मार्गाचा अवलंब करा.

१९. ‘जरी दुसरे आर्य सत्यासंबधी, मोक्षासंबंधी चुकत असले तरी तुम्ही मात्र त्यासंबंधी बरोबर राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

२०. ‘ जरी दुसरे आळस, सुस्तपणा यांनी पछाडलेले असले तरी तुम्ही मात्र या दोषांपासून मुक्त असले पाहिजे.

२१. ‘ जरी दुसरे गर्वोद्धत असले तरी तुम्ही विनयशील राहिले पाहिजे.

२२. ‘ जरी दुसरे शंकानी पछाडलेले असले तरी तुम्ही नि:शंक राहिले पाहिजे.
२३. ‘जरी दुसरे क्रोध, दुष्ट बुद्धी, द्वेष, मत्सर, कार्पण्य, लोभ, ढोंग, कपट, निबूंजपणा, उद्धटपणा, आगाऊपणा, नीतिहीनता, शिक्षणाचा अभाव, सुस्तपणा, गोंधळ, अज्ञान यांनी युक्त असले तरी तुम्ही मात्र त्याच्या उलट असले पाहिजे.’

## निब्बाणावरील प्रवचने

## १. निब्बाण म्हणजे काय ?

१. एके समयी भगवंत श्रावस्ती येथील अनाथपिंडीकाच्या आश्रमात सारीपुत्तासह राहात होते.
२. तेथे भिक्खुंना उद्देशून भगवंत म्हणाले, ‘ भिक्खूहो, ऐहिक मालमत्तेऐवजी माझ्या धम्माचे तुम्ही भागीदार व्हावे आणि हे घडून यावे म्हणून तुमच्या संबंधीच्या करुणेने मी काळजीत असतो.’
३. इतके बोलून भगवंत उठले आणि आपल्या गुंफेकडे निघून गेले.
४. सारीपुत्त मागे राहिला होता. भिक्खुंनी त्याला निब्बाण्णाचा अर्थ सांगावयाची विनंती केली.
५. तेव्हा भिक्खूंना उत्तरादाखल सारीपुत्त म्हणाला, ‘ भिक्खुंनो, लोभ हा अत्यंत अकुशल धर्म आहे. क्रोधही अत्यंत अकुशल धर्म आहे.
६. हा लोभ आणि हा क्रोध यांचा निरास कसा करावा हे मध्यम मार्ग शिकवतो. तो पाहायला डोळे देतो, दृष्टी देतो आणि ज्ञान देतो. तो आपणास शांती, प्रज्ञा, बोधी आणि निब्बाण यांच्या मार्गाने नेतो.
७. ‘तो मध्यम मार्ग कोणता? तो अष्टांग मार्गापेक्षा वेगळा नाही. सम्यक् दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक् वाचा, सम्यक् कर्म, सम्यक् उपजीविका, सम्यक् प्रयत्न, सम्यक् स्मृती आणि सम्यक् समाधी हा मध्यम मार्ग होय.
८. क्रोध, दुष्ट बुद्धी, द्वेष, मत्सर, कृपणता, लोभ, ढोंग, कपट, उद्धटपणा, गर्व, सुस्तपणा हे सर्व अकुशल धर्म आहेत.
९. गर्व, सुस्तपणा, यांचा निरास करण्याचा मार्ग मध्यम मार्ग होय. तो पाहायला दृष्टी आणि ज्ञान देतो. शांति, प्रज्ञा आणि बोधी यांकडे नेणारा तो मार्ग आहे.
१०. निब्बाण म्हणजे दुसरे काही नसून तो अष्टांग मार्ग होय.
११. त्या महास्थविर सारीपुत्ताच्या भाषणाने ते भिक्खू आनंदित झाले.

## २. निब्बाणाची मूलतत्वे

१. एकदा पूजनीय राधा हा भगवंताकडे आला आणि त्यांना अभिवादन करून बाजूला बसून भगवंताना त्याने प्रश्न केला. ‘ भगवन, निब्बाण म्हणजे काय?’
२. ‘ निब्बाण म्हणजे विकारापासून मुक्ती.’

३. ' भगवान, परंतु निब्बाणाचे उद्देश काय?'
४. ' निब्बाणस्थितीत राहून पुण्यशील जीवन जगता येते. निब्बाण हेच निब्बाणाचे ध्येय आणि साध्य होय.'

( ii )

१. एकदा भगवन्त श्रावस्ती येथील अनाथपिण्डकाच्या जेतवनात वस्ती करीत होते, त्या वेळी भिक्खुंना बोलावून ते म्हणाले, ' भिक्खूहो,
२. ' नीच लोकांकडे ओढून नेणारी आणि मी तुम्हांस सांगितलेली पाच बंधने तुम्हाला आठवतात काय ?'
३. यावर स्थविर मालुंक्यपुत्त भगवंतास म्हणाला,
४. ' भगवंत, ती पाच बंधने मला माहीत आहेत.'
५. ' मालुंक्यपुत्ता, ती कोणती ते सांग.'
६. ' भगवन्त, हे शरीर मी आहे - ही जाणीव, मानसिक अस्थिरता, धार्मिक कर्मे आणि विधी यांवर सर्व काही अवलंबून आहे असे मानणारी नैतिक सदोषता, एंद्रिय सुखाने उद्भवणारा उन्माद, आणि दुष्ट बुद्धी, ही भगवंतानी सांगितलेली माणसाला नीच जगाशी जखडणारी पाच बंधने होत; आणि ही पाच बंधने भगवान, मला माहीत आहेत.'
७. मालुंक्यपुत्ता, कोणाच्या अनुषंगाने ही पाच बंधने मी सांगितली हे तुला माहीत आहे काय ? अन्य मार्गाचे अनुयायी अर्भकाचे उदाहरण देऊन पुढीलप्रमाणे बोलून तुला नाव ठेवणार नाहीत काय ?'
८. ' मालुंक्यपुत्ता, अर्भकावस्थेत आपल्या पाठीवर लोळणार्या अबोध बालकाचे शरीर अविकसित असते. मग त्याच्या ठिकाणी शारीरिक जाणीव कशी निर्माण होईल ?
९. त्याप्रमाणेच आपल्या पाठीवर लोळणार्या या अबोध अर्भकाचे मन अविकसित असते. त्याच्या ठिकाणी मानसिक अस्थिरतेची अवस्था कशी उद्भवणार? हे खरे की, तरीसुद्धा त्याच्या ठिकाणी अस्थिरतेची वृत्ती सुप्तावस्थेत असते.'
१०. ' मालुंक्यपुत्ता, त्याप्रमाणेच ते अर्भक नैतिक आचार कसा करणार? त्याच्या ठिकाणी धार्मिक विधी आणि कर्मे यांवर अवलंबून राहण्याची नैतिक सदोषता कशी असणार ? तरीसुद्धा त्याच्या ठिकाणी ती वृत्ती सुप्तावस्थेत असते.'
११. 'मालुंक्यपुत्ता, त्या अर्भकाच्या ऐंद्रिय वासना अविकसित असतात. मग एंद्रिय सुखापासून उद्भवणारा उन्माद ते कसा जाणणार ? परंतु तशी वृत्ती सुप्तावस्थेत त्याच्या ठिकाणी असते.'
१२. 'शेवटी, हे मालुंक्यपुत्ता, त्या अर्भकाच्या दृष्टीने दुसर्या जीवांना अस्तित्व नाही. मग ते प्राणिमात्रांसंबंधी आपल्या मनात दुष्ट बुद्धी कशी धरणार? परंतु तशी वृत्ती त्याच्या ठिकाणी सुप्तावस्थेत असते.'
१३. ' मालुंक्यपुत्ता, ते अन्य पंथाचे अनुयायी अशा रीतीने लहान अर्भकाचे उदाहरण देऊन तुला नावे ठेवणार नाहीत काय?'

१४. भगवंताचे हे भाषण संपताच पूज्य आनंद त्यांना म्हणाला, ‘ भगवंत आता वेळ आली आहे. सुगत आता आपली विश्रांती घेण्याची वेळ आलेली आहे.’

## धम्मावरील प्रवचने

## १. सम्यक दृष्टीला प्रथम स्थान का ?

१. अष्टांग मार्गांपैकी सम्यक् दृष्टी हे एक थोर तत्व आहे.
२. सम्यक् दृष्टी ही श्रेष्ठ जीवनाची प्रस्तावना आणि गुरुकिल्लीच आहे.
३. सम्यक् दृष्टीचा अभाव हे सर्व पापाचे मूळ होय.
४. सम्यक् दृष्टीची वाढ व्हायला सर्व सृष्ट चमत्कार हे कार्यकारणभावांची प्रक्रिया आहे, असे पाहायला शिकले पाहिजे. सम्यक् दृष्टी म्हणजे कार्यकारणभावाची ओळख.
५. भिक्खूहो, ज्यांची दृष्टी, संकल्प, वाणी, कर्म, उपजीविका, साधना, स्मृती आणि समाधी मिथ्या आहेत, ज्यांचे ज्ञान आणि मुक्ती ही मिथ्या आहेत, ज्याचे प्रत्येक कार्य, वचन, विचार, ऐच्छिक कार्य, आकांक्षा, निग्रह आणि सर्व व्यापार ही सर्व अशा मिथ्या दृष्टीने साधलेली असल्यामुळे ती तिरस्करणीय, दुःखकर, जुगुप्सा उत्पन्न करणारी आणि हानिकारक असतात. आणि हे सर्व का ? तर त्याची दृष्टी मिथ्या असल्यामुळे.
६. आपला मार्ग बरोबर असणे एवढेच पुरेसे नाही. एखादे बालकही योग्य मार्ग स्वीकारते; परंतु त्याचा अर्थ असा नव्हे की, त्या बालकाला मार्गाच्या योग्यायोग्यतेची जाणीव आहे. योग्य मार्गाचे अवलंबन करायचे म्हणजे योग्य मार्गाचे ज्ञान पाहिजे.
७. हे आनंदा, यथार्थ भिक्खू कुणाला म्हणता येईल ? बुद्धिपूर्वक कोणते शक्य आहे कोणते अशक्य आहे, ह्या ज्ञानावर ज्याने प्रभुत्व मिळवले आहे त्यालाच यथार्थ भिक्यू म्हणता येईल.

## २. मृत्यूत्तर जीवनाची चिंता कशाला करा ?

१. एके समयी स्थविर महाकश्यप आणि स्थविर सारीपुत्त हे बनारसजवळच्या इसिपत्तनमधील मृगदायामध्ये राहात होते.
२. त्या वेळी स्थविर सारीपुत्त सायंकाळी आपला एकांत संपवून अर्हत स्थविर
महाकश्यप यांच्याजवळ जाऊन बसले.
३. अशा रीतीने बसल्यावर स्थविर सारीपुत्ताने महाकश्यपाला प्रश्न केला, ‘ मित्रा, कश्यपा, मृत्यूत्तर तथागतांना अस्तित्व असते काय?’
४. ‘ तथागतांना मृत्यूत्तर अस्तित्व असते किंवा नाही यासंबंधी भगवंतांनी काहीच सांगितलेले नाही.’
५. ‘ मग मित्रा, तथागतांना मरणोत्तर अस्तित्व असते आणि अस्तित्व नसते अशा दोन्हीही गोष्टी मानावयाच्या

काय ?’
६. ‘ मित्रा, हे सुद्धा भगवंतानी म्हटलेले नाही.’
७. ‘ तर मग मित्रा, तथागतांना मरणोत्तर अस्तित्व नाही. अथवा नाही असेही नाही असे म्हणावयाचे काय ?’ ‘ हे सुद्धा भगवंतानी म्हटले नाही.’
८. ‘ मित्रा, हे भगवंतानी का म्हटलेले नाही ?’
९. ‘ कारण हा प्रश्न मानवतेच्या हिताशी किंवा श्रेष्ठ जीवनाच्या तत्वाशी संलग्न नाही. तो प्रश्न आपणाला प्रज्ञा किंवा निब्बाण यांपैकी काहीच साधून देत नाही. आणि म्हणूनच भगवंतांनी या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही.’

## ३. देवाची प्रार्थना किंवा त्याचे आवाहन करणे हे व्यर्थ आहे

१. एकदा भगवंत वसिष्ठाला उद्देशून म्हणाले,
२. ‘ ही अचिरवती नदी पुराने भरून दुथडी भरून वाहात असली आणि ज्याला पैलतीरावर काही काम आहे तो येथे आला आणि त्याला पलीकडे जावयाचे असले.’
३. ‘ आणि तो ह्या काठावर उभा राहून पैलतीराला उद्देशून बोलू लागला, ‘ हे पैलतीरा, इकडे ह्या बाजूला ये.’
४. ‘ तर हे वसिष्ठा, अचिरवतीचे पैलतीर त्या माणसाच्या प्रार्थनेने आणि आवाहनाने, अशा करण्याने आणि स्तुती करण्याने त्याच्या जवळ येईल काय?’
५. ‘ त्याचप्रमाणेच हे वसिष्ठा, तीन वेदांत पारंगत असलेले ब्राम्हण ज्या गुणांच्या आचरणाने मनुष्य ब्राम्हणत्वाला पावतो, त्या गुणांचे परिपालन करणे सोडून उलट ज्यांच्या योगाने मनुष्य अब्राम्हण बनतो असले आचार करीत म्हणत राहिले की:
६. ‘ इंद्रा, तुला आम्ही आवाहन करीत आहोत; ब्रह्मा, तुला आम्ही आवाहन करीत आहोत; ईशान तुला आम्ही आवाहन करीत आहोत; प्रजापती, तुला आम्ही आवाहन करीत आहोत.
७. ‘ तर वसिष्ठा, हे ब्राम्हण आपल्या आवाहनाने, प्रार्थनेने अशा करण्याने आणि स्तुती करण्याने आपल्या मृत्यूत्तर ब्रम्हाबरोबर एकरूप होतील काय? खरोखर असे कधीच होणार नाही.’

## ४. विशिष्ट अन्नसेवनाने मनुष्य पवित्र होत नाही

१. एकदा एक ब्राम्हण भगवन्ताना भेटला आणि त्याने त्यांज्याजवळ अन्नाचा माणसाच्या शीलावर होणार्या परिणामाचा प्रश्न काढला.
२. तो ब्राम्हण म्हणाला, ‘ ज्वारी, ताड आणि माड यांची फळे, डाळी, कंदमुळे, आणि अंकुर हे अन्न सदाचरणाने मिळवून सेवन केल्याने चांगले जीवन जगण्यास प्रेरणा मिळते. ‘मृतमांस’ खाणे हे वाईट आहे.’
३. यावर भगवन्तानी उत्तर केले, ‘ तू म्हणतोस की, आपण पक्ष्याच्या मांसाची निवडक पक्वाने खातो आणि मृतमांसाला स्पर्श करीत नाही. तर मग तू मृतमांसाची व्याख्या कशी करतोस?

४. हत्या करणे, शरीर विद्रूप करणे, मार देणे, बांधून ठेवणे, चोरी करणे, खोटे बोलणे, बनावट गोष्टी करणे, कपट, व्यभिचार करणे ही सर्व मृतमांस भोजनेच आहेत; मांस भोजन नव्हे.

५. कामभोगाची लालसा, खाण्याबाबत वखवख, अस्वच्छ जीवन, परमत असहिष्णुता ही सर्व मृत-मांस भोजनेच आहेत, मांस भोजने नव्हेत.

६. कोणाचीही त्याच्या मागून निंदा करणे, क्रौर्य, विश्वासघात, अनिवार्य सर्वशूद्र, कृपणता ही मृत-मांस भोजने आहेत. मांस भोजने नव्हेत.

७. राग, लुच्चेगिरी, विद्रोह, कपट, द्वेष, फुशारकी, गर्व, कुसंगती ही मृत-मांस भोजने आहेत. मांस भोजने नव्हेत.

८. नीच जीवन, निंदा, अफरातफर, फसगत करणे, लांडीलबाडी करणे, दुष्टपणे दुसर्याची दुष्कीर्ती करणे ही मृत-मांस भोजनेच आहेत. मांसभोजने नव्हेत.

९. हत्येस, चौर्यकर्मास प्रवृत्त करणारे सर्व अपराध शेवटी माणसाला नरकात ओढतात. ते सर्व मृत-मांस भोजनेच आहेत. मांस भोजने नव्हेत.

१०. शंका घेणे हाच ज्याचा स्वभाव, असा माणुस मांसमत्स्यसेवनापासून परावृत्त झाला. वस्त्राचा त्याग करून दिगंबर अवस्थेत राहू लागला, शिरावर जटामुकुट वाढवू लागला किंवा शिरोमुंडण करू लागला, वस्त्राऐवजी कातडी परिधान करू लागला यज्ञयाग करू लागला, पुण्यार्जनासाठी तपश्चर्येचा अवलंब करू लागला, तीर्थात निम्मज्जन करू लागला, आहुती देऊ लागला आणि दुसरेही क्रियाविधी करू लागला- तरी तो कधीही पापरहित होऊ शकणार नाही.

११. आपल्या इंद्रियावर प्रभुत्व मिळवा, आपल्या सामर्थ्याने संयम करावयास शिका, सत्याची कास धरा आणि करुणामय व्हा. जो सत्पुरुष सर्व बंधनाचा त्याग करून दुःखावर विजय मिळवितो, त्याने काहीही ऐकले - पाहिले तरी त्याला दोष लागत नाही.

१२. भगवंन्तांची ही उच्च विमोचक सत्ये, मृतमांस म्हणजे काय याचे केलेले निरूपण, आणि दुःखनिरोधाची शिकवण ऐकून तो ब्राम्हण भगवंतांपुढे नम्र झाला आणि भिक्खू संघात आपणाला समाविष्ट करून घ्यावे अशी त्याने विनंती केली.

## ५. अधोगतीचे कारण दुष्कर्मे, अन्न नव्हे

१. आमगंध नावाचा एक ब्राम्हण हिमालयात आपल्या शिष्यगणांसह राहात असे. तो आणि त्याचे शिष्य मत्स्यमांस खात नसत. प्रतिवर्षी आपला आश्रम सोडून ते क्षार आणि आम्ल पदार्थाच्या शोधार्थ वाली उतरत असत.

२. ज्या गावात ते उतरत तेथील रहिवासी चार महिनेपर्यंत मोठ्या सन्मानाने त्याचे आदरातिथ्य करीत असत.

३. एकदा भगवंतांनी त्या गावाला भेट दिली. भगवंतांचे धम्मनिरूपण ऐकून ते गावकरी त्यांचे श्रावक बनले.

४. त्या वर्षी आमगंध आणि शिष्यगण प्रतिवर्षाप्रमाणे त्या गावात आले असताना ग्रामवासियांनी त्यांच्यासंबंधी फारसा उत्साह दाखविला नाही.

५. भगवंत मत्स्यमांसाच्या सेवनाचा निषेध करीत नाहीत हे ऐकून तो खिन्न झाला. या गोष्टीचे खरे खोटे करून

घेण्यासाठी श्रावस्ती येथे जेतवनात भगवन्त राहात होते तेथे त्यांच्याकडे जाऊन तो म्हणाला.

६. 'जे बाजरी, चिंगुलाचे दाणे, वाटाणे, खाद्य पालेभाजी आणि कंद, कोणत्याही वेलीची फळे, ही सुमार्गाने मिळवून सेवन करतात, ते आपल्या सुखासाठी असत्य भाषण करीत नाहीत.

७. 'परंतु तू तर लोक जे काही देतात असे चांगल्या प्रकारे शिजविलेले, माल-मसाला लावलेले स्वच्छ आणि उत्कृष्ट अन्न खातोस. जो कोणी तांदुळाचे असले बनविलेले पदार्थ खातो तो आमगंध खातो. पक्ष्याच्या मांसास निश्चित अन्न खाताना मजवर आमगंध सेवनाचा आरोप येत नाही असे म्हणतोस.

८. 'मी तुला विचारतो ह्याचा अर्थ काय ? ज्याला तू आमगंध म्हणतोस ते आहे तरी काय?'

९. भगवंतांनी उत्तर दिले, 'जीवहिंसा करणे, ताडन, बंधन, चौर्यकर्म, असत्य भाषण, अफरातफर, फसवगूक, क्षुल्लक गोष्टींचे ज्ञान आणि व्यभिचार ही आमगंध होत. मांस सेवन आमगंध नव्हे.

१०. या जगात जे पुरुष आपल्या सुखोपभोगात संयमरहित असतात, ज्यांना मधूर वस्तूंचा लोभ असतो, अपवित्र कार्याशी ज्यांचा संबंध असतो, जे विचाराने उच्छेदवादी आणि कपटी असतात. ज्याची वर्तणूक समजायला कठीण असते, ते आमगंध असतात. मांससेवनाने त्यांना आमगंधाचा दोष लागत नाही.

११. या जगात जे उद्धट, कर्कश, निंदाप्रिय, विश्वासघातकी, निर्दय, अतिशय अहंकारी व अनुदार असतात, आणि दुसर्यांना काहीच देत नाहीत ते लोक आमगंध दोषाने युक्त होत. मांसाशनाने मनुष्य आमगंध दोषयुक्त होत नाही.

१२. राग, गर्व, हटवादीपणा, शत्रुत्व, कपट, द्वेष, फुशारकी मारणे, आत्यंतिक अहंकार, पापी मनुष्याची संगत, यांच्या योगाने मनुष्याला आमगंधाचा दोष जडतो. मांसाशनाने नव्हे.

१३. ज्यांची नीती वाईट, जे घेतलेले कर्ज देण्याचे नाकारतात, जे निंदा करीत असतात, आपल्या व्यवहारात जे लुच्चेगिरीने वागतात, जे ढोंगीपणा करतात, अशी दुष्कृत्ये करणारी नीच माणसे ही आमगंध दोषाने युक्त होत. मांसाशनाने आमगंध दोष लागत नाही.

१४. जी माणसे सजीव प्राण्याशी संयम राखून वागत नाहीत, जे परधन हिरावून परपीडा करावयास सदैव सिद्ध असतात, जे अनीतिमान, क्रूर, कर्कश असतात आणि दुसर्याचा उपमर्द करण्याची ज्यांची वृत्ती असते ते सर्व आमगंधदोषयुक्त होत. मांसाशनाने आमगंध दोष जडत नाही.

१५. जे लोभाने अथवा शत्रूत्वाने सजीव प्राण्यावर छापा घालतात ते सदैव दुर्बुद्धीने प्रेरित झाल्यामुळे मरणोत्तर अंधारात सापडतात आणि नरकात कोसळतात, ने आमगंधी होत. मांसाशनाने आमगंधाचा दोष जडत नाही.

१६. मत्स्यमांस सेवनापासून परावृत्ती, नग्नता, शिरोमुंडन, जटा, सर्वांगी भस्मार्चन, मृगाजिन परिधान, अहिताग्नी व्रत इत्यादी जगातील सर्व तपांचे अमरपदासाठी केलेले परिपालन आणि मंत्रोच्चार, बलिदान, नैमित्तिक यज्ञ, यांपैकी कशानेही सदैव शंका घेणारा मनुष्य शुद्ध होऊ शकत नाही.

१७. ज्याने आपली इंद्रिये जिंकली आहेत, जो त्याचा संयम करतो, जो धर्मनिरत आहे, सरळपणा, मार्दव यात ज्याला आनंद वाटतो, ज्याच्या ठिकाणी विषयासक्ती नाही, ज्याने दुःखनिरोध केला आहे तो सूज्ञ मनुष्य जे पाहतो किंवा ऐकतो, त्यापैकी कशाच्याही आहारी जात नाही.

१८. आमगंधाचा दोष दुष्कृत्यामुळे जडतो; मत्स्यमांसाच्या सेवनाने नव्हे.

## ६. देहप्रक्षालन पुरेसे नाही

१. एकदा भगवंत श्रावस्ती येथे राहात होते. संडगाख नावाचा ब्राम्हणही तेथे राहात होता. तो स्नानवादी होता आणि जलप्रक्षालनाने स्वत:ला शुद्ध करण्याच्या आचाराचे तो अवलंबन करीत असे. रात्रदिवस स्नान करणे हा त्याचा स्वभावच झाला होता.

२. एकदा महास्थविर आनंद सकाळच्या प्रहरी चीवर धारण करून भिक्षापात्र आणि एक चीवर घेऊन श्रावस्तीत भिक्षेसाठी निघाला. श्रावस्तीत फिरून मिळविलेली भिक्षा खाल्ल्यावर तो भगवंताच्या बाजूला अभिवादन करून बसला आणि म्हणाला,

३. 'भगवान! ह्या श्रावस्तीत संडगाख नावाचा स्नानवादी ब्राम्हण असून स्नानाने स्वत:ला शुद्ध बनविण्याच्या कर्मात तो मग्न असतो. रात्रंदिवस स्वानापलीकडे त्याला काही दिसत नाही. भगवंतांनी करुणा करून त्या संडगाख ब्राम्हणाची भेट घेतली तर बरे होईल.'

४. भगवन्तानी आपल्या मौनाने त्याला संमती दर्शविली.

५. दुसर्या दिवशी सकाळी भगवन्त चीवर चढवून व एक चीवर आणि भिक्षापात्र हाती घेऊन त्या संडगाख ब्राम्हणाच्या घराकडे निघाले. तेथे जाऊन ते आसनावर बसले.

६. संडगाख ब्राम्हण भगवंतांजवळ आला. त्याने त्यांचे स्वागत केले आणि कुशल प्रश्न झाल्यावर त्यांच्या बाजूला बसला.

७. तो स्थानापन्न झाल्यावर भगवंतांनी त्याला विचारले, 'ब्राम्हणा, लोक म्हणतात तू स्नानवादी असून रात्रंदिवस स्नान करून स्वत:ला शुद्ध बनविण्याचा प्रयत्न करीत आहेस. हे खरे आहे का ?'

८. 'श्रमण गौतम, हे सर्व खरे आहे.'

९. 'मग, हे ब्राम्हणा, हे स्नानव्रत धरून तू काय मिळवणार आहेस ?'

१०. 'गौतमा, हे व्रत अशासाठी आहे ; - दिवसा जे काही पाप मी करतो ते त्याच संध्याकाळी मी धुवून टाकतो. अशा रीतीने माझ्या या स्नानव्रताने मी स्वत:ला शुद्ध राखण्याचा प्रयत्न करीत आहे.'

११. भगवान म्हणाले,

१२. 'धर्म हा एक तडाग आहे. तो स्वच्छ व निर्मल आहे.

१३. 'जे या तडागात निमज्जन करतात ते सर्व धर्मज्ञ, आणि सर्वांग शुद्ध होऊन पैलतीराला जातात.'

१४. यावर तो संडगाख ब्राम्हण म्हणाला, 'वा: छान, श्रमण गौतम, मला आपला शरणागत उपासक करा. आजपासून मरेपर्यंत मी आपलाच आश्रय करणार.'

## ७. पवित्र जीवन म्हणजे काय?

१. एकदा चारिका करीत असता आपल्याबरोबर असलेल्या भिक्खुंना उद्देशून भगवान बुद्धांनी खालील प्रवचन केले -

२. भिक्खूंनो, पवित्र जीवन हे लोकांना फसविण्यासाठी, त्यांची कृपा साधण्यासाठी, काही लाभासाठी, काही कीर्तीसाठी, किंवा वादविवादाच्या जटिल प्रश्नांतून सुटका करून घेण्यासाठी, किंवा लोकांमध्ये आपले नाव व्हावे यासाठी जगायचे नसते. भिक्खुहो, शरीर आणि वाणी यांचे नियंत्रण करण्यासाठी, कोणत्याही प्रकारची अशुद्धता, आसक्ती आणि तृष्णा यांपासून विमोचन करण्यासाठी हे पवित्र जीवन जगावयाचे असते.

## सामाजिक व राजकीय प्रश्नांवरील प्रवचने

## १. राजकृपेवर अवलंबून राहू नका

१. एकदा भगवान राजगृह येथील वेळूवनात कलंदक-निवासात राहात होते.
२. त्या वेळी भगवंतांविरुद्ध उलटलेल्या देवदत्ताचा पक्ष राजा अजातशत्रूने घेतला होता.
३. सकाळ-संध्याकाळ पाचशे गाड्यांतून अन्नपात्रे पाठवून तो देवदत्ताच्या शिष्यगणांना पोशीत होता.
४. तेव्हा काही भिक्खु भगवंतासमोर आले आणि साभिवादनपूर्वक त्यांच्या शेजारी बसले. त्यांनी भगवंतांना देवदत्तासंबंधाची वार्ता सांगितली.
५. तेव्हा भगवंत भिक्खुंना म्हणाले, ‘राजाकडून कृपेची, खुशामतीची, कोणत्याही प्रकारच्या लाभाची आशा धरू नये; जोपर्यंत अजातशत्रू राजा देवदत्ताला सकाळ-संध्याकाळ पाचशे गाड्यांत अन्नपात्रे भरून अन्न पुरवीत आहे तोपर्यंत देवदत्ताची अधोगतीच होत राहणार. सन्मार्गात त्याच्या प्रगतीची अपेक्षा करणे व्यर्थ होईल.
६. ‘भिक्खूंनो, ज्याप्रमाणे कुत्र्याच्या नाकावर काळीज चुरडून थापले तर तो कुत्रा अधिकच पिसाळतो. त्याप्रमाणे जोपर्यंत राजा अजातशत्रू दवदत्ताला अशा रीतीने पोशीत आहे, तोपर्यंत तो देवदत्त अधोगतीलाच जात राहणार; त्याची सुधारणा होणार नाही. बंधूंनो, राजाची खुशामत, कृपा, त्यापासून होणारे लाभ हे भयदायक आहेत.
७. ‘सर्वोच्च अशी अढळ शांती साधण्याच्या मार्गातील ते कटु आणि दु:खदायक असे अडसर आहेत.
८. ‘म्हणून भिक्खुंनो, तुम्ही स्वत:ला हे शिकविले पाहिजे की, आमच्यावर लाभ, कृपा, खुशामत याचा वर्षाव होणार असेल तर आम्ही त्याचा निषेध करू आणि त्याचा वर्षाव होऊ लागलाच तर त्याला आमच्या मनावर पकड घेऊ देणार नाही, प्रभुत्व मिळवू देणार नाही, त्याच्या लालसेने आम्हाला राजाचे दास बनवू देणार नाही.’

## २. जर राजा धार्मिक असेल तर त्याची प्रजा धार्मिक होते

१. एकदा भिक्खुंना उद्देशून भगवंत म्हणाले, ‘भिक्खूहो,’
२. जोपर्यंत राजा हा धर्मशील नाही, तोपर्यंत त्याचे प्रधान आणि कर्मचारी धर्मशील होऊ शकत नाहीत. प्रधान आणि कर्मचारी अधार्मिक झाले की, ब्राम्हण आणि गृहस्थही अधार्मिक होतात. ब्राम्हण आणि गृहस्थ हे धर्मरहित असल्यावर नगरवासी आणि ग्रामवासी हेही धर्मरहित होतात.
३. परंतु जेव्हा राजे धार्मिक असतात तेव्हा हे भिक्खुंनो, त्याचे प्रधान आणि कर्मचारीही धार्मिक होतात. जेव्हा

राजे आणि त्याचे प्रधान आणि कर्मचारी धार्मिक असतात तेव्हा ब्राम्हण आणि गृहस्थ हेही धार्मिक होतात. जेव्हा ब्राम्हण आणि गृहस्थ धार्मिक असतात तेव्हा नगरवासी आणि ग्रामवासी हेही धार्मिक होतात.
४. गुरांचा तांडा नदी ओलांडीत असताना त्यांच्यामधील वयोवृद्ध असलेला वृषभ चुकला की त्याच्यामागून येणारी सर्व गुरेही चुकतात. त्याप्रमाणेच माणसामध्येही ज्याला प्रमुख मानतात तो वाममार्गाने जाऊ लागला तर इतरेजनही त्याच मार्गाचा अवलंब करतात.
५. त्याप्रमाणेच राजाने कुमार्ग धरला तर सर्व राज्याला हानी पोचते. गुरे नदी ओलांडीत असता जर मुख्य वृषभ सरळ मार्गाने गेला तर मागील गुरांचा तांडा त्याच सरळ मार्गाने जातो. याप्रमाणेच जो प्रमुख असेल तो जर सन्मार्गाने चालू लागला तर इतरही त्याचे अनुकरण करतात आणि सन्मार्गाने जातात. जर राजे चांगले असतील तर सारे राज्य सुखाने राहते.'

## ३. राजकीय आणि लष्करी शक्ती समाजव्यवस्थेवर अवलंबून असते

१. एकदा भगवान राजगृह येशील गृधकूटावर गहात होते.
२. त्या वेळी वैदेही पुत्र मगधराजा अजातशत्रू विज्जीवर आक्रमण करण्याच्या विचारात होता. तो स्वत:शीच म्हणाला, हे विज्जीकुल सामर्थ्यशाली असले तरी मी त्यांचा पुरेपूर नाश करीन.
३. म्हणून आपल्या मगध देशाचा मुख्यप्रधान, वस्सकार नावाचा ब्राम्हण याला बोलावून तो म्हणाला,
४. 'हे ब्राम्हणा, भगवंताकडे जा आणि नम्रतेने माझ्यातर्फे त्यांचे पायवंदन करून त्यांना विचार, "आपली प्रकृती ठीक आहे ना ? आपण स्वास्थ्य, सुख आणि आरोग्य उपभोगीत आहात ना ?"
५. "नंतर त्यांना सांग की, मगधराजा, अजातशत्रू वज्जीवर आक्रमण करण्यास उत्सुक आहे. वज्जीकुल कितीही सामर्थ्यशाली असले तरी त्याचा पुरेपूर नाश करण्याचा त्याचा विचार आहे."
६. अजानशत्रू पुढे म्हणाला, "भगवान, जे काही पुढले भविष्य होईल ते सांगतील. ते नीट लक्षात ठेव आणि त्यातला शब्द न् शब्द मला निवेदन कर. कारण भगवान बुद्ध कधीही खोटे बोलत नसतात."
७. राजाचे शब्द ऐकून तो ब्राम्हण वस्सकार म्हणाला, "ठीक आहे." आणि अनेक उत्कृष्ट रथ जोडून तो गृधकूटाकडे निघाला.
८. तेथे पाहोचल्यावर भगवंतांना कुशल प्रश्न विचारून राजाने आज्ञा केल्याप्रमाणे राजाचा संदेश त्याने निवेदन केला.
९. त्या वेळी स्थविर आनंद भगवन्ताच्यामागे उभा होता. भगवंत त्यास म्हणाले. "आनंद, वज्जी वारंवार सार्वजनिक सभा भरवतात हे तू ऐकले आहेस काय?"
१०. आनंदाने उत्तर दिले, "होय भगवंत, मी ऐकले आहे."
११. यावर भगवंत पुढे म्हणाले, 'आनंद, जोपर्यंत वज्जी सर्व लोकांच्या वारंवार सभा भरवीत असतात तोपर्यंत ते कधीच नाश पावणार नाहीत. उलट त्यांची भरभराट होत राहील.
१२. 'आनंद, जोपर्यंत वज्जी एकोप्याने एकत्र येतात, एकोप्याने उभे ठाकतात, एकोप्याने आपापली उद्दिष्ट कार्ये करतात.

१३. 'जोपर्यंत कोणतेही उद्दिष्ट मान्य झाल्याशिवाय तदनुसार वर्तन करीत नाहीत, ज्या उद्दिष्टाला एकदा सर्वमान्यता मिळाली आहे ते वर्ज्य समजत नाहीत आणि गतकाळात वज्जीकुळाने जे नियम केले आहेत त्या नियम-परंपरेप्रमाणे आचरण करतात.
१४. 'जोपर्यंत ते वज्जी आपल्यामधील वृद्धांना मान देतात, त्यांची वाहवा करतात, त्यांचा आदर करतात आणि त्यांची सल्लामसलत ऐकणे हे आपले कर्तव्य मानतात,
१५. 'जोपर्यंत आपल्या कुळांतील कोणत्याही स्त्रीला अथवा कन्येला ते बळ-जबरीने डांबून ठेवीत नाहीत आणि सामर्थ्याच्या जोरावर तिचे अपहरण करीत नाहीत,
१६. 'जोपर्यंत वज्जी धम्माला मान देतात आणि त्याचे परिपालन करतात,
१७. 'तोपर्यंत, हे आनंदा, वज्जीकुळाची अधोगती होणार नाही. उलट त्यांची भरभराटच होत राहील आणि कोणीही त्यांचा नाश करू शकणार नाही.'
१८. 'सारांश, जोपर्यंत वज्जी प्रजातंत्रावर विश्वास ठेवतील, प्रजातंत्रकाप्रमाणे आचरण करतील तोपर्यंत त्यांच्या राज्याला संकट स्पर्श करू शकणार नाही, असे भगवन्तांनी स्पष्ट केले.'
१९. नंतर भगवन्त वस्सकाराला उद्देशून म्हणाले,
२०. 'हे ब्राम्हणा, मी वैशाली येथे वज्जीकुळात राहात असताना त्यांच्या कल्याणास ह्या वरील अटी कशा आवश्यक आहेत हे त्यांना शिकविले.'
२१. तेव्हा तो ब्राम्हण म्हणाला, 'तर मग वज्जी जोपर्यंत ह्या वहिवाटीचे परिपालन करीत आहेत तोपर्यंत त्यांची अधोगती न होता त्यांचे कल्याणच वृद्धिगत होणार असे आम्ही मानायचे तर ? हे गौतमा, मगधराजाला वज्यीचा पाडाव करता येणार नाही असे तुझे म्हणणे दिसते.'
२२. असे बोलून वस्सकार उठून राजगृह येथे आपल्या राजाला भगवंताचे शब्द सांगायला निघुन गेला.

## ४. युद्ध हा चुकीचा मार्ग आहे

१. एकदा मगध राजा अजातशत्रू याने आपले अश्वदळ, पायदळ गोळा करून पसेनदी राजाच्या काशी विभागावर स्वारी केली. पसेनदीनेही स्वारीचा वृत्तान्त ऐकून घोडदळ पायदळाचे सैन्य जमविले आणि तो अजातशत्रूला तोंड द्यावयास निघाला.
२. त्या दोन्ही सैन्यांचे युद्ध झाले. अजातशत्रूने राजा पसेनदीचा पराभव केला आणि पसेनदी शेवटी आपली राजधानी श्रावस्ती येथे माघार घेऊन राहिला.
३. श्रावस्तीमध्ये राहणारे भिक्खु भिक्षाटण करून परत आले आणि त्यांनी भगवंतांना त्या दोन राजांचे युद्ध आणि पसेनदीची माघार यासंबंधीचे वृत्त सांगितले.
४. भगवंत म्हणाले, 'भिक्खूहो, मगध राजा अजातशत्रू म्हणजे जगातील सार्या दुष्टपणाचा ठेवा आहे. उलट राजा पसेनदी हा जगातील चांगुलपणाचा मित्र आहे. सध्या तरी पसेनदी राजाला पराभूत मनुष्य म्हणून दुःखात रात्र काढावी लागगार आहे.
५. 'विजयातून द्वेष जन्मास येतो. जिताला दुःखात काळ कंठावा लागतो. परंतु जो शांत आहे आणि क्रोधरहित

आहे तो सुखात राहतो. कारण अशा माणसाच्या गावी जय आणि पराजय याची वार्ताच नसते.'

६. पुन्हा असे घडले की, त्या दोन राजांचे पुन्हा युद्ध जुंपले. परंतु त्या युद्धात कोसलराजा पसेनदी याने अजातशत्रूचा पराभव करुन त्याला जिवंत पकडले. तेव्हा राजा पसेनदीने स्वत:शी विचार केला की, मी ह्याच्या वाटेस गेलो नसतानाही हा राजा माझा पुतण्या असूनही मला त्रास देतो. आता मी त्याचे सर्व सैन्य, हत्ती, घोडे, रथ आणि पायदळ ताब्यात घेऊन त्याला केवळ आपल्या जीवनिशी सोडून दिले तर ? आणि त्याप्रमाणे पसेनदी राजाने केले.

७. श्रावस्तीमध्ये भिक्षाटण करून परतलेल्या भिक्खुंनी ही वार्ता भगवंताच्या कानी घातली. त्यावर भगवंत म्हणाते, " माणूस आपल्या स्वार्थासाठी दुसर्याला लुटतो, परंतु जेव्हा दुसरे त्याला लुटतात तेव्हा तो लुटला गेलेला मनुष्य परत दुसर्यांना लुटण्याची ईर्षा धरतो."

८. 'जोपर्यंत पापाचे फळ पक्व झाले नाही तोपर्यंत मूर्खाला सदैव वाटते, मला पाहिजे ती सुवर्णसंधी आता येणार. परंतु जेव्हा कर्माचे फळ भोगण्याची वेळ येते तेव्हा केल्या पापाबद्दल भय वाटू लागते.

९. 'हिंसकालाही त्याची हिंसा करणारा कोणी तरी भेटतोच. जेत्याला जिंकणारा कोणी तरी निपजतो. निंदकाला निंदक सापडतो.

१०. 'अशा रीतीने कर्मविपाकाने जो मनुष्य दुसर्याला लुटतो त्यावरही आपण स्वतः लुटला जाण्याची पाळी येते.'

## ५. शान्ती स्थापन करणार्या जेत्याची कर्तव्ये

१. जेव्हा जेता शांती स्थापन करण्याची सत्ता मिळवितो, त्या वेळी जितावर गुलामगिरी लादण्याचा नसला, तरी त्याची अधिकाधिक मानखंडना करण्याचा अधिकार सांगू लागतो. ह्या विषयावर बुद्धाचे मत अगदी वेगळे आहे. त्यांच्या मते शांती स्थापन करणे याला काही अर्थ असेल, तर जेत्याने जित्याच्या शांततेच्या काळाचा जित्याच्या कल्याणासाठी उपयोग करणे, हे त्याचे कर्तव्य ठरते. ह्या विषयावर बुद्धाने भिक्खुंना उद्देशून असे म्हटले आहे,-

२. ' युद्धविद्येत पारंगत असलेल्या माणसाने युद्धविराम झाल्यावर आपल्या अंगच्या ऋजुता, अनुग्रहणपूर्ण वाणी, उद्धटपणाविरहित दयाळू वृत्ति, ह्या गुणांचा आविष्कार केला पाहिजे. आपण कोणी आडदांड, आक्रमक नसून घरच्यासारखे वागणारे पाहुणे आहोत, इंद्रिय सुखाच्या आहारी न जाणारे, कुशाग्र बुद्धीचे, वायफळ बडबड न करणारे, हाव धरून परधन हिरावून न घेणारे असे आहोत, असे आपल्या वर्तणुकीने सिद्ध केले पाहिजे. लोक शाप देतील असे क्षुद्र आणि नीच वर्तन करून त्याने आपल्याला कमीपणा आणू नये.

३. ' सर्व प्राणिमात्रांना सुखसमृद्धी आणि शांतता लाभो. सबळ-दुर्बळ, लहान-मोठे, प्राणिमात्र शांततेचा सदैव उपभोग घेत राहोत. दुश्य-अदृश्य, जवळचे-दूरचे, जात आणि अजात जीव शांतीचा उपभोग घेवोत अशी वृत्ती जेत्याने राखली पाहिजे.

४. ' कोणालाही आपल्या बांधवाची खुशामत करण्याची अथवा त्यांचा उपमर्द करण्याची आणि कोणाला तुरुंगात डांबविण्याची अथवा द्वेष करण्याची पाळी जेत्याने येऊ देऊ नये.

५. ' ज्याप्रमाणे माता आपल्या एकुलत्या एक मुलाला इजा पोहचू नये म्हणून जपते, त्याप्रमाणे जेत्याने सर्व

जीवमात्रांसंबंधी विवेक धरावा. विश्वातील वरच्या खालच्या, भोवतालच्या सार्या देशांच्या प्राणिमात्रावर अंत:करणपूर्वक प्रेम करावे, त्यांच्याविषयी मनाला द्वेषाचा स्पर्श होऊ देऊ नये. कोणत्याही प्रकारे दुसर्याच्या अंत:करणात शत्रुत्व भावना निर्माण होईल असे काहीही कृत्य करू नये.

६. ‘ म्हणजे तुम्ही उभे असताना, चालत असताना, बसताना, उठताना, आपल्या संपूर्ण मानसिक सामर्थ्याने असा विचार करीत राहा, ‘ हा ब्रम्हविहारच आहे.’

# पंचम खंड: संघ

भाग पहिला - संघ
भाग दुसरा - भिक्खु आणि त्यांच्याविषयी भगवान बुद्धाची कल्पना
भाग तिसरा - भिक्खूची कर्तव्ये
भाग चवथा - भिक्खु आणि उपासक
भाग पाचवा - उपासकांसाठी नियम

# भाग पहिला: संघ

## १. संघ आणि त्याची संघटना

१. भगवंताच्या अनुयायांची दोन वर्गांत विभागणी होत असे. भिक्खु आणि गृहस्थ अथवा उपासक.

२. संघ ही भिक्खुंची संघटना. उपासकांची संघटना नव्हती.

३. बौद्ध भिक्खू हा मुख्यत: परिव्राजक असे. परिव्राजक ही संस्था बौद्ध भिक्खुंच्या संस्थेहून जुनी आहे.

४. प्राचीन परिव्राजक म्हणजे कौटुंबिक जीवनाचा त्याग करून इतस्तत: परिभ्रमण करणार्या लोकांचा समुदाय.

५. आचार्य आणि दार्शनिक यांच्या साहचर्यात यावे, त्यांची प्रवचने ऐकावी आणि नीतिशास्त्र, तत्वज्ञान, सृष्टी, गूढवाद इत्यादी विषयांवर त्यांच्याशी चर्चा करावी. तेणेकरून सत्यज्ञान मिळवावे हा त्यांच्या परिभ्रमणाचा हेतू असे.

६. काही प्राचीन परिव्राजक दुसरा गुरू मिळेपर्यन्त एका गुरूपाशी राहात. तर काही कोणालाही गुरू न मानता एकटेच राहात असत.

७. ह्या प्राचीन परिव्राजकांच्या वर्गात स्त्री-परिव्राजकही असत. त्या कधी पुरुष परिव्राजकाबरोबर राहात तर कधी स्वतंत्रपणे राहात.

८. ह्या प्राचीन परिव्राजकांचा संघ नसे. वर्तनाचे नियम नसत. ज्या ध्येयासाठी झटायचे असे ध्येयही त्यांच्यासमोर नसायचे.

९. भगवंतांनीच प्रथम आपल्या अनुयायांचा एक संघ अथवा भ्रातृभावाने एकत्र आलेला समुदाय बनविला आणि त्यांच्या वर्तणुकीचे नियम आणि ज्या ध्येयाची साधना करून ते प्राप्त करून घ्यायचे ते त्यांच्यापुढे ठेविले.

## २. संघप्रवेश

१. संघात कोणालाही प्रवेश मिळे.

२. त्याला जातीचे बंधन नसे.

३. त्यांत पुरुषाप्रमाणे स्त्रियांनाही बंदी नव्हती.

४. संघप्रवेशाला सामाजिक प्रतिष्ठेची आवश्यकता नसे.

५. संघात जातीला स्थान नव्हते.

६. संघात सामाजिक प्रतिष्ठेप्रमाणे उच्च-नीच असा भेद पाळला जात नसे.

७. संघात सर्व समान मानले जात असत.

८. संघामध्ये माणसाचे महत्व त्यांच्या अंगच्या गुणांवर ठरविले जात असे; कुळावर नसे.

९. भगवंत म्हणत असत, संघ हा एका महासागरासारखा असून भिक्खु म्हणजे महासागराला येऊन मिळणार्या नद्या होत.

१०. नद्यांना स्वतंत्र नावे व अस्तित्वे असतात.

११. परंतु नदी एकदा महासागराला मिळाली म्हणजे तिचे नाव आणि अस्तित्व लोप पावते.

१२. ती इतरांबरोबर मिळून एकरूप होते.

१३. संघाचीही स्थिती तशीच आहे. भिक्खूने एकदा संघात प्रवेश केला की तो समुद्राच्या पाण्याप्रमाणे एकरूप होऊन जातो.

१४. त्याची जात, त्याची सामाजिक प्रतिष्ठा व कुळ ही लोप पावतात असे भगवंत म्हणत.

१५. संघात जो एक भेद मानला जात असे तो लिंगविषयक; भिक्खू संघ आणि भिक्खुणी संघ, ह्या दोन वेगळ्या संस्था असत.

१६. संघातील घटकांचे श्रमणेर आणि भिक्खु असे दोन वर्ग पाडले जात.

१७. वीस वर्षाखालील प्रत्येक मनुष्य श्रमणेर मानला जाई.

१८. त्रिशरण आणि दशशीला ग्रहण केलेला प्रत्येक मुलगा श्रमणेर बने.

१९. 'त्रिशरण' म्हणजे मी बुद्धाला शरण आहे, मी धम्माला शरण आहे आणि मी संघाला शरण आहे.

२०. 'दशशीला' म्हणजे मी हिंसा करणार नाही, मी चोरी करणार नाही, मी ब्रम्हचर्य पाळीन, मी असत्य बोलणार नाही, मी मद्यपान करणार नाही.

२१. मी अवेळी अन्नसेवन करणार नाही. मी असभ्य आणि अनैतिक कृत्य करणार नाही. मी अलंकाराने आपले शरीर भूषविणार नाही. मी ऐषआरामापासून दूर राहीन. मी सुवर्ण आणि रौप्य यांचा लोभ धरणार नाही.

२२. अशा ह्या दहा प्रतिज्ञा आहेत. ह्या प्रत्येक श्रमणेराने घ्यावयाच्या दहा प्रतिज्ञा आहेत.

२३. श्रमणेराला कोणत्याही काळी संघ सोडून उपासक बनता येत असे. श्रमणेर हा भिक्खुंच्या स्वाधीन असून भिक्खुंच्या सेवेत आपला काळ व्यतीत करीत असे. त्याने परिव्रज्या घेतलेली नसे.

२४. भिक्खु व्हायला दोन अवस्थांतून जावे लागे; पहिली परिव्रज्या आणि दुसरी उपसंपदा. उपसंपदा घेतल्यावरच तो भिक्खू ठरे.

२५. ज्या श्रमणेराला भिक्खु होण्यासाठी परिव्रज्या घेण्याची इच्छा असेल त्याला ज्या भिक्खूला उपाध्यायपदाचा अधिकार असे त्याच्याकडे जावे लागे. भिक्खू म्हणून दहा वर्षे घालविल्याशिवाय भिक्खूला उपाध्यायपद प्राप्त होत नसे.

२६. उपाध्यायाने श्रमणेरला त्याचा परिव्राजक म्हणून स्वीकार केल्यावर त्याच्या सेवेत आणि संरक्षणात राहावे लागे.

२७. हा शिक्षणाचा काळ संपल्यानंतर उपसंपदेसाठी खास बोलाविलेल्या संघ सभेत उपाध्यायाला श्रमणेरावर उपसंपदेचा अनुग्रह करावा अशी संघाला विनंती करावी लागे.

२८. जो भिक्खूपदाचा प्रार्थी आहे, तो परिव्राजक त्या पदाला योग्य आहे की नाही. याची खात्री संघाला करून घ्यावी लागे. ही खात्री करून घेण्यासाठी परिव्राजकाला काही ठराविक प्रश्नांची उत्तरे द्यावी लागत.

२९. जेव्हा संघ उपसंपदेची अनुमती देईल तेव्हाच परिव्राजकाला भिक्खुपद पद मिळे.

३०. भिक्खुणी संघात प्रवेशासंबंधीचे नियम भिक्खूसंघ प्रवेशाच्या नियमासारखेच असत.

## ३. भिक्खु आणि त्याच्या प्रतिज्ञा

१. उपासक आणि श्रमणेर शीलप्रतिपालनाच्या अटीने आपणाला बांधून घेतो.
२. भिक्खू शील ग्रहण करतो ते व्रत म्हणून, शीलव्रताचे उल्लंघन करणार नाही अशी त्याला प्रतिज्ञा करावी लागते. उल्लंघन झाल्यास तो शिक्षेस पात्र ठरतो.
३. भिक्खु ब्रम्हचर्याची प्रतिज्ञा करतो.
४. भिक्खू चोरी न करण्याची प्रतिज्ञा करतो.
५. भिक्खू वृथा वल्गना न करण्याची प्रतिज्ञा करतो.
६. भिक्खु जीवहत्या न करण्याची प्रतिज्ञा करतो.
७. नियम ज्याची अनुज्ञा देत नाही त्या वस्तु जवळ न बाळगण्याची भिक्खु प्रतिज्ञा करतो.
८. भिक्खूला खालील आठ वस्तु फक्त जवळ बाळगता येतात : ( १ ) शरीर आच्छादनासाठी तीन चीवरे; ती म्हणजे ( i ) कंबरेस गुंडाळण्याचे अंतरवासक, ( ii ) अंगावर घ्यावयाचे उत्तरासंग आणि ( iii ) थंडीवाऱ्यापासून रक्षण करण्यासाठी संघाटी हे वस्त्र. ( २ ) करगोटा; ( ३ ) भिक्षापात्र; ( ४ ) वस्तरा; ( ५ ) सुई धागा; ( ६ ) पाणी गाळण्याचा कपडा.
९. भिक्खु निर्धन राहण्याची प्रतिज्ञा करतो. अन्नासाठी त्याने भिक्षा मागितली पाहिजे. भिक्षेवरच त्याने आपली उपजिवीका केली पाहिजे. दिवसासून एकच वेळ त्याने भोजन घेतले पाहिजे. ज्या ठिकाणी संघासाठी विहार बांधला नसेल त्या ठिकाणी त्याने झाडाखाली राहिले पाहिजे.
१०. भिक्खू आज्ञापालनाची प्रतिज्ञा करीत नाही. आपल्याहून श्रेष्ठाचा मान राखणे, औपचारिक नम्रता दाखविणे, ह्या गोष्टी श्रमणेराकडून अपेक्षित असतात. भिक्खूची मुक्ती आणि गुरू म्हणून उपयुक्तता ही त्याच्या साधनेवर अवलंबून असते. त्याने वरिष्ठाच्याऐवजी धम्माची आज्ञा पाळावयाची असते. त्याच्या वरिष्ठाजवळ प्रज्ञा अथवा मोक्ष दानाचे दैवी सामर्थ्य असते असे तो मानीत नाही. अधःपतन अथवा उद्धार हा ज्याच्या त्याच्या स्वाधीन आहे, म्हणून त्याला विचारस्वातंत्र्य असले पाहिजे.
११. प्रतिज्ञाभंग घडल्यास भिक्खूच्या हातून पाराजिका हा दोष होतो. पाराजिका दोषास शिक्षा म्हणजे संघातून हकालपट्टी करणे.

## ४. भिक्खू आणि धार्मिक दोष

१. भिक्खूकडून घडलेला प्रतिज्ञाभंग हा त्याने धर्माविरुद्ध केलेला अपराध असे समजले जाते.
२. या अपराधाशिवाय भिक्खूच्या बाबतीत इतरही काही अपराध मानले जात. त्यांना संघादिसेस अशी संज्ञा होती.
३. विनयगिटकांत अशा तेरा अपराधांची यादी आढळते.
४. ते पाराजिकासारखे आहेत.

## ५. भिक्खु आणि प्रतिबंध

१. संघादिसेस आणि पाराजिका यांशिवाय भिक्खूला काही प्रतिबंध अथवा नियम पाळावे लागत. गृहस्थासारखा भिक्खु वाटेल ते करू शकत नाही.
२. यापैकी एका प्रतिबंध प्रणालीला निस्सगीय पाचित्तिय अशी संज्ञा असून, त्यात भिक्खुने पाळावयाचे सव्वीस प्रतिबंध समाविष्ट होतात.
३. हे प्रतिबंध चीवरे, लोकरीचा बिछाना, भिक्षापात्र, आणि औषधी यांच्या स्वीकृती-अस्वीकृती संबंधी आहेत.
४. काही प्रतिबंध स्वर्ण आणि रौप्य यांचे दान षेणे वा न घेणे यासंबंधी आहेत. काही संघाला मिळालेली मालमत्ता स्वत: स्वीकारण्याच्या आणि देवघेवीच्या कामी नेमलेल्या भिक्खुसंबंधी आहेत.
५. याप्रतिबंधाच्या उल्लंघनास निस्सणीय म्हणजे परतफेड आणि प्राचित्तिय म्हणजे पश्चात्ताप व्यक्त करणे ह्या शिक्षा सांगितलेल्या आहेत.
६. ह्या प्रतिबंधाशिवाय भिक्खुला पाचित्तिय या नावाचे ब्यान्नाव निर्बंध पाळावे लागतात.

## ६. भिक्खु आणि शिष्टाचाराचे नियम

१. भिक्खूचे वर्तन चांगले असावे. त्याची चालचलणूक इतरांना आदर्शवत वाटेल अशी असावी.
२. यासाठी भगवंतांनी शिष्टाचाराचे अनेक नियम केलेले आहेत.
३. शिष्टाचाराच्या नियमाना सेखिय धम्म अशी संज्ञा असून त्यांची संख्या एकंदर पंचाहत्तर आहे.

## ७. भिक्खु आणि दोषपरीक्षा

१. कसे वागायचे आणि कसे वागायचे नाही यासंबंधीचे नियम केवळ औपचारिक नव्हते. त्यांना कायद्याचे स्वरूप असून त्यात आरोप ठेवणे, न्यायपरीक्षा आणि शिक्षा यांचा अंतर्भाव होई.
२. योग्य रीतीने नियोजिलेल्या न्यायमंडळाशिवाय भिक्खूला शिक्षा करता येत नसे.
३. हे न्यायमंडळ ज्या ठिकाणी भिक्खूच्या हातुन अपराध घडला त्या ठिकाणी राहणार्या भिक्खुंचे बनविलेले असे.
४. न्यायमंडळासाठी लागणारी भिक्खुंची आवश्यक संख्या उपस्थित असल्याशिवाय भिक्खुची न्यायपरीक्षा होत नसे.
५. आरोप निश्चित असल्याशिवाय कोणत्याही न्यायपरीक्षेला कायदेशीर स्वरूप येत नसे.
६. कोणतीही न्यायपरीक्षा आरोपीच्या अनुपस्थितीत केल्यास तिला कायदेशीर स्वरूप येत नसे.
७. आरोपीला स्वत:च्या बचावाची पूर्ण संधी दिली नसल्यास कोणतीही न्यायपरीक्षा कायदेशीर मानली जात नसे.

८. ज्याच्यावरील आरोप सिद्ध झाला आहे त्या भिक्खूला खालीलप्रमाणे शिक्षा देण्यात येत-

(i) तर्जनीय कर्म ( ताकीद देऊन सोडणे )

(ii) नियस्सकर्म ( वेडा म्हणून जाहीर करणे )

(iii) प्रव्राजनीय कर्म (संघातून हकालपट्टी )

(iv) उत्क्षेपणीय कर्म (बहिष्कार )

(v) परिवासकर्म ( विहारांतून बाहेर घालविणे )

९. विहारांतून बाहेर घालविल्यावर अब्भानकर्माचा उपयोग करता येत असे. अब्भानकर्म म्हणजे संघाचे रद्द केलेले सभासदत्व परत देणे. अब्भानकर्म हे विहारातून बाहेर घालविल्यानंतर भिक्खूने आपली वागणूक नीट ठेवून संघाचे समाधान केले आणि संघाने क्षमा केली तरच केले जात असे.

## ८. भिक्खु आणि अपराध स्वीकृती

१. भिक्खूसंघविषयक जी अगदी नवीन आणि अपूर्व अशी संस्था भगवंतानी निर्मिली ती म्हणजे उपोसथ अथवा हातून घडलेल्या अपराधाची स्वीकृती ही संस्था होय.

२. अपराध किंवा दोष यासंबंधी केलेल्या नियमांचे परिपालन करावयाला लावणे शक्य आहे हे भगवंतांच्या लक्षात आले होते. परंतु ज्यांचे उल्लंघन झाले असता दोष अथवा अपराध घडत नसे असेही काही प्रतिबंध भगवंतांनी घालून दिले होते. त्यांच्या मते प्रतिबंधांचा शीलनिर्मिती आणि शीलसंवर्धन ह्यांच्याशी अतिशय दाट संबंध असल्यामुळे त्यांचेही परिपालन करणे अपराधासंबंधीच्या नियमांच्या परिपालना इतकेच आवश्यक आहे.

३. परंतु या प्रतिबंधाचे परिणामकारक रीतीने परिपालन करण्याचा मार्ग त्यांना आढळेना. म्हणून त्यांनी लोकांसमोर या प्रतिबंधाच्या उल्लंघनाची उघड कबुली देणे हा उपोसयाचा प्रकार शोधून काढला. हा प्रकार म्हणजे भिक्खूची सदसद्विवेक बुद्धी संघटित करून वाममार्गी त्याचे पाऊल न पडेल अशी काळजी घेणारी शक्ती निर्माण करणे.

४. उपोसथ अथवा अपराधाची कबूली देणे हे पतीमोख्ख या भिक्खु नियमांच्या उल्लंघनापुरते मर्यादित होते.

५. उपोसथासाठी त्या त्या ठिकाणच्या भिक्खुंची सभा भरवावी लागे. दर पंधरवड्यात अशा तीन सभा भरविल्या जात. पहिली चतुर्दशीला, दुसरी पंचमीला, आणि तिसरी अष्टमीला. त्या दिवशी भिक्खूला उपवास करावा लागे, म्हणूनच कबलीच्या दिवसाला उपोसथ म्हणतात.

६. सभेत एक भिक्खु पतीमोख्खातील एकेक प्रतिबंध (नियम ) वाचून दाखवी आणि उपस्थित भिक्खुंना उद्देशून तो म्हणे, 'तुम्ही स्तब्ध आहात यावरून तुमच्यापैकी कोणीही या प्रतिबंधनाचे उल्लंघन केलेले नाही असे मी गृहीत धरतो.' हे वाक्य त्रिवार उच्चारून तो मग पुढल्या प्रतिबंधाकडे वळे.

७. अशाच तऱ्हेची उपोसथाची सभा भिक्खुणी संघातही होई.

८. प्रतिबंध उल्लंघनाची कबुली दिल्यास पुढे आरोप ठेवून न्यायपरीक्षा चाले.

९. अपराध घडला असूनही एखाद्या भिक्खूने तो कबूल केला नाही, तर त्याला तो अपराध करताना ज्या भिक्खूने

पाहिले असेल त्या भिक्खूने तो सभेत सांगावयाचा. असे झाल्यावर मग अपराधी भिक्खूवर आरोप ठेवून त्याच्या न्यायपरीक्षेला सुरुवात होई.

# भाग दुसरा: भिक्खू आणि त्यांच्याविषयी भगवान बुद्धाची कल्पना

## १. भिक्खू कसा असावा यासंबंधी बुद्धाची कल्पना

१. भिक्खूकडून आपल्या काय अपेक्षा आहेत हे स्वतः बुद्धाने भिक्खुंना सांगितले ते असे-

२. "जो कोणी चित्तमल धुवून टाकल्याशिवाय, त्याप्रमाणेच सत्य आणि संयम यांचा मान न राखता काषायवस्त्रे धारण करण्याची इच्छा करतो, तो ती वस्त्रे परिधान करायला लायक नाही.

३. परंतु ज्याने चित्तमलाचे परिमार्जन केले आहे, ज्याच्या अंगी सद्गुणाची वाढ झालेली आहे, जो सत्य आणि संयम पाळावयाला शिकला आहे तोच खरोखर काषायवस्त्रे धारण करण्यास योग्य आहे.

४. जो मनुष्य दुसर्याजवळ नेहमी भीक मागतो म्हणून तो काही भिक्खू होऊ शकत नाही. जो धम्माचे पालन करतो तोच भिक्खू होय. केवळ भिक्षा मागणारा भिक्खू ठरत नाही.

५. ज्याला दुष्टपणा स्पर्श करीत नाही, जो अव्यभिचारी आहे, जो सावधानपणे जगात परिभ्रमण करतो, तोच खरोखर भिक्खु होय.

६. सामान्यजनांना अप्राप्य असे मुक्तिसुख, विनय, शील, पांडित्य, एकांतवास, आणि ध्यान यामुळेच लाभत नसून हे भिक्खू ज्याने वासनांचा ( आस्त्रवाचा ) क्षय केला त्यालाच ते सुख संपादन करता येते, असे निश्चितपणे म्हणता येईल.

७. ज्याच्या वाणीत संयम आहे, जो विचारपूर्वक बोलतो, जो लीन आहे, जो धम्म स्पष्ट करतो, अशा भिक्खूचे भाषण मधुर असते.

८. धम्मात आनंद मानणारा, धम्मात रममाण असणारा, धम्माचे चिंतन करणारा, धम्माचे सदैव स्मरण ठेवून त्याप्रमाणे वागणारा असा भिक्खू सद्धम्मपासून च्युत होणार नाही.

९. जे आपल्याला लाभले आहे त्याची अवहेलना करू नये. दुसर्याला लाभलेल्याची स्पृहा करू नये. दुसर्याचा मत्सर करू नये. जो भिक्खू दुसर्याचा मत्सर करतो त्याला मानसिक समाधान लाभत नाही.

१०. अल्पच का होईना, परंतु जे मिळाले आहे त्याचा जो अव्हेर करीत नाही, जो शुद्धजीवी आहे, प्रमादरहित आहे अशाची देवसुद्धा प्रशंसा करतात.

११. जो आपले नामरूप म्हणजेच आपण असे समजत नाही आणि जो नष्ट झाले आहे त्याबद्दल दुःख करीत नाही त्यालाच खरोखर भिक्खु म्हणावे.

१२. जो भिक्खु मैत्रीत रमलेला आहे, जो बुद्धशासनात प्रसन्न असतो तो वासनाच्या ( आस्त्रव ) क्षयाने प्राप्त होणारे सुखमय शांतिपद-निब्बाण प्राप्त करतो.

१३. हे भिक्खु, तू ही नाव रिकामी कर. रिकामी झाली म्हणजे ती हलकी होईल. राग आणि द्वेष यांचा नाश केलास तर तू निर्वाणाला जाशील.

१४. पाच बंधनांना तोडून टाकावे. पाच बंधनांचा त्याग करावा. पाच बंधनांवर मात करावी. पाच बंधनांच्या पलीकडे गेलेल्या भिक्खुला ओघतीर्ण म्हणतात.

१५. हे भिक्खू, ध्यान कर. प्रमादात राहू नको. आपले चित्त कामोपभोगात रमू देऊ नकोस.

१६. प्रज्ञेशिवाय ध्यान शक्य नाही. ध्यानाशिवाय प्रज्ञा नाही. ज्याच्याजवळ प्रज्ञा आणि ध्यान दोन्हीही आहेत असा पुरुष निर्वाणाच्या जवळ आहे.

१७. ज्या भिक्खूने एकान्तवास केला आहे, ज्याचे मन शांत आहे, त्याला धम्माचे सम्यक् आकलन झाले असता अलौकिक आनंद होतो.

१८. प्रज्ञायुक्त भिक्खूच्या जीवनाला इंद्रियांवर ताबा ठेवणे, संतुष्ट असणे, धम्माने घालून दिलेल्या निर्बंधाचे ( प्रतिमोक्षाचे ) पालन करणे, ज्याचे जीवन शुद्ध आहे, जे आलस्यरहित आहेत अशा थोर मित्रांची संगत ठेवणे यापासून प्रारंभ होतो.

१९. आपली उपजीविका प्राप्त भिक्षेवर करील, आपली कर्तव्ये यथायोग्य पार पाडील तो आनंदभरात आपल्या दुःखाचा अंत करील.

२०. स्वतःला स्वतःच जागे कर, स्वतःच स्वतःची परीक्षा कर असा आत्मरक्षित आणि सावधान चित्त झाल्यावर हे भिक्खु, तू सुखाने राहशील.

२१. कारण मनुष्य स्वतःच आपला स्वामी आहे. तो स्वतःच आपली गती आहे. म्हणून ज्याप्रमाणे व्यापारी उमद्या घोड्याला आपल्या ताब्यात ठेवतो त्याप्रमाणे मनुष्याने आपले नियमन करावे.

२२. जो भिक्खु अप्रमादी राहण्यात आनंद मानतो, जो अविकाराचे भय मानतो, तो आपले लहानमोठे बंध जाळून संचार करीत असतो.

२३. जो भिक्खु चिंतनात आनंद मानतो, अविचाराचे भय मानतो, तो कधीही आपल्या पूर्ण अवस्थेपासून च्युत होत नाही, तो सदैव निब्बाण सान्निध्य अनुभवतो.

२४. गौतमाचे शिष्य हे सदैव जागृत असतात आणि त्यांचे विचार रात्रंदिवस बुद्धाचे ध्यान करतात.

२५. गौतमाचे शिष्य हे सदैव जागृत असतात आणि त्यांचे विचार रात्रंदिवस संघावर एकाग्र झालेले असतात.

२६. गौतमाचे शिष्य हे सदैव जागृत असतात आणि त्यांचे विचार धम्माचे ध्यान रात्रंदिवस करतात.

२७. गौतमाचे शिष्य सदैव जागृत असतात आणि त्यांचे विचार स्वशरीराच्या सर्व क्रियांचे रात्रंदिवस ध्यान करतात.

२८. गौतमाचे शिष्य सदैव जागृत असतात आणि त्यांचे मन रात्रंदिवस करुणेत समाधान मानते.

२९. गौतमाचे शिष्य सदैव जागृत असतात. त्यांचे मन रात्रंदिवस चिंतनात आनंद मानते.

३०. संसारत्याग बिकट आहे. संसारोपभोग बिकट आहे. विहारवास बिकट आहे. गृहवास दुःखदायक आहे. समाजाबरोबर एकत्र राहणे आणि सर्व गोष्टी त्यांच्याबरोबर समानतेने सेवणे हे दुःखकर आहे. परिभ्रमण करणार्या भिक्खूसमोर दुःखच वाढून ठेवलेले आहे.

३१. ज्याच्या ठिकाणी धम्मश्रद्धा आहे, शील आणि यश यांनी जो ऐश्वर्यवान आहे तो कुठेही गेला तरी सर्वत्र पूजनीय ठरतो.

## २. भिक्खु आणि तपस्वी

१. भिक्खू म्हणजे तपस्वी काय ? याचे उत्तर 'नाही' असे आहे.

२. स्वतः भगवंतांनीच निग्रोध या नावाच्या परिव्राजकाबरोबर झालेल्या संवादात या प्रश्नाचे नकारात्मक उत्तर दिले आहे.

३. एकदा भगवंत राजगृहाजवळील गृध्रकूटावर राहात होते. त्या वेळी उदुंबरीका राणीच्या उद्यानामध्ये राहणार्या पुष्कळशा परिव्राजकांमध्ये निग्रोध नावाचा एक परिव्राजक होता.

४. त्या सुमारास भगवंत गृध्रकूटावरून उतरून सुमगंधा नदीच्या काठावर, ज्या ठिकाणी मोरांना दाणे घालीत. तिथे मोकळया हवेत येरझारा करीत होते. त्या वेळी निग्रोधाने भगवन्तांना येरझारा घालताना पाहिले. तेव्हा तो आपल्या परिव्राजक अनुयायांना म्हणाला, कृपा करून शांत रहा. श्रमण गौतम सुमगंधेच्या तीरावर आहेत. त्याच्या सांगण्यावरून सर्व परिव्राजक स्तब्ध राहिले.

५. नंतर भगवंत परिव्राजक निग्रोधाजवळ गेले, निग्रोध त्यास म्हणाला, 'भगवंत, या. मी आपले स्वागत करतो. आपण येथे आगमन करण्याचा निश्चय करण्यापूर्वी पुष्कळच विचार केला असावा. ह्या इथे सिद्ध असलेल्या आसनावर आपण बसावे.'

६. पुढे केलेल्या आसनावर भगवंत स्थानापन्न झाले. निरोध भगवंतापेक्षा एका ठेंगण्या आसनावर त्यांच्याच बाजूला बसला.

७. नंतर निग्रोध भगवंतांना म्हणाला, ' श्रमण गौतम आमच्या ह्या चमूत आले आहेत. म्हणून मी त्यांस एक प्रश्न विचारतो. भगवतांचा धर्म काय ? आपल्या शिष्यांना ते काय धर्मविनय शिकवितात ? आणि असे भगवंतानी आत्मसुखप्राप्ती शिकविलेले शिष्य कशाला शरण जातात ? त्यांच्या सदाचरणाची मुख्य तत्वे कोणती?'

८. ' हे निग्रोध, ज्याचा दुष्टिकोन, निष्ठा आणि श्रद्धा भिन्न आहेत त्या आपल्या शिष्यांना आत्मसुखप्राप्तीसाठी मी काय शिकवितो? त्यांचे अंतिम शरण्य काय आणि त्यांची सदाचरणाची मुख्य तत्वे कोणती ? हे विनभ्यास, विनाशिक्षण समजणे कठीण आहे.'

९. ' परंतु हे निग्रोध, तू आपल्या स्वतःच्या सिद्धांताविषयी आणि खडतर जीवन-निष्ठेविषयी मला प्रश्न विचार. आत्मपीडेपासून काय साधते आणि काय साधत नाही याविषयी मला प्रश्न कर.'

१०. यावर निग्रोध भगवन्तांना म्हणाला, ' भगवन्त, आम्ही आत्मक्लेशाचे तप करतो. आमच्या मते आत्मक्लेश अत्यावश्यक आहेत, म्हणून आम्ही त्यांचा स्वीकार करतो. त्यापासून काय साधते आणि काय साधत नाही हे सांगा.'

११. ' निग्रोध, कल्पना कर की, एक परिव्राजक वस्त्ररहित फिरतो आहे. त्याला काही विशिष्ट वाईट सवयी आहेत. तो आपले हात चाटतो, आपल्याकडे येणार्यांना मान देत नाही. त्याच्यासाठी मुद्दाम आणलेले किंवा तयार केलेले तो काहीच घेत नाही. आमंत्रणे स्वीकारीत नाही. ज्यात अन्न शिजविले आहे त्या भांड्यातले, उंबरठ्याच्या आत ठेवलेले, उखळातले, काट्याकुट्यातले, जात्यातले वगैरे काही घेत नाही; त्याप्रमाणेच एकत्र भोजन करीत असलेल्या दोन माणसांचे, गर्भवती स्त्रीचे, बाळंतिणीजवळचे, संभुक्त स्त्रीजवळचे, दुष्काळातले, कुत्रा जवळ असला तर तेथले, ज्या ठिकाणी माशा फणफणत आहेत तेथले अन्न तो स्वीकारीत नाही; मत्स्य, मांस, तीव्र मादक पेये, किंवा पेज घेत नाही असा तो परिव्राजक असेल. तो कदाचित एकाच घरचे मागणारा, एकच घास खाणारा, किंवा दोन घरी मागणारा, दोन घास खाणारा; सात घरी मागणारा, सात घास खाणारा असेल तो एकदोन

अथवा सात दानांवर उपजीविका करीत असेल, तो प्रतिदिवशी एकदाच किंवा दोन दिवसांतून एकदा, किंवा सात दिवसांतून एकदा अन्नभक्षण करीत असेल. अशा रीतीने नियमाप्रमाणे अर्ध्या अर्ध्या महिन्याच्या अंतराने अन्नसेवन करण्याची त्याची पद्धत असेल, तो शाक अथवा वनात उगवणारे तांदूळ, अथवा निवार बीजे, अथवा चामड्याचे तुकडे, अथवा आटा, अथवा भाताचा कोंडा, भाताचे पीठ, अथवा कणी, अथवा तेलबीजे, अथवा गवत अथवा गाईचे शेण, अथवा रानातील वार्याने पडलेली फळे, फुले खाऊन तो राहात असेल. तो जाडेभरडे तागाचे कापड, अथवा प्रेतावरून फेकून दिलेल्या चिंध्या अथवा तिरीटा झाडाची वल्कले, अथवा काळविटाची कातडी, अथवा कुशतंतू, अथवा मनुष्य-केसापासून अथवा घोड्याच्या केसापासून बनविलेली कांबळी, अथवा घुबडाच्या पिसांपासून बनविलेले कपडे वापरीत असेल, त्याला डोक्याचे व दाढीचे केस उपटून काढण्याची सवय जडलेली असेल, तो सदैव उभा राहणारा, टांचावर बसणारा आणि टांचावर बसूनच पुढे सरकण्याचे श्रम करणारा, काट्याच्या अथवा लोखंडाच्या मेखांप्या बिछान्यावर पहुडणारा, लाकडी फळीवर अथवा जमिनीवर एकाच कुशीवर झोपणारा असेल, तो मळ आणि धूळ धारण करणारा, उघड्यावर राहणारा, वाटेल तेथे बसणारा,घाण खाणारा, पेय न पिणारा किंवा केवळ थंडपाणी पिणारा आणि सकाळ, दुपार,सायंकाळ स्नान करणारा असा तो असेल.

१२. 'हे सर्व करणार्या, हे निग्रोध, त्याने आत्मक्लेशाचे व्रत पाळले किंवा नाही, यापैकी तुम्ही काय मानणार?'
'भगवन्त, या सर्व गोष्टी त्याने केल्या तर आत्मक्लेशाचे तप त्याने पूर्ण केले असे आम्ही मानणार ! '

१३. 'हे निग्रोधा ! ह्या आत्मक्लेशाचे तप करणारा माझ्या मते अनेक परीने कलंकित झालेला असतो.'

१४. 'भगवन्त, कलंकित कसा?'

१५. 'निग्रोध, जेन्हा परिव्राजक एखाद्या तपाचे व्रत धरतो, तेव्हा त्यायोगेच संतुष्ट होऊन, आपले ध्येय साधले आहे असे तो मानू लागतो; आणि निग्रोधा, हाच पीरव्राजकाला जडणारा दोष आहे.

१६. 'आणि निग्रोधा, जेव्हा परिव्राजक तपाचे व्रत धरतो, तेव्हा स्वतःला उच्च समजून दुसर्यांचा तिरस्कार करू लागतो. हा सुद्धा परिव्राजकीय आचरणातील कलंक आहे.

१७. 'निग्रोधा, आणि जेव्हा परिव्राजक तपाचे व्रत घेतो तेव्हा तो त्या व्रताने, त्या तपाच्या कल्पनेने उन्मत्त आणि मोहित होऊन निष्काळजी बनतो, हासुद्धा एक कलंकच आहे.

१८. 'निग्रोधा, जेव्हा तपस्वी परिव्राजक तपाचे व्रत धरतो, तेव्हा त्या योगाने त्याला देणग्या, कीर्ती मिळते, लोकांचे लक्ष त्याच्याकडे लागते. तो आत्मसंतुष्ट होऊन आपले ध्येय मिळाले आहे असे मानू लागतो. हाही परिव्राजकातील कलंकच आहे.

१९. 'अशा देणग्या, कीर्ती आणि लोकांची नजर आपल्याकडे ओढून घेतल्याने तो परिव्राजक स्वतःला मोठा समजून दुसर्याचा द्वेष करू लागतो, हा सुद्धा परिव्राजकाचा दोष आहे.

२०. 'आणि पुन्हा, हे निग्रोध, दान, देणग्या आणि कीर्ती मिळविल्यावर आणि लोकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतल्यानंतर तो उन्मत्त बनून निष्काळजी होतो. हा सुद्धा तपस्व्यामधला कलंक होय.

२१. 'आणि पुन्हा, हे निग्रोधा, जेव्हा तपस्वी आपल्या साधनेला प्रारंभ करतो किंवा जेव्हा एखादे व्रत स्वीकारतो तेव्हा अन्नाअन्नात भेद करू लागतो. तो म्हणतो, हे मला योग्य आहे, ते मला योग्य नाही. त्याला जे अयोग्य वाटते त्याचा तो बुद्धिपुरस्सर निषेध करतो. आणि ज्याला जे अन्न योग्य वाटते त्यासंबंधी त्याला लोभ वाटतो. त्याने तो

मोहित होतो. त्याचीच तो हाव धरतो. ह्या प्रकारच्या अन्नात काही धोका नाही, हानिकारकता नाही असे मानून तो त्याचा उपभोग घेतो. हाही तपस्व्याच्या ठायीचा कलंक होय.

२२. 'आणि पुन्हा हे निग्रोधा, दान, धर्म, कीर्ती, लोकप्रियता, मान यांच्या लोभामुळे तो असा विचार करतो की, राजा मला मान देईल, माझा सन्मान करील. त्याचे कर्मचारी, क्षत्रिय, ब्राम्हण, गृहस्थ आणि मोठमोठे आचार्यही मला मान देतील. हाही तपस्व्याच्या ठायीचा कलंक आहे.

२३. 'आणि हे निग्रोध, पुन्हा तो तपस्वी एखाद्या संन्याशी अथवा ब्राम्हणासंबंधी कुरकुरू लागतो की, तो अमुक मनुष्य सर्व प्रकारच्या अन्नावर आपली उपजीविका करतो. तो कंदमूळ, फळ, शाक आणि धान्य, बी, बिया, जात्यासारख्या आपल्या जबड्याने चघळतो. तरीसुद्धा लोक त्याला पवित्र मानतात. ( दुसर्यांना तिरस्करणीय मानण्याची वृत्ती ) हा सुद्धा तपस्व्याच्या ठायी कलंक आहे.

२४. 'आणि हे निग्रोधा, पुन्हा ज्या वेळी तो तपस्वी एखाद्या श्रमणाचा, ब्राम्हणाचा लोक दानधर्माने मानसन्मान करतात त्या वेळी म्हणतो, सुखोपभोग करणार्या ह्या माणसाचा लोक सन्मान करीत आहेत. दानधर्म करून त्याची पूजा करीत आहेत, आणि मी खरोखर खडतर तप आचरीत असता मला मात्र मान देत नाहीत; दानधर्म करून माझी पूजा करीत नाहीत. अशा रीतीने तो मत्सराधीन होतो आणि लोकांसंबंधी कुरकुर करू लागतो. हा सुद्धा तपस्व्याच्या ठायी कलंक आहे.

२५. 'आणि हे निग्रोधा, तो तपस्वी रहस्यमय गूढता धारण करतो. तुम्हांला अमुक एक मान्य आहे काय असा आपण प्रश्न केला असता ते अमान्य असूनही तो ते मान्य आहे असे म्हणतो, आणि मान्य असूनही अमान्य आहे असे म्हणतो. अशा रीतीने तो बुद्धिपुरस्सर असत्य भाषण करतो. हाही त्या तपस्व्याच्या ठायीचा कलंक आहे.

२६. ' आणि हे निग्रोधा, पुन्हा तो तपस्वी क्रोधाधीन होण्याचा आणि शत्रुत्व धरण्याचा संभव आहे. हाही त्या तपस्व्याच्या ठायीचा कलंकच आहे.

२७. 'आणि हे निग्रोधा, पुन्हा तो तपस्वी ढोंगी आणि फसवा, त्याप्रमाणेच मत्सरी आणि कृपण बनण्याचा संभव आहे. तो कपटी, कावेबाज, निर्दय, पोकळ डौली होतो. दुसर्यासंबंधी दुष्ट वासना बाळगून तो त्यांच्या आहारी जातो. भ्रामक मते मनाशी बाळगून दैवी तर्कातील सिद्धान्तावर तो श्रद्धा ठेवू लागतो. आपल्या अनुभवांना चुकीचा अर्थ चिकटवू लागतो. लोभी बनून त्यागभावना विसरू लागतो. हाही त्या तपस्व्याच्या ठायीचा कलंक आहे.

२८. 'निग्रोधा, ह्या सर्व गोष्टी तप आणि आत्मक्लेश ह्यांच्या मार्गातील कलंक आहेत असे तुला वाटत नाही काय?'

२९. 'होय भगवान ! तप आणि आत्मक्लेशाच्या मार्गातील हे सर्व कलंकच आहेत. ह्यांपैकी एखाद्याच कलंकाने काय, परंतु सर्वच्या सर्वच कलंकांनी तपस्वी दूषित होण्याचा संभव आहे !'

३०. भिक्खुंनी हे कलंक आपल्याला जडू देता कामा नये.

## ३. भिक्खु आणि ब्राम्हण

१. भिक्खु आणि ब्राम्हण हे एकच काय ? ह्या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच आहे.

२. ह्या विषयावरील चर्चा कोणत्याही एका ठिकाणी आलेली नाही. ती सर्वत्र विखुरलेली आहे; परंतु भिक्खू आणि

ब्राम्हण यांमधील भेद सारांशरूपाने असे देता येतील--
३. ब्राम्हण हा पुरोहित असतो. जन्म, विवाह आणि मृत्यु यांचे आनुषंगिक संस्कार करणे हे त्याचे मुख्य कार्य होय.
४. माणसाला जन्मजात पाप चिकटलेले असते. आणि त्याचे विधिपूर्वक प्रक्षालन करणे आवश्यक आहे, या कल्पनांमुळे त्याप्रमाणेच ईश्वर आणि आत्मा या सिद्धान्तावरील श्रद्धेमुळे हे संस्कार आवश्यक ठरले.
५. या संस्कारासाठी पुरोहिताची आवश्यकता आहे. उलटपक्षी भिक्खु हा जन्मजात पाप, ईश्वर, आत्मा यांवर विश्वास ठेवीत नाही. ह्यामुळे संस्काराचे कारणच उरत नाही. म्हणून भिक्खू हा पुरोहित होत नाही.
६. ब्राम्हण हा जन्माने ब्राम्हण असतो. भिक्खु हा बनावा लागतो.
७. ब्राम्हणाला जात असते. भिक्खूला जात नसते.
८. ब्राम्हण हा सदोदित ब्राम्हणच राहतो. कोणत्याही गुन्ह्याने वा पापाने ब्राम्हणाचे ब्राम्हणत्व लोप पावत नाही.
९. परंतु भिक्खु एकदा भिक्खु झाल्यावर नेहमीच भिक्खू राहील असे नाही. भिक्खू हा बनविला जातो. म्हणून जर त्याचे वर्तन भिक्खूपणाला योग्य नसेल तर त्याचे भिक्खूत्व हिरावून घेतले जाऊ शकते.
१०. ब्राम्हण व्हायला मानसिक अथवा नैतिक शिक्षणाची आवश्यकता नाही. याच्याकडून केवळ अपेक्षा केली जाते ती ही की, त्याला आपल्या धर्मविधीची माहिती असावी.
११. भिक्खूची परिस्थिती याच्या अगदी उलट आहे. मानसिक आणि नैतिक शिक्षण हे त्याच्या जीवनाला रक्तासारखे आवश्यक आहे.
१२. ब्राम्हणाला स्वतःसाठी वाटेल तितकी मालमत्ता जमविण्याची सवलत आहे. भिक्खूला मात्र तसे करता येत नाही.
१३. हा दोहोंतील भेद लहानसहान नाही. मालमत्ता ही माणसाच्या मानसिक आणि नैतिक स्वातंत्र्याला मर्यादा घालून त्याच्या आचारविचारांना नियंत्रित करते. ती आचार-विचारांमध्ये संघर्ष निर्माण करते; म्हणून ब्राम्हण परिवर्तनाच्या विरुद्ध असतात. कारण परिवर्तन म्हणजे त्यांच्या बाबतीत अधिकार व संपत्तीचा नाश ठरतो.
१४. भिक्खु हा संपत्तिरहित असल्याने तो मानसिक व नैतिक दृष्टया स्वतंत्र असतो. प्रामाणिकपणा आणि सच्छील यांच्या आड स्वार्थी हेतू त्याच्या बाबतीत तरी येऊ शकत नाही.
१५. ब्राम्हण ही जात असली तरी प्रत्येक ब्राम्हण ही स्वतंत्र व्यक्ती आहे. कोणत्याही धार्मिक संघटनेच्या नियमांनी तो बांधलेला नाही. आपले नियमन तो आपण स्वतःच करणारा. आपल्या जातीशी तो ज्या सामान्य हितसंबंधांनी बांधलेला आहे ती हिते अगदी भौतिक असतात.
१६. उलटपक्षी भिक्खू हा सदैव संघाचा एक घटक असतो. संघाचा घटक असल्याशिवाय कोणी भिक्खू असू शकेल हे शक्य नाही. भिक्खु हा स्वतःचे नियम स्वतःसारखे करीत नसून तो संघाने नियंत्रित असतो. संघ ही एक आध्यात्मिक संघटना आहे.

## ४. भिक्खु आणि उपासक

१. धम्मामध्ये भिक्खूचा धम्म आणि उपासकाचा धम्म यांत विशेष भेद करण्यात आला आहे.
२. भिक्खू हा ब्रम्हचर्याला बांधलेला आहे. ही गोष्ट उपासकाची नाही. त्याला लग्न करता येते.

३. भिक्खूला घर अथवा कुटुंब असू शकत नाही. ह्याच्या उलट उपासकाला घर आणि कुटुंब असू शकते.

४. भिक्खूला मालमत्ता बाळगता येत नाही. उपासकाला ती ठेवता येते.

५. भिक्खूला हत्या न करण्याचा निर्बंध आहे. उपासकाला तसा निर्बंध नाही.

६. पंचशीलाचे नियम दोघांनाही पाळावयाचे असतात. परंतु भिक्खूला ते प्रतिज्ञारूप असतात. ते मोडल्यास तो शिक्षेस पात्र होतो. उपासकाच्या बाबतीत ते पाळण्याजोगे नियम या स्वरूपाचे असतात.

७. पंचशीलांचे परिपालन हे भिक्खूच्या बाबतीत सक्तीचे असते. उपासकाच्या बाबतीत ते त्याच्या इच्छेवर अवलंबून असते.

८. भगवंतांनी असा हा भेद का केला असावा ? काही तरी सबळ कारण असल्याशिवाय ते असा भेद करणार नाहीत.

९. भगवंतांनी त्या भेदाचे कारण कुठेही स्पष्ट केलेले नसल्यामुळे ते तर्काने जाणावे लागते. काहीही असले तरी ते कारण जाणणे आवश्यक आहे.

१०. आपल्या धम्माच्या साहाय्याने इहलोकी सदाचरणाचे राज्य स्थापन करावे असा भगवंतांचा उद्देश होता यात संशय नाही. म्हणूनच तर भगवंतांनी आपला धम्म भिक्खु अथवा उपासक असा भेद न करता सर्वांणा शिकविला.

११. परंतु भगवंताना माहीत होते की, सामान्य माणसाला केवळ धम्म शिकविल्याने सदाचरणावर आधारलेला आदर्श समाज निर्माण होणे शक्य नाही.

१२. आदर्श हा व्यवहार्य असला पाहिजे. एवढेच नव्हे तर तो व्यवहार्य कसा आहे हे उदाहरणाने यथार्थ पटविले पाहिजे. तेव्हा लोक त्याच्यासाठी झटतात आणि तो कृतीत उतरविण्याचा प्रयत्न करतात.

१३. ही अशी झटण्याची वृत्ती निर्माण करण्यासाठी आणि सामान्य माणसाला हा आदर्श अव्यवहार्य नसून व्यवहार्य आहे हे पटविण्यासाठी त्या आदर्शानुसार वर्तन ठेवणार्या समाजाचे चित्र सामान्य माणसापुढे ठेवणे आवश्यक आहे.

१४. संघ म्हणजे भगवंतांनी शिकविलेल्या धम्माचे आचरण करणार्या समाजाचा नमुना आहे.

१५. म्हणूनच भगवंतांनी भिक्खू आणि उपासक ह्यांच्यामध्ये भेद केला. भिक्खु म्हणजे बुद्धाचा आदर्श समाजाचा मार्ग दाखविणारा प्रकाश आणि शक्य तो त्या भिक्खूच्या पावलावर पाऊल ठेवून जाणे हे उपासकाचे काम आहे.

१६. दुसर्या एका प्रश्नाचे उत्तर देणे आवश्यक आहे आणि तो प्रश्न म्हणजे भिक्खूचे कार्य काय?

१७. भिक्खूने केवळ व्यक्तिगत साधनेला वाहून घ्यावयाचे की त्याने लोकांना मार्गदर्शन करून त्यांची सेवा करावयाची?

१८. त्याने दोन्हीही कार्ये केली पाहिजेत.

१९. व्यक्तिगत साधनेशिवाय तो मार्गदर्शनास लायक ठरत नाही. म्हणून तो स्वतः प्रथम संपूर्ण सर्वश्रेष्ठ, धार्मिक, ज्ञानसंपन्न अशी व्यक्ती असली पाहिजे, यासाठीच त्याने व्यक्तित साधना करण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे.

२०. भिक्खु गृहत्याग करतो; परंतु तो जगापासून निवृत्त होत नाही. गृहत्याग करण्यात त्याचा हेतु, ज्यांना गृहासंबंधी आसक्ती वाटते परंतु ज्याचे जीवन दुःख आणि दैन्य यांनी व्याप्त असून जे असहाय्य असतात, अशा गृहस्थांची किंवा अशा लोकांची सेवा करण्याची संधी व स्वातंत्र्य मिळावे हा असतो.

२१. धम्माचे मूलतत्व करुणा हे आहे आणि त्या तत्वानुसार प्रत्येकाने प्राणिमात्रावर प्रेम केले पाहिजे आणि त्याची सेवा केली पाहिजे. भिक्खु करुणेच्या परिपालनास अपवाद नाही.

२२. भिक्खु आध्यात्मिक संस्कारात कितीही परिपूर्ण असला तरी, जर तो मानवजातीच्या दु:खाबाबत उदासीन असेल तर तो ‘भिक्खु’ या संज्ञेला पात्र ठरत नाही. त्याला इतर काही संज्ञेने संबोधिता येईल पण भिक्खु या संज्ञेने नाही.

# भाग तिसरा: भिक्खुची कर्तव्ये

## १. भिक्खुची नवदीक्षितांसंबंधी कर्तव्य

१. यश आणि त्याच्या चार मित्रांच्या धर्मांतराची वार्ता सर्वत्र पसरली आणि त्याचा परिणाम असा झाला की, देशातील श्रेष्ठ कुळांतील अणि त्यांहून कमी प्रतीच्या कुळातील उपासक भगवंताकडे त्याच्या धम्माची दीक्षा घेण्यासाठी आणि बुद्ध आणि त्याचा धम्म यांना शरण जाण्यासाठी आले.

२. पुष्कळच लोक धम्मासंबंधीच्या मार्गदर्शनासाठी त्याच्याकडे येऊ लागले. त्यापैकी प्रत्येकाला व्यक्तिशा मार्गदर्शन करणे कठीण आहे, हे भगवंतांना माहीत होते, म्हणून प्रतिदिनी वाढणार्या परिव्राजकांच्या संख्येला संघ या नावाने धार्मिक संप्रदायाचे रूप देणे त्यांना आवश्यक वाटले.

३. तेव्हा परिव्राजकांना संघाचे सदस्य बनवून त्यांना शिस्त लावण्यासाठी विनयाचे नियम बनवून ते संघाच्या प्रत्येक सदस्याने पाळणे आवश्यक केले.

४. नंतर भगवंतांनी प्रत्येक शिष्याने भिक्खु होण्यासाठी ज्या दोन अवस्थांतून गेले पाहिजे त्या ठरविल्या. पहिली अवस्था म्हणजे प्रत्येक शिष्याने परिव्राजक होऊन कित्येक वर्षे एखाद्या भिक्खूच्या नेतृत्वाखाली शिक्षण घेत राहणे. शिक्षणाच्या काळानंतर परिक्षक मंडळासमोर आपली लायकी सिद्ध करून त्याला उपसंपदा घ्यावी लागे. उपसंपदा ग्रहण केल्यावरच तो पूर्ण भिक्खु होईल आणि संघाचा सदस्य बनेल असे ठरविले.

५. धम्म परिवर्तनाच्या प्रारंभीच्या काळात अशी व्यवस्था करणे शक्य नव्हते, म्हणून भगवंत परिव्राजकांना-भिक्खुंना आपला धम्म सर्वत्र प्रसृत करण्यासाठी धम्मदूत म्हणून पाठवीत असत.

६. धम्मदूत म्हणून पाठविताना भगवंत भिक्खुंना म्हणत, ‘भिक्खूहो, मी सर्व प्रकारच्या मानवी आणि दैवी बंधनांपासून मुक्त झालो आहे. भिक्खूहो, तुम्हीही अशा बंधनांपासून मुक्त आहात. आता तुम्ही बहुजनांच्या हितासाठी, बहुजनांच्या कल्याणासाठी, मानवजातीच्या अनुकंपेने देवाच्या आणि माणसांच्या हितासाठी, सुखासाठी आणि कल्याणासाठी फिरत राहा.

७. ‘कोणीही दोघांनी एकाच वाटेने जाऊ नये आणि जो धम्म प्रथम आणि अंती त्याप्रमाणेच तत्वत: आणि अक्षरश: कल्याणप्रद आहे तो धम्म शिकवा. पवित्र, शुद्ध आणि परिपूर्ण असे श्रेष्ठ जीवन प्रकाशित करा.

८. ‘सर्व देशांत जा आणि ज्यांनी धम्माचा स्वीकार केला नाही त्यांना धम्माचा स्वीकार करावयास शिकवा आणि दु:खाने दग्ध झालेल्या सार्या जगाला आपल्या उपदेशाने धम्माची ओळख करून द्या. अज्ञानी माणसांना ज्ञान द्या.

९. ‘ज्या ठिकाणी महर्षी, राजर्षी, ब्रम्हर्षी वास करीत आहेत आणि आपापल्या संप्रदायांचा फैलाव करीत आहेत त्या त्या ठिकाणी जा आणि त्यांना आपापल्या मताप्रमाणे प्रभावित करा.

१०. ‘ एकटेच जा. करुणामय अंत:करणाने जा. लोकांना बंधनमुक्त करा आणि त्यांना दीक्षा द्या.’

११. भगवंतांनी त्यांना असेही सांगितले,

१२. ‘धम्मदान हे कोणत्याही दानापेक्षा श्रेष्ठ आहे. धम्माचा आनंद कोणत्याही आनंदापेक्षा श्रेष्ठ आहे.

१३. ‘शेत तणाने बिघडते. प्रजा द्वेषामुळे बिघडते. म्हणून धम्मदानाचे फळ फार मोठे आहे.

१४. 'शेत तणाने बिघडते. प्रजा मोहामुळे बिघडते. म्हणून धम्मदानाचे फळ फार मोठे आहे.
१५. 'शेत तणाने बिघडते. प्रजा गर्वामुळे बिघडते म्हणून धम्मदानाचे फळ फार मोठे आहे.
१६. 'शेत तणामुळे बिघडते तर प्रजा तृष्णेमुळे बिघडते. म्हणून धम्मदानाचे फळ फार मोठे आहे.
१७. 'अशा रीतीने धम्मपदाचा आदेश घेऊन साठ भिक्खू धम्मप्रचारार्थ सर्व देशांत गेले.'
१८. धम्मपरिवर्तनासंबंधी काय करावे याविषयी भगवंतांनी त्यांना अधिक शिक्षण दिले.

## २. धम्मदीक्षा ही चमत्काराने करावयाची नाही

१. एकदा भगवान मल्लांच्या अनुपिय या गावी राहात होते. तेव्हा एकदा आपली चीवरे परिधान करून भिक्षापात्र घेऊन त्या गावी ते भिक्षेसाठी गेले.
२-३. भगवंतांनी असा विचार केला, ह्या सकाळच्या वेळेला अनुपिय गावात भिक्षेसाठी जाणे योग्य नाही. तेव्हा ज्या उद्यानात परिव्राजक भग्गव्व राहात आहे त्या ठिकाणी जाऊन त्याला भेटावे.
४. म्हणूने ते त्या उद्यानात गेले.
५. भग्गव्वाने त्यांना पाहिल्यावर त्यांना उद्देशून तो म्हणाला, ' भगवान् यावे, आपले मी स्वागत करीत आहे. फार दिवसांनी आपण इकडे येत आहात. इथे हे आपणासाठी आसन सज्ज आहे. यावर बसावे.'
६. भगवान आसनावर बसल्यावर भग्गव त्यांच्या शेजारी एका ठेंगण्या आसनावर बसला आणि तो परिव्राजक त्यांना म्हणाला,
७. 'काही दिवसांपूर्वी लिच्छवी कुळातील सुनक्खत मजकडे येऊन म्हणाला, मी भगवंताचा त्याग केला आहे. मी त्यांना गुरु मानीत नाही. ही खरी गोष्ट आहे का?'
८. 'लिच्छवी कुळातील सुनक्खताने तुला जे सांगितले ते सर्व खरे आहे.
९. हे भग्गव, काही दिवसांपूर्वी लिच्छवी कुळातील सुनक्खत मजकडे आला आणि म्हणाला, 'हे भगवान, मी आपला त्याग केला आहे. आजपासून मी आपणाला गुरु मानीत नाही.' तेव्हा मी त्याला विचारले, 'हे सुनक्खत, तू मला गुरु मान असे मी कधी म्हटले होते काय?'
१०. 'सुनक्खताने उत्तर दिले, 'नाही.'
११. 'किंवा तू तरी मला कधी असे म्हटले होतेस काय ? भगवंत, मी आपणाला गुरु मानतो.'
१२. सुनक्खत म्हणाला, 'नाही, मी कसे कधीच बोललो नाही.'
१३. 'जर मी तुला सांगितले नाही आणि तूही तशी इच्छा प्रदर्शित केली नाहीस तर मग मी तरी असा कोण आहे किंवा तू तरी असा कोण आहेस की, तू माझा त्याग करण्याच्या गोष्टी बोलाव्यास?'
१४. 'पण भगवान, आपण सामान्य माणसापेक्षा काही अद्भुत चमत्कार करून मला दाखवीत नाही.'
१५. 'सुनक्खता, मी तुला कधी असे म्हटले होते काय, की मी तुला अद्भुत चमत्कार करून दाखवीन, तू माझा शिष्य हो.'
१६. 'नाही भगवान.'
१७. 'किंवा तू तरी मला म्हणाला होतास का, की सामान्य माणसाच्या शक्ती पलीकडचा अद्भुत चमत्कार

भगवान मला करून दाखवतील म्हणून मी त्यांचा शिष्य होईन?'

१८. 'नाही, भगवान.'

१९. 'जर मीही असे बोललो नाही व तूही असे बोलला नाहीस तर मग तू माझा त्याग करण्याच्या गोष्टी बोलतोस त्याला अर्थ काय ?'

२०. 'माणसाला अद्भुत चमत्कार करता येतील किंवा नाही हे सिद्ध करण्यासाठी मी आपला धम्म शिकवीत नसतो. माझा धम्म हा माणसाला आपल्या दु:खाचा पूर्ण निरास करता येईल हे शिकवितो. हा त्याचा उद्देश नाही काय?'

२१. 'अद्भुत चमत्कार दाखविले जावोत अथवा न दाखविले जावोत, तथागतांच्या धम्मोपदेशाचा उद्देश जो तथागतांच्चा धम्माचे अनुसरण करतो तो आपल्या दु:खाचा नाश करू शकतो हा आहे.'

२२. 'परंतु भगवान,' सुनक्खत मला सारखा म्हणत राहिला, 'वस्तुजाताचा प्रारंभ कसा झाला, हे भगवान मला सांगत नाहीत.'

२३. 'अरे सुनक्खता, मी कधी असे म्हटले आहे काय की, ये आणि माझा शिष्य बन; आणि मी तुला वस्तुजाताचा प्रारंभ स्पष्ट करीन?'

२४. 'नाही, भगवान्!'

२५. 'किंवा तू असे कधी तरी म्हणाला होतास काय की, वस्तुजाताचा प्रारंभ कसा होतो हे मला भगवान शिकवितील म्हणून मी त्यांचा शिष्य बनेन?'

२६. 'नाही भगवान, असे मी म्हटले नाही.'

२७. 'तूही असे म्हटले नाहीस आणि मीही तसे म्हटले नाही. मग तू त्याग करण्याची भाषा बोलतोस त्याचा अर्थ काय ? माणसाच्या सर्व दु:खांचा निरास करण्याचा जो धम्म तो मी शिकवितो. त्याचा हेतू, वस्तुजाताचा प्रारंभ कसा झाला हे शिकवीत नसतो.'

२८. 'वस्तुजाताचा आरंभ कसा झाला हे शिकवो, अगर न शिकवो दु:खनिरासासाठीच भगवान आपला धम्म शिकवीत असतात.'

२९. 'मग सुनक्खत, वस्तुजाताचा प्रारंभ कसा झाला किंवा ते प्रारंभ रहित आहे हे तुला समजण्यात काय अर्थ आहे?'

३०. 'सुनक्खता, वज्जी लोकात तू माझी अनेक प्रकारे प्रशंसा केली आहेस.

३१. 'सुनक्खता, वज्जी लोकांत धम्माचीही तू अनेक प्रकारे प्रशंसा केलेली आहेस.'

३२. 'सुनक्खता वज्जी लोकांत तू अनेक प्रकारे संघाची प्रशंसा केली आहेस.'

३३. 'सुनक्खता, मी तुला असे सांगतो की, काही लोक तुजसंबंधी असे म्हणतील की, लिच्छवी कुळातील सुनक्खताला गौतमाच्या आदेशानुसार भिक्खूचे पवित्र जीवन जगता आले नाही, त्याचे नियम पाळता आले नाहीत. म्हणून विनय झुगारून देऊन तो दुर्वर्तन करू लागला आहे.'

३४. 'भग्गव्वा, अशा रीतीने लिच्छवी कुळातील सुनक्खताला मी बोललो. तो धम्म आणि विनय यांचा त्याग करून आता अधोगतीच्या मार्गाला लागला आहे.'

३५. सुनक्खताने धम्म आणि बुद्धाचा विनय यांचा त्याग केल्यावर तो लोकांना असे सांगू लागला, बुद्धाच्या प्रज्ञा

आणि बोधीमध्ये काहीच दैवी नाही. त्याने केवळ आपल्या बुद्धीच्या जोरावर असा एक वैयक्तिक सिद्धान्ताचा शोध लावला आहे आणि तो प्रतिपादिला आहे की, ऐकणार्याने आपले दुःख निवारण्यासाठी त्याचे परिपालन व आचरण करीत राहावयाचे. त्यांत दैवी असे काही नाही.

३६. सुनक्खत अशा रीतीने बुद्धाची निंदा करण्याच्या हेतूने बुद्धाच्या सिद्धान्तात गूढ अथवा दैवी असे काही नाही असे जे सांगत सुटे त्यात तथ्यांश होता. कारण बुद्धाने आपल्या धम्मपरिवर्तनात अलौकिक अथवा चमत्कार अशा कोणत्याही साधनांचा उपयोग केलेला नाही.

## ३. धम्मपरिवर्तन हे बळाने करावयाचे नसते

१. एकदा भगवान राजगृह आणि नालंदा यांना जोडणार्या राजमार्गावरून जवळ जवळ पाचशे भिक्खूंसह जात होते. त्या वेळेला सुप्पिय नावाचा एक परिव्राजक भिक्खू, ब्रह्मदत्त नावाच्या आपल्या तरुण शिष्यासह त्याच मार्गावरून चालला होता.

२. परिव्राजक सुप्पिय बुद्ध, धम्म आणि संघ यांची निंदा करीत होता. परंतु त्याचा तरुण शिष्य ब्रह्मदत्त मात्र बुद्ध, धम्म आणि संघ याची प्रशंसा करीत होता.

३. अशा रीतीने गुरू आणि शिष्य परस्परविरोधी मतांचे प्रतिपादन करीत भगवान आणि त्यांच्या भिक्खू संघामागून चालले होते.

४. भगवान रात्र होताच अंबलठ्ठिका उद्यानातील राजाने निर्मिलेल्या एका विश्रांतिगृहात आपल्या भिक्खू संघासह थांबले. परिव्राजक सुप्पिय व तरुण ब्रह्मदत्त तेथेच उतरले आणि तेथेही त्यांनी आपली चर्चा चालू ठेवली.

५. पहाटेस काही भिक्खू उठले आणि सभागृहात जाऊन बसले. तिथे बोलता बोलता ते सुप्पिय आणि ब्रह्मदत्त ह्यांच्यामधील भाषणाची चर्चा करू लागले.

६. त्यांच्या भाषणाचा रोख कुणाकडे आहे हे जाणताच भगवान सभागृहात आले आणि त्यांच्यासाठी पसरलेल्या एका चटईवर बसले. त्यांनी भिक्खुंना विचारले, 'तुम्ही कशासंबंधी बोलत आहात? तुमच्या संभाषणाचा विषय काय आहे?' भिक्खुंनी सर्व सांगताच भगवान म्हणाले,

७. 'भिक्खू हो, कोणीही संघाबाहेरील मनुष्य माझ्याविरुद्ध, धम्माविरुद्ध अथवा संघाविरुद्ध बोलू लागला तरी त्यामुळे तुम्ही त्या माणसासंबंधी मनात कोणत्याही प्रकारचा द्वेष धरता कामा नये.

८. असे कोणी बोलू लागले, आणि जर तुम्ही दुखावल्यासारखे होऊन त्याच्यावर रागावू लागलात, तर तुमचा राग तुमच्या आत्मविजयाच्या आड येईल. जेव्हा इतर लोक तुमच्याविरुद्ध बोलतात, त्या वेळी तुम्ही रागावलात आणि कष्टी झालात तर बोलणार्याचे शब्द कितपत योग्य आहेत अथवा अयोग्य आहेत हे तुम्हाला कसे ठरविता येईल?'

९. भिक्खू म्हणाले, 'भगवान, आम्ही क्रोधाविष्ट झालो तर दुसर्याच्या भाषणाची योग्यायोग्यता आम्हाला ठरविता येणार नाही. ही खरी गोष्ट आहे.'

१०. भगवान पुढे म्हणाले, 'संघाबाहेरील लोक माझ्यासंबंधी, धम्मासंबंधी, अथवा संघासंबंधी काही कमीपणा आणणारे शब्द बोलू लागले तर तुम्ही म्हणावे, अमूक अमूक गोष्ट आमच्या संघात अथवा आमच्यामध्ये नाही आणि अशा रीतीने त्यांचे शब्द कसे खोटे अथवा चुकीचे आहेत हे व्यवस्थितपणे स्पष्ट करून दाखवावे.

११. 'भिक्खूहो, परंतु संघाबाहेरील लोक जेव्हा माझी, धम्माची वा संघाची प्रशंसा करतील त्या वेळी तुम्ही त्यांना काय म्हणावे ते ऐका.

१२. 'प्रशंसा करणारा म्हणेल, हिंसेचा त्याग केल्याने श्रमण गौतम हा जीवहत्येपासून दूर राहतो. त्याने दंड आणि तलवार हाती धरण्याचे सोडले आहे. दांडगेपणाची त्याला लाज वाटते. तो करुणामय असून सर्व जीवजातासंबंधी त्याच्या ठिकाणी मैत्री वसत आहे. ज्याचे धम्मपरिवर्तन झाले नाही तो तथागतासबंधी अशा प्रकारे प्रशंसा करण्याचा संभव आहे.

१३. 'किंवा तो म्हणेल, न दिलेले असे कोणाचे काही घ्यावयाचे नाही हे व्रत-पालन करणार्या गौतमाने लोभ सोडलेला आहे. जे दिले तेवढेच तो घेतो. आपल्या गरजा भागविल्या जातील असा त्याला विश्वास असतो. आपले जीवन प्रामाणिकपणे आणि हृदयशुद्धीने व्यतीत करीत असतो.

१४. 'किंवा तो संघाबाहेरील मनुष्य प्रशंसा करताना असे म्हणेल, व्यभिचाराचा त्याग करून गौतम हा ब्रह्मचर्य पाळीत आहे. संभोग आणि सामान्य माणसाच्या क्रिया यांच्यापासून तो दूर राहातो.

१५. 'तो प्रशंसा करणारा कदाचित असेही म्हणेल, श्रमण गौतम असत्य भाषण करीत नाही. खोटेपणाचा आपणाला स्पर्श होऊ देत नाही. तो सत्य बोलतो. सत्यापासून विचलित होत नाही. तो इमान राखतो. तो विश्वसनीय आहे. दिलेला शब्द तो मोडीत नाही.

१६. 'तो प्रशंसा करणारा कदाचित असेही म्हणेल, श्रमण गौतम निंदाजनक शब्द उच्चारीत नाही. निंदेचा त्याने त्याग केला आहे, तो जे इथे ऐकतो ते इथल्या लोकांच्याविरुद्ध भांडण उभे करण्यासाठी इथे बोलत नाही. अशा रीतीने भिक्खुंना एकत्र आणण्यात, मित्र असतील त्यांची मैत्री अधिक दृढ करण्यात आपले जीवन व्यतीत करतो. तो शांतिनिर्माता, शांतिप्रेमी, शांतीची मनापासून इच्छा करणारा आणि ज्याच्या योगे शांती वाढेल असेच शब्द उच्चारणारा आहे.

१७. 'किंवा तो म्हणेल, श्रमण गौतमाने उद्धट भाषणाचा त्याग केल्यामुळे त्याच्या मुखांतून कठोर शब्द बाहेर पडत नाहीत. निर्दोष सुश्राव्य, ललित, हृदयाला जाऊन भिडणारे, लोकांना आल्हाद देणारे, लोकांचे प्रेम वृद्धिंगत व्हावे असे शब्द तो बोलतो.

१८. 'अथवा तो म्हणेल, चेष्टेखार भाषणाचा त्याग केल्यामुळे श्रमण गौतम निरर्थक संभाषणात कधीच गुंतत नाही. तो योग्य वेळी बोलतो, सत्याला धरून बोलतो, धम्म आणि संघ यावर तो समयोचित बोलतो. अंत:करणात साठविण्यासारखे शब्द बोलतो. समुचित उदाहरणे देतो. भेद स्पष्ट करतो आणि मुद्याला कधीही सोडीत नाही.

१९. ' किंवा तो म्हणेल, श्रमण गौतम बीजे किंवा रोप यांनासुद्धा इजा करीत नाही. तो दिवसा फक्त भोजन करतो रात्री अथवा मध्य-दिवसा नंतर अन्न सेवन करीत नाही. जत्रेतील नाच, तमाशा, संगीताचे जलसे अशा ठिकाणी तो कधीही जात नाही. फुलमाळा, सुगंधी द्रव्ये आणि उटणे यांनी तो आपणाला विभूषित करीत नाही. लांबलचक उंच बिछान्यावर तो कधीही पहुडत नाही. सोने, रुपे तो कधी स्वीकारीत नाही. विन शिजविलेले धान्य तो घेत नाही. स्त्रिया अथव युवती ह्यांचा तो स्वीकार करीत नाही. दासदासी यांचा तो स्वीकार करीत नाही. मेंढे, बकरी, बोकड, हे तो स्वीकारीत नाही. कोंबड्या अथवा डुकरे तो स्वीकारीत नाही. हत्ती, घोडे, गुरे तो स्वीकारीत नाही. तो दूताचे अथवा मध्यस्थाचे काम करीत नाही. तो क्रयविक्रय करीत नाही. लाचलुचपत, लांडीलबाडी ह्यांचा वाममार्ग तो आचरीत नाही. तो कोणाला विद्रुप करीत नाही. कोणाचा खून करीत नाही.

कोणाला कडी घालून बांधीत नाही. वाटमारी, दरोडे आणि मारहाण करीत नाही.

२०. ' भिक्खुहो; तथागताची प्रशंसा करताना धर्मपरिवर्तन न झालेला मनुष्य अशा प्रकारच्या गोष्टी बोलेल, परंतु त्यामुळेसुद्धा आनंदित होता कामा नये, किंवा तुमचे हृदय उचंबळूनही जाता कामा नये. कारण असे घडणेसुद्धा तुमच्या साधनेच्या आड येईल. संघाबाहेरील लोक जेव्हा अशा रीतीने माझी, धम्माची अथवा संघाची प्रशंसा करतील, तेव्हा तुम्ही जे सत्य असेल ते सत्य म्हणून मान्य केले पाहिजे. आणि म्हटले पाहिजे, त्या किंवा त्या कारणास्तव ही गोष्ट खरी आहे. अशी गोष्ट आमच्यामध्ये आढळते हे अगदी बरोबर आहे.'

## ४. भिक्खु धम्मप्रचारासाठी झटले पाहिजे

१. भिक्खूंना उद्देशून भगवंत एकदा म्हणाले,

२. ' भिक्खुहो, मी जगाशी भांडत नाही. परंतु जग माझ्याशी भांडते. सत्याचा शिक्षक जगातील कोणाही माणसाशी भांडत नसतो.

३. ' भगवंत, आम्ही स्वत:ला, वीर असे संबोधितो. आम्ही कोणत्य प्रकारचे वीर आहोत?'

४. ' भिक्खूहो, आम्ही संग्राम करतो म्हणून आम्हांला वीर म्हणतात.'

५. ' भगवान, आम्ही कशासाठी संग्राम करतो ?'

६. ' श्रेष्ठ शील, श्रेष्ठ ध्येय आणि श्रेष्ठ प्रज्ञा यांसाठी आम्ही युद्ध करतो. म्हणूनच आम्हाला वीर म्हणतात.'

७. ' ज्य ठिकाणी शील संकटात असते त्या वेळी संघर्ष करण्याला घाबरू नका : दुबळेपणाने वागू नका.'

# भाग चवथा: भिक्खू आणि उपासक

## १. भिक्षापाश

१. संघ ही सुसंघटित संस्था असून त्याचे सभासदत्व सर्वांनाच मोकलळे नव्हते.
२. केवळ परिव्रज्या स्वीकारल्याने परिव्राजकाला संघाचे सभासदत्व लाभत नसे.
३. उपसंपदा स्वीकारल्यानंतर परिव्राजक संघसभासद बने.
४. संघ ही स्वतंत्र संस्था होती. संस्थापकावर ती अवलंबून नव्हती.
५. ती स्वायत्त संस्था असून आपल्याला आवडेल त्याला सभासदत्व देऊ शके. विनयनियमाला अनुसरून ती कोणाचेही सभासदत्व हिरावून घेऊ शके.
६. भिक्खूला उपासकाशी जोडणारे एकच बंधन म्हणजे भिक्षा.
७. भिक्खू हा भिक्षेवर अवलंबून असे. भिक्षा घालणारा म्हणजे उपासक.
८. उपासकांची सुसंघटित अशी व्यवस्था नव्हती.
९. संघात कोणालाही प्रवेश देताना संघदीक्षा हा समारंभ करावा लागे.
१०. संघदीक्षेमध्ये, संघप्रवेश त्याप्रमाणेच धम्मप्रवेश या दोहोंचा अंतर्भाव होई.
११. परंतु ज्यांना धम्मप्रवेश हवा असेल, परंतु संघप्रवेश करावयाचा नसेल त्यांच्याविषयी वेगळी धम्मदीक्षा नसे. संघप्रवेश म्हणजे घर सोडून अनिकेत बनणे.
१२. धम्म प्रवेशासाठी धम्मदीक्षा नसणे ही एक गंभीर उणीव होती. ज्या अनेक कारणांनी भारतात बौद्धधर्माचा र्हास झाला, त्यांपैकी हे एक कारण आहे.
१३. या दीक्षाविधीच्या अभावी उपासक एका धर्मातून दुसर्या धर्मात भ्रमण करू शके, आणि अधिक वाईट गोष्ट म्हणजे दोन धर्म एकाच वेळेला आचरण्याची त्याला मुभा मिळत असे.

## २. परस्परावरील परिणाम

१. तथापि धर्मावरणात चुकणार्या उपासकाला मार्गावर आणण्याचे साधन भिक्षापाश हे एक होते.
२. यासंबंधीचे अंगुत्तर-निकायातील नियम लक्षात घेण्याजोगे आहेत.
३. या नियमाशिवाय भिक्खूने दुर्वर्तन अथवा दुराचरण केल्यास तत्संबंधी दुसर्या भिक्खूकडे तक्रार करण्याचा उपासकाला सर्वसामान्य अधिकार होता.
४. अशी तकार बुद्धाकडे आल्यावर आणि त्याने ती पडताळून पाहिल्यावर विनयपिटकांतील तत्संबंधीच्या नियमाला पुस्ती जोडून अशा प्रकारचे आचरण, संघाविष्ट केलेला अपराध या सदरात सामील केले.
५. विनयपिटक हे दुसरे तिसरे काही नसून उपासकांनी केलेल्या तक्रारींचा योग्य न्याय देण्याचे साधन आहे.
६. भिक्खू आणि उपासक यांच्यामधील संबंध अशा प्रकारचा होता.

## ३. भिक्खूचा धम्म आणि उपासकाचा धम्म

१. बौद्ध धर्माचे काही टीकाकार बौद्धधर्म हा धर्मच नव्हे असे म्हणतात.

२. अशा टीकेकडे लक्ष देण्याचे कारण नाही. परंतु त्यांना जर उत्तर द्यावयाचे तर ते असे : बौद्ध धम्म हाच खराखुरा धम्म आहे आणि ज्यांना हे मान्य नसेल त्याने आपली धम्माची व्याख्या सुधारली पाहिजे.

३. दुसरे काही टीकाकार या थरापर्यंत जात नाहीत. ते असे म्हणतात बौद्धधर्म हा केवळ भिक्खूंनी पाळावयाच्या धर्म आहे. सामान्य माणसाशी त्याचा संबंध नाही बौद्धधम्माने सामान्य माणसाला आपल्या परिसराच्या बाहेर ठेवले आहे.

४. भगवान बुद्धाच्या संवादात भिक्खूचा उल्लेख इतका वारंवार आढळतो की, बौद्धधम्म हा केवळ भिक्खूचाच धम्म होय, या टीकेला बळकटी येते.

५. म्हणून हा विषय अधिक स्पष्ट करणे जरूर आहे.

६. भिक्खूचा आणि उपासकाचा धम्म समान होता काय? किंवा भिस्खूला बंधनकारक असा धम्माचा एक भाग असून तो उपासकाला बंधनकारक नाही, अशी वस्तुस्थिती आहे काय?

७. भगवान बुद्धाने आपली प्रवचने केवळ भिक्खू संघाला उद्देशून केली आहेत. म्हणून ती केवळ त्यांचासाठीच आहेत, उपासकांसाठी नाहीत. परंतु असे समजण्याचे कारण नाही. भगवान बुद्धाने जे शिकवेले ते दोघांनाही लागू पडणारे आहे.

८. पंचशील, अष्टांगमार्ग आणि दशपारमिता यांचा उपदेश करताना बुद्धाच्या मनात उपासक होते, हे त्या त्रयींच्या स्वरूपावरूनच लक्षात येण्याजोगी गोष्ट आहे; आणि ते सिद्ध करण्याला कुठल्याही विवेचनाची जरूरी नाही.

९. ज्यानी गृहत्याग केला नाही, जे क्रियाशील गृहस्थी जीवन जगत आहेत, त्यांना पंचशील, अष्टांगमार्ग आणि पारमिता अत्यंत आवश्यक आहेत. गृहत्याग केलेल्या म्हणजे क्रियाशील गहस्थी जीवनापासून दूर असलेल्या अशा भिक्खूच्या हातून या त्रयींचे उल्लंघन होणे संभवनीय नाही. ते संभवनीय आहे गृहस्थाच्या बाबतीत.

१०. भगवान बुद्धाने आपल्या धर्मोपदेशाला प्रारंभ केला तेव्हा तो प्राधान्याने उपासकांनाच उद्देशून असला पाहिजे.

११. तथापि इथे तर्कावर विसंबून राहण्याची आवश्यकता नाही. बौद्ध धम्मावरील टीकेचे खंडन करावयाला प्रत्यक्ष पुरावाही आहे.

१२. त्या बाबतीत खालील प्रवचनाकडे लक्ष पुरवावे.

१३. एकदा भगवान श्रावस्ती येथील अनाथपिंडिकाच्या जेतवनारामात राहात असता धम्मिक आणि इतर ५०० उपासक त्यांच्याकडे गेले. अभिवादन केल्यावर धम्मिक बाजूच्या आसनावर बसला आणि भगवंतांना उद्देशून म्हणाला,

१४. 'भगवान, गृहत्याग करणारे भिक्खू आणि गृहस्थ उपासक या दोघांचीही प्रगती करणारा आचार कोणता ?'

१५. 'इथे भिक्खूसह बसलेल्या उपासकांना ते मोक्षदायी सत्य ऐकू द्या.'

१६. भगवंत म्हणाले, ‘ऐका, भिक्खूहो, कान देऊन ऐका, आणि सांगितलेल्या नियमांचे पालन करा.

१७. ‘दुपार झाल्यानंतर भिक्षेसाठी परिभ्रमण करू नका त्यापूर्वीच योग्य वेळी आपली भिक्षा गोळा करा. अवेळी येणारा अतिथी पाशात गुरफटतो.’

१८. ‘अन्नभिक्षा मागण्यापूर्वी रूप, गंध, शब्द, रुची आणि स्पर्श यासंबंधीच्या आसक्तीला आपल्या मनातून काढून टाका.’

१९. ‘भिक्षा मिळताक्षणीच एकटेच मागे फिरा आणि एकटेच बसून अविचलित म्हणजे बाह्य पदार्थामागे न धावणार्या अशा स्थिर चित्ताने विचार करा.’

२०. ‘धर्मशील लोकांशी बोलताना, हे भिक्खूहो, भाषणाचा विषय धम्म हाच असू द्या.’

२१. ‘भिक्षा, आपली राहती खोली, बिछाना, पाणी, स्नान ही केवळ साधने आहेत; ह्यांहुन त्यांना अधिक महत्व नाही असे माना.’

२२. ‘ह्या गोष्टींचा केवळ साधन म्हणून अनासक्तीने उपयोग करणारा भिक्खू हा कमलदल ज्याप्रमाणे पाण्याच्या थेंबाने कलंकित होत नाही त्याप्रमाणे सदैव निष्कलंक राहील.’

२३. ‘आता उपासकांना प्रगतिपथावर नेणार्या आचारासंबंधी मी बोलतो.’

२४. ‘हत्या करू नका. मृत्यूची शिक्षा देऊ नका किंवा कत्तल करण्याची आज्ञा देऊ नका सबळ, दुर्बळ कोणत्याही प्रकारच्या सजीव प्राण्याची हिंसा करू नका. सकल प्राणिमात्रावर प्रेम करा.

२५. ‘कोणीही उपासकाने बुद्ध्या चोरी करू नये किंवा चोरी करण्याची आज्ञा देऊ नये. दुसरे देतील तेवढेच घ्यावे.

२६. ‘उपभोग ही अग्निगर्ता समजून त्यापासून दूर राहा. ब्रह्मचर्य शक्य झाले नाही तरी निदान कोणत्याही विवाहित परस्त्रिशी व्यभिचार करू नका.

२७. ‘राजगृही अथवा चव्हाट्यावर थांबू नका किंवा तेथे खोटे भाषण करण्याला प्रोत्साहन देऊ नका, किंवा तसे करण्याची अनुज्ञा देऊ नका. हा निर्बंध सदैव पाळा.

२८. ‘मद्यपान करू नका दुसर्याला मद्य पाजू नका मद्यपानात रमण्याची अनुज्ञा देऊ नका हा निर्बंध सदैव पाळा. मद्यपानाने मनुष्य कसा उन्मत्त होतो हे लक्षात ठेवा.

२९. ‘मद्यपानाने मूर्ख मनुष्य पापाचरणास उद्युक्त होतो आणि आपल्या इतर स्वैराचारी बांधवांना पापास प्रवृत करतो. म्हणून त्या उन्मादकारक व्यसनापासून, त्या मूर्खाच्या स्वर्गापासून सदैव दूर राहा.

३०. ‘हिंसा, चोरी, असत्य भाषण, सुरापान, व्यभिचार ह्यांपासून परावृत्त व्हा.

३१. ‘सप्ताहामागून सप्ताह, उपोसथाचे व्रत ग्रहण करा आणि श्रद्धाभय अंत:करणाने अष्टशीलांचे पालन करा.

३२. ‘प्रात:काळी पवित्र श्रद्धामय चित्ताने वरील उपोसथ व्रत स्वीकारल्यानंतर यथाशक्ती भिक्खुंना अन्न आणि पेय द्या.

३३. ‘आपल्या आईबापांचा सन्मान राखा. उपजीविका सन्यार्गाने करा.

३४. ‘असा एकनिष्ठ उपासक दिव्य जगात प्रवेश करील.’

३५. ह्यावरून स्पष्ट होईल की, धम्म हा दोघांना समान आहे.

३६. परंतु त्या दोघांचाकडून आचारावयाच्या निर्बंधात फरक आहे.

३७. भिक्खूला पाच व्रते अनिवार्य आहेत.

३८. आपण हत्या करणार नाही, असे व्रत त्याला धारण करावे लागते.

३९. दुसर्यांनी न दिलेली दुसर्यांची मालमत्ता आपण स्वतःच्या मालकीची करणार नाही असे व्रत त्याला धारण करावे लागते.

४०. कधीही असत्य भाषण करणार नाही असे व्रत त्याला धारण करावे लागते.

४१. स्त्रीसुखापासून परावृत्त राहण्याचे व्रत त्याला धारण करावे लागते.

४२. उन्मादक पेय पिणार नाही असे व्रत त्याला धारण करावे लागते.

४३. हे सर्व नियम उपासकालाही बंधनकारक आहेत.

४४. फरक आहे तो एवढाच की, भिक्खूच्या बाबतीत हे नियम अनुल्लंघनीय व्रतासारखेच आहेत उलटपक्षी उपासकाच्या बाबतीत ते नैतिक कर्तव्य असून त्यांचे परिपालन स्वच्छेने करावयाचे असते.

४५. ह्याशिवाय त्यांच्यामध्ये लक्षात घेण्याजोगे दोन फरक आहेत;

४६. भिक्खूला खाजगी मालमत्ता ठेवता येत नाही. उपासकाला खाजगी मालमत्ता धारण करता येते.

४७. भिक्खूला परिनिब्बाणामध्ये प्रवेश करण्याचे स्वातंत्र्य आहे. उलटपक्षी उपासकाला निब्बाण हे पुरेसे मानले जाते.

४८. भिक्खू आणि उपासकामधील भेद आणि साम्य असे आहे.

४९. तथापि धम्म हा दोघांनाही समान आहे.

# भाग पाचवा: उपासकासाठी नियम

## १. धनवंतासाठी विनय

१. दारिद्रयांत धन्यता मानावी असा कधीही भगवंतांनी दारिद्र्याचा गौरव केला नाही.
२. त्याप्रमाणेच दरिद्री माणसांनी आपल्या दारिद्र्यात समाधान मानावे म्हणजे पुढे त्यांना सारी पृथ्वी लाभणार आहे असे कधीच शिकविले नाही.
३. उलट संपत्ती ही स्वागतार्ह आहे असे ते म्हणतात. एका गोष्टीवर मात्र त्यांचा कटाक्ष होता आणि तो म्हणजे संपत्ती ही विनयशासित असली पाहिजे.

( ii )

१. एकदा अनाथपिंडिक भगवानांकडे आला आणि त्यांना अभिवादन करून सन्निध बसून म्हणाला, 'गृहस्थाला स्वागतार्ह, सुखकर आणि पथ्यकर परंतु त्याला दुष्प्राप्य अशा कोणत्या गोष्टी आहेत?'
२. भगवंतांनी उत्तर दिले, 'ह्या गोष्टीपैकी सन्मानाने धन संपादन करणे हे प्रथम आहे.'
३. 'दुसरी गोष्ट म्हणजे, आपले आप्टेष्टसुद्धा सन्मार्गाने धन संपादन करीत आहेत याची काळजी घेणे.'
४. 'तिसरी गोष्ट म्हणजे दीर्घायू होणे.'
५. 'या जगातील स्वागतार्ह सुखकर आणि पथ्यकर अशा या तीन दुष्प्राप्य गोष्टी मिळविताना सदगृहस्थाने चार अटी पाळल्या पाहिजेत. ह्या चार अटी म्हणजे श्रद्धा, सदाचार, औदार्य आणि प्रज्ञा-यांच्या सौभाग्याने संपन्न होणे.
६. श्रद्धारूपी धनाने संपन्न होण्यासाठी तथागतासंबंधीचे सर्वश्रेष्ठ असे ज्ञान झाले पाहिजे. ह्या ज्ञानाने त्याला हे भगवान अर्हत आहेत, सम्यक् संबुद्ध आहेत, विद्या व सदाचरणसंपन्न आहेत. विश्वाचे जाणकार आहेत अतुलनीय आहेत, ते दुर्दमनीय मनुष्यांना वळण लावणारे सारथी देवमनुष्याचे गुरू आहेत असे उमगले पाहिजे.
७. सदाचाराने अथवा शीलसौभाग्याने संपन्न होणे म्हणजे हिंसा, चोरी, व्यभिचार, असत्य भाषण, सुरापान यांपासून परावृत्त होणे.
८. औदार्यरूपी सौभाग्याने संपन्न होणे म्हणजे गृहस्थाने आपले मन कंजुषपणापासून मुक्त करून औदार्याने आणि मुक्तहस्ताने दान करण्यात आनंद मानावयास शिकणे, लोकांनी त्यांच्यासमोर हात पुढे करावा आणि त्याने सहजपणे दान द्यावे, अशी योग्यता त्याच्या अंगी आली पाहिजे.
९. प्रज्ञारूपी सौभाग्याने संपन्न होणं म्हणजे काय ? तुला माहित आहे की ज्या गृहस्थाचे मन हावरेपणा, लोभ, द्वेष, आळस, तंद्री, अनवधान आणि धांदल यांनी ग्रस्त होते तो मनुष्य दुष्कृत्ये करतो. जे कर्तव्य केले पाहिजे त्याजकडे दुर्लक्ष करतो आणि अशा रीतीने सुख व सन्मान यांना पारखा होतो.
१०. हावरेपणा, लोभ, द्वेष, आळस, तंद्री, अनवधान, धांदल, आणि शंकेखोरपणा हे मनाचे कलंक आहेत. जो गृहस्थ ह्या मानसिक कलंकापासून मुक्त होतो त्याला थोर आणि भरपूर प्रज्ञा लाभते. दोषरहित अशा प्रज्ञेने

त्याची दृष्टी स्वच्छ होते. तो पूर्ण ज्ञानी होतो.

११. अशा रीतीने सन्मार्गाने, न्यायाने, थोर परिश्रमाने, मनगटाच्या जोरावर, निढळाच्या घामावर संपत्ती कमावणे, ही धन्यता मानण्याजोगी गोष्ट आहे. असा सदगृहस्थ स्वतःला सुखी, आनंदी करतो आणि सदैव सुखसमाधान भोगतो त्या-प्रमाणेच आपले आईबाप, पत्नी, मुलेबाळे, सेवक, कामकरी, मित्र आणि सहचारी यांना सुखी आणि आनंदी करतो आणि त्यांना सदैव सुखात ठेवतो.

## २. गुहस्थासाठी विनय

ह्या विषयांवरील बुद्धाचे विचार सियालवाद सुत्तांत अंतर्भूत झाले आहेत.

१. एकदा भगवान राजगृह येथील वेळूवनातील कलंदनिवासात विहार करीत होते.

२. त्या समयी एका गृहस्थाचा सियाल नावाचा तरुण पुत्र प्रातःकाळी उठून राजगृहाच्या बाहेर गेला आणि ओल्या केसांनी आणि कपड्यांनी वर हात जोडून पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर, उर्ध्व, अधर अशा रीतीने आकाश-पृथ्वीच्या सर्व दिशांची पूजा करू लागला.

३. त्याच वेळी सकाळी भगवंतानी चीवर परिधान करुन, चीवर व भिक्षापात्र घेऊन राजगृहात भिक्षेसाठी प्रवेश केला. अष्ट दिशांची पूजा करणारा सियाल त्यांच्या दृष्टीस पडला आणि त्यांनी विचारले, ‘ तू अष्टदिशांची पूजा का करीत आहेस ?’

४. त्यावर सियालने उत्तर दिले, ‘ माझे वडील मृत्यूशय्येवर असताना मला म्हणाले, ‘ मुला, तू आकाश पृथ्वीच्या सर्व दिशांची पूजा करीत जा.’ वडीलांच्या आज्ञेचा मान राखण्यासाठी, भगवान, मी अशा रीतीने पूजा करीत आहे.

५. भगवंतानी त्याला विचारले, ‘ व्यवहारी माणसाचा हा धर्म कसा ठरतो ?’ सियालने उत्तर दिले, ‘ याशिवाय व्यवहारी माणसाचा कोणता धर्म असणार? आणि जर असेल तर तो भगवंतांनी मला सांगावा.’

६. ‘ तरुण गृहस्था, ऐक; मी तुला व्यवहारी माणसाचा धर्म सांगतो.’ तरुण सियाल म्हणाला, ‘ठीक आहे.’ मग भगवंत म्हणाले:

७. ‘ माणसाच्या धर्माने माणसाला दुर्वर्तनपासून परावृत होण्यास शिकवले पाहिजे. जीवहत्य करणे, न दिलेले बलात्काराने घेणे, व्यभिचार करणे आणि असत्य बोलणे, हे चार दुर्गुण त्याने टाळले पाहिजेत.

८. ‘ सियाल, हे लक्षात ठेव की, पापकर्मे ही पक्षपातीपणा, शत्रुत्व, मूर्खपणा आणि भय यामुळे घडतात. यांपैकी कोणताही हेतु त्याच्या कृत्याच्या मागे नसेल तर त्याच्या हातून पापकर्म घडणार नाही.

९. ‘ माणसाच्या धर्माने माणसाला आपल्या संपत्तीची उधळपट्टी करु नये असे शकवले पाहिजे. मद्यपानाचे व्यसन, अवेळी रस्त्यावरुन भटकत राहणे, जत्रांतून परिभ्रमण करणे, जुगाराची सवय जडणे, कुमित्रांची संगत धरणे आणि आळशी सवयी अंगी लावून घेणे, यांमुळे संपत्तीची धूळधाण होते.

१०. ‘मद्यपानाच्या सवयीने सहा प्रकारची संकटे उद्भवतात. संपत्तीचा खराखुर नाश, वाढती भांडणे, रोगाधीनता, शीलभ्रष्टता, अश्लील वर्तणूक आणि बुद्धीनाश ही ती सहा संकटे होत.

११. ‘ अवेळी रस्त्यावर भटकण्याने माणूस सहा प्रकारच्या संकटात पडतो. ती म्हणजे तो स्वतः, त्याची

बायकामुले आणि त्याची मालमत्ता ही अरक्षित राहतात. त्याप्रमाणेच ज्या गुन्ह्यांचा तपास लागला नाही, त्यासंबंधी त्याचा संशय घेतला जातो. खोट्या अफवा त्याला चिकटतात आणि त्यांना तोंड देण्यात त्याला पुष्कळच त्रास सोसावा लागतो.

१२. ‘ जत्रेत भटकल्याने तो सहा प्रकारच्या संकटांत सापडतो. ती म्हणजे तो सारखा विचार करीत राहतो की, नाचणे, गाणे, बजावणे, काव्य गायन, झांजा, ढोलकी कुठे वाजत आहेत का ?’

१३. ‘ जुगाराने मोहीत होणार्यावर येणारी सहा संकटे म्हणजे, खेळात जिंकला- तर त्याचे सहकारी त्याचा द्वेष करतात, हरला तर द्रव्यनाशाबद्दल तो स्वत: शोक करतो. त्याच्या जवळची नगदी संपत्ती व्यर्थ जाते, न्यायालयासमोर त्याच्या शब्दाला किंमत उरत नाही, त्याचे मित्र आणि सहकारी त्याचा तिरस्कार करतात. लग्नासाठी त्याला कोणीच मागणी घालीत नाही. कारण लोक म्हणतात, जुगार्याला बायकोचे पालनपोषण कसचे करत येणार?

१४. ‘ कुसंगतीने सहा प्रकारची संकटे ओढवतात. ती म्हणजे त्याला कोणाही जुगारी, व्यभिचारी, दारुबाज, लबाड, पैसे खाऊ आणि हिंसक मन ष्याची मैत्री जडते.

१५. ‘ आळशीपणाच्या सवयीने ओढवणारी सहा संकटे म्हणजे, तो म्हणतो, फार थंडी आहे म्हणून मी काम करीत नाही, फार गरमी आहे म्हणून काम करीत नाही, अद्यापि अवकाश आहे किंवा आता फार उशीर झाला, म्हणून मी काम करीत नाही; तो म्हणतो, फार भुक लागली आहे म्हणून काम करीत नाही. तो म्हणतो, हातात फारच काम आहे म्हणून काम करीत नाही. आणि अशा रीतीने जे करायला पाहिजे ते त्याच्य हातून घडत नाही. त्याच्या संपत्तीत भर पडत नाही आणि असलेली संपत्ती हळूहळू नाहीशी होऊ लागते.

१६. ‘ व्यवहारी माणसाच्या धर्माने खर्या मित्राची पारख करण्यास त्याला शिकवले पाहिजे.

१७. ‘ मित्र म्हणून म्हणविणारे परंतु वस्तुतः शत्रू असणारे असे चार प्रकारचे लोक आहेत. लोभी पुरुष, बोलघेवडा परंतु कृतीने शून्य अस पुरुष, खुशामत्या पुरुष आणि उधळ्या वृत्तीचा पुरुष.

१८. ‘ यांपैकी पहिल्या प्रकारचा मनुष्य बाहेरून मित्रत्व दाखवितो, परंतु आतून तो शत्रूसारखाच वागतो. कारण तो देतो थोडे व मागतो अधिक. केवळ भीतीने तो आपले कर्तव्य करीत असतो. परंतु त्याचा मूळ हेतू स्वार्थ साधणे हा असतो.

१९. ‘ जो बोलघेवडा आहे आणि कृतीच्या नावाने शून्य आहे, असा मनुष्य कितीही मैत्री दाखवित असला तरी तो शत्रूच मानावा. कारण तो आपल्य गत किंवा भावी काळासंबंधी मोठ्या आत्मीयतेने बोलत असला तरी त्याचा हेतू पोकळ शब्दांनी तुमची कृपा संपादन करायची हा असतो. प्रसंग पडताच मात्र तो आपल्या अंगी साहाय्य करण्याचे सामर्थ्य नाही असे सांगून दगा देतो.

२०. खुशामती मनुष्य मित्रासारखा वाटत असला तरी तो शत्रूच समजावा. तो दुष्कृत्ये करण्याला संमती देतो आणि सत्कृती त्याला असंमत असते. तो तुमच्या तोंडावर तुमची स्तुती करतो परंतु तुमच्या पाठीमागे दुसर्याजवळ तुमची निंदा करतो.

२१. त्याप्रमाणेच उधळ्या सोबती मित्रासारखा वाटत असला तरी शत्रूच मानावा. कारण तुम्ही अवेळी रस्त्यावर भटकत असताना तो तुम्हाला सोबत करतो. नाचतमाशा पाहताना तो तुम्हाला सोबत करतो. तुम्ही द्यूतक्रीडेत मग्न झाला असता तुम्हांला तो सोबत करतो.

२२. ' मन:पूर्वक मैत्री करणारे चार मित्र असतात, सहाय्यक, सुखादुःखामध्ये समान मैत्री ठेवणारा, सद्वर्तनाचा सल्ला देणारा आणि सहानुभूती दाखविणारा.
२३. ' सहाय्यक हा खरा मित्र समजा. कारण तुम्ही बेसावध असताना तो तुम्हाला सावध करतो. तुमचे आपल्या मालमत्तेवर लक्ष नसताना तो तिचे संरक्षण करतो. तुम्ही भयग्रस्त झाले असता तो तुम्हाला आश्रय देतो. तुम्हाला एखादे काम करावयाचे असले की, तुम्हाला ज्याची गरज असेल ते तुम्हाला दुपटीने पुरवितो.
२४. ' सुखदुःखामध्ये समान मैत्री ठेवणारा खरा मित्र मानावा. कारण तो आपली गुपिते तुम्हाला सांगतो. तुमची गुपिते तो गुप्त ठेवतो. तुमच्या अडचणींत तुमचा त्याग करीत नाही. प्रसंग पडला तर तुमच्यासाठी प्राणदान करायला तयार असतो.
२५. 'तुम्ही काय केले पाहिजे याचा सल्ला देणारा खरा मित्र मानावा कारण तो तुम्हाला दुष्कृत्यांपासून परावृत्त करतो. सत्कृत्याला प्रबृत्त करतो. जे पूर्वी कधी ऐकले नाही अशा चार गोष्टी तुम्हाला सांगतो आणि सन्मार्ग दाखवितो.
२६. 'तुमच्याबद्दल सहानुभूति दाखविणारा खरा मित्र मानावा कारण तो तुमच्या दुःखाने दुःखी होतो. सुखाने आनंदित होतो. तुमची निंदा करणार्यांना तो प्रतिबंध करतो आणि तुमची स्तुती करणार्यांची तो प्रशंसा करतो.' असे भगवंत म्हणाले.
२७. जो धर्म मानवधर्म आहे तो मानवाला षडदिशांची पूजा करण्याऐवजी आपले आईबाप, शिक्षक, पत्नी, मुले, मित्र, सोबती, नोकरचाकर आणि धर्मगुरू यांचा मान राखायला शिकवितो.

## ३. पुत्रांसाठी विनय

१. "मुलांनी वडिलांची सेवा करावी. त्यांनी असा विचार मनात आणावा की, माझ्या वडिलांनी माझे पालनपोषण केले आणि मी त्यांना पोसले पाहिजे. त्यांना जी कर्तव्ये करावी लागली ती आता मी केली पाहिजेत. माझ्या कुळाची परंपरा मी चालवली पाहिजे. आणि त्या परंपरेला जुळेल अशी योग्यता मी माझ्या अंगी आणली पाहिजे. वडील मुलावर प्रेम करीत असतात. दुर्गुणापासून त्याला परावृत्त करतात. सद्गुणाचा त्याला उपदेश करतात. आपल्या व्यवसायाचे त्याला शिक्षण देतात. त्याला साजेल असे त्याचे लग्न करून देतात आणि योग्य वेळी आपली सारी मालमत्ता त्याचावर सोपवतात."

## ४. शिष्यासाठी विनय

१. शिष्याने पुढीलप्रमाणे आपल्या गुरूची सेवा करावी. ते आले असता आसनावरून उठून त्यांना मान द्यावा. त्यांना अभिवादन करावे. त्यांची सेवा करावी. ते शिकवतील ते उत्सुकतेने शिकावे. त्यांचे कोणते काम करावयास पडले तरी ते करावे आणि ते अध्यापन करीत असता एकाग्र चित्ताने ते ग्रहण करावे. कारण गुरु शिष्यावर प्रेम करतात. जे त्यांना ज्ञान आहे ते त्या शिष्याला देतात. जे एकदा शिष्याने ग्रहण केले आहे ते त्याचे ज्ञान गुरु

अध्यापनाने दृढ करतात. ते सर्व विद्या आणि कला त्याला पूर्णपणे शिकवितात. त्याचे मित्र आणि सोबत्यांशी त्याच्यासंबंधी चांगले बोलतात आणि ते सर्व तर्हेने त्याच्या रक्षणाची काळजी वाहतात.

## ५. पति-पत्नीसाठी विनय

१. " पतीने आपल्या पत्नीचा सन्मान राखून, आदरभाव प्रदर्शित करून, तिजशी एकनिष्ठतेने वागून, तिला सत्ता देऊन, तिला लागणारे दागदागिने पुरवून तिची सेवा करावी. कारण पत्नी त्याच्यावर प्रेम करते. ती सासर-माहेरच्या नातलगांचे आदरा- तिथ्य करून आपले कर्तव्य बजाविते. ती पातिव्रत्याने वागते. आपल्या नवर्याच्या उपर्जित धनावर दक्षतापूर्वक लक्ष ठेविते. आणि उद्योगाने आणि कुशलतेने आपली कर्तव्ये पाळते."
२. " कुलपुत्राने औदार्याने, दाक्षिण्यानेने, दान धर्माने आपल्या मित्रांची आणि सहकार्यांची सेवा करावी. आपल्यासारखेच त्यांना वागवावे, आणि आपण स्वत: न्यांना दिल्या शब्दप्रमाणे वागावे. कारण त्याचे मित्र आणि परिचित त्याच्यावर प्रेम करतात. तो गैरसावध असताना त्याचे व त्याच्या मालमत्तेचे रक्षण करतात. संकटात ते त्याला आधार देतात. त्याच्या आपद्अवस्थेत त्याग करीत नाहीत, आणि त्याच्या परिवाराच्या हिताला जपतात."

## ६. धनी व सेवक यांसाठी विनय

१. धन्याने नोकर-चाकरांना पुढील प्रमाणे वागवावे. त्याने त्यांच्या सामर्थ्याप्रमाणे त्यांना काम द्यावे. अन्न व मजुरी द्यावी. ते आजारी पडले अरताना त्यांची शुश्रूषा करावी. असाधारण स्वादिष्ट पक्वान्ने त्यांनी वाटून खावी. वेळ पडेल तेव्हा त्यांना रजा द्यावी. कारण नोकरचाकर हे धन्यावर प्रेम करतात. ते त्याच्यापूर्वी उठतात, आणि त्याच्या नंतर झोपतात. त्यांना जे द्यावे त्यात ते समाधान मानतात. ते आपले काम चोख बजावतात आणि त्याची किर्ती सर्वत्र वाढवितात.
२. कुलपुत्राने आपल्या धर्मगुरूची सेवा काया-वाचा-मनसा, त्याजवर प्रीती करून, आपल्या घराचे दार त्यांन सदैव मोकळे ठेवून व त्यांच्या ऐहिक गरजा भागवून करावी, कारण धर्मगुरू आपल्या शिष्याला दुष्कृत्यापासून पराडमुख करतात. त्याला सन्मार्गाचा उपदेश करतात. मायेने त्यांच्यासंबंधी विचार करतात. जे पूर्वी कधी कानी पडले नाही ते शिकवितात आणि पूर्वी जे कानी पडलेले असते ते चूक असेल तर त्याची सुधारणा करतात.

## ७. निष्कर्ष

१. भगवन्तांनी सियालाला वरीलप्रमाणे उपदेश केल्यवर तो म्हणाला, ' सुंदर! फार सुंदर! एकदा स्थानभ्रष्ट झालेली वस्तु ज्याप्रमाणे परत स्थानावर बसवावी. किंवा जे गुपित होते ते उघड करावे किंवा पथभ्रष्टाला सन्मार्ग

दाखवावा किंवा काळोखात दीप लावावा आणि डोळे असतील त्यांना सन्मार्ग दाखवावा, अगदी त्याप्रमाणे भगवन्तानी मला अनेक रीतीने सत्य विशद करून सांगितलेले आहे.

२. मी भगवन्तांना, त्यांनी सांगितलेल्या धम्माला आणि संघाला शरण जातो. आजपासून आमरण शरण आलेल्या या उपासकाचा स्वीकार करावा.

## ८. कन्येसाठी विनय

१. एकदा भगवान भद्दीय समीप असलेल्या जेतवनात राहात होते. तेथे मेण्डकाचा नातू उग्गह, याने त्यांना भेट दिली आणि अभिवादन करून तो त्यांच्या बाजूला बसला आणि भगवन्तांना म्हणाला,

२. 'भगवान, उद्या आपण माझ्या घरी भोजनास यावे.'

३. भगवन्तानी त्याला मूक संमती दिली.

४. भगवन्तांनी आपले आमंत्रण स्वीकारले, हे पाहिल्यावर उग्गह आपल्या स्थानावरून उठला व भगवन्तांना अभिवादन करून तो त्यांच्या उजव्या बाजूने निघून गेला.

५. रात्र संपल्यावर भगवंतांनी चीवर परिधान करून आणि भिक्षापात्र व चीवर घेऊन ते उग्गहाच्या घरी आले. तेथे त्यांच्यासाठी सज्ज ठेवलेल्या आसनावर ते बसले. उग्गहाने स्वहस्ताने भगवंतांचे समाधान होईतोवर अन्न वाढले.

६. भगवन्तांनी भिक्षापात्रावरून आपला हात काढून घेतल्यावर उग्गह त्यांच्या बाजूला बसला आणि म्हणाला.

७. 'भगवान, या माझ्या मुली, त्या आता पतिगृही जाणार आहेत. भगवंतांनी त्यांना शहाणपणाचा सल्ला द्यावा आणि दीर्घकाळ त्यांना सुख मिळेल, त्यांचे हित साधेल असा त्यांना उपदेश करावा.'

८. यावर भगवंत त्या मुलींना उद्देशून म्हणाले, 'मुलींनो, तुम्ही अशा प्रकारचे वर्तन ठेवावे की, आमचे आई-बाप आमचे सुख आणि हित साधण्यासाठी प्रेमाने ज्या पतीच्या हाती आमचा हात देतील, त्या पतीविषयींच्या प्रेमबुद्धीने आम्ही सकाळी लवकर उठू आणि सर्वांच्या शेवटी झोपू; मन:पूर्वक काम करू, कुठलीही गोष्ट करायला सांगताना ती गोडीगुलाबीने करायला लावू; नेहमी गोड आवाजात बोलू' असे वागायला शिका.

९. 'त्याप्रमाणेच आमच्या पतीचे आप्तेष्ट, आईबाप, संन्यासी अथवा पूजनीय माणसे या सर्वांना आम्ही मान देऊ; त्यांचा आदर करू. ते आमच्या पतीच्या घरी येताच त्यांना आसन आणि पाणी देऊन त्यांचा सत्कार करू' असे वागायला शिका.

१०. 'त्याप्रमाणेच पतीगृहीची सर्व कृत्ये मग ती लोकर विणण्याची असोत किंवा कापूस विणण्याची असोत, मोठ्या कौशल्याने व चपळाईने करू. कोणत्याही कामाचे स्वरूप नीट समजावून घेऊ. म्हणजे ते आम्हांला सुलभतेने करता येईल किंवा करवून घेता येईल' असे वागायला शिका.

११. 'त्याप्रमाणेच दूत, कामगार हे आपली कामे कशी बजावतात, प्रत्येक जण काय करतो आणि काय करीत नाही, ह्या गोष्टी आम्ही ओळखायला शिकू. कोण किती सशक्त आहे, दुबळा आहे, हे आम्ही जाणून घेऊ आणि ज्याला जसे लागते तसे अन्न देऊ' असे वागायला शिका.

१२. 'त्याप्रमाणेच आपले पती जे धनधान्य, रूपे, सोने, कमाई करून घरी आणतील ते आम्ही सुरक्षित ठेऊ.

त्यांजवर पहारा आणि देखरेख ठेवू आणि जेणे करून चोर, दरोडेखोर, लुंगे, लफंगे यांच्या नजरेपासून जे सुरक्षित राहील असे सर्व काही करू' असे वागायला शिका.'

१३. हा उपदेश ऐकताच उग्गहाच्या मुली अत्यंत प्रसन्न झाल्या आणि त्यांनी कृतज्ञतेने भगवंताना धन्यवाद दिले.

# षष्ठ खंड: भगवान बुद्ध आणि त्यांचे समकालीन

भाग पहिला--भगवान बुद्ध व त्यांचे समर्थक

भाग दुसरा--भगवान बुद्धाचे विरोधक

भाग तिसरा--भगवान बुद्धाच्या धम्माचे टीकाकार

भाग चवथा--भगबान बुद्धाचे मित्र आणि चाहते

# भाग पहिला: भगवान बुद्ध व त्यांचे समर्थक

## १. बिम्बिसार राजाचे दान

१. बिम्बिसार राजा हा तथागतांचा फक्त अनुयायीच नव्हता; तो त्यांचा परम भक्त आणि त्यांच्या धम्माचा एक प्रमुख आधार होता.
२. उपासक झाल्यावर बिम्बिसाराने विचारले- " भिक्खूसंघासह भगवान उद्या मजकडे भोजन घेण्यास सम्मती देतील काय ?"
३. तथागतांनी मुग्ध राहून सम्मती दर्शविली.
४. आपले निमंत्रण स्वीकृत केले गेले आहे असे समजल्यावर बिम्बिसार राजा आपल्या आसनावरून उठला. त्याने तथागतांना अभिवादन केले आणि त्यांच्याभोवती प्रदक्षिणा घालून तो निघून गेला.
५. रात्र संपताच बिम्बिसाराने उत्तमोत्तम भोजनाची सिद्धता केली आणि वेळ होताच तथागतांना तो म्हणाला, " भगवान, वेळ झाली. भोजन तयार आहे."
६. तथागतांनी दोन प्रहर होण्यापूर्वी चीवर परिधान केले, उत्तरीय आणि भिक्षापात्रासह पूर्वजटिल भक्खुंसमवेत त्यांनी राजगृहात प्रवेश केला.
७. तथागत बिम्बिसार राजाच्या महालाकडे निघाले. तिथे गेल्यावर त्यांच्यासाठी सिद्ध केलेल्य असणावर भिक्खुंसह ते बसले. बिम्बिसार राजाने पंक्तीचा प्रमुखस्थानी असलेल्या तथागतांना व उपस्थितत भिक्खु वर्गांना स्वत:च्या हातांनी भोजन वाढले आणि तथागतांनी भोजन झाल्यावर आपले भिक्षापात्र धुऊन स्वच्छ करताच बिम्बिसार राजा त्यांच्या जवळ बसला.
८. त्यांच्याजवळ बसल्यावर बिम्बिसार राजा विचार करू लागला : "तथागतांसाठी निवासाची जागा कुठे बरे निवडावी? गावापासून फार दूर नको आणि अगदी जवळही नको. त्यांना भेटण्यास जाणार्या लोकांना सोयीस्कर आणि सुगम अशी असावी. दिवसा गजबजलेली नाही अशी शांत, रात्री जनसंमर्दापासून दूर एकान्तात आणि निवृत्तवासास अनुकूल अशी."
९. बिम्बिसार राजाला मग आठवले, " माझे वेळूवन उद्यान गावापासून फार दूरही नाही आणि जवळही नाही. शिवाय येण्याजाण्यास सोयीस्कर. बुद्ध प्रमुख असलेल्या भिक्खुसंघास मी ह्या वेळूवन उद्यानाचे दान केले तर...?"
१०. मग बिम्बिसार राजाने पाण्याने भरलेले सुवर्णपात्र घेऊन भगवान बुद्धांना दान देताना तो म्हणाला, "आपण ज्याचे प्रमुख आहात त्या भिक्खूसंघास माझे वेळूवन उद्यान मी दान देत आहे." तथागतांनी उद्यानाचा स्वीकार केला.
११. तथागतांनी नंतर प्रवचन करून बिम्बिसार राजाला उत्साहित, उद्युक्त आणि आनंदित केले, व आपल्या स्थानावरून उठून ते निघून गेले.
१२. ह्या प्रसंगानंतर तथागतांनी प्रवचन करताना भिक्खुंना सांगितले, "भिक्खूंनो ! ह्या उद्यानाचा स्वीकार करण्यास मी तुम्हांस अनुमती देत आहे."

## २. अनाथपिण्डिकाचे दान

१. अनाथपिण्डिक दीक्षा घेतल्यानंतर एकदा तथागतांकडे गेला. त्यांच्या उजव्या बाजूस आसनस्थ झाल्यावर तो म्हणाला;

२. "भगवान्, आपणास माहीत आहे की, धनधान्यसमृद्ध आणि शान्तिपूर्ण अशा श्रावस्तीत मी वास्तव्य करीत आहे. तिथे प्रसेनजित राजा अधिकारावर आहे.

३. "तिथे एक विहार बांधावा अशी माझी मनीषा आहे. आपण कृपा करून श्रावस्तीत यावे, आणि विहाराच्या दानाचा स्वीकार करावा."

४. तथागतांनी मुग्ध राहून दानग्रहणास सम्मती दर्शविली.

५. निराधारांचा मित्र आणि अनाथांचा आश्रयदाता असा तो अनाथपिण्डिक घरी परतताना राजकुमार जेताचे हरित वृक्षवाटिकांनी आणि निर्मल जलप्रवाहांनी परिपूर्ण असलेले उद्यान त्याच्या दृष्टीस पडले. तेव्हा त्याने विचार केला, "हे रमणीय स्थान तथागतांच्या भिक्खूसंघासाठी योजिलेल्या विहारासाठी अनुरूप आहे." आणि मग तो राजकुमाराकडे गेला आणि ते उद्यान विकत घेण्याची अनुज्ञा मागितली.

६. राजकुमार ते उद्यान विकण्यास तयार नव्हता. कारण त्याचे त्याला फार मोल वाटे. प्रथमत: त्याने नकार दशविला; पण अखेरीस तो म्हणाला "या सर्व भूमीवर जर तू सुवर्णमुद्रा पसरशील तरच फक्त तुला ते मिळेल."

७. अनाथपिण्डिक आनंदित झाला आणि सुवर्णमुद्रा पसरण्यास त्याने सुरुवात केली; पण जेत म्हणाला: "तू तसदी घेऊ नकोस. मला जमीन विकायची नाही;" पण अनाथपिण्डिकाने आग्रह धरला. त्यांच्यात वादावादी सुरू होऊन प्रकरण न्यायाधिशाकडे गेले.

८. मध्यंतरी लोकांत ह्या असामान्य न्यायप्रकरणाची चर्चा सुरु झाली आणि राजकुमाराच्या कानी पडणार्या गोष्टीत अनाथपिण्डिकाच्या श्रीमंतीची तसेच प्रामाणिकपणाची आणि निष्ठेची हकिकतही आली. म्हणून त्याने त्याच्या योजनेची चौकशी केली. तथागतांचे नाव ऐकताच विहाराच्या संस्थापनेत भाग घेण्यास तो उत्सुक झाला आणि फक्त अर्ध्या सुवर्णमुद्रा स्वीकारून तो म्हणाला, "जमीन तुझी आहे; पण वृक्ष माझे आहेत तथागतांच्या दानात माझा हिस्सा म्हणून ते वृक्ष मी अर्पण करीत आहे."

९. विहाराचा पाया तयार झाल्यावर तथागतांच्या आदेशानुसार प्रमाणबद्ध असा भव्य विहार बांधण्यास त्यांनी प्रारंभ केला. अनुरूप अशा शिल्पकामाने त्याला शोभिवंत करण्यात आले.

१०. ह्या विहाराला 'जेतवन' असे नाव दिले गेले आणि अनाथपिण्डिकाने तथागतांना श्रावस्तीस त्याचे दान स्वीकारण्यास पाचारण केले. तथागत कपिलवस्तूहुन श्रावस्तीस त्यासाठी आले.

११. जेव्हा तथागतांनी जेतवनात प्रवेश केला तेव्हा अनाथपिण्डिकाने पुष्पवर्षाव केला आणि सुगन्धित धूप जाळला. सोन्याच्या झारीतून तथागतांच्या हातावर उदक सोडताना तो म्हणाला, "अखिल जगातील भिक्खुसंघाच्या उपयोगासाठी हा जेतवन विहार मी आपणास दान देत आहे."

१२. तथागतांनी दानाचा स्वीकार करताना उत्तर दिले, "सर्व अमंगलावर विजय प्राप्त होवो; ह्या दानाने दात्याचे आणि अखिल मानवजातीचे कल्याण होवो आणि सर्वत्र न्यायाचे वास्तव्य वर्धित होवो."

१३. अनाथपिण्डिक ह्या तथागताच्या ऐंशी प्रमुख शिष्यांपैकी एक होता. त्याला 'प्रमुख धर्मदाता' अशी पदवी होती.

## ३. जीवकाचे दान

१. जेव्हा तथागत राजगृहात असत तेव्हा भिषग्वर जीवक दिवसातून दोन वेळा त्यांच्याकडे जात असे.
२. बिम्बिसार राजाने दान केलेले वेळूवन फार दूर असल्याचे त्याला जाणवले.
३. राजगृहात जीवकाच्या निवासानजीक त्याच्या मालकीचे 'आम्रवन' नावाचे उद्यान होते.
४. तिथे एक सर्वांगपरिपूर्ण विहार बांधावा आणि आम्रवनासहीत तथागतांना त्याचे दान करावे असे त्याला वाटले.
५. ह्या कल्पनेने प्रेरित होऊन तो तथागतांपाशी गेला आणि आपली इच्छा परिपूर्ण करण्याची त्याने अनुज्ञा मागितली.
६. तथागतांनी मुग्ध राहून सम्मती दर्शविली.

## ४. आम्रपालीचे दान

१. तथागत नादिकामध्ये राहिले असताना त्यांना दुसर्या ठिकाणी जावेसे वाटले. त्यांनी आनन्दाला हाक मारली आणि म्हटले, "चल आनन्दा, आपण वैशालीला जाऊ या."
२. " बरं तर." सम्मती दर्शवून तथागतांना आनन्द म्हणाला.
३. नंतर महाभिक्खू संघासहित तथागत वैशालीकडे निघाले. तिथे आम्रपालीच्या आम्रवनात तथागत वास्तव्यास गेले.
४. तथागत वैशालीस आले असून आपल्या आम्रवनात राहिले आहेत असे गणिका आम्रपालीला समजले. तिने पुष्कळ शासकीय वाहने मागवून त्यांपैकी एकात स्वत: आरूढ होऊन वैशालीहून आपल्य परिवारासह ती आम्रवनाकडे निघाली. जिथपर्यंत रथ जाऊ शकला तिथपर्यंत ती रथातून गेली. मग खाली उतरून तथागत जिथे होते त्या स्थानापर्यंत पायाने चालत जाऊन जवळ गेल्यावर तिने त्यांना अभिवादन केले आणि ती एका बाजूस बसली. ती तशी बसल्यानंतर तथागतांनी तिला धर्मोपदेश केला.
५. नंतर तथागतांना उद्देशून ती बोलली, " भगवान भिक्खूसंघासहित उदईक मजकडे भोजनास येतील काय?"
६. तथागतांनी मुग्ध राहून सम्मती दर्शविली. आपल्या आमंत्रणाचा त्यांनी स्वीकार केला हे पाहत आम्रपाली आपल्या आसनावरून उठली आणि तिने त्यांना अभिवादन केले. नंतर प्रदक्षिणा घालून ती तिथून निघाली.
७. वैशालीच्या लिच्छवींना समजले की, तथागत वैशालीला आले असुन आम्रपालीच्या आम्रवनात त्यांचे वास्तव्य आहे. त्यांना सुद्धा आपल्या घरी भोजनासाठी तथागतांना आमंत्रित करावयाचे होते. म्हणून त्यांनीही बरीचशी शासकीय वाहने सिद्ध करून प्रत्येकात एक एक जण आरूढ होऊन ते परिवारासह वैशालीला गेले.

८. आम्रपालीची आणि व्यांची परस्परविरुद्ध दिशेने येताना गाठ पडली.

९. त्या तरुण लिच्छवींच्य रथांना आम्रपालीचे रथ चाकाला चाक, आसाला आस आणि जूला जू असे जोराने घासत गेले. तेव्हा ते तिला म्हणाले, " आम्रपाली, आमच्या रथांना अशी टक्कर देत तू का बर निघाली आहेस?"

१० . " महाराज, आताच मी तथागतांना भिक्खूसंघासहित उद्या भोजनास येण्याचे आमंत्रण दिले आहे." आम्रपाली बोलली.

११. " हे सौभाग्य आम्हांस प्रदान कर. आम्ही तुला एक लक्ष देऊ करतो."

१२. " महाराज! वैशाली आणि इतर नियंत्रणाखालील प्रदेश जरी आपण मला देऊ केला तरी हा विक्रय मी करणार नाही."

१३. लिच्छवी हातवारे करीत बोलले, " ह्या आम्रपालीने आम्हांस हरविले." आणि ते आम्रपालीच्या आम्रवनाच्या दिशेने निघून गेले.

१४. आपल्यावर कुरघोडी झाली हे जाणूनही तथागतांना भेटून फेरविचाराने त्यांच्याकडून आपल्या आमंत्रणाला अग्रक्रम मिळवावा ह्या आशेने ते आम्रपालीच्या आम्रवनात गेले.

१५. लिच्छवी दुरून येत दिसताच तथागत भिक्खुंना म्हणाले. " आपल्यापैकी ज्या कोणी कधी देव पाहिले नसतील त्यांनी ह्या लिच्छवींकडे पहावे. ह्या लिच्छवींच्या समुदायाकडे पहावे आणि तुलनेने त्यांचे निरीक्षण करावे- हे परलोकातील जणू देवच आहेत."

१६. रथ जाऊ शकतील तिथपर्यंत गेल्यावर लिच्छवी रथातून उतरले आणि तथागत आसनस्थ होते त्या स्थानी जाऊन नम्रतेने त्यांच्या शेजारी ते बसले.

१७. नंतर तथागतांना उद्देशून ते बोलले, " तथागतांनी भिक्खूसंघासह उदईक आमचे भोजनाचे निमंत्रण स्वीकारून आमच्यावर कृपा करावी."

१८. " हे लिच्छवीजनहो, उद्याचे भोजनाचे आमंत्रण स्वीकारल्याचा मी आम्रपालीला आधीच शब्द दिला आहे." ते म्हणाले.

१९. आम्रपालीने आपल्याला हरविल्याची लिच्छवींची आता खात्री पटली. तथागतांचे आभार मानून आणि त्यांच्या वचनाला मान्यता दर्शवून ते आपल्या आसनांवरून उठले आणि तथागतांना अभिवादन करून प्रदक्षिणा घालून ते निघून गेले.

२०. रात्र होताच गणिका आम्रपालीने आपल्या प्रासादात साखरभातादी मिष्टान्ने तयार करून ती तथागतांना म्हणाली, " महाराज! वेळ झाली. भोजन तयार आहे."

२१. पहाटे वस्त्रपरिधान केलेल्या तथागतांनी आपले उत्तरीय व भिक्षापात्र घेतले आणि भिक्खूसंघासह आम्रपालीच्या प्रासादात ते गेले. त्यांच्यासाठी सिद्ध केलेल्या आसनावर ते बसले. मग आम्रपालीने त्यांना व भिक्खुंना साखरभात व मिष्टान्ने वाढली आणि पोट भरेतो त्यांना जातीने आग्रह केला.

२२. भोजन संपल्यावर तथागतांनी आपले भिक्षापात्र स्वच्छ केले आणि हात धुतले. आम्रपाली नंतर त्यांच्या शेजारी चौरंग ठेवून त्यावर बसल्यावर त्यांना उद्देशून म्हणाली :

२३. " भगवान्! आपणास व आपल्या संघास माझे उद्यान मी अर्पण करीत आहे." तथागतांनी त्या दानाचा स्वीकार केला आणि धर्मोपदेश केल्यानंतर ते तिथून निघाले.

## ५. विशाखेची दानशूरता

१. विशाखा ही श्रावस्तीची धनीक महिला होती. तिला बरीच मुले व नातवंडे होती.

२. जेव्हा तथागत श्रावस्तीत राहात होते तेव्हा त्यांच्या निवासस्थानी विशाखा गेली आणि तिने त्यांना भोजनाचे आमंत्रण दिले. त्यांनी ते स्वीकारले.

३. त्या रात्री आणि दुसर्या दिवशी सकाळीही सारखा पाऊस पडला. भिक्खूंनी अंग ओले राहू नये म्हणून आपली चीवरे काढून ठेवली आणि आपल्या उघड्या देहावर पाऊस पडू दिला.

४. दुसर्या दिवशी तथागतांचे भोजन संपल्यावर त्यांच्याजवळ बसून विशाखा त्यांना म्हणाली, "भगवान, मला आपणाकडून आठ वर हवे आहेत."

५. भगवान म्हणाले, "विशाखा, वर कोणते आहेत ते समजल्यावाचून तथागत वर देऊ शकत नाहीत."

६. विशाखा बोलली, "मी मागणार आहे ते वर उचित आणि निरुपद्रवी असेच आहेत."

७. तथागतांनी अनुज्ञा देताच विशाखा बोलली, "भगवान, आयुष्यभर वर्षा-कालात भिक्खूसंघाला चीवरे द्यावी अशी माझी मनीषा आहे. तसेच विहारात दाखल होणार्या आणि बाहेर जाणार्या भिक्खुंना व आजारी तसेच त्यांची शुश्रूषा करणार्या भिक्खुंना भोजन द्यावे. आजारी भिक्खुंना औषधे आणि भिक्खूसंघाला खीर तसेच भिक्खुणींना स्नानासाठी वस्त्रे पुरवावीत अशी माझी इच्छा आहे."

८. तथागत म्हणाले, "पण विशाखा, तथागतांकडून हे अष्ट वर मागण्यात तुझा काय हेतू आहे?"

९. आणि विशाखा बोलली, "भगवान, मी सेविकेला आज्ञा केली की, 'जा, आणि भोजन तयार आहे असे भिक्खूसंघाला सांग.' माझी सेविका त्याप्रमाणे गेली, पण ती विहारात पोचली तेव्हा पाऊस पडत असल्यामुळे भिक्खुंनी आपापली वस्त्रे उतरून ठेवली असल्याचे तिच्या दृष्टोत्पत्तीस आले. तिला असे वाटले की, ते भिक्खू नसून पावसात देह भिजवून घेणारे कुणी नग्न तपस्वी आहेत. म्हणून ती परतली. तिची समजूत घालून मला पुन्हा तिला पाठवणे प्राप्त ठरले.

१०. "भगवान, नग्नता अपवित्र आणि किळसवाणी असते. ह्यामुळेच संघाला आजन्म वर्षावासास उपयुक्त अशी वस्त्रे द्यावी अशी मी इच्छा प्रकट केली.

११. "माझ्या दुसर्या वराबद्दल सांगावयाचे म्हणजे, दुरून येणारे भिक्खू सरळ मार्ग अपरिचित असल्यामुळे आणि भिक्षा उपलब्ध होईल असे गाव माहित नसल्यामुळे भिक्षा मिळविताना वाटेत थकून जातात. भगवान, ह्यामुळेच विहारात येणार्या भिक्खुंची आजन्म भोजनाची व्यवस्था करावी अशी माझी इच्छा आहे.

१२. "तिसरे म्हणजे, बाहेर जाणारा भिक्खू भिक्षा मिळवता मिळवता कदाचित मागे पडेल अथवा जाण्याच्या ठिकाणी उशीरा पोहोचेल. साहजिकच मार्ग काटता काटता तो थकून जाईल."

१३. "चौथे म्हणजे, रुग्ण भिक्खूला आवश्यक अन्न मिळाले नाही तर त्याचा आजार वाढेल आणि कदाचित त्याचा अंतही होईल.

१४. " पांचवे म्हणजे, रुग्णाची शुश्रुषा करणार्या भिक्खूला बाहेर जाऊन भिक्षा मिळवण्यास सवड मिळणार नाही.

१५. " सहावे म्हणजे, रुग्ण भिक्खूला आवश्यक औषध प्राप्त झाले नाही तर त्याचा आजार वाढेल आणि कदाचित त्याचा अंतही होईल.

१६. " सातवे म्हणजे, भगवान ! आपण खिरीची प्रशंसा केली आहे की, तिच्यामुळे बुद्धी तल्लख होते, भूकतहान शमते; निरोगी माणसास ती पौष्टिक आणि रुग्णास पथ्यक ठरते. म्हणून आजन्म संघास खीर पुरवावी अशी माझी मनीषा आहे.

१७. " शेवटचे म्हणजे, भगवान, अचिरावती नदीत भिक्खुणी गणिकांसमवेत विवस्त्रावस्थेत तटापाशी स्नान करीत असतात. गणिका त्या वेळी त्यांना खिजवतात आणि बोलतात, ' तारुण्यात पावित्र्य राखण्यात काय फायदा ? वृद्धापकाली पावित्र्य राखा म्हणजे दोन्ही साधेल.' भगवान ! नग्नता ही स्त्रीच्या बाबतीत अपवित्र, किळसवणी आणि तिटकार आणणारी गोष्ट ठरते.

१८. " माझ्या वर मागण्याचे हे प्रयोजन आहे."

१९. तथागत म्हणाले, " पण विशाखा, तथागतांकडून हे आठ वर मागण्यात तुझा स्वत:चा काय लाभ आहे ?"

२०. विशाखा म्हणाली, " वर्षावासासाठी ठिकठिकाणी राहणारे भिक्खू तथागतांना भेटण्यासाठी श्रावस्तीला येतील आणि तथागतांकडे आल्यावर ते विचारतील, 'अमूक अमूक भिक्खू निधन पावला. आता त्याला काय गती मिळेल ?' त्यावर जशी त्याची गती असेल त्याप्रमाणे तथागत सांगतील की, ' त्याला मार्गफल प्राप्त झाले आहे किंवा त्याला निर्वाण प्राप्त झाले आहे किंवा त्याला अर्हतत्व प्राप्त झाले आहे.'

२१. " आणि मग मी त्यांच्यापाशी जाऊन त्यांना विचारीन की, ' प्रस्तुत भिक्खू श्रावस्तीत कधी पूर्वी होता काय ?' आणि होकार मिळाला तर मला जाणवेल की, ' नक्की वर्षावासासाठी त्याला चीवरे प्राप्त झाली असतील किंवा बाहेर जाणार्या अथवा आत येणार्या त्या भिक्खूला भोजन मिळाले असेल किंवा त्या रूग्णाइताला किंवा त्याची शुश्रूषा करणार्याला अन्न मिळाले असेल किंवा त्याला आजारपणात औषध आणि खीर सतत मिळाली असेल."

२२. ' आणि मग माझ्या मनास प्रसन्नता वाटेल आणि प्रसन्नतेमुळे आनंद प्राप्त होईल आणि आनंदामुळे सर्व देहाला शान्ती प्राप्त होईल. शान्तीच्या प्राप्तीने सुखकर तृप्तीची अनुभूती मिळेल आणि त्या अनुभूतीने माझ्या हृदयात शांती निर्माण होईल. एक प्रकारे माझ्या नैतिक सामर्थ्याचा किंवा सप्त संबोधीचा उपयोग केल्यासारखे होईल. भगवान, हे आठ वर मागण्यात माझा हा लाभ होणार होता."

२३. त्यावर तथागत म्हणाले, " विशाखे, हे फार बरे; हे फार बरे की, हे लाभ ध्यानात घेऊन तू हे आठ वर मागितलेस. जे पात्र आहेत त्यांना दान करणे हे सुपीक फल देणार्या मातीत सुबीज पेरण्यासारखे आहे. उलट जे रागलोभादी मनो- विकाराच्या आधीन आहेत त्यांना दान करणे हे खराब भूमीत बीज पेरण्यासारखे आहे. दानाचा स्वीकार करणार्यांचे मनोविकार गुणविकासास कुंठित करून टाकतात."

२४. त्यानंतर तथागतांनी पुढील शब्दात विशाखेचे आभार मानले : "शीलसंपन्न उपासिका श्रद्धायुक्त मनाने आणि नि:स्वार्थी वृत्तीने जे काही दान देईल ते दान दिव्य, दु:खनाशक आणि सुखकारक ठरेल. अपवित्रता आणि कलंक ह्यापासून मुक्त असलेल्या मार्गाने जीवन कंठीत असताना सुखी जीवन तिला प्राप्त होईल. सत्प्रवृत्तीमुळे तिला सुख मिळेल आणि आपल्या दातृत्वाने तिला आनंद प्राप्त होईल."

२५. विशाखेने पूर्वाराम विहार संघास दान दिला आणि उपासिकांमध्ये व्यवस्थापिका होण्याचा बहुमान तिला लाभला.

# भाग दुसरा: भगवान बुद्धाचे विरोधक

## १. मोहाकर्षणाने धम्मदीक्षा देण्याचा आरोप

१. एकदा वैशालीच्या महावनातील कूटागारामध्ये भगवान बुद्ध वास्तव्यास होते. भद्दीय लिच्छवी तथागतांकडे त्या वेळी आला आणि म्हणाला, " भगवान, लोक म्हणतात की, श्रमण गौतम हा जादूगार आहे आणि दुसर्या धर्माच्या लोकांना भुलविण्याचा जादूटोणा त्याला अवगत आहे."

२. " जे असे म्हणतात ते तथागताबद्दल विपर्यस्त प्रचार करण्यास हेतू अमान्य करतात. आम्ही लिच्छवीचे लोक ह्या आरोपावर विश्वास ठेवत नाही; पण तथागतांना ह्याबाबत काय म्हणायचे आहे ते ऐकण्याची आमची इच्छा आहे."

३. तथागत म्हणाले: ' भद्दीय, अफवा, परंपरा किंवा लोकप्रवाद ह्यांवर विसंबून राहु नये. एखादी गौष्ट धर्मग्रंथात सांगितली आहे म्हणून ती मान्य करू नका. अमूक एक गोष्ट तर्कसिद्ध किंवा अनुमानावर आधारित किंवा बाह्य स्वरूपाने प्रतीत किंवा स्वमतानुकूल वाटली तर तेवढ्यानेच ती स्वीकारू नका. तुम्हाला ती न्याय वाटते, म्हणून ती मान्य करू नका. श्रमणाच्या मताचा आदर केला पाहिजे ह्या भावनेने भारून जाऊनही एखादी गोष्ट स्वीकारू नका.

४. " पण भद्दीय, अमूक एक कृत्य पापकर्म आहे असे सर्व घटना स्वत: निरीक्षून तुम्हाला आढळेल किंवा अनुभवी विद्वानांनी ते गर्ह्य आहे असे सांगितले आणि त्यामुळे हानी किंवा अन्याय होण्याचा संभव आहे असे आढळले, तर त्याचा तुम्ही त्याग करा.

५. " आता तुझ्या प्रश्नाबद्दल बोलायचे म्हणजे, भद्दीय, जे मजवर जादूटोणा करून धर्मपरिवर्तन करण्याचा आरोप करतात ते स्वत: महत्वाकांक्षी लोक नाहीत काय?" भद्दीय बोलला, " होय, भगवान, ते महत्वाकांक्षी आहेत."

६. "मग भद्दीय, लोभाने जिंकले गेलेले महत्वाकांक्षी लोक आपली महत्वाकांक्षा साध्य करण्यासाठी खोटे बोलण्यास किंवा पाप करण्यास कधी कचरतील काय?" " नाही भगवान. ते कचरणार नाहीत." भद्दीय बोलला.

७. " आणि भद्दीय, जेव्हा कुविचार आणि सूडभावना अरा माणसांच्या मनात उत्पन्न होते तेव्हा. त्यांच्या महत्वाकांक्षेच्या आड येणार्यावर आरोप करण्यास ते दुसर्यांना चिथावणी देणार नाहीत काय?" " होय, भगवान, देतील." भद्दीय बोलला.

८. "भद्दीय, माझ्या शिष्याला मी फक्त असा उपदेश करतो: 'प्रिय शिष्य, लोभयुक्त विचारांचे नियमन करून तू राहात जा. असे केल्याने कोणतेही लोभमूलक कार्य मन, वचन, किंवा कृत्य ह्यांद्वारे तुझ्याकडून घडणार नाही. द्वेष आणि अज्ञान ह्यांवर नियंत्रण ठेवून तू वाग.'

९. "भद्दीय, जे श्रमण-ब्राम्हण माझी निंदा करतात की, 'श्रमण गौतम जादूगार आहे आणि त्याला जादूटोणा अवगत आहे, ज्यामुळे परधर्मातील लोकांना तो भूलवतो' ते लबाड व खोटे बोलणारे आहेत."

१०. "भगवान, आपली ही जादू मोठी अजब गोष्ट आहे. ह्या आपल्या जादूटोण्याने माझ्या प्रिय नातेवाइकांना भूल

पडली असती तर किती बरे झाले असते ! खात्रीने त्यामुळे त्यांना हित आणि सुख प्राप्त झाले असते. भगवान जर सर्व ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र आपल्या ह्या जादूटोण्याने मोहून जातील तर दीर्घकालपर्यंत त्याना हित आणि सुख नक्की प्राप्त होईल."
११. "खरे आहे. भद्दीय, खरे आहे. ह्या जादूटोण्याने जिंकलेल्या सर्व लोकांनी पापकर्माचा त्याग केला तर ते जगाच्या हिताचे आणि सुखाचे ठरणार आहे."

## २. परोपजीवी असल्याचा आरोप

१. भगवान बुद्ध हे परोपजीवी असल्याचा आरोप केला जात असे. ते कष्ट करून स्वतःची उपजीविका न करता दुसर्यावर आपल्या जीवनाचा भार टाकतात असे म्हणण्यात येत असे. आरोप आणि तथागतांचे त्यावर उत्तर खालीलप्रमाणे आहे.
२. एकदा भगवान बुद्ध मगध देशातील दक्षिणगिरी प्रांतातील एकनाला नामक ब्राम्हणाच्या गावात राहात होते. त्या वेळी कृषिभारद्वाजाचे पाचशे नांगर शेतीसाठी जोडले जात होते.
३. पहाटे लवकर चीवर घालून आणि भिक्षापात्र घेऊन ज्या ठिकाणी ब्राम्हण काम करीत होता त्या ठिकाणी तथागत गेले. त्या वेळी तिथे भोजनही आणण्यात आले होते. तथागत एका बाजूला उभे राहिले.
४. ते भिक्षेसाठी उभे राहिले आहेत असे पाहून ब्राम्हण म्हणाला, "श्रमण, मी नांगरतो, बी पेरतो आणि मगच मी खातो. तुम्ही सुद्धा प्रथम नांगरले पाहिजे, बी पेरले पाहिजे आणि मग खाल्ले पाहिजे."
५. "ब्राम्हणा, मीही खाण्यापूर्वी नांगरतो आणि बी पेरतो."
६. "श्रमण गौतमाचा नांगर, जू, फाळ, पराणी किंवा बेलजोडी कधी मी पाहिली नाही. तरीही आपण म्हणता की, मी खाण्यापूर्वी नांगरतो आणि बी पेरतो.
७. " तुम्ही कुषीवल असल्याच दाव करता; पण तुम्ही कसलेली जमीन तर कुठे दिसत नाही. तुम्ही कशी शेती करता ते मला ऐकायचे आहे."
८. " श्रद्धा हे माझे बीज, तपस्व ही वर्षा, प्रज्ञा हे जू आणि नांगर, पापभीरुता हा दण्ड, विचार ही जू बांधण्याची दोरी आणि दक्षता हा नांगर फाळ आणि पराणी." तथागतांनी उत्तर दिले.
९. " वचन आणि कर्म ह्यांमध्ये दक्षता व भोजनात संयम ठेवून, निरुपयोगी गवतापासून मी शेतीला जपतो आणि अन्तिम आनंदाचे पीक उगवेपर्यंत मी सतत खपत असतो. प्रयत्न हा माझा पुष्ट बैल आहे जो खडबडीत जमिनीला कचरत नाही आणि सरळ शान्तीच्या मार्गाने जिथे दुःखाचा लवलेशही नसतो त्या अंतिम स्थानी मला तो घेऊन जातो."
१०. हे ऐकल्यावर ब्राम्हणाने काश्याच्या पात्रात खीर घालून ती भगवान बुद्धांना अर्पण केली आणि तो बोलला, " श्रमण गौतम, हिचा स्वीकार करा. खरोखरच आपणच कृषीवल आहात, आपण अमृताचे पीक काढता."
११. तथागत त्यावर बोलले, " पुरोहितासारखी मी दक्षिणा घेत नाही. सिद्ध पुरुष अशा वृत्तीचे समर्थन करीत नाहीत. तथागतांना तर ती सर्वस्वी निषिद्ध आहे. जोपर्यंत धर्म विद्यमान आहे तोपर्यंत ही प्रथा टिकलीच पाहिजे. एखाद्या पवित्र, शांत प्रवीण, सत्प्रवृत्त श्रमण ब्राम्हणास ते दे, त्याने तुला पुण्यलाभ होईल."

१२. तथागतांचे हे शब्द ऐकून तो ब्राम्हण त्यांच्याकडे गेला आणि त्यांच्या चरणी मस्तक ठेवून बोलला, " श्रमण गौतम, अद्भुत; खरोखरच हे अद्भूत आहे ! जसा एखादा माणूस एखादी पडलेली वस्तु पुन्हा उभी करतो किंवा एखादे गुह्य प्रकट करतो किंवा एखाद्या अध:पतित पुरूषाला उपदेश करतो किंवा एखादी गुह्य गोष्ट सागतो किंवा एखाद्या पथभ्रष्ट माणसाला योग्य मार्गदर्शन करतो किंवा डोळस माणसाला सभोवतालचे जग दिसावे म्हणून अंधारात दीप पेटवून आणतो, तसेच तथागतांनी नाना प्रकारांनी आपला धर्म स्पष्ट करून सांगितला."
१३. " बुद्ध, धम्म आणि संघ ह्यांचा आश्रय मी स्वीकारतो. तथागतांनी मला प्रव्रज्या आणि उपसम्पदा देण्याचा अनुग्रह करावा." अशा प्रकारे कृषीवल भारद्वाजाने प्रव्रज्या व उपसम्पदा ग्रहण केली.

## ३. सुखी संसार उध्वस्त केल्याचा आरोप

१. मगध देशातील पुष्कळ थोर तरुण सरदारपुत्र तथागतांचे शिष्य झालेले पाहून लोक रागावले आणि चिडले. ते बोलू लागले, " श्रमण-गौतम मातापित्यांना नि:संतान बनवीत आहेत; श्रमण गौतम विवाहित स्त्रियांना विधवा बनवीत आहेत. श्रमण गौतम कुटुंबांचा नाश करीत आहेत."
२. "त्यांनी एक सहस्त्र जटिलांना दिक्षा दिली. संजयाच्या अडीचशे अनुयायांना त्यांनी दीक्षा दिली. मगध देशातील पुष्कळ थोर तरुण कुलवंत श्रमण गौतमांच्या नादी लागून पवित्र जीवन व्यतीत करीत आहेत. आता पुढे काय होईल ते सांगता येणार नाही !"
३. आणि जेव्हा त्यांच्या दृष्टीस भिक्खू पडतात तेव्हा ते त्यांना असे चिडवतात, "महाश्रमण मगधदेशी राजगृहात संजयाच्या सर्व अनुयायांसह आले आहेत. आता आणखी कोणाच्या वाटेला ते जाणार?"
४. भिक्खूच्या कानी हे आरोप पडले आणि त्यांनी ते तथागतांना निवेदित केले.
५. तथागत म्हणाले, "हा गदारोळ फार दिवस टिकणार नाही; फक्त एक सप्ताहच तो टिकेल सप्ताहानंतर सर्व काही शांत होईल.
६. "आणि जर ते तुम्हाला चिडवू लागले तर त्यांना सांगा की, जे महावीर आहेत, जे तथागत आहेत ते सद्धर्माच्या मार्गाने जातात. जर विद्वान पुरुष लोकांना सन्मार्गाने नेऊ लागले तर त्यात तक्रार करण्यासारखे काय आहे ? माझ्या धम्मात कसल्याच जबरदस्तीला स्थान नाही. वाटल्यास कुणी गृहत्याग करावा किंवा गृहस्थ राहून परिव्रज्या घ्यावी."
७. भिक्खुंनी जेव्हा टीकाकारांना तथागतांचे हे शब्द सांगितले तेव्हा त्यांना समजून चुकले की, शाक्यपुत्र श्रमण लोकांना सन्मार्गानेच नेत आहे, कुमार्गाने नव्हे. आणि मग त्यांनी तथागतांना दोष देण्याचे थांबविले.

## ४. जैन तीर्थक आणि प्राणघाताचा आरोप

१. तीर्थकांना वाटू लागले की, श्रमण गौतमाच्या प्रभावामुळे लोक आता आपणास आदर दर्शवीत नाहीत. एवढेच नव्हे तर आपल्या अस्तित्वाची देखील त्यांना जाणीव दिसत नाही.

२. तीर्थकांनी विचार केला, ‘त्याचा प्रभाव नाहीसा करण्यासाठी काही तरी उपाय केला पाहिजे; कुणाचे तरी साहाय्य घेतले पाहिजे. सुंदरीच्या मदतीने हे काम यशस्वी होऊ शकेल.’
३. ते सुंदरीकडे गेले आणि तिला म्हणाले, “भगिनी, तू अत्यंत सुंदर आणि आकर्षक आहेस. श्रमण गौतमाबद्दल जर तू कुवार्ता प्रसृत केलीस तर लोक तिच्यावर विश्वास ठेवतील आणि त्यामुळे त्यांचा प्रभाव कमी होईल.”
४. दररोज सायंकाळी जेव्हा जेतवनाहून शहराकडे लोक परत येत त्या वेळी हातात पुष्पमाला, कर्पूर आणि सुगंध घेऊन जेतवानकडे सुंदरी जात असे. परतणारे लोक विचारत, “सुंदरी, कुठे जातेस?” त्यावर ती उत्तर देत असे, “मी श्रमण गौतमांकडे त्यांच्या गन्धकुटीत राहण्यास चालले आहे.”
५. तीर्थकांच्या उद्यानात रात्र घालवून प्रात:काल होताच ती तिथून परतत असे. जे कोणी तिला विचारत की, ‘ रात्रभर तू कुठे होतीस ?’ त्यांना ती सांगत असे, ‘श्रमण गौतमांच्याकडे.”
६. काही दिवसांनंतर तीर्थकांनी मारेकरी बोलावून त्यांना सांगितले, “ सुंदरीला ठार मार आणि गौतमांच्या गंधकुटीजवळच्या कचरपट्टीत तिचा देह फेकून द्या.” मारेकर्यांनी त्याप्रमाणे केले.
७. त्यानंतर तीर्थकांनी सरकारी न्यायाधिकार्यांकडे तक्रार केली की, सुंदरी जेतवनात जात असे आणि आता ती कुठे दिसत नाही.
८. सरकारी अधिकार्यांच्या मदतीने शोध करताना कचरपट्टीत तिचा देह त्यांना आढळला.
९. आपल्य गुरूची अब्रू वाचविण्यासाठी सुंदरीची हत्या केल्याचा आरोप तीर्थकानी तथागतांच्या शिष्यांवर केला.
१०. सुंदरीची हत्या केल्याबद्दल मिळालेल्य धनाची वाटणी मारेकरी दारूच्य गुत्त्यात करीत असताना आपापसात भांडू लागले.
११. सरकारी अधिकार्यांनी त्यांना ताबडतोब पकडले आणि त्यांनी गुन्ह कबूल केला. ज्यांच्या प्रेरणेने ही हत्या करण्यास ते प्रवृत्त झाले त्या तीर्थकांचाही त्यांनी उल्लेख केला.
१२. अशा प्रकारे तीर्थकांचा उरलासुरला प्रभावही त्यांनी गमावला.

## ५. जैन तीर्थक आणि अनैतिकतेचा आरोप

१. सूर्योदयाबरोबर जसे काजवे लुप्त होतात तशी तीर्थकांची दशा झाली. लोक त्यांना आदर किंवा उपहार देईनात.
२. राजरस्त्यावर उभे राहून ते बोलू लागले, “ जर श्रमण गौतम बुद्ध असतील तर आम्हीही आहोत. जर श्रमण गौतमांना दान देऊन पुण्य मिळत असेल तर आम्हालाही दान केल्याने पुण्य प्राप्त होईल. ह्यांस्तव आम्हांस दान द्या.”
३. लोकांनी त्यांच्या ह्या बडबडीकडे दुर्लक्ष केले. तेव्हा श्रमण गौतमांच्या चारित्र्याबद्दल कंडी पसरवून संघाला बदनाम करण्याचा त्यांनी गुप्त कट रचला.
४. त्या वेळी श्रावस्तीमध्ये चिंचा नावाची एक ब्राम्हणी योगिनी राहात असे. तिचा देह आणि रूप आकर्षक हाते. आपल्या अंगविक्षेपांनी ती वासनोत्तेजक प्रभाव निर्माण करू शके.
५. तीर्थकांपैकी एक कुटिल तीर्थकाने सुचवले की, चिंचाच्या सहाय्याने गौतमाबद्दल कंडी उठवून त्याला बदनाम

करणे सुलभ होईल. बाकीच्या तीर्थकांनी ह्या सूचनेस सम्मती दर्शवली.

६. एके दिवशी चिंचा तीर्थकांच्या उद्यानात आली आणि अभिवादन करुन ती त्यांच्याजवळ बसली; पण कुणीही तिच्याशी बोलले नाही.

७. ह्यामुळे चकित होऊन ती बोलली, "मी काय अपराध केला आहे? तीनदा मी आपणास अभिवादन केले; पण आपण शब्दही बोलत नाही."

८. तीर्थक बोलले, "भगिनी! तुला माहीत नाही काय की, आपल्या लोकप्रियतेमुळे श्रमण गौतम आम्हाला बाधक झाला आहे." " नाही, मला माहीत नाही! पण ह्याबाबत मी काही करू शकेन काय?"

९. "भगिनी, जर तुला आमचे भले करायचे असेल तर तू स्वत: गौतमाबद्दल काही कंड्या उठव. जेणेकरून त्याची लोकप्रियता नष्ट होईल." "ठीक आहे; ह्या बाबतीत आपण निःशंक राहा आणि सर्व मजवर सोपवा." असे म्हणून ती तिथून निघून गेली.

१०. स्त्री-सुलभ आकर्षणकलेत आणि नैसर्गिक सौंदर्यविशेषात चिंचा कुशल होती. श्रावस्तीचे नागरिक जेतवनाहून प्रवचन ऐकून परत येत. त्या वेळी रक्त-वस्त्र परिधान करून, सुगंध लेवून हातांत पुष्पमाला घेऊन चिंचा जेतवनाकडे जाण्यास निघे.

११. जर कुणी तिला विचारले, "तू कुठे निघालीस?" तर त्यावर ती उत्तर देई, "तुम्हाला काय करायचे !" जेतवनाजवळील तीर्थिकारामात रात्र घालवून ती प्रात:काळी शहराकडे परत येई. त्या वेळी भगवान बुद्धाच्या दर्शनासाठी नागरिक जेतवनाकडे जात असत.

१२. जर कुणी तिला विचारले, "तू रात्र कुठे व्यतीत केलीस ?" तर ती उत्तर देई, "तुम्हाला काय करायचे ? मी जेतवनात श्रमण गौतमांच्या गन्धकुटीत त्यांच्याबरोबर रात्र घालवली !" काही लोकांच्या मनात ह्या तिच्या उत्तरामुळे संदेह निर्माण होई.

१३. चार महिन्यांनंतर आपल्या पोटावर जुनी चिरगुटे गुंडाळून त्याचा आकार वाढवून तिने सांगायास सुरुवात केली की, श्रमण गौतमापासून आपल्याला गर्भप्राप्ती झाली आहे. काही लोकांनी तिच्या ह्या शब्दांवर विश्वास ठेवला.

१४. नवव्या महिन्यात तिने एक लाकडाची फळी आपल्या पोटावर बांधली आणि कीटकदंशांनी हात सुजवून घेऊन ज्या स्थानी भगवान बुद्ध, भिक्खू व गृहस्थांसमोर प्रवचन करीत होते तिथे जाऊन ती म्हणाली, "हे महान् उपदेशक ! आपण पुष्कळ लोकांना धर्मोपदेश करता. आपली वाणी मधुर आहे आणि आपले ओठ फार नाजूक आहेत. आपल्याशी संबंध येऊन मी गर्भवती झाले आहे आणि माझा प्रसूतीसमय समीप आला आहे.

१५. "आपण माझ्या प्रसूतीची काहीच व्यवस्था केलेली नाही. तसेच अडीअडचणीसाठी औषधपाण्याचीही काहीच सोय केलेली दिसत नाही. जर स्वतः तुम्हाला ही व्यवस्था करणे शक्य नसेल तर आपल्या शिष्यांपैकी- कोशल देशाचा राजा, अनाथ- पिण्डिक किंवा विशाखा अशा कोणाला तरी ती करण्यास का सांगत नाही?

१६. " कुमारिकांना वश कसे करावे हे आपणास माहीत आहे; पण त्यापायी होणार्या अर्भकाचा परिपाल कसा करावा हे मात्र आपणास माहीत नाही." उपस्थित श्रोतृवर्ग तटस्थ झाला होता.

१७. आपले प्रवचन अर्धवट सोडून अत्यंत संयमाने गंभीर स्वरात भगवान बुद्ध बोलले, "हे भगिनी, तू जे काही आता सांगितलेस त्याची सत्यासत्यता फक्त आपणा दोघासच माहीत आहे."

१८. चिंचा जोरजोराने खोकत म्हणाली, “ होय, गुरुवर्य, असली गोष्ट फक्त आपणा उभयतासच माहीत असणे संभाव्य आहे.”

१९. तिच्या खोकल्यामुळे पोटावर बांधलेल्या फळीच्या दोराची गाठ सैल होऊन ती फळी सरकून तिच्या पायाशी पडली. चिंच ह्यामुळे अस्वस्थ झाली.

२०. लोकांनी तिला काठ्यांनी आणि दगडांनी मारुन तिथून हाकलून दिले.

## ६. देवदत्त, चुलत भाऊ आणि शत्रू

१. देवदत्त हा भगवान बुद्धांचा चुलत भाऊ होता; पण प्रथमपासूनच तो भगवान बुद्धांचा द्वेष करीत असे आणि त्याला त्यांच्याबद्दल तीव्र घृणा वाटत असे.

२. भगवान बुद्धांनी गृहत्याग केल्यानंतर यशोधरेशी लगट करण्याचा त्याने प्रयत्न केला.

३. एकदा यशोधरा झोपण्याच्या तयारीत असता दरवाजावरच्या सेवकांना चुकवून भिक्खूच्या वेषाने तिच्या शयनागारात त्याने प्रवेश केला. यशोधरेने विचारले, “ श्रमणा, तुला काय हवे आहे ? माझ्या स्वामीकडून माझ्यासाठी काही निरोप आणला आहेस काय ?”

४. “ तुझा स्वामी, त्याला काय तुझी पर्वा ! तूला ह्या सुखनिवासात निर्दयपणे एकटी टाकून तो निघून गेला.”

५. “ पण पुष्कळ लोकांच्या कल्याणासाठीच त्याने हे केले.” यशोधरेने उत्तर दिले.

६. “ ते काहीही असो; पण त्याच्या निर्दयतेचा सूड तू आता घे.”

७. “ श्रमणा, गप्प बस. तुझी वाणी आणि विचार दुर्गंधीने भरलेले आहेत.”

८. “ यशोधरे ! तू मला ओळखले नाहीस ? मी तुझा प्रियकर देवदत्त !”

९. “ देवदत्त ! तू फसवा आणि दुष्ट आहेस हे मला माहीत होते. तू कधी श्रमण झालास तरी वाईटच होशील असे मला वाटत होते ; पण तू इतका अधम वुत्तीचा असशील असा मात्र संशय आला नव्हता.”

१०. “यशोधरे, यशोधरे, माझे तुझ्यावर प्रेम आहे.” देवदत्ताने विनवणी केली. “आणि तुझा पती तुझा तिरस्कार करतो तो तुझ्याशी दुष्टपणे वागला आहे. माझ्यावर प्रेम कर आणि त्याच्या दुष्टतेचा सूड घे.”

११. यशोधरेच्या फिकट आणि कृश चेहर्यावर रक्तिम्याची छटा आली. तिच्या गालावर अश्रू ओघळू लागले.

१२. “देवदत्त, तूच माझ्याशी दुष्टपणाने वागत आहेस. तुझे प्रेम जरी निःसीम असते तरी तो माझा अपमान ठरला असता. ‘मी तुझ्यावर प्रेम करतो’ असे सांगतानाही तू खोटे बोलतो आहेस.

१३. “जेव्हा मी तरुण आणि सुंदर होते तेव्हा तू माझ्याकडे ढुंकूनही पाहिले नाहीस. आता मी वयस्क शोकमग्न झाले आहे आणि अशा रात्रीच्या अनुचित समयी तू विश्वासघातकी आणि अपराधी प्रेमाची घोषणा करण्यास आला आहेस. तू दुष्ट-भ्याड पुरुष आहेस.”

१४. आणि ती ओरडली, “देवदत्त, चालता हो इथून.” आणि देवदत्त तिघून निघून गेला.

१५. आपल्याला संघप्रमुख न करता सारिपुत्त आणि मोग्गलायनांना ते स्थान दिले ह्याबद्दल देवदत्ताचा भगवान बुद्धांवर रोष होता. देवदत्ताने भगवान बुद्धांवर तीनदा प्राणघाताचे प्रयत्न केले; पण तो एकदाही यशस्वी झाला नाही.

१६. एकदा भगवान बुद्ध गृध्रकूट पर्वताच्या पायथ्याशी सावलीत येरझारा करीत होते.
१७. देवदत्त वर चढला आणि तथागताचे प्राणहरण करण्याच्या हेतूने त्याने एक मोठा दगड खाली लोटून दिला; पण तो एका खडकावर आदळला आणि तिथल्या तिथे गाडला गेला. फक्त त्याचा एक लहान तुकडा तथागतांच्या पायावर येऊन आदळला आणि त्यामुळे थोडे रक्त आले.
१८. त्याने दुसर्यांदा भगवान बुद्धाचे प्राणहरण करण्याचा प्रयत्न केला.
१९. ह्या वेळी देवदत्त राजकुमार अजातशत्रूकडे गेला आणि म्हणाला, “मला थोडे लोक दे.” आणि अजातशत्रूने आपल्या लोकांना आज्ञा केली, “देवदत्त तुम्हाला सांगेल तसे करा.”
२०. मग देवदत्ताने एकास आज्ञा केली, “जा मित्रा; श्रमण गौतम अमुक जागी आहेत. त्यांची हत्या करा.” आणि तो मनुष्य परत आला आणि त्याला म्हणाला, “मी तथागतांचे प्राणहरण करण्यास असमर्थ आहे.”
२१. त्याने तथागतांचे प्राणहरण करण्याचा तिसरा प्रयत्न केला.
२२. ह्या समयी राजगृहात नलगिरी नावाचा एक क्रूर, नरघातक हत्ती होता.
२३. देवदत्त राजगृहातील हत्तीच्या तबेल्यात गेला आणि रक्षकांना म्हणाला, “मी राजाचा नातेवाईक आहे आणि मी कुठल्याही नीचपदस्थ व्यक्तीला उच्चपदी चढवू शकतो. मी त्याचा शिधा किंवा पगार वाढवू शकतो.”
२४. “तेव्हा, माझ्या मित्रांनो, जेव्हा श्रमण गौतम ह्या सडकेवर येतील तेव्हा नलगिरीला मुक्त करा आणि सडकेवर जाऊ द्या.”
२५. देवदत्ताने भगवान बुद्धांना मारण्यासाठी धनुर्धरांची नियुक्ती केली होती. त्याने पिसाळलेल्या नलगिरी हत्तीला त्यांच्या मार्गात सुटे सोडले होते.
२६. पण तो यशस्वी झाला नाही. जेव्हा हे प्रयत्न उघडकीस आले तेव्हा देवदत्ताला प्राप्त झालेल्या सर्व सार्वजनिक नेमणुका रद्द झाल्या आणि नंतर अजातशत्रूनेही त्याला भेटीगाठी नाकारल्या.
२७. उपजीविकेसाठी त्याला दारोदार भीक मागावी लागली. देवदत्ताला अजातशत्रूकडून पुष्कळ नजराणे प्राप्त झाले होते; पण ते फार टिकू शकले नाहीत. नलगिरी प्रकरणानंतर देवदत्ताचा प्रभाव संपूर्ण नष्ट झाला.
२८. आपल्या कृत्यामुळे अप्रिय झाल्यामुळे देवदत्त मगधदेश सोडून कोशलदेशात गेला. राजा प्रसेनजित आपले स्वागत करील अशी त्याची अपेक्षा होती; पण प्रसेनजितने त्याला तुच्छतेने वागवून हाकलून दिले.

## ७. ब्राम्हण आणि भगवान बुद्ध

( १ )

१. एकदा पुष्कळ भिक्खुंसमवेत तथागत कोशलदेशात परिभ्रमण करीत असता ते थून नामक ब्राम्हणग्रामात जाऊन पोहोचले.
२. थून गावातील ब्राम्हण गृहस्थांच्या कानांवर बातमी आली की, ‘श्रमण गौतम आपल्या गावातील शेतात येऊन पोहोचले आहेत.’

३. हे ब्राम्हण गृहस्थ स्वभावाने लोभी, असत्य मताचे आणि अश्रद्ध होते.
४. ते म्हणाले, "जर श्रमण गौतम ह्या गावात प्रवेश करतील व दोन तीन दिवस वास्तव्य करतील तर सर्व ग्रामस्थ त्यांचे उपासक बनतील. मग ब्राम्हण धर्माला आधार राहणार नाही. ह्यासाठी त्यांचा ग्रामप्रवेशाला प्रतिबंध केला पाहिजे."
५. गावात प्रवेश करण्यापूर्वी नदी ओलांडावी लागे. तथागताच्या ग्रामप्रवेशाला प्रतिबंध करण्यासाठी त्या ब्राम्हणांनी नदीतल्या सर्व होड्या किनार्यापासून काढून घेतल्या आणि पूल आणि बांध निरपयोगी करून टाकले.
६. त्यांनी एक सोडून इतर सर्व विहिरीत पालापाचोळा भरला आणि पाणवठे, आरामगृहे आणि पडव्या झाकून अदृश्य केल्या.
७. तथागतांना त्यांची ही दुष्कृत्ये समजली आणि त्यांची दया येऊन भिक्खू-वर्गासह त्यांनी नदी पार केली आणि मार्ग कापीत कापीत ते थून ब्राम्हणग्रामी येऊन पोहोचले.
८. तथागत सडक सोडून एका बाजूस झाडाखाली जाऊन बसले. त्या समयी पुष्कळ स्त्रिया पाणी घेऊन तथागतांच्या जवळून जात होत्या.
९. त्या गावाने निश्चय केला होता की, 'श्रमण गौतम तिथे आले तरी त्यांचे आगतस्वागत करायचे नाही आणि जर ते एखाद्या घरी गेले तर त्यांना किंवा त्यांच्या शिष्यांना अन्न किंवा पाणी द्यायचे नाही.'
१०. एका ब्राम्हणाची दासी पाण्याचा घडा घेऊन जात असता तिच्या नजरेस तथागत आणि भिक्खू पडले. ते थकलेले व तहानेलेले आहेत हे जाणून ती भाविक दासी त्यांना पाणी देणार होती.
११. ती मनाशी म्हणाली की, 'जरी गावच्या लोकांनी श्रमण गौतमांचे स्वागत करू नये किंवा त्यांना काही देऊ नये असे ठरवले तरी ह्या पुण्यक्षेत्र व दानपात्र लोकांना पाहून त्यांना थोडे पाणी देऊन माझ्या मुक्तीचा पाया जर मी घातला नाही तर मी दुःखातून कशी बरे मुक्त होऊ शकेन ?'
१२. "काय वाटेल ते होवो. ह्या गावचे सर्व लोक मला मारोत किंवा बांधून घालोत, ह्या पुण्यक्षेत्रांना मी पाणी दिल्यावाचून राहणार नाही."
१३. दुसर्या स्त्रियांनी तिला थांबवण्याचा यत्न केला ; पण एकदा निश्चय केल्यावर जीवाची पर्वा न करता तिने आपल्या डोक्यावरचा घडा खाली ठेवला व ती तथागतांच्या जवळ गेली आणि तिने त्यांना पाणी दिले. त्यांनी आपले हातपाय धुतले व पाणी प्राशन केले.
१४. तथागतांना तिने पाणी दिल्याची हकीकत तिच्या ब्राम्हण धन्याला समजली. 'तिने गावच्या ठरावाचा भंग केला आहे आणि लोक मला दोष देत आहेत' अशा विचाराने संतप्त होऊन दातओठ खाऊन तो तिच्या अंगावर धावला आणि खाली पाडून लाथाबुक्कयांनी त्याने तिला मारले. ह्या मारामुळे ती मरण पावली.

( २ )

१. द्रोण नामक एक ब्राम्हण तथागतांजवळ गेला आणि त्याने त्यांना अभिवादन केले व कुशलसमाचार विचारून तो त्यांच्याजवळ बसला. असे बसल्यावर द्रोण तथागतांना म्हणाला :

२. “श्रमण गौतम ! मी असे ऐकले आहे की, तथागत वयोवृद्ध आदरणीय ब्राम्हणांना अभिवादन करीत नाहीत. त्यांना उत्थापन देत नाहीत किंवा आसनही देत नाहीत.

३. “श्रमण गौतम ! हे खरे आहे काय, की आपण असे करता ? तसे असेल तर ते बरे नव्हे.”

४. “श्रमण गौतम ! जर कुणाच्या बाबतीत खरे बोलताना जर म्हटले की ‘कुलशीलवान मातापित्यांपासून त्याचा जन्म झाला, पूर्वीच्या सात पिढ्यांपर्यंत त्याचे कुल पवित्र आणि निष्कलंक होते, त्याचा जन्म निर्दोष होता, अभ्यासू, वेद-मन्त्रज्ञ, अक्षर आणि प्रभेदासह तीन वेदांत तो पारंगत होता. तसेच शब्दशास्त्र, इतिहासपुराणे, काव्य आणि व्याकरणाचा तो ज्ञाता होता. महापुरुषलक्षणाच्या अभ्यासात कुशल व विश्वतत्वज्ञ असा तो होता.’ तर श्रमण गौतम ! माझ्या बाबतीत हे संपूर्णपणे यथातथ्य ठरेल. कारण माझा जन्म... माझे कुलशील इत्यादी हे असे आहे.”

५. “द्रोण ! जे प्राचीन मन्त्रनिर्माते, मन्त्रउद्गाते ब्राम्हणऋषी होते, ज्यांना आपल्या मन्त्राची प्रत्येक ओळ, वाक्य व शब्द अक्षरश: ज्ञात होता--उदाहरणार्थ, अठ्ठक, वामक, वामदेव, विश्वामित्र, जमदग्नी, अंगीरस, भारद्वाज--त्यांनी असे म्हटले आहे की, ब्राम्हण पाच प्रकारचे असू शकतात. ब्रम्हसदृश, देवसदृश, बन्धनयुक्त, बन्धनभंजक व जातिभ्रष्ट. द्रोणा, ह्या पाचांपैकी तू कोणत्या प्रकारचा ब्राम्हण आहेस ?”

६. “श्रमण गौतम ! आम्हाला हे ब्राम्हणांचे पाच प्रकार माहीत नाहीत तरी पण आम्हाला माहीत आहे की, आम्ही ब्राम्हण आहोत. आपण आम्हाला धर्मोपदेश करावा म्हणजे मला हे पाच प्रकार समजतील.”

७. “ब्राम्हणा, तर लक्ष देऊन ऐक. मी सांगतो.”

८. “ठीक आहे.” तो बोलला आणि मग तथागत सांगू लागले-

९. “द्रोण ! ब्राम्हण ब्राम्हणसदृश केव्हा होतो ?”

१०. “हे द्रोण, एखादा ब्राम्हण कुलशीलवान मातापित्यांपासून जन्म घेतो, सात पूर्व-पिढ्यांकडून त्याला पावित्र्याचा वारसा प्राप्त झालेला असतो, जन्माच्या दृष्टीने तो सर्वथा निर्दोष असतो. अठ्ठेचाळीस वर्षे ब्रम्हचर्याचे तो पालन करतो आणि आचार्यांनी शिक्षण दिल्याबद्दल अधर्मानुसार नव्हे तर धर्मानुसार त्यांची दक्षिणा पूर्ण करण्याबद्दल तो झटतो.”

११. “आणि द्रोण ! धर्मानुसार म्हणजे काय ? तर शेतकरी, व्यापारी, गुराखी, धनुर्धर, राजसेवक, किंवा दुसरा कोणताही व्यावसायिक न होता, भिक्षापात्राचा तिरस्कार न करिता फक्त भिक्षा मागून तो आपली उपजीविका करतो.”

१२. “तो आपली गुरुदक्षिणा देऊन टाकतो. श्मश्रूशीर्षाचे मुंडन करतो, काषायवस्त्र परिधान करतो आणि गृहहीन जीवनासाठी गृहत्याग करतो.”

१३. “आणि असे केल्यावर एका, दुसर्या, तिसर्या, चौथ्या, ऊर्ध्व व अधर अशा सर्व दिशांत मैत्रीयुक्त, दूरगामी, व्यापक, तसेच असीमित वृत्तीने आणि घृणा किंवा कुविचाराविना तो संचार करीत राहतो.”

१४. “आणि असे केल्यावर तो करुणायुक्त वृत्तीने विहार करतो. मुदितायुक्त वृत्तीने विहार करतो. उपेक्षायुक्त वृत्तीने विहार करतो. एका, दुसर्या, तिसर्या,चौथ्या, ऊर्ध्व, अधर अशा सर्व दिशांत करुणा, मुदिता, उपेक्षापूर्ण विचारांनी सर्वत्र दूरगामी, व्यापक, असीमित आणि घृणा किंवा कुविचाराविना तो सर्वत्र संचार करीत राहतो.

१६. “अशा प्रकारे ह्या चार ब्रम्हविहारांत विहार करून, मृत्यूनंतर देहविच्छेद झाल्यानंतर तो हितकर

ब्रम्हलोकात उदय पावतो. हे द्रोण! अशा प्रकारे ब्राम्हण ब्रम्हसदृश होतो.''

१७. ''द्रोण ! ब्राम्हण देवसदृश कसा होतो?''

१८. ''द्रोण ! अशाच प्रकारच्या सुजात आणि सुचरित ब्राम्हणाचे उदाहरण घेऊ. तो शेती, व्यापार इत्यादी मार्गांनी आपली उपजीविका न करता भिक्षा मागून जीवन व्यतीत करतो. तो आपली गुरुदक्षिणा चुकती करतो, आणि अधर्मानुसार नव्हे तर धर्मानुसार पत्नीचा स्वीकार करतो.''

१९. ''इथे धर्मानुसार म्हणजे तरी काय ? तर क्रयविक्रयाने प्राप्त न करता जिच्या हातावर विधियुक्त उदक घातले गेले आहे अशाच ब्राम्हणीचा तो स्वीकार करतो. ब्राम्हणीकडेच जातो, अन्त्यज, व्याध, वेळू-कारागीर, रथकार किंवा आदिवासी ह्यांच्या कन्यकांकडे नव्हे. किंवा सन्तानवती, स्तनपानक्षम किंवा ऋतू प्राप्त न झालेल्या कन्यकांकडेही नव्हे.''

२०. ''द्रोण ! तो गर्भवती कन्येकडे का जात नाही? तर तसे केल्यास होणारी संतती कलंकित ठरेल. तो स्तनपानक्षम कन्येकडे का जात नाही? तर त्यामुळे संततीचे स्तनपान अपवित्र होईल.''

२१. ''आणि जी ऋतुस्नात नाही त्या कन्येकडे तो का जात नाही ? हे द्रोण जर तो अशा कन्येकडे गेला तर कामतृप्ती, क्रीडा अथवा सौख्य ह्यांचे निधान न होता केवळ सन्तानोत्पत्तीचे साधन एवढेच त्या ब्राम्हणीला महत्व उरेल.''

२२. ''आणि वैवाहिक जीवनात त्याला संतानप्राप्ती झाली तर तो मुंडन करून घेतो आणि गृहत्याग करून गृहहीन जीवन पत्करतो.''

२३. ''आणि अशा प्रकारे गृहहीन झाल्यानंतर कामविकारापासून अलिप्त होऊन तो प्रथम, द्वितीय, तृतीय, ध्यान प्राप्त करीत चतुर्थ ध्यानाची साधना करीत सिद्ध होतो.''

२४. ''आणि अशा रितीने चारही ध्यानांची धारणा केल्यानंतर मृत्यूनंतर देहविच्छेद झाल्यानंतर तो हितकर ब्रम्हलोकात उदय पावतो.''

२५. ''हे द्रोण ! अशा प्रकारे ब्राम्हण देवसदृश होतो.''

२६. ''आणि हे द्रोण, ब्राम्हण बन्धनयूक्त ब्राम्हण कसा होतो ?''

२७. ''हे द्रोण, अशाच एका सुजात आणि सुचरित ब्राम्हणाचे उदाहरण घेऊ. तोही असाच विवाहित होतो.''

२८. ''आणि वैवाहिक जीवनात संतानप्राप्ती झाल्यानंतर तो संतानप्रेमाने भारून जाऊन संसारातच मग्न होतो. गृहजीवनाशी निगडित होऊन राहतो, आणि गृहहीन जीवनात प्रवेश करण्याचा विचारही त्याला शिवत नाही.''

२९. ''आपल्या परंपरागत बन्धनात तो जीवन व्यतीत करतो. यांचे उल्लंघन करीत नाही. त्याच्या बाबतीत असे म्हणता येईल, 'तो बन्धनांचा मर्यादेतच जीवन व्यतीत करतो, सीमोल्लंघन करण्याचा कधी प्रयत्न करीत नाही' आणि म्हणूनच ह्या ब्राम्हणाला 'बन्धनयुक्त ब्राम्हण' म्हणतात.''

३०. ''द्रोण, अशा प्रकारे ब्राम्हण बन्धनयुक्त होतो.''

३१. ''आणि हे द्रोण ! ब्राम्हण 'बन्धनभंजक' कसा होतो?''

३२. ''हे द्रोण, अशाच एका सुजात आणि सुचरित ब्राम्हणाचे उदाहरण घेऊ. तो गुरुदक्षिणा चुकती करतो आणि धर्मानुसार किंवा अधर्मानुसार पत्नीचा स्वीकार करण्याचे योजतो. क्रयविक्रयाने प्राप्त झालेली, अथवा ब्राम्हणी, अथवा जिच्या हातावर विधियुक्त उदक सोडले गेले आहे अशी.''

३३. “तो एखाद्या ब्राम्हणीकडे जातो, किंवा क्षत्रिय, अन्त्यज, भूदासी कन्येकडे किंवा जातिभ्रष्ट, व्याध, वेळूकारागीर, रथकार, आदिवासी ह्यांच्या कन्यांकडे, किंवा सन्तानवती, स्तनपानक्षम, ऋतुमती, अप्राप्तऋतू अशा स्त्रियांकडे जातो. कामतृप्ती, क्रीडा, सौख्य आणि सन्तानोत्पत्तीचे साधन ह्या दृष्टीनेच केवळ त्याला ब्राम्हणीचे महत्व वाटत असते.”

३४. “तो परंपरागत बन्धनांचे पालन करत नाही. तो त्यांचे उल्लंघन करतो आणि असे म्हटले जाते, ‘तो बन्धनांचे पालन करीत नाही तर बन्धनांचे उल्लंघन करतो’ आणि म्हणूनच त्याला ‘बन्धनभंजक’ ब्राम्हण म्हणतात.”

३५. “अशा प्रकारे, द्रोण ! ब्राम्हणाला ‘बन्धनभंजक’ म्हणतात.”

३६. “आणि द्रोण, ब्राम्हण ‘जातिभ्रष्ट ब्राम्हण’ कसा होतो?”

३७. “हे द्रोण, अशाच एका सुजात ब्राम्हणाचे उदाहरण घेऊ. तो अठ्ठेचाळीस वर्षेपर्यंत ब्रम्हचर्यपालन करून वेदमंत्रांचा अभ्यास करतो. शिक्षणक्रम पूर्ण झाल्यावर गुरुदक्षिणेच्या परिपूर्तीसाठी ( धर्मानुसार किंवा अधर्मानुसार उपजीविका करीत ) तो कृषिबल, व्यापारी, गुराखी, धनुर्धर, राजसेवक किंवा इतर व्यवसाय पत्करतो; किंवा भिक्षापात्राचा तिरस्कार न करता भिक्षा मागूनच तो उपजीविका करतो.”

३८. “गुरुदक्षिणा चुकती केल्यावर तो धर्मानुसार किंवा अधर्मानुसार पत्नीचा स्वीकार करतो. क्रयविक्रयातून प्राप्त झालेली, किंवा जिच्या हातावर विधियुक्त उदक सोडलेले आहे अशी एखादी ब्राम्हणी किंवा दुसरी एखादी स्त्री. सन्तानवती, स्तन-पानक्षम इत्यादी. कामतृप्ती क्रीडा, किंवा सन्तानोत्पत्तीचे साधन म्हणूनच गणली गेलेली. अशा प्रकारे तो जीवन व्यतीत करतो.”

३९. “तेव्हा ब्राम्हण त्याच्याबद्दल बोलतात, ‘हा श्रेष्ठ ब्राम्हण आपले जीवन असे कसे बरे व्यतीत करतो ?”

४०. आणि त्यावर तो उत्तर देतो, ‘अग्नी स्वच्छ व घाणेरड्या वस्तू जाळून टाकतो; पण त्यामुळे तो स्वत: अशुद्ध होत नाही. तसेच ब्राम्हणाने अशा प्रकारे जीवन व्यतीत केले तरी त्यामुळे तो अपवित्र ठरत नाही.’

४१. “ आणि असे म्हणतात, तो ब्राम्हण अशा प्रकारे जीवन व्यतीत करतो आणि म्हणूनच त्याला ‘जातिभ्रष्ट ब्राम्हण’ असे म्हणतात.”

४२. “ हे द्रोण, अशा प्रकारे एखादा ब्राम्हण ‘जातिभ्रष्ट ब्राम्हण’ होत असतो.”

४३. “ द्रोण, प्राचीन मन्त्रनिर्माते, मन्त्रउग्दाते, ब्राम्हणऋषी ज्यांना आपल्या मंत्राची प्रत्येक ओळ, वाक्य व शब्द अक्षरश: ज्ञात आहे त्यांनी असे म्हटले आहे की, ब्राम्हण पाच प्रकारचे असू शकतात. ब्रम्हसदृश, देवसदृश, बंधनयुक्त, बंधनभंजक आणि जातिभ्रष्ट.”

४४. “ द्रोण! ह्या पाचांपैकी तू कोणत्या प्रकारचा ब्राम्हण आहेस?”

४५. “ श्रमण गौतम ! जर असे ब्राम्हणांचे प्रकार खरोखर असतील तर निदान आम्ही ‘ जातिभ्रष्ट ब्राम्हण’ तरी नक्की नाही.

४६. “ पण श्रमण गौतम ! आपले निवेदन अद्भुत आहे. आपण मला उपासक म्हणून स्वीकृत करण्याची कृपा करावी. येणेकरुन यावज्जीव आपल्या आश्रयाचा अनुग्रह मला प्राप्त होईल.”

# भाग तिसरा: भगवान बुद्धाच्या धम्माचे टीकाकार

## १. संघातील मुक्त प्रवेशाचे टीकाकार

१. कोणत्याही उपासक गृहस्थाला सदस्य म्हणून स्वीकृत करणे संघाला सुलभ होते.
२. संघरुपी मंदिराचे द्वार खुले ठेवून त्यात कुणालाही प्रवेश करू दिल्याबद्दल भगवान बुद्धांवर कही लोक टीका करीत असत.
३. त्यांचे म्हणणे असे होते की, अशा योजनेमुळे असे घडेल की, काही लोकांना संघात प्रवेश मिळाल्यानंतर संघ सोडून ते पुन्हा गृहस्थाश्रमात जातील आणि ह्या त्यांच्या माघारीमुळे लोक असे म्हणू लागतीनल, 'ह्या लोकांनी व्यक्त केलेला श्रमण गौतमांचा धर्म फोल असला पाहिजे.
४. ही टीका यथातथ्य नव्हती. ज्या हेतूने तथागतांनी अशी. योजना केली होती तो हेतू टीकाकारांना समजला नव्हता.
५. तथागनांचे म्हणणे होते की, हा धर्म स्थापून उपकारक अशा मुक्तीजलाने परिपूर्ण व स्नानासाठी योग्य असा जलाशय त्यांनी निर्माण केला होता-सद्धम्माचा जलाशय.
६. तथागतांची इच्छा होती की, पापाच्या कलंकानी जर कोणी भ्रष्ट झाला असेल तर ह्या जलाशयात त्याने स्नान केल्याने त्याची पापे धुवून जातील.
७. आणि जर कोणी ह्या सद्धर्माच्या जलाशयाकडे गेला आणि स्नान न करताच पूर्वीप्रमाणे कलंकित अवस्थेत मागे फिरला तर त्याबद्दल तोच दोषी आहे, सद्धम्म नव्हे.
८. तथागत म्हणाले, "लोकांना आपली पापे धुवून टाकणे साध्य व्हावे म्हणून हा जलाशय निर्माण केल्यानंतर जर मी असे म्हटले, 'जो कोणी मलिन आहे त्याने जलाशयात प्रवेश करू नये. ज्यांची धूळ आणि चिखल धुवून गेला आहे व जे शुद्ध व निष्कलंक आहेत त्यांनीच फक्त जलाशयाकडे जावे' तर ते योग्य ठरेल काय?
९. " अशा अटी घातल्या असत्या तर माझ्या सद्धम्माचा उपयोग तो काय होता?"
१०. आपल्या धम्माने होणारे हित हे फक्त निवडक लोकांपुरतेच मर्यादित करावे ही तथागतांची इच्छा नव्हती, हे टीकाकार विसरले होते. आपला धम्म हा सर्वांनी पडताळून पाहावा यासाठी तो सर्वांना खुला असावा अशी त्यांची इच्छा होती.

## २. व्रत-नियमाचे टीकाकार

१. 'पंचशील पुरेसे नाही काय ? व्रतग्रहणाची काय आवश्यकता आहे ?' असे प्रश्न नेहमी विचारले जात असत.'
२. ' जर औषधाशिवाय रोग बरे हाऊ शकतात तर वांतीच्या, जुलाबाच्या आणि तत्सम औषधांनी देह दुर्बल करण्याचा फायदा काय?' असे मतप्रदर्शन केले जात असे.

३. तसेच गृहस्थ उपासकाला संसारात राहून, वासनोपभोग भोगूनही पंचशीलाने शान्ती व श्रेष्ठ निर्वाण प्राप्त होऊ शकते तर भिक्खुंना व्रतग्रहण करण्याची आवश्यकता काय?
४. तथागतांनी ही व्रते त्यातील स्वाभाविक गुणवत्तेसाठी योजिली आहेत.
५. व्रतस्थ जीवनामुळे आपोआपच सत्वाची वृद्धी होते व अधपातापासून रक्षण होते.
६. जे व्रतग्रहण करतात आणि स्वावलंबनाने त्याची जोपासना करतात त्यांना मुक्ति प्राप्त होते.
७. व्रतग्रहण म्हणजे वासना, असूया अहंकार ह्यांचे नियमन व कुविचारांचे निर्मूलन.
८. जे व्रतग्रहण करतात आणि त्याची जोपासना करतात ते सुरक्षित असतात व त्यांचे आचार विचार सर्वस्वी पवित्र असतात.
९. फक्त पंचशील ग्रहणाने मात्र हे साध्य होत नाही.
१०. व्रतग्रहणाने नैतिक अधपतनापासून जसे संरक्षण होते तसे पंचशील ग्रहणाने होत नाही.
११. व्रतस्थ जीवन अत्यंत कठीण असते, पंचशील ग्राहकाचे मात्र तसे नसते. मानवजातीच्या हितासाठी काहींनी व्रतस्थ जीवन पत्करणे आवश्यक असते. म्हणून तथागतांनी दोन्हींची योजना केली होती.

## ३. अहिंसा-तत्वाचे टीकाकार

१. अहिंसा-तत्वाला ज्यांचा विरोध होता असे काही लोक होते. त्यांचे म्हणणे होते की, त्यामुळे पापाचा अप्रतिकार व शरणागती पत्करावी लागते.
२. तथागतांनी शिकवलेल्या अहिंसा-तत्वाचा हा पूर्ण विपर्यास होता.
३. संदिग्धता व गैरसमज राहू नयेत म्हणून तथागतांनी आपली भूमिका अनेक वेळा स्पष्ट केली आहे.
४. ह्यांपैकी पहिला उल्लेखनीय प्रसंग म्हणजे संघात सैनिकाला प्रवेश देण्याबाबत नियम केला तो.
५. एकदा मगध देशाच्या सीमाभूमीत आंदोलन सुरू झाले. तेव्हा मगधनरेश सेनीय बिंबिसाराने आपल्या सेनापतीस आज्ञा केली की, " जा, आणि आपल्या सेनाधिकार्यांना सीमाप्रदेशातील बंडखोरांना हुडकून काढण्यास, त्यांना शिक्षा करण्यास आणि तिथे शांतता प्रस्थापित करण्यास आदेश द्या." सेनापतीने तसे केले.
६. सेनापतीचा आदेश ऐकून सेनाधिकार्यांची द्विधा मन:स्थिती झाली. जे युद्धावर जातात आणि लढण्यात ज्यांना आनंद प्राप्त होतो ते पाप करतात आणि पुष्कळ अवगुण प्राप्त करतात अशी तथागतांची शिकवण होती हे त्यांन माहीत होते. याउलट बंडखोरांना पकडा आणि त्यांचा निप्पात करा अशी राजाज्ञा होती; अशा परिस्थितीत काय करावे असा स्वत:शी ते विचारू करू लागले.
७. सेनाधिकार्यांनी विचार केला की, जर आपण तथागताच्या भिक्खूसंघात प्रवेश केला तर ह्या समस्येतून आपली सुटका होईल.
८. त्यासाठी ते सेनाधिकारी भिक्खुंकडे गेले आणि त्यांनी प्रव्रज्येची याचना केली. भिक्खुंनी त्यांना प्रव्रज्या व उपसम्पदा दिली. सेनाधिकारी सैन्यातून लुप्त झाले.
९. जेव्हा सेनाधिकारी कुठे दिसेनात तेव्हा सेनापतीने सैनिकांना विचारले, " सेनाधिकारी कुठेच दिसत नाहीत हे कसे काय?" " सेनापतीमहाशय, सेनाधिकार्यांनी भिक्खुंची धम्मवृत्ती अंगिकारिली." सैनिकांनी उत्तर दिले.

१०. हे ऐकून सेनापती संतप्त झाला. " राजसैनिकांना भिक्खू प्रवज्या कशी देऊ शकतात ?"
११. सेनापतीने घडलेली हकीकत राजाच्या कानावर घातली. राजाने न्यायाधिकार्यांना विचारले, " महाशय, राजसेवेतील लोकांना प्रव्रज्या देणारा कोणत्या शिक्षेला पात्र ठरतो ते सांगा."
१२. " महाराज, उपाध्यायाचा शिरच्छेद करावा; कम्मावाचा म्हणणार्याची जीभ उपटून टाकावी. आणि इतर संघसदस्यांच्या अर्ध्या बरगड्या तोडून टाकाव्यात."
१३. नंतर तथागत जिथे राहात होते तिथे राजा गेला आणि त्यांना अभिवादन करून सर्व हकीकत कथन केली.
१४. " भगवान, आपणास ज्ञात आहे की, कित्येक राजे धम्माच्या विरुद्ध आहेत. हे विरोधक राजे क्षुल्लक निमित्तासाठीसुद्धा भिक्खुंना छळण्यास सदैव सिद्ध आहेत. जर त्यांना आढळले की, सैन्य सोडून संघाचे सदस्य बनण्यासाठी भिक्खू सैनिकाना प्रवृत्त करत आहेत तर भिक्खुंचा छळ करण्यात ते कोणत्या टोकाला जातील त्याची कल्पनाही करवत नाही. ही आपत्ती टळावी म्हणून तथागतांनी योग्य ते करावे अशी विनंती आहे."
१५. तथागतांनी उत्तर दिले, "सैनिकांनी अहिंसेच्या नावाखातर किंवा अहिंसेच्या अवगुंठनाचा आश्रय घेऊन आपल्या राजनिष्ठा किंवा देशनिष्ठेचा त्याग करावा असा माझा कधीच हेतू नव्हता."
१६. त्याप्रमाणे तथागतांनी राजसेवेतील लोकांना संघात प्रवेश न देण्याबाबत एक नियम जाहीर केला व भिक्खुंना तसे सांगितले, "भिक्खूहो, राजसेवेतील लोकांना प्रव्रज्या देण्यात येऊ नये. जो कोणी अशा लोकांना प्रवज्या देईल त्याने दृष्कृत्याचा गुन्हा केल्यासारखे होईल."
१७. दुसर्या एका वेळी श्रमणमहावीराचा अनुयायी सिंह सेनापती याने अहिंसेच्या विषयाबाबत तथागतांशी वादविवाद केला.
१८. सिंहाने विचारले, "तथागतांच्या तत्वाबाबत माझ्या मनात अजून एक आशंका आहे. तथागत सांगतात तो धम्म मला यथातथ्य समजावा म्हणून माझ्या मनावरचे अभ्रपटल दूर करण्यास तथागत अनुमती देतील काय?"
१९. तथागतांनी अनुमती देताच सिंह म्हणाला, "तथागत, मी एक सैनिक आहे; आणि राज्यात कायद्याचे पालन नीट व्हावे आणि वेळप्रसंगी युद्धाची कार्यवाही करावी म्हणून मला राजाने नियुक्त केले आहे. दु:खितांबद्दल करुणा आणि असीमित दयेची शिकवण देणार्या तथागतांना गुन्हेगाराला शासन करणे मान्य आहे काय? दुसरे म्हणजे, आपली घरे, बायकामुले व चीजवस्तु ह्यांचे रक्षण करण्यासाठी युद्धाचा मार्ग पत्करणे हे चूक आहे असे तथागत सांगतात काय? तसेच तथागत संपूर्ण आत्मसमर्पणाची शिकवण देतात काय की जेणेकरून अत्याचारी लोकांनी काहीही केले तरी मी सहन करावे, आणि जे माझ्या मालकीचे आहे ते बळजबरीने कोणी नेत असेल तरी नेऊ द्यावे ? तसेच सर्व संघर्ष-मग ते न्याय कारणासाठी असले तरी ते निषिद्ध आहेत असे तथागत मानतात काय?"
२०. तथागतांनी उत्तर दिले: "जो दण्डनीय आहे त्याला शासन झालेच पाहिजे; आणि जो उपकारार्ह आहे त्याला लाभ हा मिळालाच पाहिजे. ह्याबरोबरच कोणत्याही प्राणिमात्राला अपाय करू नये, उलट त्याला प्रेमाने आणि दयेने वागवावे. हे आदेश परस्परविरोधी नाहीत. कारण ज्या कोणाला अपराधाबद्दल शासन करणे इष्ट आहे तो न्यायाधिशाच्या द्वेषबुद्धीने सजा भोगत नसून आपल्या अपराधाचे फळ म्हणून भोगत असतो. न्यायाधिशाने दिलेली सजा ही त्याज्या स्वतःच्याच कुकर्माची परिणती असते. जेव्हा न्यायाधिश सजा देतो तेव्हा त्याच्या हृदयात द्वेषबुद्धी असता कामा नये. तरीसुद्धा जेव्हा खुनी माणसाला देहान्ताची सजा मिळते तेव्हा ती त्याच्या कुकर्माचे फळ आहे असे त्याने मानले पाहिजे. शिक्षेमुळे आपला आत्मा शुद्ध होणार आहे असे जेव्हा त्याला समजेल

तेव्हा आपल्या भोगाबद्दल शोक न करता उलट तो प्रसन्नच होईल.”
२१. ह्या गोष्टी नीट समजून घेतल्या तर असे प्रत्ययास येईल की, तथागतांनी शिकवलेली अहिंसा मूलभूत होती पण ती निरपेक्ष नव्हती.
२२. त्यांची शिकवण होती की, चांगल्या गोष्टीने परतफेड करून पापावर उपचार करावा; पण चांगल्या गोष्टींना निर्बल करण्यास पापाला सवड द्यावी असे त्यांनी कधीच सांगितले नव्हते.
२३. ते अहिंसेचे समर्थक होते. ते हिंसेचे निंदक होते; पण पाप चांगल्या गोष्टीचा नाश करीत असताना ते टाळण्यासाठी हिंसा हा अखेरचा उपाय असू शकेल हे त्यांनी अमान्य केले नव्हते.
२४. ह्यावरून तथागतांनी एखाद्या भयंकर तत्वाची शिकवण दिली नव्हती हे समजून येईल. टीकाकारांना मात्र त्याचा अर्थ आणि व्याप्ती समजू शकली नाही हेच खरे.

## ४. शीलप्रचार आणि दुःखनिर्मितीबाबत टीका

## *( १ ):* दुःख हे निराशाजनक आहे

१. दुःखाचा कपिलाने सांगितलेला मूळ अर्थ म्हणजे अशांतता, क्षोभ.
२. सुरवातीला त्याला आध्यात्मिक अर्थ होता.
३. नंतर त्याला यातना व खेद असा अर्थ प्राप्त झाला.
४. हे दोन अर्थ एकमेकांहून फार भिन्न नव्हते. ते निकटसंबंधी होते.
५. अशांततेमुळे यातना व खेद निर्माण होतो.
६. लवकरच ह्या शब्दाचा अर्थ सामाजिक व आर्थिक कारणामुळे होणार्या यातना व खेद असा झाला.
७. भगवान बुद्धांनी खेद व यातना ह्या शब्दांचा उपयोग कोणत्या अर्थी केला ?
८. भगवान बुद्धाच्या एका प्रवचनावरून असे स्पष्ट दिसते की, दारिद्र्य हे दुःखाचे कारण आहे ह्याची त्यांना पूर्ण जाणीव होती.
९. त्या प्रवचनात ते म्हणतात, “भिक्खूहो, ह्या जगातील स्वच्छंदी माणसांना दारिद्र्य ही दुःखकारक गोष्ट वाटते काय ?”
१०. “होय, भगवान?”
११. “आणि जेव्हा मनुष्य गरीब असतो, गरजू असतो, विपत्तीत असतो तेव्हा तो कर्ज काढतो. हे सुद्धा दुःखद आहे काय?”
१२. “होय, भगवान ?”
१३. “आणि जेव्हा तो कर्जबाजारी होतो तेव्हा तो उसनवारी करतो. हे सुद्धा दुःखद आहे काय?”
१४. “भगवान, खात्रीने.”
१५. “आणि जेव्हा रक्कम चुकती करण्याचा समय येतो तेव्हा तो ती देत नाही आणि म्हणून धनको त्याला तगादा

लावतात; हेही दु:खद काहे काय?”

१६. “भगवान, नक्की.”

१७. “आणि तगादा लावूनही तो देत नाही तेव्हा ते मारपीट करतात; हे पण दु:खद आहे काय?”

१८. “खात्रीने, भगवान!”

१९. “आणि मारपीट करूनही तो रक्कम देत नाही तेव्हा ते त्याला बांधतातही हे पण दु:खद आहे काय?”

२०. “होय भगवान!”

२१. “अशा तर्हेने, भिक्खूहो, गरीबी, कर्ज, उधारी, तगादा लावला जाणे, मारपीट होणे, आणि बंधनात पडणे ही सर्व इहलोकातील स्वच्छंदी माणसाची दु:खे आहेत.”

२२. “ह्या जगात गरिबी आणि कर्ज ह्या फार दु:खद गोष्टी आहेत.”

२३. ह्यावरून असे ध्यानात येते की, भगवान बुद्धांची दु:खाची कल्पना ही भौतिक स्वरूपाची होती.

## *( २ ):* अशाश्वतता हे निराशेचे कारण

१. जे जे मिश्रित स्वरूपाचे आहे ते ते अशाश्वत आहे. ह्या सिद्धान्तामुळे आलेल्या आरोपाचे आणखी एक कारण आहे.

२. ह्या सिद्धान्ताची सत्यता कोणीही नाकारत नाही.

३. सर्व अशाश्वत आहे हे सर्वांनी मान्य केले होते.

४. ज्याप्रमाणे सत्य हे कितीही अप्रिय असले तरी ते कथन केले पाहिजे. त्याप्रमाणे हा सिद्धान्तही खरा असेल तर तो जाहीर केला पाहिजे.

५. पण मग निराशाजनक तात्पर्य का काढले जावे?

६. जर जीवन अल्पजीवी असेल तर ते अल्पजीवी असणारच. त्याबद्दल कुणी निराश होण्याचे कारण नाही.

७. ही फक्त दृष्टि कोणाच्या भिन्नतेची बाब आहे.

८. ब्रम्ही लोकांचा दृष्टिकोण फारच निराळा होता.

९. कुटुंबातील कोणाचे निधन झाले तर ब्रम्ही लोक तो आनंददायक सोहळा म्हणून साजरा करतात.

१०. ज्या दिवशी निधन होते त्या दिवशी कुटुंबप्रमुख सार्वजनिक मेजवानी आयोजित करतो आणि नंतर लोकनृत्य करीत तो मृतदेह स्मशानात नेतात. मृत्यू हा अपरिहार्य होता हे जाणून कोणी त्याची पर्वा करत नाही.

११. अशाश्वतता ही निराशाजनक असेल तर त्याचे कारण शाश्वतता ही खरी नसतानासुद्धा खरी मानली गेली हे होय.

१२. भगवान बुद्धांची शिकवण ही निराशाप्रसारक आहे असा आरोप म्हणूनच करता येत नाही.

## *( ३ ):* बौद्ध धम्म निराशावादी आहे काय?

१. भगवान बुद्धांचा धम्म निराशा निर्माण करतो असा आरोप केला गेला आहे.
२. हा आरोप केला जाण्याचे कारण प्रथम आर्य-सत्य आहे, जे सांगते की जगात दुःख आहे.
३. ही खरोखरच आश्चर्याची गोष्ट आहे की, दुःखाचा उल्लेख होताच असला आरोप बौद्ध धम्मावर केला जावा.
४. कार्ल मार्क्सही असे म्हणाला होता, 'जगात शोषण सुरू आहे, आणि श्रीमंत लोक अधिक श्रीमंत केले जात आहेत, व गरीब अधिक गरीब केले जात आहेत.'
५. आणि तरी कार्ल मार्क्सचा सिद्धान्त निराशावादी आहे असे कोणी म्हणत नाही.
६. तर मग भगवान बुद्धांच्या सिद्धान्ताबाबत निराळा दृष्टीकोण का?
७. असे समजते की, भगवान बुद्ध आपल्या प्रथम प्रवचनात म्हणाले होते की, जन्म हा दुःखद, वृद्धत्व दुःखद, व मृत्यू हा दुःखद आहे. ह्याचमुळे कदाचित त्यांच्या धम्माला हा निराशेचा गहिरा रंग दिला गेला असेल.
८. पण ज्यांना अलंकारशास्त्र अवगत आहे ते जाणू शकतील की, हा एक अतिशयोक्तीचा प्रकार आहे, आणि परिणाम साधण्यासाठी चतुर साहित्यिक तो वापरतात.
९. 'जन्म हा दुःखद आहे' ही अतिशयोक्ती आहे हे भगवान बुद्धांच्या एका प्रवचनाचा संदर्भ देऊन सिद्ध करता येईल-की ज्यात त्यांनी सांगितले आहे की, मानव जन्म ही एक अमोल वस्तू आहे.
१०. आणि शिवाय भगवान बुद्धांनी दुःखाचा नुसता उल्लेख केला असता तर हा आरोप मान्य होऊ शकला असता.
११. पण भगवान बुद्धांच्या दुसर्या आर्य-सत्यात दुःखाचा नाश केला पाहिजे ह्यावर विशेष भर देण्यात आला आहे. दुःखाचा नाश करण्याच्या कर्तव्यावर भर देण्यासाठीच त्यांना दुःखाचे अस्तित्व सांगावे लागले.
१२. दुःख नाहीसे करावे ह्या गोष्टीला भगवान बुद्धांनी फार महत्व दिले आहे. कपिलाने दुःखाचे फक्त अस्तित्व जाहीर करून त्याविषयी अधिक काही स्पष्ट केले नाही असे जेव्हा त्यांना आढळले तेव्हा असंतुष्ट होऊन त्यांनी आलार कालाम मुनींचा आश्रम सोडला.
१३. मग हा धम्म निराशावादी आहे असे कसे म्हणता येईल?
१४. दुःखाचा नाश करण्यास जो उत्सुक आहे अशा गुरूवर निराशावादाचा आरोप करता येत नाही.

## ५. 'आत्मा' आणि 'पुनर्जन्म' तत्त्वांचे टीकाकार.

१. भगवान बुद्धांनी सांगितले की, आत्मा नाही. त्यांनी सांगितले की, पुनर्जन्म आहे.
२. ज्यांना भगवान बुद्धांच्या ह्या दोन तत्त्वांची शिकवण परस्परविरोधी वाटली असे टीकाकार कमी नव्हते.
३. ते म्हणाले, "जर आत्मा नसेल तर पुनर्जन्म कसा असू शकेल?"
४. ह्यात परस्परविरोध नाही. आत्मा नसला तरी पुनर्जन्म असू शकतो.
५. आंब्याची कोय असते. कोयीतून आंब्याचा वृक्ष निर्माण होतो. आंब्याच्या वृक्षाला आंब्याची फळे येतात.
६. हा आंब्याचा पुनर्जन्म आहे.
७. पण इथे आत्म्याचे अस्तिस्व नाही.
८. म्हणजे आत्मा नसला तरी पुनर्जन्म असु शकतो.

## ६. विनाशवादी असल्याबद्दल टीका

१. एकदा श्रावस्तीतील जेतवनात भगवान बुद्धांचे वास्तव्य होते. तेव्हा त्यांना असे सांगण्यात आले की, अरिठ्ठ नावाचा एक भिक्खू, जी तथागतांची मते नाहीत ती त्यांची मते आहेत असे मानीत आहे.

२. भगवान बुद्ध हे विनाशवादी आहेत किंवा काय हे अरिठ्ठाच्या त्यांच्या संबंधीच्या अनेक गैर मतापैकी एक होते.

३. तथागतांनी अरिठ्ठाला पाचारण केले. अरिठ्ठ आला. त्याला विचारल्यावर तो गप्प बसला.

४. तेव्हा तथागतांनी त्याला सांगितले, “काही श्रमणब्राम्हण चुकीने, गैरतर्हेने, खोटेपणाने सत्याला झुगारून मी विनाशवादी असल्याचा आरोप करतात; आणि विच्छेदाची, प्राणिमात्रांच्या समूळ नाशाची शिकवण देतो असा मजवर दोषारोप करतात.”

५. “मी असा मुळीच नाही आणि माझी अशी शिकवणही नाही.”

६. “मी पूर्वी आणि आता सतत सांगत आलो आहे की, दुःखाला अस्तित्व आहे आणि अखेरही आहे.”

# भाग चवथा: भगवान बुद्धाचे मित्र आणि चाहते

## १. धनंजनी ब्राम्हणीची भक्ती

१. तथागतांचे पुष्कळ मित्र आणि चाहते होते. त्यांत धनंजनी होती.
२. ती एका भारद्वाज ब्राम्हणाची पत्नी होती. तिचा पती तथागतांचा तिरस्कार करीत असे; पण धनंजनी ही भगवान बुद्धांची भक्त होती. तिच्या भक्तीचा उल्लेख करणे योग्य आहे.
३. एकदा भगवान बुद्ध राजगृहाजवळील वेळूवनातील कलन्दकनिवाप विहारात रहात होते.
४. त्या वेळी एका भारद्वाज कुळातील ब्राम्हणाची धनंजनी नावाची ब्राम्हणी पत्नी आपल्या पतीसमवेत राजगृहात राहात होती.
५. तिचा पती तथागतांचा तीव्र विरोधक होता; पण धनंजनीची मात्र बुद्ध, धम्म आणि संघ ह्यावर दृढ श्रद्धा होती. ह्या त्रिरत्नांची स्तुती करण्याचा तिचा प्रघात होता. जेव्हा जेव्हा ती असे स्तवन करू लागे तेव्हा तिचा पती कान झाकून घेत असे.
६. एकदा त्याच्याकडे पुष्कळ ब्राम्हण भोजनास यावयाचे होते. तेव्हा त्याने तिला विनंती केली की, दुसरे काय हवे ते कर; पण भगवान बुद्धांची स्तुती करून अभ्यागतांना दुखवू नकोस.
७. असले वचन देण्यास धनंजनी तयार नव्हती. तेव्हा खंजिराने केळ्याचे तुकडे करतात तसे तुझे करीन अशी धमकी त्याने तिला दिली. ती आत्मबलिदान करण्यास तयार झाली आणि अशा प्रकारे आपले वाक्स्वातंत्र्य राखून तिने बुद्धस्तवनाच्या पाचशे गाथा म्हणावयास प्रारंभ करताच त्या ब्राम्हणाने बिनशर्त पराजय मान्य केला.
८. भोजनपात्रे आणि सोनेरी चमचे ठेवण्यात आले व अतिथी भोजनास बसले. अतिथिंना भोजन वाढताना तिची प्रभावी भावना जागृत झाली आणि मध्येच वेळूवनाकडे तोंड करून तिने त्रिरत्नन-स्तवन म्हटले.
९. अपमानित अतिथी पानावरून उठले आणि एका नास्तिकेच्या उपस्थितीने अपवित्र झालेले अन्न थुंकून टाकून ते चालते झाले. मेजवानीचा बेरंग झाल्यामुळे ब्राम्हणाने ब्राम्हणीची खरडपट्टी काढली.
१०. आपल्या पतीला भोजन वाढताना तिने त्रिरत्नाचे स्तवन केले; 'बुद्धांना वंदन असो, धम्माला वंदन असो, संघाला वंदन असो.'
११. तिने असे स्तवन केल्यावर भारद्वाज ब्राम्हणास फार राग आला व तो म्हणाला, 'चांडाळणी, प्रत्येक वेळी त्या बोडक्या बैरागड्याची स्तुती गात असतेस. थांब चांडाळणी, तुझ्या त्या गुरूला जाऊन चांगला धडा शिकवतो."
१२. धनंजनी म्हणाली, " हे ब्राम्हणा ! सदेव, समार, सब्रम्ह अशा ह्या लोकात त्या अर्हत्, सम्यक् सम्बुद्ध तथागतांना अशा तर्हेने बोलू शकेल असा कोणी श्रमणब्राम्हण, देव अथवा पुरुष असेल असे मला वाटत नाही. तरीसुद्धा हे ब्राम्हणा, तु त्यांच्याकडे जा म्हणजे तुला समजेलच."
१३. तेव्हा तो गांजलेला व अप्रसन्न झालेल ब्राम्हण तथागतांचा शोध घेण्यास निघाला. त्यांच्या समोर आल्यावर त्याने मित्रत्वाने व विनयशीलतेने त्यांना अभिवादन केले व कुशलाची पृच्छा करून तो एका बाजूला बसला.
१४. अशा रीतीने बसल्यावर त्याने तथागतांना पुढील प्रश्न विचारले, " सुखी जीवनासाठी कशाची हत्या

करावी ? अधिक रडावे लागू नये म्हणून कशाची हिंसा करावी ? गौतमा ! असे काय आहे की, ज्याच्या हत्येचे तू सर्वात अधिक समर्थन करतोस?"

१५. तथागतांनी उत्तर दिले, " सुखप्रद जीवनासाठी क्रोधाची हत्या केली पाहिजे. अधिक रडावे लागू नये यासाठी क्रोधाची हिंसा केली पाहिजे. हे ब्राम्हणा, ज्याचे मूळ विषारी आहे, ज्याची परिणती संतापात आहे आणि ज्यात प्राण घातकी माधुर्य आहे अशा क्रोधाची ! श्रेष्ठ जनांनी अशा प्रकारच्या हिंसेची प्रशंसा केली आहे. भविष्यकाळात अधिक शोक करावा लागू नये म्हणून त्या क्रोधाची तू हिंसा कर."

१६. " तथागताच्या ह्या उत्तराचे महत्व जाणून तो भारद्वाज ब्राम्हण बोलला, " भगवान ! खरोखर अद्भूत, खरोखर अद्भुत ! जशी पडलेली वस्तू कोणी उभी करावी, किंवा जे प्रच्छन्न आहे ते प्रकट करावे, अथवा मार्गभ्रष्टाला योग्य मार्ग दाखवावा, किंवा ज्यांना नेत्र आहेत त्यांना बाह्य वस्तु दिसाव्यात म्हणून अंधारात दीप प्रज्ज्वलीत करावा- तसा नाना प्रकारांनी भगवान बुद्धांनी आपला सद्धर्म मला सांगितला आहे. भगवान ! मी बुद्ध, धम्म संघ ह्यांचा आश्रय स्वीकारतो. मी गृहस्थाश्रमाचा त्याग करून प्रव्रज्यित होण्याची इच्छा व्यक्त करतो."

१७. अशा प्रकारे धनंजनीच केवळ भगवान बुद्धांची भक्त राहिली नाही. तिने आपल्या पतीलाही भगवान बुद्धांचा भक्त बनविले.

## २. विशाखेची दृढ श्रद्धा

१. अंग देशातील भद्दीय नगरीत विशाखा जन्मली होती.

२. तिच्या पित्याचे नाव धनंजय आणि मातेचे नाव सुमना होते.

३. एकदा सेल ब्राम्हणाच्या निमंत्रणावरून पुष्कळ भिक्खुंसह तथागत भद्दीय नगरीत गेले. विशाखा ही ह्या ब्राम्हणाची नात असून ती त्या वेळी सात वर्षाची होती.

४. जरी विशाखेचे वय केवळ सात वर्षाचे होते तरी तिने आपले पितामह मेण्डक याजकडे भगवान बुद्धाच्या दर्शनाची इच्छा प्रकट केली. मेण्डकाने तिला अनुज्ञा देऊन पाचशे सहचारिणी, पाचशे दासी व पाचशे रथ सोबत देऊन बुद्धांच्या दर्शनासाठी तिला पाठवले.

५. आपला रथ काही अंतरावर थांबवून ती भगवान बुद्धांजवळ पायीच गेली.

६. भगवान बुद्धांनी तिला धर्मोपदेश केला आणि ती त्यांची उपासिका बनली.

७. त्यानंतरच्या पंधरवड्यात मेण्डकाने भगवान बुद्ध व त्यांचे अनुयायी ह्यांना दररोज आमंत्रित करून भोजन दिले.

८. कालांतराने प्रसेनजित राजाच्या विनंतीनुसार बिंबिसाराने धनंजयाला जेव्हा कोशल देशात पाठवले तेव्हा विशाखाही आपल्या मातापित्यांसह गेली आणि साकेत येथे तिने वास्तव्य केले.

९. श्रावस्तीचा एक धनिक नागरिक मिगार आपला पुत्र पुण्यवर्धन ह्याचा विवाह करण्याच्या विचारात होता. त्याने अनुरूप वधूच्या शोधासाठी काही लोकांना पाठविले होते.

१०. हे लोक फिरत फिरत साकेतला येऊन पोहोचले. एका सणाच्या दिवशी विशाखा सरोवरावर स्नान करण्यास जात असताना त्यांच्या दृष्टीस पडली.

११. त्या समयी पावसाची मोठी सर येताच विशाखेच्या सहचारिणी आश्रयासाठी धावल्या; पण विशाखा मात्र नेहमीच्या गतीने चालत ज्या स्थानी हे दूत उभे राहिले होते तिथे पोहोचली.

१२. त्यांनी विचारले की, तू धावत जाऊन आपले कपडे का बचावले नाहीस ? ती म्हणाली की, तिच्याजवळ भरपूर कपडे आहेत; पण ती जर धावली असती तर कदाचित तिच्या अवयवाला अपाय झाला असता आणि तो अवयव बदलणे असाध्य ठरले असते. विक्रीसाठी असलेल्या मालासारखी अविवाहित कन्यांची स्थिती असते. त्यांना विद्रूप राहून चालत नाही."

१३. तिच्या सौंदर्याने आधीच प्रभावित झालेली ती मंडळी तिच्या बुद्धिमत्तेने आणखी भारावून गेली. त्यांनी तिला पुष्पगुच्छ दिला. विवाहाच्या प्रस्तावाचे प्रतीक म्हणून तिने तो स्वीकारला.

१४. विशाखा घरी परतल्यावर ती मंडळी तिच्या मागून तिथे आली व त्यांनी धनंजयाकडे पुण्यवर्धनाबद्दल शब्द टाकला. त्यांची सूचना स्वीकारली गेली आणि नंतर पत्रव्यवहाराने बेत पक्का ठरविला गेला.

१५. प्रसेनजितला जेव्हा हे समजले तेव्हा अपूर्व सन्मानार्थ पुण्यवर्धनासह साकेतला जाण्याची त्याने इच्छा दर्शविली. धनंजयाने राजा व त्याचा परिवार, मिगार, पुण्यवर्धन आणि त्याचे सहकारी ह्यांचे भव्य स्वागत केले, आदरातिथ्याच्या सर्व बाबतीत त्याने स्वत: लक्ष घातले.

१६. वधूचे अलंकार करण्यासाठी पाचशे सुवर्णकारांची योजना केली गेली. धनंजयाने आपल्या कन्येच्या विवाहाप्रीत्यर्थ धनाच्या पाचशे गाड्या, सुवर्णपात्रे व पशुधन इत्यादिकांच्या पाचशे-अशा अर्पण केल्या.

१७. जेव्हा विशाखेला निरोप देण्याचा समय आला तेव्हा धनंजयाने उपदेशार्थ तिला दहा सूचना सांगितल्या - ज्या पलीकडच्या खोलीत असलेल्या मिगारानेही ऐकल्या. ह्या सूचना अशा होत्या: घरातील अग्नी बाहेर न देणे; बाहेरचा अग्नी घरात येऊ न देणे, जो कोणी परत काही देईल त्यालाच काही देणे, जो कोणी देणार नाही त्याला काही न देणे; जो देईल त्याला देणे आणि न देईल त्यालाही देणे, प्रसन्नतापूर्वक बसणे, प्रसन्नतापूर्वक खाणे पिणे; अग्नी प्रज्वलित राहील अशी खबरदारी घेणे; आणि गृहदेवतांना आदर दर्शविणे.

१८. दुसर्या दिवशी धनंजयाने आपल्या कन्येच्या पुरस्कारार्थ आठ गृहस्थांची नियुक्ती केली. तिच्यावर कसला आरोप आला तर त्याची चौकशी करण्याचे काम त्यांच्यावर सोपविले होते.

१९. आपली सून श्रावस्तीच्या जनतेने पाहावी अशी मिगाराची इच्छा होती. आपल्या रथात उभी राहुन विशाखेने जेव्हा श्रावस्तीत प्रवेश केला तेव्हा रस्त्याच्या दुतर्फा जनता उभी होती. जनतेने विशाखेवर उपहारांचा वर्षाव केला; पण तिने त्या सर्व वस्तू जनतेत वाटून टाकल्या.

२०. मिगार निगण्ठांचा उपासक होता. विशाखा घरी आल्यावर लवकरच त्याने निगण्ठांना पाचारण केले आणि त्यांचे स्वागत करण्यास तिला सांगितले; पण त्यांची नग्नावस्था पाहून तिला घृणा आली आणि तिने त्यांचा सन्मान करण्याचे नाकारले.

२१. निगण्ठांनी हट्ट धरला की तिला परत पाठवून द्यावे. पण मिगाराने काल-हरण करण्याचे योजिले.

२२. एके दिवशी मिगार भोजनास बसला होता व विशाखा त्याला पंख्याने वारा घालीत होती. इतक्यात घराबाहेर एक भिक्खू उभा असल्याचे तिच्या दृष्टोत्पत्तीस आले. मिगाराची त्याच्याकडे नजर जावी म्हणून विशाखा बाजूला झाली; पण भिक्खूकडे न पाहता मिगाराने भोजन सुरू ठेवले.

२३. हे पाहताच विशाखा त्या भिक्खूला बोलली, "कृपा करून पुढे जा. माझे श्वशूर शिळे अन्न खात आहेत."

मिगाराला राग आला. त्याने तिला माघारी पाठवण्याची धमकी दिली. पण तिच्या विनंतीनुसार ही बाब त्या अष्टपंचांसमोर मांडण्याचे मान्य केले.
२४. त्यांनी तिच्याविरुद्ध केलेल्या सर्व आरोपांची चौकशी केली आणि तिला दोषमुक्त ठरविले.
२५. त्यावर विशाखेने आज्ञा दिली की, तिला माहेरी पाठविण्याची सिद्धता केली जावी. मिगार आणि त्याच्या पत्नीने त्यावर तिची क्षमा मागितली. भगवान बुद्ध आणि त्यांचा भिक्खू परिवार ह्यांना आमंत्रण दिले जावे, अशी अट घालून विशाखेने त्यांना क्षमा केली.
२६. त्याने तसे केले; पण निगण्ठांच्या दडपणामुळे सरबराई करण्याचे काम त्यांनी विशाखेवर सोपविले व फक्त भोजनाच्या अखेरीस होणारे भगवान बुद्धांचे प्रवचन पडद्याआडून श्रवण करण्यास मान्यता दिली.
२७. पण प्रवचनाचा प्रभाव त्याजवर एवढा पडला की, तो उपासक बनला.
२८. विशाखेबद्दल त्याला असीम कृतज्ञता वाटली. ह्यानंतर तो तिला मातेसमान मानू लागला. आणि त्याप्रमाणे तिचा आदरसत्कार करू लागला. ह्या नंतर तिला मिगार-माता असे संबोधण्यात येऊ लागले.
२९. अशा रीतीची विशाखेची दृढ श्रद्धा होती.

## ३. मल्लिकेची श्रद्धा

१. एकदा जेव्हा भगवान बुद्ध श्रावस्तीच्या जेतवनारामात राहिले होते तेव्हा एका गुहस्थाचा एकुलता एक प्रिय पुत्र निधन पावला. ह्यामुळे त्या गृहस्थाने आपला व्यवसाय व खाणेपिणे सोडून दिले.
२. तो दररोज स्मशानभूमीत जाई आणि मोठमोठ्याने विलाप करी, “ हे लाडक्य मुला, तू कुठे आहेस ? तू कुठे आहेस ?”
३. तो शोकग्रस्त पिता भगवान बुद्धांकडे आला व अभिवादन करुन एकीकडे बसला.
४. शून्यमनस्क, निर्विकार व आगमनाचे प्रयोजन न जाणणार्या त्याच्या अवस्थेकडे पाहून तथागत त्याला म्हणाले, “ तुझी अवस्था ठीक नाही, तुझे मनही स्थिर नाही.”
५. “ माझा एकुलता एक लाडका पुत्र मरण पावला असता माझे चित्त कसे स्थिर राहू शकेल ?”
६. “ होय, सदगृहस्था ! आपले प्रियजन दु:ख, शोक, वेदना, व्यथा व कष्ट ह्यास कारणीभूत होतात.”
७. तो गृहस्थ रागावून बोलला, “ असे कोण म्हणू शकतो ? छे, छे; आपले प्रियजन आपल्याला आनंद आणि सुख देतात.”
८. आणि असे बोलून भगवान बुद्धांच्या शब्दांचा धिक्कार करून तो रागाने उठला आणि निघून गेला.
९. जवळपास काही जुगारी द्यूत खेळत होते. तो गृहस्थ त्यांच्याकडे गेला आणि श्रमण गौतमास आपली शोककथा आपण कशी सांगितली, त्यांनी त्यावर काय उत्तर दिले, व आपण रागाने तिथून कसे निघालो हे त्यांना निवेदन केले.
१०. जुगारी म्हणाले, “ तुमचे म्हणणे बरोबर आहे. आपले प्रियजन हे आपल्या आनंदाचे व सुखाचे उगमस्थान आहे.” त्या गृहस्थाला ते जुगारी आपल्याच मताचे असल्याबद्दल बरे वाटले.
११. हळूहळू ही गोष्ट पसरत पसरत राजाच्या अंत:पुरापर्यंत जाऊन पोहोचली. राजाने मल्लीकेला सांगितले की,

तुझे श्रमण गौतम म्हणत की, प्रियजन दुःख, शोक, वेदना, व्यथा व कष्ट ह्यांस कारणीभूत होतात.

१२. " महाराज ! जर तथागत असे म्हणाले असतील तर ते रास्तच आहे."

१३. "मल्लिके ! जसा एखादा शिष्य गुरूच्या प्रत्येक वचनाला 'होय, बरोबर आहे.' असे म्हणून मान्यता दर्शवितो तसेच श्रमण गौतम जे जे बोलतात ते ' जर तथागत असे म्हणाले असतील तर ते रास्तच आहे.' असे बोलून तू मान्यत दर्शवितेस. जा, चालती हो !"

१४. तेव्हा मल्लिकेने नलिध्यान ब्राम्हणास पाचारण केले आणि सांगितले की, भगवान बुद्धांच्याकडे जा, आपल्या वतीने त्यांना शिरसाष्टांग प्रणिपात कर, त्यांचे कुशल विचार आणि ते म्हणतात असे जे सांगितले जाते ते खरे आहे काय ह्याची चौकशी कर.

१५. " आणि ते जे काय बोलतील ते तसेच मला नीट सांग." ती म्हणाली.

१६. राणीच्या आज्ञेच्या परिपालनार्थ ब्राम्हण निघाला आणि तथागतांकडे जाऊन त्यांना ते तसे बोलले की काय असे त्याने विचारले.

१७. " होय, ब्राम्हणा ! आपले प्रियजन आपल्याला दुःख, शोक, वेदना, व्यथा व कष्ट देतात. हा पहा पुरावा."

१८. " एकदा ह्या श्रावस्तीत एका स्त्रीची माता मरण पावली, शोकविव्हल होऊन वेड्यासारखी ती रस्त्यातून भटकू लागली, आणि 'माझी आई तुम्ही पाहिलीत का ? माझी आई तुम्ही पहिलीत का ?' असे प्रत्येकाला विचारु लागली.

१९. " दुसरा पुरावा, श्रावस्तीतील एका स्त्रीचा पिता, बंधू, भगिनी, पुत्र, कन्या व पति निधन पावले. शोकविव्हल होऊन वेड्यासारखी ती गल्लोगल्ली भटकायला लागली आणि 'आपले प्रियजन कुणी पाहिले का ?' असे प्रत्येकाला विचारु लागली.

२०. " तिसरा पुरावा. श्रावस्तीतील एका गृहस्थाची माता, पिता, बंधू, भगिनी, पुत्र, कन्या, व पत्नी निधन पावली. शोकविव्हल होऊन वेड्यासारखा तो गल्लोगल्ली रस्तोरस्ती भटकू लागला आणि ' आपले प्रियजन कुणी पाहिले का ?' असे प्रत्येकाला विचारू लागला.

२१. " आणखी एक पुरावा. श्रावस्तीतील एक स्त्री आपल्या माहेरी गेली. तिच्या घरची मंडळी पतीपासून तिला विभक्त करून तिला न आवडणार्या दुसर्या एकाबरोबर तिचा विवाह करून देण्याच्या विचारात होती."

२२. " तिने आपल्या पतीस हे सांगितल्यावर त्याने तिच्या देहाचे दोन तुकडे केले आणि मग स्वतः आत्महत्या केली. जेणेकरून त्या दोघांचे एकत्र निधन व्हावे."

२३. नलिध्यान ब्राम्हणाने हे सर्व राणीला यथातथ्य कथन केले.

२४. तदनंतर राणी राजाकडे गेली आणि म्हणाली, " आपली एकुलती एक कन्या वजिरा आपणास प्रिय आहे काय?" "होय, प्रिय आहे." राजाने उत्तर दिले.

२५. " आपल्या लाडक्या वजिराला काही झाले तर आपणाला दुःख होईल की नाही?" "जर तिला काही झाले तर माझ्या जीवनावर त्याचा फार परिणाम होईल."

२६. "महाराज मी आपणास प्रिय आहे काय?" मल्लिकेने विचारले. "होय. प्रिय आहेस."

२७. "मला जर काही झाले तर आपणास दुःख होईल की नाही?" " जर तुला काही झाले तर माझ्या जीवनावर त्याचा फार परिणाम होईल."

२८. “ महाराज, काशीकोशल नागरिक आपणास प्रिय आहेत काय?” “ होय.” राजाने उत्तर दिले. “जर त्यांना काही झाले तर आपणास दु:ख होईल की नाही?”
२९. “ जर त्यांना काही झाले तर त्याचा घोर परिणाम होईल. आणखी निराळे कसे बरे होईल?”
३०. “ तर मग तथागत ह्याशिवाय निराळे काही बोलले का?” “ नाही, मल्लिके !” राजा पश्चात्तापदग्ध स्वराने बोलला.

## ४. गर्भवती मातेची तीव्र अभिलाषा

१. एकदा भगवान बुद्ध भग्ग देशी भेसकलावनातील सुसुमार पर्वतावरील मृग-उपवनात राहात होते. राजकुमार बोधीचा पद्मनामक प्रासाद त्या वेळी नुक्ताच तयार झाला होता, पण त्यात श्रमण ब्राहम्हणाचे किंवा कुणा दुसर्याचे वास्तव्य झाले नव्हते.
२. राजकुमाराने संकिकपुत्त नामक ब्राम्हणाला सांगितले, ‘ तथागतांकडे जा; माझ्यातर्फे त्यांना अभिवादन कर, त्याचे कुशल वृत्त विचार आणि भिक्खुसंघासहित त्यांना माझे भोजनाचे आमंत्रण दे.’
३. निमंत्रण भगवान बुद्धांना दिले गेले. मौनाद्वारे त्यांनी मान्यता दर्शविली आणि हे वृत्त राजकुमाराला निवेदन केले गेले.
४. रात्र झाल्यावर राजकुमाराने आपल्या पद्म नावाच्या प्रासादात उत्तम भोजन सिद्ध केले आणि प्रासादाच्या पायर्यावर शुभ्र वस्त्र आच्छादित करून सर्व सिद्धता असल्याचे वर्तमान भगवान बुद्धास कळविण्यास त्या तरुण ब्राम्हणास सांगितले.
५. तसे केल्यावर लवकरच तथागत चीवर परिधान करून भिक्षापात्र हातात घेऊन प्रासादापाशी आले. तिथे दरवाजापाशी राजकुमार त्यांची प्रतीक्षा करीत उभा होता.
६. तथागत येताना पाहून राजकुमार त्यांना सामोरा गेला आणि अभिवादन करून त्यांच्या परिवारासह प्रासादाकडे परतला.
७. पायर्यांच्या पायथ्याशी तथागत नि:स्तब्धपणे उभे राहिले. राजकुमार बोलला, “ तथागतांनी बिछायतीवर पदार्पण करण्याची कृपा करावी. कृपा करून तथागतांनी माझ्या विनंतीप्रमाणे करावे म्हणजे ते मला चिरकाल हितावह होईल.” पण तथागत नि:स्तब्धपणे उभे राहिले.
८. पुन्हा एकदा राजकुमाराने त्यांना विनंती केली आणि तरी तथागत स्तब्धच उभे राहिले. तिसर्यांदा त्याने विनंती केली आणि मग तथागतांनी आनंदाकडे दृष्टिक्षेप टाकला.
९. अडचण काय होती ते आनन्द समजला आणि त्याने पायर्यावरचे आच्छादन गुंडाळून काढून ठेवावे असे त्याने सांगितले. आपल्या अनुयायांचा विचार करत तथागत त्या वस्त्रावर पाय ठेवतील असे शक्य नव्हते.
१०. राजकुमाराने ते वस्त्राच्छादन गुंडाळून ठेवण्याची आज्ञा केली व प्रासादाच्या वरच्या मजल्यावर आसनांची सिद्धता करण्यास सांगितले.
११. तथागत भिक्खूसंघासहित पायर्या चढून वर गेले आणि त्यांच्यासाठी सिद्ध केलेल्या आसनावर स्थानापन्न झाले.

१२. राजकुमाराने आपण स्वत: तथागत आणि भिक्खूसंघास यथेच्छ भोजन वाढले.
१३. तथागतांचे भोजन समाप्त झाल्यावर राजकुमार बोधी एका बाजूस आसनावर बसला आणि त्यांना म्हणाला, " भगवान, मला वाटते की, सुखद साधनांनी नव्हे तर अप्रिय साधनांनीच खरे कल्याण प्राप्त केले पाहिजे."
१४. तथागत म्हणाले, " राजकुमारा, फार पूर्वी जेव्हा मला संबोधी प्राप्त झाली नव्हती तेव्हा तुझ्यासारखेच माझे मत होते. त्या वेळी मी अगदी तरुण होतो, माझे केस काळेभोर आणि भरदार होते आणि तारुण्याच्या ऐन बहरात मात्यापित्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्या दु:खशोकाला न जुमानता मी केस व दाढी कापून पीतवस्त्र परिधान करून संसाराचा त्याग करून गृहहीन संन्यास पत्करला. सत्यान्वेषण करण्यासाठी आणि अनुपम शांतीचा मार्ग शोधण्यासाठी मी संन्यास स्वीकारला होता."
१५. " पण आता माझे मन निराळे झाले आहे. जर एखाद्याला धम्म समजला तर सर्व दु:खांचा नाश कसा करावा हे त्याला समजेल."
१६. राजकुमार बोलला, " किती अद्भुत हा धम्म ! किती अद्भुत ह्या धम्माचे स्पष्टीकरण ! हा समजण्यास किती सुलभ !"
१७. तेव्हा तरुण ब्राम्हण संकिकपुत्त राजकुमाराला म्हणाला, "राजकुमार ! आपण हे मान्य केलेत खरे; पण आपण बुद्ध, धम्म आणि संघ ह्यांचा आश्रय ग्रहण करण्याची तयारी दर्शविली नाहीत !"
१८. "असे म्हणू नकोस, मित्रा ! असे म्हणू नकोस." राजकुमार बोलला. "कारण मी माझ्या मातेकडून असे ऐकले आहे की, ज्या वेळी भगवान बुद्ध कोसम्बीच्या घोसितारामात राहात होते त्यावेळी गर्भवती अवस्थेत ती त्यांच्याकडे गेली व त्यांना अभिवादन करून त्यांच्याजवळ एका बाजूस बसली. ती त्यांना म्हणाली की, पुत्र अथवा कन्या-जो काही गर्भ माझ्या उदरात ह्या क्षणी आहे तो अजातजर्भ बुद्ध, धम्म आणि संघ ह्यांचा आश्रय स्वीकारीत आहे. भगवान बुद्धांनी अनुग्रह करून त्या गर्भाला यावज्जीव आपला शरणागत उपासक म्हणून स्वीकारावे."
१९. "आणखी एकदा भगवान बुद्ध ह्या भग्गदेशातच सुंसुमार पर्वतावरील भेसकलावनात राहात होते. माझ्या दाईने मला त्या वेळी तथागतांकडे नेले आणि त्यांच्या समोर उभी राहून ती म्हणाली, "हा राजकुमार बोधी बुद्ध, धम्म आणि संघ ह्यांचा आश्रय स्वीकारीत आहे."
२०. "आता मी स्वत: तिसर्या वेळी आश्रय स्वीकारत आहे आणि तथागतांना विनंती करीत आहे की, मला याज्जीव उपासक म्हणून त्यांनी स्वीकृत करून घ्यावे."

## ५. केनियाचे स्वागत

१. आप्पण येथे सेल नावाचा एक ब्राम्हण रहात होता. तो तीन वेदांत पारंगत होता. तसेच व्याख्यांसहित कर्मकाण्डाचा पण्डित, शब्दशास्त्र व व्युत्पत्तिशास्त्राचा तज्ञ, व पाचवी विद्या जो इतिहास त्यात निष्णात होता. तो व्याकरण जाणत असे. कूटतर्कशास्त्र तसेच महापुरुषांची लक्षणे ओळखणे ह्यांतही तज्ज्ञ होता. त्याच्यापाशी तीनशे तरुण ब्राम्हण होते; -ज्यांना तो वेदमन्त्र शिकवत असे.

२. केनिय नावाचा अग्निपूजक ब्राम्हण ह्या सेलाचा अनुयायी होता. आपल्या तीनशे शिष्यांसह सेल त्याच्याकडे गेला. त्या वेळी तिथे अग्निपूजक निरनिराळ्या उपक्रमात व्यग्र होते व स्वत: केनिय मेजवानीची खास व्यवस्था करण्यात गुंतला होता.
३. ते पाहताच ब्राम्हण केनियाला म्हणाला, " हे सर्व काय चालले आहे ? ही विवाहभोजनाची तयारी आहे की यज्ञाची सिद्धता ? मगधनरेश बिम्बिसार सपरिवार उदईक भोजनास येणार आहेत की काय?"
४. "सेल ! ही विवाहभोजनाची तयारी नाही किंवा राजाच्या मेजवानीचीही नाही. पण मी एक मीठा यज्ञ आयोजिला आहे. कारण श्रमण गौतम आपल्या भिक्षाटन यात्रेत बाराशे पन्नास भिक्खुंसह आप्पण येथे आले आहेत."
५. " श्रमण गौतमांच्या बाबतीत अशी कीर्ती प्रसृत आहे की, ते सम्यक् संबुद्ध आहेत."
६. " त्यांनाच भिक्खूसंघासह मी उदईक भोजनास निमंत्रित केले आहे. ही जी मेजवानीची सिद्धता दिसते आहे ती त्यांच्यासाठी आहे."
७. सेल म्हणाला, " केनिय, तू त्यांना सम्यक् संबुद्ध असे संबोधिलेस काय?" " होय." केनिय बोलला. " केनिय, तू खरोखरच असे म्हणालास?" " होय, मी तसे म्हणालो."

## ६. राजा प्रसेनजितची स्तुती

१. एकदा भगवान बुद्ध श्रावस्तीत अनाथपिण्डिकाच्या जेतवनारामात राहात होते.
२. त्या वेळी कोशलनरेश प्रसेनजित एका लुटुपुटूच्या युद्धात विजय मिळवून आपला हेतू साध्य करून परतला होता. उद्यानाजवळ पोहोचल्यावर तो तिथे वळला. जिथपर्यंत रथ जाऊ शकत होता तिथपर्यंत रथातून जाऊन नंतर पुढे तो पायाने उद्यानात चालत गेला.
३. त्या वेळी काही भिक्खू खुल्या हवेत शतपावली करीत होते. कोशल-नरेश प्रसेनजित त्या भिक्खुंकडे गेला आणि म्हणाला, " भन्ते, ह्या समयी अर्हत सम्यक् संबुद्ध तथागत भगवान बुद्ध कोणत्या स्थळी आहेत ? मी त्यांचे दर्शन घेऊ इच्छितो."
४. " महाराज ! त्यांचा निवास पलीकडे आहे. दरवाजा बंद आहे. आपण न घाबरता शांतपणे तिकडे जा. व्हरांड्यात प्रवेश करा, खाकरल्यासारखे करा व दरवाज्याची कडी वाजवा. तथागत दरवाजा उघडतील."
५. त्यांनी सांगितल्याप्रमाणे राजा प्रसेनजित त्या निवासात गेला. खाकरला, व त्याने दरवाजाची कडी वाजवली. तथागतांनी दार उघडले.
६. मग प्रसेनजितने निवासात प्रवेश केला आणि तथागतांना त्याने शिरसाष्टांग वंदन केले. त्यांच्यां पदकमलांचे चुंबन घेतले व हातांनी ते स्पर्शीले, आणि आपल्या आगमनाची सुचना दिली, " भगवान ! मी कोसल-नरेश प्रसेनजित आलो आहे."
७. भगवान बुद्धांनी विचारले, " पण महाराज ! ह्या देहात असे काय वैशिष्ट्य आहे की, आपण इतक्या गाढ मानवतेने ह्या देहास भावपूर्ण वंदन करीत आहात?"

# सप्तम खंडः भ्रमणिकाची अंतिम यात्रा

भाग पहिला-- निकटवर्तीयांच्या भेटी

भाग दुसरा-- वैशालीचा निरोप

भाग तिसरा--महापरिनिर्वाण

# भाग पहिला: निकटवर्तीयांच्या भेटी

## १. धम्मप्रचाराची केंद्र

१. धम्मदूतांच्या नियुक्तीनंतर भगवान बुद्ध स्वत: कोणत्या एका ठिकाणीच बसून राहिलेत असे नाही. आपले धम्मदूताचे कार्यही त्यांनी सुरू ठेवले.
२. आपलें धम्मप्रचाराचे कार्य काही विशिष्ट स्थळे निवडून त्या ठिकाणी त्यांनी केंद्रित केले होते असे वाटते.
३. अशा केंद्रांपैकी 'श्रावस्ती' व 'राजगुह' ही प्रमुख होती.
४. त्यांनी श्रावस्तीला सुमारे ७५ वेळा व राजगृहाला सुमारे २४ वेळा भेट दिली होती.
५. आणखी इतर काही स्थळीही धम्मप्रचाराची छोटी केंद्रे होती.
६. जसे कपिलवस्तु इथे ते सहा वेळा गेले होते, वैशाली इथेही ते सहा वेळा गेले आणि कम्मासधम्म इथे चार वेळा.

## २. त्यांच्या भेटीची स्थाने

१. आपल्या धम्मप्रचाराच्या प्रवासात उपयुक्त लहानमोठ्या केंद्रांशिवाय इतरत्रही त्यांनी भेटी दिल्या.
२. ते उक्कठा, नादिका, साला, अस्सपुर, धोषिताराम, नालन्दा, आप्पण, एतुमा येथे गेले.
३. ते ओपसाद, इच्छा-नङगंल, चण्डाल-कप्प, कुशिनारा येथे गेले.
४. ते देवदह, पावा, अम्बसण्डा, सेतव्या, अनुपिया आणि उजुन्ना येथे गेले.
५. त्यांनी भेट दिलेल्या स्थळांची नावे पाहिली म्हणजे असे समजते की, शाक्यदेश, कुरुदेश व अंगदेश ह्या ठिकाणी त्यांनी प्रवास केला होता.
६. सामान्यत: असे म्हणावयास हरकत नाही की, त्यांनी सर्व उत्तर भारताची यात्रा केली होती.
७. ह्या स्थानाची संख्या जरा कमी वाटते; पण त्यामध्ये अंतर किती आहे ? लुम्बिनीपासून राजगृह अडीचशे मैलांपेक्षा कमी लांब नाही. ह्यावरून अंतराची थोडीशी कल्पना येऊ शकेल.
८. ही सर्व यात्रा भगवान बुद्धांनी पायी केली. त्यांनी बैलगाडीचासुद्धा उपयोग केला नाही.
९. ह्या यात्रेत त्यांना वाटेत राहण्यासाठी कुठेही जागा उपलब्ध नव्हती. नंतर मात्र त्यांच्या गृहस्थ उपासकांनी विहार व विश्रांतीस्थाने बांधल्यामुळे त्यांची व त्यांचा भिक्खुंची प्रवासात विश्राम करण्याची सोय होऊ शकली. बहुधा भगवान बुद्ध रस्त्यालगतच्या वृक्षाच्या छायेत राहात असत.
१० . त्यांचा संदेश स्वीकारण्यास जे सिद्ध होते त्यांचे संदेह व अडचणींचे निवारण करीत, जे जे त्यांना विरोध करण्यास उद्युक्त झाले होते त्यांच्याशी वादविवाद करून उत्तर देत व जे अजाण बालकाप्रमाणे मार्गदर्शनासाठी येत त्यांना सन्मार्ग दाखवित भगवान बुद्धांची एका स्थळापासून दुसर्या स्थळापर्यंत, एका गावापासून दुसर्या गावापर्यंत यात्रा चालू राही.

११. भगवान बुद्ध जाणून होते की, जे लोक त्यांचा उपदेश ऐकण्यास येत असत ते सर्वच बुद्धिमान नव्हते, तसेच निर्विकल्प मनोवृत्तीचे नव्हते.

१२. त्यांनी आपल्या भिक्खूंना सूचना दिली होती की, श्रोतृवर्ग तीन प्रकारचा असू शकतो.

१३. निर्बुद्ध--ज्या मूर्खाला काहीही दिसू शकत नाही, तो पुन्हापुन्हा भिक्खूकडे जातो, त्यांचे भाषण आदि-मध्य-अंत असे संपूर्ण ऐकतो, पण त्याला काहीच उमजत नाही. त्याला बुद्धी मुळीच नसते.

१४. ह्याहून चांगला म्हणजे जो मन एकाग्र करु शकत नाही असा. तो पुन:पुन्हा भिक्खूंकडे जातो, त्यांचे भाषण आदि-मध्य अन्त असे संपूर्ण ऐकतो आणि तसे करीत असताना त्याला ते सर्व उमजतेही; पण तिथून उठल्यावर मात्र काहीच त्याच्या ध्यानात राहात नाही. त्याचे मन कोरे असते.

१५. ह्याहूनही श्रेष्ठ म्हणजे प्रगल्भ ज्ञानी माणूस. तो पुन:पुन्हा भिक्खूकडे जातो, त्यांचे भाषण आदि-मध्य अन्त असे संपूर्ण ऐकतो. तसे करताना त्याला ते सर्व उमजते, सर्व काही स्मरणात राहते. स्थिर, निश्चल आणि धर्म व धार्मिक विषयांत तज्ज्ञ.

१६. असे असूनही भगवान बुद्ध धर्मप्रचारासाठी गावोगावी न कंटाळता जात असत.

१७. भिक्खूंप्रमाणे त्यांच्याशी तीनपेक्षा जास्त चीवर कधीही नसत. ते फक्त दिवसातून एकदाच अन्नग्रहण करीत आणि दररोज सकाळी दारोदार भिक्षा मागून अन्न जमवित.

१८. कोणत्याही माणसाने इतके कठीण काम पार पाडले नसेल आणि तेही इतक्या प्रसन्नतेने.

## ३. माता-पुत्राची आणि पति-पत्नींची अंतिम भेट

१. आपल्या मृत्यूपूर्वी महाप्रजापती व यशोधरा ह्यांची भगवान बुद्धाशी भेट होऊ शकली.

२. कदाचित ही त्यांची अंतिम भेट असावी.

३. प्रथम महाप्रजापती त्यांच्याजवळ गेली आणि तिने त्यांची पूजा केली.

४. तिने कृतज्ञतेने त्यांचे आभार मानले. कारण त्यांनी तिला सद्धर्माने प्राप्त होणारे समाधान दिले होते. कारण तिला अध्यात्मिक जन्म लाभला होता. कारण त्यांच्यामुळे तिच्या शरीरात धम्माचा विकास झाला होता. कारण त्यांच्याच धम्मरूपी दुधाचे पान तिने केले होते. कारण त्यांच्याच सहाय्याने तिने भवसागर पार केला होता--बुद्धाची जननी समजली जाण्यात तिचा केवढा तरी गौरव झाला होता !

५. आणि नंतर तिने आपली विनंती त्यांच्यापाशी सादर केली- "आता ह्या देहाचा त्याग करुन मृत्यूचा स्वीकार करावा अशी माझी इच्छा आहे. हे दु:खनाशिन् भगवान ! मला हे करण्यास अनुमती दे !"

६. यशोधरेने भगवान बुद्धांना उद्देशून म्हटले की, ती आता अठ्ठ्याहत्तर वर्षांची झाली आहे. त्यावर भगवान बुद्ध म्हणाले की, त्यांचेही आता ऐंशीआवे वर्ष सुरू आहे.

७. यशोधरेने सांगितले की, आजची रात्र ही तिची अखेरची आहे. महाप्रजापतीपेक्षा तिचा स्वर अधिक संयमित होता. महाप्रजापतीप्रमाणे तिने त्यांच्याशी मरणाची अनुमती मागितली नाही किंवा त्यांच्याकडे जाऊन त्यांच्या आश्रयाचीही याचना केली नाही.

८. उलट ती त्यांना म्हणाली, "मीच माझे आश्रयस्थान आहे."

९. आपल्या जीवनातील सर्व विघातक प्रवृत्तींवर तिने विजय मिळवला होता.
१०. ती आपली कृतज्ञता व्यक्त करण्यास आली होती. कारण त्यांनीच तिला मार्ग दाखविला आणि शक्ती दिली होती.

## ४. पिता-पुत्रांची अंतिम भेट

१. एकदा भगवान बुद्ध राजगृहाच्या वेळुवनात राहात होते. त्याच वेळी राहुल अम्बलठ्ठिका येथे राहात होता.
२. संध्याकाळ होता होता भगवान बुद्ध समाधी संपवून राहुलकडे गेले. त्यांना दुरुन येताना पाहून राहुलने त्यांच्यासाठी आसन सिद्ध केले व पादप्रक्षालनासाठी पाणी ठेवले.
३. राहुलने ठेवलेल्या आसनावर बसून भगवान बुद्धांनी आपले पाय धुतले. राहुलने त्यांना अभिवादन केले व एका बाजूस जाऊन तो बसला.
४. राहुलला उद्देशून भगवान बुद्ध म्हणाले, " जाणूनबुजून खोटे बोलण्याचा ज्याला संकोच वाटत नाही त्याने शक्य असलेले कोणतेही पाप कर्म करायचे बाकी ठेवलेले नाही असे मी म्हणतो. म्हणून राहुल ! तू अशी शिस्त लावून घे की, थट्टेतसुद्धा खोटे बोलले जाणार नाही."
५. " तसेच प्रत्येक गोष्ट करताना व प्रत्येक शब्द बोलताना व प्रत्येक विचार मनात आणताना तू पुन्हा पुन्हा चिंतन कर."
६. " तुला एखादी गोष्ट करावयाची असेल तेव्हा तू नीट विचार कर की, ती करण्याने तुला, इतरांना किंवा दोघांनाही अपाय होईल काय, आणि म्हणून ती दुःखोत्पादक किंवा दुःखपरिणत आहे काय ? विचारांती जर तुला वाटले की, ती तशीच आहे तर ती तू करू नकोस."
७. " पण जर तुझी खात्री पटली की, तिच्यात अपाय नसून हितच आहे तर ती तू करावी."
८. " प्रेमळ मैत्रीत तुझा विकास व्हावा. असे होण्याने द्वेषभावना नष्ट होईल."
९. "करुणेत तुझा विकास व्हावा. असे होण्याने पीडा नष्ट होईल."
१०. " परहितसंतोषात तुझा विकास व्हावा. असे होण्याने पराङगमुखता नष्ट होईल."
११. " संयमित शांत वृत्तीत तुझा विकास व्हावा. असे होण्याने विसंगती नष्ट होईल."
१२. " देह भ्रष्टतेच्या चिंतनात तुझा विकास व्हावा. असे होण्याने विकारवशता नष्ट होईल."
१३. " नश्वरतेच्या जाणीवेत तुझा विकास व्हावा. असे होण्याने अहंकार गळून पडेल."
१४. असे भगवान बुद्धांनी सांगितले. त्यांच्या उपदेशाने राहुल हर्षित होऊन प्रसन्न झाला.

## ५. भगवान बुद्ध आणि सारिपुत्त ह्यांची अंतिम भेट

१. भगवान बुद्ध श्रावस्तीच्या जेतवनातील गन्धकुटी विहारात राहात होते.

२. पाचशे भिक्खुंसह सारिपुत्त तिथे आला.

३. त्यांना अभिवादन करून सारिपुत्त म्हणाला की, पृथ्वीवरील आपल्या जीवनाचा अंतिम दिवस समीप आला आहे. भगवान बुद्ध आता आपणाला देहत्यागाची परवानगी देतील काय ?

४. भगवान बुद्धांनी सारिपुत्ताला विचारले की, परिनिर्वाणासाठी त्याने स्थान निश्चित केले आहे काय ?

५. सारिपुत्ताने त्यांना सांगितले, "मगध देशातील नालेक नावाच्या गावी माझा जन्म झाला. ज्या घरात माझा जन्म झाला ते घर अजूनही तिथे आहे. ते माझे घर माझ्या परिनिर्वाणासाठी मी निवडले आहे."

६. भगवान बुद्ध म्हणाले, "प्रिय सारिपुत्ता ! तुला बरे वाटेल ते कर."

७. भगवान बुद्धांच्या चरणांवर डोके ठेवून सारिपुत्त म्हणाला, "आपल्या चरणवन्दनाच्या प्रतिष्ठेच्या एकमेव आशेसाठी एक सहस्त्र कल्पांपर्यंत मी पारमितांचा अभ्यास केला होता. माझी ही इच्छा आता सफळ झाली आहे, आणि त्यामुळे माझ्या आनंदाला पारावार उरलेला नाही."

८. "पुनर्जन्मावर आपला विश्वास नाही. त्या अर्थी हीच आपली अन्तिम भेट. माझ्या अपराधांबद्दल भगवानांनी मला क्षमा करावी. माझी अखेर आता समीप आली आहे."

९. "सारिपुत्त क्षमा करण्यासारखे काहीच उरलेले नाही." भगवान बुद्ध म्हणाले.

१०. जेव्हा सारिपुत्त जाण्यासाठी उठला तेव्हा त्याच्या सन्मानार्थ भगवान बुद्ध उठले आणि गन्धकुटी विहाराच्या सज्जात जाऊन उभे राहिले.

११. तेव्हा सारिपुत्त भगवानांना म्हणाला, "जेव्हा आपले पहिले दर्शन घडले तेव्हा मला आनंद झाला. आता आपले दर्शन झाले त्यामुळे मला अत्यानंद झाला. आपले हे शेवटचे दर्शन आहे हे मी जाणून आहे. पुन्हा आपले दर्शन होणार नाही."

१२. आपले दोन हात जोडून भगवानांकडे पाठ न करता सारिपुत्त तिथुन निघून गेला.

१३. त्यावर उपस्थित भिक्खूवर्गास भगवान बुद्ध म्हणाले, "आपल्या ज्येष्ठ बंधूच्या मागे जा." भिक्खूवर्ग प्रथमच भगवानांना सोडून सारिपुत्तामागे त्यांच्या आज्ञेप्रमाणे गेला.

१४. आपल्या गावी पोहोचल्यावर सारिपुत्ताने आपल्या घरातील ज्या खोलीत त्याचा जन्म झाला होता त्याच खोलीत देह ठेवला.

१५. सारिपुत्तांचे दहनसंस्कार केले गेले व त्याच्या अस्थी भगवान बुद्धांपाशी नेल्या गेल्या.

१६. सारिपुत्ताच्या अस्थी स्वीकारल्यावर भगवान बुद्ध भिक्खुंना म्हणाले, "तो सर्वोच्च विद्वान होता. त्याव्यापाशी संग्रहवृत्तीचा लेशही नव्हता. तो उत्साही आणि कष्टाळू होता. त्याला पापाची घृणा वाटत असे. भिक्खुंनो, त्याच्या अस्थींकडे ध्यान द्या. क्षमाशीलतेत तो पृथ्वीसमान होता. त्याने आपल्या मनात क्रोधाला कधीही प्रवेश करू दिला नव्हता. कोणत्याही इच्छेच्या आहारी तो गेला नव्हता. विकारवशतेवर त्याने विजय मिळविला होता. करुणा, बंधुभाव आणि प्रीती ही त्याच्या ठायी परिपूर्ण होती."

१७. त्याच सुमारास महामोग्गलायन राजगृहासमीप एका एकान्तविहारात राहात होता. भगवान बुद्धांच्या शत्रूंनी नियुक्त केलेल्या मारेकर्यांनी त्याची हत्या केली.

१८. महामोग्गलायनाच्या दुःखद मृत्यूचे वृत्त भगवान बुद्धांना सांगितले गेले. सारिपूत्त आणि महामोग्गलायन हे

त्यांचे प्रमुख शिष्य होते. त्यांना धम्म सेनापती असे म्हटले जात असे. आपली धम्म-परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी ते या उभयतांवर अवलंबून होते.

१९. आपल्या हयातीत झालेल्या त्यांच्या निधनाने भगवान बुद्ध अधिक व्यथित झाले होते.

२०. आता श्रावस्तीत राहण्यात त्यांना स्वारस्य उरले नाही म्हणून तिथून निघण्याचे त्यांनी ठरविले.

# भाग दुसरा: वैशालीचा निरोप

## १. वैशालाली प्रणाम

१. आपल्या अंतिम प्रवासास निघण्यापूर्वी भगवान बुद्ध राजगृही गृध्रकूट पर्वतावर राहात होते.
२. तिथे काही काळ वास्तव्य केल्यानंतर ते म्हणाले, "आनन्द ! चल आपण अम्बलठ्ठिकेला जाऊ या."
३. "जशी आपली आज्ञा." आनन्द सम्मतिदर्शक स्वरात म्हणाला. महाभिक्खूसंघ सोबत घेऊन ते अम्बलठ्ठिकेला गेले.
४. काही काळ अम्बलठ्ठिकेला वास्तव्य करून ते नालन्दाला गेले.
५. नालन्दाहून ते मगध देशची राजधानी असलेल्या पाटलीग्रामास गेले.
६. पाटलीग्रामाहून कोटिग्रामाला आणि कोटीग्रामाहून नादिका येथे ते गेले.
७. ह्या प्रत्येक स्थानी ते काही दिवस थांबले आणि भिक्खू संघासाठी किंवा उपासकांसाठी त्यांनी तिथे प्रवचने केली.
८. नादिकेहून ते वैशालीस गेले.
९. वैशाली हे महावीराचे जन्मस्थान होते आणि म्हणूनच जैनधर्माचा तो एक दुर्गही होता.
१०. तरी पण लवकरच तिथल्या नागरिकांना आपल्या धम्माकडे वळविण्यात बुद्ध यशस्वी झाले.
११. असे सांगतात की, अवर्षणामुळे वैशालीत असा दुष्काळ पडला की, त्यामुळे अनेक लोक मृत्युमुखी पडले.
१२. वैशालीच्या जनतेने सभा बोलावून ह्याबद्दल तक्रार केली.
१३. पुष्कळ वादविवाद होऊन अखेर सर्वांनी भगवान बुद्धांना नगरास येण्याचे निमंत्रण देण्याचा निर्णय घेतला.
१४. बिम्बिसार राजाचा मित्र व वैशालीचा एक लीच्छवी पुरोहित-पुत्र महाली ह्याला निमंत्रण करण्यासाठी पाठविण्यात आले.
१५. भगवान बुद्धानी निमंत्रणाचा स्वीकार केला व पाचशे भिक्खुंसह ते निघाले. वज्जियांच्या प्रदेशात त्यांनी प्रवेश केला न केला तोच विजेच्या गडगडाटासह वादळ होऊन मुसळधार वर्षाव झाला व दुष्काळाची समाप्ती झाली.
१६. वैशालीच्या जनतेने भगवान बुद्धांचे जे अपूर्व स्वागत केले त्याचे कारण मुख्यत: हेच होय.
१७. भगवान बुद्धांनी त्यांची हृदये जिंकल्यामुळे वैशालीच्या जनतेने सहजच उत्साहाने त्यांना प्रतिसाद दिला.
१८. नंतर वर्षावासाचा समय आला. भगवान बुद्ध वर्षावासासाठी वेळूवनास गेले आणि भिक्खूंना वैशालीतच वर्षावास करण्यास त्यांनी सांगितले.
१९. वर्षावासानंतर भगवान पुन्हा वैशालीला आले. कारण वैशालीचा निरोप घेऊन पुढील प्रवासास जाण्याचे त्यांनी योजिले होते.
२०. एके दिवशी भगवान बुद्धांनी सकाळीच वस्त्रे परिधान केली आणि भिक्षापात्र घेऊन भिक्षेसाठी वैशालीत त्यांनी प्रवेश केला. भिक्षाटनानंतर त्यांनी भोजन केले. मग वैशालीकडे गजराजाप्रमाणे दृष्टिक्षेप टाकून त्यांनी

आनन्दास सांगितले, “आनन्दा, वैशालीची ही माझी अखेरची दृष्टिभेट आहे.”
२१. असे म्हणून त्यांनी वैशालीजनांचा निरोप घेतला.
२२. त्या पुरातन नगराच्या उत्तर सीमेवर जेव्हा त्यांनी त्यांचा निरोप घेतला तेव्हा त्या लिच्छवीजनांना त्यांनी आपले भिक्षापात्र स्मृती म्हणून प्रदान केले.
२३. ही त्यांची वैशालीची अखेरची भेट होती. त्यानंतर पुनर्भेटीसाठी ते जगले नाहीत.

## २. पावा येथे वास्तव्य

१. भगवान बुद्ध वैशालीहून भण्डग्रामास गेले.
२. भण्डग्रामाहून हठिग्रामास व तिथून भोग-नगरास ते गेले.
३. भोग-नगराहून ते पावा येथे गेले.
४. पावा येथे भगवान बुद्ध चुन्द नामक लोहाराच्या आम्रवनात वास्तव्यासाठी गेले.
५. भगवान बुद्ध पावा येथे आले असून ते आपल्या आम्रवनात उतरले आहेत असे चुन्दाने ऐकले.
६. चुन्द आम्रवनात गेला आणि भगवानाच्या समीप जाऊन बसला. भगवानांनी त्याला धर्मोपदेश केला.
७. ह्यामुळे आनन्दित होऊन चुन्द भगवानांना म्हणाला, “उद्या माझ्या घरी भिक्खुंसहवर्तमान भगवानांनी येऊन भोजन घेण्याची कृपा करावी.”
८. आणि भगवान बुद्धांनी मौनानेच जणू सम्मती दर्शविली. भगवानांनी आपल्या आमंत्रणाचा स्वीकार केला हे जाणून चुन्दाने प्रयाण केले.
९. दुसर्या दिवशी चुन्दाने आपल्या घरी खीर वगैरे मिष्टानाबरोबर ‘सूकर-मद्दवां’चीही सिद्धता केली. तयारी होताच त्याने भगवानांना कळविले, “भगवान, वेळ झाली. भोजन तयार आहे !”
१०. भगवानांनी वस्त्रे परिधान केली आणि भिक्षापात्र घेऊन भिक्खूंसहवर्तमान ते चुन्दाच्या घरी आले आणि त्याने सिद्ध केलेल्या भोजनाचे ग्रहण केले.
११. भोजनानंतर भगवानांनी चुन्दास पुन्हा धर्मोपदेश केला आणि आसनावरून उठून ते निघाले.
१२. चुन्दाने सिद्ध केलेले भोजन भगवानांना मानवले नाही. त्यामुळे त्यांना घोर आजार जडला. अतिसारामुळे त्यांना मरणप्राय वेदना होऊ लागल्या.
१३. पण भगवानांनी ‘स्मृति-सम्प्रजन्य’ चा नियोग करून सर्व सहन केले.
१४. आम्रवनात परतल्यानंतर मलशुद्धी झाल्यानंतर भगवान आनन्दाला बोलले, “चला, आपण कुशिनाराला जाऊ या.” आणि मग सर्व जण पावाहून निघाले.

## ३. कुशिनारा येथे आगमन

१. भगवान बुद्ध थोडासा रस्ता चालून गेले तोच त्यांना विश्रांतीची जरूरी भासू लागली.

२. मार्गातून थोडेसे बाजूला जाऊन एका वृक्षाखाली ते बसले आणि आनन्दाला म्हणाले, "आनन्दा, वस्त्राची घडी करून माझ्याकरिता बिछाईत कर. मी थकलो आहे. काही काळ विश्रांतीची मला गरज आहे."

३. "जशी आपली आज्ञा !" आनन्द म्हणाला आणि त्यांच्या आज्ञेप्रमाणे त्याने वस्त्राची चौघडी करून बिछाईत तयार केली.

४. भगवान बुद्ध त्यावर आसनस्थ झाले.

५. आसनस्थ झाल्यावर ते आनन्दाला म्हणाले, "आनन्दा थोडे पाणी आण. तहान लागली आहे. पाणी प्यावे म्हणतो."

६. आनन्द म्हणाला, "ककुत्थ नदी इथून जवळच आहे. तिचे पाणी स्वच्छ, चविष्ट, शीतल आणि पारदर्शक आहे. प्रवाहात उतरणेही सुलभ व आल्हाददायक आहे. भगवानांनी तिथे चलावे. म्हणजे पाणी पिता येईल आणि हातपाय धुऊन बरे वाटेल. ह्या जलाशयाचे पाणी निर्मल नाही, घाणेरडे आहे."

७. भगवान बुद्धांचा देह इतका दुर्बल झाला होता की, ते नदीजवळ जाऊ शकत नव्हते. जवळच्या जलाशयातल्या पाण्यावरच त्यांनी समाधान मानले.

८. आनन्दाने पाणी आणले आणि भगवानांनी ते प्राशन केले.

९. थोडा वेळ विश्रांती घेऊन भगवान बुद्ध भिक्खूंसह कुकुत्थ नदीकडे गेले. तिथे आल्यावर ते पाण्यात उतरले आणि त्यांनी स्नान व जलप्राशन केले. दुसर्या तीरावरून ते बाहेर आले आणि आम्रवनाकडे त्यांनी प्रयाण केले.

१०. तिथे पोहोचल्यावर त्यांनी बिछाईत पसरण्यास पुन्हा सांगितले. "मी थकलो आहे, जरा पडावे असे वाटते." त्यांच्या आज्ञेप्रमाणे वस्त्राच्या चौघडीची बिछाईत करण्यात आली आणि भगवान त्यावर विश्रांतीसाठी आडवे झाले.

११. काही काळ विश्रांती घेतल्यानंतर भगवान उठून बसले आणि आनन्दाला म्हणाले, "आनन्दा ! आपण मल्लांच्या शालवनात जाऊ या. हिरण्यवतीच्या दुसर्या तीरावर कुशिनारात ते उपवन आहे."

१२. आनन्दाबरोबर ते तिथे जाऊन पोहचले व दोन शालवृक्षांच्या मध्ये आपल्या वस्त्राच्या चौघडीची बिछाईत घालण्यास सांगताना आनन्दाला ते म्हणाले, "मी थकलो आहे, इथे पडावे असे वाटते."

१३. आनन्दाने बिछाईत तयार केली आणि भगवान बुद्ध त्यावर जाऊन पहुडले.

# भाग तिसरा: महा परिनिर्वाण

## १. वारसाची नियुक्ती

१. एकदा भगवान बुद्ध धनुर्धारी नामक शाक्य कुटुंबाच्या आम्रवनात वस्तीस होते.

२. त्या वेळी पावामध्ये नुकतेच निगष्ठनाथपुत्राचे (महावीराचे) देहावसान झाले होते. त्याच्या मृत्यूनंतर निगण्ठियात दुही होऊन भांडणे सुरू झाली होती. त्यांचे दोन पक्ष आपापसांत झगडताना एकमेकांना वाग्बाणांनी घायाळ करीत होते.

३. श्रामणेर चुन्द पावामध्ये वर्षावास संपवून स्थविर आनन्दास भेटण्यास आला असताना बोलला, "निगण्ठनाथपुत्राचे नुकतेच पावा येथे देहावसान झाले आहे. त्याच्या मृत्यूनंतर निगण्ठियांत दुही माजली असून ते आपापसांत झगडताना परस्परांना वाग्बाणांनी घायाळ करीत आहेत. ह्याचे कारण त्यांना कोणीच रक्षणकर्ता नाही."

४. त्यावर स्थविर आनन्द म्हणाला, "ही महत्वाची हकीकत भगवान बुद्धांना सांगणे इष्ट आहे. आपण त्यांच्याकडे जाऊ या आणि त्यांना ती कथन करू या."

५. "ठीक, महाशय." चुन्द बोलला.

६. त्यावर आनन्द व चुन्द दोघे भगवान बुद्धापाशी गेले आणि त्यांना अभिवादन करून निगण्ठियांची हकीकत कथन केली व आपला वारस नियुक्त करण्याची त्यांनी विनंती केली.

७. चुन्दाचे निवेदन ऐकून भगवान बुद्ध म्हणाले, "चुन्द, विचार कर की, जगात एक आचार्य निर्माण होतो. अर्हत्, सम्यक्-संबुद्ध. तो आपल्या सद्धर्माचा सुयोग्य प्रसार करतो, जो शांतिदायक, प्रभावी, मार्गदर्शक व सुबोध असा आहे; पण त्याचे शिष्य मात्र धर्मज्ञानात प्रगत झालेले नाहीत आणि त्यांच्या निधनानंतर तो धर्म त्यांचे रक्षण करण्यास असमर्थ ठरतो;"

८. "अशा आचार्यांचे निधन त्यांच्या शिष्यांना दुःखदायक आणि त्यांच्या धर्मालाही विघातक ठरते."

९. "पण चुन्द, जगात एक अर्हत् व सम्यक्-संबुद्ध आचार्य निर्माण झाला आहे. त्याने आपल्या धर्माचा सुयोग्य व सुबोध प्रचार केला आहे. ज्याचा सद्धर्म प्रभावशाली मार्गदर्शक असून शांतिदायक आहे, ज्याचे शिष्य सद्धर्मात पारंगत आहेत असा तो सद्धर्म त्या शिष्यांना उच्चतर जीवनाचे सम्यक् स्वरूप दर्शवीत असताना त्या आचार्याचे देहावसान होते;"

१०. "अशा आचार्यांचे निधन शिष्यांना दुःखदायक होत नाही. मग वारसाची गरज कुठे भासते ?"

११. दुसर्या एका प्रसंगी आनन्दाने पुनहा तोच प्रश्न काढल्यावर भगवान म्हणाले, "आनन्दा ! माझ्या धर्माबाबत ज्यांचे एकमत नाही असे दोन भिक्खू तरी तुला आढळलेत काय ?"

१२. "नाही, पण आज जे भगवानांच्या निकट आहेत ते भगवानांच्या मृत्यू- नंतर कदाचित 'विनया' बाबत, संघाच्या नियमांबाबत वाद निर्माण करण्याचा संभव आहे आणि असला वाद सर्वांच्या दुःखाला कारणीभूत होऊ शकेल."

१३. “आनन्द, ‘विनया’ बाबत, भिक्खूच्या नियमाबाबतचे वाद क्षुल्लक ठरतात; पण भिक्खूसंघात धम्माबद्दल जर वाद निर्माण झाले तर ते मात्र चिंतादायक होईल.”
१४. “धम्मासंबंधीचे वादविवाद हुकूमशहा मिटवू शकत नाहीत. वारस जर हुकूमशहासारखा वागणार नसेल तर तो काय करू शकणार ?”
१५. “धम्मासंबंधीचे वादविवाद हुकूमशहा मिटवू शकणार नाही.”
१६. “कोणत्याही वादाबाबत संघच निर्णय घेऊ शकेल. संघाने एकत्र येऊन एकमत होईपर्यंत विचारविनिमय केला पाहिजे आणि एकदा निर्णय झाल्यानंतर त्याचे परिपूर्ण पालन केले पाहिजे.”
१७. “वादाचा निर्णय बहुमतानेच व्हायला पाहिजे. वारसाची नियुक्ती हा त्यावर उपाय होऊ शकत नाही.”

## २. अन्तिम धर्म-दीक्षा

१. त्या समयी सुभद्र नावाचा परिव्राजक कुशिनारा येथे राहात होता. सुभद्र परिव्राजकाच्या कानावर लोकवार्ता पडली. “असे म्हणतात की, आज रात्रीच्या अखेरच्या प्रहरी गौतम बुद्धांचे परिनिर्वाण होणार आहे.” तेव्हा सुभद्र परिव्राजकाच्या मनात आले.
२. “काही वयोवृद्ध गुरू आणि शिष्य परिव्राजकांना असे म्हणताना मी ऐकले आहे की, ह्या जगात अर्हत्, सम्यक्-सम्बुद्ध असे तथागत वारंवार निर्माण होत नाहीत आणि आज रात्रीच्या अखेरच्या प्रहरी श्रमण गौतमांचे परिनिर्वाण होणार आहे. माझ्या मनात एक संदेह उत्पन्न झाला आहे आणि श्रमण गौतमांबद्दल मला खात्री वाटते की, ते मला असला उपदेश देतील की, जेणे करून माझ्या संदेहाचे निराकरण होईल.”
३. सुभद्र परिव्राजक उपमार्गाने मल्लांच्या शालवनात गेला. तिथे स्थविर आनन्द होता. सुभद्र त्याला म्हणाला, “स्थविर आनन्द, मला श्रमण गौतमांचे दर्शन होईल काय ?”
४. त्याचे शब्द ऐकून स्थविर आनन्द त्याला म्हणाला, “पुरे, पुरे सुभद्र ! तथागतांना आता मुळीच त्रास देता कामा नये. ते पार थकून गेले आहेत.”
५. सुभद्र परिव्राजकाने दुसर्यांदा व तिसर्यांदा पुन्हा तीच विनंती केली. स्थविर आनन्दाने तीनही वेळा त्याला तेच उत्तर दिले.
६. सुभद्र परिव्राजक आणि स्थविर आनन्दाचा चाललेला हा संवाद तथागतांनी ऐकला. त्यांनी आनन्दाला हाक मारून म्हटले, “आनन्दा, सुभद्राला अडवू नकोस. सुभद्राला तथागतांचे दर्शन घेण्याची अनुमती असावी. सुभद्राला जे काही माझ्यापाशी मागावयाचे असेल ते त्याला ज्ञानासाठी हवे असेल. मला त्रास देण्याच्या इच्छेने नव्हे. आणि जे उत्तरादाखल मी सांगेन ते तत्काळ त्याला समजेल.”
७. तेव्हा स्थविर आनन्द परिव्राजकाला म्हणाला, “सुभद्रा, आत प्रवेश कर. तथागतांची तुला परवानगी आहे.”
८. तेव्हा सुभद्र परिव्राजक तथागतांच्या समीप गेला आणि त्यांना अभिवादन करून कुशलवर्तमानाचे बोलणे झाल्यावर तो एका बाजूस जाऊन बसला. बसल्यावर तथागतांना उद्देशून तो बोलला,
९. “श्रमण गौतम, ज्यांना अनुयायी आहेत आणि श्रोते आहेत, जे प्रसिद्ध आहेत, जे गणाचार्य काहेत, जे पंथसंस्थापक आहेत, ज्यांना जनता धर्मात्मा मानीत आली आहे असे श्रमण आणि ब्राम्हण-पूर्णकाश्यप, मख्खली

गोशाल, अजित केशकम्बल, पकुच कच्चायन, सज्जय वेलट्ठीपुत्र, तसेच निगण्ठनाथपुत्र – ह्या सर्वांना ते म्हणतात तसे आपल्या आपणच सत्यज्ञान प्राप्त झाले आहे की नाही ? की, काहींना झाले आणि काहींना झाले नाही ?"

१०. "सुभद्र ! काहींना ज्ञान प्राप्त झाले, की काहींना झाले नाही ह्या असल्या गोष्टीत तू पडू नकोस. मी तुला धर्म्मोपदेश करतो तो नीट ध्यान देऊन श्रवण कर. लक्ष दे. मी सांगतो."

११. "भगवान ! फार चांगले." असे बोलून सुभद्र परिव्राजकाने भगवान बुद्धांकडे एकाग्रतेने ध्यान दिले. त्यावर भगवान बोलले;

१२. "सुभद्र ! ज्या धम्ममतामध्ये आर्यअष्टांगिक मार्ग नाही त्यात श्रमण असू शकत नाही. ज्या धम्ममतात आर्यअष्टांगिक मार्ग आहे त्यात श्रमणही असतो."

१३. "सुभद्र ! माझ्या धम्ममतात आर्यअष्टांगिक मार्ग आहे म्हणून ह्या धम्मात ( स्त्रोतापन्न, सकृदागामी, अनागामी व अर्हत् असे ) चार प्रकारचे श्रमण आहेत. दुसर्या धम्ममतात श्रमणाचा अभाव आहे; पण सुभद्र, जर ह्या धम्ममताच्या अनुयायांनी सम्यक् जीवन व्यतीत केले तर ह्या जगतात अर्हतांचा अभाव कधीच आढळणार नाही."

१४. "मी एकोणतीस वर्षांचा असताना सत्याच्या शोधासाठी बाहेर पडलो."

१५. "सुभद्र ! सद्धम्माचा पक्ष स्वीकारल्याला आता पन्नासाहून अधिक वर्षे होऊन गेली असतील."

१६. तथागतांनी असे सांगितल्यावर सुभद्र परिव्राजक बोलला, "आपल्या मूखीचे हे शब्द अत्युत्कृष्ट आहेत. खरोखरच अत्युत्कृष्ट ! "

१७. "जसे कोणी फेकून दिलेल्याची प्रतिष्ठापना करावी किंवा झाकलेले खुले करावे किंवा मार्गभ्रष्टाला सन्मार्ग दाखवावा किंवा अंधारात दीप प्रज्वलित करावा की, जेणेकरून नेत्र असलेल्याला दिसावे."

१८. "तसे मला तथागतांनी सत्याचे ज्ञान करून दिले म्हणून मी बुद्ध, धम्म आणि संघाचा आश्रय स्वीकारतो."

१९. "सुभद्र ! ज्याने पूर्वी दुसर्या धम्माची दिक्षा घेतली असेल त्याला जर संघात प्रवेश करावयाची इच्छा असेल तर त्याला चार महिने प्रतीक्षा करणे प्राप्त आहे."

२०. "जर तसा दंडक असेल तर मीही चार महिने प्रतीक्षा करीन."

२१. पण तथागत म्हणाले, "माणसामाणसात फरक असतो हे मी मान्य करतो." असे म्हणून त्यांनी आनन्दाला हाक मारली व ते बोलले, "आनन्द ! सुभद्राला आताच संघात दाखल करून घे !"

२२. "बरे, जशी आपली आज्ञा." असे बोलून आनन्दाने संमती दर्शवली.

२३. सुभद्र परिव्राजक मग आनंदाला म्हणाला, "तुम्ही भाग्यवान आहात आनन्द ! महाभाग्यवान ! तुम्हाला स्वत: तथागतांनी धर्मजलाचे सिंचन करून दिक्षा दिली व भिक्खूसंघात शिष्यत्व प्रदान केले."

२४. "सुभद्र ! तुझ्या बाबतीतही तसेच झाले आहे." स्थविर आनन्द म्हणाला.

२५. अशा रीतीने तथागतांच्या अनुज्ञेने सुभद्र परिव्राजकाला भिक्खूसंघात स्वीकृत करण्यात आले. ज्याला स्वत: तथागतांनी दीक्षा दिली असा तोच अखेरचा श्रावक.

## ३. अन्तिम शब्द

१. भगवान बुद्ध आनन्दाला नंतर म्हणाले,

२. "आनन्दा ! कदाचित तू असे म्हणशील, 'गुरूंची वाणी आता लोपली. आता आम्हांस कोणी गुरू उरला नाही.' पण आनन्द, तुला असे वाटता कामा नये; जो धम्म आणि विनय मी शिकविला, सांगितला आहे तोच माझ्या पश्चात तुमचा गुरू !"

३. "आणि आनन्द ! भिक्खु परस्परांशी बोलताना मित्रभावाने एकमेकांना हल्ली संबोधतात; पण माझ्या पश्चात ही प्रथा बंद झाली पाहिजे, ज्येष्ठ जेव्हा कनिष्ठाला हाक मारील तेव्हा त्याच्या नावाने, गोत्र नावाने किंवा 'मित्र' म्हणून त्याने त्याला संबोधावे व कनिष्ठ जेव्हा ज्येष्ठाला हाक मारील तेव्हा त्याने त्याला ' भगवान्' किंवा ' भन्ते' असे संबोधावे."

४. " आणि आनन्द ! माझ्या पश्चात जर संघाला आवश्यक वाटले तर किरकोळ अथवा गौण नियम त्याने रद्द करावेत."

५. " आणि आनन्द ! तुला माहीतच आहे की, भिक्खू छन्न कसा हट्टी, विकृत आणि बेशिस्त आहे."

६. " आनन्द ! माझ्या पश्चात छन्नाला सर्वोच्च शिक्षा दिली जावी."

७. " भगवान ! सर्वोच्च शिक्षा म्हणजे काय ?"

८. " छन्न काय वाटेल ते बोलो, कोणी त्याच्याशी बोलू नये. त्याची कानउघाडणी करू नये, त्याला शिकवू नये. त्याला एकटे सोडून द्यावे. कदाचित ह्यामुळे तो सुधारेल."

९. नंतर भगवान बुद्ध भिक्खूंना उद्देशून बोलले.

१०. " जर कोणा भिक्खूच्या मनात कदाचित बुद्धाबाबत, धम्माबाबत, संघाबाबत, मार्गाबाबत किंवा मार्गाच्या वाटेबाबत संदेह किंवा गोंधळ असेल तर भिक्खूवर्गहो, आताच तो त्याने विचारावा. मागाहून पश्चात्ताप करू नये की, आमचे गुरु समोर असताना त्यांना प्रत्यक्ष शंका सांगण्याची हिंमत झाली नाही."

११. असे सांगितल्यावर भिक्खू गप्प राहिले.

१२. तेव्हा तथागतांनी दुसर्यांदा, तिसर्यांदा तेच शब्द उच्चारले आणि तिसर्या वेळीही भिक्खुंनी मौन सोडले नाही.

१३. तेव्हा तथागत म्हणाले, " कदाचित गुरूचा मान राखावा म्हणून तुम्ही विचारत नसाल; पण भिक्खूहो, तुम्ही मला मित्रासमान मानून काय विचारायचे ते विचारा !"

१४. तरीही भिक्खू अबोलच राहिले.

१५. तेव्हा आनन्द तथागतांना म्हणाला, " आश्चर्य आहे, अद्भुत आहे. भगवान ! ह्या माझ्या संघाने मला आज निश्चिन्त केले. ह्या भिक्खुंपैकी एकाच्याही मनात बुद्धाबाबत, धम्माबाबत, संघाबाबत, मार्गाबाबत किंवा मार्गाच्या वाटेबाबत यत्किंचितही संदेह नाही."

१६. " आनन्द ! तू हे विश्वासाने बोलतोस; पण तथागतांना ही जाणीव आहे की, एकाही भिक्खूच्या मनात कसलाही संदेह किंवा गोंधळ नाही. ह्या माझ्या पाचशे भिक्खुंतला सर्वात मागासलेला निदान स्त्रोतापन्न तरी खास असेलच. त्याला अधोगतीपासून सुटण्याची खात्री आहे. त्याला संबोधी प्राप्त करून घेण्याची खात्री आहे."

१७. तेव्हा तथागत भिक्खुंना उद्देशून बोलले :

१८. " भिक्खूहो, मी तुम्हाला पुन्हा स्मरण देतो की, सर्व संस्कार अनित्य आहेत. आपला मार्ग अप्रमादपूर्वक

आक्रमण करा !”

१९. तथागतांचे हेच अखेरचे शब्द होते.

## ४. शोकग्रस्त आनन्द

१. जसजसे वय होत चालले तसतशी भगवान बुद्धांना आपली काळजी घेण्यासाठी एखाद्या सेवकाची जरुरी वाटू लागली.

२. प्रथम त्यांनी नन्दाची निवड केली. त्यानंतर त्यांनी आनन्दाची निवड केली. तथागतांच्या अंतिम समयापर्यंत व्यक्तिगत सेवक म्हणून त्याने त्यांची सेवा केली.

३. आनन्दाला तथागतांनी सेवक न मानता आपला प्रियतम सहचर म्हणून मानले.

४. जेव्हा भगवान बुद्ध कुशीनारा येथे आले व दोन शालवृक्षांच्यामध्ये त्यांनी वास्तव्य केले तेव्हा आपला अंतकाळ जवळ येत चालल्याचे पाहून आता आनन्दाला विश्वासात घ्यावे असे त्यांनी योजिले.

५. म्हणून त्यांनी आनन्दाला हाक मारली आणि म्हणाले, “आनन्द ! ह्या शालवृक्षांमध्ये कुशीनाराच्या ह्या उपवनात रात्रीच्या तिसर्या प्रहरी तथागतांचे परिनिर्वाण होईल.”

६. तथागतांनी असे सांगितल्यावर स्थविर आनन्द म्हणाला, “भगवान ! आपण बहुजनांच्या हितासाठी, बहुजनांच्या सुखासाठी, जगाच्या अनुकम्पेसाठी तसेच देव व मानवांच्या कल्याणासाठी कल्पान्तापर्यंत राहण्याची कृपा करा.”

७. आनन्दाने त्रिवार अशी विनंती केली. “बस्स, बस्स, आनन्द ! तथागतांची अधिक विनवणी करू नकोस, अशी विनंती करण्याचा समय निघून गेला.”

८. “आनन्द ! आता मी वृद्ध झालो आहे. वयस्क झालो आहे. माझा जीवनप्रवास आता संपत आला आहे. माझी आयुर्मर्यादा मी गाठली आहे. माझी ऐंशी वर्षे आता उलटली. ज्याप्रमाणे एखादे जुने शकट वापरुन झिजून एखादे दिवशी मोडून पडते तीच अवस्था तथागतांच्या देहाचीही झाली आहे.” हे श्रवण केल्यावर आनन्द तिथून निघून गेला.

९. स्थविर आनन्द दिसला नाही तेव्हा तथागतांनी भिक्खूंना विचारले, “आनन्द कुठे आहे ?” “स्थविर आनन्द निघून गेले आणि ते शोक करीत आहेत.” भिक्खू म्हणाले.

१०. तथागतांनी एका भिक्खूला बोलावले व ते म्हणाले, “ जा आणि आनन्दाला सांग की, तुला तथागत बोलावताहेत.”

११. “जशी आपली आज्ञा.” भिक्खू बोलला.

१२. आनन्द आला आणि तथागतांच्या समीप जाऊन बसला.

१३. “आनन्द ! आता रडू नकोस ! मी तुला मागेच सांगितले नाही का, की आपल्या आवडत्या व निकट वस्तूंपासून अलग व्हावे लागणे, त्यांचा त्याग करणे, त्यांचा संबंध तोडावा लागणे हे स्वाभाविकच आहे ?”

१४. “आनन्द ! तुझ्या अमाप प्रेमळ कार्यामुळे, दयाशील सुस्वभावामुळे तू दीर्घकालपर्यंत माझा अगदी निकटवर्ती झाला आहेस.”

१५. "आनन्द ! तू हुशार आहेस. निष्ठेने प्रयत्न कर म्हणजे तूसुद्धा विषयासक्ती, स्वार्थ, मोह व अज्ञान ह्यांसारख्या दुर्गुणांपासून मुक्त होशील."

१६. नंतर आनन्दाबद्दल भिक्खूंना उद्देशून ते बोलले, "आनन्द बुद्धीमान आहे. भिक्खूहो ! आनन्द बुद्धीमान आहे."

१७. "तथागतांची आपण केव्हा भेट घ्यावी. हे तो जाणतो; भिक्खू-भिक्खुणींनी कोणत्या समयी भेट घ्यावी हे तो जाणतो. उपासक उपासिकांची भेटण्याची योग्य वेळ कोणती, राजा किंवा राजमंत्र्याची वेळ कोणती, तसेच दुसर्या आचार्यांची व शिष्यांची वेळ कोणती हेही त्याला ठाऊक आहे."

१८. "भिक्खूहो ! हे आनन्दाचे चार विशेष आहेत."

१९. "आनन्दाला भेटल्यावर सर्वांना समाधान मिळते. त्याला पाहुन त्यांना आनंद होतो. सर्वांना आनन्दाचे बोलणे ऐकून सुख मिळते. आनन्द जेव्हा अबोल होतो तेव्हा ते बेचैन होतात."

२०. ह्यानंतर आनन्दाने पुन्हा तथागतांच्या परिनिर्वाणाचा विषय काढला. तथागतांना उद्देशून तो बोलला, "तथागतांनी ह्या उजाड नगरीत ह्या जंगलामध्ये देहत्याग करू नये. चम्पा, राजगृह, श्रावस्ती, साकेत, कोसाम्बी, वाराणशीसारखी मोठी मोठी नगरे आहेत. ह्यांपैकी कोणत्या तरी नगरात त्यांनी परिनिर्वाण प्राप्त करावे."

२१. "आनन्द ! असे बोलू नकोस, आनन्द ! असे बोलू नकोस. ही कुशिनारादेखील केशवती नावाची महासुदर्शन राजाची राजधानी होती."

२२. नंतर तथागतांनी आनन्दावर दोन कामे सोपवली.

२३. त्यांनी आनन्दाला सांगितले की, चुन्दाने दिलेल्या अन्नामुळे तथागतांना मृत्यू आला अशी वार्ता पसरणार नाही ह्याची खबरदारी घेणे. त्यामुळे चुन्द संकटात सापडेल अशी भीती वाटते. त्यांनी सांगितले की, ह्या बाबतीत लोकांच्या मनातील भ्रम आनन्दने दूर करावा.

२४. आणखी एक गोष्ट त्यांनी आनन्दास करण्यास सांगितली आणि ती म्हणजे कुशिनाराचा मल्लांना जाऊन सांगणे की, तथागत ह्या उपवनात आले असून रात्रीच्या तिसर्या प्रहरी त्यांचे परिनिर्वाण होईल.

२५. "तुझ्यावर दोष येईल अशी संधी तू देऊ नकोस. मल्ल कदाचित म्हणतील; 'आमच्या गावात तथागतांचा मृत्यू झाला आणि आम्हाला हे समजले नाही. त्यांचा अखेरच्या क्षणी त्यांना भेटण्याची संधीही आम्हाला मिळाली नाही."

२६. त्यानंतर स्थविर अनुरुद्ध व स्थविर आनन्द ह्या उभयतांनी धार्मिक चर्चेत उरलेली रात्र व्यतीत केली.

२७. पूर्वी प्रकट केल्याप्रमाणे, रात्रीच्या तिसर्या प्रहरात तथागतांना परिनिर्वाण प्राप्त झाले.

२८. जेव्हा तथागतांचे परिनिर्वाण झाले तेव्हा काही भिक्खू व आनन्द हात पसरून रुदन करू लागले; काही तर दुःखातिशयाने जमिनीवर गडबडा लोळू लागले व म्हणू लागले, " तथागतांना फारच लवकर परिनिर्वाण आले. ह्या सुखी माणसाने फारच लवकर जीवनत्याग केला. जगातून फारच लवकर प्रकाश निघून गेला."

२९. वैशाखी पौर्णिमेच्य रात्री तिसर्या प्रहरात तथागतांचे परिनिर्वाण झाले. त्यांचे परिनिर्वाण इ. स. पूर्व ४८३ मध्ये झाले.

३०. पाली भाषेतल्या ग्रंथात असे म्हटले आहे :

दिवा तपति आदिच्चो
रत्ति आभाति चन्दिमा

सन्नद्धो खत्तियो तपति
झायी तपति ब्राम्हणो
अथ सब्बं अहोरत्ति
बुद्धो तपति तेजसा ।।

३१. 'सूर्य केवळ दिवसाच प्रकाशतो आणि चन्द्र केवळ रात्रीलाच प्रकाशमान करतो. आपली शस्त्रास्त्रे धारण केल्यावर क्षत्रिय तेजस्वी दिसतो. जेव्हा ध्यानस्थ असतो तेव्हाच ब्राम्हण तेजपुंज दिसतो. पण बुद्ध मात्र स्वयंतेजाने दिवस-रात्र सतत प्रकाशित राहतो.'

३२. निःसंदेह तो जगाचा प्रकाश होता.

## ५. मल्लांचा विलाप आणि एका भिक्खूची प्रसन्नता

१. तथागतांच्या आदेशानुसार आनन्दाने मल्लांकडे जाऊन त्यांना ही घटना विदित केली.

२. जेव्हा ही घटना समजली तेव्हा त्यांच्या स्त्रिया, तरुण पुरुष व कुमारिका दुःखित, खिन्न आणि शोकविव्हल झाले.

३. काहींनी केस विस्कटून, हात पसरून व जमिनीवर गडबडा लोळून शोक प्रदर्शित केला.

४. त्यानंतर आपल्या कुमार-कुमारिका व स्त्रियांसह मल्ल तथागतांच्या अंतिम दर्शनासाठी उपवनातील शालवाटिकेत गेले.

५. तेव्हा स्थविर आनन्दाने विचार केला: "जर मी कुशिनाराच्या मल्लांना तथागतांच्या मृत देहाला वंदन करण्यासाठी एकेकटे जाऊ दिले तर फार काळ व्यतीत होईल."

६. म्हणून त्याने कुटुंबाकुटुंबांचे गट केले. प्रत्येक कुटुंब तथागतांच्या चरणी विनम्र भावाने वंदन करून निरोप घेई.

७. ह्या समयी पुष्कळ भिक्खूंच्या समवेत महास्थविर महाकाश्यप पावा ते कुशिनारा ह्या मार्गाने यात्रा करीत होते.

८. त्याच वेळी पावाला जाणार्या मार्गाने एक नग्न परिव्राजक येत होता.

९. महास्थविर महाकाश्यपांना तो नग्न परिव्राजक दुरून दिसला. तो जवळ आल्यावर त्यांनी त्याला विचारले, "मित्रा, तू आमच्या गुरूंना ओळखत असशीलच ?"

१०. "होय मित्रा, मी त्यांना ओळखतो." "श्रमण गौतमाचे निधन होऊन आज एक सप्ताह झाला."

११. हे वृत्त ऐकताच भिक्खूगण शोकविव्हल होऊन रुदन करू लागला.

१२. ह्या भिक्खूगणात उतार वयात संघात दाखल झालेला सुभद्र नावाचा एक भिक्खू होता.

१३. तो म्हणाला, "पुरे ! आता विलाप पुरे ! आता शोक पुरे ! आपण श्रमण गौतमांच्या निर्बंधांतून मुक्त झालो हे बरे. 'हे तुम्हांस शोभते; हे शोभत नाही' अशा त्यांच्या निर्बंधांनी आपण हैराण झालो होतो. आता आपल्याला हवे ते करता येईल आणि नको ते करावयाची गरज पडणार नाही ! त्यांचे निधन झाले हे बरे नाही का झाले ? मग रडता कशासाठी ? शोक कशाला करता ? ही तर आनंदाची घटना आहे."

१४. तथागत हे असे मोठे व शिस्तीचे कठोर भोक्ते होते.

## ६. अन्तिम संस्कार

१. कुशिनाराच्या मल्लांनी मग स्थविर आनन्दाला विचारले, “तथागतांच्या देहाची काय व्यवस्था करायची ?”

२. आनन्द म्हणाला, “लोक महाराजांची जशी उत्तरक्रिया करतात तशीच तथागतांची उत्तरक्रिया आपण करावी.”

३. “महाराजांची उत्तरक्रिया कशी केली जाते ?”

४. आनन्दाने उत्तर दिले, “महाराजांचा देह नव्या कोर्या वस्त्रात अवगुंठित करतात. तदनंतर तो कापसाने गुंडाळतात. नंतर पुन्हा नव्या वस्त्राने गुंडाळतात. असे एकामागून एक दोन्ही प्रकारचे पाचशे फेरे होईपर्यंत करतात. नंतर तो देह लोखंडाच्या कढईसारख्या पात्रात ठेवून त्यावर तसेच लोखंडी झाकण ठेवून तो बंद करतात. नंतर सर्व प्रकारची सामग्री आणून चिता रचतात. अशा पद्धतीने महाराजांची उत्तरक्रिया केली जाते.”

५. मल्ल म्हणाले, “तसेच आपण करू.”

६. मग मल्ल बोलले, “तथागताच्या देहाला अग्निसंस्कार करण्यास आता उशीर झाला आहे. उद्या ते करू या.”

७. नंतर कुशिनाराच्या मल्लांनी आपल्या सेवकांना आज्ञा केली. “तथागतांच्या उत्तरक्रियेची तयारी करा. सुगंध, पुष्पमाला गोळा करा. तसेच वादकांनाही बोलावून घ्या !”

८. नृत्य, भजन, गायन, पुष्पमाला, सुगंध, वस्त्राची आच्छादने, फुलांची तोरणे इत्यादिकांनी तथागतांच्या देहाला मानसन्मान व आदरांजली अर्पण करण्यात दूसरा दिवसही निघुन गेला. असाच तिसरा, चौथा, पाचवा आणि सहावा दिवसही गेला.

९. सातव्या दिवशी कुशिनाराच्या मल्लांनी विचार केला, “आज तथागतांचा देह हालवू या आणि त्यांची उत्तरक्रिया करू या.”

१०. नंतर मल्लांच्या आठ प्रमुखांनी ताटीला खांदा देण्यासाठी सिद्ध व्हावे म्हणून स्नाने केली व नवी वस्त्रे परिधान केली.

११. नंतर तथागतांचा देह उचलून मुकुटबन्धन नामक पूर्वेकडे असलेल्या चैत्याकडे नेला. तिथे देह उतरवून त्यांनी अग्निसंस्कार केले.

१२. काही कालानंतर तथागतांच्या नश्वर देहाची रक्षा झाली.

## ७. रक्षेसाठी संघर्ष

१. तथागतांच्या देहाला अग्नीने भस्मसात केल्यानंतर कुशिनाराच्या मल्लांनी रक्षा व अस्थी गोळा केल्या व सभागारात त्या ठेवून भाले व धनुष्यांचा त्यांच्याभोवती कोट केला. कोणी त्या सर्व किंवा त्यांचा अंश चोरू नये म्हणून तिथे पहारा बसवला.

२. सप्ताहपर्यंत नृत्य, गायन, वादन, पुष्पमाला व सुगंध इत्यादी उपचारांनी मल्लांनी त्या रक्षा-अस्थींना मानसन्मान व आदरांजली अर्पण केली.

३. मगधदेशाचा राजा अजातशत्रू ह्याच्या कानी आले की,तथागतांचे कुशिनारा येथे परिनिर्वाण झाले.

४. त्याने मल्लांकडे दूत पाठविला आणि तथागतांच्या अवशेषांचा थोडा अंश मिळावा म्हणून विनंती केली.

५. ह्याचप्रमाणे वैशालीच्या लिच्छवियांकडून, कपिलवस्तूच्या शाक्यांकडून, अहकप्याच्या वल्लियांकडून, रामगामच्या कोलीयांकडून आणि पावाच्या मल्लांकडूनही दूत आले.

६. अस्थींचा हिस्सा मागणार्यांत वेठद्वीपाचा एक ब्राम्हणही होता.

७. एवढ्या मागण्या आलेल्या पाहून कुशिनाराचे मल्ल म्हणाले, “तथागतांचे परिनिर्वाण आमच्या गावात झाले. तथागतांच्या अवशेषाचा अंशही आम्ही कुणाला देणार नाही. त्यांच्यावर फक्त आमचाच हक्क आहे.”

८. परिस्थिती चिघळत चाललेली पाहून द्रोण नावाचा एक ब्राम्हण मध्यस्थीसाठी पुढे आला. तो म्हणाला, “माझे दोन शब्द ऐका !”

९. द्रोण म्हणाला, “ज्या तथागतांनी आपणास संयमाचे शिक्षण दिले त्याच नरवरांच्या अस्थींच्या हिश्शासाठी संघर्ष, रक्तपात आणि युद्ध व्हावे हे अनुचित होय !”

१०. “आपण सर्वांनी एकमताने, मित्रत्वाने व दिलजमाईने अस्थींचे सारखे आठ हिस्से करण्याचे ठरवावे आणि प्रत्येक राज्यात त्यांवर स्तूप उभारावेत की, जेणेकरून त्या त्या ठिकाणी त्यांची पूजा जनतेला करता येईल.”

११. कुशिनाराच्या मल्लांनी मान्यता दर्शविली आणि ते म्हणाले, “हे ब्राम्हणा ! तूच ह्या अवशेषांचे सारखे आठ हिस्से करून सुयोग्य वाटणी कर.”

१२. “ठीक आहे !” द्रोणाने संमती व्यक्त केली.

१३. नंतर त्याने तथागतांच्या अवशेषांचे सारखे आठ हिस्से केले.

१४. हिस्से करून झाल्यावर द्रोण म्हणाला, “मला हे रक्षापात्र द्याल तर त्यावर मीही एक स्तुप बांधून काढीन.”

१५. सर्वांनी ते पात्र त्याला देण्यास मान्यता दर्शविली.

१६. अशा रीतीने तथागतांच्या अस्थि-रक्षेची विभागणी झाली आणि संघर्ष शांतीने आणि सलोख्याने मिटला.

## ८. बुद्ध-भक्ती

१. ह्या घटना घडण्याचे स्थान श्रावस्ती....

२. त्या वेळी पुष्कळसे भिक्खू तथागतांसाठी चीवर तयार करण्यात दंग होते. तीन महिन्यांत चीवर तयार झाले की, तथागत यात्रेला निघतील असे त्यांना वाटले.

३. त्या वेळी इसीदत्त आणि पूर्ण ह्या नावाचे दोन राज्याधिकारी काही कामानिमित्त साधुका येथे राहिले होते. त्यांना असे कळले की, ‘पुष्कळसे भिक्खू तथागतांसाठी चीवर तयार करण्यात दंग आहेत. तीन महिन्यात चीवर तयार झाले की, तथागत यात्रेला निघतील असे त्यांना वाटते.’

४. तेव्हा इसीदत्त आणि पूर्ण ह्यांनी एका माणसाला रस्त्यावर उभे राहण्यास सांगितले. त्याला सांगितले, “जेव्हा भगवान, अर्हत, सम्यक्-सम्बुद्ध तुला येताना दिसतील तेव्हा धावत येऊन आम्हाला कळव.”

५. दोन तीन दिवस त्या माणसाने तिथे राहून त्यांची प्रतीक्षा केल्यानंतर त्याला दूरवरून तथागत येताना दिसले. धावत येऊन त्याने इसीदत्त आणि पूर्ण ह्यांना सांगितले, "भगवान, अर्हत्, सम्यक्-सम्बुद्ध येत आहेत. आपल्याला जे काही करावयाचे असेल ते करावे."

६. तेव्हा इसीदत्त आणि पूर्ण हे राज्याधिकारी तथागतांना समोरे गेले आणि त्यांच्या समीप गेल्यावर त्यांनी तथागतांना अभिवादन केले व ते तथागतांच्या मागून पावले टाकीत चालू लागले.

७. नंतर तथागत राजमार्ग सोडून बाजूला गेले. तिथे एका वृक्षाच्या खाली त्यांच्यासाठी सिद्ध करण्यात आलेल्या आसनावर ते बसले. इसीदत्त व पूर्ण ह्यांनी त्यांना अभिवादन केले व ते एका बाजूला बसले. बसल्यावर ते तथागतांना म्हणाले,

८. " भगवान, आम्हाला जेव्हा समजले की, आपण कोशल देशात यात्रेसाठी जाणार आहात तेव्हा तथागत आमच्यापासून दूर चालले ह्याचे आम्हाला वाईट वाटले."

९. "भगवान, आम्हाला जेव्हा समजले की, आपण श्रावस्ती सोडून कोशल देशात यात्रेसाठी चालला आहात, तेव्हा तथागत आमच्यापासून दूर जाणार ह्या विचाराने आम्ही पुन्हा विवश व खिन्न झालो."

१०. "भगवान, आणि आम्हाला जेव्हा समजले की, तथागत कोशल सोडून मल्ल देशात जाणार आहेत, नव्हे गेलेही; तेव्हा आम्ही निराश व खिन्न झालो."

११. "भगवान पुन्हा आम्ही ऐकले की, तथागत मल्लदेश सोडून वज्जीदेशात जाणार.. आणि ते गेलेही.. की ते वज्जीदेश सोडून काशीला जाणार.. आणि ते गेलेही.. की ते काशी सोडून मगध देशात यात्रेला जाणार आणि ते गेले, तेव्हा तथागत आमच्यापासून दूर चालले म्हणून आम्ही निराश व खिन्न झालो."

१२. "पण भगवान, आम्हाला जेव्हा समजले की, तथागत मगध सोडून काशीला येणार आणि ते तसे निघाले; तेव्हा आम्हाला आनंद झाला आणि आमची हृदये उचंबळून आली, की तथागत आमच्याजवळ आले."

१३. "आणि जेव्हा आम्ही ऐकले की, तथागत काशीमध्ये संचार करीत आहेत तेव्हा आम्हाला तसाच आनंद झाला."

१४. (नंतर तथागतांच्या काशी ते वज्जी, वज्जी ते मल्लदेश, आणि मल्लदेश ते कोशलपर्यंतच्या संचाराचे तसे वर्णन करून ते म्हणाले, )

१५. "पण भगवान, जेव्हा आम्ही ऐकले की, तथागत कोशलदेशाहून श्रावस्तीच्या दिशेने संचारास निघाले तेव्हा तथागत आमच्या अगदी समीप येणार म्हणून आम्हांला आनंद झाला व आमची हृदये उचंबळून आली."

१६. "जेव्हा आम्ही ऐकले की, तथागत श्रावस्तीमध्ये अनाथपिण्डिकाच्या जेतवनविहारात वस्तीला राहिले आहेत तेव्हा तथागत आमच्या निकट आहेत ह्याचा आम्हाला आनंद होऊन आमची हृदये उचंबळून आली."

# अष्टम खंड: त्यांचे व्यक्तिमत्त्व

भाग पहिला--त्यांचे व्यक्तिमत्त्व

भाग दुसरा--त्यांची मानवता

भाग तिसरा--त्यांची आवडनावड

# भाग पहिला: त्यांचे व्यक्तिमत्त्व

## १. त्यांची देहाकृती

१. त्यांच्या सर्वत्र वर्णनांवरून असे कळते की, तथागत हे एक आकर्षक स्वरूपाचे पुरुष होते.
२. त्यांची देहाकृती ही सुवर्ण पर्वताच्या शिखराप्रमाणे होती. ते उंच आणि सुदृढ असून त्यांचे व्यक्तिमत्व आकर्षक होते.
३. त्यांचे आजानुबाहू व सिंहगती, त्यांचे वृषभसम नेत्र आणि सुवर्णकांती, त्यांची भरदार रुंद छाती सर्वांना आकर्षित करीत असे.
४. त्यांच्या भुवया, कपाळ, तोंड, डोळे, देह, हात, पाय आणि त्यांची गती; त्यांचा जो जो देहविशेष कुणाच्या दृष्टिक्षेपात येई त्या त्या अवयवांवर दृष्टी खिळून जाई.
५. ज्याने कोणी त्यांना पाहिले असेल त्याच्यावर त्यांच्या तेजाचा, सामर्थ्याचा आणि त्यांच्या सर्वोत्तम सौंदर्याचा प्रभाव पडत असे.
६. त्यांचे दर्शन होताच अन्यत्र जाणारा खिळून उभा राही; जो उभा असे तो त्यांच्यामागे चालू लागे. जो हळूहळू आणि शांतपणे चालत असे तो जलद धावू लागे; आणि जो बसलेला असे तो एकदम उभा राही.
७. जे त्यांच्या दर्शनार्थ येत त्यांपैकी काही हात जोडून त्यांना अभिवादन करीत. काही आदराने नतमस्तक होत, काही स्नेहार्द्र शब्दांनी त्यांच्याशी संभाषण करीत. कोणीही आदर व्यक्त केल्याशिवाय निरोप घेत नसे.
८. सर्वांना त्यांच्याबद्दल प्रेम आणि आदर वाटत असे.
९. स्त्रिया आणि पुरुष-सर्व त्यांचे भाषण श्रवण करण्यास उत्सुक असत.
१०. त्यांची वाणी अत्यंत मधुर, गंभीर, आकर्षक, कंपनात्मक आणि सुस्पष्ट अशी होती. त्यामुळे त्यांचे भाषण हे जणू दिव्य संगीतासारखे वाटायचे.
११. त्यांचा स्वर ऐकणार्यास आश्वासनपूर्ण वाटे आणि त्यांचे रूप पाहणार्यास पूज्यभाव वाटे.
१२. त्यांचे व्यक्तिमत्त्व त्यांना लोकनेता होण्यासच नव्हे तर आपल्या अनुयायांची हृदयदेवता होण्यासही पुरेसे होते.
१३. जेव्हा ते बोलत तेव्हा श्रोते सहजच जमत असत.
१४. ते काय बोलत ह्याला विशेष महत्व नसे. पण ते बोलत तेव्हा ऐकणार्यांच्या भावना हेलामून जात; आणि त्यांची मने आपल्या इच्छेप्रमाणे वळवली जात.
१५. श्रोत्यांच्या मनावर त्यांच्या शब्दांचा एवढा प्रभाव पडे की, जे काही ते सांगत ते सत्य आहे एवढेच नव्हे तर तो मुक्तीचा एकमेव मार्ग आहे अशी त्यांची खात्री होई.
१६. त्यांचे भाषण ऐकणार्यांना गुलामांना स्वतंत्र करण्याचे सामर्थ्य असणारे सत्य त्यांच्या शब्दांत असल्याची जाणीव होई.
१७. जेव्हा ते स्त्री-पुरुषांबरोबर बोलत तेव्हा त्यांचे गंभीर रूप लोकांच्या मनात आदराची भावना निर्माण करीत

असे आणि त्यांचा मधुर स्वर त्यांना आश्चर्यचकित व हर्षनिर्भर करीत असे.

१८. डाकू अंगुलीमाल आणि आळवीचा नरमांसभक्षक ह्यांना धर्मदीक्षा देणे दुसर्या कोणाला साध्य झाले असते काय ? राजा प्रसेनजित व राणी मल्लिका ह्यांचे एका शब्दाने सख्य करून देणे दुसर्या कोणाला जमले असते काय ? कोणावर त्यांचा प्रभाव एकदा पडला की तो त्यांचा कायमचा अंकित होत असे. इतके त्यांचे व्यक्तिमत्व आकर्षक होते.

## २. प्रत्यक्ष पाहिलेल्यांची साक्ष

१. भगवान बुद्धांना त्यांच्या जीवनकालात ज्यांनी पाहिले किंवा ज्यांना ते भेटले त्यांचे मत ह्या परंपरागत समजुतीचे समर्थन करतात.

२. साल नावाच्या एका ब्राम्हणाची अशी साक्ष काढता येईल की, भगवान बुद्धांना समोर प्रत्यक्ष पाहून त्याने त्यांच्या गौरवार्थ अशा भावना व्यक्त केल्या.

३. भगवानांच्या समोर आल्यावर अभिवादन करून तो ब्राम्हण बसला. त्या वेळी महापुरुषाची बत्तीस लक्षणे त्यांच्या ठायी आहेत किंवा काय ह्यासाठी त्याने त्यांच्या देहाचे निरीक्षण केले आणि त्याला ती आढळलीही.

४. ही बत्तीस लक्षणे असल्याची खात्री झाल्यावर त्यांना संबोधी प्राप्त झाली आहे किंवा नाही ह्याबाबत त्याला सन्देह वाटला; पण त्याला स्मरले की, वृद्ध ब्राम्हण किंवा आचार्य प्राचार्य ह्यांच्या मते जे अर्हत व सम्यक-सम्बुद्ध असतात त्यांची स्तुती केल्याने ते प्रकट होतात म्हणून खालील शब्दांनी त्याने त्यांची स्तुती करण्याचे योजिले.

५. "भगवान, आपला देह निर्दोष आहे, परिपूर्ण आहे, आकर्षक आहे, सुवर्णवर्णी आहे. आपले दात चमकदार आहेत. महापुरुषाच्या ठायी असणारे प्रत्येक लक्षण ह्या सुविकसित देहात प्रतीत होत आहे."

६. "स्पष्ट दृष्टी, सुंदर, उंच सरळ देहयष्टी असणारे आपण आपल्या अनुयायांत सूर्याप्रमाणे तळपळणारे आहात; आपण इतके आनंदी, सुवर्णवर्णी असून आपले तारुण्य एखाद्या गृहहीन श्रमणाप्रमाणे का फुकट घालवीत आहात ?"

७. " आपण चक्रवर्ती नरेशाप्रमाणे थाटामाटाने संचार केला पाहिजे. आपली राज्यसत्ता सातासमुद्रापर्यन्त असली पाहिजे. अभिमानी राजे तुमच्या पदरी ग्रामप्रमुख म्हणून असायला पाहिजेत. सार्वभौम चक्रवर्ती नरेशाप्रमाणे अखिल जगताचे शास्ते म्हणून आपण असायला पाहिजे."

८. आनन्दाने वर्णन केल्याप्रमाणे तथागतांची देहकांती इतकी निर्मळ आणि तेज:पुंज होती की, त्यावर सुवर्णवर्णी वस्त्राची जोडी ठेवली की क्षणात ती फिकट वाटू लागे.

९. तथागतांच्या विरोधकांनी त्यांना ' देखणा पोर' असे म्हटले. त्यात नवल ते कसले ?

## ३. त्यांचे नेतृत्व-सामर्थ्य

१. संघाला कोणी अधिकृत नेता नव्हता. तथागतांचाही संघावर काही अधिकार नव्हता. संघ ही एक स्वायत्त संस्था होती.

२. तर मग संघ आणि त्याचे सदस्य ह्या बाबतीत तथागतांचे स्थान काय होते ?

३. ह्याबाबत तथागतांचे समकालीन सकलुदायी व उदाई ह्यांची साक्ष उपलब्ध आहे.

४. एकदा भगवान राजगृहातल्या वेळूवनात वास्तव्यास होते.

५. एके दिवशी सकाळी भिक्षाटनासाठी भगवान राजगृहात गेले; पण नेहमीपेक्षा फार अगोदर आल्याचे जाणवून परिव्राजकारामात सकलुदायीकडे जाण्याचा त्यांनी विचार केला आणि त्या दिशेने ते निघाले.

६. त्या वेळी पुष्कळ परिव्राजकांच्या समुदायात सकलुदायी बसलेला होता. अस्तित्व व नास्तित्वाबाबत त्यांची जोरदार चर्चा चालली होती.

७. दुरून भगवान येत असल्याचे सकलुदायीला दिसताच त्याने सर्वांना सूचना दिली, "गप्प रहा ! गडबड करू नका. शांतताप्रिय श्रमण गौतम येत आहेत !"

८. त्याबरोबर ते सर्व गप्प झाले. इतक्यात भगवान आले. त्यांना सकलुदायी म्हणाला, " या, या भगवान! आम्ही आपले हार्दिक स्वागत करतो. दीर्घकालानंतर आज आपले आगमन होत आहे. भगवानांनी आसनस्थ व्हावे."

९. भगवान आसनस्थ झाले. कसल्या विषयावर चर्चा चालली होती आणि काय निष्कर्ष निघाले ह्याची त्यांनी चौकशी केली.

१०. त्यावर सकलुदायी बोलला, "जाऊ द्या. काही विशेष नाही. पुढे कधी तरी समजेलच ते !"

११. काही दिवसांपूर्वी जेव्हा नाना मतांचे श्रमण बाम्हण संथागारामध्ये एकत्र जमले तेव्हा त्यांच्यात चर्चा चालली की, अंगदेशातील मगध पौरजन किती भाग्यवान आहेत की, जितके गणाचार्य आहेत, जितके विख्यात श्रमण आहेत, जितके निरनिराळ्या मतांचे संस्थापक आहेत, जितके जनसंमर्दाने आदरणीय मानले आहेत ते सर्व राजगृहात वर्षावासासाठी आलेले आहेत.

१२. त्यामध्ये पूर्णकाश्यप आहे. मख्खली गोशाल आहे. अजितकेशकम्बल आहे. सन्जय वेलठ्ठिपुत्र आहे, निगंठनाथपुत्र आहे. सर्व प्रतिष्ठावंत आहेत आणि सर्व वर्षावासासाठी इथे आले आहेत. त्यात श्रमण गौतमसुद्धा आहेत, जे संघनायक आहेत, सुविख्यात धर्मगुरू आहेत, धर्मसंस्थापक आहेत, अनेक लोकांचे श्रद्धास्थान आहेत.

१३. ह्या अधिपतींपैकी ह्या सुविख्यात श्रमण ब्राम्हण आचार्यांपैकी असा कोण आहे की, जो आपल्या शिष्यांना पूज्य, आदरणीय व सन्मान्य वाटतो ? आणि ते आपल्या गुरूपाशी किती पूज्यबुद्धीने आणि आदराने राहात होते?

१४. काही म्हणाले, "पूर्णकाश्यपांना कोणी आदर किंवा सन्मान दर्शवीत नाहीत. त्यांचे शिष्य त्यांच गौरव करीत नाहीत. त्यांच्याजवळ राहताना त्यांना त्यांच्याबद्दल काही विशेष पूज्यभाव वाटत नाही."

१५. अशी वेळ एकदा आली होती, जेव्हा पूर्णकाश्यप आपल्या शेकडो अनुयायांना उपदेश करीत होते. तेव्हा मध्येच एक शिष्य बोलला, "पूर्णकाश्यपांना काही विचारू नका. त्यांना ह्या विषयात काही समजत नाही. मला विचारा. मी आपणास सर्व काही समजावून देऊ शकेन."

१६. तेव्हा पूर्णकाश्यप अश्रुपूर्ण नेत्रांनी व हात वर उचलून म्हणाले, "आपण शांत रहा. गडबड करू नका !"

# भाग दुसरा: त्यांची मानवता

## १. त्यांची करुणा- महाकारुणिकता

१. एकदा तथागत श्रावस्तीमध्ये राहिले होते तेव्हा काही भिक्खुंनी त्यांच्याकडे येऊन तक्रार केली की, त्यांच्या ध्यानधारणेत काही देवगण सतत उपद्रव देत असतात.

२. ह्या त्यांच्या अडचणी श्रवण करून तथागतांनी त्यांना खालीलप्रमाणे सूचना दिल्या.

३. “जो परमार्थविषयात कुशल आहे, जो शांतिपदाची आकांक्षा करीत आहे त्याने असे वागले पाहिजे: तो समर्थ, न्यायी, सुवच, तसेच मृदू आणि विनम्र असला पाहिजे.”

४. “तो संतुष्ट असला पाहिजे; त्याच्या गरजा अधिक असू नयेत. त्यांची कर्तव्ये कमी, त्याची जीवनवृत्ती साधी असावी. तो इंद्रियनिग्रही व विवेकी असला पाहिजे. उद्धट असता कामा नये. त्याला कुटुंबपरिवाराची आसक्ती असू नये.”

५. “सुज्ञजन नावे ठेवतील अशा क्षुल्लक गोष्टींचा नाद त्याने धरू नये. ‘सर्वांचे मंगल होवो, सर्वांचे कुशल होवो, सर्वांची हृदये निरामय होवोत’ अशी इच्छा त्याने धारण केली पाहिजे.”

६. “कसेही प्राणिमात्र असोत-सबल किंवा दुर्बल, उंच, सुदृढ किंवा मध्यम, बुटके, मोठे किंवा लहान.”

७. “दृष्ट किंवा अदृष्ट, दूरवर वास्तव्य करणारे किंवा निकटवासी, जात किंवा अजात-सर्व प्राणिमात्र सुखी होवोत.”

८. “कोणी कुणास फसवू नये; कुठेही असणार्या कुणाचाही द्वेष करू नये; किंवा रागाने व वाईट भावनेने कुणाचेच अनिष्ट चिंतू नये.”

९. “आपले प्राण पणाला लावून माता आपल्या एकमेव अपत्याला जशी जपते तशीच त्याने सर्व प्राणिमात्रांबद्दल भावना बाळगली पाहिजे.”

१०. “त्याच्या असीम मित्रत्वाच्या भावना जगात सर्वत्र-वर, खाली, आसमंतात, अनिर्बंधपणे, द्वेषविरहित प्रसृत झाल्या पाहिजेत.”

११. “तो उभा असो, बसलेला असो, चालता असो, निजलेला असो, जोपर्यंत तो जागा असेल तोपर्यंत त्याने असे जागरूक राहिले पाहिजे. हेच सर्वांनुमते उच्च जीवन आहे.

१२. “मोहात न पडणारा, सद्गुणी, ज्ञानी, इंद्रियसुखाबाबत अनासक्त असा तो असल्यामुळे त्याच्या नशिबी पुन्हा कधी गर्भवास येत नाही.”

१३. सारांश, भगवान बुद्धांनी त्यांना उपदेश केला, “आपल्या शत्रुंवरही प्रेम करा.”

## २. दु:खितांचे दु:खहरण-दु:खांचा उपशमनकर्ता

## *( १ ):* विशाखेचे सान्त्वन

१. विशाखा ही एक उपासिका होती. भिक्खुंना भिक्षा देणे हा तिचा प्रघात होता.
२. एके दिवशी तिच्याबरोबर रहात असलेली तिची नात सुदत्ता आजारी पडली आणि तिचे निधन झाले.
३. विशाखेचा शोक अनावर झाला.
४. तिच्या अंत्यविधीनंतर विशाखा भगवान बुद्धांपाशी गेली आणि साश्रू नयनांनी एका बाजूस जाऊन बसली.
५. तथागतांनी विचारले, "विशाखे, दु:खी, शोकमग्न आणि अश्रुसिंचन करीत तू अशी बसलीस ह्याचे कारण काय?"
६. तिने आपल्या नातीच्या मृत्यूची वार्ता सांगितली व ती म्हणाली, "ती अत्यंत आज्ञाधारक मुलगी होती. तिच्या सारखी दुसरी सापडणे कठीण!"
७. "विशाखे ! श्रावस्तीमध्ये एकूण किती मुली असतील ?"
८. "भगवान ! लोक म्हणतात कित्येक कोटी आहेत !"
९. "ह्या सर्व तुझ्या नातीसारख्या असतील तर त्यांच्यावर तू प्रेम करणार नाहीस काय ?"
१०. "भगवान ! खात्रीने करीन."
११. "आणि दर दिवशी श्रावस्तीमध्ये किती मुलींचे निधन होत असेल ?"
१२. "भगवान ! पुष्कळ."
१३. "मग कुणासाठी तरी शोक केल्यावाचून तुझा एक क्षणही सुना जाणार नाही!"
१४. "भगवान ! खरे आहे."
१५. "तर काय दिवसरात्र रडत तू तुझे जीवन कंठणार ?"
१६. "भगवान ! आपण ठीक सांगितलेत. समजले मला !"
१७. "तर मग आता शोक पुरे !"

## *( २ ):* किसा-गौतमीचे सान्त्वन

१. किसा गौतमीचा विवाह श्रावस्तीच्या एका व्यापार्याच्या पुत्राशी झाला होता.
२. विवाहानंतर थोड्या कालाने तिला एक पुत्र झाला.
३. तो चालताफिरता होतो न होतो तोच त्याला सर्पदंश होऊन तो मृत्यू पावला.
४. आपला पुत्र मृत्यू पावला ह्यावर तिचा विश्वासच बसेना. कारण पूर्वी तिने कधी मृत्यू पाहिला नव्हता.
५. सर्पदंश जिथे झाला तिथे दिसत असलेला लहान लाल डाग हा पुत्राच्या मृत्युचे कारण असेल असे तिला वाटले नाही.
६. म्हणून आपल्या पुत्राचे कलेवर घेऊन विचित्र मन:स्थितीत ती घरोघर फिरत असताना पाहून लोकांना वाटले की, तिला वेड लागले असावे.

७. अखेरीस एका वृद्ध गृहस्थाने तिला सुचविले की, श्रावस्तीत राहात असलेल्या श्रमण गौतमांकडे तिने जावे.
८. म्हणून ती तथागतांकडे आली आणि आपल्या मृत पुत्रासाठी काही औषध तिने मागतिले.
९. तथागतांनी तिची हकीकत आणि विलाप ऐकला.
१०. तथागतांनी तिला सांगितले, "तू नगरात जा आणि ज्या घरी एकही मृत्यू झालेला नाही त्या घरातून थोडी मोहरी घेऊन ये. तिने मी तुझा पुत्र जिवंत करीन."
११. तिला वाटले ही फार सोपी गोष्ट आहे. आणि म्हणून मुलाचे कलेवर घेऊन नी नगरात गेली.
१२. पण लवकरच तिचा भ्रम दूर झाला. कारण जिथे जिथे ती गेली त्या घरी कुणाचा ना कुणाचा तरी मृत्यू झालेला होता.
१३. एका गृहस्थाने तिला सांगितले, "जे जिवंत आहेत ते थोडे आणि जे निधन पावले ते अधिक आहेत."
१४. ती तथागतांकडे निराश होऊन रिकाम्या हाताने परत आली.
१५. तेव्हा तथागतांनी तिला विचारले की, मृत्यू हा सर्वॅनच्या नशिबी असतोच हे तुला समजले की नाही ? तिच्याच बाबतीत ही दुर्दैवी घटना घडली म्हणून तिने शोक का करावा ?
१६. तिने मग आपल्या पुत्राचे अन्त्यविधी केले. ते करताना ती म्हणाली, "सर्व नश्वर आहे; हा सृष्टिनियम आहे."

## ३. रुग्णांबद्दल चिंता

१. एकदा एक भिक्खू अतिसाराने आजारी होता आणि आपल्या मलमूत्रातच पडून राहिला होता.
२. स्थविर आनन्दाबरोबर फिरत फिरत तथागत त्या भिक्खूच्या निवासस्थानी आले.
३. आपल्या मलमूत्रात लोळत पडलेल्या भिक्खूला तथागतांनी पाहिले. ते त्याच्यापाशी गेले व म्हणाले, "भिक्खु ! तुला काय होते आहे?"
४. "भगवान ! मी अतिसाराने आजारी आहे."
५. "तुझी सेवा करण्यास कोण आहे काय?"
६. "भगवान ! कोणी नाही."
७. "भिक्खू ! तुझी कोणी दुसरे भिक्खू सेवा करीत नाहीत, असे का?"
८. "भगवान ! मी कुणाच्या उपयोगी पडत नाही. म्हणून कुणी माझी पर्वा करीत नाहीत."
९. मग तथागत आनन्दाला म्हणाले, "आनन्द ! जा आणि पाणी घेऊन ये. ह्या भिक्खूला मी स्वच्छ करतो."
१०. "होय महाशय !" आनन्द त्यांना म्हणाला. त्याने पाणी आणल्यावर तथागतांनी पाणी ओतले व आनंदाने त्या भिक्खूचा देह स्वच्छ केला. नंतर तथागतांनी त्याचे डोके व आनन्दाने पाय धरून त्याला उचलून बिछान्यावर ठेवला.
११. नंतर तथागतांनी त्या क्षणी सर्व भिक्खूगणांना पाचारण केले व ते म्हणाले :
१२. "अमुक एका निवासात कोणी भिक्खु आजारी आहे काय ?"
१३. "होय, भगवान !"
१४. "तो कशामुळे आजारी आहे ?"

१५. "भगवान ! त्या भिक्खूला अतिसार झाला आहे."
१६. "भिक्खूवर्गहो, त्याची कुणी सेवा करीत आहे काय ?"
१७. "नाही, भगवान !"
१८. "का नाही ? त्याची सेवा का करत नाहीत ?"
१९. "तो भिक्खु कुणाच्या उपयोगी पडत नाही म्हणून भिक्खु त्याची सेवा करीत नाहीत."
२०. "भिक्खूहो, तुमची काळजी वाहण्यास तुमचे मातापिता नाहीत. तुम्ही जर परस्परांची सेवा केली नाहीत तर दुसरे कोण करणार ? भिक्खूहो, जो माझी सेवा करू इच्छितो त्याने रुग्णाची सेवा करावी."
२१. "त्याला जर गुरू असेल तर तो जिवंत असेपर्यंत गुरूने त्याची काळजी वहावी आणि रुग्ण बरा होईपर्यंत प्रतीक्षा करावी. जर आचार्य अथवा सहनिवासी भिक्खु असेल, अथवा शिष्य सहवासी किंवा गुरुबंधू असेल तर त्याने त्याची काळजी घ्यावी आणि बरा होईपर्यंत प्रतीक्षा करावी. जर कुणी रुग्णाची सेवा करणार नसेल तर तो त्याचा गुन्हा समजला जावा."

( २ )

१. एकदा भगवान बुद्ध राजगृहाच्या महावनात कलन्दक निवासामध्ये राहात होते.
२. त्या वेळी स्थविर वक्कली रुग्ण, पीडित व व्याधिग्रस्त अशा स्थितीत एका कुंभाराच्या झोपडीत राहात होता.
३. स्थविर वक्कलीने आपल्या सेवकांना बोलाविले व तो म्हणाला, "मित्रहो, तथागतांकडे जा आणि माझ्या वतीने त्यांच्या चरणी वंदन करूत त्यांना सांगा, 'भिक्खू वक्कली रुग्ण, पीडित व व्याधिग्रस्त आहे व तो तथागतांच्या चरणी वंदन करीत आहे.' आणि असेही सांगा, 'वक्कलीवर दया करा आणि त्याला पाहण्यास या."
४. भगवानांनी मौनानेच सम्मती दर्शवली. नंतर वस्त्रे लेवून भिक्षापात्र चीवरासह स्थविर वक्कलीला पाहण्यासाठी तथागत गेले.
५. स्थविर वक्कलीने तथागतांना येताना पाहून आपल्या बिछान्यावर तो सावरून बसला.
६. तेव्हा तथागत स्थविर वक्कलीला म्हणाले, "वक्कली, उठू नकोस. ह्या इथल्या आसनावर मी बसतो." त्याप्रमाणे तिथे असलेल्या आसनावर तथागत बसले व ते स्थविर वक्कलीला म्हणाले,
७. "वक्कली, मला दिसते आहे की तू सर्व सहन करीत आहेस. तू धीराने दिवस कंठीत आहेस. तुझी पीडा न वाढता कमी होत आहे ना? ती कमी होण्याची लक्षणे आहेत की वाढण्याची ?"
८. "नाही, भगवान. मला आता सहन होत नाही. मला धीरही उरला नाही. तीव्र कळांनी मी हैराण झालो आहे. त्या कमी होत नाहीत. त्या कमी होण्याची लक्षणे दिसत नाहीत. उलट वाढण्याचीच दिसतात."
९. "तुझ्या मनात काही संदेह आहे, वक्कली ? काही दुःख ?"
१०. "भगवान, माझ्या मनात काही संदेह किंवा दुःख नाही !"
११. "वक्कली, तुझ्या शीलाबाबत काही दोषार्ह आहे काय ?"
१२. "भगवान, नाही. माझ्या शीलाबाबत लज्जा वाटण्यासारखे काही घडलेले नाही."

१३. "वक्कली, असे आहे तर तुला काही तरी दु:ख होत असले पाहिजे. कसला तरी तुला पश्चात्ताप होत असला पाहिजे !"
१४. "भगवान ! आपले दर्शन व्हावे अशी फार दिवसांची इच्छा होती; पण त्यासाठी आपल्याकडे येण्याचे त्राण देहात नव्हते."
१५. "वक्कली ! ह्या माझ्या घाणेरड्या देहात पाहण्यासारखे काय आहे ? जो धम्माला पाहतो तो मला पाहतो, वक्कली ! जो मला पाहतो, तो धम्माला पाहतो. धम्माचे दर्शन करणार्याला मी दिसू शकतो आणि वक्कली, माझे दर्शन करण्यात धम्माचेही दर्शन घडते."

( ३ )

१. असे मला समजले की, एकदा भगवान बुद्ध भग्गी देशातील मृगवनात भेसुकला वाटिकेत मकर समाश्रयावर राहात होते. तेव्हा गृहपती नकुलपिता तथागतांकडे आला आणि त्यांना अभिवादन करून एकीकडे बसला.
२. बसल्यानंतर नकुलपिता तथागतांना म्हणाला, "भगवान, मी एक जरा-जर्जर, वयोवृद्ध गृहस्थ आहे. माझे वय होत आले आहे. मी आजारी असून नेहमी कष्टी असतो आणि भगवान, मला क्वचितच आपले व संघाचे दर्शन घडते. भगवान, आपण सान्त्वनाचे व उत्तेजनाचे दोन शब्द जर मला सांगितलेत तर दीर्घकालपर्यंत ते मला हितकारक व सुखदायी होतील."
३. "गृहपती, तुमचे शरीर जर्जर आणि पीडित झाले आहे हे खरे आहे. असा देह धारण करून वावरणार्याने क्षणभरही आरोग्याची अपेक्षा करणे मुर्खपणाचे आहे. गृहपती, ह्यासाठी तुम्ही आपल्या मनास अशी शिकवण दिली पाहिजे की, 'माझा देह दुर्बल असला तरी माझे मन रोगट होणार नाही.' गृहपती, असे तुम्ही मनाला शिकवले पाहिजे."
४. गृहपती नकुलपिताने तथागतांचा हा उपदेश प्रसन्न मनाने श्रवण केला. आपल्या आसनावरून तो उठला आणि तथागतांना अभिवादन व प्रदक्षिणा करून तो निघुन गेला.

( ४ )

१. एकदा तथागत शाक्यांच्या कपिलवस्तुमधील अंजिरोद्यानात राहात होते.
२. त्या वेलळी पुष्कळसे भिक्खू तथागतांसाठी चीवर तयार करण्यात दंग होते. त्यांना असे वाटत होते की, तीन मास पूर्ण होताच तयार झालेले चीवर घेऊन तथागत परिचारासाठी निघतील.
३. महानाम शाक्याने असे ऐकले की, पुष्कळसे भिक्खू तथागतांसाठी चीवर तयार करण्यात गुंतले आहेत. त्यांना असे वाटते की, तीन मास पूर्ण होताच तयार झालेले चीवर घेऊन तथागत परिचारासाठी निघतील आणि म्हणून

तो तथागतांकडे गेला आणि त्यांना अभिवादन करून एकीकडे बसला, बसल्यावर तथागतांना महानाम शाक्य म्हणाला,

४. "मी असे ऐकले आहे की, बरेचसे भिक्खू तथागतांसाठी चीवर तयार करण्यास गुंतले आहेत त्यांना असे वाटते की, 'तीन मास पूर्ण होताच तयार झालेले चीवर घेऊन तथागत परिचारासाठी निघतील.' पण भगवान ! समजूतदार गृहस्थाने आपल्या रुग्णपीडित व दुःखी सहकार्यांचे कशा प्रकारे सान्त्वन करावे व त्याला प्रसन्न ठेवावे ह्याबाबत आपल्या मुखातून काहीच आम्ही ऐकलेले नाही."

५. "महानाम, समजूतदार गृहस्थाने आपल्या रुग्णपीडित व दुःखी सहकार्यांचे सान्त्वन करून त्याला प्रसन्न करण्यासाठी चार सुखदायक आश्वासनांचा अबलंब केला पाहिजे. बंधू ! धर्म आणि संघ ह्यांच्याठिकाणी श्रद्धा बाळग. तसेच मन निश्चल राखणार्या व धर्माला प्रिय असणार्या अखण्डित व अकलंकित शीलाबाबतही श्रद्धा राख."

६. "महानाम, एका समजूतदार गृहस्थाने दुसर्या रुग्ण, पीडित व दुःखी गृहस्थाला ह्या प्रकारे उपदेश केल्यानंतर मग असे बोलावे."

७. "जर तो रुग्ण आपल्या मातापित्यांच्या दर्शनासाठी व्याकूळ झाला असेल तर त्याला म्हणावे, 'हे सद्गृहस्था, तू आपल्या मातापित्यांच्या दर्शनासाठी व्याकूळ अस किंवा नस, तुझे मरण समीप आहे. तू जर आपल्या मातापित्यांच्या लोभापासून मुक्त झालास तर ते बरे होईल."

८. "आणि जर तो रुग्ण त्यावर म्हणाला की, 'मातापित्याच्या लोभाचा आता त्याग केला आहे.' तर त्या दुसर्या गृहस्थाने म्हणावे, 'पण अजून तुझा मुलाबाळांचा लोभ शिल्लक असेल. काही झाले तरी तू मरणार. मग हा मुलाबाळांचा लोभ सोडलास तर बरे होईल."

९. "अशा तर्हेने मग इन्द्रियसुखाच्या पाच प्रकारांबाबत सांगावे. समज, जर तो रुग्ण म्हणाला की, 'इन्द्रियसुखाची मला अभिलाषा आहे.' तर दुसर्याने म्हणावे, 'इन्द्रियसुखापेक्षा दिव्य लोकातील सुख अधिक श्रेष्ठ आणि सरस आहे; मानवी सुखाकडून तुझी दृष्टी दिव्य लोकाच्या सुखाकडे वळव."

१०. आणि जर तो रुग्ण म्हणाला, 'माझी दृष्टी तशी स्थिर झाली आहे.' तर दुसर्याने म्हणावे, 'तुझे चित्त ब्रम्हलोकावर स्थिर कर.' आणि जर तो म्हणाला, 'तसे केले आहे.' तर दुसर्याने म्हणावे,

११. "प्रिय मित्रा, ब्रम्हलोकसुद्धा अनित्य, अस्थिर व ममत्वपूर्ण आहे म्हणून तुझे चित्त ब्रम्हलोकापलीकडे उच्च करून स्वत्वाची विरक्ती साधण्यावर केंद्रित कर."

१२. "आणि जर तो रुग्ण म्हणाला की, 'तसे केले आहे' तर महानाम, जीवनमुक्तीचा विचार करताना, स्वत्वाचा त्याग करू पाहणारा हा सद्गृहस्थ आणि आसवापासून ज्याने आपले चित्त विरक्त केले आहे तो श्रावक ह्यांत काहीच फरक नाही."

## ४. असहिष्णुंच्या बाबतीत त्यांची उदारता

१. एकदा भगवान बुद्ध आलवक यक्षाच्या राज्यात आळवी नगरीत राहात होते. तेव्हा आलवक तथागतांकडे आला व म्हणाला, "श्रमण, चालता हो."

२. “मित्रा, ठीक आहे.” असे म्हणून तथागत तिथून निघाले.
३. तेव्हा यक्ष बोलला. “श्रमण, आत ये.”
४. तथागत आत आले व म्हणाले, “मित्रा ठीक आहे.”
५. पुन्हा यक्ष त्यांना म्हणाला, “श्रमण, चालता हो.”
६. “मित्रा, ठीक आहे.” असे म्हणून तथागत बाहेर गेले.
७. पुन्हा यक्ष त्यांना म्हणाला, “श्रमण, आत ये.”
८. तथागत आत येता येता म्हणाले, “मित्रा ठीक आहे.”
९. पुन्हा तिसर्यांदा यक्ष म्हणाला, “श्रमण, चालता हो.”
१०. तथागत जाता जाता म्हणाले, “मित्रा, ठीक आहे.”
११. “श्रमण आत ये.” पुन्हा यक्ष म्हणाला.
१२. तथागत आत येता येता म्हणाले, “मित्रा, ठीक आहे.”
१३. पुन्हा चौथ्यांदा यक्ष त्यांना म्हणाला, “श्रमण, चालता हो !”
१४. त्यावर तथागत म्हणाले, “मित्रा, मी मुळीच जाणार नाही. तुला काय वाटेल ते कर.”
१५. यक्ष रागावून म्हणाला, “श्रमण ! मी एक प्रश्न विचारतो. तू जर माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाहीस तर तुला मी वेडा करीन किंवा तुझे हृदय फाडून टाकीन किंवा तुला पायाने उचलून नदीपलीकडे फेकून देईन.”
१६. “मित्रा, ह्या जगात मला वेडा करू शकेल किंवा माझे हृदय फाडू शकेल किंवा मला पायाने उचलून नदीपलीकड फेकू शकेल असा कुणी असेलसा दिसत नाही. तरी पण तुला काय प्रश्न विचारायचा असेल तो विचार !”
१७. तेव्हा आलवक यक्षाने तथागतांना पुढील प्रश्न विचारले-
१८. “ ह्या जगात मानवाचे सर्वोच्च धन कोणते ? कोणत्या सत्कर्माने सुख प्राप्त होते ? सर्वांत अत्यंत स्वादिष्ट चव कोणती ? कोणत्या प्रकारचे जीवन सर्वश्रेष्ठ आहे ?”
१९. तथागतांनी उत्तर दिले, “श्रद्धा हे सर्वोच्च धन आहे. धर्माचे यथार्थ आचरण केल्यास सुख प्राप्त होते. सत्याची चव ही सर्वांत अत्यंत स्वादिष्ट आहे. प्रज्ञापूर्ण जीवन हे सर्वश्रेष्ठ जीवन आहे.”
२०. आलवकाने मग विचारले, “ मानवाला पूर ( पुनर्जन्म ) कसा ओलांडता येतो ? मानव ( भव ) सागर कसा ओलांडतो ? मानव दु:ख कसे जिंकू शकतो ?”
२१. तथागतांनी उत्तर दिले, “मानव श्रद्धेच्याद्वारे पूर पार करू शकतो. मानव दक्षतेने सागर ओलांडू शकतो. मानव प्रयत्नाने दु:खावर विजय मिळवू शकतो. मानव प्रज्ञेने शुद्ध होऊ शकतो.”
२२. आलवक यक्षाने विचारले, “मानवाला ज्ञान कसे प्राप्त होते ? मानवाला धन कसे प्राप्त होते ? मानवाला कीर्ती कशी लाभते ? मानवाला मित्रप्राप्ती कशी होते ? इहलोकातून परलोकात जाताना मानवाला पश्चात्ताप का होत नाही ?”
२३. तथागतांनी उत्तर दिले, “निर्वाणाच्या प्राप्तीसाठी अर्हत तसेच धर्म ह्यावर श्रद्धा ठेवून आणि आज्ञापालन करून दक्ष व तत्पर मनुष्याला ज्ञान प्राप्त करता येते.”
२४. “जो उचित तेच करतो, जो दृढनिश्चयी असतो, तो जागृत असतो, त्यालाच धन प्राप्त होते. जो दान करतो

त्यालाच मित्र प्राप्त होतात.”

२५. “ज्या श्रद्धावान उपासकाशी सत्य, सदाचार, सहनशीलता आणि औदार्य असते त्याला मृत्यूनंतर पश्चात्ताप होत नाही.”

२६. “इकडे ये ! दुसरे श्रमण ब्राम्हण इथे आहेत. त्यांनाही विचार की, सत्य, संयम, दानशीलता आणि सहनशीलता ह्यापेक्षा अधिक उच्च गुण आहेत काय ?”

२७. आलवक यक्ष म्हणाला, “आता दुसर्या श्रमण ब्राम्हणांना कशाला विचारायला हवे ? आज माझ्या भावी सुखाची मला जाणीव झाली.”

२८. “खरोखरच माझे भाग्य म्हणून तथागत आले. आज मला समजले की, कोणाला दान दिल्याने सर्वाधिक फल प्राप्त होते.”

२९. “आजपासून तथागत व त्यांचा धम्माला वंदन करून एका गावाहून दुसर्या गावाला, एका नगराहून दुसर्या नगराला मी फिरत जाईन.”

## ५. समता आणि समान व्यवहाराचे समथर्न

१. तथागतांनी भिक्खू संघासाठी जितके नियम तयार केले होते त्यांचा त्यांनी स्वखुशीने स्वीकार केला होता व ते आपणालाही बंधनकारक मानले होते.

२. आपण संघाचे प्रमुख आहोत आणि आपल्यावरील असीम प्रेमाने आणि आदराने नियमपालनाबाबत आपणास सहज सवलती मिळू शकतील, अशी परिस्थिती असतानाही तथागतांनी काही खास सवलती किंवा नियम-विमुक्ती हक्काने उपभोगिल्या नाहीत.”

३. भिक्खू दिवसातून फक्त एकदाच अन्नाशन करतात हा भिक्खूवर्गासाठी केलेला नियम तथागतांनीही स्वीकृत केला आणि त्याचे पालनही केले.

४. भिक्खूची काही खाजगी मालमत्ता असता कामा नये हा नियमही तथागतांनी स्वीकृत केला आणि त्याचे पालन केले.

५. भिक्खूपाशी फक्त तीनच चीवरे असली पाहिजेत हा नियमही सर्व भिक्खुंप्रमाणे तथागतांनी स्वीकृत केला व त्याचे पालनही केले.

६. एकदा भगवान बुद्ध शाक्यदेशात कपिलवस्तुमधील वटवाटिकेत राहात होते. त्यावेळी तथागतांची मावशी प्रजापती गौतमी स्वत: हाताने कातलेली व विणलेली नवीन वस्त्र जोडी घेऊन आली व तिचा स्वीकार करण्याची तिने तथागतांना विनंती केली.

७. तथागतांनी तिला सांगितले, “प्रजापती ! ती संघाला अर्पण कर.”

८. तिने दुसर्यांदा आणि तिसर्यांदा पुन्हा तशी विनंती केली आणि तिला तेच उत्तर मिळाले.

९. नंतर आनन्दाने आग्रह केला. “भगवान ! गौतमीने आणलेल्या वस्त्रांचा आपण स्वीकार करावा. आपल्या मातेच्या निधनानंतर प्रजापती गौतमीनेच दाई आणि दत्तक माता होऊन आपली फार सेवा केली होती.” पण वस्त्र संघालाच अर्पण करण्यात यावी हा आपला आग्रह तथागतांनी सोडला नाही.

१०. प्रारंभी भिक्खूसंघाचा असा नियम होता की, भिक्खूंची वस्त्रे उकिरड्यावर पडलेल्या चिंध्यातूनच तयार करण्यात यावीत. धनिक लोकांना संघाचे सदस्य होण्यापासून परावृत्त करता येईल. म्हणून हा नियम केला होता.

११. एकदा जीविकाने नव्या कापडाचे तयार केलेले चीवर स्वीकारण्याचा तथागतांना आग्रह केला. जेव्हा तथागतांनी त्या चीवराचा स्वीकार केला तेव्हा तथागतांनी मूळ नियमात तसा बदल केला आणि भिक्खुंनाही ती सवलत जाहीर केली.

# भाग तिसरा: त्यांची आवड-नावड

## १. त्यांना दारिद्र्य नापसंत होत

१. एकदा भगवान बुद्ध श्रावस्तीमध्ये अनाथपिण्डिकाच्या जेतवनारामात राहात होते. त्या वेळी गृहपती अनाथपिण्डिक त्यांच्या दर्शनासाठी आला व तथागतांना अभिवादन करून एकीकडे बसला. नंतर त्याने तथागतांना विचारले की, 'मानवाने धनार्जन का करावे ?'
२. "तू विचारतोस म्हणून तुला मी सांगतो."
३. "ज्याने मेहनतीने धन मिळवले आहे, ज्याने हातांनी कष्ट करून धन मिळवले आहे, ज्याने घाम गाळून धन मिळविले आहे; तसेच ज्याने न्याय मार्गाने धन कमावले माहे अशा एखाद्या आर्यश्रावकाचे घेऊ. त्या धनामुळे तो स्वत: सुखी व आनंदी होतो आणि ते सुख व आनंद तो टिकवू शकतो; तो आपल्या मातापितरांना सुखी व आनंदी करतो, आणि तसे राखतो; त्याप्रमाणेच आपली पत्नी, मुले, दास व कामगार ह्यांनाही. धन प्राप्त करण्याचा हा पहिला हेतू आहे."
४. "अशा प्रकारे बंधन प्राप्त केल्यानंतर तो आपल्या स्नेह्यासोबत्यांना सुख आणि आनंद देतो. तसेच सुखी आणि आनंदी राखतो. हा दुसरा हेतू आहे."
५. "अशा प्रकारे धन प्राप्त केल्यानंतर अग्नी व पाणी, राजा तसेच चोर, शत्रू आणि वारस ह्यांपासून होणारी हानी तो टाळू शकतो. तो आपली मालमत्ता सुरक्षित ठेवू शकतो. हा तिसरा हेतू."
६. "अशा प्रकारे धन प्राप्त केल्यानंतर तो कुलयज्ञ, अतिथियज्ञ, पितृयज्ञ, राजयज्ञ व देवयज्ञ असे पंचयज्ञ करू शकतो हा धन प्राप्त करण्याचा चौथा हेतू."
७. "अशा प्रकारे धन प्राप्त केल्यानंतर तो गृहपती उच्च हेतूचे, स्वर्गीय सुखाप्रत नेणारे, स्वर्गलोकाच्या दिशेस प्रवृत्त करणारे असे दान, अहंकार व आळस ह्यांपासून मुक्त असलेल्या सर्व गोष्टी धीराने व विनम्रतेने सहन करणार्या, स्वतंत्र, शांत व परीपूर्ण होण्याचा यत्न करणार्या सर्व श्रमणांना आणि संतजनांना देतो. हा धन प्राप्त करण्याचा पाचवा हेतू."
८. अनाथपिण्डिकाला समजले की, गरिबीचा गौरव करून तथागतांनी गरिबांचे सान्त्वन केले नाही किंवा मानवाने प्राप्त करावी अशी सुखी जीवनवृत्ती म्हणून गरिबीला श्रेष्ठत्वही दिले नाही.

## २. त्यांना संग्राहक वृत्ती नापसंत होती

१. भगवान बुद्ध एकदा कुरुदेशात कम्मासदम्म नगरीत राहात होते.
२. स्थविर आनन्द त्यांच्याकडे आला आणि त्यांना अभिवादन करून एकीकडे बसला.
३. तसे बसल्यावर तो म्हणाला, "तथागतांनी शिकविलेला प्रतीत्य- समुत्पादाचा नियम अजब आहे. तो फार गहन आहे. तरी पण मला तो अगदी स्पष्ट समजला आहे."

४. “आनन्द, असे म्हणू नकोस. असे म्हणू नकोस. हा प्रतीत्य-समुत्पादाचा नियम गहन आहे. हा नियम न समजल्यामुळे, त्याचे आकलन न झाल्यामुळे चालू पिढी गोंधळात, गडबडगुंड्यात सापडली आहे. तिला दुःखाचा मार्ग ओलांडून जाणे असाध्य झाले आहे.”
५. “मी सांगितले आहे की, तृष्णा ही लोभाचे कारण आहे. जिथे कोणत्याही प्रकारचा किंवा जातीचा लोभ कोणालाही कशासाठी नसतो तिथे लोभाचा संभव कसा असेल ?”
६. “भगवान, असणार नाही.”
७. “तृष्णेमुळे लोभाची ओढ लागते.”
८. “लोभाच्या मागे लागल्याने काम व लालसा उत्पन्न होतात.”
९. “काम व लालसेमुळे दृढता निर्माण होते.”
१०. “दृढतेमुळे स्वामित्वाची निर्मिती होते.”
११. “स्वामित्वामुळे लोभ आणि अधिक स्वामित्व निर्माण होते.”
१२. “स्वामित्वामुळे मालमत्तेवर पहारा ठेवणे आवश्यक होते.”
१३. “मालमत्तेवर पाहारा ठेवण्याच्या वृत्तीमुळे अनेक वाईट व दुष्ट प्रसंग निर्माण होतात, जसे मारामारी, जखम, संघर्ष, भांडण, निंदा व असत्य.”
१४. “आनन्द, ही प्रतीत्य-समुत्पादाची साखळी आहे. जर तृष्णाच नसली तर लोभाची ओढ लागेल काय ? लोभाची ओढ नसेल तर विकार निर्माण होतील काय ? विकार नसतील तर दृढता निर्माण होईल काय ? दृढता नसेल तर स्वामित्वाचा लोभ निर्माण होईल काय ? स्वामित्व नसेल तर अधिक स्वामित्वाची हाव निर्माण होईल काय ?”
१५. “भगवान, नाही होणार,”
१६. “जर स्वामित्वाचा लोभ नसेल तर शान्ती नाही का टिकणार ?”
१७. “भगवान, टिकू शकेल.”
१८. भगवान म्हणाले, “मी पृश्वीला पृथ्वीच मानतो; पण माझ्या मनात तिच्याबद्दल तृष्णा नाही.”
१९. “म्हणून मी सांगतो की, सर्व तृष्णा समूळ निपटून, त्यांची लालसा न धरून उलट त्यांचा त्याग, नाश व परित्याग करूनच मी ‘बुद्धत्व’ प्राप्त केले आहे.”
२०. “भिक्खूहो, भौतिक मालमत्तेचे नव्हे तर माझ्या धर्माचे हिस्सेदार होण्यासाठी झटा. कारण तृष्णेमुळे आसक्ती निर्माण होते आणि आसक्तीने मानसिक दास्यत्व येते.”
२१. अशा रीतीने भगवान बुद्धांनी स्थविर आनन्दाला आणि अन्य भिक्खूवर्गाला संग्राहक वृत्तीचे दुष्परिणाम समजावून सांगितले.

## ३. त्यांची सौंदर्याची आवड

१. भगवान बुद्धांना सौंदर्याची एवढी आवड होती की, त्यांना सौंदर्यप्रिय बुद्ध असे म्हटले तर शोभून दिसेल.
२. त्यांनी आपल्या अनुयायांना सांगितले होते, “सौंदर्याच्या सहवासात राहा.”

३. भिक्खुंना उपदेश करताना ते म्हणाले,
४. "भिक्खूहो, अनुदित सद्धर्माचा उदय किंवा उदित अधर्माचा लोप करण्यास समर्थ ठरेल अशी सौंदर्याच्या सहवासाइतकी दुसरी कोणतीही गोष्ट नाही."
५. "जो सौंदर्याचा स्नेही आहे त्याच्या ठायी अनुदित सद्धर्माचा उदय होतो आणि उदित अधर्माचा लोप होतो. अधर्म आणि अधर्माची भक्ती लोप पावते, सद्धर्माबद्दल अप्रीती नाहीशी होते, सद्धर्माबद्दल भक्ती निर्माण होते; अधर्माबद्दल अप्रीती वृद्धिंगत होते."
६. "भिक्खूहो, अनुदित ज्ञानशाखा उदित न व्हावी म्हणून किंवा उदित ज्ञानशाखा पूर्णत्वाप्रत जाऊ नये म्हणून उपयुक्त ठरणारी बेशिस्त दृष्टीसारखी दुसरी समर्थ गोष्ट मला माहीत नाही."
७. "भिक्खूहो, ज्याची दृष्टी बेशिस्त आहे त्याच्या ठायी अनुदित ज्ञानशाखा उदित होत नाहीत आणि जर उदित झाल्या तर त्यांची योग्य जोपासना न झाल्यामुळे पूर्णत्वास पोचत नाहीत."
८. "भिक्खूहो, सग्यासोयर्यांचा अभाव ही क्षुल्लक गोष्ट आहे. पण विद्वत्तेचा अभाव ही मात्र फार हानिकारक गोष्ट आहे."
९. "भिक्खूहो, सग्यासोयर्यांची बुद्धी ही क्षुल्लक गोष्ट आहे, पण प्रज्ञेची वृद्धी ही मात्र सर्वोच्च महत्त्वाची गोष्ट आहे."
१०. "भिक्खूहो, म्हणून तुम्ही अशी शिकवण अंगी बाणली पाहिजे की, 'आम्ही प्रज्ञेचा विकास करू.' ती प्राप्त करण्यासाठी तुम्ही साधना केली पाहिजे.
११. "भिक्खुहो, धनवृद्धी ही क्षुल्लक महत्वाची गोष्ट आहे. सर्व वृद्धींमध्ये श्रेष्ठ म्हणजे प्रज्ञावृद्धी. म्हणन तुम्ही अशी वृत्ती बाळगली पाहिजे की, 'आम्ही प्रज्ञेचा विकास करू.' ती प्राप्त करण्यासाठी तुम्ही साधना केली पाहिजे."
१२. "कीर्तीचा लोप ही क्षुल्लक गोष्ट आहे, पण प्रज्ञेचा लोप ही खरोखरीच दुःखद गोष्ट आहे."

## ४. त्यांची सौंदर्याबद्दल आसक्ती

१. एकदा शाक्य देशातील सक्कर ह्या नगरात तथागतांचे वास्तव्य होते.
२. त्या समयी स्थविर आनन्द तथागतांकडे आला आणि त्यांना अभिवादन करून एका बाजूस बसला. अशा रीतीने आसनस्थ झाल्यावर स्थविर आनन्द बोलला,
३. "भगवान, जीवनात अर्धे महत्व सौंदर्याशी मैत्री जोडण्यात आहे, सौंदर्याचा सहवास जोडण्यात आहे, सौंदर्याशी दाट स्नेह जोडण्यात आहे."
४. "आनन्द, असे म्हणू नकोस, असे म्हणू नकोस. सौंदर्याशी मैत्री, सहवास व निकट स्नेह ह्यांचे जीवनात सर्वस्वी महत्व आहे."
५. "जो सौंदर्याचा मित्र, सहवासी आणि निकट परिचित आहे अशा भिक्खूकडून अशी अपेक्षा आहे की, तो आर्य-अष्टांगिक मार्गाचा विकास करील, तो आर्य- अष्टांगिक मार्गाचा जास्तीत जास्त लाभ घेईल."

६. “आणि आनन्द, असा भिक्खू आर्य-अष्टांगिक मार्गाचा विकास कसा करील किंवा त्यापासून अधिकाधिक लाभ कसा घेऊ शकेल ?”

७. “अशा वृत्तीने तो सम्यक् दृष्टी प्राप्त करील; जी त्याग, विराग, विराम ह्यांवर आधारित असून जिची परिणती आत्मसमर्पणात होते. तो सम्यक् संकल्प, सम्यक् वाणी, सम्यक् कर्मान्त, सम्यक् आजीविका, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृती, तसेच सम्यक् समाधीचीही प्राप्ती करील. ज्यांची परिणती आत्मसमर्पणात होते.”

८. “आनन्द, जो भिक्खु सौंदर्याचा मित्र, सहवासी आणि दाट स्नेही आहे तो अशा रीतीने आर्य-अष्टांगिक मार्गाचा विकास करतो आणि त्यापासून जास्तीत जास्त लाभ घेतो.”

९. “सौंदर्याशी मैत्री, सहवास आणि निकट स्नेह ह्यांचे जीवनात सर्वस्वी महत्व कसे आहे हे तुला समजण्यास आनन्द, हाच मार्ग आहे.”

१०. “आनन्द, खरोखर जे प्राणी नाशवंत, मर्त्य, दुःख शोक व आपत्तीग्रस्त आहेत त्यांना सौंदर्याशी मैत्री केल्याने मुक्ती मिळू शकते.”

११. “सौंदर्याशी मैत्री, सहवास व निकट स्नेह ह्यांचे जीवनात कसे सर्वस्वी महत्व आहे ते तुला आता समजू शकेल.”

# उपसंहार

## १. भगवान बुद्धांच्या महत्तेची प्रशंसा

१. भगवान बुद्धांचा जन्म दोन हजार पाचशे वर्षांपूर्वी झाला.

२. आधुनिक विचारवंत आणि शास्त्रज्ञ त्यांच्या विषयी आणि त्यांच्या धम्माविषयी काय म्हणतात ? ह्या विषयावरील त्यांच्या विचारांचा हा संग्रह उपयुक्त व्हावा.

३. प्रा. एस. एस. राघवाचार म्हणतात :

४. "भगवान बुद्धांच्या जन्मापूर्वीचा काळ हा इतिहासातील तमोयुगापैकी एक होता."

५. " प्रज्ञेच्या दृष्टीने ते एक मागासलेले युग होते. धर्म ग्रन्थाविषयी निर्विवाद पूज्यभाव, हे तत्कालीन विचारांचे वैशिष्ट्य होते."

६. "नैतिकतेच्या दृष्टीने ते एक तमोयुग होते."

७. "श्रद्धाळू हिंदूंच्या मते नैतिकतेचा अर्थ म्हणजे धर्मग्रंथांनुसार आचारविधींचे यथातथ्य आचरण."

८. "आत्मत्याग किंवा संकल्पाची पवित्रता ह्यांसारख्या खर्या नैतिक विचारांना तत्कालीन नैतिक अभिज्ञतेत यथायोग्य स्थान नव्हते."

९. श्री. आर. जे. जॅकसन म्हणातात :

१०. "भगवान बुद्धांच्या शिकवणीचे अपूर्व स्वरूप भारतीय धार्मिक विचार धारांच्या अध्ययनात प्रतीत होते."

११. "ऋग्वेदाच्या ऋचांत मानवाचे विचार बहिर्मुख, स्वपरोक्ष आणि देवलोकाभिमुख असल्याचे आपणास आढळते."

१३. "बौद्धधर्माने मानवात प्रच्छन्न असलेल्या अंत:सामर्थ्याच्या शोधाकडे मानवाचे लक्ष वेधले."

१३. "वेदांमध्ये आपणास प्रार्थना, प्रशंसा आणि पूजा आढळते."

१४. "बौद्धधम्मातच प्रथम सदाचारास प्रवृत्त होण्यासाठी मानसिक संस्कारांचे महत्व सांगितलेले आढळते."

१५. श्री. विनवुड रीड म्हणतात :

१६. "जेव्हा आम्ही निसर्गाचा ग्रंथ उघडतो, जेव्हा कोट्यावधी संवत्सरांतील रक्त आणि अश्रूंनी लिहिलेली उत्क्रांतीची कथा आपण वाचतो, जेव्हा जीवन-नियंत्रणाचे नियम आणि विकासाच्या उत्पत्तीस कारणीभूत होणारे नियम आपण अभ्यासतो, तेव्हा परमेश्वर प्रेमरूप असल्याचे मत किती भ्रामक आहे ह्याची आपणास स्पष्ट जाणीव होते."

१७. "प्रत्येक वस्तुत दुष्ट भ्रष्टता आणि स्वछंदी अपव्यय आढळतो. प्राणिसृष्टीत जितके जन्मास येतात त्यांपैकी फक्त अल्पांशच जगतात."

१८. "भक्षण करा आणि भक्ष्य व्हा हा अर्णव, आकाश आणि अरण्याचा नियम आहे. हत्या हा विकासाच नीतिनियम आहे."

१९. श्री. रीड आपल्या 'मानवाचे हौतात्म्य' ( Martyrdom of Man ) ह्या ग्रंथात असे म्हणतात : "भगवान बुद्धांचा धम्म किती तरी निराळा आहे."

२०. डॉ. रंजन रॉय असे म्हणतात :

२१. "एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरक्षेचे तीन सिद्धान्त प्रभुत्वे करून प्रचलित होते. कोणीही त्यांना आव्हान देऊ शकला नाही."

२२. "ते म्हणजे पदार्थ, वस्तुमान आणि कार्यशक्ती ह्यांचे सिद्धान्त होत."

२३. "हे तीनही अविनाशी आहेत असा विचार जोपासणार्या आदर्शवादी तत्वज्ञांची ती हुकमी पाने होती."

२४. "एकोणिसाव्या शतकातल्या वैज्ञानिकांच्या मते हे तीन सिद्धान्त म्हणजे सृष्टीच्या नियंत्रणाचे कारक होत."

२५. "एकोणिसाव्या शतकातल्या वैज्ञानिकांच्या मते हे तीन सिद्धान्त म्हणजे विश्वाचे स्वाभाविक घटक होत."

२६. "त्यांची कल्पना अशी : विश्व हे अविनाशी अणूंनी भरलेले आहे."

२७. "एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस श्री. जे. जे. थॉम्पसन आणि त्यांचे अनुयायी ह्यांनी अणुभंजनास प्रारंभ केला."

२८. "आणि आश्चर्य असे की, अणूंचे तुकडे होऊ लागले."

२९. "ह्या तुकड्यांना ऋणविद्युत्कण असे संबोधण्यात येऊ लागले. ते सर्व समस्वरूप आणि ऋणविद्युतजागृत होते."

३०. "मॅक्सवेलने ज्या अणूंना विश्वाचे अथवा वास्तवतेचे अविनाशी आधारस्तम्भ मानले होते ते खण्डित झाले."

३१. "त्यांचे सूक्ष्म कणांत विभाजन झाले-धनविद्युत् जागृत असे धनविद्युत्कण व ऋणविद्युत् जागृत असे ऋणविद्युत्कण."

३२. "निश्चित न बदलणार्या वस्तुमानाची कल्पना विज्ञानास कायमची अंतरली. चालू शतकात जगात अस समज आहे की, प्रतिक्षणी पदार्थाचा उच्छेद होत आहे."

३३. "भगवान बुद्धांचा अनित्यतेचा सिद्धान्त खरा ठरला आहे."

३४. "विज्ञानाने असे सिद्ध केले आहे की, विश्वाची गती संधीकरण, विभाजन, आणि पुनर्संधीकरण ह्या प्रक्रियांनुसार होत असते."

३५. "आधुनिक विज्ञानाची प्रवृत्ती म्हणजे अन्तिम सत्य, ऐक्य आणि अहंतेची विभिन्नता ह्यांची प्रवृत्ती."

३६. "आधुनिक विज्ञान म्हणजे बौद्धधम्मातील अनित्य आणि अनात्मवादाचा प्रतिध्वनी होय."

३७. श्री. इ. जी. टेलर आपल्या 'बौद्धधर्म आणि आधुनिक विचारधारा' ( Buddhism and Modern Thought ) ह्या ग्रंथात म्हणतात :

३८. "बराच काळ मानवावर बाह्य शक्तींनी अधिकार गाजविला आहे. जर तो खरोखरच सुसंस्कृत व्हावयाचा असेल तर त्याने स्वत:च्या तत्त्वांनी आत्मनियमन करण्यास शिकले पाहिजे. बौद्धधम्म हीच जगातील सर्वप्रथम नैतिक विचारपद्धति आहे की, जिच्यामध्ये मानवास आत्मनियमन करण्याची शिकवण दिलेली आहे."

३९. "ह्यासाठी प्रगतिशील जगाला ही सर्वोच्च शिकवण देण्यासाठी बौद्धधम्माची आवश्यकता आहे."

४०. यूनिटेरिअन ख्रिश्चन पाद्री, रेव्हरण्ड लेस्ली बोल्टन म्हणतात :

४१. "बौद्ध धम्माचे आध्यात्मिक तत्वज्ञान हीच फार सामर्थ्यशाली देणगी आहे, असे मला दिसते."

४२. "बौद्धधम्माप्रमाणे यूनिटेरिअन ख्रिस्ती बांधवही धर्मग्रंथ किंवा मतप्रणालीची बाह्य शक्ती नाकारून मानवाच्या अंतर्यामी असलेल्या मार्गदीपाचा आधार मान्य करतात."

४३. “युनिटेरिअन मताचे अनुयायी येशू ख्रिस्त आणि गौतम बुद्ध हे जीवनाचे उच्च भाष्यकार आहेत, असे मानतात.”

४४. प्रा. ड्वाइट गोडार्ड म्हणतात :

४५. “जगातल्या सर्व धर्मसंस्थापकांत भगवान बुद्धच फक्त एक असे थोर होते, की जे आपली मुक्ती साध्य करण्याच्या मानवी सामर्थ्याचा स्वाभाविक मोठेपणा बरोबर ओळखू शकले.”

४६. “मानवतेची योग्यता उंचावण्याच्या कर्तृत्वात जर खर्या थोर माणसाचे मोठेपण सामावलेले असेल तर खरा थोर असा तथागताशिवाय दुसरा कोण असू शकेल ?”

४७. “त्यांनी मानवाच्या वर दुसरे कोणी संस्थापित करून त्याला हीन न करता प्रज्ञा व मैत्रीच्या शिखरावर ( त्याला ) प्रस्थापित करून उच्चत्व प्राप्त करून दिले आहे.”

४८. “बौद्धधर्म” ( Buddhism ) ह्या ग्रंथाचा कर्ता श्री. ई. जे. मिल्स म्हणतो :

४९. “बौद्धधम्माइतका दुसर्या कोणत्याही धर्मात ज्ञानाच्या मूल्यावर आणि अज्ञानाच्या हीनतेवर भर देण्यात आलेला नाही.”

५०. “आपले डोळे उघडे राखण्याबाबत दुसर्या कोणत्याही धर्मात इतका भर देण्यात आलेला नाही.”

५१. “दुसर्या कोणत्याही धर्मात मनोविकासासाठी इतकी सखोल योजना आखलेली नाही.” ५२. प्रा. डब्ल्यू. टी. स्टेस आपल्या ‘बौद्धधर्मीय नीतीशास्त्र ( Buddhist Ethics ) ह्या ग्रंथात म्हणतात :

५३. “बौद्धधम्मातील नैतिक आदर्श पुरुष जो अर्हत्, तो नैतिक आणि बौद्धिक अशा दोन्ही दृष्टींनी महान असला पाहिजे.”

५४. “तो तत्वज्ञ, तसाच सदाचारीही असला पाहिजे.”

५१. “ज्ञान हे मुक्तीसाठी आवश्यक आहे आणि ते प्राप्त करण्यास अपयश येण्याची जी दोन कारणे आहेत त्यांपैकी अज्ञान हे एक आहे, असे बौद्धधम्माने आग्रहपूर्ण सांगितले आहे ( तृष्णा किंवा लोभ हे दुसरे ).”

५६. “ह्या उलट ख्रिस्ती आदर्श पुरुषाच्या घडणीत ज्ञानाला अजिबात स्थान नाही.”

५७. “संस्थापकाच्या अतात्विक स्वरूपामुळे ख्रिस्तधर्मी विचारधारेत मानवाच्या नैतिक आणि बौद्धिक बाजूत दूरावा निर्माण झाला आहे.”

५८. “जगातल्या दुःखापैकी पुष्कळशी दुःखे दुष्टपणापेक्षा मूर्खत्वाने आणि अंधश्रद्धेने निर्माण झाली आहेत.”

५९. “भगवान बुद्धांनी ह्याला स्थान दिले नाही.”

६०. भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म किती श्रेष्ठ आणि अपूर्व आहे हे स्पष्ट करण्यास एवढेसे पुरेसे आहे.

६१. असे हे भगवान बुद्ध आपले गुरू असावेत असे कोण बरे म्हणणार नाही ?

# २. त्यांच्या धम्माचा प्रसार करण्याची प्रतिज्ञा

१. प्रतिज्ञा आपण करू या-- जीवसृष्टी आहे असीम; ती भवसागरपार नेण्याची;

२. प्रतिज्ञा आपण करू या-- आपणात दोष असंख्य; ते नष्ट करण्याची;

३. प्रतिज्ञा आपण करू या-- आहेत सत्ये अनंत, पूर्ण आकलण्याची;

४. प्रतिज्ञा आपण करू या-- भगवान बुद्धांचा अतुल्य मार्ग, तो संपूर्ण साध्य करण्याची.

## ३. भगवान बुद्धांच्या स्वदेशप्रत्यागमनासाठी प्रार्थना

१. “हे पुरुषोतम, मी मनापासून निष्ठा ठेवतो.
तथागतांवर,ज्यांचा प्रकाश आहे व्याप्त
अनिर्बंध दशदिशांत
आणि माझी निग्रही मनीषा
तुझ्या भूमीत जन्म घेण्याची
२. मनःचक्षूंना घडते तुझ्या भूमीचे दर्शन
तेव्हा त्रैलोक्यातील सर्व भूमीत
तिची श्रेष्ठता जाणतो
३. आकाशासमान सर्वसमावेशक ती
अनन्त आणि असीम
४. सन्मार्गानुसारी तुझी करुणा मैत्री
सर्व भौतिक विश्वात श्रेष्ठ
जन्मजन्मान्तरीच्या पुण्यसंचयाचा परिपाक
५. आणि तुझा प्रकाश सर्वव्यापी
जणू चंद्रसूर्याचा रुपदर्पण
६. माझी अशी प्रार्थना :
तिथे जन्म घेतलेले प्राणिमात्र
तुझ्यासम करोत सत्यघोष
हे बुद्धा !
७. मी लिहतो आहे इथे लेख हा
आणि गातो गीते ही
तुझे व्हावे साक्षात दर्शन
हीच करतो प्रार्थना
८. अखिल प्राणिमात्रासहित
ह्या धन्य भूमीत
होवो मला जन्म प्राप्त.

--एनसायक्लोपीडिया ऑफ रिलिजन अँड एथिक्स
खंड १०. पृ. १६८-१६९